# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

## चरित्र खंड नववा

श्री. चां. भ. खैरमोडे





राष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंब

प्रथमावृत्ती – डिसेंबर, १९८७

प्रकाशक – सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई–४०० ०३२.

– प्रकाशकाधीन

मुद्रक – आरेम प्रिंटर्स, ५, युनिव्हर्सल इंडस्ट्रियल इस्टेट, जे. पी. रोड,
अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५८.

**किंमत चाळीस रुपये**

# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

## चरित्र (खंड ९)

## अर्पण पत्रिका



जन्म २२ सप्टेंबर १८८७ मृत्यु ९ मे १९५९

तथा

पद्मभूषण, भाऊराव पायगौंडा पाटील

यांच्या

ती. आण्णा - रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक

शैक्षणिक व समतेच्या अतुलनीय कार्यासाठी
त्यांना हा खंड अर्पण

— चां. भ. खैरमोडे

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय

# -: निवेदन :-

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने आजवर अनेक ग्रंथ प्रकाशित केले आहेत. त्यात चरित्रे, आत्मचरित्रे यांचाही समावेश आहे. तसेच अनेक ज्येष्ठ व श्रेष्ठ व्यक्तींच्या वाङ्मयाचाही समावेश आहे. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कै. चां. भ. खैरमोडे यांनी १५ खंडात लिहिलेले चरित्र मंडळाने प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला आहे. मंडळाने या १५ खंडांपैकी पहिल्या पाच खंडांना अनुदान दिले असून खंड ६/७, ८ मंडळाने प्रसिद्ध केले आहेत. याच योजनेत खंड ९ ही मंडळातर्फे आज प्रकाशित होत आहे.

इतर सर्व खंडांप्रमाणे वाचक या खंडाचेही स्वागत करतील अशी आशा आहे.

४२, यशोधन
मुंबई–४०० ०२०.
दिनांक २५ फेब्रुवारी, १९८८

**सुरेंद्र बारलिंगे,**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

## चरित्र खंड ९ वा

लेखक :– श्री. चांगदेव भवानराव खैरमोडे

## अनुक्रमणिका


| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रस्तावना | | १ ते ८ |
| प्रकरण | १ ले | ९२ कलमी राज्य | पृष्ठे | १ ते ३५ |
| ,, | २ रे | डॉ. आंबेडकरांचे राजकीय महत्त्व | ,, | ३६ ते ७२ |
| ,, | ३ रे | क्रिप्स मिशन योजना | ,, | ७३ ते १०२ |
| ,, | ४ थे | क्रिप्स मिशन योजना (पुढे चालू) | ,, | १०३ ते ११५ |
| ,, | ५ वे | व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात | ,, | ११५ ते १३५ |
| ,, | ६ वे | व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात (पुढे चालू) | ,, | १३६ ते १७७ |
| ,, | ७ वे | व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात (पुढे चालू) | ,, | १७८ ते २०४ |
| ,, | ८ वे | अस्पृश्यांचा लष्करी पेशा | ,, | २०५ ते ३२५ |
| ,, | ९ वे | गांधी–जीना वाटाघाटी | ,, | ३२६ ते ३३३ |
| ,, | १० वे | बाबासाहेबांचा दक्षिणेतील यशस्वी दौरा | ,, | ३३४ ते ३७२ |
| ,, | ११ वे | बाबासाहेबांचा दक्षिणेतील यशस्वी दौरा (पुढे चालू) | ,, | ३७३ ते ४१७ |

# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

## चरित्र खंड ९

## प्रस्तावना

या ९ व्या खंडांची प्रस्तावना चरित्रकार **श्री. चा. भ. खैरमोडे** यांची नसून, संपादक या नात्याने ते काम मला करावे लागत आहे. पहिल्या खंडापासून ७ व्या खंडापर्यंतच्या चरित्रकाराच्या प्रस्तावनेचा एक खंड होणार आहे. या ९ व्या खंडाचा काल १९३९ पासून १९४५ म्हणजेच घटना समिती निर्माण होईपर्यंतचा आहे.

१९३७ च्या निवडणुकीनंतर आठ राज्यांत काँग्रेस सरकारे अस्तित्वांत आली. १९३९ च्या ऑक्टोबरमध्ये, काँग्रेस मंत्रीमंडळांनी ब्रिटिशांशी असहकार म्हणून, दुसऱ्या महायुद्धाला मदत करायची नाही, असे ठरवून राजीनामे दिले. काँग्रेस राजवटीतून सुटलो म्हणून **कायदे अझाम जीनांनी** १२–२–३९ ला मुक्तिदिन साजरा केला. हिंदुमहासभेसह इतर पक्षांनीही या गोष्टीला पाठिंबा दिला. डिप्रेस्डक्लास असोशिएशनतर्फे **रा. ब. एन्. राजा** व स्वतंत्र मजूर पक्षातर्फे **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांनीही **जीनांना** पाठिंबा दिला.

**म. गांधीनी** या विरोधी पक्षांच्या, काँग्रेस राजवटी विरोधी 'मुक्ती दिन' साजरा करण्यावर एक लेख लिहून, काँग्रेस व त्याला विरोधी असे दोनच पक्ष देशांत राहतील तर जातीयवादाला 'मूठमाती' मिळेल अशी त्या लेखात आशा व्यक्त केली.

**डॉ. बाबासाहेबानी** 'स्वतंत्र मजूर' पक्षतर्फे स्वातंत्र्य–दिन १९ मार्च १९३९ ला साजरा केला. (काँग्रेसने २६ जानेवारी हा स्वातंत्र्य–दिन ठरविलेला होता.) या स्वातंत्र्य दिनाच्या भाषणांत **बाबासाहेबांनी** राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक–धार्मिक व आर्थिक स्वातंत्र्याचे प्रश्न महत्वाचे मानले पाहिजेत; यावर जास्त भर देऊन हिंदू–समाजाची आजची विपन्नावस्था व तिचे मूळ, आर्य संस्कृतीत आहे; ही संस्कृती प्रथम सुधारली पाहिजे असे प्रतिपादन केले. त्यांनी स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या पुढाऱ्यांपेक्षा समाजसुधारकांना अधिक धन्यवाद दिले. या भाषणात त्यांनी राष्ट्रीयत्वाचे विवेचन

करुन, 'हिंदु व मुसल्मान यांचे एक राष्ट्र होईल' असे म्हणणारे लोक फार मोठी चूक करताहेत असे सांगितले.

१८५७ सालाच्या स्वातंत्र्य संग्रामानंतर ब्रिटिशांनी हिंदी जनतेला एकत्र येऊ न देण्याचे धोरण स्वीकारले. एका तोंडाने तुमची एकी करा व आमच्याकडून स्वातंत्र्य घ्या म्हणायचे व दुसऱ्या बाजूने 'फोडा व झोडा' या नीतीने जातीयवाद भडकवीत रहावयाचे! खरे तर ब्रिटिशांना कायद्याच्या बळाने जातीयवाद सोडविता आला असता. परंतु तसे न करता 'एकी करा मग स्वातंत्र्य मागा हे तुणतुणे चालू ठेवले. हे ब्रिटिशांचे धोरण दांभिकपणाचे व फसवेगिरीचे आहे हे सर्व पक्ष जाणून होते.

१८८५ च्या **सय्यद अहमदच्या** देशभरच्या दौऱ्याच्या परिणामामुळे, मुसलमानांमध्ये शिक्षणाचा प्रसार होऊन सरकारी नोकऱ्या त्यांना मिळू लागल्या. संघटना करुन ते सवलती मागू लागले. उलट हिंदुसमाज जातीयवादामुळे, ( ब्राह्मण–ब्राह्मणेत्तर, उच्चवर्णीय–अस्पृश्य ) दुबळा बनत चालला होता. १९३३ साली केंब्रिजचा पदवीधर, **चौधरी रहिमतअली** याने मुसलमान चळवळीचा व १८८५ मधील **सय्यद अहमद** यांच्या भाषणांचा सखोल अभ्यास करुन असा निष्कर्ष काढला की मुसल्मान व **हिंदु** एकत्र रहाणे अशक्य आहे. त्यांचे दोन अलग भाग झाले तर मुसल्मान बहुसंख्य प्रदेशाला **पाकिस्तान** हे नाव द्यावे. हे 'पाकिस्तान' नाव त्याने, बहुसंख्य मुसल्मान वस्तीच्या प्रदेशाच्या नावांची अद्याक्षरे एकत्र करुन तयार केले. परंतु पाकिस्तान म्हणजे नक्की कसे व काय निर्माण करायचे याचा सखोल अभ्यास कुणीच केलेला नव्हता. हिंदू–मुसल्मानांच्या राजकीय हक्कांची रस्सीखेच १९४१ पर्यंत अटी तटीला पोहोचली. ही चमत्कारिक रीतीने वाढलेली परिस्थिती हिंदुस्थानचे विभाजन करण्यास सज्ज झाली.

डॉ. **बाबासाहेबांनी** लीगच्या पाकिस्तानच्या मागणीचा योग्य व सखोल अभ्यास करुन 'Thoughts On Pakistan' हा तर्कशुद्ध विचारसरणीचा ग्रंथ लिहिला. जेव्हां पाकिस्तान व हिंदुस्थान अलग अलग होण्यावाचून पर्यायच उरला नाही, तेव्हां हा ग्रंथ सर्वांना मार्गदर्शक ठरला.

**म. गांधी** व **कायदेअझाम जीना** यांच्या वाटाघाटीच्या वेळी **गांधीजींनी, जीनांना** विचारले की तुम्हाला पाकिस्तान म्हणजे नक्की काय पाहिजे? तेव्हां **जीनांनी** उत्तर दिले कीं तुम्ही **डॉ. आंबेडकराचे** Thoughts On Pakistan हे पुस्तक वाचा म्हणजे कळेल. असा हा Thoughts On Pakistan ग्रंथ **बाबाहेबानी** आपली पहिली पत्नी **'रामू'** तथा **सौ. रमाबाई भीमराव आंबेडकर** यांना अर्पण केला आहे.

१९३५ च्या येवले येथील धर्मांतराच्या घोषणेपासून १९४३ पर्यंत **बाबासाहेबांचा** जगातील प्रमुख व उत्क्रांत धर्माचा सखोल अभ्यास पूर्णत्वास पोहोचला होता. या अभ्यासामुळे भारतभूमीत निर्माण होऊन अतिपूर्वेकडे सर्वत्र पसरलेल्या मानवतावादी

प्रगत अशा **बौद्धधर्माकडेच** त्यांचा ओढा होऊ लागला होता. याच सुमारास बौद्ध जयंती निमित्त त्यांनी एक लेख लिहून, सर्व देवांच्या, संतांच्या व लहानमोठ्या व्यक्तींच्या जयन्त्या साजऱ्या करणाऱ्या भारतीयांनी जगाला **'भारतीय सूर्य'** वाटणाऱ्या **बुद्धाला** विस्मरणाच्या खाईत ढकलले आहे, याबद्दल खेद प्रदर्शित करून ती जयन्ती मोठ्या प्रमाणांत साजरी करण्याचे लोकांना आवाहन केले. याच लेखात **भगवान बुद्धाचे** बाबासाहेबांनी स्वतः अभ्यासलेले चरित्रही थोडक्यात सांगितले आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर** हे श्रद्धावान व दूरगामी नैतिक मूल्यांवर भर देणारे होते. ते म्हणतात, "कोणत्यातरी धर्माचे–तत्वज्ञानाचे, माणसावर दडपण पाहिजे. धर्माचा भावनात्मकतेशी संबंध पोहोचतो आणि कायद्याचा बुद्धीशी, जीवनांत भावनात्मकतेला फार मोठे स्थान आहे. म्हणूनच मी म्हणतो की मानवी जीवनावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणता तरी धर्म हवा! कोणते तरी तत्त्वज्ञान हवे!" बुद्धधर्माच्या श्रेष्ठत्वाबद्दल सांगताना ते म्हणतात, "बुद्धधर्माचा आणखी एक विशेष गुण सांगण्यासारखा आहे. सर्वच धर्म आपल्या गुणांच्या आश्रयाने प्रसार पावलेले नाहीत. मुसलमानी धर्म, तलवारीच्या जोरावर वाढला. खिस्तीधर्म, कायद्याच्या जोरावर वाढला. फक्त एकट्या **बुद्धधर्माचा** प्रसार गुणांमुळे झाला. त्याला तलवारीच्या धारेची अगर कायद्याच्या दंडणाची जरूरी लागली नाही."

**कार्लमार्क्सच्या** तत्त्वज्ञानाबद्दल **लेनिनचे** म्हणणे असे आहे की 'His is the satisfying pholosophy to the lower order. It is a direction not a dogma'. **डॉ. आंबेडकरानाही** हाच विचार बरोबर वाटतो. समाजाला ठराविक ठशाचे वळण लावण्यापेक्षा समाज नेहमी प्रयोगावस्थेत राहिला पाहिजे म्हणजे नव्या कल्पनांना आणि प्रयोगांना त्यांत वाव असला पाहिजे. असे त्यांचे स्पष्ट मत आहे. म्हणून त्यांना धर्म ही अफूची गोळी न वाटता, धर्माला ते श्रद्धेचे ठिकाण मानतात!

१९३९ साली काँग्रेस सरकारने राजिनामे दिल्यातनंर व्हाईसरॉयने भारतातील सत्तेची सूत्रे आपल्या हाती घेतली. एक्झिक्युटिव्ह कौंसिलच्या सभासदांत वाढ करून त्यांत **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा** त्यांनी समावेश केला. या बाबतीत व्हाईसरॉयने आपणाशी (काँग्रेसची) चर्चा करावी. अशी **गांधींनी** त्यांना गळ घातली. याचा, **बाबासाहेबांनी** असा अर्थ लावला की ब्रिटिशांनी अल्पसंख्यांकांच्या हाती सत्ता देऊ नये, असे **गांधीजींना** वाटले असावे. तांत्रिकदृष्ट्या तसे **बाबासाहेबांना** वाटणे सहाजिक असले तरी, **ॲटलींनी गांधीजी** विषयी म्हटल्याप्रमाणे Gandhi is a combination of saint and state politician. त्यांचा अंतरिक हेतू वाईट नसला तरी काँग्रेसच्याच हाती सत्ता यावी असे त्यांना वाटत होते. उलट **बाबासाहेबांना** वाटत होते की अल्पसंख्यकाच्या हाती सत्ता राहिली तर या संधीचा उपयोग समाजातील विषमता दूर करण्याकरता करून घेता येईल.

**डॉ. आंबेडकरांनी** महायुद्धाच्या सुरुवातीच्या घडामोडीबद्दल ब्रिटनच्या व रशियाच्या धोरणावर परखड, पण तर्कशुद्ध टीका केलेली आहे. या युद्धाला अस्पृश्यांकडून मदतीची अपेक्षा करतांना, ब्रिटिशांच्या 'कामापुरता मामा' या नीतीचा समाचार घेऊन कायम स्वरूपांच्या योजनांचा पाठपुरावा केलेला आहे. या योजनेचे एक दृश्यफळ म्हणजे **एम. जी. महार रेजिमेंट** होय.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**, मिळालेल्या संधीचा उपयोग करून पद-दलितांना दारिद्र्याच्या खाईतून वर खेचण्याचा पद्धतशीर प्रयत्न करीत होते. तर त्याचवेळी काँग्रेसने हरिजन सेवक संघाच्या सहाय्याने **बाबासाहेबांच्या** नेतृत्वाला शह देण्याचे व्रत स्वीकारले होते. त्यांच्या अनुयायांतही मतभेदाला सुरुवात झाली होती. परंतु त्यांना या गोष्टींकडे लक्ष देण्यास वेळच नव्हता. तरीही त्यांनी याबाबतीत **श्री. भाऊराव गायकवाडांना** जिल्हावार व तालुकावार मोठेपणा मिरविण्याऐवजी सर्व अस्पृश्यांची एकी व संघटना बळकट केली पाहिजे. ती असल्याखेरीज ही चळवळ पुढे जाऊ शकणार नाही असा पत्राने इशारा देऊन ठेवला आहे. या वेळी त्याचे सारे लक्ष राजकीय सत्तेत अस्पृश्यांना योग्य वाटा मिळविण्याकडे केंद्रित झाले होते.

**क्रिप्स** योजनेत अस्पृश्यांना कुठेच स्थान नाही हे पाहून, भारत मंत्री **ॲमरींना** तार पाठवून "सहा कोटी अस्पृश्यांना राजकीय सत्तेत प्रतिनिधीत्व न देऊन उपहास करणे म्हणजे ब्रिटिश सरकारने विशिष्ट जातींजवळ स्वतःस गहाण ठेऊन घेणे होय" असे कळविले.

या वेळ पावेतो युद्धाची सरशी जर्मनीच्या बाजूने होत होती. जर्मनीचा मित्र जपान, **नेताजी सुभाष बोस** यांच्या सहाय्याने भारताच्या सीमेवर आला होता. आता दोस्त राष्ट्रांचे **रुझवेल्ट** व **चर्चिल** यांना भारताने युद्धाला सहाय्य करण्याची निकड जास्तच भासू लागली. सिंगापूर पडल्यावर ब्रिटनने **क्रिप्सला** शिष्टाईसाठी तातडीने भारतात पाठविले. **क्रिप्सला**, रशियाला, ब्रिटन, अमेरिका इत्यादी दोस्त राष्ट्राकडे वळविण्यास यश आल्यामुळे त्याचे महत्व वाढले होते. ते **चर्चिलला** सहन होत नव्हते. म्हणून **क्रिप्सच्या** शिष्टाईला यश मिळू नये यासाठी **चर्चिलची**, अंतस्थ कारस्थाने चालली होती त्यापैकी एक म्हणजे लीगच्या द्विराष्ट्रवादाला खतपाणी घालणे हे होय! काँग्रेसने तर जाहीर केले की संपूर्ण स्वातंत्र्य व अखंड भारत हेच तिचे ध्येय आहे. या परस्पर विरोधी धोरणांमुळे लीग व काँग्रेस एकत्र येऊ शकत नव्हती व अशा रीतीने भारताला स्वातंत्र्य न देण्याचे **चर्चिलचे** धोरण चालूच होते. **क्रिप्सची** ही शिष्टाई चालू असतांना अमेरिकेच्या **रुझवेल्टने** पाठविलेले **कर्नल जॉन्सन**, हिन्दी पुढाऱ्यांची मने युद्धाला अनुकूल करण्याचे प्रयत्न करीत होते. त्यांनी जेव्हां **बाबासाहेबांशी** चर्चा केली तेव्हां **बाबासाहेब** म्हणाले की या योजनेत अस्पृश्यांच्या हीतसंबंधाचा काहीही संदर्भ नसतांना मी या योजनेला का पाठिंबा द्यावा. जॉन्सनने त्यांना व्यापक दृष्टीकोन स्वीकारण्यास सांगितले. पण बाबासाहेबांनी ते मान्य केले नाही,

**क्रिप्सने बाबासाहेबांशी** जेव्हां चर्चा केली तेव्हां ते, "तुम्ही स्वतंत्र मजूर पक्षातर्फे अस्पृश्यांची कैफियत कशी काय मांडू शकता?" म्हणाले. जातीय राजकारण स्वतंत्र मजूरपक्षातर्फे मांडता येत नाही, हे पाहून **बाबासाहेबांनी** 'ऑल इंडिया शेडयूल्ड कास्टस फेडरेशन्' हा पक्ष काढला. या पक्षाचे नाव, घटना व रूपरेखा **बाबासाहेबांनी** दिल्लीत अधीच ठरवून, आपला मनोदय पत्रांनी आपल्या अनुयायी पुढाऱ्यांना कळविला होता. **बाबासाहेबांच्या** आदेशानुसार 'शेडयुल्ड कास्टस फेडरेशन'चे अधिवेशन १८ व १९ जुलै १९४२ ला नागपूर येथे भरले. त्यात मुख्य पाच ठराव पास करून घेतले. त्यापैकी १) अस्पृश्यांना भरपूर प्रतिनिधित्व मिळावे २) स्वतंत्र मतदार संघातून घटना समितीत प्रतिनिधी निवडावेत. या दोन मुद्यां-वर **क्रिप्सची** योजना **बाबासाहेबानी** नाकारली. अशा रीतीने क्रिप्सची योजना कोणत्याही पक्षाला स्वीकारार्ह वाटली नाही.

दुसऱ्या महायुद्धाच्या सुरवातीला भारतीय कम्युनिस्ट पक्ष रशियाच्या बाजूने म्हणजे ब्रिटनच्या दोस्त राष्ट्रांच्यां विरुद्ध होता, म्हणून येथील कम्युनिस्ट पुढाऱ्यांना ब्रिटिश राज्यकर्त्यांनी तुरुंगात डांबले होते. परंतु १९४२ साली जर्मनीने खुद्द रशियावर जेव्हां स्वारी केली तेव्हां हे युद्ध फॅसिझम विरुद्ध लोकशाहीचे आहे म्हणून, ब्रिटनला म्हणजेच लोकशाहीला मदत केली पाहिजे असे हिंदी कम्युनिस्टांनी जाहीर केले; आणि 'लोकयुद्ध' हे साप्ताहिक काढून ब्रिटनच्या बाजूने प्रचारास सुरवात केली. कॉ. **मानवेंद्र रॉय** यांनीही '**रॅडिकल डेमोक्रॅटिक**' पक्ष, पक्ष ब्रिटिशांच्या आर्थिक सहाय्याने काढून युद्धास सहाय्यक करणाऱ्या प्रचारास सुरवात केली.

हुजूर पक्षाच्या **चर्चिल** साहेबांना, जपानने भारत गिळंकृत केला तरी चालेल, हिंदुस्थानांत रक्ताचे पाट वहिले तरी चालतील., परंतु भारताला स्वातंत्र्य देऊ नये, असे ठामपणे वाटत होते. **क्रिप्सची** शिष्टाई असफल झाली होती, याचा सारा वृतांत **जॉन्सनने रुझवेल्टना** सांगितला. तेव्हां **रुझवेल्टने चर्चिलचे** मन वळविण्या-साठी **फिलिप्सला** पाठविले, पण **चर्चिल साहेब** बधले नाहीत.

पाकिस्तानचा जोर लीगने खूपच वाढविला, हे पाहून कॅांग्रेसच्या पुढाऱ्यांतही मतभेद झाले. कांहीनी, ही लीगची मागणी मान्य करून भारताला लवकर स्वतंत्र करावे असे म्हटले. या बाबतींत **श्री. राजगोपालचारी** यांनी पुढाकार घेऊन **नेहरू, पटेल** व **गांधीजी** यांचे मतपरिवर्तन करण्याचा गुप्त प्रयत्न केला; पण त्याला यश न येऊन **राजाजी** कॉंग्रेसमधून बाहेर पडले. पाकिस्तानच्या मागणीला चोहोबाजूनी खूप प्रसिद्धी मिळू लागली.

व्हाईसरॉयने, ९२ कलमी राज्यात बहुसंख्य–कॉंग्रेसला डावलून, अल्पसंख्यंकांचे प्रतिनिधी घेऊन, राज्यकारभाराची महत्वाची खाती आपल्या हाती ठेवली. आणि सटरफटर खाती हिन्दी मंत्र्यांच्या हाती सोपविली. या ९–७–१९४२ च्या हुकुमान्वये गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्युटिव्ह कौंसिलवर **बाबासाहेबांची** नेमणूक करून मजूर खाते त्यांच्या हाती सोपविले.

या दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी आंतरराष्ट्रीय ऐक्य साधण्यासाठी कॅनडातील क्विबेक शहरात, 'इन्स्टिटयुट ऑफ पॅसिफिक रिलेशन्स' ही संस्था स्थापन झाली होती. त्याचे अधिवेशन ४२ च्या डिसेंबरमध्ये भरणार होते. त्या करता अस्पृश्यांच्या प्रश्नांवर एक प्रबंध पाठविण्याची बाबासाहेबांना विनंती करण्यात आली होती. वर्णद्वेशाच्या आगीत ज्याप्रमाणे निग्रो, ज्यू वगैरे होरपळून निघतात, त्याप्रमाणेच हिंदू धर्मातील ब्राह्मण्य संरक्षक सनातन्यांच्या जातीद्वेशाने अस्पृश्य लोक होरपळून निघत आहेत. असे **बाबासाहेबांनी** या संस्थेला पाठविलेल्या निबंधात स्पष्ट केले. तोच प्रबंध त्यांनी 'Mr. Gandhi and The Emancipation of The Untouchables' या पुस्तिकेद्वारा १९४३ मध्ये प्रसिद्ध केला.

व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात असतांना त्यांनी पिडीत व मजूर यांच्या विकासासाठी अनेक योजनांबाबत अभ्यास करुन, योग्य त्या योजना कार्यान्वित करण्यासाठी मिळेल त्या संधीचा, व्यक्तींचा व अधिकाऱ्यांचा सदुपयोग करून घेतला. उच्च शिक्षणाकरता फॉरेन स्कॉलरशिप्सची तरतूद केली. अस्पृश्यांची कुंठीत झालेली लष्कर भरती करवून कायम स्वरूपाची रेजिमेंट निर्माण करण्याचा पाया घातला. दक्षिण भारतात दौरा करून पददलितांचे व ब्रह्मणेत्तर बहुजन समाजाचे गाऱ्हाणे ऐकून व प्रत्यक्ष परिस्थिती पाहून योग्य ज्ञान करून घेतले, व त्यावर उपायही सुचविले. पद दलितांना एकाच झेंड्याखाली येण्याचे पटवून दिले. तेथील बऱ्याच संस्थांनी, **काँग्रेसचा विरोध असतांनाही बाबासाहेबांना** मानपत्रे दिली. मानपत्रांना उत्तर देतांना भारताला लौकर स्वातंत्र्य मिळाले पाहिजे पण ते बहुजन समाजाच्या हिताला जपणारे लोकशाही राज्य व्हायला पाहिजे, मूठभर ब्राह्मण्यग्रस्तांच्या हाती ते जाऊ न देण्याची लोकांनी खबरदारी घेतली पाहिजे; असा त्यांनी लोकांना इशाराही दिला. या दौऱ्याचे वेळी शे. का. फेडरेशनच्या कार्यकारी मंडळाची बैठक २३ सप्टेंबर १९४४ ला भारली. त्या सभेला **बाबासाहेब**, आमंत्रित पाहुणे म्हणून उपस्थित होते. फेडरेशनची पुढील बैठक कलकत्त्याला भरविण्याचे ठरविले. या बैठकांमधून अस्पृश्यांच्या हीताच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठराव पास झाले.

मजूर मंत्री असतांना, मजूरांसाठी मालकांनी कोणत्या गोष्टी करणे आवश्यक आहे हे ठरवून, त्या राज्य सरकारने अंमलात आणल्या पाहिजेत; असे **बाबासाहेबांनी** ठरवून दिले. देशाच्या विकासाचे दृष्टीने व पदवीपर्यंतचे शिक्षण घेता न येणाऱ्या गरीबांसाठी देशभर शेकडो तांत्रिक शाळा निर्माण केल्या. युद्ध समयाला अनुसरून अशा शाळा हव्याच होत्या, त्याचा बाबासाहेबांनी दूरदृष्टीने विचार केला.

हिंदी राजकारणांतील कोंडी फोडण्याचा प्रयत्न सर **सर तेजबहादूर सप्रू** व **बॅ. मुकुंदराव जयकर** यांनी सुरु केला. त्याला **बॅ. जीनांचा** प्रतिसाद मिळाला नाही. त्याचप्रमाणे **डॉ. आंबेडकरांनीही** आपले प्रतिनिधी पाठविले नाहीत, त्यामुळे राजकीय पेच वाढतच राहिले.

या काळात **बाबासाहेबांचे** वास्तव्य दिल्लीला होते. तेथे ते अस्पृश्यांना राजकीय व आर्थिक सत्तेत योग्य वाटा मिळविण्याच्या प्रयत्नात असतांना, त्यांच्या सामाजिक चळवळीचा बालेकिल्ला–महाराष्ट्र, यातील पुढाऱ्यांत आपसांतील हेवेदावे निर्माण होऊ लागले होते. आपापसांतील भांडणामुळे चळवळीचे नुकसान होईल, सर्व भारतीय अस्पृश्यांची एकी होणे, हीच अस्पृश्यता निवारणाची शक्ती आहे हे बाबासाहेबांचे म्हणणे, त्यांच्या व श्री. भाऊराव गायकवाड यांच्या पत्र व्यवहारावरून स्पष्ट होते.

या व अशा अनेक, बाबासाहेबांच्या कर्तृत्वाने भरलेला हा, **डॉ. भीमराव रामजी आंबेडकर**, चरित्र खंड ९ वा याचे हस्तलिखित माझे पती **श्री. चांगदेव भवानराव खैरमोडे** यांनी आपल्या मृत्यूपूर्वीच (१९७१) पूर्ण करून ठेवलेले होते. ते प्रसिद्ध करण्याचा योग आतां (१९८७) येत आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने हे पंधरा चरित्र खंड प्रकाशित करण्याचे ठरविले आहे. त्यांनी आतापर्यंत ६, ७ व ८ हे आधीच प्रसिद्ध केले आहेत. आता हा ९ वा खंड प्रसिद्ध होत आहे. खंड १० व्या ची (हस्तलिखित) मुद्रणप्रत मंडळास सुपूर्द केलेली आहे. पुढील खंडांच्या मुद्रणप्रती तयार करण्याचे माझे काम चालूच आहे.

मंडळाने हे प्रकाशनाचे काम हाती घेऊन पूर्णत्वास नेण्याचे ठरविले आहे माझे हे हजारो पानांचे लेखन कसे प्रसिद्ध होईल, ही विवंचना कमी झाली आहे. या बद्दल व्यक्तिशः मी व सामाजिक व राजकीय चळवळींचा अभ्यास करणारे सर्वच लोक मंडळाचे ऋणी रहातील.

शेवटी या लेखान प्रपंचाचा चरित्रकाराचा एक उतारा मी खाली देत आहे. :–

**'घरादारावर, संसारावर आणि सुखदुःखावर (स्वतःच्या) तुळशीपत्र ठेऊन सतत विद्याभ्यास, संशोधन, मनन व लेखन करणारी, केवळ विशाल बुद्धीची, प्रबुद्ध व्यक्ती म्हणून; अगर केवळ सामाजिक क्रांतीचा तत्त्ववेत्ता व उद्गाता म्हणून, अथवा पददलितांच्या अंतःकरणांत माणूसकीच्या जीवनाचा रटरटणारा लाव्हारस उत्पन्न करणारा किमयागार पुढारी म्हणून; किंवा समाजिक क्रांतीतून राष्ट्रव्यापी शांती उत्पन्न करणारा धार्मिक द्रष्टा म्हणून; ज्यांना या (महामानव) बाबासाहेबांच्या चरित्राचा अभ्यास करण्याची अगर त्यावर ग्रंथ लिहिण्याची इच्छा होईल, त्यांना या सर्व चरित्र खंडांतून भरपूर माहिती मिळेल व इतर माहिती मिळविण्याचे मार्ग सापडतील. माझ्यानंतर जे लेखक या क्षेत्रात उतरतील त्यांना हे खंड उपयुक्त ठरतील, याचे मला समाधान, बाकीचे उर्वरीत खंड प्रसिद्ध होतील तेव्हां होईल. गेल्या कित्येक वर्षांच्या परिश्रमांचे फळ काय ते एवढेच माझ्या हाती लागेल !**

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष **डॉ. सुरेंद्र बारलिंगे** माजी सचिव **श्री. सु. द्वा. देशमुख** व सांप्रतचे सचिव **श्री. पं. रा. पाटील**

आणि या खंडाचे काम प्रत्यक्ष हाताळणारे **श्री. सावे** व मंडळाचा इतर कर्मचारीवर्ग यांच्या सहाय्याशिवाय हे काम पूर्णत्वाकडे वाटचाल करूच शकले नसते म्हणून मी त्यांची आभारी आहे. त्याचप्रमाणे 'आरेम' प्रिंटींग प्रेसचे मालक **श्री. बाळ देसाई** यांनी सुबक छपाई करून दिल्याबद्दल त्यांचेही आभार मानते.

या खंडाची मुद्रणप्रत तयार करण्यात **डॉ. विनिता बोराळे, डॉ. प्रज्ञा सावंत, श्री. भंडारे, कु. हेमा भंडारे** यांचे मला अतोनात सहाय्य झाले. त्याबद्दल मी त्यांचेही आभार मानते.

**या ग्रंथाच्या व इतर (श्री. चां. भ. खैरमोडे यांच्या लेखनाचे) प्रकाशनांत वेळोवेळी मला पुष्कळांचे मार्गदर्शन घ्यावे लागले. त्यापैकी प्रा. नलिनी पंडीत, प्रा. य. दि. फडके, प्रा. डॉ. लिला साळगांकर, डॉ. वि. द. खोबरेकर, प्रि. पी. टी. बोराळे, श्री. तु. हि. म्हात्रे, श्री. सुहास सोनावने व श्री. निवृत्ती भंडारे यांचा** आवर्जून उल्लेख करायला हवा. या व इतर अनेक सहाय्यकर्त्यांची मी आभारी आहे.

माहितीच्या दृष्टीने 'घटना समिती' वरील खंड निघाल्यानंतर अभ्यासू वाचकांची, १९३९ ते १९४४ च्या कालखंडातील **बाबासाहेबांच्या** कामगिरीबद्दल उत्सुकता वाढून ती माहिती विचारणारी पुष्कळ पत्रे मला आली. त्या अतुरतेने वाट पहाणाऱ्या जिज्ञासूंना हे पुस्तक लवकर देता आले नाही म्हणून त्यांची मी क्षमा मागते.

**शेवटी, चरित्रकार चां. भ. खैरमोडे यांनी प्रदर्शित केलेल्या इच्छेनुसार हे पुस्तक सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरो! एवढीच इच्छा करणे माझ्या हाती आहे. चरित्रकाराच्या स्मृतीदिनी १८ नोव्हेंबर ला हा ग्रंथ प्रकाशांत येवो!**

१४७–अ, हिंदु कॉलनी
दादर, मुंबई–१४.

१–९–८७ — **द्वारका खैरमोडे**

(प्रा. न. र. फाटक यांचे चरित्रकारांचा गौरव करणारे पत्र)

नवी भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

ता. ८–५–६५ शनिवार

**श्री. चांगदेव भवानराव खैरमोडे** यांच्या एकसष्टीच्या समारंभाच अध्यक्ष म्हणून आपल्या सत्कार समितीने केलेल्या पाचारणाबद्दल मी माझे आभार मनःपूर्वक व्यक्त करतो.

हल्लीच्या जीवनकलहांत एखाद्याला साठावे वर्ष संपून एकसष्टावे वर्षात दाखल होण्याचा योग लाभावा ही खरोखरीच अभिनंदन करण्यासारखी घटना असून त्यांचा जाहीर सत्कार करणे हे एक समाजाचे कर्तव्य आहे. त्यातल्या त्यात श्री. खैरमोडे हे ज्या महाराष्ट्रीय समाजविभागात जन्मले, त्या समाजाची आजतागायतची दुःस्थिती विचारात घेतल्यास ते तर एकसष्टीनिमित्त जास्तच अभिनंदनीय ठरतात. श्री. खैरमोडे यांनी (उच्च) शिक्षण घेतले, निर्वाहाचा व्यवसाय केला, समाजाचा प्रत्येक घटक हेच करतो. परंतु त्यांनी **डॉ. भीमराव रामजी आंबेडकर** विस्तीर्ण चरित्र लिहिण्याचे काम हाती घेतले हा त्यांच्या आयुष्यातील महत्वाचा भाग आहे व त्याच्या योगाने श्री. खैरमोडे यांचे नांव महाराष्ट्रांत चिरस्मरणीय होऊन राहील. **त्यांनी लिहिलेले चरित्र हे केवळ आंबेडकर या एका व्यक्तीचे नसुन अखिल महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासाचे एक नवे अंग स्पष्टपणे जनतेच्या निदर्शनास आणणारे ते एक महत्कार्य आहे.** या चरित्र ग्रंथाचे प्रसिद्ध झालेले खंड जो कोणी अस्थेने दृष्टीखाली घालील त्याला **श्री. खैरमोडे** यांच्या क्लेशकारक परिश्रमांची सहज कल्पना करता येईल. त्यांत आलेला पत्रव्यवहार हा कालांतराने महाराष्ट्रातील सामाजिक समतेच्या इतिहासाचे बहुमोल साधन समजला जाईल. चरित्रासाठी जवळचा पत्र व्यवहार जतन करणे आणि इतरांचा मिळविणे. हे काम सोपे नाही, फार जिकिरीचे, सहनशीलतेचे, सत्व पाहणारे असते. ते काम शक्य तेवढे जास्तीत जास्त **श्री. खैरमोडे** यांनी पार पाडलेले आहे. त्यांच्या चरित्रलेखनाने मराठी चरित्रसाहित्यात उत्तम प्रकारची भर पडेल यांत संशय नाही.

**श्री. खैरमोडे** यांच्या लेखनकार्याकडे पाहिले म्हणजे संधी मिळाल्यास जो समाज अस्पृश्यतेच्या शिक्षेने हजारो वर्षे इतर समाजापासून दूर पडला होता, ज्याला विद्येपासून सक्तीने दूर ठेवले होते त्या समाजातील व्यक्ती काय करू शकतात, याचे हे एक डोळ्यात भरण्याजोगे उदाहरण **श्री. खैरमोडयानी** निर्माण केल्याबद्दल शंका राहत नाही. राजकीय गुलामगिरीहून शेकडो पटीने दुर्धर असलेल्या सामाजिक गुलामगिरीने सडत पिडत असलेल्या देशबांधवांचा समूह आता कुठे थोडासा त्या भयंकर गुलामगिरीच्या काटेरी बंधनांतून सुटण्याच्या पंथास लागला आहे. **ही सुटका निरर्थक नाही.**

अशी सुटका देशाच्या एकंदर उत्कर्षाला हातभार लावील. या भवितव्याचे एक प्रसाद-चिन्ह म्हणजे श्री. खैरमोडे यांचे लेखन. त्यांची एकसष्टी गौरवपूर्वक साजरी करणारांत जे तरुण होतकरू असतील त्यांनी श्री. खैरमोडे यांचा कित्ता गिरविण्याचा संकल्प या प्रसंगी करावा. येथे कित्ता म्हटले तो फक्त लेखनाचाच नव्हे. सर्व प्रकारच्या लोकोपयोगी उद्योगाचा कित्ता या शब्दात अंतर्भाव आहे. ज्याचा जो विषय असेल त्याने त्या विषयाची सिद्धी मिळवून तिचा लाभ सामान्य जनतेस देण्याचे ध्येय बाळगावे हा येथे कित्ता गिरविणे या शब्दांचा अर्थ आहे श्री. खैरमोडे यांनी लेखणीच्याद्वारे लोकसेवा चालविली आहे. विद्यार्थी किंवा विद्यासंपन्नानी निराळे साधन हाती घ्यावे, पण आपल्यावर समाजाचे ऋण आहे व ते सामाजिक हिताच्या उद्योगाने फेडले पाहिजे हे श्री. खैरमोडे यांच्या कामगिरीचे तात्पर्य आहे.

मी श्री. खैरमोडे यांना आशीर्वाद देतो की, त्यांना उदंड आयुष्य लाभावे, ते आयुष्य सुखाचे, निरोगी आणि कार्यक्षम असावे. त्यांच्या हातून सदैव लोकसेवा होत राहावी; आशीर्वाद दिला. त्याबरोबरच एक लहानशी सूचना करावीशी वाटते की आशीर्वाद उत्तेजन देतो, पण कार्याचे साफल्य हे ज्याच्या त्याच्या श्रमावर अवलंबून असते हे विसरू नये.

मला उपस्थित राहणे शक्य नाही म्हणून हा लेखन प्रपंच केला आहे. 'जेथे धर्म तेथे जय' न्यायाने जेथे गुणगौरव तेथे मी शरीराने नसलो तरी मनाने उपस्थित आहे असे समजावे. सत्कार समितीने मुंबई मराठी साहित्य संघाच्या सहकार्याची अपेक्षा धरली ती या आशीर्वादाने पूर्ण करावी अशीही एक या आशीर्वादामागे भावना आहे. कळावे

आपला हिताकांक्षी

न. र. फाटक

# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र

## खंड नववा

### प्रकरण १

## ९२ कलमी राज्य

काँग्रेसच्या मंत्रिमंडळांनी सात प्रांतातील कायदेमंडळांत बहुसंख्य काँग्रेस सभासदांच्या पाठिंब्याने युद्धविषयक ठराव मंजूर करून घेतले आणि व्हाइसरॉयतर्फे अगर गव्हर्नरतर्फे काही खुलासा सदर ठरावाला उद्देशून प्रसिद्ध झाला नाही म्हणून पूर्वी काँग्रेसने आदेश दिल्याप्रमाणे काँग्रेस मंत्रिमंडळांनी गव्हर्नरकडे राजीनामे दिले. मद्रास प्रांताने पहिल्यांदा राजिनामा (२७ ऑक्टोबर) दिला. नंतर सहा प्रातांनी राजिनामे दिले. व्हाइसरॉय साहेबांनी १९३५ च्या कायद्यांतील ९२ कलमान्वये प्रत्येक प्रांतात गव्हर्नर व सनदी नोकरांचे सल्लागार मंडळ असे मिळून राज्यकारभार चालू केला.

सात प्रांतातील काँग्रेस मंत्रिमंडळांनी राजिनामे दिल्यानंतर बॅ. जीना यांनी असे निवेदन प्रसिद्ध केले की, मुसलमान लोक काँग्रेसच्या जुलमी राज्यसत्तेपासून मुक्त झाले, याप्रीत्यर्थ मुसलमानांनी सर्व भारतात २२-१२-३९ हा दिवस मुक्तीदिन म्हणून साजरा करावा. या निवेदनावर काँग्रेसपक्षाचे व इतर काही पक्षाचे पुढारी यांनी कडक टीका केली. गांधीजींनीही टीका केली. काँग्रेसच्या राजवटीत मुसलमानांचा भयंकर छळ व गळचेपीही झाली. हा जीनांचा दावा अतिशयोक्तीपूर्ण आहे अशी या टीकाकारांची भूमिका होती. ती भूमिका खोटी आहे. आणि या बाबतीत सत्य काय आहे. याची शहनिशा पुरविण्यासाठी ब्रिटिश सरकारने रॉयल कमिशन नेमावे असे या टीकाकारांना उत्तर देताना जीनानी मागणी केली. यासंबंधी त्यांनी अत्यंत विस्तीर्ण निवेदन असोसिएटेड प्रेसला १३-१२-३९ ला दिले. त्या निवेदनांत त्यांनी मुसलमानांवर काँग्रेस राजवटीत कसे अन्याय झाले, याची थोडीशी माहिती दिली "वंदे

मातरम्' राष्ट्रगीत मुसलमान विद्यार्थ्यांनी म्हणण्याची व काँग्रेसचा तिरंगी झेंडा याला नमस्कार करण्याची जबरदस्ती आणि उर्दू ऐवजी हिंदी शाळेत शिकण्याची मुसलमान विद्यार्थ्यांवर बळजबरी, मध्य प्रांतातील विद्यामंदिरांतून मुसलमान विद्यार्थ्यांवर हिंदू देवदेवतांची स्तोत्रे म्हणण्याची केलेली सक्ती वगैरे बाबींचा उल्लेख जीनांनी या निवेदनात केला. मी लाहोर येथील १९३७ डिसेंबरमधील सेशनमध्ये माझ्या भाषणाला या गोष्टीला तोंड फोडले, आणि १९३८ डिसेंबरमधील पाटणा येथील सेशनमध्ये प्रांताचे गव्हर्नर आणि गव्हर्नर जनरल यांनी मुसलमानांवर होत असलेल्या अत्याचारांचे उच्चाटन आपले जादा हक्क वापरून करावे, असा ठराव मंजूर केला. याबाबतीत लीगतर्फे ठराव व तक्रारी सरकारकडे वेळोवेळी पाठविल्यानंतर व्हाईसरॉयनी १७–४–३९ला मला कळविले की सरकार याबाबतीत लक्ष घालीत आहे. त्यांनी नंतर गांधीजींना विनंती केली की लीग व काँग्रेस यांत सख्य घडवून आणा. या उलट बिहार काँग्रेसने एक गुप्त पत्रक काढून गया जिल्हा काँग्रेस कमिटीला पाठविले. त्या गुप्त पत्राची नक्कल 'स्टार ऑफ इंडिया' या वर्तमानपत्राच्या दि. ४–१२–३९ च्या अंकात प्रसिद्ध केलेली आहे. त्या गुप्त पत्रात असे सुचविले होते की, काँग्रेसमधील मुसलमानांनी लीग विरुद्ध ओरड करून तिचे महत्त्व कमी करावे. लीग विरुद्ध झालेल्या प्रचारामुळे आणि गांधीजींनी हरिजनामध्ये लीगला साम्राज्यशाहीची हस्तक म्हटल्यामुळे मुसलमानांच्या छळावर उपाय काँग्रेस करू इच्छित नाही, असे सिद्ध होते. काँग्रेस राजवटी विरुद्धचे लीगचे आरोप खोटे आहेत असे काँग्रेस प्रांतिक सरकारांनी यापूर्वी जाहीर केलेले आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करता रॉयल कमिशन नेमणे जरुर आहे. या कमिशनचे अध्यक्ष लॉर्डस ऑफ दी प्रिव्ही कौन्सिल व सभासद न्यायखात्यांतील लोक आणि हायकोर्टाचे जज्ज असावेत.

बॅ. जीनांच्या या निवेदनांचा सारांश गुरुवारी १४-१२-३९ च्या टाइम्स ऑफ इन्डियाने (पान ७–८) प्रसिद्ध केला तो असा :

*"Mr. Jinnah's Demand, Royal Commission, Investigation of complaints, Covernors criticized.*

The appointment of a Royal Commission by the British Government to investigate his charges against the Congress ministries is demanded by Mr. M. A. Jinnah. In a statement he says, "A great deal of unnecessary controversy has arisen over my appeal to Muslims, to celebrate December 22, as a day of deliverance from oppression, and since the guilty do not admit their guilt, and the public memory is short, I consider it advisable simply to trace the events that led to and the reasons that prompted this appeal.

"To commence with, the suggested resolution says nothing more or less than that has been said on many previous occasions. The very first complaint against congress rule, was made by me, after they took office, and, in my speech at the Lucknow session of Muslim League of 1937, I complained against the compulsory singing of *Bande Mataram* the question of the congress flag and the supplanting of Urdu by Hindi, and even then I called upon the Governors to exercise their special powers.

"From then onwards the congress caucus, like the provincial steam-roller, gathered speed, and complaints of oppression began to pour into the central office. These became so numerous that the council decided to appoint in march 1938 the Pirpur committee, which after an elaborate and painstaking investigation in all the congress provinces. submitted its report at the Patna session, in Deceber 1938.

## Patna Resolution

The following resolution was passed there as a full session:—

"That having regard to the atrocities that have been committed and that elementary rights of the Muslims have been trampled upon in a systematic manner in Bihar, U.P. and the C.P. and that the Governments of these provinces have failed to redress their grievances or protect even the elementary rights of Mussalamans in these provinces, in spits of all constitutional methods adopted so far by the Muslims, this session of all India Muslim League is, therefore of opinion that the time has now come to authorise the working committee of the All India Muslim League to decide on, and report to direct action, if and when necessary.

"During this time in order to prevent direct action being resorted to, I was repeatedly urging both the Governors and the Governor-General, in person and by corres-

pondence, to exercise their special powers and to take executive action to safeguard the interests of the minorities placed by the constitution under their protection, and it was only on April 17, 1939 that the Viceroy intravated that he would take up the matter.

## Congress Attitude

As regards the congress ministries our complaints were dismissed as false, frivolous and vexations and even Mr. Gandhi, before whom I placed our charges as far back as May 1938, side-tracked the question by writing.

"I believe, the congress committees have been advised to avoid as far as possible all occasions of friction over *Bande Mataram* and flag.... The first two demands have come upon unexpectedly from the public. Nevertheless they undoubtedly have to be remained on their merits, but it does not appear to me to be fair to anticipated the result of the joint committees, which I hope will come into being without and hitch..... With no redress, Muslims in certain provinces grew resistive and in the C.P., ignoring the working committee, altogether resorted to direct action over the *Vidya-Mandir* scheme.

"I may state here that at no stage, did the working committee favour or encourage direct action, and on request being received from Bihar, in July 1939 for permission to launch direct action, the working committee instructed the Bihar Muslim League to place the whole case before the Governor-General, the Governor and the Prime Minister, and to report later the result of their representation. Similar advice was given to the other Muslim Leagues who contemplated similar measures.

*Mr. Jinnah defends 'Deliverance Day' proposal, Talks not affected. Expressing relief, not Joy.*

"Complaints however continued to pour in, and on

August 27, 1939, the council of the League, at Delhi, passed the following resolution:—

"(a) Resolved that this council, while deploring the the policy of the British Government towards the Muslims of India, by attempting to force upon them against their will a constitution and, in particular a federal scheme as embodies in the government of India Act of 1935, which allows a permanent hostile communal majority to trample upon their religions, political, social and economical rights, and the utter neglect and indifference shown by the Viceroy and the Governors in the congress governed provinces in exercising their special powers to protect and secure justice to the minorities.

"In September war was declared, and on the seventeenth of that month, the working committee reaffirmed the above mentioned resolution as one of the fundamental conditions of Muslim support, and the viceroy reaching the gravity of the situation pressed Mr. Gandhi and the congress leaders to come to an agreement with the Muslim League in the provincial sphere on a condition basis for atleast the duration of the war.

### Mr. Prasad's Offer

"Consequently, Babu Rajendraprasad wrote on October 5, that the congress was prepared to request Sir Maurice Gu or some other suitable person to investigate only any specific charges which the Muslim League might formulate against the ministries of the congress governed provinces.

"I considered this proposal unsound and unpracticable for the following reasons :—

First legally and constitutionaly the congress working committee has no place or power in the constitution, secondly, the complaints of the Muslims, and other minorities were directed against the Governments of certain provinces who were responsible to the legislatures and the

electorates and not to the Working Committee; thirdly, the proposed resolution of the working committee could not confer upon the contemplated tribunal the necessary power summour witnesses and administer oaths. Nor could the tribunal compel the production of documents that might be required and finally I wished to know to whom the tribunal was to report and who would be the final authority to take action, if any against the ministers.

"If this final authority was the working committee, I point out that, in my opinion, it was the working committee itself that was primarily responsible for the injustice and the wrongs committed, and I also could not believe that any adequate action would be taken against the ministries in view of the fact that the working committee had already decided that the Muslim League's charges were false and unfounded.

### Request to Viceroy

"I also informed Babu Rajendra Prasad that I had already placed the whole matter before the Governor-General, and had requested him to take executive action without delay to safeguard and to secure justice for the minorities.

"I must explain, at this stage, that I have never asked either the Governor-General or the Governors to act as a judicial tribunal as is suggested in Mr. Gandhi's appeal to me. What I asked them to do was to take executive action to redress our grievances and by intervention, to secure justice and fairplay.

Mr. Gandhi's appeal to me to await the Viceroy's opinion is, therefore, based on a wrong assumption and, even intervention is not possible, now the Congress Ministries have resigned. For what then should I want ?

"However, just after my letter to Babu Rajendra Prasad, the congress ministries resigned — to the very natural

relief of Muslims and other minorities — and I immediately decided to appeal for the observance of a day to express our relief and to show it's intensity in a manner that would force the ears that had hither to been deaf to listen to us. I might point out that if our appeals had been heard at the proper time, no such action on our part would now be necessary.

"This appeal has been various by described as 'ill-timed', 'provocative' and 'anti-national' and the Muslims are asked to gloat over the departure of elected Governments and to welcome an official administration.

### Spirit of Humanity

"I gladly deal with these points, As regards the time the appeal could not appear before it did for reasons already made public and its connection or effect on Pandit Jawaharlel Nehru's visit is dealt with by me at the end of my statement.

As regards provocation, let me point out the words of my appeal. 'I trust that all public meetings will be conducted in an orderly manner, with all due sense of humility, and nothing should be done which will cause offense to any community....' However to make quite clear my insistence that the day is observed in such spirit, I again state that I look to all District and primary leagues to ensure that the meetings are held in that spirit."

"Let there be no hartals, processions or any such demonstration, but let a spirit of humility and a mood of reflection prevail. There is relief and gratitude in our hearts, not joy or triumph.

"Thirdly it is extremely unfair and unjust to contend that the Muslims welcome the present administration. It is true that we urge upon them to inquire into our grievances and to redress them, but this is only because it is in their power to do so.

"On the other hand my appeal emphasises that prayers should be offered, for the establishment of truly popular Ministries, which would do even justice to all communities and interests.

"But there is one statement on my appeal that I cannot let pass coming as it does from such an authoritative source as the chairman of the Congress particularly committee. I am told that all our charges are totally false and unwarranted, and that was to be expected, lent I must take notice of his declaration :—

"Furthermore every premiere at my instance had invited his Governor unhesitatingly to intervene in matters affecting the rights and the interests of the minorities whenever the Governor felt that the action of the Ministry was not correct. When Mr. Jinnah recently made the charges, I again instructed every premiere to invite his Governor's attention to them as they also affected him, and I was informed that the Governors considered the charges unwarranted.

"The above statement raises a very grave issue, for it makes the Governor accessories to the fact. Let me inform Mr. Vallabhbhai Patel that me have overwhelming evidence in support of our case, and far from shirking an inquiry, as is suggested I insist that a thorough inquiry should now be made by a properly constituted tribunal, invested with all necessary powers.

*"And I now ask that a Royal Commission be appointed by the British Government, of a purely judicial personnel and composed of judges if His Majesty's High Court and under the chairmanship of one of the Law Lords of the Privy council..*

"I cannot conceive of any objection to this demand from the Congress or any other quarter, and call upon them to support my request.

## Example and Precept

"Before concluding I must deal with Mr. Gandhiji's appeal, and Pandit Jawaharlal's visit. I would have been inclined to respond to Mr. Gandhiji's appeal had he and other Congress leaders practised what they preached about the necessity for a cordial atmosphere in which a communal agreement might be arrived at. May I remind them that a regular crusade, begining with Mr. Gandhi himself, is being carried out against the League, since the Delhi conversation took place.

"Mr. Gandhi himself, since my conversation with him in Delhi in October, has, in the *Harijan* described the *League* as an agent of imperialism, as an obstacle and an obstruction in the way of India's freedom and progress and has stated that the Muslim League is insatiable in it's demand since it can always look to the British Government to fulfil them. He even threatens the Muslims that though they may be holding up the country at present, they cannot do so far long.

## Congress Propanganda

"Further, the congress press and the organisations are carrying on propaganda all over India and abroad, discrediting the League and attempting to divide the ranks of the Muslims. Let me give one out of many examples in my possessions.

"Mr. Gandhi is perhaps not aware that a secret letter from the Bihar Provincial Congress Committee, the present Congress President's own Province, issued from the Sadaquat Ashram, P.O. Digha Ghat, Patna and adressed to the President of the District Congress Committee, Gaya, which was published in the *Star of India* on December 4, and which remains uncontradicted says :

"Your are, I hope, convinced by this time that the one outstanding question before us awaiting solution, and thus

preparing pattern for our forward move towards our goal of self-Government, is the attainment of Hindu-Muslim unity. To achieve this end, it is essential that Congress minded and truly nationalist, Mussalmans of Hindustan have got to become vocal, so that the stopper to all progress applied by the League should disappear.

### Result of Propaganda

"It is hardly necessary for me to point out that daily propaganda on these lines has the exact result that Mr. Gandhi fears will ensure from my single appeal.

"Now to deal with the chief objection raised against my appeal that it will prejudice the communal talks taking place between Pandit Jawaharlal Nehru and myself. Let me inform the public that, rather than approaching a settlement as has been so readily and widely assumed such discussions have yet to commence. The discussions between him and other congress leaders and myself were of a purely political nature and related to the political demands made by the congress at that time. This has been stated by congress leaders themselves. I informed them at Delhi that I could not associate the Muslim League with any joint demand to the British Government, till a Congress-League agreement had first been arrived at.

"I also informed them that no such agreement was posible till the Muslim League was recognised as the authoritative and representative organisation of the Musalmans of India, and as this position was not acceptable to them, the talks ended on this point, and on Pandit Nehru expressing a desire to see me again. I gladly agreed, and I look forward to his visit.

*—Associated Press"*

बॅ. जीनांची मुक्तिदिन साजरा करण्याबद्दल जी सूचना केलेली आहे त्याबद्दल आपले मत काय आहे हे अजमाविण्यासाठी टाईम्सच्या प्रतिनिधीने डॉ. आंबेडकर यांची मुलाखत बुधवारी (१३-१२-३९) घेतली तेव्हा बाबासाहेब म्हणाले की, "स्वतंत्र

मजूर पक्षाचा जीनांच्या पाठिंबा आहे. ही सर्वांनी पाठिंबा देण्यास योग्य आहे. तीत हिंदूंच्याविरुद्ध असे काही नाही" हा मुलाखतीचा मजकूर जीनांच्या उपर्निष्ट निवेदनाच्या खालीच टाईम्सने गुरुवारी (१४-१९-३९) पान ८ वर केला असा :

**Dr. Ambedkar's Support**

"The suggestion of Mr. M. A. Jinnah, President of the All India Muslim League, to observe December 22 as a day of Deliverance from the congress ministries in the country, is favoured by Dr. B. R. Ambedkar, leader of Independent Labour Party.

In the course of a talk with a representative of this paper on Wednesday, Dr. Ambedkar said Mr. Jinnah's idea deserved support. There was nothing "anti-Hindu" about observance of the day."

रावबहादूर एम्. सी. राजा, एम्. एल्. सी, प्रेसिडेंट ऑल इंडीया डिप्रेस्ड क्लासेस असोसिएशन, यांनीही जीनांच्या मुक्तिदिन समारंभाला पाठिंबा दिला. कॉंग्रेस च्या राजवटीत अस्पृश्य वर्गाचे फार नुकसान झालेले आहे. रॉयल कमिशनने सर्व अल्पसंख्यांक जातीवर झालेल्या अन्यायांची कसून चौकशी करावी, असे राव बहादूरांनी स्पष्ट केले.

"*Muslim Demand For Inquiry, Depressed Classes welcome,* Madras, December 16 — "so far as the depressed classes are concerned, they not only welcome Mr. Jinnah's demand for a Royal Commission, but they associate themselves entirely with it," says Rao Bahadur M. C. Rajah, M.L.A., President of the AII India Depressed Classes Association, in the course of a statement, to the press, he adds that they too have suffered wrongs at the hands of the congress ministries.

Rao Bahadur Rajah trusts that when the Royal Commission is appointed the scope of the commission will be extended to all weak and minority communities, including the depressed classes."

—*Times,* Monday, 18-12-1939.

सोमवारी, १८-१२-३९ ला टाईम्सच्या प्रतिनिधीने पुनः डॉ. आंबेडकरांची मुलाखत घेतली, तेव्हा, बाबासाहेबांनी खुलासा केला की, मुक्तीदिन समारंभात स्वतंत्र मजूर पक्ष भाग घेणार, या गेल्या आठवड्यात प्रसिद्ध झालेल्या बातमीबद्दल अनेक शत्रूमित्रांनी मला खुलासा विचारलेला आहे. तो खुलासा मी आता करतो. काँग्रेसच्या राजवटीत मुसलमानांना जे अन्याय सहन करावे लागले त्याबद्दलचा धिक्कार जीनानी जळजळीत भाषेत व्यक्त केलेला आहे. अस्पृश्यांना मुसलमानांपेक्षा जास्त प्रमाणात अन्याय सहन करावे लागले. याबद्दल मी जीनांच्या भाषेपेक्षा जास्त जळजळीत भाषा वापरून यापूर्वीच काँग्रेस राजवटीचा धिक्कार करावयास हवा होता. या बाबतीत जीनांनी माझ्यावर मात केली हे मान्य करावयास मला लाज वाटते. रॉयल कमीशन पुढे जीना काँग्रेसवरील त्यांच्या १०० पैकी ५ आरोप सिद्ध करु शकतील मी मात्र काँग्रेसवर जे आरोप अस्पृश्यांच्या संबंधी केलेले आहेत ते १०० पैकी १०० सिद्ध करून दाखवीन, असा बाबासाहेबांच्या खुलाशाचा आशय होता. तो प्रसिद्ध करताना पार्शी जमातीतील ज्येष्ठ व श्रेष्ठ पुढारी यांचाही जीनांच्या मुक्तिदिन समारंभाला पाठिंबा आहे, असा टाईम्सने प्रथम खुलासा केला.

*"Dr. Ambedkar To Join Muslim Celebration Deliverance Day" : Support of Many Parsis.*

Dr. B. R. Ambedkar, leader of the Independent Labour Party, has decided to join in the celebration of "Deliverance Day" on Friday next.

A number of Parsis have, already expressed their eagerness in their individual capacity, to cooperate with Mr. M. A. Jinnah, President of the All India Muslim League, in making the day a success.

The sub-committee appointed by the Parsi Community a few months ago at a meeting held at Sir Cowasjee Jehangir Hall to protect against the Congress policy of prohibition will consider on Tuesday the invitation extended to it to participation in the observance of "Deliverance Day". The sub-committee consists of nearly 50 leading Parsis including Mr. M. P. Khareghat, President of the Parsi Panchayat, Sir Cowasji Jehangir, Sir H. P. Mody and Sir Byramjee Jeejeebhoy.

Dr. Ambedkar, in a talk with a representative of this Paper on Monday said : "Ever since The Times of India

published my cryptive reply to it's representatives only last week, supporting Mr. Jinnah's appeal for the observance of "Deliverance Day", I have had numerous inquiries from friends as well as foes to explain what I meant. I am, therefore, obliged to explain my position.

"When I read Mr. Jinnah's statement, I felt ashamed to have allowed him to steal a march over me and rob me of the language and the sentiments which I more than Mr. Jinnah, was entitled to use.

### "Harijans Position"

"Whatever anyone may say with regard to the tyranny alleged to have been practised by the Hindus over the Muslims during the Congress regime no one can entertain any doubt as to the position of millions of untouchables who had the misfortune to be ruled by the congress Government in this province in common with some others. If Mr. Jinnah and the Muslims can prove five out of 100 cases of oppression, I am prepared to place 100 out of 100 cases before any impartial tribunal, I, therefore, am anxious more than Mr. Jinnah can ever be, for the appointment of a Royal Commission to investigate the cases of tyranny and oppression by the Congress Government.

"Although the oppressors, so far as the untouchables are concerved, are Hindus, I can assure my Hindu friends that this is not an anti-Hindu move, it is anti-congress, and therefore purely political. If attack on the Congress is interpreted by the Hindus as an attack on them, they have to thank themselves then for the consequences. It proves two things, that the congress is a Hindu body and that the Hindus are attacked to the congress and are not prepared to put that organization on it's trial."

(*Times of India*, Tuesday, 19-12-39, P-9)

जीनांनी मुक्तिदिन साजरा करण्यासाठी जे मुसलमान व इतर अल्पसंख्याक जमातीना आवाहन केले ते योग्य आहे. अशा अर्थाचे पत्र पुण्यातील तीन मुसलमान

गृहस्थानी टाईम्सला पाठविले. या समारंभात डॉ. आंबेडकर भाग घेणार आहेत, मग हिंदू महासभा, पार्शी, तामीळ, खिस्ती वगैरे जातींनी का भाग घेऊ नये, असे पत्र एका हिंदी खिश्चनाने टाईम्सला पाठविले. पार्शी जमातीने या समारंभात सामील व्हावे असे पत्र एका पार्शी गृहस्थाने टाईम्सला पाठविले. ही तीन पत्रे २१–१२–३९ च्या टाईम्सच्या "Reader's View" या स्तंभात प्रसिद्ध झाली होती.

हा समारंभ २२–१२–३९ ला सर्व प्रांतात विस्तृत प्रमाणात साजरा झाला. तेव्हा काँग्रेसच्या राजवटी विरूद्ध प्रचाराचा पाऊस पाडण्यात आला.

१९३९ पर्यंतच्या काळात बाबासाहेबांच्या बौद्धिक तेजाचा प्रकाश भारतात व भारताबाहेर पसरत गेला. १९३९ नंतरच्या एक दोन वर्षात या प्रकाराचे दिव्यत्व भारतातील आणि इतर देशातील बुद्धिवंत पंडितांना आणि विचारवंतांना पटू लागले. कारण या काळात त्यांनी जशी मनोवेधक भाषणे केली, लेख लिहिले आणि खासगी चर्चा केल्या तसेच त्यांनी पाकिस्तानच्या ज्वलंत प्रश्नावर उत्कृष्ट ग्रंथ लिहिला. वकिली, स्वतंत्र मजूर पक्षाचे काम, वगैरे किचकट कार्याच्या व्यापात ते नेहमी गढून गेलेले असत. त्यातच वाचन व लेखन हे त्यांचे अत्यंत आवडीचे कार्य ते अखंडपणे करीत असत.

१९३९ च्या डिसेंबरमध्ये एका खटल्याचे काम पहाण्यासाठी ते कोल्हापूरला स्वतःच्या मोटारीने गेले होते. ते काम संपल्यानंतर मित्रांच्या आग्रहावरून ते कोल्हापूरला गेस्ट हाऊसमध्ये ३–४ दिवस राहिले. तेथे राजाराम कॉलेजचे प्राध्यापक आणि ब्राह्मणेतर चळवळीतील काही जुने लोक बाबासाहेबांच्या बरोबर गप्पा मारण्यास येत असत. ते कोल्हापूरहून बुधवारी ३-१-४० ला सकाळी मोटारने कऱ्हाडला परतण्यास निघाले. कऱ्हाड म्युनिसिपालीटीचे त्या दिवशी त्यांना मानपत्र मिळणार होते. कऱ्हाड जवळ कोयनेच्या पुलावरून मोटारीपुढे गुरे व माणसे आडव्या तिडव्या तऱ्हेने जात असता ड्रायव्हरला ब्रेक वेळोवेळी दाबावा लागला. अशा शेवटच्या ब्रेकमुळे मोटार एकदम थांबली व तीतून बाबासाहेब मोटारीतून बाहेर पडले. त्यांच्या डोक्याला खूप इजा झाल्या. ड्रायव्हरलाही मार बसला. दोघांना सरकारी इस्पितळात पट्टया बांधल्या. बाबासाहेब दोन तास इस्पितळात होते. त्यानंतर डॉक्टर व इतर लोक यांच्या विरोधाला बाजूला सारून ते म्युनिसिपालिकेचे मानपत्र स्वीकारण्यास गेले. त्यांचे भाषण ऐकण्यास हजारो लोक जमले होते. भाषण एक तास झाले. स्वातंत्र्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी एकत्र प्रयत्न करणे जरूर आहे. पण काँग्रेस व इतर पक्ष यामुळे ते शक्य होत नाही, असा भाषणाचा आशय होता.

बाबासाहेबांना झालेल्या अपघाताची बातमी टाईम्सने दिली, होती ती अशी —

*"Dr. Ambedkar in Motor Accident, serious injuries.*

Dr. B. R. Ambedkar leader of the Independent Labour Party, met with a serious motor accident while travelling from Kolhapur to Karad in Satara District on Wednesday.

According to information received in Bombay Dr. Ambedkar was thrown out of the car, while the driver was negotiating a bridge, and received serious injuries on his head. He was taken to hospital, where after two hours' stay he insisted on going to Karad Municipal office to keep up the engagement.

The Karad Municipality presented him with an address of welcome and he replied to it. Thereafter he again went to the hospital and proceeded to Medha, a village in the same District. He is due in Poona on Thursday morning."

(The Times of India, Thursday 4-1-41)

मानपत्र समारंभ संपताच बाबासाहेब अंगात ताप असताना मोटारने पुण्यास येण्यास निघाले. त्यांनी कोणाच्या विरोधाला मानले नाही. ते पुण्याला संध्याकाळी सहा वाजता आले तेव्हा पुण्यात बातमी पसरली. ते अ. भाऊसाहेब गडकरी यांच्या घरी (पुण्यात) उतरले. त्यांच्या समाचारासाठी शेकडो लोक गेले व त्यांची प्रकृती बरी आहे असे पाहून समाधान व्यक्त केले. श्री. राजभोज यांच्या घरासमोर रात्रौ आठ वाजता एक सभा घेऊन लोकांनी बाबासाहेबांचे अपघातातून बचावले म्हणून अभिनंदन केले. व त्यांना दीर्घायुष्य लाभो म्हणून प्रार्थना केली. उत्तरादाखल भाषण करताना त्यांनी प्रथमच उद्‌गार काढले की, ' मी तीनदा संकटातून वाचलो. यावरून माझ्या हातून काहीतरी माझ्या समाजाची सेवा करून घेण्याचा ईश्वरी संकेत असावा अशी श्रद्धा मला वाटू लागली आहे. (दलित बंधु, २९-२-४०) हे उद्गार निरर्थक नव्हते. चळवळ १९२४ साली सुरु करण्याच्या अगोदरही बाबासाहेबांची श्रद्धा होती की, आपण आपल्या आयुष्यात समाजासाठी काही तरी चांगले कार्य करणार ! आणि ते ही श्रद्धा अनेक वेळा खासगी बैठकीतून बोलून दाखवीत असत.

' आशा प्रमोद ' या मुंबईतील साप्ताहिकाने प्रसिद्ध व्यक्तींच्या मुलाखतीत दर आठवड्याला प्रसिद्ध करण्याची योजना १९४० सालासाठी हाती घेतली. तिसरी मुलाखत बाबासाहेबांची त्या पत्राच्या २१-१-४० च्या रविवार अंकात (पा. ८-९) प्रसिद्ध झाली. या मुलाखतीत बाबासाहेबांनी अनेक मुद्यावर आपली मते व्यक्त केली. त्यांनी यावेळी आपल्या काही आवडी निवडीही व्यक्त केल्या. या साप्ताहिकाच्या प्रतिनिधीने घेतलेली ती मुलाखत अशी—

" खास मुलाखत : डॉ. आंबेडकर राजकारणाखेरीज जीवनातल्या इतर गोष्टीकडे कसे पहातात : उ खरोखरच मला राजकारणाचा तिटकारा वाटतो !

ज्ञानमार्ग भक्तीमार्ग आणि कर्ममार्ग असे तीन मार्ग गीतेमध्ये सांगितले आहेत. पण त्या मार्गात सुद्धा विसंगतीचे अनेक नमुने सांपडतात. आपण जीवनात केलेल्या सर्व चुका सावरून घेण्याचे त्यात तत्वज्ञान आहे. मूर्खपणाने लिहिलेला जर कुठला ग्रंथ असेल तर तो गीता !

संगीत आणि हास्य प्रत्येक माणसाला आवडत असते. संगीतामुळे जीवनात नवजीवन निर्माण होते तसेच माणसाला पोटभर हसता आले पाहिजे. आमच्या हिंदी लोकांना शत्रू निर्माण करता येतात. पण हसता मात्र येत नाही. हास्य हे प्रभावी शस्त्र आहे. उपहासपूर्ण हासूनही शत्रूची रेवडी उडविता येते. त्याला नामोहरम करता येते आणि म्हणूनच दुसऱ्याकडे पाहून हसणे आणि स्वतःही पोटभर हसणे मला फार आवडते.

सगळ्यात कुठल्या गोष्टीचा जर मला जास्त तिरस्कार असेल तर राजकारणाचा. मी राजकारणातून निवृत्त झालो तर वाचन आणि लेखन यांतच सारा वेळ खर्च करीन. माझ्या दृष्टीकोनाने भगवान बुद्धाच्या जीवनचरित्रावर असे मी एक चरित्र लिहिणार आहे. त्याचप्रमाणे मी स्वतः एक कादंबरीही लिहिगार आहे. असे उग्दार डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी मी त्यांची भेट घेतली त्यावेळी काढले.

डॉ. आंबे.कर यांची भेट घ्यायचे मी ज्यावेळी ठरविले त्यावेळी माझ्यापुढे अनेक अडचणींची कल्पना चमकून गेली. त्यातली पहिली अडचण म्हणजे त्यांना माझ्याशी अनेक विषयांवर चर्चा करण्यास वेळ मिळेल की नाही ही, आणि दुसरी अडचण म्हणजे अशी की, त्यांच्या लहरी स्वभावाविषयी मला असलेली माहिती. डॉक्टरांच्या लहरीविषयी अनेक गोष्टी सांगतात की ते आपल्या 'स्टडीरूम' मध्ये वाचीत किंवा लिहीत असले म्हणजे स्वतःचेही अस्तित्व ते विसरतात ! कुणीतरी जीवलग स्नेही जरी त्यांना भेटायला गेला तरी त्यावेळी ते ' काय बरं आहे ना ? ' असा साधा प्रश्न करून ते जे आपली मान पुस्तकात खुपसतात ते तासन् तास तशा समाधीत असतात. पण जर का ते आपल्या 'स्टडीरूम' च्या बाहेर असले तर त्यांना सहजच एकादा प्रश्न 'विचारावा आणि जगातील विचार प्रवाहांचे बसल्या बैठकीत ज्ञान करून घ्यावे.

डॉक्टरांच्या भेटीसाठी, मी त्यांची भेट व्हावी म्हणून डॉक्टरांच्या सेक्रेटरीना फोन केला. पण त्यावेळी सेक्रेटरी घरी नसल्यामुळे मी डॉक्टरांना टेलीफोन केला. डॉक्टर त्यावेळी आपल्या 'स्टडीरूम' मध्ये असतील अशी माझी कल्पना होती. पण डॉक्टर आपल्या बंगल्याच्या टेरेसवर कुणा पाहुण्याशी बोलत बसले आहेत, असे ज्या वेळी मला कळेल त्यावेळी माझ्याबरोबर असलेल्या डॉक्टरांच्या एका स्नेह्याबरोबर मी डॉक्टरांच्या बंगल्यावर गेलो.

## सर्वांना मुक्तद्वार

डॉक्टरांची मी 'अपॉइन्टमेंट' मुळीच घेतली नव्हती. व्हिजिटिंग कार्ड आत पाठविल्यानंतर पंधरा मिनिटे बाहेर तिष्ठत राहावे लागेल अशी माझी कल्पना होती, पण तेथे जाऊन पहातो तर डॉक्टरांचे घर म्हणजे सर्वांनाच 'मुक्तद्वार' असलेले मला आढळून आले.

मी सरळ गच्चीवर गेलो तेव्हा डॉक्टर पाहुण्यांशी काहीतरी कायदेशीर प्रश्नाबाबत बोलत बसले होते. मला ते दुसऱ्या दिवशी वेळ देऊन मुलाखतीस बोलावतील असे मला पाहिल्याने वाटले. पण मी ज्यावेळी त्यांना माझ्या येण्याचा उद्देश सांगितला त्यावेळी, "हं बोला काय विचारायचं आहे तुम्हाला ?" असा त्यांनी मला प्रश्न केला.

असेंब्लीमध्ये अगर सभेत भाषणे करताना मी अनेक वेळा डॉ. आंबेडकर यांना पाहिले होते प्रतिपक्षाला वाग्बाणांनी नामोहरण करण्याच्या वेळी त्यांची मुद्रा बरीच क्रुद्ध दिसते. ते फार गंभीर दिसतात आणि अशा मनस्थितीत असतानाच मी त्यांना अनेक वेळेस पाहिले होते. पण आताची त्यांची मुद्रा खेळकर दिसत होती त्या वेळेपुरते तरी जीवनाकडे ते खेळकर मनःस्थितीने आणि मुद्रेने पहात आहेत, असे मला वाटले, त्यावेळी त्यांचा वेषही अगदी साधा होता बंगाली पद्धतीने त्यांनी लहानसे धोतर गुंडाळले होते आणि सदऱ्यावर एक शाल परिधान केली होती.

"आपण जुनं मराठी वाङ्मय वाचलं आहे कां ?"

"बहुतेक सर्व संत वाङमय वाचलं आहे मी."

● "कुणाचे वाङमय जास्त आवडतं आपल्याला ?"

"मुक्तेश्वर आणि ज्ञानेश्वर हे माझ्या जास्त आवडीचे आहेत."

● "का आवडतात आपल्याला हे कवी ?" माझ्या बरोबरीचे संपादक मित्राने प्रश्न केला.

**"मुक्तेश्वर – ज्ञानेश्वराचं तत्त्वज्ञान मला मान्य आहे असं नाही. पण मला त्याचं जे वाङ्मय आवडतं ते केवळ भाषेच्या वैभवामुळे– तत्त्वज्ञानामुळे नव्हे."**

● "पण गीतेविषयी आपलं काय मत आहे?" माझ्या संपादक मित्राने प्रश्न विचारला.

"I don't accept Geeta at all' डॉक्टर म्हणाले

● "कां वरं?" मी त्यांना विचारले.

## गीतेतील विसंगती

"याचं कारण असं आहे" डॉक्टर जास्त गंभीर होऊन म्हणाले, "ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग आणि कर्ममार्ग असे तीन मार्ग गीतेमध्ये सांगितले आहेत. **पण त्या मार्गांतसुद्धा विसंगतीचे अनेक नमुने सापडतात. आपण जीवनात केलेल्या सर्व चुका सावरून घेण्याचं त्यांत तत्त्वज्ञान आहे. मुर्खपणाने लिहिलेला जर कुठला ग्रंथ असेल तर तो गीता!**

हे एक साधच उदाहरण पहा. कृष्णाने अर्जुनाला युद्धप्रवृत्त करण्यासाठी कुरुक्षेत्रावर उपदेश केला आहे. तो सुद्धा विसंगतीने भरलेला आहे. पहिल्याने कृष्ण उपदेश करतो राज्यासाठी लढ. नंतर सांगतो क्षात्र धर्मासाठी शस्त्र इ तात घे. आ ण नंतर सांगतो, मी सांगतो म्हणून युद्ध कर! आता यांत नीती

कुठं राहिली?"

● "गीता म्हणजे compromise of all errors असेच तुमच मत आहे का?" माझ्या मित्राने प्रश्न केला.

## बेजबाबदार ग्रंथ

"अलबत्!" डॉक्टर आंबेडकर उद्गारले" "It is an irresponsible book of ethics!"

गीतेवर चर्चा करता करता डॉक्टर हिंदू धर्माच्या चर्चेकडे वळले. आणि धर्मासंबंधीची त्यांची मते ऐकताच माझे असे मत बनले की जगातील सर्व धर्मांतील तत्त्वज्ञानाचा डॉ. आंबेडकर यांनी गाढ व्यासंग केला आहे. धर्मासंबंधी त्यांची मते परिपक्व आहेत. धर्मासंबंधीचे त्यांचे विशिष्ट तत्त्वज्ञान आहे.

डॉ. आंबेडकर पुढे म्हणाले "बुद्ध धर्माच्या नाशानंतर गीतेला महत्त्व आले"

● "बुद्ध धर्माचा नाश होण्याचं कारण काय?" माझ्या मित्राने प्रश्न केला.

"तो मोठा इतिहास आहे," डॉक्टर म्हणाले. "त्या काळी दोन धर्मांचे विचारप्रवाह वहात होते. एक वैदिक धर्म आणि दुसरा बुद्ध धर्म. पण या दोन्ही धर्मांच्या तत्त्वज्ञानात बुद्धाचं तत्त्वज्ञान अत्यंत महत्त्वाचं होतं–मानवी कल्याणाचं होतं तरी बुद्ध धर्माला यश मिळालं नाही. बुद्ध धर्माचा अल्पावधीतच नाश झाला."

● "याचं कारण ?" मी अधीरतेने विचारले "थांबा-तेच मला सांगायचं आहे." डॉक्टर उद्गारले "बुद्ध धर्माला अपयश आले याचं कारण असं की, बुद्ध धर्माला त्या काळच्या ब्राह्मण वर्गाचा कसून विरोध होता. बुद्ध धर्म जगातून शक्य तितक्या लवकर नष्ट व्हावा अशी त्यांची आत्यंतिक इच्छा होती. कारण बुद्ध धर्मात स्वातंत्र्य आणि समता ही जी तत्त्वे आहेत-ती ब्राह्मण वर्गाला मुळीच पसंत नव्हती. समाजामध्ये समता आणि स्वातंत्र्य यांच युग सुरू झालं तर आपलं समाजातील स्थान कायम राहणार नाही अशी त्यांना भीती वाटत होती."

* "आर्थिक हितसंबंधासाठीच ब्राह्मणांनी हे धोरण स्वीकारलं होतं कां ?"

"मुळीच नाही-आर्थिक हितसंबंधापेक्षा सामाजिक हितसंबंधावरच त्यांची लोभी नजर खिळलेली होती. जगात बुद्ध धर्माचा विजय झाला असता तर जातिभेद, धर्मभेद शिल्लक राहिले नसते, असं झालं असतं तर ब्राह्मणांचं समाजातलं स्थान कसं अढळ राहिलं असतं ?"

## ब्राह्मणांचा कावा !

"ब्राह्मण वर्गाला इतर जातींनी कसा पाठिंबा दिला. बुद्ध धर्म हा बहुजन समाजाच्या हिताचा धर्म असताना अल्पसंख्यांकांनी बहुसंख्यांकावर मात कशी केली व बुद्ध धर्माचा निःपात कसा केला ?"

* "ज्यांच्या हाती राजकीय आणि लष्करी सत्ता होती तो अल्पसंख्य वर्ग मधेच घोटाळत होता. त्यांना आपल्या हाताशी धरण्याचा ब्राह्मण वर्गानी कावा लढविला. त्यांच्या राम, कृष्ण या देवांना मान्यता देऊन त्यांची मन वळविली. पण क्षत्रियांना आपल्या बाजूला वळविण्यासाठी ब्राह्मणांनी कृष्ण राम अशा क्षात्रवंशी देवांना भजण्यास सुरूवात केली आणि अशा रितीने त्यांनी क्षत्रियांची मनं वळवून घेतली. बुद्ध धर्माला मोठ्या शिताफीने विरोध केला. ब्राह्मणांचा विरोध फसला असता तर आज हिंदुस्थानात बुद्ध धर्माचं युग निर्माण झालं असतं. आजच्यापेक्षा हिंदुस्थानची निराळी परिस्थिती दिसली असती. बुद्ध धर्मातच अनत्याचाराचं तत्वज्ञान आहे !"

* "म. गांधीचेही अनत्याचाराचं तत्वज्ञान आहे की !" माझे संपादक मित्र म्हणाले,

"खरं आहे!" डॉक्टर उपहासात्मक हसत हसत म्हणाले, "त्या माणसाचा अनत्याचाराच्या तत्वज्ञानावर अंतःकरणपूर्वक कितपत विश्वास आहे याची मला शंका आहे ! त्यातूनही गांधीना मी बुद्धपंथीय म्हणायला मुळीच तयार नाही. गांधी हे जैनपंथीय असं फार तर म्हणता येईल. आपल्या श्वासानंही कुणाला उपद्रव होऊ नये. पावलाखाली मुंगीही चिरडल्याचं 'पाप' आपल्या माथी घेऊ नये म्हणून फडके गुंडाळून रस्त्यातच

भीत भीत चालणारे जैन लोक आणि गांधी यांच्यात फारसा फरक नाही. गांधीचं आजचं अहिंसेचं जे तत्वज्ञान आहे ते बुद्धाचं तत्वज्ञान नसून जैनांचं तत्वज्ञान आहे. बुद्धानं कधीच असल्या अव्यवहारी अनत्याचाराच्या तत्वज्ञानाचा पुरस्कार केलेला नाही.

● "अनत्याचारासंबंधी आपलं काय मत आहे ?"

## गांधीविषयी शंका

"अनत्याचाराचं तत्वज्ञान ठीक आहे. बुद्धाचंही ते तत्वज्ञान होतं पण या तत्वज्ञानाची अंमलबजावणी करण्याचा प्रश्न सर्वस्वी परिस्थितीवर अवलंबून आहे. याचा अर्थ शस्त्रबल नसावं असा मात्र कोणी करू नये शस्त्रबळ असताही कुणी अनत्याचारी वृत्तीनं रहायचं व्रत पाळलं तर ते काही वाईट नाही. सामर्थ्यवान असता अत्याचाराचं व्रत पाळावं–दुबळेपणात नाही.

बुद्धाचं हेच तत्त्वज्ञान होत. गांधीचं मात्र आजचं जैन तत्त्वज्ञान आहे."

## बुद्धधर्मांचे महत्त्व

● "बुद्ध धर्मांविषयी आपणास अजूनही महत्त्व वाटतं कां ?"

"अर्थातच !" डॉक्टर उत्साहाने म्हणाले. "बुद्ध धर्मामुळे लोकांचं नैतिक बल वाढलं आहे." डॉक्टर आंबेडकर पुढे बोलताना म्हणाले, "आज जो हिंदू धर्म आहे, त्यात दोन प्रवाह चालू आहेत. एक वैदिक व दुसरा बुद्ध धर्म, आजच्या हिंदु धर्मात ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्यातल्या नव्वद टक्के बुद्ध धर्मातल्या आहेत. मात्र आजच्या हिंदू धर्मात जातिभेद आणि कर्मकांड यांचा जो अनिष्ट वैदिक प्रवाह वहात आहे त्या प्रवाहामुळे हिंदू धर्माचा साराच प्रवाह बिघडून गेला आहे."

● "समाजांत कोणत्या तरी धर्माचं बंधन असावं असं आपणास वाटतं काय ?"

"अलबत् !" डॉक्टर म्हणाले "धर्माचं बंधन नसलं तर प्रत्येक माणसाच्या संरक्षणासाठी दर एकाला पोलिसची जरुरी लागेल."

● "का बरं ? धर्माचं कार्य कायदा करू शकणार नाही का ?"

"मुळीच नाही" डॉक्टरांनी बोलायला सुरवात केली. "विशिष्ट धर्म असं मी म्हणत नाही. पण कोणत्या तरी धर्माचं–तत्वज्ञानाचं माणसाच्या मनावर दडपण पाहिजे. जेवणाचे डबे पोचविणाऱ्या घाट्याचं, मोल-मजुरी करून पोट भरणाऱ्या लोकांचं उदाहरण घ्या किंवा थोरामोठ्यांच्या घरी नोकरकाम करणाऱ्या नोकरांच उदाहरण घ्या, भूकेनं व्याकूळ झाले तरी ते आपल्या मालकांशी अत्यंत प्रमाणिकपणानं वागतात. याचं कारण कायद्याला ते घाबरतात असं नव्हे. तर धर्माचं त्यांच्या मनावर दडपण असतं. अधर्म होऊ नये— आपल्या हातून धर्मबाह्य कृत्य होऊ नये असं त्यांना नेहमी वाटत असतं."

● "पण कायद्यांची तरी बंधनासाठीच योजना केली आहे ना? कायद्याचंही माणसाच्या मनावर दडपण असतं."

"चुकता आहात तुम्ही!" डॉक्टर म्हणाले. "कोणत्याही देशातून धर्म नाहीसा झालेला नाही. धर्माचं बंधन कायम आहे. धर्माचा भावनात्मकतेशी संबंध पोचतो. आणि कायद्याचा बुद्धीशी. जीवनात भावनात्मकतेला फार मोठं स्थान आहे. म्हणूनच मी म्हणतो की, मानवी जीवनावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणतातरी धर्म हवा. कोणतेतरी तत्त्वज्ञान हवं!"

● "बरं, ईश्वरासंबंधी आपलं कोणतं मत आहे? ईश्वरावर आपला विश्वास आहे का?"

● "I do believe in God!" डॉक्टर देवभोळ्या माणसाचा आव आणून म्हणाले, "विशिष्ट देवावर किंवा देवाच्या आकृतीवर माझा विश्वास नसला तरी कोणती तरी अद्भूत शक्ती आपल्यावर प्रभाव गाजवीत आहे अशा मताचा मी आहे."

● "कोणतीतरी Conscious Agency असंच आपणास म्हणायचं आहे का?" माझ्या मित्राने प्रश्न केला.

● "असं म्हटलं तरी चालेल!" डॉ. उद्गारले.

● संतवाङ्मय वैदिक धर्म, बुद्ध धर्म, ईश्वराचे अस्तित्व यासंबंधी आमची चर्चा झाल्यावर मी डॉक्टरांना विचारले, "संतवाङ्मयानंतर आपण कोणते आधुनिक ग्रंथकार वाचले आहेत?"

## मराठी वाङ्मय

"हरिभाऊ आपटे" डॉक्टर म्हणाले, हरिभाऊंचं वाङ्मय मी अधाशीपणानं वाचलं आहे. हरिभाऊंचं वाङ्मय मला अत्यंत आवडलं. त्यानंतरच्या मराठी ग्रंथकारांचं वाङ्मय मात्र मी वाचलं नाही."

● "आणि इंग्रजी वाङ्मय?"

"मनोरंजनासाठी मी कधीही कांही वाचले नाही–वाचीत नाही. कथावाङ्मयापेक्षा इतर solid वाङ्मयच मी जास्त वाचलं आहे. शिकण्यासाठी मी वाङ्मय वाचतो मनोरंजनासाठी नाही. What instructs me, amuses me! अर्थशास्त्र आणि राजकारण हे माझ्या अत्यंत आवडीचे विषय आहेत आणि या विषयांवर सर्व उपलब्ध पुस्तकं मी वाचली आहेत."

● "आपण रशियन तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला आहे का?"

"मार्क्स वाचला आहे मी!" डॉक्टर म्हणाले, "His is the satisfying philosophy to the lower order. It is a direction, not a dogma असं जे लेनिन म्हणतो तेच खरे आहे."

● "आपण रशियन राज्यघटनेचा अभ्यास केला आहे काय?"

"I did not get a chance to read it."

● "पण आपणास रशियन तत्त्वज्ञानाविषयी काय वाटतं?"

"They may be devils. But they have got good ideas! पण ठराविक चाकोरीतून समाजाला विशिष्ट तत्वज्ञानानं वळण लावण्याची कल्पना मला पसंत नाही, नेहमी समाज Experimental stage (प्रयोगावस्था) मध्ये असला पाहिजे. नव्या कल्पनांना, नव्या विचारांना आणि प्रयोगांना त्यात वाव असला पाहिजे. एका लेखणीच्या फटकाऱ्यानं आदर्श असा समाज कुणालाही निर्माण करता येणार नाही.

## प्रयोगावस्थेतूनच आदर्श जग हळूहळू निर्माण होत असत

लोकांच्या कल्पनांना आणि विचारांना वाव मिळाला पाहिजे, त्यांचा विकास झाला पाहिजे. माणसाच्या मनाचा विकास होण्याला स्वातंत्र्य पाहिजे. एका ठराविक ठशानं माझ्या खुर्च्या कुणी तयार केल्या तर त्या मला आवडणार नाहीत. I would like my chairs to be something different."

## व्यक्तिस्वातंत्र्याचा अभाव

"मार्क्सच्या तत्वज्ञानाला लेनिननं बरंच वळण लावलं आहे," माझे मित्र म्हणाले.

"पण Andre Gide चा रशियासंबंधीचा जो मी नुकताच एक ग्रंथ वाचला त्यामुळे माझ्या मनावर फारच परिणाम झाला. त्याच्या पुस्तकावरून माझा असा समज झाला आहे की, रशियात मुळीच व्यक्तिस्वातंत्र्य नाही म्हणूनच मला रशियासंबंधी आज इतकी उत्सुकता वाटत नाही तत्वज्ञानाच्या प्रयोगाचे पैलू पाडले पाहिजेत. You cannot lay down an ideal state by a stroke of a pen!"

"आपणा रशियन Marriage Law चा अभ्यास केला आहे का?"

"I am not interested in Marriages!"
डॉक्टर हसत हसत म्हणाले.

● "आपणास अर्थशास्त्र व राजकारण याखेरीज दुसरा कोणता विषय आवडतो?"

"चित्रकला!" डॉक्टर म्हणाले "खरंच माझ्याकडे चित्रं विकत घेण्याइतके पैसे नाहीत नाही तर पुस्तकांप्रमाणेच मी चित्रंही घेतली असती विकत! मला हिंदी चित्रकला आवडते तशीच इटालियन चित्रकलाही आवडते!"

चित्रकलेसंबंधी बोलताना डॉक्टर म्हणाले, "मी ऑक्सफर्ड येथे असताना माझ्याच बरोबर बेव्हन नावाच्या एका सधन गृहस्थाचा भाऊ होता. त्याच्यामुळे बेव्हनची आणि माझी ओळख झाली. बेव्हन हा मोठा सधन व्यापारी होता. पण ब्रिटिश म्युझियमपेक्षाही मोठा चित्रसंग्रह त्याच्या जवळ होता. त्यानं हजारो पौंड चित्र खरेदी करण्यासाठी खर्च केले होते. पुढं बेव्हन अफरातफरीच्या आरोपानं तुरुंगात गेला. पण माझा त्याच्याविषयीचा आदर मात्र कमी झाला नाही याचं कारण त्याचा चित्रसंग्रह पाहिल्यामुळं माझ्या मनावर अनुकूल परिणाम झाला होता. माझ्या मनात आदर निर्माण झाला होता. आपल्याकडील व्यापारी किंवा धनिकवर्ग यांच्यामध्ये रसिकतेची दृष्टी असत नाही. हा त्यांचा दोष असत नाही; चातुर्वर्ण्याचा आहे. चातुर्वर्ण्यात जे वर्णभेद पाडले आहेत त्यात कोणी काय करावं याचा खुलासा केला आहे. ब्राह्मणांनी संस्कृती आणि कला यांचं संवर्धन करावं, वैश्य लोकांनी पैसा कमवावा असे हे धार्मिक समजले जाणारे नियम असल्यामुळे प्रत्येक जण ठराविक दृष्टानं जीवनाकडे पहात असतो. यामुळं त्यांच्यातील रसिकता मेली आहे. आपल्याकडील श्रीमंत माणसं पहा. त्यांना पैशांची अनुकुलता असली तरी आपल्या क्षेत्राबाहेर ते कोणत्याही गोष्टीकडे लक्ष देत नाहीत. आमच्याकडच्या धनिक मारवाड्यांच्या घरात एकादेही सुंदर चित्र आढळणार नाही. पण युरोपात तसं नाही. प्रत्येक जण आपापला व्यवसाय सांभाळूनही निरनिराळ्या कलांकडे दक्षतेने पाहतात. आपल्याकडे कलेविषयी जी अनास्था दिसून येते याचं कारण चातुर्वर्ण्य आहे. चातुर्वर्ण्यामुळे हिंदू धर्मातील लोकांच्या रसिकतेचेही अपहरण झालं आहे."

## संगीत आणि हास्य

● "आपणांस संगीत आवडतं का?"

संगीत आणि हास्य प्रत्येक माणसाला आवडलं पाहिजे. संगीतामुळं जीवनात नवजीवन निर्माण होतं तसंच हास्यानंही माणसाला पोटभर हसता आलं पाहिजे. आमच्या हिंदी लोकांना शत्रू निर्माण करता येतात पण हसता मात्र येत नाही. हास्य हे प्रभावी शस्त्र आहे. उपहासपूर्वक हसूनही शत्रूची रेवडी उडविता येते. त्याला नामोहरम करता येते. आणि म्हणूनच दुसऱ्याकडे पाहून हसणं आणि स्वतःही पोट धरून हसणं मला फार आवडतं."

● "आपणास राजकारण फार आवडत असेल नाही?" "नाही मुळीच नाही!" डॉक्टर म्हणाले, "Politics is the one thing that I hate! सगळ्यात कुठल्या गोष्टीचा जर मला तिटकारा असेल तर तो राजकारणांचा!"

● "आपण राजकारणातून निवृत्त झालात तर कोणतं आवडीचं काम हाती घ्याल?"

"I would do literary work! लेखनात सारा वेळ मी खर्च करीन. माझ्या दृष्टीकोनानं बुद्धाच्या चरित्रावर मी एक ग्रंथ लिहिणार आहे आणि एक स्वतंत्र कादंबरी लिहिणार आहे!" डॉक्टर आनंदात म्हणाले.

● "आपण आत्मचरित्र का लिहीत नाही?"

"लिहिण्यासारखं काही नाही म्हणून!" डॉक्टर हसत हसत म्हणाले.

आणि बराच वेळ झाल्यामुळे मी आणि माझ्या मित्राने डॉक्टरांचा निरोप घेतला. डॉक्टरांची राजकीय मतें काहिही असोत पण व्यासंगी विद्वान या नात्याने मात्र डॉक्टर सर्वांना आदर्श आहेत, आणि म्हणूनच डॉक्टरांविषयी मला नेहमी आदर वाटतो. आपलेपणा वाटतो."

ही मुलाखत श्री. ह. वि. देसाई यांनी घेतलेली होती. ती त्याच्या "मोठ्यांच्या मुलाखती" या ऑक्टोबर १९४० मध्ये प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात २०–२८ मध्ये पानावर दिलेली आहे.

मुक्तिदिन समारंभाच्या निमित्ताने गुलबर्ग्याच्या मुसलमानांनी गांधीजींना तार पाठविली की, 'मुक्तिदिनानिमित्त शुभेच्छा. कायदे आझम जीना झिंदाबाद' या तारेला उद्देशून गांधीजींनी हरिजनमध्ये आपले विचार प्रगट केले. काँग्रेसमध्ये सर्व धर्मांतील आणि जातींतील लोक आहेत व म्हणून काँग्रेस हा बहुसंख्याकाचा पक्ष आहे. जीनांच्या मुक्ति दिनाला डॉ. आंबेडकर आणि काँग्रेसविरोधी पक्षांचे पुढारी यांनी जीनांच्या लिग-बरोबर सहकार्य करण्याचे ठरविले, हे त्यांनी मुक्तिदिन समारंभात भाग घेतला यावरून सिद्ध होते. तेव्हा लीग व हे कॉन्ग्रेस विरोधी पक्ष यांचा एक राजकीय अल्पसंख्यांकाचा पक्ष होईल देशात काँग्रेस व काँग्रेसविरोधी हा पक्ष असे दोनच पक्ष झाले तर जातीय-वादातील सर्व प्रश्न सुटतील आणि स्वातंत्र्याच्या मार्गातील अडथळे दूर होतील. लीगला जातीय कर्दमातून बाहेर काढण्याचे हे राष्ट्रीय कार्य केल्याबद्दल मी जीनांना शतशः धन्यवाद देतो आणि म्हणतो की, 'कायदे आझम जीना दीर्घायुषी होवोत!' (Non-Muslim support to Mr. Jinnah — Lifting of Leage out of Communal Rot." —The Times of India, 22-1-40).

मुक्तिदिन समारंभ झाल्यानंतर अनेक राजकीय पुढाऱ्यांनी भारतातील राजकीय क्षेत्रात जी जातीय स्वरुपाची कोंडी निर्माण झालेली होती ती कशी नष्ट करता येईल, आणि राजकीय स्वातंत्र्याचा मार्ग कसा निष्टकक करता येईल, यासंबंधी आपले विचार सभेतून आणि लिखाणातून व्यक्त केले. त्यापैकी श्री. न. चि. केळकर यांचे टाईम्स-मध्ये प्रसिद्ध झालेले पत्र देशातील स्वातंत्र्यवादी विचारांचे प्रतीक म्हटले तरी चालेल. श्री. केळकरांचा मुख्य मुद्दा हा की, ब्रिटीश साम्राज्याचे सामर्थ्य अफाट आहे आणि त्याने मनात आणले तर भारतातील जातीयवाद ते हा हा म्हणता सोडवू शकेल. राष्ट्र-संघाने जातीय प्रश्नासंबंदी ठराव केलेले आहेत. व त्यांची अंमलबजावणी मध्य

युरोपातील देशात चालू आहे. ब्रिटनला हे ठराव भारतात का अमलात आणता येत नाहीत? १९३५ च्या कायद्याने भारताच्या प्रांतांना स्वायत्तत्ता ब्रिटिश सरकारने दिली मग केंद्र सरकारातही भारताला का स्वायत्तत्ता देता येत नाही ? भारताच्या भल्याबद्दल जे कायदे करावयाचे ते या साम्राज्याच्या पार्लमेंटच्याहाती आहे. या पार्लमेंटला जातीय वादासंबंधी काही कायदा करून तो ती नष्ट करता येत नाही तर संयुक्त राष्ट्र संघाच्या हाती हा प्रश्न ब्रिटिश लोक का सोपवीत नाहीत ? कारण त्यांना भारतातील त्यांचा स्वार्थ नष्ट करावयाचा नाही. यासाठीच ब्रिटिश लोक जातीजातींत जेवढी तेढ माजविता येईल तेवढी ते माजवित असतात. आता मुसलमानांना त्यांनी डोक्यावर घेऊन स्वातंत्र्याला खो घातलेला आहे. काही दिवसांनी ते संस्थाने, ब्रिटिश व्यापारी, मुलकी व लष्करी नोकर, साम्राज्याची इभ्रत वगैरे गोष्टींचा वापर करून भारताच्या स्वातंत्र्याच्या मार्गात अडथळे निर्माण करतील आणि भारतावरील आपली मगरमिठी घट्ट करीत राहतील. हिंदू–मुसलमानांची एकी अगोदर करा मग स्वातंत्र्य मागा अशी जी ब्रिटिशांनी अडवणुकीची भूमिका स्वीकारलेली आहे. ती फसवी आहे. त्यामुळेच भारतातील जातीजातींत वैराचे अग्नी धुमसत राहिलेले आहेत. काँग्रेसच्या जुलमी राजवटीतून मुसलमान मुक्त झाले म्हणून जीना मुक्ती समारंभ साजरा करतात आणि मुसलमानांना संतुष्ट करणे या हेतूचा काँग्रेसचा भ्रमनिरास झाला म्हणून डॉ. मुंजे मुक्तिसमारंभ साजरा करतात हा हास्यास्पद प्रकार आहे, असा श्री. केळकरांच्या पत्राचा सारांश आहे. ते पत्र असे :–

"THE COMMUNAL POSITION" ....

Sir, — The communal position in India is very intriguing indeed ! Mr. Jinnah celebrates 'Deliverance Day' because Muslims are delivered from congress ministries; and Dr. Moonje celebrates it because the congress is delivered from the delusion that it can reconcile Hindus and the Muslims !

Who can fail to appreciate the shrewdness of the British Government in offering to Indian political leaders, communal unity and agreement as the first (unsurmountable) hurdle to jump over ? There are, of course, other hurdles in reserve, e.g. the Indian Princes, British Merchants, civil and military services, Imperial prestige etc. But there, will be time enough, I suppose, for bringing them forward !

But speaking about communal agreement, I would like to ask one question. How was the position different when Government decided to pass the Parliamentary Act of 1935

and hand over Provincial Autonomy ? Cannot Government, if they really mean it, surrender responsibility at the centre under the same conditions ?

The Unity Conference of September, 1924, held in Delhi, which was more thoroughly representative of political and other parties in India, than any such conference, unanimously passed resolutions which cover most of the points of dispute between Hindus and Muslims, in their social and religious contact. These resolutions stand and are serviceable.

As for political disagreement things will be suitably discussed, if a round table conference is convened, and in the last resort the case may be reserved as before for the arbitration of the British Government or the League of Nations. The Government of India is, I think, a party to the resolution of the League of Nations by which certain treaties in respect of treatment of minorities were approved and enforced upon several Central European States, which were distressed like India, by communal tension. Those treaties stand and are available for reference and guidance.

In the name of sincerity and honesty, too much should not be made of the plausible desideratum of communal agreement as a condition precedent to the grant of responsible Government to India. Do not the judicial courts exist simply because the world of plaintiffs and defenders have never been unselfish and sensible enough to decide their own disputes ?

A flat refusal by the British Government to make a further advance in the development of the political status if India can be more truly understood than the disingenuous demand upon Hindus and Muslims to produce complete communal unity and agreement. The responsibility for deciding what would be an equitable treatment of minorities by majorities naturally devolves upon the British Parliament if the assumption holds and is accepted both by

the Congress and the Government, that a scene of self Government for India, even if designed by a constitution assembly or a round table conference, shall ultimately have to be framed and sanctioned as an act of British Parliament. The The anology of the constituent assembly emerging out of the French revolution does not apply, because the body which in that case framed the Constitution had also the military power to enforce it by the sword !
Poona, December 27.

—*N. C. Kelkar.*"

स्वतंत्र मजूर पक्षातर्फे २६ जानेवारी हा स्वातंत्र्य दिवस म्हणून साजरा करण्याचे बाबासाहेबांनी ठरविले. पण काहीजणांनी त्यांना सुचविले की, हा दिवस काँग्रेसने सुचविलेला आहे. आपला निराळा दिवस हवा. तो दिवस ठरवून पाळणे व त्यात मुस्लीमलीग व काँग्रेसेतर राजकीय पक्ष यांना भाग घेण्यास सुचविणे हे ठरविण्यासाठी मजूर पक्षाची लौकरच बैठक भरविण्यात येणार आहे, अशी बातमी प्रसिद्ध झाली.

("Labour Party Plans — The Independent Labour Party will be celebrating Independence Day shortly. A few days ago, Dr. B. R. Ambedkar, the leader of the Party had an idea of observing the Independence Day on January 26, the day fixed by the Congress. But since then suggestions were put forward to him that he should fix another day.

Dr. Ambedkar is convening a meeting of his party shortly to fix the date and programme. He propoess to invite the Muslim League and other non-Congress bodies to join the Celebration.

(—*The Times of India*, 16-1-40, p.9)

अस्पृश्यांचा "स्वातंत्र्य दिन" १९ मार्च महाडला साजरा झाला. त्यावेळी पंधरा हजार श्रोत्यांपुढे त्यांचे भाषण झाले. राजकीय स्वातंत्र्य म्हणजेच आपल्या जीवनाचे सार सर्वस्व असा समज जो आज देशात फैलावला आहे, त्यामुळे आपण आत्मघातकी रस्त्याने जात आहोत, असे मला वाटते. सामाजिक धार्मिक व आर्थिक प्रश्न आपल्या आयुष्यात राजकीय स्वातंत्र्यापेक्षा जास्त महत्वाचे व मोलाचे मानले पाहिजेत. तरच आपणाला आपली सर्वांगीण उन्नती करता येईल. आपल्या हिंदू समाजाला आज जी विपन्नावस्था आलेली आहे तिचे कारण आर्य संस्कृती. आर्यांनी स्त्रियांना अस्पृश्यते-

पेक्षाही हीन दर्जा समाजात दिला. आर्यांनी धर्माच्या नावावर यज्ञात नरबली व पशुबली प्रथा सुरू केली व आतापर्यंत हजारो माणसांची व पशूंची यज्ञासाठी हत्या करण्यात आली. म्हणून आर्य संस्कृतीने खिळखिळा झालेला हिंदू समाज प्रथम सुधारा. राजकीय स्वातंत्र्यापेक्षा हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. हा प्रश्न सुटला तर आपले आर्थिक, सामाजिक, धार्मिक व राजकीय प्रश्न सुटतील. ब्रिटिश लोक देशातून गेले तर हे प्रश्न सुटतील असे जे मानतात ते समाजाची देशाची मोठी फसवणूक करतात. सवर्ण हिंदू सुधारकांनी हिंदू समाज सुधारण्यासाठी जे प्रयत्न केले त्याबद्दल बाबासाहेबांनी त्यांना धन्यवाद दिले, असा बाबासाहेबांच्या भाषणाचा सारांश होता. रात्री महाड म्युनिसिपालिटीने त्यांना मानपत्र दिले. त्याचा वृत्तांत टाईम्सने प्रसिद्ध (फोटोसहित) केला तो असा—

"Defects In Hindu Society; Dr. Ambedkar On Need for Reform"
Ratnagiri, March 19.

"'It is entirely wrong to concentrate all our attention on the political independence of our country and to forget the foremost serious problems of social and economic independence." said Dr. B. R. Ambedkar, addressing a rally of 15,000|- people at Mahad, this afternoon to celebrate "Independence Day" of the Depressed Classes. "'It is suicidal to imagine that political independence necessarily means real all sided freedom" he continued. "Finland, Albania and Romania in Europe, most of the South American Republics and a big country like China are all politically independent, but are in reality under complete domination of one or the other power, economically. Nazi Germany and Fascist Italy present other examples of entire want of social and civic liberties for the people, even though their countries are politically independent. Mere absence of British rule will not mean for us political, economic and social freedom.

**Aryan Civilisation**

Proceeding Dr. Ambedkar analysed the numerous defects of the present Hindu society, laying them at the door of the so called Aryan Culture and civilization. Whatever the merits of the caste system, it had outlived its utility and

if Hindu society was to progress on modern lives, its present frame work had to be completely broken down.

The Aryan civilisation was responsible for giving to women a social position which was even lower than that allotted to the Depressed Classes. It was a civilisation responsible the most outrageous butchery both of animals and human beings in the name of religion. A new Hindu society had to be built up on a basis of equality between man and man.

Concluding his address, Dr. Ambedkar traced the movement of the Depressed classes and the working classes like Kunbis, etc. for economical and social freedom during recent years. He paid a tribute to caste-Hindu social reformers for the efforts, they had made for the uplift of these classes, but maintained that only self-dependence by these classes would really bring about this salvation.

At night an address of welcome presented to Dr. Ambedkar by Mahad Municipality."

(*The Times of India*, 21-3-40, P-11)

मुंबई प्रांतातील सर्व सार्वजनिक विहिरी व पाणवठे ही अस्पृश्य वर्गांना खुली आहेत अशा पाट्या त्याच्या शेजारी लावणे, व या सरकारी हुकुमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे, ही जबाबदारी सर्व महसूल अधिकाऱ्यांची आहे अशी सरकारने प्रेस नोट काढली. प्रत्येक तालुक्यात अशा किती विहिरी व पाणवठे आहेत व त्यांचा अस्पृश्यांना उपभोग घेता येतो की नाही, याबद्दलचे अहवाल सदर अधिकाऱ्यांनी वेळोवेळी सरकारकडे पाठवावेत अशी प्रेस नोट मध्ये आज्ञा होती.

("Use of well by Harijans, Bombay Orders to Collectors." — *The Times of India*, 24-1-40, p-11.)

अस्पृष्यांची 'महार', 'मांग', 'चांभार', ढोर इत्यादी जातिवाचक नावे कागदीपत्री लावण्याची रूढी पूर्वपरंपरेने चालत आलेली होती. अस्पृश्य समाजात जागृती झाल्यानंतर त्यांनी आपली आडनावे लावण्यास सुरूवात केली, पण खेड्यांतील सवर्ण लोक आणि शाळेतील सवर्ण शिक्षक त्यांना त्याबातीत विरोध करीत असत. ही परिस्थिती १९२० ते १९४० पर्यंत चालू होती. ती अस्पृश्यानी सरकारच्या नजरेस वेळोवेळी आणली तेव्हा सरकारने १९४० च्या फेब्रुवारीत असा हुकुम काढला की, जे अस्पृश्य

आपली पूर्वीची नावे बदलू इच्छितील त्यांनी ती प्रथम सरकारी ग्रॅझेटमध्ये प्रसिद्ध करावीत म्हणजे ती बदलेली नावे कागदोपत्री बदलून घेता येतील. या नाव बदलण्याच्या कार्याला सरकारी फी १ रु. ६ आणे आहे. पण ती अस्पृश्यांसाठी फक्त सहा आणे आकारली जाईल.

("Changing of Names, Concession To Scheduled Class Members." —*The Times of India*, 8-3-40, p-13).

मराठा लीगतर्फे ४-२-४० रोजी नाशिक येथे गोदावरीच्या पश्चिम तीरावर लीगबद्दल निष्ठा प्रदर्शित कराण्याच्या प्रचंड समारंभ झाला. रावसाहेब भाऊसाहेब थोरात, एम. एल. ए. श्री. देवराम एस. बाघ, श्री. पी. जे. तिकडे, क्षात्रगुरू, श्री. पंजाबराव देशमुख आणि श्री. रामराव देशमुख (खरे मंत्रिमंडळातील एक मंत्री) आणि राजकुमारी अलकनंदा बाईसाहेब देवास (धाकटी पाती) यांनी समारंभात भाषणे करून लीगच्या दहा हजार सभासदांकडून निष्ठेची शपथ घेवविली आणि महायुद्ध जिकण्यास मराठ्यांनी सर्वतोपरीनी मदत करावी, असे वक्त्याचे मुख्य मुद्दे होते. लीगचा स्वराज्याच्या चळवळीला विरोध नाही, असे श्री. रामराव देशमुखांनी स्पष्ट केले. ब्रिटिशांना युद्ध जिंकण्याच्या कामात मदत करणे म्हणजे भारताला वसाहतीचे स्वराज्य मिळविण्याच्या कार्याला मदत करणे होय असा क्षात्रगुरूंनी मुद्दा मांडला ("Maratha League — 10,000 Take Oath of Allegiance"—*The Times of India*, 6-2-40, p-6).

लीगच्या मुक्तिदिन समारंभानंतर इतर जातींतही राजकीय हक्कासंबंधी धडपड करण्याची प्रवृत्ती उत्पन्न झाली. याबाबतीत विचार विनिमय करण्यासाठी पार्शी जातीतील काही लोकांची बैठक डॉ. एफ. के. दादाचांदजी, श्री. एन. एन. एडनवाला आणि श्री. फिरोजशहा मेहता या तिघांनी प्रेसिडेन्सी असोशिएयनच्या कचेरीत घेतली. ती सोमवारी ५-२-४० रोजी सायंकाळी झाली. पार्शी जातींतील ३० प्रमुख गृहस्थ बैठकीस बोलाविलेले होते. बॅ. वि. दा. सावरकर व डॉ. आंबेडकर यांनीही आमंत्रण असल्यामुळे ते बैठकीस उपस्थित झाले. डॉ. आंबेडकरांनी पार्शी जातीला असा सल्ला दिला की ही जात मुंबईत जास्त आहे. व येथील दैनंदिन घडामोडीत पार्शी लोकांना भाग घेता येईल. तो भाग त्यांनी कोणत्या पक्षातर्फे घ्यावा हा मुद्दा महत्त्वाचा नाही, पण त्यांनी गुपचूप न बसता चळवळीत भाग घ्यावा हे महत्त्वाचे आहे. त्यांनी काँग्रेस विरोधी फळी उभारण्यासाठी अस्पृश्य लोक, मुसलमान, हिंदू महासभावादी हिंदू वगैरे जमातींची एकजूट केली तर काँग्रेस व तिचा विरोधी पक्ष ही फळी, असे चित्र देशात दिसेल. राजकीय दृष्टीने हे इष्ट आहे. विरोधी पक्षाला इंग्लंडमध्ये महत्त्व आहे. तशी हिंदुस्थानात परिस्थिती नाही. ती उत्पन्न करणे जरूर आहे.

पार्श्यांना अस्पृश्यादी जातींकडून मतदान भरपूर पडेल व त्यांचे उमेदवार निवडून येतील, असा बाबासाहेबांच्या भाषणाचा व त्यांना विचारलेल्या प्रश्नांना दिलेल्या उत्तरांचा सारांश होता.

बॅ. सावरकर यांनी पारशांना सल्ला दिला की, तुम्ही मुस्लीम लीगशी सहकार्य न करता हिंदू महासभेशी सहकार्य करा. त्यात तुमचे हित आहे. ("Strong Opposition To Congress — Move in Bombay Province — Parsis Advised To Work With Hindu Mahasabha." —*The Times of India*, Tuesday, 6-2-40, p-7).

कॉंग्रेस व लीग यांचे भारतीय स्वातंत्र्याबद्दलच जे दृष्टीकोन आहेत, त्याबद्दल डॉ. आंबेडकर याचे विचार आजमाविण्यासाठी टाईम्सच्या प्रतिनिधीने त्यांची सोमवारी ५–२–४० रोजी रात्री मुलाखत घेतली. भारत हे एक राष्ट्र आहे, हे कॉंग्रेस व गांधींजी यांचे मत मला मान्य नाही, तसेच हिंदू व मुसलमान यांची दिलजमाई होणे शक्य नाही, हे लीगचे मतही मला मान्य नाही आजच्या स्थितीत आपण राष्ट्र या स्थितीत नाही. परंतु दोन्ही समाजात ऐक साधण्ययाच्या हेतूने जर योग्य अशा काहीं सामाजिक पुनर्रचना हिंदू व मुसलमान या दोन्ही समाजात करण्यात आल्या तर आपण राष्ट्र या पदवीला पोहोचू शकू, असा माझा विश्वास आहे, असा बाबासाहेबांच्या मुलाखतीतील भाषणाचा सारांश होता. Discussing the Congress and Muslim League Viewpoints with a representation of their paper on Monday night, Dr. B. R. Ambedkar, Leader of the Independent Labour Party, said, "I do not agree with Mr. Gandhi and the Congress when they say that India is a nation. I do not agree either with the foreign relations committee of the Muslim League when they say that Hindus and Muslims could not be welded together into a nation.

"My belief is" he continued "that we are not a nation. But my confident hope is that we can be a nation provided proper processes of social amalgamation are set forth." —*The Times of India*, Tuesday, 6-2-40 p-11).

या वृत्तांताची माहिती 'आशा–प्रमोद'ने दिली ती अशी —

"मला वाटते—

हिंदू समाज राष्ट्र नाही मुस्लीम समाज राष्ट्र नाही हिंदू–मुस्लिम समाज हेही राष्ट्र नव्हे. राष्ट्र अजून बनायचे आहे हिंदू समाजाला पाहिजे असेल तर निराळ राष्ट्र बनता येईल. मुसलमान लोकांना स्वतःच राष्ट्र बनवायचं असेल तर त्यानाही निराळ राष्ट्र बनविता येईल. दोघांचं मिळुन जर एक राष्ट्र करायचं असेल तर तसही एक राष्ट्र करता येईल. राष्ट्र ही काही उपजत वस्तू नव्हे ही घडीव आहे. घडवणाराची इच्छा असेल तर ते घडवता येईल. नुसत्या एकत्र मतदार संघांनी एवढं होणार नाही.

पाच वर्षांच्या अवधीत जे लोक एकमेकांशी फटकून वागतात, त्यांनी एक दिवस निवडणुकीकरता एके ठिकाणी येऊन एकत्रित मतदान केल्यानं हिंदू मुसलमानांच एक राष्ट्र होईल असं म्हणणारे लोक शतमूर्ख आहेत असं माझं म्हणणं आहे.

**डॉ. बी. आर. आंबेडकर**

मुंबई ता. २–३–४०
(खास 'आशा–प्रमोद' साठी)

अस्पृश्य समाजात जी फाटाफूट झालेली होती तिच्यासंबंधी दोन्ही पक्ष विरुद्ध पक्षावर प्रहार करून आपली बाजू खरी करून दाखविण्याचा वेळोवेळी प्रयत्न करीत असत. त्याचे एक उदाहरण पहा :–

## "जनताकार" आपल्या पायाखाली काय जळते ते पाहतील काय?

लेखक :– श्री. सीताकांत

डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली निघणाऱ्या जनता पत्राच्या ता. १७–२–४० च्या अंकात स्फूट विचार या सदराखाली "त्र्यंबक येथील चांभार समाजाची विराट सभा" या मथळ्याखाली लोकांची दिशाभूल करणारी टीका आली आहे. ती टीका वाचता क्षणीच कोकणातील एका म्हणीची आठवण झाली. ती म्हण अशी की कोणाच्याही कामाचा नाश व्हावा अशी इच्छा असल्यास "तुझ्या कामात भट पडो" असे म्हणतात. त्याप्रमाणे जनता पत्राचे संपादकत्व विनाकष्टे आयत्या बिळात नागोबा याप्रमाणे श्री. गंगाधर निळकंठ सहस्रबुद्धे या भटजीकडे आल्यापासून महार समाजात डॉ. आंबेडकरांभोवती गोंडा घोळणाऱ्या काही उच्चवर्णीयांचे प्रस्थ माजविण्याकरिता हरिजन वर्गात भिन्न मताच्या समाजसेविकांविरुद्ध कुटिल लिखाण लिहून महार वा महारेतर यांच्यामध्ये फाटाफूट पाडण्याचे पद्धतशीर प्रयत्न या संपादकाने सुरू केले आहेत.

वास्तविक पाहिले असता काजरोळकर व शिवतरकर हे आपल्या समाजात जागृतीचे कार्य करीत आहेत. ते कार्य करीत असताना डॉ. आंबेडकरांनी आतापर्यंत जी कारस्थाने केली, जे लंपडाव खेळले व चांभार पुढाऱ्यांविरुद्ध जी त्यांनी त्यांच्या विद्वत्तेला न शोभणारी अशी अश्लील भाषणे केली व मित्रद्रोह केला. त्याबद्दलचे अविष्करण त्यांनी आपल्या जातीपुढे केले तर त्याबद्दलचा राग डॉ. आंबेडकरांना किंवा यांच्या अंध अनुयायांना का यावा? हे काही समजत नाही. पण म्हणतात ना, "खाई त्याला खवखवे" हेच खरे हे जनताकार आपल्या पत्रात लिहितात की, "डॉ. आंबेडकरांच्या प्रयत्नाने मुंबईत म्युनिसिपल शाळांचे सुपरवायझर पद प्राप्त झालेले श्री. शिवतरकर यांचेही भाषण झालेच. धडधडीत खोटे विधान लिहिले आहे. ज्यावेळी श्री. शिवतरकर

म्युनिसिपल शाळांचे सुपरवायझर झाले त्यावेळी डॉ. आंबेडकर हे विलायतेत होते. त्यांना सुपरवायझरची जागा मिळाली ती त्यांच्या कर्तबगारीनेच मिळाली. त्यावेळी त्यांच्या बरोबरीचे महार समाजातील थर्ड इयर ट्रेंड जावळे मास्तर हेही एक उमेद्वार म्हणून उभे होते. ती जागा शिवतरकरांना मिळू नये म्हणून शिवतरकरांच्या हितशत्रूंनी पुष्कळ कृष्ण–कारस्थाने केली व त्यांनी स्कूल्स कमेटीच्या मेंबर्सना लेखी कळविले की, शिवतरकर यांच्यावर सोसायटीच्या पैशांची अफरातफर केल्याबद्दल इन्क्वायरी कमेटी नेहमी आहे. तिचा निकाल लागेपर्यंत या जागेचा निकाल तहकूब ठेवावा. तेव्हा स्कूल्स कमेटीने हे प्रकरण को ऑपरेटीव्ह सोसायटीचे असिस्टंट रजिस्टार यांच्याकडे पाठविले. त्यांच्याकडून असे उत्तर आले की, शिवतरकर यांनी सोसायटीच्या पैशांची कोणत्याही प्रकारे अफरातफर केली नाही. ही गोष्ट स्कूल्स कमेटीच्या प्रोसिडिंग बुकात नमूद केली आहे व त्यावेळचे स्कूल्स कमेटीचे मेंबर डॉ. सोळंकीसाहेब, प्रि. दोंदे व सध्याचे चेअरमन श्री. गोळे यांनाही पूर्णपणे माहीत आहे. त्यावेळी या मेंबर्सनी श्री. शिवतरकर यांची पूर्ण कसोटी करून पाहिली आहे. असे असताना लोकांची दिशाभूल करून श्री. शिवतरकर यांच्यासंबंधी गैरसमज वाढावा या दुष्ट हेतूनेच ह्या भटजी संपादकाने वरील विधान केले आहे. पण हे विधान लिहिण्यापूर्वी त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाचे एक आधारस्तंभ प्रि. दोंदे यांना जरी यासंबंधी खुलासा विचारला असता तरी त्यांनी तो अगदी प्रामाणिकपणेच केला असता. डॉ. सोळंकीसाहेब व प्रि. दोंदे यांनी शिवतरकरांच्या प्रामाणिकपणाबद्दल स्कूल कमेटीच्या सभासदांची खात्री करून दिली व जावळे व शिवतरकर या दोघांमध्ये शिवतरकर हेच लायक व हुशार आहेत म्हणून त्यांनाच ती जागा द्यावी असे त्यांनी ठासून सांगितले, ही गोष्ट जगजाहीर आहे. असे असताना प्रस्तुत संपादकाने शिवतरकरांना पैशाची मोठी हाव आहे असे विधान करून त्या विधानाचा पुरावा असिस्टंट रजिस्ट्रारच्या ऑफिसात आहे म्हणून त्यांच्यावर शिंतोडे उडविण्याच्या प्रयत्न केला आहे. परंतु डॉ. आंबेडकरांनी पैशाच्या कोणकोणत्या उलाढाली केल्या आहेत हे प्रत्यक्ष संपादक बुवाला ठाऊक असून त्याबद्दल कधी चकार शब्द लिहिला नाही. तरी पण त्यांना मला एक गोष्ट विचाराविशी वाटते, ती ही की, मुंबईतील जुन्या काळच्या महार पुढाऱ्यांनी पैसा पैसा जमवून देऊळ बांधण्याकरिता अदमासे दीड हजार रुपयांचा फंड जमा केला होता. तो फंड डॉ. आंबेडकरांच्या सांगण्यावरून त्या महार पुढाऱ्यांनी बँकेतून काढून डॉ. आंबेडकरांच्या जवळ आणून दिला. तो पैसा डॉ. आंबेडकरांनी आपल्याच संमतीने आपण ज्या टोपलाभर सोसायट्या काढल्या होत्या त्यापैकी एका सोसायटीत ठेवला होता हे आपणास ठाऊक आहे. तरी त्या फंडाचे पुढे काय झाले त्याबद्दल आपण प्रमाणिकपणे सांगू शकाल काय ? म्हणजे डॉ. आंबेडकरांना महार पुढारी त्या पैशासंबंधी पृच्छा करतात व डॉ. आंबेडकर त्यांना उडवाउडवीची उत्तरे देतात ती उत्तरे खरी आहेत की खोटी आहेत हे आपल्या खुलाशाने जनतेपुढे येईल हे लोकांच्या संशयाची निवृत्ती होईल.

त्याच पत्रात असे म्हणतात की, "डॉ. आंबेडकरांच्या स्व. म. पक्षातर्फे कायदे मंडळात शिवतरकरास जावयास हवे होते. परंतु त्यांना म्युनिसिपालिटीच्या १७५ रुपये पगाराचा मोह सुटत नव्हता. "याबाबत डॉ. आंबेडकरांनी व त्यांचे हल्लीचे सेक्रेटरी चित्रे व सुभेदार सावदकर यांनी काय काय कारस्थाने केली त्याचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. वेळ येईल तेव्हा तो बाहेर पडेल. पण येथे इतकेच नमूद करतो की, मुंबईतील धर्मांतराच्या पाठिंब्याकरता भरलेल्या महार परिषदेत डॉक्टर साहेबांनी जे भाषण केले त्यात श्री. शिवतरकर व इतर माझे सहकारी चांभार मित्र यांना असेंब्लीत निवडून आणणे हे मी माझे व आपलेहि पवित्र कर्तव्य समजतो, म्हटले आहे. व त्यानंतर झालेल्या खाजगी चर्चेत सुद्धा शिवतरकरास जर म्युनिसिपालिटी परवानगी देत असेल तर त्यास आपण निवडून आणू असे अनेक वेळा म्हटले आहे. पण ही गोष्ट कै. सवादकर व त्यांचे स्तुति पाठक झालेले कमलाकांत चित्रे (जे हल्ली डॉ. आंबेडकरांचे प्यारे सेक्रेटरी झालेले आहेत) यांना कसे खपणार. ह्या दोघांनी शिवतरकर यांच्याविरुद्ध डॉ. आंबेडकरांचे कान भरले व दुसरीकडून जेव्हा शिवतरकरांनी इलेक्शनला उभे राहाण्हाची परवानगी मिळण्याचा अर्ज म्युनिसिपालीटीत केला. तेव्हां उपनिर्दीष्ट दोन सुदोपसुंदांनी श्री. उपशाम मास्तर यास गळ घालून त्यांना तसा अर्ज करण्यास सांगितले. प्रथम श्री. उपशाम याजवर शिवतरकरांनी केलेले अनंत उपकार स्मरून ते तयार नव्हते. पण पुन्हा त्याजवर जेव्हा डॉक्टरांचे दडपण आणण्यात आले तेव्हा त्यांनी अर्ज केला व अशारीतीने स्कूल्स कमिटीच्या सभासदांच्या मनात कलुषितपणा उत्पन्न केला. त्यांना परवानगी मिळाली नाही हे सत्य आहे. श्री. शिवतरकरांना जर खरोखर पैशाची राक्षसी महत्वाकांक्षा असती तर त्यांना हिंदू कॉलीनीत एखादा बंगला सहज बांधता आला असता. परंतु त्यांचा सर्व पैसा डॉ. आंबेडकरांबरोबर सार्वजनिक कामे करण्यात व विलायतेत असताना येथील चळवळ जिंवत ठेवण्यातच खर्च केला गेला हे सर्वांना विदीत आहे.

शेवटी मी जनतेच्या संपादकाना प्रेमाची सुचना करतो की दुसऱ्यावर टीक-करताना अगोदर आपल्या पायाखाली काय जळते आहे ते पहा. "चिखलात दगड फेकला तर त्या चिखलाचे शिंतोडे आपल्यावरही उडतात." "कांचेच्या घरात राहाणाऱ्याने दुसऱ्यांच्या घरावर दगड मारू नये." हे तुमच्या सारख्या सोशल सर्वीस लीगमध्ये काम केलेल्या विद्वान संपादकास सांगावयास पाहिजे असे नाही "झाकली मूठ सव्वा लाखांची" असे समजून महार व चांभार यांच्यामध्ये सलोख्याचे वातावरण निर्माण होईल असेच लिखाण लिहा." (लोकमान्य ७-३-४०)

काहीना काही कारणामुळे अस्पृश्यांच्यामध्ये जी फूट झाली ती नष्ट करण्यासठी मनापासून कोणी प्रयत्न करीत नसत. आणि कोणी केलेच तर त्याचे पाय ओढून त्याला खड्ड्यात टाकण्याचे प्रयत्न समाजकंटक करीत असत. कारण समाजात दुही

ठेवण्यातच त्यांचे चरण्याचे कुरण सुरक्षित राहते. हा अनुभव १९२४ पासूनच्या काळा-पासूनचा आहे. तो १९४० मध्येही अस्तित्वात होतो.

आर. एम्. भट हायस्कूल येथे रविवारी ११–३–४० ला श्री. डी. जी. जाधव एम्. एल ए. यांच्या अध्यक्षतेखाली एक सभा भरून तीत असा ठराव पास करण्यात आला की, अस्पृश्यांतील तरुणांची 'प्राणयज्ञ दल' ही संस्था स्थापन करावी. डॉ. आंबेडकर यांनी जो राजकीय व सामाजिक हक्कासाठी कार्यक्रम हाती घेतलेला आहे. त्याला उचलून धरण्यासाठी अस्पृश्य तरुणांची लौकरच एक परिषद भरवावी असा दुसरा ठराव या सभेत पास झाला. सनातन्यांनी अस्पृश्यांचे मानवी हक्क मान्य करीपर्यंत प्राणयज्ञ दलाची चळवळ चालू राहील. पूर्व खानदेशातील सावडा येथे २४ मार्च रोजी स्वतंत्र मजूर पक्षाची परिषद आणि २४ व २५ मार्च रोजी अखिल महाराष्ट्र युवक परिषद डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्याचे या सभेत ठरविण्यात आले. ("Life — Sacrificing Army Planned — Bombay Harijans' Move" —*The Times of India*, Monday, 12-3-40, p-11).

१३–३–१९४० रोजी ईस्ट इंडिया असोसिएशनची कॅक्स्टन हॉल, लंडन, येथे सभा भरली होती. तेव्हा उधमसिंग या तरुणाने सर मायकेल ओडवायर पंजाबचे माजी गव्हर्नर, यांना पिस्तुलाने ठार मारले त्यांच्या कारकीर्दीत अमृतसरला जालियनवाला बाग कत्तल झाली. तसेच पंजाबात मार्शल लॉ पुकारून पंजाब्यांचे मनस्वी हाल केले. सर शंकरन् नायर यांनी Gandhi and Anarchy या पुस्तकात त्यांच्यावर बरीच टीका केलेली होती सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यावर ओडवायर साहेबांनी नायरवर बेअब्रुबद्दलची फिर्याद केली व तीत नायरला जबरदस्त भूर्दंड सोसावा लागला.

• • •

## खंड १

### प्रकरण : २

# आंबेडकरांचे राजकीय महत्त्व

लीगच्या पाकिस्ताननिर्मितीच्या ठरावाबद्दल सर चुनीलाल सेटल्वाड यांनी कडक भाषेत निषेध व्यक्त केला, आणि पाकिस्तान हे हिंदूना व मुसलमानांना परिणामी घातुक ठरेल कारण त्यामुळे त्यांच्यात सदैव चुरस व झगडे निर्माण होतील. "Mr. Jinnah's Remedy Worse than the Disease. There would be war between the two — states — (Times of India, 27-3-40). आजचे अहिंदू हे कांही शतकापूर्वीचे हिंदू होते व दोन्ही समाज सध्याहि समान संस्कृतीत वागत असतात; असेहि सेटल्वाडनी मत प्रदर्शित केले.

(In Bombay Province, the forefathers of the present Khojas and Memons were Hindus (Lohanas and Bhatias) who embraed Islam 200 to 400 years ago. They have preserved to such an extent the customs and manners of their original community that till only three years ago when legislation was framed to bring them fully under Muslim law, were governed by the Hindu law of property, inheritance and succession........ To my mind, the only solution for India is to have one India with a constitution suited to her conditions.......... I am emphatically of opinion that Mr. Jinnah's scheme is against the best interests of all concerned including the Muslims themselves, and if adapted would lead to disaster."

(Bombay Chronicle, 27-3-40)

भारतातील लोकांचे महायुद्धाला साहित्य पुरविण्यासाठी भरपूर सहाय्य व्हावे व त्याकरिता भारतातील बुद्धीप्रधान लोकांशी याबाबतीत विचारविनिमय करण्यासाठी ब्रिटिश सरकारने, काही इंग्रज लेखक, वर्तमान पत्रांचे प्रतिनिधी, युनिव्हर्सिटीतील प्राध्यापक आणि मजूर पक्षाचे कार्यकर्ते यांना आळीपाळीने पाठविण्याची योजना हाती घेतली. हे लोक भारतात आल्यानंतर सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांच्या आणि बुद्धीप्रधान भारतीयांच्या भेटी घेत व चर्चा करून त्यांचे सहाय्य मिळविण्याचे प्रयत्न करीत. अशा इंग्लीश लोकांपैकी एडवर्ड थॉमसन हे ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीतील प्राध्यापक १९३९ च्या अखेरीस भाररतात आले व त्यांनी अनेक भारतीयांच्या भेटी घेतल्या. त्यांनी बाबासाहेबांचीही राजगृहात भेट घेतली, तेव्हा बाबासाहेबांनी त्यांना आपली सर्व हकिगत सांगितली. महार सैनिकांच्या बळावर ईस्ट इंडिया कंपनीने महाराष्ट्रांत व इतरत्र ब्रिटिश साम्राज्याचा पाया घातला आणि ब्रिटिश साम्राज्य हिंदुस्थानांत चांगले बळकट झाल्यावर १८९२ साली ब्रिटिश सरकारने हिंदुसैनिकांना खुष करण्यासाठी अस्पृश्याना लष्करात नोकऱ्या देण्याचे बंद केले. १९१४–१८ च्या पहिल्या महायुद्धात महारांच्या दोन पलटणी उभारल्या व त्यांच्याकडून काम करून घेतल्यानंतर त्यांना रद्द करण्यात आले. या ब्रिटिशांच्या कृतघ्नपणामुळे महार तरुण सैन्यांत जावयास धजत नाहीत आणि जे जातात त्यांना लढवय्याचे काम मिळत नाही. त्यांना इतर सटरफटर कामे देण्यात येतात. ही परिस्थिती नष्ट झाली पाहिजे. प्रा. थॉम्पसन यांनी बाबासाहेबांचे हे आणि इतर विचार लंडनला गेल्यानंतर "स्वातंत्र्यासाठी भारताल युद्धात प्रवेश द्या" या अर्थाच्या ग्रंथात समाविष्ट केले. हा ग्रंथ १९४० मध्ये प्रसिद्ध झाला. आंबेडकर हे भारतातील १२ उत्कृष्ट लोकांपैकी एक आहेत आणि ते अस्पृश्यांचे अनभिषिक्त राजे आहेत. त्यांची विद्वता इतकी थोर आहे की, त्यांनी सहज काहीतरी लिहिले तरी ते विद्यापिपासूनी लक्षपूर्वक वाचावे. त्यात त्यांना ज्ञानज्योतींचा दिव्य प्रकाश दिसले. अशा आशयाचे उद्‌गार प्रा. थॉम्पसन् यांनी आंपल्या ग्रंथात काढलेले आहेत. ते मी येथे उध्दृत करतोः—

"The best known leader of the Scheduled Classes is Dr. Ambedkar, an *olumnus* of German and American Universities, as well as of Bombay. He has or once had, his own grievance against us over his ease. He is a Mahar, (hereditarily a leather worker) and on the memorial at Koregaon, where in 1818 it was fought an action which colonel Tod styled "the Indian Thermo-phylae", I am told that half the names of the Indian dead are those of Maharas. His father and grand-father were sepoys, but the Government in defence of caste prejudices, in 1892 ceased to recruit Mahars for the Army. Ambedkar

became a lawyer, and incidentally a master in his own vigorous and individual fashion of the English language. He is a mass exhilarating polemist, utterly fearless with a wide command of the unexpected and devastating illustration — historical or otherwise — and his energy flies so swiftly that it produces by the way most effective results. Speaking of, the little influence that his enemies attacks had on him, he said — looking fiercely at me, "In fact I am not only hide bound! I am skin-flint!" He is. If anything by Ambedkar comes your way read it, and you will understand, why he often makes orthodox Hindus hopping mad. He is one of the dozen, most astonishing men in India.

It is often said that India must not be allowed to Govern herself because without us the scheduled classes will have such a bad time.

What does Ambedkar think? In his presidential address (All India Depressed Classes Congress, August 1930) he said,

"I am afraid that the British choose to advertise, our unfortunate conditions, not with the object of removing them, but only because such a course serves well as an excuse for retarding the political progress of India. Before the British came you were in the loathsome condition due to your untouchability. Has the British Government done anything to remove your untouchability? Before the British you could not draw water from the village well. Has the British Government secured you the right to the well? Before the British you could not enter the temple. Can you enter now? Before the British you were denied entry into the Police force. Does the British Government admit you in the force? ....... Those who have held so much power over the country for such a long time, must have done some good. But there is certainly no fundamental improvement in your position. So far as you are concerned, the British Government has adopted the arrangements as it found them and has preserved them

faithfully in the manner of the Chinese tailor, who when given an old coat of pattern, produced with pride an exact replica with patches and all your wrongs have remained as open sores and they have not been righted........

It is only in the Swaraj Constitution that you stand any chance of getting the political power, into your own hands, without which you cannot bring salvation to your people."

He has fought with skill and uncanny success, to get for the scheduled classes representation far in excess of what anyone ever expected they would get.

He is a realist, when some kindly Brahman publicly washes some scores or hundrends of untouchables in the Ganges, Ambedkar comes accross with no bouquet of thanks. Nor is he excited when a South Indian Raja opens a temple or two (to be carefully recleansed after the untouchables have gone home). What the scheduled classes want is practical help. The day when we might have given it has gone by. Ambedkar wants dominion status right enough, though the scheduled classes and he himself in particular are often cited as being against it. What these classes want is enough to eat and decent human status........"

—(Enlist India For Freedom, pp. 74-76, by Edward Thompson, 1940).

मुंबईत ए आय. सी. सी. ची बैठक भरली तेव्हा गांधीजींनी आपल्या भाषणांत असे मुद्दे मांडले की, युद्धविरोधी प्रचार करण्यास आपणांस स्वातंत्र्य हवे, आणि मनुष्य व पैसे पुरवून भारतीयांनी युद्धाला मदत करू नये. गांधीजींचा हा दृष्टीकोन फार महत्त्वाचा व सामान्य माणसाला आकलन न होणारा आहे, आणि या भाषणाने गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ डावलण्याचा राजकीय डाव टाकला आहे. असा या भाषणाचा अर्थ काही जणांनी लावलेला आहे, तो आपणाला मान्य नाही' अशा आशयाचे विचार डॉ. आंबेडकर यांनी टाईम्समध्ये आपले पत्र प्रसिद्ध करून प्रगट केले. युद्ध हे हिंसामय आहे. त्याला मदत न करणे अहिंसावादी लोकांचे कर्तव्य आहे या गांधीजींच्या दृष्टीकोनाबद्दल बाबासाहेबांनी असे विचार मांडले की, हिंसा करणे हे वाईट आहे हे खरे पण युद्धात हिंसा अटळ आहे. हिंसेला विरोध करणाऱ्या सद्सद्विवेकवादी लोकांना सैन्यांत भरती न होण्यापासून

सवलत मिळेल. पण त्याला बिगर सैनिकांचे काम करावेच लागेल. त्याला युद्धविरोधी चळवळ करता येणार नाही. ही तात्विक परिस्थिती अहिंसावाद्यांनी लक्षात घ्यावी. युद्धांत यशस्वी झालेल्या पक्षाने पराजित शत्रूवर अन्यायाकारक व अपमानास्पद अटी लादणे, ही अघोरी हिंसा होईल. चालू युद्धाचा शेवट झाला व विजेत्यानी जितावर अन्यायकारक अटी लादल्या, तर अहिंसावाद्यांनी त्या अघोरी हिंसेविरुद्ध प्राणांतिक उपोषण करावे. अहिंसावादी गांधीजींना हा मार्ग मोकळा आहे. तो न चोखळता ते व्हाईसरॉयबरोबर चर्चा करण्याची वेळ मागून घेतात, हे त्यांना योग्य नाही. भारत सुरक्षा कायद्या-विरुद्ध चळवळ करण्याच्या हेतूची व्हाईसरॉयरोबर चर्चा करणारा हा जो विषय प्रगट केलेला आहे तो वस्तुतः खरा नाही. चर्चा करण्याचा त्यांचा विषय दुसरा आहे. तो म्हणजे ब्रिटिश सरकारने कॉंग्रेसच्या हाती सत्ता दिली नाही तरी चालेल. व्हाईसरॉयच्या हातांत ती सत्ता जास्त दृढ केली तरी चालेल, पण भारतांतील अल्पसंख्याक लोक व कॉंग्रेसेतर राजकीय पक्ष यांच्या हातांत ती सत्ता जाऊ देऊ नये, हा तो विषय आहे. आणि ही सत्ता जर ब्रिटिश सरकारने या लोकांच्या हातांत दिली तर कॉंग्रेस ब्रिटिशांच्या विरुद्ध सविनय कायदेभंगाची चळवळ करील, हे व्हाईसरॉयना सांगण्यासाठी गांधीजी त्यांची भेट घेऊ इच्छितात. असे बाबासाहेबांनी मत प्रदर्शित केले. ९ सप्टेंबरला मद्रास येथे श्री. राजगोपालाचारी यानी जे भाषण केले त्याचा वृत्तांत हिंदू पत्रांत प्रसिद्ध झालेला आहे. त्या भाषणांत त्यांनी या मुद्याला उचलून धरलेले आहे. व्हाईसरॉयचे मंत्रीमंडळ वाढविणे या संबंधी व्हाईसरॉयने वक्तव्य प्रसिद्ध केलेले आहे. या मंत्रीमंडळात अल्पसंख्यांकांचे कॉंग्रेसत्तर पक्षांचे लोक व्हाईसरॉय घेणार हे उघड आहे. या विरुद्धच गांधीजी व कॉंग्रेस यांचा रोख आहे. गांधी व कॉंग्रेस यांचा हा दृष्टीकोन लोकशाहीला धरून नाही. १९२३ मध्ये पार्लमेंटात कोणताही पक्ष अधिक संख्येने निवडून आलेला नव्हता. हुजूरपक्ष २५५, मजूर पक्ष १९१ आणि उदारमतवादी पक्ष १५८ असे उमेदवार निवडून आलेले होते. तेव्हा मि. ॲसक्विथ यांना सरकार बनवणे कठीण नव्हते कोणत्यातरी एका पक्षाशी करार करून ते प्रधान होऊ शकले असते. जे लोक जीर्णमताचे होते ते मि. ॲसक्विथ यांना एकसारखे सांगत की, काहीही करा पण मजूर पक्षाशी करार करून त्याच्या हाती सत्ता देऊं नका. पण ते लोकशाहीप्रिय मि. ॲसक्विथ यांनी ऐकले नाही. ते म्हणाले, मजुर पक्षाला बाजूला सारले तर देशांत वर्गकलह धुमसत राहील. त्यांनी मजूर पक्षाशी करार केला व मजूर पक्ष सत्तारूढ झाला. कॉंग्रेस व गांधी यांना जर लोकशाही प्रस्थापित करावयाची असती तर त्यांनी ॲसक्विथप्रमाणे दृष्टिकोन स्वीकारला असता. आणि व्हाईसरॉयच्या मंत्रीमंडळांत सर्व पक्षाचे आणि जमातीचे प्रतिनिधी घ्या आणि कॉंग्रेसलाही घ्या, असे त्यांनी व्हाईसरॉय यांना सुचविले असतें. पण त्यांना कॉंग्रेसशिवाय कोणाच्या हातांत राज्यसत्ता जाणे पसंत नाही. याचा अर्थ हाच की भारत देशांत लोकशाही स्थापणे हे कॉंग्रेसचे ध्येय नाही म्हणजे भारत लोकशाही राज्याला लायक नाही. या दुष्ट विचारांची कटु फळे कॉंग्रेसेतर

पक्षांना चाखाबयास मिळतील ती जेव्हां भारताची राज्यघटना तयार करावी तेव्हां! काँग्रेस आपले हित करील अशा भरवशावर जे अल्पसंख्यांक लोक राहिलेले आहेत त्यांचे डोळे त्या वेळी उघडतील व आपण आपली आत्मवंचना करून घेतली हे त्यांना कळून येईल.

बाबासाहेबांच्या पत्रांतील मजकूराचा आशय वरीलप्रमाणे होता. ते पत्र मी येथे देतो :—

*"Meaning of the Congress Decision"*

*Dr. Ambedkar On Mr. Gandhi's Object.*

Sir:— Two views are prevalent in Bombay about Mr. Gandhi's performance at the A.I.C.C. meeting held in Bombay.

One is that the performance of Mr. Gandhi was the cleverest, something beyond the ken or ordinary mortale, and that by his performance Mr. Gandhi has avoided the turmoils of civil disobedience. To me both these views appear most astounding. That the public should form it's views on such vital matters in such a facile manner is a sad commentary upon it's thinking capacity, especially of the Hindu public, I cannot see how Mr. Gandhi has by his project avoided civil disobedience. It is true Mr. Gandhi is asking for liberty to preach against the war, to tell people that they should not take part in the war or help it's furtherance either by supplying men or money. But what does this mean ? To my mind it means nothing but Civil Disobediance of the Defence of India Act. How the Hindu public can interpret Mr. Gandhi's project as not amounting to civil disobedience is beyond my comprehension.

## VERY BAFFLING

What is, however most baffling in the whole situation is the audacity of Mr. Gandhi to call upon the Viceroy and the absolute certainty of the Viceroy giving him an interview.

A man with much less intelligence than Mr. Gandhi realies what nothing can be more ridiculous than to go to the Viceroy to ask his permission to break the Defence of

India Act. It cannot be beyond the knowledge of Mr. Gandhi that he is asking something far in excess of what has been conceded to conscientious objectors in England or America. All that conscientious objects has been given is that he will not be forced to join the combatant service. He has not been given exemption from non-combatant service nor has he been given any liberty to preach against the war which is going on. It cannot be beyond Mr. Gandhi to appreciate that while all thinking men must hate the use of force, a distinction has to be made between the use of force to put down force and to use the victory obtained by force to impose ignoble and injust terms upon the vanguished.

It seems to me that the root of the evil is not in the use of force but in the misuse of victory. Mr. Gandhi and all pacifists and believers in non-violence will do a lasting service to humanity if they went on a fast unto death when peace is announced if the terms of peace offered to the vanguished are ignoble and unjust. The pacifist, it seems to me, has misunderstood his mission. His fight must be against a base peace, and not against force. By calling upon people to abjure the use of force the pacifist is only helping those who will insist on using force to victory. All this must be quite intelligible to Mr. Gandhi.

I am therefore quite certain that Mr. Gandhi is not going to the Viceroy on such a fool's errand Mr. Gandhi is going for a totally different purpose. He is going to tell the victory that the Congress will not mind if power is not given to the congress, and that the Congress will tolerate the situation if power is retained by the Viceroy and the bureaucracy. But the Congress will start civil disobedience and fight the British Government if the British Government plans to transfer power to the minorities and other non-Congress parties in the country. That this is the force which aminates the Congress is clear from the speech made by Mr. C. Rajgopalachari on September 9 at Madras. In that speech Mr. Rajgopalachari according to The Hindu said : "Had he by any misfortune been the Viceroy, he

would under present conditions, have prefered to carry on the administration in the old way than courting fresh troubles that were bound to follow by deciding to proceed with the present plan of forcing the rule of minorities over the majority.

## CONGRESS MOTIVE

The basis of this sudden call to arms by the Congress lies in its desire to force the Viceroy into abandoning his project of installing the minorities and other non-congress parties in the expanded executive council. This threat of civil disobedience has no other purpose : That the Congress is fighting for the cause of the country is humbug. The Congress is fighting to obtain the keys of power in it's own hands. That the Congress is fighting for freedom of speech is equally humbug. The Defence of India Act has been in existence for one whole year. The toil it has taken is detailed by the recent report of the Civil Liberties Union. If Mr. Gandhi felt that the Defence of India Act had deprived the country of his liberty to speech, why did he not start his civil disobedience immediately after the act was passed ? Why did he wait for a year ? Why this revolt after the Viceroy's statement that Government must now be carried on with the help of the representatives of the minorities and other parties in the country ? There is no answer. The hardship caused by the Defence of India Act is only an excuse put forth by the Congress to clothe the torpedoing of the Viceroy's plans and to prevent the minorities and others from getting political power.

## BRITISH EXAMPLE

Such are the springs of Congress action. It may be good tactics and, if the Congress suceeds, it will provide additional proof that the British, having established a parliamentary system of Government will not risk being in the bad books of a party that is popular. But is it statesmanship ? In this connection one is reminded of the action of

Mr. Asquith in 1923. In the 1923 dections no one party had a majority. The Conservatives had 255, Labour 191, and Liberals 158. As the leader of the liberals, three courses were open to Mr. Asquith : (i) to support the conservatives; (ii) to support Labour; or (iii) to take office himself relying on Conservative support. Appeals were made to Mr. Asquith to enter into a compact with the tories and thereby prevent Labour from getting into power. But so far from being tempted by these suggestions Mr. Asquith was averse to any such plot. His reasons were first of all that it would be seriously harmful to the national interest and an incitement to class antagonism for the two middle-class parties to combine together to deprive Labour of an opportunity to rule. If Congressmen deprive the minorities of their opportunity, they will, I hope, realise that they are purchasing their victory at great cost. If they do not realise it now, they will realise when parties meet to revise the constitution. By the action of the Congress, two things have become abundantly clear. First that British Parliamentary Government is unsuited in this country. Secondly that anyone who leaves an important safeguard to a gentleman's agreement for it's guarantee will do so at his peril.

DR. B. R. AMBEDKAR"

(*The Times of India*, Monday, 24-9-40)

पहिले महायुद्ध संपल्यानंतर युरोपमधील बहुतेक देशांना वाटू लागले की लोकशाहीप्रणीत राज्य देशाला व समाजाला हितावह नाही. रशियाने कम्युनिझमचे तत्वज्ञान स्वीकारले आणि हेच सर्व देशांना तारक होय असा प्रचार चालविला इटलींत फॅसिझम सुरू होऊन त्या देशानेही तोच प्रचार चालविला. जर्मनीत नाझीझम सुरू होऊन त्या देशानेहि तोच प्रचार चालविला. व्हेसुाय युरोपात, लोकशाही, साम्यवाद व दंडूकेशाही (फॅसिझम व नाझीझम) असे तीन गट उत्पन्न झाले. आणि ते परस्परांचे हाडवैरी झाले. दंडुकेशाही गट लोकशाही व साम्यवाद यांना नष्ट करण्याच्या घोषणा करू लागला. हिटलर व मुसोलिनी यांनी लोकशाही गट नष्ट केला तर ते आपणालाही नष्ट करतील अशी स्टालिनला भिती वाटत होती; आणि त्या दोन दंडुकेबहाद्दरांनी स्टालीनचा साम्यवाद नष्ट केला तर ते आपणांलाही नंतर नष्ट करतील, अशी भीती लोकशाही राष्ट्रांना वाटत होती. या तीन गटांची स्पर्धा स्वशक्ती वाढविण्यासाठी सुरू

झाली. इटलीने अबिसिनियावर स्वारी करून तो देश आपल्या वर्चस्वाखाली आणला. जर्मनीने पोलंड झेकोस्लोव्हाकिया ऑस्ट्रिया हे देश जिंकले व दुसऱ्या महायुद्धाला तोंड लागले. जर्मनी व इटली यांच्यावर इंग्लंड व फ्रान्स या देशांनी युद्ध पुकारले (३-९-३९) जर्मनी व रशिया यांचा मैत्रीचा करार झाला होता (ऑगस्ट १९३०). म्हणून रशिया युद्धांत पडला नाही. पण या कराराचा भंग जर्मनीने केला व रशियावर स्वारी केली तेव्हा रशियाने जर्मनी व इटली यांच्याबरोबर युद्ध पुकारले. हे दुसरेम हायुद्ध साम्राज्यवादी राष्ट्रांचे आहे, म्हणून त्यांत भारत भाग घेणार नाहीं; असा भारतीय राष्ट्रसभेने पुकारा केला. सात प्रांतातील काँग्रेस मंत्रीमंडळांनी १९३९ च्या नोव्हेंबरमध्ये राजिनामे दिले. जोपर्यंत रशिया या युद्धांत पडला नाही. तोपर्यंत हिंदी कम्युनिस्ट पार्टी असा प्रचार करीत असे कीं हे रक्तपिपासू साम्राज्यवाद्यांचे युद्ध आहे, त्याला कामगारांनी मदत करू नये. स्वतंत्र मजूरपक्ष या युद्धाला सर्वांनी मदत करावी, असा प्रचार करीत असे. काँग्रेस व कम्युनिस्ट पार्टी यांची भूमिका कशी चुकीची आहे आणि स्व. म. पक्षाची भूमिका कशी बरोबर आणि परिणामी देशाला व पर्यायाने सर्व जगाला हितावह आहे याबद्दल साधक बाधक माहिती देऊन बाबासाहेबांनी जनतेच्या ९-११-४० च्या अंकात (पा. ४-५) एक अग्रलेख व स्फुट लिहिले. ती दोन्ही मी खाली उधृत करीत आहे :—

## "क्रांतीची उपासना कां ध्येयाचे रक्षण"

दर वर्षीं ता. ७ नोव्हेंबर हा दिवस रशियन राज्यक्रांतीचा दिवस म्हणून जगांतील सर्व कामगार उत्साहाने साजरा करतात. हिंदुस्तानमध्ये रशियन क्रांतीचे चहाते व उपासक जरी पुष्कळ नसले तरी बरेचसे आहेत असे म्हणावयास कांही हरकत नाही व ते देखील हा दिवस हिंदुस्थानमध्ये मजूर लोकांनी साजरा करावा अशा प्रकारचा प्रयत्न करीत असतात. त्याप्रमाणे थोड्या बहुत प्रमाणांत तो हिंदुस्थानमध्ये या वर्षीं साजरा करण्यांत आलाच.

रशियामध्यें प्रस्थापित करण्यांत आलेल्या कम्युनिस्ट समाज पद्धतीसंबंधाने, कोणाचे कांही मत असो, परंतु रशियन क्रांतीचा दिवस मानवी समाजाच्या इतिहासामध्ये अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. याबद्दल कोणाही सुजाण माणसाला शंका असेल, असे आम्हाला वाटत नाही. सुरुवातीपासून आतापर्यंत मानवी समाजाच्या जीवनक्रमाच्या इतिहासातील टप्पे शोधून काढण्याचा कोणी जर प्रयत्न केला, तर फ्रेंच राज्यक्रांतीचा दिवस हा **पहिला टप्पा** आहे, हे कोणांसही कबूल करावे लागेल. मानवी समाजाच्या इतिहासांत समाजाची रचना प्रथम समता आणि स्वातंत्र्य या तत्त्वांवर झाली पाहिजे अशी घोषणा जर पहिल्या कोणी केली असेल तर ती फ्रेंच क्रांतीकारकांनी केली आहे. या फ्रेंच क्रांतीच्या पूर्वी समाजाची रचना गुलामगिरीच्या तत्त्वावर आधारलेली होती. श्रेष्ठ, कनिष्ठ, वरचा, खालचा या भेदभावाने समाजाचे बंधारण रचण्यांत आले होते. त्यांत असंख्य दरिद्री

व निर्विय जनांना स्वातंत्र्याची माहिती नव्हती. नव्हें, त्याचा हकहि त्यांना नव्हता. श्रम करणे, धनोत्पादन करणे आणि ते मालकांस देणे व मालक देईल त्यावर जगणे याशिवाय त्यांच्या स्वतःच्या माणुसकींत व जीवनांत कांही अर्थ नव्हता. दारिद्याच्या गर्तेत सांपडल्यामुळे संस्कृतीचा सुगंध त्यांना ठाऊक नव्हता व त्यामुळे श्रीमंतापासून समतेच्या वागणुकीची त्यांना कोणत्याही प्रकारची अपेक्षा नव्हती, नव्हे हकही नव्हता. या असमानतेचे समूळ उच्चाटन करून समतेच्या व स्वातंत्र्याच्या तत्त्वाचा पुरस्कार केल्यामुळे फ्रेंच क्रांतीचा दिवस, तो जरी पाळण्यात येत नसला, तरी त्याचे महत्व फार मोठे आहे. फ्रेंच क्रांतीनंतर रशियन क्रांतीचा दिवस हा मानवी समाजाच्या विकासाच्या इतिहासांतील **दुसरा टप्पा** आहे. एका दृष्टींने पाहिले असतांना रशियन क्रांती व फ्रेंच क्रांती यांचा निकटचा संबंध आहे. फ्रेंच क्रांतीत सामाजिक समता व सामाजिक स्वातंत्र्य यांच्यावर भर देण्यांत आला होता. आर्थिक स्वातंत्र्य व आर्थिक समानता यांकडे दुर्लक्ष करण्यांत आले होते. आर्थिक स्वातंत्र्य व आर्थिक समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला नव्हता व जो झाला होता तो अयशस्वी झाला. **रशियन क्रांतीचे महत्व** जर कोणत्या एका गोष्टींत सांठविलेले असेल, तर ते आर्थिक स्वातंत्र्य व समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केल्यामुळेच होय हा कार्यक्रम कांही लहानसहान नव्हे. आर्थिक समानतेशिवाय सामाजिक समता व सामाजिक स्वातंत्र्य ही दोन्ही फोल आहेत, हे फ्रेंच क्रांतीचा इतिहास जो कोणी परिशिलन करुन पाहील त्याला कळून चुकेल. ज्याला धन नाही त्याला मान नाही. ज्याला धन नाही त्याला स्वातंत्र्य नाही, कारण त्याला पोटाकरितां दुसऱ्यावर अवलंबून राहिल्याशिवाय मार्ग नाही. जो परावलंबी आहे तो मनुष्य केव्हांही स्वतंत्र असू शकत नाही. रशियन क्रांतीकारकांचे मार्ग सदोष अघोरी आहेत अशी तक्रार करता येईल. समता प्रस्थापित करण्याकरितां रशियाने व्यक्तीस्वातंत्र्य नष्ट केले. असे करणे समाजाच्या धारणेच्या दृष्टीने योग्य आहे काय अशी विरोधी वृत्ती घेता येईल परंतु कांही म्हटले तरी जेथे आर्थिक असमानता अपरिमित प्रमाणांत नांदत आहे तेथे खरें स्वातंत्र्य नाही ही गोष्ट सर्वांस कबूल करावीच लागेल. अशा पद्धतीने पहाता रशियन क्रांतीचा कसा अन्योन्य संबंध आहे. व फ्रेंच क्रांतीपेक्षा रशियन क्रांतीचे महत्व जास्त कां हे दिसून येईल. फ्रेंच क्रांती ही पोळी आहे. रशियन क्रांती ही पोळीतले पुरण आहे. फ्रेंच क्रांती ही कळी आहे व रशियन क्रांती हे विकास पावलेले फूल आहे. मनुष्य मात्राच्या इतिहासांत त्यांचे उदंड महत्त्व असल्याकारणाने रशियन क्रांतीचा दिन फ्रेंच क्रांतीच्या दिनापेक्षा जास्त प्रमाणात साजरा करण्यात यावा, हे सहाजिक आहे.

वर सांगितल्याप्रमाणे रशियन क्रांतीचे उपासक हिंदुस्थानमध्ये अनेक आहेत. या उपासकामध्ये बरेचसे किरकोळ, ढोंगी, पोटभरू असे लोक आहेत; परंतु त्या बरोबरच या देशातील राजकारणामध्ये अग्रभागी असलेले कांही लोक आहेत, हेहि तितकेच खरे

आहे. पं. जवाहरलाल नेहरु, जयप्रकाश नारायण वगैरे राजकारणात पुढारी असलेले लोक या रशियन क्रांतीचे उपासक आहेत. **परंतु या रशियन क्रांतीच्या हिंदुस्थानातील उपासकांना आमचा असा सवाल** आहे की, तुम्ही फक्त हा दिवस साजरा करणार व स्वस्थ बसणार, कां या रशियन क्रांतीने ज्या तत्त्वांना जन्म दिला त्या तत्त्वांच्या संरक्षणार्थ तुम्ही प्रयत्न करणार ? आज जे जागतिक युद्ध चालू झाले आहे त्या युद्धात तत्त्वाचा लढा आहे, हे कोणीही नाकबूल करू शकणार नाही. एका बाजूला झोटिंगशाही व दुसऱ्या बाजूला लोकशाही असे पक्ष पडलेले आहेत. या लढ्यात रशियन क्रांतीच्या उपासकांना लोकशाहीच्या बाजूने लढून लोकशाहीचा विजय करणे हे त्यांचे कर्तव्य कर्म आहे, असे आम्हास वाटते. परंतु आश्चर्याची गोष्ट ही की, जे लोक रशियन क्रांतीचे उपासक म्हणून अभिमान बाळगतात तेच लोक ह्या लढाईमध्ये ब्रिटिश सरकार लोकशाहीच्या वतीने लढत आहे, हे मान्य असूनही मदत करण्यास तयार नाहीत. नव्हे मदत करु नये म्हणून प्रचार करण्याचा त्यांनी चंग बांधला आहे. ही वागणूक कशी विचित्र व कशी विसंगत आहे हे उघड आहे. रशियन क्रांतीचे उपासक म्हणवून घेत असताना स्वातंत्र्याचे व समतेच्या तत्त्वांचे रक्षण करण्याकरिता या उपासकांनी पुढे येऊ नये, याला काय उत्तर असावे; याचा पुष्कळांना अचंबा वाटल्याशिवाय रहाणार नाही. याला विसंगतपणाचे जे उत्तर देण्यात येते ते असे आहे.— खुद्द रशिया ज्याने समतेकरेता व स्वातंत्र्याकरिता जगामध्ये अघोर साधनांचा उपयोग करुन व अघोरी-पणाच्या दूषणांस न जुमानता क्रांती केली तोच रशिया आजच्या युद्धात लोकशाहीच्या वतीने लढण्यास जर सिद्ध नाही तर आम्ही या लढ्यात कां भाग घ्यावा ? गुरु वागेल तसेच शिष्यांनी वागावे या शिष्टाचाराप्रमाणेच वागणे, हेच जर ध्येय असेल, तर ही विचारसरणी तर्कशुद्ध आहे हे मान्य करावे लागेल. या युद्धात **रशियाची वर्तणूक दुर्बोध आहे हे सर्वांनाच दिसण्यासारखे आहे**. हे लढाईच्या सुरुवा-तीसच ज्या साम्राज्यशाही जर्मनीविरुद्ध रशियाने आज वीस वर्षे पावेतो धर्मयुद्ध चालविले होते त्याच साम्राज्यशाहीबरोबर तहनामा करून त्याने पोलंडवरती अतिक्रमण करून त्याचा विच्छेद केला व त्याचे स्वातंत्र्य हरण करून त्या देशाचा अर्धा भाग आपल्यात सामील केला. पोलंडचे स्वातंत्र्यहरण केल्यानंतर रशियाने फिनलंडवर स्वारी केली व ५।६ महिन्याच्या लढाईनंतर फिनलंडचेही स्वातंत्र्य नष्ट केले. फिनलंडचे स्वातंत्र्य नष्ट केल्यानंतर रशियाने एस्थोनिया, लॅटव्हिया अशा बाल्टिक समुद्राच्या किनाऱ्यावरती वास्तव्य करुन रहात असलेल्या स्वतंत्र राष्ट्रावरती घाला घालून त्यांचेही स्वातंत्र्य हरण केले. त्यानंतर काळ्यासमुद्रावरती आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या हेतूने रशियाने त्या भागाकडे आपली दृष्टी फिरविली व रुमानियाचा डब्र्यूज या नांवाचा जो प्रांत होता, तो नुसत्या दमदाटीने गिळंकृत करून टाकिला. **रशियाचा या मुलुखगिरीमुळे हिटलरला मोठाच फायदा** झाला हे उघड आहे. जर्मनीची पूर्व बाजूची सरहद्द निर्वेर झाल्यामुळे जर्मनीला आपले सर्व सैन्य व आपली सर्व युद्धाची

सामुग्री एकवट करून जर्मनीच्या पश्चिम सरहद्दीवरील राष्ट्रांवर मारा करण्याचे काम साधे व सुलभ होऊन गेले. फ्रान्स, बेलजियम, नॉर्वे, हॉलंड या देशांना जर्मनी या युद्धांत पायाखाली तुडवू शकला याची जबाबदारी पर्यायाने रशियावरतीच पडते, असे निदान आम्हांस तरी वाटते. रशियाने जर्मनीच्या पूर्व दिशेवरती ही पुंडाई चालविली नसती आणि जर्मनीच्या हुकुमशाहीस आळा घालण्यास जर्मनीच्या पूर्व बाजूवर जर रशियाने हल्ला केला असता तर फ्रान्स, बेल्जियम, नॉर्वे, हॉलंड वगैरे जर्मनीच्या पश्चिम सरहद्दीवरल्या राष्ट्रांचे स्वातंत्र्य नष्ट झाले नसतेच. जर्मनी या बनावाने हतबल होऊन उभय सरहद्दीवरतीं एकाच वेळी लढण्यास मात्र असमर्थ होऊन तह करण्यास उत्सुक झाला असता. झाली ही गोष्ट विपरित झाली आणि ती विपरित होण्याचे कारण म्हणजे रशियाचे असमर्थनीय धोरण होय; असे म्हटल्यावाचून गत्यंतर नाही. जर्मनीने फ्रान्स, बेल्जियम, नॉर्वे वगैरे पश्चिम सरहद्दीवरील राष्ट्रांचे स्वातंत्र्य नष्ट केले इतकेच नव्हे तर, सर्व बाल्कन राष्ट्रांवरती आपले वर्चस्व नव्हे स्वामित्व बसविण्याचा उपक्रम चालविला आहे. झेकोस्लोव्हाकियाचा तर अंत झालाच आहे. रुमानिया जर्मनीने हस्तगत केला आहे. जर्मनीचा साथी इटली याने ग्रीसवरती स्वारी केली आहे. हा सर्व भाग जर्मनी व इटाली या दोन राष्ट्रांच्या स्वाधीन झाला तर रशियाची धडगत नाही निदान त्याची मोठी कुचंबणा तरी होईल, ही गोष्ट रशियन क्रांतीचे उपासकही कबूल करतील. कारण रुमानिया व ग्रीस ही जर जर्मनीच्या ताब्यांत गेली तर ज्या डार्डानेसच्या समुद्रधुनीवरती आज अनेक वर्षे रशियाचा डोळा आहे ती समुद्रधुनी जर्मनीच्या अतिक्रमणामुळे टर्कीच्या हातून जाऊन जर्मनीच्या हाती लागली तर त्यामुळे रशियाचा भलताच कोंडमारा होईल. रशियाने केलेली मुलुखगिरी एकेवेळी क्षम्य म्हणता येईल. जे जे प्रांत या लढ्यांत रशियाने घेतले ते प्रांत एकेकाळी रशियाचेच होते. रशियाचे क्षेत्र रशियाचे संख्याबल व आरमारी बळ कमी व्हावे या हेतूने गेल्या लढाईमध्ये रशियाची त्या काळची अनवस्था झालेल्या स्थितीचा फायदा घेऊन हे प्रांत इंग्लंड व फ्रान्स यांनी तहाच्या वेळी रशियापासून तोडून काढले व व त्यांची स्वतंत्र राष्ट्रे बनविली. ती रशियाने या युद्धात परत घेतली व आपली आतांची सरहद्द पूर्वीच्या सरहद्दीला नेऊन भिडविली. हे चालू जमान्याच्या राजनितीला मोठेसे विसंगत आहे, असे म्हणता येणार नाही; परंतु येवढी मुलुखगिरी संपल्यानंतर व मान्याचे प्रांत आपल्या सरहद्दीत सामील करून ती सरहद्द बळकट करण्याचे कार्य संपल्यानंतर रुमानिया व ग्रीस या रशियाला जिव्हाळ्याच्या असणाऱ्या प्रांतावर जमनीने मारा केल्यावर तरी रशिया आपल्या धोरणात बदल करील अशी आशा पुष्कळांना होती; परंतु मॉस्कोहून ६ नोव्हेंबर रोजी सोव्हियट सरकारच्या सुप्रीम कौन्सिलचे अध्यक्ष कालीनीन यांनी मॉस्को शहरातील सोविएतच्या सभासदांपुढे ता. २३ ऑक्टोबर रोजी केलेल्या भाषणाचा गोषवारा तारेने इकडे आला आहे. त्या भाषणावरून अशी आशा करण्यास काही आधार उरलेला नाही. त्या भाषणात त्यांनी असे स्पष्टपणे सांगितले की, "ह्या

लढाईत कोणतीच बाजू घेण्याचा रशियाचा इरादा नाही. रशिया या लढाईत तटस्थ रहाणार आहे."

एके काळी रशियन क्रांतीचे पुढारी असे म्हणत होते की, रशियामध्ये समता प्रस्थापित करून भागणार नाही. तर ज्याप्रमाणे मिशनरी लोक आपल्या धर्माचा प्रसार जगभर करीत असतात, त्याच प्रमाणे रशियाने आपले समतेचे तत्त्व जगभर प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याकरिता त्यांनी कोटयावधी रुपये खर्च करून सर्व जगभर आपले हस्तक नेमून, त्यांच्या करवी समतेची क्रांती करण्याचे कार्य मोठ्या नेमाने चालू केले होते. कालिनिन यांच्या भाषणावरून पहाता या धोरणात व चालू रशियाच्या धोरणात जमीन अस्मानाचे अंतर पडले आहे, हे उघड आहे. रशिया आज ध्येयाच्या दृष्टीने शून्यवत् झाला आहे. परंतु रशियाने ध्येय सोडले तरीपण त्याने आपला स्वार्थ का सोडावा हे समजणे कठीण आहे. ध्येयासाठी नको असेल तर रशियाने लढू नये. पण ज्या डार्डानेल्सच्या सामुद्रधुनीवरती रशियाचे पुढील भविष्य अवलंबून आहे त्याकरिता तरी रशियाने का लढू नये ? केवळ इंग्लीश लोकांचा द्वेष म्हणून जर त्यांच्या बाजूला होऊन रशियाला लढावयाचे नसेल तर ती गोष्ट निराळी आहे. या लढाईत **इंग्रज लोकांच्या मूर्खपणाची कमाल आहे** ही गोष्ट कोणालाही लपवून ठेवता येणे शक्य नाही. त्यांची वर्तणूक अशी विचित्र झाली आहे की, त्यांना या लढाईत युरोपमधील एक देखील राष्ट्र मित्र म्हणून उरले नाही. रशियाचा तर इंग्लंडने जन्मभर गेली वीस वर्षे द्रोह केला व त्याला केवळ समतेच्या क्रांतीने अस्पृश्य मानून त्याच्याशी कांही वर्षे व्यवहार देखील बंद केला होता. परंतु एवढयामुळेच जर इंग्लंडला मदत करावयाची नाही असेच जर रशियाचे म्हणणे असेल तर मग रशिया कोणत्या तोंडाने हिटलरशी दोस्ती करू शकतो हे आम्हांस उमगू शकत नाही. हिटलरने रशियाचा द्वेश कांही कमी प्रमाणांत केला नाही. नाझी पार्टीची सारी उभारणी रशियाच्या द्वेषावरतीच केलेली होती. रशियाचा नाश करणे हेच एक आपले ध्येय आहे, असा पाठ रात्रंदिवस हिटलर घोषित होता. हिटलर सारख्या शत्रूशी जर रशिया कार्यानिमित्त सख्य करू शकतो तर तशाच प्रकारचे सख्य रशिया इंग्लंडशी कां करू शकत नाही, हे आम्हास कळत नाही. हिटलरचा वृक्ष वाढला, तर त्याचे सावट रशियावर पडून रशियाची वाढ खुंटल्याशिवाय रहाणार नाही, असा इशारा दिल्याखेरीज आमच्याने रहावत नाही. या लढाईतील रशियाचे वर्तन कसे सदोष आहे, हे आम्ही वर सांगितले आहे. ते रशियन क्रांतीच्या काही उपासकांना मान्य होईल. काहीना मान्य होणार नाही. परंतु रशियन क्रांतीच्या सर्व उपासकांना आम्ही असा प्रश्न विचारू इच्छितों कीं तुम्ही रशियन क्रांतीची उपासना करीत बसणार की समतेच्या स्वातंत्र्याच्या ध्येयाचे रक्षण करणार ? क्रांती मोठी की ध्येय मोठे याचा निर्णय सर्वांनी करून वागले पाहिजे. आणि क्रांतीपेक्षा ध्येय मोठे ही गोष्ट निर्विवाद असेल तर रशिया काय करतो, काय न करतो याकडे

लक्ष पुरवीत ध्येयाच्या संरक्षणार्थ सर्वांनी चालू लढाईत मनोभावाने भाग घ्यावा हेच सर्वांचे परम् कर्तव्य ठरेल व तीच रशियन क्रांतीची खरी उपासना ठरेल.

"रशिया सांगेल तोच धर्म, रशिया करील ते कार्य, अशी अंध भक्ती किती दिवस चालणार? रशियापासून नेहमीच धडे घेत बसण्यापेक्षां चुकेल त्या वेळी रशियाला धडा देणे योग्य होणार नाही काय?"

स्फुट खालीलप्रमाणे

## "कामगारशाहीचा विजय असो"

ता. ७ नोव्हेंबर हा रशियन राज्यक्रांतीचा वाढदिवस आहे. या दिवशी जगांतील शेतकरी व कामकरी यांनी एकत्र येऊन कामगारशाहीचीं घोषणा करण्याचा प्रघात आहे. मुंबईचे कामगार तरी हा दिवस कधीही विसरणे शक्य नाही. कांही वर्षांपूर्वी मुंबईत होऊन गेलेल्या एक दिवसाच्या संपात याच दिवशी कॉंग्रेस शाहीने दोन कामगारांचे बळी घेऊन आपल्या बेगडी अहिंसेचे स्वरुप जगजाहीर केले होते. जगातील कोणत्याही देशांत शेतकरी व कामकरी लोकांचीच बहुसंख्या असल्याने खरी लोकशाही जगांत नांदावयाची असल्यास कामगारशाहीचाच उदय व्हावयास हवा यांत शंका नाही. जगांतील मानवी समाजांत क्रांती यशस्वी व्हावयाची तर खऱ्या लोकशाहीचा म्हणजे अर्थातच कामगारशाहीचा जगात प्रचार व्हावयास हवा आहे. या दृष्टीने पहाता जगात आजवर झालेल्या क्रांत्या फोलच ठरणार आहेत. इंग्लंडात क्रांती होऊन इंग्लंडची राज्यसूत्रे फक्त धनिक वर्गाच्या हातात गेली व खरी लोकशाही अस्तित्वात येणे ही गोष्ट दुरापास्तच होऊन बसली. फ्रेंच राज्यक्रांतीने 'समता' स्वतंत्रता व बंधुता' या लोकशाही तत्वांची घोषणा केली. पण भांडवलदाराच्या हातात राज्यसत्ता जाऊन ती घोषणाही फोलच ठरली. रशियन क्रांतीने एक पाऊल पुढे टाकले आहे, असे म्हणावयास हरकत नाही. पण रशियातील क्रांतीने भांडवलशाहीचा बंदोबस्त केला असला तरी रशियामध्ये एकंदर कामगार वर्गाच्या हातात राज्यसत्ता आलेली नाही, हे त्या क्रांतीचे एक मोठे वैगुण्य आहे. रशियामध्ये सर्व राज्यसत्ता एका सोटेशाही पक्षाच्या हाती आहे; तोंवर त्या देशांतही खरी कामगारशाही निर्माण झाली आहे असे कदापि म्हणता येणार नाही. जगांत खरी कामगारशाही व्हावयाची असल्यास तिचा पाया लोकशाहीच्या तत्वावरच रचला गेला पाहिजे. हुकुमशाहीच्या सोटेशाहीने निर्माण झालेली क्रांती ही कधीही चिरस्थाही होणे शक्य नाही.

वरील विचारसरणी खरी असल्यास आपणास जी कामगारशाही हवी आहे ती लोकसत्ताक समाजसत्तेच्या तत्वावर आधारलेली असावयास पाहिजे. आपणास हव्या असणाऱ्या लोकशाही कामगारशाहीने मूठभर भांडवलदारापासून व सोटेशाहीपासून अलिप्त रहावयास हवे. असे झाल्याविना एखाद्या नामधारी कामगारशाहीने कामगारवर्गाचे खरे कल्याण होणे, मृगजळाने तहान भागविण्याइतकेच अशक्य आहे. म्हणून

जगात खऱ्या नव्या कामगारशाहीचा संभव होणे असल्यास जगातील लोकशाही राष्ट्रांनी आपले भांडवलशाही धोरण सोडावयास हवे व रशियानेही आपले सोटेशाही धोरण टाकून द्यावयास हवे. असे झाले तर समाजसत्तवादी रशिया व लोकशाही राष्ट्रे यांच्या संगनमताने जगात नव्या युगाला सुरुवात होईल असे वाटते.

जागतिक कल्याणासाठी वर दर्शविल्याप्रमाणे रशिया व जगातील इतर लोकशाही राष्ट्रे यांचे सहकार्य घडून यावयास हवे आहे. पण आजतरी असा सुयोग येण्याचा संभव दिसत नाही. चालू लोकशाहीविरुद्ध हिटलरशाही यामध्ये जे महायुद्ध चालू आहे त्यात रशियाच्या स्टॅलिनशाहीचे जर्मनीच्या हिटलरशाहीशी चांगलेच मेतकूट जमले आहे. या परिस्थितीत लोकशाही राष्ट्रांना एकाकीच हिटलरशाहीला तोंड देणे प्राप्त झालेले आहे. भावी कामगारशाहीच्या दृष्टीने पहाता आजचा प्रसंग आणी-बाणीचा आहे. हिटलरशाही विजयी होऊन भावी जगात बळी तो कानपिळी हा न्याय सर्रास जारी होणार का लोकशाही यशस्वी होऊन जगात नव्या जगाची, नव्या जोमाने 'स्वतंत्रता, समता व बंधुता' या त्रिकालबाधीत तत्त्वावर पुनर्घटना होणार, हा प्रश्न चालू युद्धाने सुटावयाचा आहे. अशा या प्रसंगी सर्व लोकशाही व कामगारशाहीवादी मुत्सद्यांनी चालू युद्धात लोकशाही राष्ट्रानांच शारिरिक, मानसिक व आर्थिक अशी शक्य तितकी मदत करून 'बळी तो कान पिळी' या हिटलरशाही पिशाच्याला खोल गाडून टाकणे हेच त्यांचे खरे कर्तव्य होणार नाही काय ?'

महायुद्धाला सहाय्य करुन लोकशाही वाचवा, असा ज्या ज्या राजकीय पक्ष पुढाऱ्यांनी प्रचार केला त्यांना साम्राज्यशाहीचे हस्तक आणि देशद्रोही अशा शिव्या विरोधी पक्षांनी (काँग्रेस, कम्युनिस्ट, इत्यादि) दिल्या. त्यातल्या त्यांत अशा शिव्यांचा जास्त भडिमार बाबासाहेबांच्यावर झाला. हिटलरने रशियावर २२–६–१९४१ ला हल्ला सुरू केला. जर्मनी व इंग्लंडचे युद्ध हे साम्राज्यवाद्यांचे युद्ध होय, म्हणून त्याला कम्युनिस्टांनी सहाय्य करु नये, याबद्दल संदेश देणारे चोपडे (Soviet-German War) पॉलिट ब्युरोने १९४१ च्या जुलैत प्रसिद्ध केले. (The Communist Party of India, P. 80, by M. R. Masani, 1954) १९४१ च्या डिसेंबरमध्ये जपान व अमेरिका यांनी अनुक्रमे जर्मनी व इंग्लंड, यांची बाजू धरुन युद्धांत प्रवेश केला व युद्धाला जागतिक स्वरुप प्राप्त झाले. मग पॉलिट ब्युरोने हुकूम प्रसिद्ध केला की, हे जनतायुद्ध यशस्वी करण्यास जगातील जनतेने इंग्लंड, अमेरिका व रशिया यांना सहाय्य करावे मग हिंदी कम्युनिस्ट पक्षाने युद्धाला सहाय्य, करण्यासाठी प्रचार सुरू केला व The People's War (जनता युद्ध) व इतर वर्तमानपत्रे सुरु केली. जपानने १९४२ च्या फेब्रुवारींत सिंगापूर आणि ९ मार्चला रंगून काबीज केल्यानंतर युद्धाच्या सीमा भारताजवळ येऊन भिडल्या. याच सुमारास सुभाषचंद्र बोस यांनी जर्मनी व जपान यांच्या सहाय्याने आग्नेय आशियामध्ये आझाद हिंदसेनेची उभारणी करुन हिंदूस्थानावर स्वारी करून इंग्रजांना हाकलून देण्याची तयारी चालविली होती.

नेताजी सुभाष बोस यांनी "चलो दिल्ली" व 'जय हिंद' या दोन रोमहर्षक ब्रीद, घोषणा आझाद सेनेला दिल्या. नेताजीने भारतावर चाल केली तर आपण काय करावे असा काँग्रेस व कम्युनिस्ट इत्यादी पक्षांना पेंच पडला. या बाबतीत काँग्रेसने नक्की धोरण ८-८-४२ ला ठरविले की, ब्रिटिशांनी हिंदुस्तान सोडून जावे, मग आम्ही देशाचे संरक्षण करू. कम्युनिस्ट पक्षाने युद्धाला सहाय्य करण्याचे ठरविले होतेच. युद्धाच्या यशस्वितेबद्दल जे पक्ष व लोक (काँग्रेस, सोशालिस्ट, फॉरवर्ड ब्लॉक वगैरे) विरोध करतात, त्यांचे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी गुप्त व उघड कार्य करण्याचे अभिवचन-कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस श्री. पूरणचंद्र (पी. सी.) जोशी यांनी भारत सरकारचे गृहमंत्री श्री. रेजिनाल्ड मॅक्स्वेल यांना दिले. या बाबतींत त्यांचा जो गुप्त पत्रव्यवहार झाला होता, त्याचा स्फोट श्री. एस. एस. बाटलीवाला यांनी केला. (किस्ता, ८०-८४)

इमारत फंड गोळा करण्यासाठी जी सभा भरली तींत समाजात फूट पाडणाऱ्या कार्यकर्त्यांवर बाबासाहेबांनी चांगलेच कोरडे ओढले. त्याचा वृत्तांत असा :—

"इमारत फंडाची जगी जाहीर सभा चंदनवाडी, मुंबई येथे अस्पृश्यांचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार ता. ७-१२-१९४० रोजी रात्रौ ८॥ वाजता भरली होती. सभास्थानी तीन चार हजारावर जनसमुदाय जमला जमला होता. या उपस्थित झालेल्या जनसमुदायाने डॉ. बाबासाहेबांचे स्वागत टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात आणि 'आंबेडकर कौन है? दलितोंका राजा है, आंबेडकर झिंदाबाद! थोडे दिनसे भीमराज" वगैरे सुभाषितांनी केले. सदर प्रसंगी श्री. मोहीते मास्तर, बि. का. उपशाम मास्तर, वडवलकर, भिडे पाटील, लोखंडे, गायकवाड, आमदार भाई चित्रे आणि वराळे साहेब वगैरे मंडळी हजर होती...

... डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे... आपल्या भाषणांत म्हणाले की –

आज आपण या ठिकाणी सभा करून मला आमंत्रण दिले याबद्दल मी आपले आभार मानतो. वास्तविक मी कोणाचेही आभार मानले नाहीत. तुमचेच आभार कां मानतो? कारण तुम्ही आज दहाबारा वर्षे पावेतो सार्वजनिक कार्यात भाग घेतला नाही, व मला शंका होती की, येथील लोक झोपी गेले की काय? वगैरे गोष्टीचा थांगपतत्ताही नव्हता. आता आपण ही सभा घेऊन समाजकार्याविषयी आपली जिज्ञासा दाखवीत आहात. आणि म्हणून मी आपले आभार मानणे योग्य आहे. महाडच्या सत्याग्रहापासून काही मंडळींनी कोंकणी लोकांचा बूट काढला. ज्या लोकांनी तो काढला त्यांची नावे येथे सांगण्याची जरुरी नाही. माझ्याप्रमाणे तुम्हालाही त्यांची नावे माहित असतील. अशा लोकांपैकी एखाद्या माणसाने सार्वजनिक चळवळीत भाग घेतला आहे अशी मनोदेवता मला साक्ष देत नाही. अशा लोकांपैकी काही मंडळीनी उघडपणे कोकणस्थ व देशस्थ भेद माजविला आहे. या भेदभाने समाजाचे कल्याण होणे तर दूरच राहिले,

पण नुकसान मात्र तावडतोब झाल्याशिवाय राहणार नाही. हा भेदभाव उत्पन्न करणाऱ्या लोकांनी या दहाबारा वर्षांत काही समाजहिताची कार्ये केली असती तर मला आनंद झाला असता. त्यांनी काही बोर्डिंगे काढली असती, काही गरीब मुलांना स्कॉलरशिपा देवविल्या असत्या तरीही मला आनंद झाला असता. पण तसे काहीएक एसून उलट समाजात भेदनिती करण्यात येत आहे. कटु शब्द सांगणे मला प्राप्त होत आहे. येथे जमलेल्या मंडळींना मला एक शुभसंदेश सांगावासा वाटतो आणि तो हा की, तुम्ही देशस्थ, कोकणस्थ, कर्नाटकी, वायदेशी असा भेदभाव कराल तर तुम्ही अधोगतीला गेल्या वाचून रहाणार नाही इतके दिवस आपली अधोगती झाली. ती आता होऊ देता कामा नये समाजात भेदभाव करणाऱ्यांना आपण बिलकूल थारा देऊ नका. त्यांच्याकरता मला कडक उपाय योजावे लागतील. तुम्ही हे ओळखूनच की काय, आपसातील भेदभाव विसरून ही अपूर्व सभा घडवून आणली. म्हणून मी आपले आभार मानणे योग्य आहे...

...इमारतीच्या बाबतीत माझ्या अगोदरच्या दोन वक्त्यानी आपणास सांगितले आहे. यापूर्वीहि मी इमारतीच्या बाबतीत दोन तीन ठिकाणी भाषणे केली आहेत. आपण 'जनता'वाचक असाल तर आपणालाही ते समजले असेल. माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी जे सांगितले त्यावरून त्यांना माझे मनोगत समजले असे वाटते. इमारतीची कल्पना येणे हे आवश्यक आहे ही इमारत देशावर जशी चावडी असते, तशी करावयाची नाही. देशावरच्या चावडीत कामधंदा न करणारे रिकामटेकडे महार लोक लोळत असतात तशा प्रकारची इमारत करण्याचा माझा इरादा नाही, मुंबईत दगड-चाळीमध्ये एक शंकराचे देऊळ आहे, तेथे बरेचसे साधुलोक गांजा, चरस वगैरे ओढून मठात गप्पागोष्टी सांगत बसत. या ठिकाणी हिंदुमुसलमान रहात असत. ते एकमेकांच्या विश्वासातले होते. एके दिवशी देवळातील शंकराची पिंडी कोणीतरी फोडली तेव्हा ही पिंडी मुसलमानांनी फोडली असावी असे वाटणे साहाजिक होते. पण चौकशीअंती असे समजले की, ती देवळातील साधूंनी फोडली. मुसलमानांनी फोडली नाही. बंधूनो! मला जी इमारत करावयाची आहे ती बेकार महाराजांना दिवसा रात्री झोपण्यासाठी नव्हे. इमारतीविषयीचा हेतु निराळा आहे. तो जाणणे म्हणजे दुसऱ्या एका विषयाकडे वळण घेणे भाग आहे. आपण अस्पृश्य दारिद्र्याच्या गर्तेत सापडलो आहोत. आपल्या-जवळ पैसा नाही. कोपर मोडल्याखेरीज भाकर मिळत नाही. पण आपणाजवळ संघटनेचे सामर्थ्य फार दांडगे आहे. त्याच्यावरच आपल्याला प्रतिपक्षांशी दोन हात खेळावे लागणार आहेत. आपल्याला जे काही राजकीय हक्क मिळालेले आहेत ते आपल्यापासून हिरावून घेण्यासाठी कॉंग्रेसही तयार आहे. कॉंग्रेसने मोठमोठ्या लोकांना हतबल करून टाकले आहे. एके काळी ब्राह्मणेतर पक्ष अगदी बलाढ्य असा होता. त्याचा सत्यशोधक समाज मोठ्या जोराने काम करीत होता. गणपतीच्या उत्सवाचे वेळेस

ब्राह्मणांचा गणपती निराळा तर मराठ्यांचा गणपती निराळा. त्यावेळेस ह्या मराठे लोकांनी ब्राह्मणांना चिडविण्यासाठी एक पालुपद तयार केले होते. ते ब्राह्मणांना "हर्रर्र ब्रँ" असे म्हणत असत. परंतु जे ब्राह्मणेतर ब्राह्मणांना शिव्या देत असत त्यांची आता काय घडगत आहे? रा. ब बोले यांनी आपले आयुष्य ब्राह्मणांना शिव्या देण्यांत घालविले. परंतु तेच बोले आता बॅ. सावरकरांच्या हाताखालचे मांजर झाले आहेत. तीच गोष्ट पुण्याच्या जेधेची. ते आता पुण्यांतील एका ब्राह्मणाच्या हातांतील बाहुले झालेले आहेत. हा ब्राह्मणेतर पक्ष एवढा बलाढ्य होता पण तोच काँग्रेसच्या पुढे लोटांगण घालीत कां गेला? त्याचे कारण एकच आणि ते म्हणजे हे की, त्याच्यामध्ये विस्कळीतपणा. आमची गत तशी नाही. आम्हांला जे कांही मिळालेले आहे, त्याचा फायदा आम्ही आमच्या जातीकरिता करीत आहोत. आणि तेही कोणाचे गुलाम. न होता हल्लीचे राजकारण फुकटचे नसते. गांधींनी काँग्रेसचे राजकारण लढविण्यासाठी एक कोट रुपये खर्च केले. मागच्या इलेक्शनमध्ये मला हाणून पाडण्यासाठी काँग्रेसने अगदी पराकाष्टा केली. इतर लोक जरी निवडून आले तरी ते काँग्रेसला चालले असते. पण मला निवडून यावयाचे नाही, अशी काँग्रेसची महत्त्वाकांक्षा होती. आणि म्हणून वल्लभभाई पटेल यांनी त्याकरिता ३५,०००/– रुपये खर्च केले. परंतु आपल्या समाजाच्या एकीमुळे मी दुसऱ्या नंबराने निवडून आलो. पारशांच्या बायांनी डॉ. गिल्डर यांनाच सॉलिड मते दिली नसती तर मी पहिल्या नंबराने पण निवडून आलो असतो. म्हणून या वेळोवेळी होणाऱ्या निवडणूकी लढविण्यासाठी पैसा नसल्यामुळे आपली कुचंबणा होण्याचा संभव आहे. तसे होऊ नये म्हणून या होणाऱ्या इमारती पासून आपल्याला प्रत्येक वर्षाला ५–६ हजार रुपये भाडे येऊ शकेल. त्यामुळे आपण आपल्या निवडणूकी स्वतंत्रपणे लढवूं शकूं. त्याचप्रमाणे आपल्या समाजातील लोकांना स्पृश्य समाजापासून गांवोगावी त्रास होत असतो. मला अशा गोष्टी बऱ्याच सांगण्यात येत असतात. परंतु मी काय करणार? त्यांच्याकरिता पैशांची आवश्यकता असते. वकील लोक पैशाशिवाय कसे काम करू शकतील? म्हणून मला लोकाना मोठ्या पराकाष्टेने सांगावे लागते की, 'बाबानो! तुमच्यासाठी मी जास्त कांही करू शकत नाही!' ही गोष्ट खरोखरीच नामुष्कीची आहे. म्हणून या इमारतीच्या उत्पन्नातून आपल्याला आपल्या लोकांची थोडीफार तरी दुःखे निवारण करता येतील. या इमारत फंडासाठी पैसा देण्यासाठीं आपणाजवळ श्रीमंत माणसे नाहीत म्हणून थेंब थेंब रांजणामध्ये टाकीत राहिल्याने ज्याप्रमाणे रांजण भरतो त्याचप्रमाणे आपण सर्वांनी थोडे थोडे पैसे देऊन हा इमारत फंड पुरा केला पाहिजे. हा प्रश्न माझ्या अगर दुसऱ्या कोणाच्याही स्वार्थाचा नाही. ही इमारत म्हणजे सर्व लोकांची पुंजी आहे अशी आस्था मनात बाळगून आपण सर्वांनी मदत केली पाहिजे. ज्या लोकांना २५ रुपयापर्यंत पगार आहे त्यांच्यासाठी मी दोन रुपये वर्गणी ठेवलेली आहे. परंतु ज्या लोकांना जास्त पगार आहे त्यांनी मात्र शिंगे मोडून वासरांत

शिरण्याचा प्रयत्न करुं नये. त्या सर्वांनी एक महिन्याचा पगार या कार्यासाठी हत्त्या-हत्त्याने दिला पाहिजे. तुम्ही जन्मभर पैसे कमवून आपल्या नातलगांना पोसाल; सावकारांचे पैसे भराल; दागिनेहि कराल. तरी पण हे सामाजिक ऋण आपण द्यावयास पाहिजे. या कामामध्ये तुम्ही हलगर्जीपणा करता कामा नये. मी आपणांस सरळपणे विनंती करतो तिचा जर काही उपयोग झाला नाही तर कडक उपायांचा देखील प्रयोग करण्यास मी मागेपुढे पहाणार नाही. हा उपाय कोणता तर जातिबहिष्कार. वाईट काम करणाऱ्या माणसास ज्याप्रमाणे आपण वाळीत टाकतो त्याप्रमाणे या कार्याला मदत न करणाऱ्यांस वाळीत टाकले तर वावगे होईल असे मला वाटत नाही इतके सांगून आपण या कार्याला मदत करा असे परत एकदा सांगून माझे भाषण संपवितो." (जनता, १४-१२ ४० पा. १ व ५)

"Thoughts' on Pakistan" हा बाबासाहेबांचा ३८० पानांचा सर्वोत्कृष्ट ग्रंथ ठॅकर स्पिंक ॲंड कं. लि; मुंबई १ या संस्थेने १९४० च्या डिसेंबर मध्ये प्रसिद्ध केला. तो भारत भूषण प्रेस ५७, व्हिन्सेंट रोड, दादर या छापखान्यांत छापलेला होता. किंमत दहा रुपये ठेवली होती. छपाईत बऱ्याच चुका होत्या. पाकिस्तान निर्मितीबद्दल मुस्लीम लीगने लाहोर येथे २६-३-४० च्या अधिवेशनात जो ठराव मंजूर केला होता तो राजकीय दृष्टीने फार महत्वाचा होता. तो ठराव असा :-

Text of Resolution No. I, on future Constitution of India passed at the 27th annual session of the All India Muslim League held at Lahore on 22nd, 23rd and 24th of March, 1940.

"(1) While approving and endorsing the action taken by the council and the working committee of the All India Muslim League, as indicated in their resolution dated 27th August, 17th and 18th September, 22nd October, 1939 and 3rd February, 1940 on the constitutional issue, this session of All India Muslim League emphatically reiterates that the scheme of Federation embodied in the Government of India Act, 1935, is totally unsuited to and unworkable in the peculiar conditions of this country and is altogether unacceptable to Muslim India.

(2) It further records it's emphatic view that while the declaration dated 18th of October 1939 made by Viceroy on behalf of His Majesty's Government in reassuring in so far as it declares that the policy and plan on which the Government of India Act, 1935 is based will be reconsidered

in consultation with the various parties interests and communities in India, Muslim India will not be satisfied unless the whole constitutional plan is reconsidered *de novo* and that no revised plan would be acceptable to the Muslim unless it is framed with their approval and consent.

(3) Resolved that it is the considered view of this session of the All India Muslim League that no constitutional plan would be workable in this country or acceptable to Muslims unless it is designed on the following basic principle, viz., that geographically contiguous units are demarcated into regions which should be so considered, with such territorial readjustments as may be necessary that the areas in which the Muslims are numerically in a majority as in the North-Eastern and Western zones of India should be grouped to constitute "Independent States" in which the constituent units shall be autonomous and sovereign.

The adequate, effective and mandatory safeguards should be specifically provided in the constitution for minorities in these units and in these regions for the protection of their religious, cultural, economic, political, administrative and other rights and interests in consultation with them; and in other parts of India where the Mussalmans are in a minority adequate effective and mandatory safeguards shall be specially provided in the constitution for them and other minorities for the protection of their religious, cultural, economic, political, administrative and other rights and interests in consultation with them.

This session further authorises the Working Committee to frame a scheme of constitution in accordance with these basic principles, providing for the assumption finally by the respective regions of all powers such as defence, external affairs communications, customs and such other matters as may be necessary."

(India's problems of Her Future Constitution, pages 16-17, — A Collection of Essays by various authors,

preface dated 7th October 1940, by M. A. Jinnah, and published by M. H. Saiyid, Mount Pleasant Road, Malabar Hill, Bombay.)

लीगच्या या ठरावा संबंधाने स्वतंत्र मजूर पक्षाने कोणते धोरण स्वीकारावे, याचा विचारविनियम करण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाने एक समिती नेमली तिचे अध्यक्ष बाबासाहेब होते. या समितीने जो अहवाल तयार केला तो पुस्तकरुपाने प्रसिद्ध करण्याचे ठरविले. ते पुस्तक म्हणजेच हा ग्रंथ होय अशा आशयाची माहिती बाबासाहेबांनी सदर ग्रंथाच्या प्रस्तावनेत दिली.

पाकिस्तान निर्मितीची मागणी राजकीय स्वरुपाची असली तरी तिच्या मागील भूमिका हिंदु मुसल्मानाच्या ऐतिहासिक प्राणांतिक झगड्याची आहे, आणि हिंदी राजकीय पुढाऱ्यांनी या भूमिकेचा सांगोपांग विचार करणे अटळ आहे, असे बाबासाहेबांनी इषारेवजा सूचना या ग्रंथात केली. पाकिस्तानची मागणी व तिचा पूर्वीपासूनचा इतिहास, त्यात येणारे व न येणारे प्रदेश, त्या प्रदेशांतील सांस्कृतिक व आर्थिक परंपरा, पाकिस्तान निर्माण केले तर हिंदु मुसल्मानांना कोणते बरेवाईट परिणाम भोगावे लागतील, न निर्माण केले तर त्या दोन जमातींना कोणते बरेवाईट परिणाम भोगावे लागतील या सर्व प्रश्नासंबंधी भरपूर ऐतिहासिक आर्थिक आणि लष्करविषयक माहिती देऊन बाबासाहेबांनी हा ग्रंथराज एका वर्षाच्या आत लिहिला. पक्षाच्या समितीचे नांव नाममात्र होते, हे उघड आहे. पाकिस्तान निर्माण करणे हेच परिणामी उभय पक्षाला ( हिंदू-मुसल्मान ) इष्ट आहे. असा बाबासाहेबांनी शेवटी निर्णय काढला.

हा ग्रंथ बाबासाहेबांनी **रमाबाईंना** अर्पण केलेला होता. आणि पत्रिका अत्यंत हृद्य शब्दांत लिहिलेली होती.

("Inscribed to the memory of Ramu, as a token of my appreciation of her goodness of heart, her nobility of mind and her purity of character and also for the cool fortitude and readiness to suffer along with me which she showed in those friendless days of want and warries which fell to our lot.") या पूर्वी त्यांचे जे पांच ग्रंथ प्रसिद्ध झाले होते. त्या सर्वात हा ग्रंथ फार महत्वाचा आणि रमाबाईच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालेला. म्हणून तो त्यांनी आपल्या प्रियतम रामूला अंतःकरणाच्या शिळेवर कोरून काढलेल्या भावनेने अर्पण केला.

या ग्रंथाचे समालोचन टाईम्सने २४–२–४१ च्या अग्रलेखाच्या बाजूच्या स्तंभात केले. ते वाचल्याबरोबर त्याच दिवशी सेक्रेटरीएट मधील सर्व काळे गोरे आय. सी. एस. ऑफिसर्स राजकीय पुढारी आणि मुस्लीम लीगचे कार्यकर्ते यांनी

ग्रंथाच्या प्रति विकत घेतल्या हैदराबाद कडील भागांत एक हजार प्रति विकत घेण्यांत आल्या.

टाईम्सचा या ग्रंथावरील अभिप्राय सर्व मुद्यांचा साकल्याने विचार करणारा होता. हा ग्रंथ भारतातील गेल्या वीस वर्षांच्या सामाजिक व राजकीय जीवनाचे सत्य ऐतिहासिक नागडे उघडे चित्र मनश्चक्षूपुढे उभे करतो, म्हणून भारताच्या भावी भवितव्याबद्दल ज्यांना काळजी वाटते अशा लोकांनी आणि विशेषत: ब्रिटिश मुत्सद्दी व राजकारणी यांनी या ग्रंथाचा काळजीपूर्वक अभ्यास करावा, म्हणजे त्यांना भारतातील सर्व प्रश्न सोडविण्याचे ज्ञान प्राप्त होईल, असा अभिप्रायाचा शेवट आहे. हा अभिप्राय मुळांतूनच मी येथे देतो :—

"DR. AMBEDKAR'S SURPRISING BOOK SUPPORT FOR THE PAKISTAN SCHEME"

From a Correspondent

Dr. Ambedkar's monogram — *Thoughts on Pakistan*, by Dr. B. R. Ambedkar, M.A., Ph.D, D.Sc., Bar-at-Law (Thacker Spink & Co., Bombay) — contributes a careful dispassionate and stimulating study of a study of a subject of absorbing interest and vital importance Pakistan raises in the mind of the Indian nationalist either derision or indignation; and if it is discussed at all, it is discussed with more heat than light, more prejudice than understanding. Dr. Ambedkar handled the question with knowledge and courage, the strength of his criticism lies in his ability to look straight at fundamental facts without distortion or evasion, and the illuminating background of political and historical facts against which he has projected the problem. The idea of cutting up India into two separate divisions has been scoffed at as unworthy of serious note, but Muslim opinion of late has hardened on the point; and it is no longer possible to brush it aside as a mere council of despair, if not the phantasy of disgruntled fanatics.

FAITH IN SEPARATION

It may come as a surprise to many in Dr. Ambedkar's opinion a scheme of separation anologous to, if not identical with, the Pakistan of the Muslim League brand within the

framework of the British Commonwealth is inevitable for the solution of the Indian problem. What is Pakistan? It is, in a word, the creation of separate ethnic or cultural states within suitable territorial boundaries, so as to avoid communal and cultural friction. It contemplates two Central Governments, one for Pakistan and another for Hindustan. On March 26, 1940, the Muslim League at Lahore session affirmed the basic principle that the areas in which Muslims predominate should be incorporated into an independent state, autonomous and sovereign. In concrete terms it means that the Punjab, the N.W.F. province, Baluchistan and Sindh in the North-West and Bengal in the East, should be incorporated as independent Muslim states. This suggestion arose out of the emphatic opinion of Muslims, that the scheme of Federation embodied in the Government of India Act of 1935, is unsuited to Indian conditions, and altogether unacceptable to Muslim India. Democratic Government based upon majority rule was always looked upon with distrust by the Muslims, who claim that their distrust has been justified by thirty months of actual experience of Congress rule in the provinces. They and other minorities assert that the safeguards provided in the constitution failed to protect the interests, or atleast appease their sentiments. The constitution has been suspended in most provinces, and it would be idle to ignore the fact that so far as the Muslims are concerned the cry now is "never again". What is the alternative ?

The answer of the Muslim League is Pakistan. This has naturally provoked the Hindu Mahasabha, into putting forward the slogan "Hindustan for the Hindus". The latter legitimately argue that minority cannot dictate the political destiny of a country. Curiously enough, both argue upon the basis that there are two nations, not one, as the Congress assumes.

The objections to the scheme of Pakistan are formidable and obvious. It destroys unity and ends up India into irreconcilable halves. It constitutes a death blow to India's

political aspirations and would permanently check national Growth. It would link up North Western India with the solid block of Islamic states from Turkey to Afghanistan; and since the primary loyalty of the Muslims everywhere is to his religion, it would — so it is contended — be a standing menace to the security and liberty of Hindu India.

Dr. Ambedkar meets the argument of Pakistan breaking up Indian unity by suggesting that his idea is a mere assumption, belied by the entire history of the country for eight centuries. There is, he says, no Indian nation — at any rate whatever promise there was of the development of a single nation has receded into background by reason of the extravagance of recent Congress activities, and bewildering political theories of Mr. Gandhi. Dr. Ambedkar examines the basic question of Indian unity and a single Indian nation skillfully and with a wealth of historical illustrations. Whether one agrees with his conclusions or not, the candour and competence with which he approaches the subject are admirable. He holds up as a warning the lesson of the fate of other communities, in particular Turkey and Czechoslovakia. Popularly the main cause of disruption of Turkey is taken to be the rapacity of the European Powers. But the dismemberment of the Turkish Empire was accelerated and finally accomplished by the insistent nationalism of its componant parts. The nationalism of the Greek, the Serb, the Bulgar, and ultimately even the Arab, assorted itself; and Turkey — for long years the "Sick Man of Europe" — really become strong and self sufficient only when it cast off these alien elements.

## MILITANT NATIONALISM

Similarly the destruction of Czechoslovakia is attributed to German aggression, but the real initial trouble was the intransigent nationalism of the slovaks. The malady of the world today, Dr Ambedkar insists is the militant nationalism of different people which, as Mr. Sydney Brooks put it, is the real enemy of Universal peace.

Dr. Ambedkar seems to concede that Pakistan, with a certain amount of modifications, offers only practical solutions to Indias political problems. The case for constituting North-West India as a Muslim State is, in his view, exceptionally strong. It has always been very loosely connected with India proper. The author aptly compares it to a Wafgon which can be detached and coupled at will either to India or Islamic territories beyond the frontier, somewhat after the manner of Alsace-horrain. It is also overlaid with a deep deposite of Islamic culture, it is politically detached and spiritually alien. With some modification of boundaries these regions and Eastern Bengal may be constituted into homogeneous Muslim states. Nor is Dr. Ambedkar dismayed by the question of exchange of populations. It has been done between Turkey and Greece in recent times, and in his view not so impracticable as is generally assumed.

Discussing the alternatives to Pakistan Dr. Ambedkar suggests that they are either the militant Hinduism of the Mahasabha, or the *status quo* in the sense of British Rule as it was before the constitution of 1935. Briefly, his conclusions may be reduced to the following points : It is clear that self Government connotes different things to the Hindu and to the Mussalman. They are separate nations with separate religions and cultures, and what is worse, an antagonistic history which resists effacement. Historical forgetfulness and even historical error constitute, according to Renan, an essential factor in the evolution of a nation. It is doubtful whether either the Hindu or the Mussalman is prepared to buy his past. It is not a question of race or country but of conflicting and irreconcilable creeds and cultures.

## PAKISTAN THE WAY OUT

And we come to Dr. Ambedkar's conclusion that the way out is Pakistan, the disintegration of India into a Hindu India and a Muslim India within the framework of the

British Commonwealth. What Dr. Ambedkar does not appear to have adequately considered is whether this scheme of separation and isolation would put an end to Muslim ambitions. Dr. Ambedkar cannot be accused of any pro-Muslim bias. He recommends Pakistan to the earnest attention of his countrymen, not because he is eager to concede the Muslim demands, lent because in his view it is a political necessity. Some of his conclusions came as an unpleasant surprise. He attempts by quoting chapter and verse to prove that it is really the Muslims who are out for complete independence; the Hindus, according to his, would be, or at any rate should be, content with Dominion Status. In his view, the attitude which the Hindus, under the lead of the Congress have adopted, is foolish and suicidal.

He ends upon this dismal note : that an integral India incompatable with an independent India or even with India as a Dominion; and he sees in the maintainance of Indian integrity the frustration of all her hopes of poltical freedom. Whether one agrees with his conclusions or not, there can be no doubt that his thesis, closely and lucidly reasoned and supported by historical and political knowledge of exception depth and amplitude, is a notable contribution to the political thought of the present day. No responsible leader of Indian opinion, and no British statesman who desires to study the Indian problem in its stark reality, can afford to neglect a study of this book. It is more than a mere thesis It is epitome of the political and social history of India during the last twenty years — the most fateful in the annals of the country, since the mutiny." (*The Times of India*, Monday, 24-2-41).

सदर ग्रंथावर बऱ्याच वर्तमानपत्रांनी व पुढाऱ्यांनी अनुकुल व प्रतिकुल अभिप्राय व्यक्त केले. "डॉ. आंबेडकर आणि पाकिस्तान" या शीर्षकाखाली डॉ. र. पु. परांजपे यांचे चार लेखांक २० एप्रिल, २७ एप्रिल, ४ मे व ११ मे १९४१ च्या विविधवृत्ताच्या अंकात प्रसिद्ध झाले होते. प्रत्येक लेखासोबत दोन्ही डॉक्टरांचे फोटो देण्यात आले होते. या लेखांचा सत्कार व परामर्ष म्हणून संपादकाने २० एप्रिल च्या अंकात

एक स्फुट लिहिले होते. काही विविक्षित व उपेक्षित परिस्थितीत आंबेडकरांचे दुःखी जीवन व्यतीत झालेले असल्यामुळे त्यांच्या मनात हिंदू लोक, हिंदू धर्म व हिंदूंची राजकीय चळवळ यांच्याबद्दल एक प्रकारची मनोविकृति उत्पन्न झालेली आहे. व त्यामुळेच त्यांच्या विद्वताप्रचूर बुद्धीमत्तेतून हा विकृतिमय ग्रंथ उत्पन्न झाला अशी भूमिका प्रथम मांडून डॉ. परांजपे यांनी सदर ग्रंथाला मिस मेयोच्या "मदर इंडिया" ग्रंथाच्या बाजूला नेऊन बसविले. (... हिंदुस्थानाच्या सार्वजनिक जीवनक्रमांत डॉ. आंबेडकर यांचे स्थान वरच्या श्रेणीतील आहे. अस्पृश्य समाजाचा एकमेव व निर्विवाद नेता या नात्याने काही कोटी हिंदी प्रजेचे प्रतिनिधीत्व त्यांना लाभले आहे आणि काँग्रेसवाले गांधीकडे अथवा मुस्लीम लीगपंथीय मुसलमान बॅ. जीना यांच्याकडे ज्या भावनेने पहातात, त्याच भावनेने डॉ. आंबेडकरांचे अनुयायी त्यांच्याकडे पहातात, जैनपंथीय वातावरण आणि विशिष्ट राजकीय विकास यांचा गांधीच्या दृष्टी-कोणावर व ध्येयप्रणालीवर जसा कळतनकळत परिणाम झाला किंवा असहकारितेच्या प्रारंभीच्या काळात, काँग्रेसवाल्यांच्या बिनमुत्सद्दीगिरीच्या धोरणामुळे जीन्हांची जशी उपेक्षा झाली, आणि हिंदी राजकारणात स्वतंत्र मतदारसंघाच्या योजनेखाली एखाद्या मुसलमानाला आपले स्थान हिंदी राजकरणांत कायम टिकविता येणार नाही या कल्पनेची भर ज्याप्रमाणे जिन्हांसारख्या हिंदुमुसलमान ऐक्याच्या अंगदाचे हिंदु व काँग्रेस यांचा धर्मवेडाने पछाडलेला असा कट्टा वैरी होण्यांत रुपांतर झाले त्याचप्रमाणे हिंदु समाजांतील डॉ. आंबेडकरांसारख्या अस्पृश्य वर्गाच्या एका घटकाचा जो छळ झाला त्यांच्यासारख्या महत्वाकांक्षी व बुद्धीमान व्यक्तीच्या मार्गांत केवळ विशिष्ट समाजात जन्मपावल्याच्या दुर्देवी कारणामुळे जे अडथळे पदोपदी येत गेले आणि इंग्लंड व अमेरिकेतील आपला तेजस्वी शिक्षणक्रम संपवून हिंदुस्थानांत आल्यावरही त्यांना ज्या अपमानकारक परंपरेला तोंड द्यावे लागले, त्या सर्वांची प्रतिक्रिया होऊनच हिंदी जनतेला एक अराष्ट्रीय हिंदी पुढारी म्हणून भासणारे अथवा हिंदूंची बदनामी करण्यांत विकृत स्वर्गसुखाचा लाभ घेणारा एक हिंदू या स्वरुपांत डॉ. आंबेडकर यांचे दर्शन घडत आहे.......... चौदा वर्षापूर्वी मिस मेयो या बाईचे "मदर इंडिया" हे पुस्तक प्रसिद्ध झाले होते व त्या पुस्तकाच्या प्रकाशनामुळे हिंदूस्थानच्या बदनामीचा डांगोर सर्व जगभर पिटण्यात आला...... गटार संशोधनकांचा रिपोर्ट, असाच या पुस्तकाबद्दल गांधीनीही आपला अभिप्राय दिल्याचे आम्हाला आठवते...... डॉ. आंबेडकरांच्या या ग्रंथांतील पाकिस्तानचे विचार वाचताना आम्हालाही सारखी 'मदर इंडिया' या पुस्तकाचीच आठवण होत होती.. ...वि. वि. २०–४–४१) दुसऱ्या लेखांत डॉ. परांजपे यांनी जे मुद्दे मांडले त्यांत डॉ. आंबेडकरांचे हे पुस्तक म्हणजे बीभत्स संशोधनाचा एक नमुना आहे, हा एक मुद्दा मांडलेला होता; आणि यावर सरकारने इं. पि. कोडच्या आधारे योग्य तो इलाज करावा, असाही डॉ. परांजपे यांनी सरकारला एक इषारा दिला. (......डॉ. आंबेडकरांनी इतिहासाचे उत्खनन करुन मुसलमानांनी

हिंदूवर केलेल्या स्वाऱ्या आणि मुसलमान राज्यकर्त्यांनी केलेले जुलुम आणि अत्याचार यांचा लांबलचक पाढा वाचण्यासाठी आपल्या ग्रंथराजाची वरीचशी पाने खर्ची घातली आहेत, अलिकडील काळात जे जातीय दंगे झाले, त्यांचे तपशीलवार वर्णन करण्यासाठी ग्रंथकाराने एक स्वतंत्र प्रकरण लिहिले आहे. वाचनालयाच्या अगर म्युझियमच्या तळघरांत गाडून टाकणेच उचित, असे हे आगंतुक व दुष्ट तपशील विस्ताराने वर्णन करतांना आंबेडकर मिटक्या मारीत आहेत असा भास होतो. ज्ञातीज्ञातीत वितुष्ट वाढविणाऱ्या लिखाणाला मनाई करणाऱ्या इंडियन पीनल कोडच्या कक्षेत आंबेडकरांचे हे बीभस्त इतिहाससंशोधन कसे येत नाही. याबद्दलच आम्हाला आश्चर्य वाटते... ..." वि. वि. ता २७-४-४१).

लेखांक तीन व चार यांत डॉ. परांजपे यांनी ग्रंथातील कांही मुद्याबद्दल आंबेडकरांबद्दल गौरवाचे उद्‌गार काढलेले आहेत. परंतु त्यांच्या या चार लेखांचा रोख असा की, आंबेडकरांनी हा ग्रंथ लिहायला नको होता. लिहिलाच तर तो मुसलमानांच्या पाकिस्तानवादी चळवळीला पोषक असा नको होता. परंतु मुख्य मुद्दा हा की पाकिस्तानवादाची चळवळ कॉंग्रेसलाही नाकदुऱ्या काढावयास लावण्याइतकी देशांत फोफावल्यावर सदर चळवळीबद्दल जर एकादा संशोधक प्रवृत्तीचा आणि चौकस बुद्धीचा लेखक ग्रंथ लिहावयास बसला तर तो दोन्ही पक्षातर्फे त्या त्या पक्षाला पोषक व घातक असेच मुद्दे उपस्थित करील व ते मुद्दे सिद्ध करण्यासाठी साधकबाधक सामुग्री वापरील. अगदी हाच मार्ग आंबेडकरांनीं चोखाळलेला आहे हा मार्ग चोखाळताना त्यांनी या वा त्या पक्षाला चिमटे घेतले किंवा त्यांना कोपरखळ्या मारल्या तर तो त्यांचा दोष नाही. तो लेखकाचा इतिहाससिद्ध हक्क आहे ! मिस मेयोने हिंदी समाजाची दुर्बळ अवस्था कशामुळे झाली व हिंदी समाज किती मागासलेला आहे, हे सिद्ध करण्यासाठी हिंदी समाजातील अनिष्ट चाली रिती व समजुती पुस्तकांत नमूद केल्या. तिने या गोष्टी ब्राह्मणांनी धार्मिक ग्रंथात लिहिलेल्या भाकड कथांप्रमाणे स्वतःच्या मेंदूतून निर्माण केलेल्या नव्हत्या. डॉ. आंबेडकरांनी तेच केले. या दोन्ही लेखकांनी हिंदी व हिंदू समाजाचे दोष दाखविले. त्यात त्यांनी कांही पाप केले नाही. कोणी पाप केले असले तर ते आमच्यात भरपूर दोष असले, तरी आम्ही श्रेष्ठ, म्हणणाऱ्या दांभिक लोकांनी ! कारण हे लोक समाजाला आपले दोष दूर करावयाला प्रवृत्त करीत नाहीत ! दोष दाखविणाराला ठोका, असा ते समाजाला उपदेश करतात ! हे दोष दाखविताना या दोन्ही लेखकाकडून साधनसामुग्रीच्या तपशीलात थोडेफार दोष राहिलेले आहेत. उदाहरणार्थ, आंबेडकरांनी आपल्या ग्रंथात जातीय दंग्यांची जी माहिती दिली आहे, ती सदोष आहे असे टाईम्स ऑफ इंडियाने दाखविलेले आहे.

BOMBAY RIOTS

Local Authorities tell us that Bombay riot figures quoted yesterday by a correspondent from Dr. Ambedkar's Book on Pakistan are inaccurate. The official figures read :

| Year | Persons killed | Persons wounded | Duration of riot (days) |
|---|---|---|---|
| 1929 | 144 | 743 | 19 |
| 1929 | 31 | 228 | 12 |
| 1930 | 1 | 55 | 3 |
| 1932 | 217 | 2713 | 80 |
| 1933 | 3 | 24 | 1 |
| 1933 | 0 | 5 | 1 |
| 1936 | 94 | 632 | 55 |
| 1937 | 11 | 85 | 15 |
| 1938 | 14 | 98 | 9 |

The riots in 1938 lasted for 2½ days, not 2½ hours, minor incidents occurring for nine days in all. (*Times of India*, 3-5-41)."

पण असल्या सदोष माहितीमुळे मूळ मुद्याला कांहीही बाध येत नाही.

आंबेडकरांचा सर्व ग्रंथ वाचल्यानंतर असा मनावर ठसा पडतो की, पाडाला आलेला आंबा पाहिल्यावर हा अगदी थोडया वेळात खाली पडणार, असे पाहणारा भविष्य करतो, त्याचप्रमाणे हिंदी व हिंदू समाजाची दुर्बलता व मुसल्मान समाजाची संघटना ही १९४१ पर्यंत अशा काही चमत्कारिक रीतीने वाढत आलेल्या आहेत की ती दुर्बलता व सबळता तुकडे पाडायला आलेली आहे, असे आंबेडकरांनी आपल्या ग्रंथात ऐतिहासिक घडामोडींचा संशोधक बुद्धीने अभ्यास करून कयास बांधला. हा त्यांचा कयास चुकीचा आहे, असा डॉ. परांजपे यांनी आपल्या लेखात सिद्धांत मांडला. याच सिद्धांतना कोट्यावधि हिंदूंनी टेकू दिला!

१९४४ मध्ये म. गांधी व जीना यांच्यामध्ये लीग व कॉंग्रेस यांच्या राजकीय मतभेदासंबंधी जी चर्चा झाली तीत पाकिस्तान म्हणजे काय असा म. गांधीनी जीनाला प्रश्न विचारला व जीनांनी "Thoughts on Pakistan" या ग्रंथाकडे गांधीजींचे लक्ष वेधले. सदरग्रंथात पाकिस्तानासंबंधी जो आराखडा बाबासाहेबांनी तयार केला होता, त्यांत थोडासा फरक करून लीगला पाकिस्तान हवे असे जीनांनी गांधीजीस सांगितले. पण गांधीजींनी ग्रंथाच्या व पाकिस्तानच्या चांगुलपणाबद्दल फारशी उत्सुकता प्रदर्शित केली नाही; पाकिस्तानच्या निर्मितीचा प्रश्न लीगने १९४६-४७ सालांत बसास

लावला तेव्हा गांधीजींनी उद्‌गार काढले की, तुम्ही प्रथम माझा मुडदा पाडा व मग हिंदुस्थानचे दोन तुकडे करा! परंतु हिंदुंचा अखंड हिंदूस्थानचा सिद्धांत १५ ऑगस्ट १९४७ रोजी अपेशी ठरला. कारण त्याच दिवशी हिंदुस्थानची फाळणी करण्यास जीवापाड विरोध करणारे हिंदू व काँग्रेसपुढारी यांचा पाकिस्तानिर्मितीला आशिर्वाद जाहीर झाला आणि मोठी आश्चर्याची गोष्ट ही की, आम्ही दोषी असलो तरी श्रेष्ठ व चूक असलो तरीही श्रेष्ठ तर लबंडाव खेळण्याची प्रवत्ती हजारो वर्षापूर्वीपासून हिंदू समाजात रूजू झाली ती हिंदूची ऐतिहासिक लबंडावी प्रवृत्ती १५ ऑगस्टलाही विजेच्या रोषणाईपेक्षाही जास्त उत्साहाने निदर्शनास आली! हिंदूच्या छळांना, त्रासांना व हुकुमशाही प्रवृत्तीना कंटाळून गेल्या १०-१२ शे वर्षात कोटयावधि अस्पृश्यांनी इस्मामी धर्माची कास धरली; व गेली हजार वर्षे त्यांनी आपल्याला छळणाऱ्या हिंदूचा निःपात करण्याचे बीज वाढवीत आणले. म्हणूनच हिंदूवर आक्रमण करणारे मुसलमान या धर्मांतरीत अस्पृश्यांच्या रक्ताचेच होते. हिंदूवर १९२० ते १९४७ या काळात मुसलमान लोक काही हिंदुस्थानाबाहेरून आलेले नव्हते. अस्पृश्य समाजांतून मुसलमान झालेल्या वंशजांच्या सुरी हल्ल्याने पाकिस्तान निर्माण झाले, हे ऐतिहासिक सत्य हिंदुना १५ ऑगस्टलाही पटले नाही! कारण त्यांचा ऐतिहासिक लबंडावी स्वभाव!

सदर ग्रंथराजाची ४७८ पानांची द्वितीय आवृत्ती १९४५ च्या फेब्रुवारीत "Pakistan or portion of India". या नावाने प्रसिद्ध झाली. ही आवृत्ती पहिल्या आवृत्तीपेक्षा छपाईच्या दृष्टीने फार सुबक होती.

बाबासाहेबांच्या पाकिस्तान विचारसरणीबद्दल भारतीय राष्ट्रवाद्यांनी टीकेची झोड उठविली. श्री. राजगोपालाचारी यांनी पुढील काळांत पाकिस्तान मुसलमानांना द्या, अशी भूमिका स्वीकारली, तेव्हा त्यांच्यावरहि खूपच टिका झाली. या बाबतींत श्रीमती इंदुमती पंडित यांचा "भावी ग्रहयोग - भाषावार प्रांतपुनर्रचना" या शीर्षकाखाली एक लेख २०-५-५६ च्या नवशक्तींत प्रसिद्ध झालेला होता. त्यांत त्यांनी प्रारंभी खालील मजकूर लिहिलेला होता — भारताची रास 'मकर' आहे आणि शनी त्या राशीचा स्वामी आहे. यांत आंतरराष्ट्रीय राजकीय ज्योतिष क्षेत्रांत दुमत नाहीं. बरेच राजकारणी लोक या राशीचे गुण किंवा अवगुण जाणत नाहीत किंवा तसे प्रत्यक्ष कार्यांत अनुसरीत नाहीत. मकर राशीचे गुणावगुण आधुनिक चाणक्य श्री. चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनी ओळखले आहेत आणि ते तसे नेहमी सांगत असतात.

## चाणक्य

त्याचे खरे कारण असे कीं, राजाजींना ज्योतिषशास्त्राची आवड आहे आणि त्याचा कांही अंशी त्यांनी अभ्यासही केलेला आहे. कांही वर्षापूर्वी हिंदुस्थान व पाकिस्तानच्या जबड्यांत या आधुनिक चाणक्यानी "सी. आर फॉर्म्युला" म्हणून एक तडजोड घडवून आणणारे (काँग्रेस व लीगमध्ये) निवेदन सादर केले होते. परंतु

दुर्भाग्याने बरेच लोक ते समजू शकले नाहीत. आणि त्यांनी त्याला विरोध केला. इतकेच नव्हे तर कांही वेळेला त्यांच्यावर जोडे फेकण्यांत आले. परंतु शेवटी काय? राजाजी चुकले कीं साधारण राजकारणी लोक चुकले? शेवटी पाकिस्तान झालेच की नाही? व त्या जोडे फेकणाऱ्या लोकांनाच जोडे खावे लागले की नाही?......"

पुस्तकें विकत घेणे आणि लायब्ररीचा वाढता खर्च भागविणे यासाठी बाबासाहेबांनी १९३५ पर्यंत जे कर्ज केले होते ते आणि चार मिनार बांधण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाकडून काढलेले कर्ज हे फेडावयाचे होते त्या इमारतीचा ताबा बँकेकडे दिलेला होता. हा सर्व व्यवहार कायदेशीर रीतीने बँकेचे मॅनेजर श्री. एच. सी. कॅप्टन यांच्यातर्फे झालेला होता हे बँकेचे कर्ज बाबासाहेबांना परत करता येईल की नाही, अशी शंका बाबासाहेबांना १९४० च्या डिसेंबर मध्ये आली. विचारान्ती त्यांनी असा निर्णय घेतला की, ही इमारत विकावी आणि बँकेच्या कर्जातून मुक्त व्हावे. इमारत विक्रीबद्दलची जाहिरात त्यांनी स्वतःच्या नावाने १९ मार्च १९४१ च्या नवाकाळ पत्रांत दिली. आणि ती रावबहादूर एस. आर. राणे, रिटायर्ड सुपरिंटेंडट ऑफ पोलिस मुंबई यांना विकली. विक्रीखत दिवेकर अँड कंपनी सॉलिसिटर्स, १४, हमाम स्ट्रीट, मुंबई यांच्यातर्फे ९ मे १९४१ ला रजिस्टर करण्यांत आले.

श्री. मानवेंद्रनाथ रॉय यांनी राजकीय प्रश्नांवर विचारविनिमय करून राजकीय पुढाऱ्यांची एक संघटना (National Democratic Union) स्थापण्याचे प्रयत्न १९४० च्या अखेरीस केले. :त्यासाठी त्यांनी कलकत्ता येथे ३० व ३१ डिसेंबर १९४० ला एक परिषद भरविली. तिची माहिती देण्यासाठी त्यांनी सप्रूना मुंबईहून (Provisional Central Office, Ratilal Mansion, Parekh Street, Bombay-4) २०-४-४१ ला पत्र पाठविले. सदर कार्यात तुम्ही व तुमचे इतर मित्र यांनी भाग घ्यावा, अशी रॉयनी सप्रूना सदर पत्रांत विनंती केली.

रॉय आणि सप्रू यांचा राजकीय परिस्थितीवर पत्रव्यवहार झाला. २४-४-४१ च्या पत्रांत रॉयनीं कांहीं प्रश्नांवर मतें प्रदर्शित केली होती. त्या पत्राला सप्रूंनी २९-४-४१ ला रॉयना (रोशनबाग, मोहिनी रोड, डेहराडून) उत्तर दिले. मुंबईच्या परिषदेत असा ठराव केला होता कीं, युद्धाच्या काळात व्हाईसरॉयचें मंत्रीमंडळ संपूर्ण लोकशाही पद्धतीवर बनवावें. त्यांत एकही अधिकारी नसावा. याबद्दल रॉयनीं खुलासा विचारला तेव्हां सप्रूनी स्पष्टीकरण केले कीं, ही बाब तात्पुरत्या स्वरूपाची आहे, घटनात्मक समजू नये; आणि असले मंत्रीमंडळ तयार करण्यात कांही अडथळे नाहींत. पण ही बाब ब्रिटीश सरकार मान्य करण्यास तयार होणार नाहीं. लीगने पाकिस्तान निर्मितीचा जो ठराव केलेला आहे. तो आपणाला मान्य नाही. भारताचे तुकडे करणें हे मी पाप समजतो. पाकिस्तानला माझा कसून विरोध आहे. हिंदु व मुसलमान आणि कॉंग्रेस व लीग यांच्यात ऐक्य व्हावे, हे मला मान्य आहे. परंतु ते कसे घडवून आणावे हा प्रश्न आहे. आता उभयपक्षी इतकी विक्षिप्त परिस्थिती उत्पन्न झाली आहे, कीं ही एकी

घडवून आणणे दुरापास्त झालेले आहे. पाकिस्तान मुद्यावर जीनाशीं तडजोड करणे तर त्रिकाल अशक्य आहे.

(The Bombay Conference Resolution did not aim at a permanent Constitution. It only asked for the non-affinitisation of the Viceroy's Executive Council during the period of the War and I can see no legal, or Constitutional or practical difficulties in that way but, I do not think the British Government are prepared to go so far as that.

As regards Pakistan, I have very strong views regarding this question. Although I am for a settlement, and have been so far years, with the Muslims on the most generous terms, I can never be a party to the fragmentation of India and I do not think that on that point there can be a settlement with Mr. Jinnah..........

Altogether I do not expect anything from Mr. Amery or the present Government of India and I fear the chances of a settlement between the Congress or the Hindus on one side and the Muslim League on the other are now more remote than ever before.

I have very carefully considered the Lahore Resolution of the Muslim League. While I am prepared to admit the possibility of a readjustment of the relations between the Centre and the Provinces, let me, tell you frankly that I can on no account be a party to the Pakistan resolution of the Muslim League passed at the Madras session."

सप्रू व त्यांचे सहकारी यांनी 'मुंबई राजकीय परिषद' स्थापून राजकीय प्रश्नांवर जी चर्चात्मक चळवळ चालविली होती ती आपल्या लोकशाही संघाच्या चळवळील सामना देणारी आहे, असा रॉय यांचा समज असेल तर तो चुकीचा आहे, आणि त्य.चा पाकिस्तान प्रश्नाकडे बघण्या जो दृष्टीकोन आहे तो सर्वस्वी त्याज्य होय, असे मत सप्रूंनीं डॉ. सच्चिदानंद सिंह, व्हाईस चॅन्सेलर, पाटना युनिव्हसिटी, पाटना, यांना २–७–४१ ला पाठविलेल्या पत्रात प्रदर्शित केले. हिंदू व मुसल्मान यांच्या ऐक्याच्या प्रश्नांसंबंधी रॉयपेक्षा मला जास्त माहिती आहे, असेहि सप्रूंनीं सदर पत्रांत म्हटले.

("Thanks for sending me M. N. Roy's letter of the 19th of June....... He is very critical of our conference. Apparently he looks upon it as a sort of rival organisation.

So far as I am concerned I have no desire to set up any organisation which may be a rival to any other body. I certainly do not agree with him — and I am glad that you also do not agree — on the question of Pakistan. He is quite at liberty to express himself with regard to our conference in any manner he likes or to say that a sober man like myself should get involved in this controversy. I believe that I understand the Hindu-Muslim problem better than Mr. M. N. Roy.")

बाबासाहेबांनी १९२४ ते १९४० च्या काळात जे कार्य केले व ज्या नव्या नव्या भूमिका घेतल्या व त्यासाठी चळवळी व भाषणेही केली, त्यासंबंधी सर्व-साधारणपणे विरोधी सूर जिकडे तिकडे ऐकूं येत असत. याबद्दलचे एक उदाहरण मी येथे देत आहे.

### "डॉ. आंबेडकरांची पुच्छप्रगति"!

महाराष्ट्रातील अस्पृश्य वर्गाचे पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची गणना मुंबईतील विद्वान, देशभिमानी, चिकित्सक आणि स्वतंत्र वृत्तीच्या पुढाऱ्यांत प्रामुख्याने केली जाते. डॉ. बाबासाहेबांची सर्वच मते सर्वांना सर्वकाळ पटण्यासारखी असतात असे नाही किंबहुना त्यांची सर्वच मतें सर्वांना सर्वकाळ पटतील असे क्वचितच घडते. नि खुद्द बाबासाहेबांचीहि तशी अपेक्षा असेल असे त्यांच्या परिचयांतील सुज्ञ मंडळीही केव्हांही म्हणणार नाहीत. राजकीय नि सामाजिक सुधारणाविषयक मतप्रदर्शनाच्या बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अनेकदा एकांडे शिलेदार म्हणून गणले गेलेले आहेत कांही वर्षापूर्वी अस्पृश्यांनी "धर्मांतर" करण्याबद्दलची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची क्रांतिकारक घोषणा ही त्यांच्या एकांडे शिलेदारीचीच निदर्शक म्हटली पाहिजे. त्या धर्मांतर घोषणेची स्मृति आता डॉ. बाबासाहेबांना तरी राहिलेली आहे किंवा नाही याची शंका वाटते. त्यांच्या प्रगट घोषणांत नेहमी धडाडीचा प्रामाणिक-पणा असला, तरी त्यांत अतिशयोक्तीचा अंश नसतोच अशी मात्र कोणीही ग्वाही देऊं शकणार नाही. डॉ बाबासाहेबाचा गेल्या वीस वर्षांच्या सार्वजनिक आयुष्क्रम जरी उत्तरोत्तर त्यांच्या विद्वत्तेबद्दलचा जनतेचा आदर वृद्धींगत करणारा असला, तरी त्याबरोबर त्यांचा मुत्सद्देगिरीचा लौकिक मात्र कांहीसा घटत चालला आहे, असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते. डॉ. बाबासाहेबांच्या राजकीय दूरदर्शित्वाच्या नि विधायक मुत्सद्देगिरीच्या लौकिकाच्या बव्रातींत मधून मधून भरती येते, तर कधी कधी तिला ओहोटी लागल्याचेहि खेदजनक दृश्य पहावयास सापडते डॉ. बाबासाहेबांच्या अशा अस्थिर मतांमुळे नि चंचल धोरणामुळे ते अनेकदा अस्पृश्य (मानीव) वर्गातीलही अनेक लोकांच्या अविश्वासाला पात्र झाले आहेत; आणि अस्पृश्य (मानीव) वर्गातील पुढाऱ्यांचा पूर्ण विश्वास त्यांना केव्हाच संपादन करता आलेला नाही.

तरीही पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाच स्पृश्य वर्गीय पुढारी नेहमी एकमेव अस्पृश्य वर्गीय पुढारी म्हणून गणतात, कारण डॉ. बाबासाहेबांची विचारसरणी जरी अनेकदा अस्थिर असली, तरी त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल कोणालाही शंका वाटत नाही. डॉ. बाबासाहेबांचे डावपेच जरी प्रमादपूर्ण असले, तरी त्यांचे हेतु प्रामाणिक असतात, आणि म्हणून त्यांच्या मतप्रदर्शनासंबंधाने सहानुभूतिपूर्ण दृष्टीकोन ठेऊनच स्पृश्य समाजातील प्रागतिक पुढारी नेहमी वागत आलेले आहेत. तथापि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विद्वान असले नि प्रामाणिक असले, तरीही जर ते हिंदी राष्ट्राच्या विघटनेला सहाय्यक होईल आणि हिंदू समाजाच्या विच्छेदनाला उत्तेजक होईल असा तत्त्वांचा नि कार्यक्रमांचा मतप्रचार करू लागल्यास, त्यांच्या मतांचा भ्रामकपणा नि राष्ट्रघातकपणा लोकनिदर्शनास आणून देणे आणि त्यांच्या मतप्रचाराचा प्रतिकार करणे हे सुबुद्ध जनतेच्या प्रतिनिधींचे पवित्र कर्तव्यच होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संबंधाने असे विचर प्रदर्शिता करण्याचा प्रसंग अलिकडे त्यांनी प्रसिद्ध केलेल्या "पाकिस्तान" हा इंग्रजी ग्रंथ, आणि अहमदाबाद येथे त्यांच्याच अध्यक्षतेखाली नुकत्याच भरलेल्या गुजरात अस्पृश्य राजकीय परिषदेतील त्यांचे अध्यक्षीय भाषण, नि तीत पसार झालेले काही प्रतिगामी ठरावामुळे उद्भवलेला आहे. बॅ. जिना यांनी मुस्लीम लीगच्या वतीने पुढे मांडलेली "पाकिस्तान" निर्मितीची योजना ही किती भ्रामक पायावर निस्वार्थी विचारसरणीवर आधारलेली आहे, याचा पुरावा त्या योजनेच्या हिंदु विरोधकांच्या लिखाणांतून नव्हे, तर खुद्द कांही मुसल्मान पुढाऱ्यांच्या लिखाणांतून उपलब्धहोऊ शकेल. बॅ. जीनांची ही योजना मुंबईतील कित्येक मुसल्मान पुढाऱ्यांना संमत नाही पण खुद्द सरशिकंदर हयातखानांसारखे पंजाबचे मुसल्मान पंतप्रधानहि "पाकिस्तान" ही शब्दयोजना टाळू पहात आहेत. मुंबईच्या "टाईम्स ऑफ इंडिया" सारख्या अँग्लोइंडियन पत्रकारानेही डॉ. आंबेडकरांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका अग्रलेखांत असे म्हटले आहे की,

"The plain truth is that, there is no more a Muslim nation in India than there is a Hindu nation. Pakistan based on the fundamental misconception of two seperate nations, seeks to cut across racial and provincial divisions. Exchange of populations is one way of putting it's basic ideas to the test. At the first touch of reality their illusory character becomes evident. It is difficult for instance, to visualise a Muslim from the Konkan as completely at home, among the Muslims of the Punjab. The situation will not, we firmly believe, yield to such heroic remedies. Pakistan as we have often stated, is prompted by despair, and its extra-vagences reflect the hopelessness which animates it."

हिंदुस्थानांत हिंदु आणि मुस्लीम अशी दोन अगदी स्वतंत्र राष्ट्रे आहेत असे मानणे हे वस्तुस्थितीविषयी अज्ञान दर्शविण्यासारखे आहे. ज्या प्रातात मुसलमानांचे बहुमत अर्थात संख्येने आहे, तेथेही मुसलमान आणि हिंदु संस्कृति सर्वसामान्यरीत्या सलोख्याने टिकाव धरून राहिलेली आहे. भावी लोकशाहीच्या आगमनाने या दोन संस्कृतीतील घर्षण वाढविण्याऐवजी उत्तरोत्तर ते कमीच होत जाईल. त्यासाठी राष्ट्र-विघटन किंवा विच्छेदन करण्याची राजकीय दृष्ट्या आवश्यकताही नाही, आणि ते राष्ट्रसंरक्षणाच्या दृष्टीने आत्मघातकी होईल. उदाहरणार्थ कोंकणी मुसलमान आणि कोकणी हिंदु यांच्यात कोकणी मुसलमान आणि कोकणी हिंदु यांच्यामधील गुणसाम्या-पेक्षा गुणवैषम्यच अधिक दृग्गोचर होईल. म्हणून पाकिस्तान सारख्या भ्रामक अदूरदर्शी नि राष्ट्रविच्छेदक योजनांना ऐतिहासिक आणि काल्पनिक पुरावे शोधून काढण्याच्या कामी आपले बुद्धीवैभव किंवा संशोधन चातुर्य विनाकारण खर्च करण्याच्या ऐवजी डॉ. आंबेडकरांनी आपली चतुर लेखणी आणि कुशाग्र बुद्धीमत्ता ही ब्रिटिश राज्यछत्राखाली गेल्या दीडशे वर्षांत हिंदुस्थानाने लोकशाहीच्या मार्गावर आणि एक राष्ट्रीयत्त्वाच्या दिशेने केलेल्या प्रगतीला चालना देण्याच्या कामी उपयोगी पडणारा नि हिंदुस्थानांत आसेतु हिमाचल काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत, कराचीपासून, गोहत्ती-पर्यंत एकछत्री नि एकजिनसी पण स्वयंपूर्ण, स्वयंविकासी नि लोकसत्ताकात्मक राज्यघटना स्थापित करण्याचे मार्गसंशोधन करणारा विद्वत्ताप्रचूर ग्रंथ लिहिण्याकडे उपयोगाला लाविली असती, तर खरोखर त्यामुळे त्यांच्या अस्पृश्य वर्गीय नेतृत्वाचा लौकिक तर वृद्धींगत झाला असताच, पण विधायक मुत्सद्दी म्हणूनही त्यांची ख्याती झाल्याशिवाय राहिली नसती डॉ. आंबेडकर हे गौतम बुद्धाच्या धर्माचे चहाते आहेत असे म्हणतात सध्याच्या समाजकारणात गौतम बुद्धाच्या संदेशाची आवश्यकता विशेष आहे, हे ते विसरले काय?

संयुक्त राज्यघटना हा त्यांचा १९३५ च्या संघटना कायद्यावरील प्रबंध विद्वानांनी प्रशंसिला नाही काय? पण आता हिंदी संयुक्त संघटनेच्या ऐवजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विभक्त संघटनेचा पुरस्कार करु लागलेले आहेत. हिंदुस्थानच्याऐवजी ते पाकिस्तानचे प्रचारक बनू पहात आहेत! १९३५ च्या संघटना कायद्यातील 'फेडरेशन' बाबासाहेबांना दोषपूर्ण वाटत होते, हे मशहूर आहेच. पण १९३५ च्या संघटना-कायद्याच्या पुढे जाण्या ऐवजी, आता "पाकिस्तानचा" प्रतिगामी प्रचार ते करणार अशी चिन्हे दिसत आहेत! डॉ. आंबेडकरांच्या राजकीय मतप्रणालीची ही अनपेक्षित पुच्छप्रगति पाहून त्यांच्या चाहत्यांना केव्हांही खेदच वाटला पाहिजे. परवा अहमदाबाद येथे गुजरात हरिजन (नव्हे अस्पृश्य) राजकीय परिषदेच्या अध्यक्षपदावरून डॉ. बाबा-साहेबांनी केलेली घोषणा हीही त्यांच्या पुच्छ प्रगतीची आणखी साक्ष पटवील. या परिषदे-तील भाषणात डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्याकरिता "विभक्त मतदार संघाची" मागणी केली! अस्पृश्यांपुरते बोलावयाचे झाल्यास सुप्रसिद्ध पुणे कराराने किंवा येरवडा कराराने हा प्रश्न डॉ. बाबासाहेबांच्या मान्यतेनेच कायमचा निकालात निघालेला असताना, त्यांनी

अहमदाबाद येथे आपली पगडी कां फिरविली, आणि अस्पृश्यता समाजातील महारेतर वर्गांमधील लोकमाताचा विचार न करतां, एकदम विभक्त मतदारसंघाची मागणी का केली, हे गूढच आहे ! हा एक प्रकारचा अत्याचार जरी नसला तरी तो अत्यंत अविचार आहे, असे म्हणणे भाग पडते. गेल्या पांच वर्षांत संयुक्त मतदारसंघाची योजना सर्वत्र यशस्वी झालेली असताना, आता पुन्हा हिंदू समाजाच्या एकजिनसीपणाला बाधक होणारी अस्पृश्यांच्या विभक्त मतदारसंघाची मागणी कोणींहि देशाभिमानी हिंदी पुढारी पुरस्कारणार नाही. मुसलमानांना सुद्धां विभक्त मतदारसंघ देण्यात येऊं नयेत, त्यांनाहि संयुक्त मतदारसंघांत सामील करुन घ्यावे, असा प्रयत्न सर्वत्र चालू असतांना आणि खुद्द सिंधसारख्या मुसलमान बहुसंख्येच्या प्रांतातही त्या दृष्टीने लोक मनांत प्रगति झालेली दिसत असतांना, डॉ. बाबासाहेबांनी पुन्हां विभक्त मतदार-संघाचे तट्टू पुढे रेटण्याचा प्रयत्न करावा, हे त्यांच्या अनुभविक नेतृत्वाला शोभणारे नाही. अहमदाबाद परिषदेने अस्पृश्यवर्गीय मतदानासंबंधानेहि अशी सूचना केली की, संकलित मतदान पद्धतीच्याऐवजी (Cummulative Vote) विभाजित मतदानपद्धतीच्या (Distributive Vote) स्वीकार करण्यांत यावा. या बाबतींत तज्ञांत मतभेद होणे स्वाभाविक असले, तरी स्पृश्य काय किंवा अस्पृश्य काय, सर्वच जातींतील अल्पसंख्यांक वर्गाच्या हिताच्या दृष्टीने संकलित मतदानपद्धतीच तूर्त तरी हिंदुस्थानांत लोकहिताची ठरेल, यांत शंका नाही. तीत बदल करण्याची कॉंग्रेस पक्षाची सूचना त्या पक्षाच्या हिताची असली, तरी तेवढ्यामुळे ती ग्राह्य मानता येत नाही. डॉ. ग. स. महाजनी हे संकलन मतदान पद्धतीचे पुरस्कर्ते आहेत. अहमदाबाद परिषदेने हिंदी संस्थानात अस्पृश्यांना प्रतिनिधीत्वाची आणि इतर अधिकारांची केलेली मागणी रास्त आणि न्याय आहे. परंतु अपृश्यांना हिंदु समाजापासून विभक्त करण्याच्या योजना प्रतिगामीच म्हटल्या पाहिजेत. "पाकिस्तान निर्मिति ही जशी राष्ट्रीयदृष्ट्या हिंदुस्थानला घातक आहे तशीच "अस्पृश्य वसाहती" स्थापण्याची कल्पना हीहि आर्थिक दृष्ट्या ग्राह्य मानली तरी सामाजिक दृष्ट्या पुच्छ प्रगतीचीच निदर्शक नव्हें काय ? धर्मांतर घोषणेप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विभक्त मतदारसंघाची घोषणाही अस्पृश्य समाज जर दुर्लक्षिल, तर त्यात अस्पृश्यांचे हितच आहे.

अहमदाबादच्या भाषणांत डॉ. बाबासाहेबांनी कॉंग्रेसवर यथेच्छ टिका केली आहे, पण तिच्याशी जरी आम्हांस काही कर्तव्य नसले तरीही म. गांधी आणि त्यांच्या प्रेरणेने स्थापन झालेला हरिजन सेवक संघ ह्यांच्याकडून होणारे अस्पृश्योन्नतीचे कार्य कमी लेखणे हे कोणासच मान्य होणार नाही. डॉ. आंबेडकरांनी आपल्या भाषणात ब्रिटीश पार्लमेंटरी पद्धतीच्या लोकशाहीपेक्षा अमेरिकन पद्धतीची अध्यक्षीय लोकशाही हिंदु-स्थानाने अधिक पसंत करावी असे जे सुचविले आहे तेही त्यांच्या वैचारिक पुच्छ प्रगतीचेच लक्षण नव्हे काय ?"

(ज्ञानप्रकाश, गुरुवार, २०-३-४१)

● ● ●

# खंड ९

## प्रकरण : ३ व ४

# क्रिप्स मिशन योजना

दुसरे महायुद्ध ३–९–३९ ला सुरु झाले.: त्याच्या अगोदरच्या काळात व त्यानंतरच्या १९४१ च्या काळापर्यंत मुसलमान समाजाच्या राजकीय चळवळी आणि आकांक्षा कशा होत्या व त्यांचे भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गात कसे अडथळे उत्पन्न झाले, याचा त्रोटक इतिहास पाहणे इष्ट आहे.

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर इंग्रजांना हिंदू व मुसलमान यांच्या विषयी अविश्वास वाटू लागला, त्यातल्या त्यात हिंदूंच्याबद्दल थोडीशी आपुलकी आणि मुसलमानाविषयी बरीचशी घृणा त्यांना वाटत होती. ही परिस्थिती १८८५ मध्ये काँग्रेसची चळवळ सुरू झाल्यानंतर निवळू लागली. काँग्रेसच्या चळवळीत बहुसंख्य हिंदू होते. काँग्रेसच्या चळवळीमुळे हिंदू राजकारणात शिरजोर होतील व ही घटना आपल्याला प्राणघातक ठरेल, असे हिंदुस्थानातील राज्यकर्त्या इंग्रजांना वाटू लागले. या घटनेला उतारा म्हणून मुसलमानांची राजकीय बाजू मजबूत करणे व त्या बाजूतर्फे हिंदूंच्या काँग्रेसच्या चळवळीला नेस्तनाबूद करणे, हे धोरण राज्यकर्त्यांनी स्वीकारले. त्यांनी प्रमुख मुसलमानांना जवळ केले, त्या मुसलमानांना वाटले की, राज्यकर्त्यांच्या तंत्राने मुसलमान वागू लागले तर त्यांचे भले होईल. तेव्हा ते त्या दिशेने वाटचाल करू लागले. या मुसलमानांपैकी सर सय्यद अहमद हे एक प्रमुख होते. या चळवळीचा प्रचार करण्यासाठी त्यांनी १८८८ साली काही प्रातांत दौरा काढला. एका भाषणात त्यानी असे उद्गार काढले की हिंदूस्थान देशातील ऐतिहासिक घडामोडी लक्षात घेतल्या तर असे दिसून येते की, हिंदु व मुसलमान ही दोन्ही राष्ट्रे एकाच गादीवर स्थानापन्न होऊन राजकीय सत्ता समभावनेने पेलतील, हे शक्य आहे काय? कदापि नाही. एकाने राज्यसत्ता पेलावी व दुसऱ्याने त्याचे अंकित म्हणून रहावे, हेच शक्य आहे. आणि त्यासाठी एकाने दुसऱ्याला आपल्या सामर्थ्याने जिंकून अंकित ठेवणे भाग

आहे. हिंदु व मुसलमान हे समभावनेने एकत्र नांदू शकतील हे त्रिबार अशक्य आहे. ("Is it possible that under these circumstances, two nations — the Mohammedan and Hindu — could seat on the same throne and remain equal in power? Most certainly not. It is necessary that one of them should conquer the other and thrust it down. To hope that both could remain equal is to desire the impossible and inconceivable" Pakistan : A Political Study, P-1, by Keith Callard — 1957).

सर सय्यद अहमद यांच्या प्रचाराने मुसलमान समाजात जागृति उत्पन्न झाली. परंतु त्यांना काँग्रेसच्या वाढत्या शक्तीला खच्ची करता आले नाही.

लॉर्ड कर्झन हिंदुस्थानचे व्हाईसराय असताना त्यांनी आपल्या १८९८ ते १९०३ च्या कारकीर्दीत, काँग्रेसच्या चळवळीमुळे वरिष्ठ समाजात राष्ट्रीय भावनेचे बीजांकूर वाढू लागले होते ते खुडून काढण्याची कृत्ये केली. त्यापैकी एक म्हणजे बंगालची १९०४ सालात केलेली फाळणी. या फाळणीमुळे तर राष्ट्रीय जागृतीचा बीजांकूर फारच फोफावला. हिंदुस्थानात ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध जो भडाग्नि उत्पन्न झालेला होता तो शमविण्यासाठी ब्रिटिश सरकारने त्यावेळचे इंग्लंडचे युवराज- प्रिन्स ऑफ वेल्स, (जार्ज पाचवे) यांना हिंदुस्थानच्या भेटीला १९०५ च्या मध्यंतरी पाठविले. परंतु त्यांच्या दौऱ्याचा राष्ट्राभिमानी लोकांवर परिणाम झाला नाही. ही परिस्थिती लक्षांत घेऊन हिंदी लोकांत होत असलेली राष्ट्राभिमानाची व ऐक्याची भावना खच्ची करण्यासाठी भारतमंत्री लॉर्ड मोर्ले व व्हाइसराय लॉर्ड मिंटो यांनी जातीय भावनांना उत्तेजन देऊन 'फोडा आणि झोडा' या मार्गाचा अवलंब करण्याचे ठरविले, त्यांच्या प्रेरणेने हिंदुस्थानातील ब्रिटिश अधिकाऱ्यांनी, वजनदार मुसलमानांना हाताशी धरले आणि त्यांना एच. एच. दी आगाखान यांच्या नेतृत्वाखाली लार्ड मिंटो यांच्याकडे मुसलमानांचे शिष्टमंडळ १ ऑक्टोबर १९०६ ला सिमल्याला पाठविले. हे शिष्टमंडळ ब्रिटिशांच्या प्रेरणेने उत्पन्न झाले, असा स्पष्ट उल्लेख लेडी मिंटोज डायरी या ग्रंथात ३ ऑक्टोबर १९०६ च्या दैनंदिनीत आहे. ("He, it was who engineered the recent Mohamedan deputation" — Tragedy of Jinnah, P-7, by Kailash Chandra, 1941).

या शिष्टमंडळाच्या कार्यातूनच मुस्लिम लीगची स्थापना झाली आणि तिने ब्रिटिशांच्या जातीयवादाला राजरोसपणे पाठिंबा दिला. या शिष्टमंडळाचा उल्लेख मौलाना महंमद अली यांनी कोकानाडा येथील काँग्रेसच्या आपल्या अध्यक्षीय भाषणांत 'कमांड परफॉमन्स' असा उल्लेख केलेला होता. लीगमध्ये सरकारधार्जिणे श्रीमंत जमीनदार, सरदार, व्यापारी व सुशिक्षित लोक होते. यांनी १९०६ च्या पुढील काळांत काँग्रेस व हिंदू यांच्याविरुद्ध रान उठविले. १९०९ च्या सुधारणा कायद्यात

(मोर्ले–मिंटो रिफॉर्मेस) मुसल्मानांना स्वतंत्र राजकीय अस्तिव (जातीय मतदार संघ) देण्यात आल्यामुळे जातीयवादाचे विष राजकीय क्षेत्रात प्रथमतः उत्पन्न करण्यता आले. या विषाचा नायनाट केला तरच हिंदुस्थानचीं राजकीय प्रगति होईल असे कॉंग्रेसला वाटत होते व तिच्या १९१० च्या अधिवेशनात त्यावर जोराचा प्रचारी हल्ला चढविण्यात आला. सदर ठरावावर (जातीय मतदारसंघ) जोराचा हल्ला करणारे जे वक्ते होते त्यांत बॅ. जीना हे अग्रेसर होते. लीगने १९१६ पर्यन्त हिंदू व कॉंग्रेस यांच्याविरुद्ध जे रान उठविले ते शमविण्यासाठी कॉंग्रेसने लीगबरोबर १९१६ च्या लखनौ अधिवेशनात करात केला. तो लखनौ करार म्हणून प्रसिद्ध झाला. कॉंग्रेसने मुसल्मानांचे स्वतंत्र राजकीय आस्तित्व मान्य केले. १९१६ ते १९२६ मध्ये खिलाफतची व कॉंग्रेसची चळवळ जोरार झाली. त्यामुळे लीगच्या चळवळीचा प्रभाव दिसून आला नाही. या काळात बॅ. जीना हे कॉंग्रेसच्या वर्तुळात होते आणि लीगच्याही वर्तुळात होते. तथापि ते लीगच्या जातीयवादाला जास्त महत्त्व न देता राष्ट्रीयवादाला देत होते. १९२५–२६ च्या नंतरच्या काळात खिलाफतच्या संघटनेतून जे मुसल्मान बाहेर पडले होते ते कॉंग्रेसमधूनही बाहेर पडले व जातीयवादी राजकारणाचा पुरस्कार करु लागले. तेव्हा हिंदु–मुस्लिम ऐक्य साधण्यासाठी शेकडो सभा व परिषदा भरविण्यात आल्या. त्यापैकी एका सभेत बोलताना बॅ. जीना यांनी जातीयवादामुळे सर्वांचे नुकसान होणार आहे आणि राष्ट्रीयवाद हाच सर्वांचा तरणोपाय होय, असे उद्गार काढले होते. मी कट्टर राष्ट्रवादी आहे, असे ते मध्यवर्ती कायदे मंडळात बोलले होते. "I, Sir, stand here with clear conscience, and I say that *I am a nationalist first, a nationalist second, and a nationalist last.*

I once more appeal to this House whether you are a Musalman or a Hindu, for God's sake do not import the discussion of communal matters into this house and degrade this assembly, which we desire, should become a real national movement, set an example to the outside world and our people." (Tragedy of Jinnah, P. 47-48).

बॅ. जीना १९२० पर्यंत कॉंग्रेस आणि लीग यांचे सभासद होते. परंतु कॉंग्रेसची खादी आणि सत्याग्रही चळवळ व लीगचा खिलापतशी समेट, ही जीनांना पसंत नसल्याने ते १९२० ते १९३४ पर्यंत अपक्ष राजकारणी मुसलमान म्हणून वागले. या काळात मॉस्लेम कॉन्फरन्स, शिया कॉन्फरन्स, अहरार खुदाई खिदमतगार, कृषिक प्रजापक्ष, नॅशनलिस्ट मुस्लिम्स, वगैरे पक्ष राजकीय क्षेत्रात शिरले. हकीम अजमल खॉन, डॉ. अन्सारी, डॉ. किचलू, किडवई, मौ. महंमद अली, मौ. शौकत अली, डॉ. खान, अब्दूल गफार खान वगैरे अखिल भारतीय किर्तीचे मुसल्मान गांधीजींच्या

अंतरवर्तुळात होते व ते गांधीजींच्या आत्मक्लेशाच्या चळवळीत साथीदार होते. जीना हे ख्यालीखुशाली व सुसंस्कृत जीवन यांचे चाहते होते. त्यांचा पोशाख नखशिखांत युरोपियन होता. ते युरोपियन संस्कृतीचे व राहणीचे भोक्ते होते. त्यामुळे त्यांना गांधीजींच्या सान्निध्यात स्थान नव्हते. लीगमध्येही ते फारसे लोकप्रिय नव्हते. त्यांना १९३० च्या वर्तुळ परिषदेला सरकारने निवडले ते स्वतंत्र मुसलमान राजकारणी माणूस म्हणून. जीना अगर लीगचे इतर पुढारी यांना, मुसलमानांना पाकिस्तान हवे, याची स्वप्नातही कल्पना नव्हती. उलट अंशी हिंदुस्तानातील सर्व प्रातांचे अमेरिकेच्या धर्तीवर संघराज्य असावे, पण त्यांत मुसलमानाना सर्व बाबतीत मानाचे स्थान असावे या विचाराचे ते होते. हे विचार ते वेळोवेळी बोलून दाखवीत.

१९२० साली कॉंग्रेसचे अधिवेशन नागपूर येथे भरले होते. एका ठरावावर भाषण करताना श्री. जीना यांनी गांधीजींचा उल्लेख करतांना 'श्रीयुत गांधी' असेच असा केला तेव्हा अधिवेशनातील लोक चिडले. ते ओरडून म्हणाले, 'जीनासाहेब महात्मा गांधी म्हणा श्रीयुत गांधी म्हणू नका. तरी जीन आपल्या भाषणात गांधीजींना 'श्रीयुत गांधी' असेच संबोधू लागले. ते पाहून मौलांना महंमद चिडले आणि जीनांना म्हणाले, 'येथील लोकमताला मान द्या' तरीही जीना गांधींना आपल्या पुढील भाषणात 'श्रीयुत गांधी' असे म्हणू लागले. तेव्हा सर्व श्रोत्यांनी जीनांना सांगितले, 'खाली बसा!' पण जीना पुढे भाषण करू लागले आणि गांधींना 'श्रीयुत गांधी' असे संबोधू लागले. तेव्हा अधिवेशनाचे वयोवृद्ध अध्यक्ष श्री. विजयराघवाचारियर हे जीनांना विनवू लागले की, जनमताला मान द्या! जीना ऐकेनात तेव्हा गांधीजी उठले आणि या प्रकरणाला उद्देशून म्हणाले की, मी महात्मा नाही, मी साधा माणूस आहे. जीनासाहेबांना पसंत नसलेले नाव तुम्ही त्यांना घ्यावयास भाग पाडता, यात तुम्ही माझा आदर करीत नाही. आपली मते दुसऱ्यांवर लादून आपण स्वातंत्र्य मिळवू शकणार नाही. जीनासाहेबांचा हेतु वाईट नाही, त्यांचा भाषाप्रयोगही वाईट नाही. जोपर्यंत एखादा माणूस वाईट हेतूने वाईट बोलत नाही, तोपर्यन्त त्याला बोलण्याचा हक्क आहे. मग ते बोलणे एखाद्या वस्तुबद्दल असो किंवा माणसाबद्दल असो. (I am not a Mahatma. I am an ordinary man. By coercing Jinnah Saheb to a particular choice of word, you are not doing me honour. We cannot win real freedom by forcing our views upon others. As long as there is nothing objectionable or derogatory in a man's language, he is at liberty to think or say whatever he likes about others. ...Bapu as I Saw Him, by Ramnarayan Chaudhary, P. 15-16).

पहिल्या गोलमेज परिषदेच्या वेळी मुस्लिम लीग आणि मुस्लिम कान्फरन्स यांची इंडियन कॉन्स्टिट्यूशनल रिफॉर्म्स कमीटीपुढे संयुक्तपणे साक्ष झाली. कमिटीचे

एक सभासद रेजिनॉल्ड क्रॅडॉक यांनी साक्षीदारांना प्रश्न केला की, मुसमानांसाठी हिंदूस्थानात पाकिस्तान निर्माण करावे असा एक सूर ऐकू येतो, त्याबद्दल तुमचे मत काय आहे? तेव्हा साक्षीदारांचा पुढारी उत्तरला, या हवेतल्या कल्पना आहेत. याबद्दल कोणाला महत्त्व वाटत नाही. पाकिस्तान ही कागदावर उतरलेली कल्पना आहे आणि ती अप्रयोजक व विघातक आहे. त्यातून कोणाचा फायदा होणार नाही. २०-११-३० ला जीनांनी पहिल्या गोलमेज परिषदेत भाषण करुन संयुक्त राज्यसंघाचा पुरस्कार केला ब्रिटिश साम्राज्यांतर्गत पण स्वायत्त संयुक्त राज्यसंघ हिंदुस्थानाला हवा अशी जीनांनी मागणी केली.

The cardinal principle is that (India wants to be a mistress in her own house, and I cannot conceive any constitution that you may frame, which will not transfer responsibility in the Central Government to a Cabinet responsible to the legislature. "Tragedy of Jinnah", P. 221-222).

चौधरी रहमतअली या केंब्रिजच्या पदवीधर तरुण मुसलमानाने लीगच्या प्रचारी चळवळीमुळे मुसलमानानांच्या भवितव्याचा विशेष अभ्यास केला. तेव्हां त्याला सर सय्यद अहमद यांच्या १६८८ च्या व्याख्यानातील हिंदू व मुसलमान अलग राहणे अशक्य, या मुद्याचे महत्त्व वाटू लागले. हिंदू व मुसलमान हे हिंदुस्थानांतच स्वतंत्र राहू लागले तर मुसलमानांना जो भाग वाट्याला येईल त्याला पाकिस्तान हे नाव द्यावे व हिंदूंच्या प्रदेशाला हिंदुस्थान हे नाव द्यावे, अशी कल्पना १९३३ मध्ये सुचली. त्याने तिचा गुप्तपणे प्रचार व प्रसार पंजाबात केला. पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, अफगाण, कश्मीर, सिंध व बलुचिस्तान यांची 'आद्याक्षरे' एकत्र करून -'पाकिस्तान" शब्द चौधरी रहमतअली याने तयार केला (Inside India by Halide Edib) परंतु या कल्पनेला कोणी फारसे महत्त्व दिले नाही.

बॅ. जीना हे अत्यंत महत्त्वाकांक्षी होते. १९२० ते १९३० च्या काळात आपणाला राजकीय आयुष्य मिळाले नाही, हे त्यांना जाणवल्यामुळे ते लंडनमध्ये राहून प्रॅक्टीस करू लागले. पण तेथे त्यांचे मन रमेना. ते १९३४ ला हिंदुस्थानात येऊन स्थायिक झाले. या वेळी लीगचे सामर्थ्य सर्व बाजूनी खच्ची झालेले होते. बडे जमीनदार, शेट सावकार, उद्योगपती-व्यापारी, अशा लोकांचा भरणा लीगमध्ये होता. लीग त्यांच्या आर्थिक साहाय्यावर चालत होती. पण या सर्व लोकांची धडपड होती, स्वार्थासाठी-सरकारी पदव्या, कॉन्ट्रॅक्टस, नोकऱ्या मिळविण्यासाठी-मुसलमान बहुजन समाजाच्या हितासाठी नव्हती. १९३४-३५ च्या सुमारास कॉंग्रेसमधील लोकप्रिय मुसलमान पुढारी आणि इतर मुसलमान पुढारी दिवंगत झालेले होते. तेव्हा मुसलमानाना राजकीय क्षेत्रात आणून आपले पुढारीपण प्रस्थापित करण्यास ही वेळ बरी आहे, असे जीनांनी हेरले. त्यांनी लीगची सूत्रे हाती घेतली. १९३७-४० च्या

काळात कॉंग्रेस सत्तारूढ झाली. कॉंग्रेसच्या २७ महिन्याच्या कारकीर्दीत वेळोवेळी ज्या राज्यकारभारात चूका अगर उणीवा उघड झाल्या, त्यांचा जीनांनी उपयोग करून मुसलमान समाज कॉंग्रेसच्या विरुद्ध उभा केला. जीनांनी मुसलमानांच्या १४ मागण्या जाहीर केल्या. या मागण्या कॉंग्रेसने मान्य केल्या तर लीग कॉंग्रेसशी सहकार्य करण्यास तयार आहे असा वेळोवेळी पुकारा करण्यास तयार आहे असा वेळोवेळी पुकारा केला. पण जेव्हां जेव्हां लीग व कॉंग्रेस यांच्या समेटाचे प्रयत्न होत तेव्हां तेव्हां जीना पळवाट काढून मुसलमानांत हिंदूंच्या आक्रमक राजकारणाबद्दल प्रचार करीत. १९३४-३७ च्या काळात हा लपंडाव जीना यशस्वी रीतीने खेळले. १९३७-४० च्या काळात कॉंग्रेस सत्तारूढ झाली. या काळात कॉंग्रेसच्या राजकारणात व राज्यकारभारात ज्या लहान-मोठ्या चुका झाल्या त्याबद्दल भडक प्रचार करून जीनांनी मुसलमानांना हिंदू व कॉंग्रेस यांच्याविरुद्ध उभे केले ते कायमचेच. कॉंग्रेस ही हिंदूंची, प्रांतांतील राज्यकारभार त्यांच्या हातचा, वंदे मातरम् या राष्ट्रगीतात मुसलमानांची बदनामी आहे. मुसल-मानांवर हिंदी शिकण्याची, खादी वापरण्याची सक्ती होते वगैरे मुद्दे उपस्थित करून जीनांनी लीगतर्फे असा प्रचंड प्रचार केला की, त्याला कॉंग्रेस अगर हिंदुसमाज अगर आर्यसमाज तोंड देऊ शकले नाहीत.

बॅ. जीना हे खोजा होते. त्यांचा धार्मिक प्रवृत्तीकडे ओढा फारसा नव्हता. त्यांची रहाणी एखाद्या खंरदाज इंग्रजाप्रमाणे होती. त्यांना हिंदी वा मुसलमान संस्कृती-पेक्षा युरोपियन संस्कृतीचे फार आकर्षण होते. त्यांना कुराणाची भाषा, अरेबिक येत नव्हती मात्र ते इंग्रजी अत्यंत आकर्षक रीतीने बोलत असत. अरेबिक भाषेचे त्यांना ज्ञान नव्हते, हे एका खटल्यात उघडकीस आले. सर तेज बहादूर सप्रू व जीना हे हैदराबाद संस्थानच्या प्रमुख अदालतीत एका खटल्यात परस्परविरुद्ध वकील म्हणून उभे राहिले. दस्तऐवजांत अरेबिक शब्दाचा भरणा होता. तो दस्तऐवज जीनांनी वाचवा व कोर्टाला त्यांतील अरेबिक शब्दांचा अर्थ स्पष्ट करावा असे जजांनी त्यांना लागोपाठ तीन वेळा सांगितले; पण जीना प्रत्येक वेळी काही तरी मुद्दा उपस्थित करून वेळ मारून नेऊ लागले. शेवटी जज्जाने जीनांना जरासे रागावून आपला मुद्दा सांगितला तेव्हा **जीना म्हणाले, मला अरेबिक भाषा येत नाही.** मग सर सप्रू तो दस्तऐवज वाचू लागले; त्यानी त्यातील सर्व अरेबिक शब्दांचा अर्थ स्पष्ट केला. दुसऱ्या दिवशी या खटल्याची माहिती हैद्राबादेतील वर्तमानपत्रांनी दिली एका पत्राने मथळा दिला होता तो असा, **"पंडित महमद अली जीना आणि मौलवी तेज बहादूर".**

१९३७ ते १९४० च्या कॉंग्रेसच्या राजवटीत हिंदूंनी मुसलमानांना आपल्या धर्मा-प्रमाणे वागणे मुष्कील करून सोडले, या मुद्यावर प्रचार करून जीनांनी मुसलमानांची मने थिथरवली. पण जीनांना इस्लामी धर्मातील आचारविचार यांची फारशी माहिती नव्हती लीगचे राजकारण रंगात येऊ लागले तेव्हांच ते मुसलमानी पोशाख करू लागले आणि

मशिदीत नमाज पढण्यास जाऊ लागले. (Tragedy of Jinnah, P. 235-36) (१९३७ ऑक्टोबर) मध्ये लखनौ येथे भरलेल्या ऑल बेंगाल मुस्लिम सेशनचे अध्यक्ष श्री. जीना होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणात असे जाहीर केले की, मुसलमानांनी फक्त मुसलमान दुकानदारानांच आश्रय द्यावा. ज्या ठिकाणी हिंदू मुसलमानांना हिंदूंच्या देवदेवताचे वर्णन असलेलीराष्ट्रीय गाणी गावयास लावतात, तेथे मुसलमानांनी हिंदूंना उघडपणे विरोध करावा. या शिकवणीला शह देण्यासाठी हिंदूंनी कंबर बांधली पाहिजे असे ठराव हिंदुमहासभेने नागपूर येथे भरविलेल्या सभेत १९३८ च्या डिसेंबरमध्ये मंजूर केले. (The Communal Traingal in India, P. 156-57).

१९३७-३८ मध्ये जीनांनी लीगला बड्या राजकीय पक्षाचे स्वरूप आणून दिले कॉंग्रेसची राजवट १९३७ च्या ऑगस्टमध्ये ८ प्रातांत सुरू झाली. वंदे मातरम् हे राष्ट्रगीत मुसलमान मुलांना म्हणायला लावून कॉंग्रेसने मुसलमानी धर्मावर प्रहार केला, कारण या राष्ट्रगीतात हिंदूंची अष्टभुजा दुर्गा हिची स्तुति आहे व हे राष्ट्रगीत म्हणणे म्हणजे मुसलमानांनी हिंदु देवतेची मूर्तिपूजा करणे होय; आणि हे मुसलमानांना अधर्म्य होय, असा कोटीक्रम करून जीनाने हिंदू व कॉंग्रेस राजवट याविरुद्ध मुसलमानांची मने बिथरविण्यासाठी प्रचाराचा झंझावात तयार केला. कायदे मंडळे, गव्हर्नरची व व्हाईसरॉयची कार्यकारी मंडळे, सरकारी व निमसरकारी नोकऱ्या वगैरे बाबतीत हिंदूंचे प्रमाण मुसलमानांपेक्षा जास्त असल्यामुळे हिंदू मुसलमानांवर सत्ता गाजवितात वगैरे मुद्दे उपस्थित करून जीनांनी मुसलमानांची मने बिथरवली १९३९ च्या सप्टेंबरमध्ये कॉंग्रेसच्या मंत्रीमंडळांनी राजिनामे दिले तेव्हा मुसलमान हिंदूच्या गुलामगिरीतून मुक्त झाले, म्हणून मुसलमानांनी 'राष्ट्रीय मुक्तीदिन' (Day of National Deliverence) साजरा करण्याची घोषणा केली. हा मुक्तीदिन हिंदुस्थानात सर्व ठिकाणी मुसलमानांनी साजरा केला व त्याचे प्रचारी परिणाम मुसलमानांवर फार खोलवर झाले. अशा रितीने १९३७–३९ च्या काळात जीना लीगचे सर्वाधिकारी झाले व लीग कॉंग्रेसला आव्हान देण्याइतपत बलशाली राजकीय पक्ष म्हणून ओळखला जाऊ लागला. हिंदू व मुसलमान यांच्या जीवनाची अंगे सर्वस्वी भिन्न आहेत व म्हणूनच मुसलमानांना हिंदूंच्या वर्चस्वाखाली कधी सुखी जीवन घालवता येणार नाही. मुसलमानांना आपल्या धर्माप्रमाणे व संस्कृतीप्रमाणे सुखी जीवन घालवायचे असेल तर त्यांनी हिंदूचे वर्चस्व झुगारून द्यावे व स्वतंत्र व्हावे अशी जीनांनी १९३९ मध्ये भूमिका स्वीकारली. (Therefore, in my judgement, . . .Democracy can only mean Hindu raj all over India. This is a position to which Muslims will never submit. Some recent speeches and writings of Mr. Jinnah, Vol. I, 1952, P. 99. Jamil-Ul-Din-Ahmed, Lahore). त्यांनी Faith, Unity and Discipline). निष्ठा, ऐक्य व शिस्त या तीन शब्दांचे ध्येयब्रीद लीगपुढे ठेवले व १९४० च्या लाहोर येथील

वार्षिक सभेत पाकिस्तानचा ठराव मंजूर करून त्यासाठी १९४१ पासून प्रचाराचा पाऊस पाडला. (Pakistan, by Keith Callard — P. 198-99) या प्रचारामुळे बहुसंख्क मुसलमान समाज लीगच्या बाजूला झाला. त्यामुळे जीनांच्या पुढारीपणाचे वजन इतके वाढले की ते व्हाईसरायच्या हुकमतीत ढवळाढवळ करू शकले. व्हाईसरायने १९४१ साली नॅशनल डिफेन्स कौन्सिलवर प्रांतिक मुस्लिम लीगचे प्रमुख पदाधिकारी नेमले तेव्हा जीनाने या सर्व पदाधिकाऱ्यांना राजीनामे देण्यास भाग पाडले. कारण त्या नेमणुकी जीनांच्या संमतीने झालेल्या नव्हत्या. (Ibid — P. 90).

---o---

शीख धर्म स्वीकारण्याच्या बाबतीत केलेले प्रयत्न विफल झाल्यानंतर बाबासाहेब, बौद्ध धर्म स्वीकारण्याचा विचार करु लागले. या बाबतीत सर्व बाजूनी ते विचार करीत असताना मधून मधून ते कांही प्रश्नांवर व मुद्यांवर खाजगी बैठकीत बोलत असत. कधी कधी ते लीहीतहि असत. आणि अशा लिखाणावरून जनतेची प्रतिक्रिया अजमावून पहात असत. अशा लिखाणापैकी त्यांनी बुद्धजयंतीचे राजकीय महत्त्व किती आहे व ते का यासंबंधी 'जनता' पत्रासाठी एक लेख लिहिला होता तो सदर पत्राने अग्रलेख म्हणून छापला. त्या लेखातील मुद्दे व माहिती ही महत्त्वाची असल्यामुळे मी तो अग्रलेख येथे देत आहे.

## "बुद्धजयंती आणि तिचे राजकीय महत्त्व"

हिंदुस्थानातील लोक उत्सवप्रिय आहेत हे काही कोणास सांगावयास नको. वर्षातून अर्धे अधिक त्यांचे दिवस उत्सवात आणि सणात जातात. त्यातल्या त्यात देशातील महान व्यक्तींच्या जन्म-मरणाच्या उत्सवांना तर ते फारच महत्त्व देतात. कृष्णजन्माष्टी, रामनवमी, हनुमानजयंति हे हे उत्सव त्यांच्या या मनोभावनेची साक्ष देतात. असे असताना हिंदुस्थानातील हिंदू लोक बुद्धाची जयंती साजरी करीत नाहीत याचे कोणाही परकीय माणसास आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही. ज्या विभूती हिंदुस्थानात निर्माण झाल्या त्यांत बुद्धाचे स्थान फार उच्च प्रतीचे आहे. जगाला प्रकाशित करणारा तेजस्वी सूर्य अशी महती गाणारे बुद्धाचे काही भक्तगण आहेत. ख्रिस्ती लोक, ज्यांना बुद्धाबद्दल हेवा वाटतो, ते देखील एशिया खंड प्रकाशित करणारा सूर्य अशी त्यास उपमा देतात. हिंदू लोकही त्याला विष्णूचा अवतार मानीत असत. अशा या विख्यात पुरुषाची या देशातील लोकांना आठवण देखील राहिली नाही. बाजीरावाने ठेवलेली रांड मस्तानी हिचे नांव ज्यांना माहित आहे, असे सामान्य लोक आज पुष्कळ सापडतील. पण बुद्धाच्या नावाचा परिचय असलेले सामान्य लोक यांच्यापेक्षा फारच कमी सापडतील अशी मला शंका वाटते. एवढ्या मोठ्या विभूतीची एव्हढी मोठी विस्मृती व्हावी, ही मोठी सखेदाश्चर्याची गोष्ट आहे. अशा परिस्थितीत आनंदाची

ही गोष्ट की, बंगाल व इतर प्रांतांत बुद्धजयंतीचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. पण आमच्या मते या उत्सवाला फारच मोठे राजकीय महत्त्व आहे. ते पटवून देण्याकरिता गौतमबुद्धाचे चरित्र व त्याचे कार्य याचा जनतेला परिचय करुन देण्याचे आज आम्ही योजिले आहे.

अडीच हजार वर्षांपूर्वी शुद्धोधन नावाचा साक्य वंशातील एक राजा कपिलवस्तु येथे राज्य करीत होता. शुद्धोधन राजाच्या कुळाचे नाव गौतम असे होते. कपिलवस्तु हे ठिकाण आजच्या हिंदुस्थानातील संयुक्त प्रांत म्हणतात त्या प्रांतांत होते. ते वस्ती व अयोध्या यांच्या मधोमध असून फैजाबादपासून पूर्वेकडे ५० मैलावर होते या शुद्धोधन राजाच्या दोन पत्नी होत्या. एकीचे नाव मायादेवी व दुसरीचे नाव प्रजापति असे होते. शुद्धोधन व मायादेवी यांचे लग्न झाल्यावर काही दिवसानी मायादेवी गरोदर राहिली. गरोदर राहिल्यानंतर पहिले बाळंतपण माहेरघरी व्हावे, अशी पूर्वापार चाल असल्या कारणाने मायादेवीचा बाप सुबुद्ध याने मुलीस बाळंतपणास आपल्या गावी पाठवावी म्हणून त्यांचा जावई शुध्दोधन यास निरोप पाठविला. त्याप्रमाणे मायादेवी व तिची बहीण प्रजापति या उभयता लवाजम्यानिशी आपल्या माहेरी जावयास निघाल्या. वाटेत त्यांना लुंबीणी वन लागले. व त्या ठिकाणी मायादेवी हीस प्रसूतिवेदना सुरू झाल्या व त्या वनात ती बाळंत होऊन पुत्ररत्न प्रसवली. प्रसूत झाल्या बरोबर मायादेवी मरण पावली. व त्या मुलाचे संगोपन तिची बहिण प्रजापति हिने केले. त्याचे नाव सिद्धार्थ असे ठेवण्यात आले. हाच पुढे गौतमबुद्ध म्हणून प्रसिद्धीस आला.

क्षत्रिय कुळात व राजघराण्यात जन्माला आल्यामुळे त्याच्या परिस्थितीला साजेल असे शिक्षण सिद्धार्थाला देण्यात आले होते. क्षत्रियाचे लष्करी शिक्षणच देण्यात आले होते असे नव्हे तर त्याचा वेदाभ्यासही चांगलाच झाला होता. परंतु सिद्धार्थाचा एकंदरीत मनाचा कल एकांताकडे होता. राजवैभव उपभोगण्याकडे त्याचा विशेष कल नव्हता. आपला पुत्र कदाचित संन्यास घेऊन भलत्याच मार्गाला लागेल या भीतीने शुद्धोधनाने आपल्या मुलाचे लग्न करून त्यास संसारात डांबून टाकण्याचा निश्चय केला. व त्याप्रमाणे दंडपाणी याची मुलगी, जिचे माहेरचे नाव गोपी व सासरचे नाव यशोधरा, हिच्याबरोबर लग्न लावून दिले. व या लग्नापासून सिद्धार्थ गौतमास राहूल या नावाचा एक मुलगा झाला. शुद्धोधनाने आपल्या मुलाला ऐषआरामात राहाता यावे म्हणून तीन मोठमोठे राजवाडे बांधून दिलेले होते. त्याच्या ऐषआरामात कोणत्याही प्रकारची न्यूनता राहू नये, अशा प्रकारची व्यवस्था केली होती.

एके दिवशी गौतमाने गावातून हिंडून येण्याचा व एकंदरीत सामाजिक परिस्थिती पाहून येण्याचे ठरविले व त्याप्रमाणे रथ जुंपून तो राजवाडयातून बाहेर पडला. शहरात शिरल्यानंतर चार गोष्टी त्याच्या नजरेस पडल्या. प्रथम एक अत्यंत

वृद्ध, जराग्रस्त गलितगात्र, दंतभग्न, चेहऱ्यावर सुरकुत्या पडलेल्या, केस सगळे पांढरे झालेले, पाठीची कमान झालेली, हातात काठी धरून मुंगीच्या मंदगतीने तोंडातून काहीतरी अस्पष्ट बोलत व सर्व शरीर कंपायमान होत असलेला त्याच्या नजरेस पडला, पुढे गेल्यावर त्याला दुसरे दृश्य दिसले. एक माणूस भयंकर तापाने ग्रस्त झालेला, अत्यंत अशक्त व बेशुद्ध, निराश्रीत असा वाटेवरती पडलेला दिसला. आणखी पुढे गेल्यावर एका माणसाचे प्रेत तिरडीवर घालून त्याचे नातेवाईक व त्याचे मित्रगण वाहून नेत होते. त्याच्यापुढे एक संन्यासी प्रफुल्ल मनाने व शांत चित्ताने हातात भिक्षापात्र घेऊन चालला होता हे चौथे दृश्य पाहिले. ही चार दृश्ये पाहून गौतमाच्या मनावरती मोठाच परिणाम झाला. या चार दृश्यांवरून त्याने बोध घेतला (तो हा) की जगात दुःख आहे. मनुष्य जीवीत हे अशाश्वत आहे. असे जर नसते तर उपजलेला मनुष्य रोगग्रस्त न होता! वृद्ध न होता!! आणि मरण न पावता!!! एकंदरीत चौथे दृश्य म्हणजे संन्यासवृत्ती हेच खरे ध्येय होय असे त्यास वाटले. आणि म्हणून ज्या जगात दुःख आहे, जरा आहे, आणि मरण आहे. अशा संसारात काहीच अर्थ नाही, असे त्यास वाटू लागले. अशा विचारांच्या जाळ्यात सापडून तो परत घरी आला. परत येताच त्याची पत्नी यशोधरा प्रसूत होऊन तिला एक मुलगा झाल्याचे वृत्त त्याला कळविण्यात आले. ही एक जादा बेडी आपल्या पायांत पडली, असे त्यास वाटले. तथापि संन्यास घेण्याचा त्याचा निश्चय कायम झाला होता. व त्याप्रमाणे त्याने आपला निश्चय त्याचा बाप शुद्धोधन यास जाऊन कळविला. अर्थात गौतमाने असे काही करू नये म्हणून राजवाड्यामध्ये नाना तऱ्हेचे करमणुकीचे, मनरंजनाचे प्रयोग करून या निश्चयापासून गौतमास परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु गौतमाचा निश्चिय (पक्का) झालेला होता. तथापि राजाला कळविल्याखेरीज पळून जाणे योग्य नाही, म्हणून आपला मनोदय अमलांत आणण्याचा आपण निर्धार केला आहे, हे सांगण्याकरिता तो राजवाड्यात गेला आणि बापास म्हणाला की, मला तुम्ही अडथळा करू नका. तुमचे राज्य, तुमचे प्रजाजन, तुमची संपत्ति तुम्ही घ्या. मला काही नको. दुसऱ्या दिवशी शुद्धोधनाने आपल्या सरदारांची बैठक बसविली व त्यात गौतमाने केलेल्या निश्चयाची बातमी त्यांस दिली. हे कळल्याबरोबर सरदार म्हणाले आम्ही त्याच्यावरती पहारा ठेवू. तो आपल्या हातांतून कसा जाईल? हे आम्ही पाहू. अर्थात अशा कडेकोट बंदोबस्तात निघून जाणेच शक्य नव्हते म्हणून त्याने तो दिवस तसाच जाऊ दिला. मध्य रात्री तो जागा झाला व त्याचा घोडेवाला चंडक यास झोपेतून उठवले व त्यास मला जावयाचे आहे, माझ्या घोड्यास घेऊन ये असे सांगितले. चंडक, त्यास प्रथमतः कबूल होईना व गौतमास जाऊ नको म्हणून गळ घालू लागला. परंतु गौतमाचा निश्चय अढळ आहे असे दिसल्यावर त्याचा घोडा कंथक यास तो घेऊन आला. गौतमाने त्याची बायको व मूल ज्या खोलीत झोपली होती त्याचे दार हळूच उघडून त्यांच्यावर शेवटची नजर टाकून कंथकावर स्वार होऊन त्या रात्री तो कपिलवस्तु सोडून गेला.

गृहत्याग केल्यानंतर गौतमाने दोघा गुरूंचे शिष्यत्व पत्करून जगात दुःख का? या प्रश्नाचे उत्तर मिळते का हे पाहण्याचा प्रयत्न केला. पहिल्या प्रथम आराद कलाम व त्यानंतर उद्रक रामपुत्र यांचे शिष्यत्व त्याने पत्करले. •अशा परी सात वर्षे त्यांच्या सान्निध्यात त्याने घालविली. परंतु त्यांच्या उपदेशांपासून त्याचे समाधान झाले नाही. म्हणून त्यांना सोडून तो मगध देशात 'उरूवेल (ज्याला हल्ली बुद्धगया असे म्हणतात) त्या ठिकाणी येऊन राहिला. त्या ठिकाणी त्याच्यासारखेच संसाराला सोडून आलेले पांच संन्यासी अरण्यवास पत्करून बसले होते. त्यांच्याबरोबर गौतमाने देहदंडन व खडतर तपश्चर्या करण्यास सुरवात केली. सहा वर्षांच्या देहदंडनाने त्याचे शरीर अत्यंत कृश झाले व त्याला चालण्याची शक्तीदेखील राहिली नाही. एके दिवशी जवळून वाहत असलेल्या फाल्गू नदीतून स्नान करून परत आपल्या आश्रमात येत असताना तो वाटेत घेरी येऊन पडला, जवळच एक धनगर रहात होता. त्याची वडील मुलगी सुजाता हिने गौतमास त्या स्थितीत पाहिले व त्याला घरून दूधभात आणून दिला. शुद्धीवर आल्यानंतर त्याला वाटू लागले की, देहदंडनापासून, जगात दुःख कां याचे ज्ञान होणे शक्य नाही. गौतमाने अन्न सेवन केले यामुळे तो योगभ्रष्ट झाला अशी कल्पना करून घेऊन त्याचे पांच सोबती त्यास सोडून गेले व त्य बुद्धगयेत बुद्ध एकटा राहिला.

एके रात्री एका वृक्षाच्याखाली गौतम बसला असताना या जगात दुःख का व ते दुःख नाहिसे करण्याचा मार्ग कोणता, या प्रश्नाचा त्याला उलगडा झाला. त्याला दिसले की, मानवी जीवनक्रमाचे दोन प्रचलित मार्गाने लोक चालले आहेत. एक चैन करून कालक्रमणा करणे हा, दुसरा देहदंडन करून मरण्याची अपेक्षा करीत राहणे हा. हे दोन्ही मार्ग चुकीचे आहेत या दोन्ही मार्गांनी संसारातील मानवाचे दुःख हरण होणे शक्य नाही, अशी दिव्य दृष्टी त्या रात्री त्या वृक्षाखाली बसला असताना गौतमाला झाली. या दिव्य दृष्टीने गौतम ज्ञानी झाला म्हणून लोक त्याला बुद्ध (ज्ञानी) म्हणू लागले आणि ज्या वृक्षाखाली त्याला ज्ञान झाले त्या वृक्षाला बोधीवृक्ष असे जगप्रसिद्ध नाव प्राप्त झाले.

या नवीन दिव्य दृष्टीचा असा परिणाम झाला की, बुद्धाने देहदंडन सोडून दिले. तो संसारात पुन्हा पडला नाही. पण तो पुन्हा समाजात आला व समाजाच्या उद्धारार्थ त्याने धर्मसंस्थापनेचे कार्य आरंभिले. सर्व हिंदुस्थान पायाखाली घालून आबालवृद्धास, स्त्रीपुरुषांस आपला धर्म त्याने स्वमुखाने सांगितला. हे कार्य त्याने तब्बल चाळीस वर्षे केले. अखेर धर्मप्रचाराकरिता फिरत असताना बुद्ध पावा येथे मुक्कामास राहिला. त्या गावी चूडा नावाचा एक लोहार रहात असे. त्याने बुद्धास आपल्या घरी जेवण्याकरिता येण्याचा आग्रह केला. चूडा यांच्या घरचे ते अन्न त्याला जाचले व तो आजारी झाला. तशाच आजारीस्थितीत बुद्ध नेपाळच्या पूर्व भागी असलेल्या कुशीनारा गांवी गेला व त्या ठिकाणी त्याचा अंत झाला.

बुद्ध येशू ख्रिस्ताच्या पूर्वी ५६३ व्या वर्षी राजपुत्र म्हणून जन्मास आला व खि. पू. ४८३ व्या वर्षी धर्मसंस्थापक म्हणून मरण पावला.

## बुद्धाचे कार्य

बुद्धाच्या धर्माची मूल तत्त्वे काय? त्याने कोणते कार्य साधले याचे आकलन झाल्याखेरीज बुद्धाचे महत्त्व कळून येणार नाही. या प्रश्नांचा सविस्तर खुलासा स्थळसंकोचामुळे या ठिकाणी करता येणे शक्य नाही; परंतु थोडक्यात बुद्धाच्या कार्याची कल्पना करून देता येणार नाही, असे मात्र म्हणता येणार नाही. बुद्धकालीन ब्राह्मणी धर्माचे तीन आधारस्तंभ होते. वेदप्रामाण्य हा पहिला आधारस्तंभ, यज्ञ बलिदान हा दुसरा आणि वर्णाश्रम हा तिसरा. वेदांत असेल ते सारे खरे, सत्य बुद्धीला पटो अगर न पटो. वेदांत असेल ते सारे खरे, हा जो ब्राह्मणी धर्माला आधारस्तंभ वाटत असे, त्याला बुद्ध मनुष्याच्या ज्ञान मार्गातला पहिला धोंडा असे मानीत होते. वेदांत असेल ते खरे या ब्राह्मणी धर्माच्या तत्त्वाच्याविरुद्ध ज्ञानाला पटेल तेच खरे असे, बुद्धाचे तत्त्व होते. ब्राह्मणी धर्मात परमेश्वरप्राप्ती हाच धर्माचा हेतू असे मानले जात असे. परमेश्वराला बलिदान दिल्याखेरीज त्याची प्राप्ती होऊ शकत नाही, म्हणून यज्ञ करणे व त्यात बळी देणे हाच खरा धर्म मानला जात असे. अगदी पूर्वी ब्राह्मणी धर्मात मनुष्याचा बळी यज्ञात देत असत व त्या नरबळीचे मांस यजमानास खावे लागत असे. नरबळीची चाल जरी बुद्धाच्याकाळी बंद पडली होती तरी यज्ञांत पशूंचा बळी देण्याची चाल जारी होती. त्याकाळचे वाङ्मय ज्यांनी वाचले असेल त्यांना आजच्या ब्राह्मणांचे पूर्वज असंख्य गाईंचा यज्ञाकरिता कसा संहार करीत असत हे माहीत असेलच. हे वाङ्मय वाचून जेवढ्या गाई ब्राह्मणांनी यज्ञात कापल्या असतील त्याच्या शतांशाने मुसलमानांनी कापल्या असतील काय, याबद्दल संशय उत्पन्न होतो. जसा वेदप्रामाण्यावर बुद्धाने हल्ला चढविला, तसा त्याने यज्ञावरती हल्ला चढविला. बुद्धाची या बाबातीतील भूमिका अत्यंत क्रांतिकारक होती, असेच म्हटले पाहिजे. धर्माचा आणि परमेश्वर प्राप्तीचा कांही संबंध नाही, असा बुद्धाचा पक्ष होता. मनुष्याने मनुष्याशी कसे वागावे ह्याचे योग्य प्रकारचे बंधन घालून देणे हे धर्माचे क्षेत्र आहे. ही बुद्धाची भूमिका होती. परमेश्वर प्रप्ती हे धर्माचे क्षेत्र आहे, ही भूमिका बुद्धाला कबूल नव्हती. एका बाजूने परमेश्वर प्राप्तीसाठी यज्ञ करावयाचा, आणि दुसऱ्या बाजूने आपल्या शेजाऱ्याला छळावयाचे, त्याला उपद्रव होईल असे वर्तन करावयाचे, ही धर्माची विटंबना आहे असे बुद्धाचे म्हणणे होते. ब्राह्मणी धर्माचा तिसरा आधारस्तंभ जो वर्णाश्रम धर्म त्याच्यावर तर बुद्धाने फारच मोठा मारा केला. ब्राह्मणी धर्माची सारी मखखी या वर्णाश्रम धर्माच्या कल्पनेत सामावलेली आहे. जातीभेदाच्या जन्मजात उच्चनीच कल्पनांचा फैलाव होण्यास वर्णाश्रम धर्मच कारणीभूत ठरला आहे. या ब्राह्मणी धर्मात स्त्रिया व शूद्रांना मानाचे स्थान नाही, उपजीविकेचे

मार्ग मोकळे नाहीत, कशावर स्वामित्व नाही, म्हणून या दोन वर्गांना स्वातंत्र्य नाही. ही त्यांची जिवंतपणीची अवदशा. ही अवदशा मेल्यानंतरही त्यांच्या पाठी आहेच! ब्राह्मणी धर्मात स्त्रियांना व शूद्रांना मेल्यावर मोक्ष नाही. कारण ब्राह्मणी धर्माच्या तत्त्वाप्रमाणे ज्याला संन्यास घेता येतो त्यालाच मोक्ष प्राप्त होऊ शकतो. आणि शूद्रांना व स्त्रियांना संन्यास देण्याची ब्राह्मणी धर्माने मनाई केलेली होती. बुद्धाला उच्चनीच भाव मान्य नव्हता. 'ब्राह्मण झाला भ्रष्ट तरी तो तिन्ही लोकी श्रेष्ठ,' हे अघोरी तत्व मुळापासून खणून काढण्याचा बुद्धाने निकराचा प्रयत्न केला. सामाजिक समतेचा बुद्धाइतका मोठा पुरस्कर्ता जगात दुसरा झाला नाही असे म्हटले तरी त्यात अतिशयोक्ती झाली, असे कोणालाही म्हणता यावयाचे नाही. ब्राह्मणी धर्मात स्त्रियांना मोक्ष नव्हता. पण बुद्धाने स्त्रियांना भिक्षुकिणी केल्या. ब्राह्मण धर्मात शूद्रांना मोक्ष नव्हता. बुद्धाने शूद्रांना भिक्षु केले. यावरून बुद्ध समतेच्या तत्त्वाचा नुसता पुरस्कार करून स्वस्थ बसला असे नाही. समता अमलांत आणण्याचा त्याने प्रयत्न केला. नुसत्या स्त्रियांना व शूद्रांना भिक्षू केले इतकेच नव्हे तर अंत्यजाना-सुद्धां भिक्षूच्या उच्च पदावर चढविले.

वरील विवरण अगदी त्रोटक असले तरी बुद्धाने या देशात किती महत्त्वाची कामगिरी केली याची कल्पना वाचकांस येऊ शकेल असे आम्हांस वाटते. बौद्ध धर्माची तत्त्वे जितकी ओजस्वी व कल्याणकारी होती तितकाच बौद्ध धर्माचा प्रसार अचाट प्रमाणात झाला. दक्षिणेकडे सिलोन व पॅसिफिक महासागरांतील असंख्य लहानसहान बेटांतून बुद्धाच्या धर्माने आपले अधिष्ठान वसविले आहे. पश्चिमेस ब्रह्मदेश, आसाम, सयाम, चीन, जपान येथवर बुद्ध धर्माचा प्रसार झाला. उत्तरेस तिबेट, नेपाळ, तुर्कस्तान येथवर त्याने मजल मारली. इतकेच नव्हे तर अफगाण लोकांना बौद्ध धर्मीय केले. इतका प्रसार कोणत्याही धर्माचा झाला नाही. बुद्धाच्या धर्माचा आणखी एक विशेष सांगण्यासारखा आहे. सर्वच धर्म आपल्या गुणांच्या आश्रयाने प्रसार पावलेले नाहीत मुसलमानी धर्म तलवारीच्या जोरावर वाढला. ख्रिस्ती धर्म कायद्याच्या जोरावर वाढला. फक्त एकट्या बुद्धाच्या धर्माचा प्रसार गुणांमुळे झाला. त्याला तलवारीच्या धारेची अगर कायद्याच्या दंडनाची जरूरी लागली नाही. लोकांना धरून आणून बुद्धाच्या धर्माची दीक्षा देण्याचे कारण पडले नाही. लोकांनी आपण होऊन त्यात उडी घेतली.

असे असताना बुद्धाच्या नावाची विस्मृति लोकांना कशी झाली असा प्रश्न उपस्थित होतो. हिंदुस्थानाबाहेर बौद्ध धर्म अजून जिवंत आहे. त्याची संख्या काही कमी नाही. हिंदुस्थानातून त्याचे उच्चाटन झाले. त्याची कारणे आज येथे स्थल-संकोचामुळे देता येत नाहीत. परंतु त्याचे थोडक्यात दिग्दर्शन करणे अवश्य आहे.

बुद्धाच्या नावाची विस्मृति कालाला शक्य नाही. बुद्ध अजरामर, अमर आणि अकाल आहे. त्याच्या नावाचा लोप काल कसा करू शकेल? बुद्धाची विस्मृति चीनमध्ये झाली नाही, जपानमध्ये झाली नाही, ब्रह्मदेशात झाली नाही. फक्त हिंदुस्थानातच झाली. याला काल कारण नसून बुद्धाचे शत्रू कारणीभूत आहे हे उघड आहे. ब्राह्मण हे एकजात बुद्धाचे शत्रू. ब्राह्मणांचे भांडण काही बुद्धांशीच होते असे नाही. त्यांचे जैन धर्माचा संस्थापक महावीर यांच्याशीही भांडण होते. बुद्धाप्रमाणे महावीर हाही यज्ञाच्या विरुद्ध होता. पण ब्राह्मणांनी जसा बुद्धांवर निष्ठूरपणाचा व निकराचा हल्ला केला तसा महावीरावर केला नाही. याचे कारण **बुद्ध जसा चातुर्वर्ण्याच्या विरुद्ध होता तसा महावीर नव्हता.** बुद्धाच्या वेदनिंदेबद्दल ब्राह्मणांनी जरी विषाद वाटत असे तरी त्यांना त्याची विशेष चीड नसे. वेदाचे प्रामाण्य गेले तरी त्यात ब्राह्मणांचे मोठेसे नुकसान नाही. तसेच काहीसे यज्ञसंबंधाने त्यांना वाटे. यज्ञ राहिला तरी ठीक, गेला तर त्यात काही मोठी आपत्ती ओढवणार नाही, असे त्यांना वाटे. पण चार्तुवर्ण्यासंबंधी मात्र त्यांची मनोदिशा निराळ्या प्रकारची होती. चार्तुवर्ण्य गेले तर ब्राह्मण गेले, हे त्यांनी ओळखले होते. अर्थात चार्तुवर्ण्याला ते आपला प्राण समजत. बुद्धाची चार्तुवर्ण्य-विध्वसनाची मोहीम म्हणजे ब्राह्मणांना 'मुले कुठारः' असे वाटणे साहजिक आहे. ती त्या काळची ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ होती असे म्हणावयास काहीच हरकत नाही व त्या चळवळीचा अधिष्ठाता जो बुद्ध, त्याला ते मांग अथवा कालपुरुष लेखीत असत. त्यांचा नायनाट करण्यासाठी त्यांनी होते नव्हते तितके सर्व उपाय केले. आपले वैदिक देव ब्रह्मा, विष्णु, महेश यांना बाजूस सारून क्षत्रिय राजांना देव करून बुद्धाची चळवळ त्यांनी मारली. क्षत्रिय रामाला, ब्राह्मण आज जसे जेध्यांना भजतात तसे भजू लागले. एकट्या रामाला हाताशी धरून कार्य होत नाही असे दिसताच दुसऱ्या एका क्षत्रिय राजाला-कृष्णाला पुढे करून ब्राह्मणांनी त्याला देव बनविला. ब्राह्मण आपल्याच राजांना भजू लागले, आता ब्राह्मणांच्या विरुद्ध मोहीम चालू ठेवण्यास कारण नाही अशी वृत्ति ब्राह्मणेतरांत उत्पन्न करून, बुद्धाने आरंभिलेल्या ब्राह्मणेतर चळवळीची धार ब्राह्मणांनी काढून टाकली व तिला बोथट केली. बुद्ध तुमचा खरा, पण आम्ही देखील त्याला आमच्या विष्णुचा दहावा अवतार मानतो, असे ब्राह्मण म्हणू लागले. जनता खूष झाली. आमच्या बुद्धाला ब्राह्मणांनी दहावा अवतार मानला. झाले! आता ब्राह्मणांशी भांडावयाचे कारण काय? एकीकडून ब्राह्मणेतर जनतेशी सामदाम केला. दुसरीकडून बुद्धाचे अनुकरण करून आणि ब्राह्मण धर्म व बुद्ध धर्म एकच अशी लोकांची दिशाभूल करण्यास ब्राह्मणांनी सुरवात केली. बुद्धाने विहारे बांधली. विहारे ही बुद्ध धर्माची लोकांच्या दृष्टीने जागती ज्योत खूण. बुद्धाच्या विहारांच्या शेजारीच ब्राह्मणांनी आपली विहारे बांधण्यास सुरवात केली. या बाह्यत्कारी साम्यांमुळे लोकांच्या मनातून बौद्ध धर्म व ब्राह्मणी धर्म या दोहोमधील फरक दिसेनासा होऊन धर्माच्या बाबतीत पृथकपणा

जाऊन सवगोलंकार झाला. शेवटी मुसलमानांच्या स्वाऱ्यांनी बुद्ध विहारांचा विध्वंस केल्यानंतर जेव्हा बुद्ध भिक्षू देश सोडून गेले तेव्हा त्यांच्या गैरहजेरीत ब्राह्मणांनी बुद्धाच्या नावाचा समूळ लोप करण्याच्या उद्देशाने बुद्ध विहारांना पांडव लेणी म्हणू लागले व बुद्धाच्या मूर्ति फोडून त्या ठिकाणी शिवलिंगाची स्थापना करू लागले.

ब्राह्मणांनी बुद्धाचे नाव या देशातून धुवून काढण्याचा प्रयत्न करावा हे समजण्यासारखे आहे. तो त्यांचा बोलूनचालून शत्रूच होता. त्याची जयंती करावी असा विचार त्यांना कसा रुचेल? परंतु ज्या ब्राह्मणेतरांच्या हिताकरिता त्यांना अंध-श्रद्धेच्या तावडीतून सोडविण्याकरिता, जंतर मंतरच्या खोट्या धर्माच्या कचाट्यातून मोकळे करून खऱ्या मानवी धर्माच्या मार्गावर आणण्याकरिता, त्यांची माणुसकी प्रस्थापित करण्याकरिता, त्यांचा स्वाभिमानदीप प्रज्वलित ठेवण्याकरिता जो झटला, ज्याने ब्राह्मणेतर जनतेच्या हिताकरिता राज्यवैभवाचा त्याग केला, ज्याने आपल्या कीर्तीने देशाचा लौकिक वाढविला अशा महापुरुषाला ब्राह्मणेतरांनी समूळ विसरून जावे, ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यांनी तरी बुद्धाची स्मृति जिवंत ठेवणे अवश्य होते.

बुद्ध जयंती साजरी करा असे हिंदुमात्रास सांगावयास आम्हाला हे एकच कारण आहे असे कोणी समजू नये. आमचे मुख्य कारण यापेक्षा भिन्न असून सबळ आहे. असे आम्हास वाटते. हिंदूतील सुशिक्षित लोकांना राजकारणात हिंदु संस्कृतीच्या पायावर व हिंदूकरता लोकशाही प्रस्थापित करण्याची इच्छा उत्पन्न झाली आहे व त्या प्रीत्यर्थ त्यांचे सारे प्रयत्न चालू आहेत. असल्या हिंदु लोकांच्या बुद्धीची आम्हांस कीवच येते. या देशात लोकशाही प्रस्थापित करू असे म्हणणारे लोक एक तर मूर्ख तरी असले पाहिजेत. किंवा लबाड तरी पाहिजेत. परंतु ही लबाडी व हा मूर्खपणा फार दिवस चालणार नाही. अनुभवाची गाठ पडल्यानंतर असे दिसून येईल की, ब्राह्मणी धर्म आणि लोकशाही ह्या परस्परविरोधी, एकमेकांस विरोधी गोष्टी आहेत. लोकशाही हवी असेल तर चातुर्वर्ण्य नाहीसे झाले पाहिजे. हे चातुर्वर्ण्याचे जंतु काढून टाकण्याकरिता बुद्धाच्या तत्वज्ञानासारखे मारक रसायन नाही, असे आम्हांस वाटते. म्हणून आम्ही म्हणतो की, राजकारणाची रक्तशुद्धी करण्याकरिता बुद्धजयंती सर्व हिंदूंनी साजरी करणे हितावह व आवश्यक आहे.

हिंदुस्थान देश आज राजकीय दृष्ट्या रोगी माणसासारखा आहे. हिंदुस्थानची आठवण झाली म्हणजे पोट वाढलेले, हातापायांच्या काड्याकुड्या झालेल्या, चेहरा फिकट झालेला, डोळे आत गेलेले, हाडांचा सांगाडा झालेल्या पुरुषाचे चित्र नजरेसमोर उभे रहाते. याला लोकशाहीचा गाडा चालविण्याची ताकद नाही, पण लोकशाहीचा गाडा घेऊन चालविण्याची मोठी हौस. हौस पुरवायची तर त्याला ताकद आवश्यक आहे. ती औषध घेतल्याशिवाय प्राप्त होणे शक्य नाही, पण औषध घेऊन काय उपयोग? सर्वांना माहित आहे की, कोणतेही औषध घेण्यापूर्वी कोठा साफ करावा

लागतो. त्यातील मळ काढावा लागतो. त्याशिवाय औषधाचा गुण येत नाही. आमच्या हिंदुमात्राचा कोठा शुद्ध नाही. त्यात ब्राह्मणी धर्माचा कैक दिवसांचा मळ घर करून बसला आहे. जो वैदु हा मळ धुवून काढील तोच या देशाला लोकशाहीच्या प्रस्थापनेत मदत करू शकेल. तो वैद्य म्हणजे गौतम बुद्ध हाच एक आहे. हिंदूंची रक्तशुद्धी रामाची जयंति करून होणार नाही, कृष्णाची जयंति करून होणार नाही. किंवा गांधीची जयंति करून होणार नाही. राम, कृष्ण, गांधी हे ब्राह्मणी धर्माचे उपासक आहेत. लोकशाहीच्या प्राणप्रतिष्ठेला त्यांचा काही उपयोग नाही. उपयोग झाला तर एका बुद्धाचाच होऊ शकेल त्याची आठवण घेणे आणि त्याचीच मात्रा घेणे हाच एक हिंदुमात्राच्या राजकीय व सामाजिक रक्तशुद्धीचा उपाय आहे, असे आम्हांस निःसशय वाटते. म्हणजे

बुद्धम् सरणम् गच्छामि ।
धम्मम् सरणम् गच्छामि ॥
संघम् सरणम् गच्छामि ॥।

हा महामंत्र त्यांनी जपावा असे आमचे सांगणे आहे." (जनता, १७-५-१९४१ पा.४-५)

या लेखामुळे जनतेची खात्री झाली की, बाबासाहेब बौद्ध धर्माचा स्वीकार करणार, त्यांच्या सल्ल्याप्रमाणे आपणही तो धर्म स्वीकारणार, अशी मते लोक प्रगट करू लागले.

जनता पत्राचा खप व्हावा तसा होत नसे. याला बरीच कारणे होती, लिहिण्याची माहिती असणाऱ्या अभ्यासू व निःस्वार्थी लेखकाची नेमणूक संपादक म्हणून केलेली नव्हती. पत्रासाठी व्यवस्थापक मंडळ असे; पण त्यातील बहुतेक सभासद सुमार बुद्धीचे आणि होयबा असत. त्यांच्यातही खाजगी व सार्वजनिक स्वरुपाची धूसफूस नेहमी होत असे पत्रातील नेहमीचे लिखाण वारेमाप स्तुतीने अगर विरोधी पक्षावरच्या बेफाट टीकेने भरलेले असे. समाजाला सुसंस्कृत, नैतिक आणि सत्यवादी व चरित्रवान करण्याच्या हेतूसंबंधी सदर पत्रात क्वचितच लिखाण होत असे. लिखाणाचा दर्जाही सुमार योग्यतेचा असे आणि सर्वात वाईट म्हणजे समाजात जे हौशी व चांगल्यापैकी लिखाण करणारे होते, त्यांचे लेख सदर पत्रात दिले जात नसत. व्यवस्था मंडळात अनेक वेळा फेरबदल होत असत. या व इतर कारणांमुळे जनता पत्राला उच्च दर्जा व खपाचा उच्चांक हे गाठता आले नाहीत. सदर पत्राच्या आर्थिक परिस्थितीमुळे पत्र बंद करण्याची पाळी आली आहे, असा इशारा लोकांना व वर्गणीदारांना बाबासाहेबांनी सदर पत्राच्या १७-५-४१ च्या अंकात (पा. १) आपल्या सहीने दिला होता तो असा—

**"वाचकांना विनंति"**

गेल्याच्या मागील अंकात **जनता** पत्र कदाचित बंद करावे लागेल, अशी सूचना वाचकांस देण्यास आली होती. या सुचनेरूप बरेचसे वाचक दुःखित झाल्याचे

माझ्या नजरेस आले आहे. कित्येकांनी तर प्रत्यक्ष येऊन कोणत्याही स्थितीत **जनता** पत्र बंद करू नये, अशी गळ घातली. **जनता** पत्र बंद करण्याची माझी केव्हाच इच्छा नव्हती. अत्यंत अडीअडचणीचे प्रसंग आले असतानादेखील हे पत्र मी तसेच चालू ठेवलेले आहे. माझ्या या पत्राप्रमाणेच ब्राह्मणेतर चळवळीची अनेक वर्तमानपत्रे एकेकाळी अस्तित्वात होती. त्यांना राजाश्रय होता. वर्गणीदारांची संख्या पुष्कळ होती. थोडेबहुत जाहिरातीचेही उत्पन्न होते. मी चालविलेल्या वर्तमानपत्रांना यापैकी एकदेखील उत्पन्नाचे साधन मला हव्या तितक्या प्रमाणात उपलब्ध नव्हते. असे असतानाही हे पत्र मी चालू ठेवले. याचे कारण हे पत्र म्हणजे अस्पृशांच्या चळवळीला जिवंत ठेवण्यास एक संजीवनी आहे, अशी माझी ठाम समजूत आहे. बंद करण्याची कल्पना हल्लीच्या बिकट परिस्थितीमुळे मनात आणावी लागली. पण ती असह्यच होती. जनतेच्या वाचकांनाही ही कल्पना असह्य वाटावी ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. कारण त्यावरून **जनते**वरती त्यांचे किती प्रेम आहे, हे दिसून येते. पण या सर्व प्रेमळ वाचकांना अशी सूचना आहे की, जनतेवर नुसते प्रेम दाखवून तिला जगविणे शक्य होणार नाही. तिच्याकरिता सर्वांनी झीज सोसणे आवश्यक आहे. इतर पत्रकर्त्यांनी आपली तूट भरून काढण्याकरिता वर्तमानपत्रांची किंमत वाढविली आहे. जनतेची किंमत वाढविणे लोकांच्या दारिद्र्यामुळे शक्य नाही व शक्य असले तरी इष्ट नाही. जनतेला या संकटातून तारण्याला दुसराच काही उपाय योजणे आवश्यक आहे. माझ्या मते दोन गोष्टी करता येण्यासारख्या आहेत. जनतेच्या वर्गणीदारांची संख्या वाढविता येईल व दुसरी जनतेला जास्त देणगी मिळविता येईल. गेल्या वर्षी जेव्हा जनतेतर्फे मदतीची याचना करण्यात आली होती त्यावेळी पुष्कळांनी मदत केली, ही गोष्ट मला कबूल करणे प्राप्त आहे. तशीच मदत लोक चालू ठेवतील तर हे पत्र चालू ठेवण्याची जबाबदारी मी पार पाडीन, असे आश्वासन मी देऊ इच्छितो. तरी सर्वांनी जनतेसंबंधी आपले कर्तव्यकर्म करण्यास विसरू नये, अशी माझी सर्वांस विनंति आहे.

-- भिमराव रामजी आंबेडकर

राजकीय पेच सोडविण्यासाठीं काय उपाययोजना करावी, याबद्दल मुंबईत जी काँग्रेसेतर पुढाऱ्यांची सभा भरली होती, तिची दुसरी बैठक लखनौ किंवा पुणे येथे भरविण्याची खटपट सर जगदीश प्रसाद, सर तेज बहादर सप्रू, इत्यादि प्रयत्न करीत होते. पहिल्या बैठकीस जे लोक उपस्थित होते त्यांना सप्रूंनी पत्रे पाठविली. ते एकाएकी आजारी झाले, आणि काश्मिरला हवा पालटण्यास गेले. तेथून (Guest House No. 5, Shrinagar) त्यांनी ६–६–४१ ला बाबासाहेबांना मुंबईच्या पत्त्यावर पत्र पाठवून दुसऱ्या बैठकीस उपस्थित राहण्याची विनंती केली. आपणास या बैठकीस उपस्थित राहणे अवघड वाटत असेल तर मी आपणास या बाबतीत आग्रह करीत नाही, असेही मत सप्रूंनी पत्रात प्रदर्शित केले होते.

(of course I do not wish you go out of your way to attend the conference if you have any kind of hesitation in doing so).

राजकीय पेचप्रसंग जास्त बिकट करण्यासाठी जो उपाय सरकार करीत होते त्यापैकी जातीय दंगे घडवून आणणे व त्यात कधी एका जातीला तर कधी दुसऱ्या जातीला हाती धरणे हा एक उपाय होता. त्यांचा मासला अहमदाबादेतील हिंदु-मुसलमान दंग्याच्या वेळी दिसून आला.

वर्तुळ परिषदेतून जी राजकीय घटना भारतासाठी तयार होत होती ती राष्ट्रीय मनोवृत्तीच्या राजकीय कार्यकर्त्यांना मान्य नव्हती. तेव्हा ह्या घटनेऐवजी सर्वसंमत घटना तयार करण्यासाठी भारतीयांनी निवडलेली 'घटना परिषद' उत्पन्न करणे जरूर आहे, ही कल्पना १९३४ च्या सुरवातीसच राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या मनात रुजत चालली होती. या कल्पनेला चालना देण्यासाठी गांधीजींनी ७ एप्रिल १९३४ ला असे जाहीर केले की, या पुढे सविनय कायदेभंगाची चळवळ स्थगित करावी. पूर्वी जी स्वराज्य पार्टी राजकीय मतप्रणाली मांडण्यात भाग घेत होती, त्या पार्टीने हे कार्य यापुढे करावे असेही गांधीजींनी सुचविले, तेव्हा 'न्यू स्वराज्य' पार्टी २ व ३ मे १९३४ च्या बैठकीत उत्पन्न करण्यात आली. त्यातील एक कार्य हे होते की, भारतातील सर्व समाजांनी व राजकीय पक्षांनी एकत्र यावे आणि भारतीय घटना तयार• करण्यासाठी परिषद उत्पन्न करावी. त्यात सर्व समाजाचे व पक्षांचे प्रतिनिधी निवडले जावेत व त्यांनी ही घटना सहकार्याने निर्माण करावी. घटना परिषदेची रीतसर मागणी ही अशी प्रथमच करण्यात आली. या पूर्वी (१९२८ च्या सुमारास) मानवेंद्रनाथ रॉय यांनी भारताची राजकीय घटना भारतीयांनीच तयार केली पाहिजे असा विचार देशापुढे मांडला होता परंतु त्याला फारसा पाठिंबा मिळाला नाही. १९३० च्या बंडाळीमुळे बाकीचे सर्व राजकीय विचार बाजूला पडले आणि लोक काँग्रेसचेच विचार मानू लागले, त्यामुळे घटना परिषदेची मागणी तेव्हां काँग्रेस पक्षाला महत्त्वाची वाटली नाही. ह्या पक्षाचे सर्व लक्ष, संपूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याकडेच केंद्रित झालेले होते. (The Indian Constituent Assembly by Principal Gurumukh Nihal Singh — P. 2-5). काँग्रेसने या कल्पनेशी बराच काळ लपंडाव चालविला, आणि शेवटी १९३९ नोव्हेंबर-मध्ये वर्किंग कमिटीने घटना परिषदेची मागणी केली. ही परिषद सज्ञान मतदारांच्या मतावर उत्पन्न करण्यात येईल आणि ती जी घटना तयार करील तीच देशाची घटना होईल, इतर कोणतीही घटना देशाची घटना होणार नाही, असा कमिटीने ठराव केला. (कित्ता, पा. ६–७).

इंग्लंडचे मुख्य प्रधान व अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांनी १४ ऑगस्ट १९४१ ला आठ कलमी घोषणा जाहिर केली ती 'अटलांटिक चार्टर' या नावाने प्रसिद्ध आहे.

सर्व देशातील लोकांना स्वतःचे सरकार निर्माण करण्याचा हक्क आहे, आणि त्यांना परक्याचे दास्यत्व झुगारून देण्याचाही हक्क आहे, अशा अर्थाचे तिसरे कलम होते. या कलमाप्रमाणे सर स्टॅफर्ड क्रिप्सने २३ मार्च १९४२ ला राजकीय योजना भारतासाठी आणली, तीत घटना परिषदेला मान्यता दिली. या परिषदेत कोणत्या पक्षाचे व जातीचे किती सभासद असावेत, याबद्दल क्रिप्स योजनेत जे नमूद केले होते ते कोणालाही मान्य नव्हते. सप्रू व त्यांचे सहकारी यांनी तडजोड म्हणून जे पर्याय सुचविले होते, त्यात सप्रू कमिटीने (अपक्ष परिषद भरवून तिने जी कन्सिलिएशन कमिटी नेमली होती तिने) असे सुचविले होते की, १६० पैकी ५१ मुसलमान, ५१ सवर्ण हिंदु, २० अस्पृश्य, १६ खास रक्षित लोक, ८ शीख, ७ हिंदी ख्रिस्ती, ३ गिरिजन २ ॲंग्लो इंडियन, १ युरोपियन आणि १ पार्शी असावा, पण या पर्यायाला महत्त्व मिळाले नाही. (कित्ता ७–२४)

श्री. देवीदासराव नामदेवराव कांबळे (निजामस्टेट) या मातंग समाजसेवक विद्यार्थ्याने बाबासाहेबांना पत्र पाठवून अनेक प्रश्न उपस्थित केले होते. त्यातील प्रमुख प्रश्न हा होता की, बाबासाहेब हे फक्त महार लोकांसाठीच सामाजिक कार्य करीत असतात व ते फक्त महार लोकांनाच जवळ करीत असतात. त्यांनी हे धोरण सोडून द्यावे आणि अस्पृश्य समाजातील सर्व जमातीसाठी कार्ये करावीत व त्यांच्यांतील समाजसेवकांना जवळ करावे. या पत्रांतील मुद्यांना बाबासाहेबांनी उत्तरे दिली. त्या उत्तरात त्यांच्या अर्धवट दुःखित भावनांचे आणि अर्धवट संतापजनक उद्वेगाचे प्रतिबिंब पहावयास मिळतेच पण त्यांचा महारेतर जातीतील समाजसेवकांकडे पहाण्याचा दृष्टीकोन कसा व तसा का होता याचेही चित्र पहावयास मिळते. एरवी भावनांच्या आहारी न जाणारे बाबासाहेब त्यांच्या भावनांना उचंबळून वर आणणारे अनपेक्षित प्रसंग उद्भवले आणि विशेषतः ते प्रसंग एखाद्याच्या आगाऊपणामुळे उद्भवले तर ते आपल्या भावना मोकाट, स्वैर शब्दांत व्यक्त न करता वक्रोक्ति, व्याजोक्ति, उपहास वगैरे साहित्यिक अलंकारांच्या द्वारे सुंदर पण जोरदार शब्दांत व्यक्त करीत असत, याचा त्यांचे हे उत्तर एक उत्कृष्ट नमुना आहे. श्री. कांबळे यांचे हे पत्र १४–६ ४१ च्या जनतेत (पा–५) छापलेले होते व बाबासाहेबांचे उत्तर अग्रलेख म्हणून त्याच अंकात छापले होते. ते पत्र व त्याला दिलेले उत्तर मी खाली देत आहे.

## दे. ना. कांबळे (मातंग) यांचे पत्र

ॐ

पाथ्री : ३०–५–४१

परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांस देवीदास बुवा पाथ्रीकर याचा सादर प्रणाम वि. वि. लिहिण्यास कारण की, आपणांस पत्र पाठवून पूर्ण खुलासा करून घेण्याचा, माझ्या मनात बऱ्याच दिवसांपासून विचार आहे. याबद्दलचा सोक्षमोक्ष तो काय आताच

करून घ्यावा व मनातील खुडखुडी काढून टाकावी असे वाटले म्हणून आपणास हे पत्र पाठवीत आहे. हे पूर्ण वाचून विचार करून आपले खरे उत्तर देणे. जर पत्राचे उत्तर आले नाही तर आपण विलायतेस जाताना १७ पानांचे पत्र गांधीस पाठविले होते, पण गांधीने अधिकाराच्या मदाने, अहंकाराने किंवा तुच्छतेने आपणास निष्काळजीपणाने उत्तर दिले नाही, त्यावेळी आपणास जसे वाईट वाटले व गांधीबद्दल आपणास जसा तिरस्कार उत्पन्न झाला त्यापेक्षाही हजारपट तिरस्कार मला आपणाबद्दल उत्पन्न होईल.

मी निजाम इलाख्यातील मराठवाडा भागातील मातंग समाजातील शिकलेला पहिला विद्यार्थी असून मातंग समाजातील सुधारणेची सर्वस्वी जबाबदारी माझ्या शिरावर आहे. मी आपणास सामान्य विद्यार्थी या नात्याने पत्र पाठवीत नसून निजाम स्टेटच्या मातंग समाजाचा भावी पुढारी म्हणून पत्र पाठवित आहे. म्हणून आपण उत्तर देण्यास अनमान करू नये.

मातंग समाज व महार समाज यांमध्ये देव–दानवासारखे हाडवैर आहे व आपसात वैर, तिरस्कार, द्वेष, मत्सर आणि वाईट भावना आहेत त्याची कारणे —

(१) महार समाज मातंग समाजास तुच्छ व हलका समजतो. (२) मातंग समाज डुकरास पवित्र मानतो व ते जनावर शूर व मर्द असल्यामुळे त्याची (रानडुकर) शिकार करतो, पण महार समाज मुसलमानांपेक्षाहि डुकरास अपवित्र समजतो. ह्या व इतर क्षुल्लक कारणावरून आपसात विनाकारण झगडे होतात. (३) मातंग समाजास मराठ्याप्रमाणे सर्व सण व लग्नसमारंभ व मिरवणुकी काढण्याचा हिंदु धर्मशास्त्रदृष्ट्या अधिकार आहे, म्हणून ज्यावेळी मातंग लोकांचा नवरदेव गांवामधून घोड्यावरून मारुतीला परण्यास जातो त्यावेळी महार लोक वेशीमध्ये अडवतात व पंचारतीमध्ये थुंकतात. यामुळे भयंकर मारामारी होऊन डोकी फुटतात व वैरभाव वाढतो. (४) कोणतीहि सुधारणेची गोष्ट मांग लोक करीत असता महार लोक ती करू देत नाहीत, व ती हाणून पाडण्याचा कसून विरोध करतात म्हणून मांग व महार यांचे वाकडे आहे. (५) लोकसंख्येच्या मानाने महार लोकांची संख्या जास्त असल्यामुळे प्रत्येक गांवी महारांची जास्त आबादी आहे व मांगांची कमी आहे. जर लोक महारांच्या मनाप्रमाणे न वागले तर महार लोक विनाकारण त्रास देतात व त्यांना वाटते की, ज्याप्रमाणे हिंदु लोकांची गुलामगिरी अस्पृश्य समाज करतो, त्याप्रमाणे मातंग समाजाने महार समाजाची गुलामगिरी करावी. (६) अस्पृश्य समाजात शिकलेले व पुढे गेलेले महार लोक आहेत, हे स्वार्थी व आपमतलबी असून इतर समाजातील लोकांस पुढे जाण्यास व सुधारण्यास वाव देत नाहीत. याची साक्ष जितक्या बोर्डिंगस आहेत त्यात महार विद्यार्थ्यांचाच भरणा जास्त आहे. जितके एम.एल.ए. आहेत ह्यात महार मेंबरांचाच भरणा जास्त आहे. फक्त नावाकरिता काही ठिकाणी कळसूत्री बाहुल्यांसारखे मांग मेंबर निवडले असून ते बिनबुडाच्या भांड्याप्रमाणे आहेत. (७) आपणाबद्दल

मातंग समाजात असा गैरसमज उत्पन्न झाला आहे की, आपण स्वतः महार समाजाच्या कल्याणाची जास्त काळजी घेता, दुसऱ्या समाजाची तितकी घेत नाही. म्हणून मातंग परिषद मध्यप्रांताने आंबेडकर फक्त महार समाजाचे पुढारी आहेत, मातंग समाजाचे नाहीत असा ठराव पास केला. (८) आपली वृत्ति जो प्रथम येऊन (शिकायत) करील त्याचीच बाजू न्यायाची आहे अशी मानणारी असल्यामुळे प्रथम महार समाजातील लोक आपल्याकडे येतात व आपण त्यांची बाजू उचलून धरता म्हणून इतर समाजास पक्षपाती आहात असे भासते व आपण महार समाजाचे हितचिंतक आहात असे वाटते.

जर आपणास अस्पृश्य समाजाचे खरे कल्याण करावयाचे असेल व महार व मातंग समाज यांची एकी करून सांगड घालून नवा मार्ग आखावयाचा असेल तर खालील शर्तीवर विशेष लक्ष घालणे व त्याप्रमाणे मनःपूर्वक लक्ष देऊन कार्य करणे, कारण महार समाज आपणास देवतुल्य मानतो व आपला शब्द प्राणाचे पण लावून पूर्ण करण्याचा कसून प्रयत्न करतो.

माझ्या मताने ज्याप्रमाणे नॉर्मन (Norman) आणि सॅक्सन (Saxon) यांच्या मिश्रणाने रिचर्ड लायन हार्ट यांच्या कारकीर्दीत या परस्परविरुद्ध जातीच्या संमेलनाने अर्वाचीन धैर्यशाली, वीर्यशाली व सुधारलेली इंग्रज जात निर्माण झाली त्याप्रमाणे करावी की, जिचे नाव ऐकताच सर्व जातीवर व समाजावर दरारा बसावा जिचा धर्म व कर्म इतराहून भिन्न असावा, यासाठी आपण खालील गोष्टीकडे लक्ष द्यावे.

[(१) हा मुद्दा गाळलेला दिसतो.] (२) मातंग समाजास महार समाजाने बरोबरीच्या व समानतेच्या नात्याने व बंधुभावाने वागवावे. (३) मातंग समाजातील होतकरू मनुष्याला पुढे येण्यास वाव द्यावा. (४) मातंग लोकांचा नवरदेव वेशीमध्ये अडवू नये व समारंभ व मिरवणुकी यामध्ये अडथळेच आणू नयेत. (५) महार समाजाने मातंग लोकाकडून कोणत्याही प्रकारचे वतनदारी संबंधीचे हक्क घेऊ नयेत (जसे महार लोक हिंदु समाजाकडून घेत असत). (६) आपण महार समाजाच्या सुधारणेची जशी काळजी घेतात तशीच किंबहुना त्यापेक्षाही जास्त कळकळ मातंग समाजाबद्दल घेणे. कारण, आपण महार समाजामध्ये जन्मला असल्यामुळे आपणावर जातीयतेचा आरोप येतो, व म्हणूनच आपण महाराचेच हितचिंतक आहात अशी कोल्हेकुई होते. (७) डुकराबद्दल महारांच्या मनात तिरस्कार व इतर क्षुल्लक कारणावरून झगडे, द्वेषभाव निर्माण करणारी जी साधने आहेत ती मिटविण्याची व आपापसात प्रेम व बंधुभाव निर्माण करणाऱ्या साधनांची योजना करणे. (८) श्रद्धेने व अज्ञानाने महार समाज आपणास ईश्वरी अवतार मानून आपल्या फोटोचे पूजन करतात व आपणाशिवाय दुसरा कोणी होणारच नाही असा बुद्धीमंतास वाव न देणारा समज करून घेतात, तो मला पसंत नाही व हे अंधश्रद्धेचे व भोळेपणाचे अनुकरण मी मातंग समाजास करू देणार नाही.

जर या सर्व अटी मान्य असतील व आपणास अखिल भारतीय अस्पृश्य समाजाचे पुढारीपण करावयाचे असेल तर मी आपला शिष्य होण्यास तयार आहे. आपल्या व्याख्यानावरून मी गेल्यावर कसे होईल ही काळजी वाटत आहे ती आपल्या कृपेने मी दूर करीन व आपल्या मनाप्रमाणे कार्य करून दाखवीन म्हणून उत्तर पूर्ण विचार करून आपल्या स्वाक्षराने देणे. मी १५ दिवस वाट पाहीन. उत्तर न आले तर मी असे समजेन की, आपला मार्ग निराळा व माझा मार्ग निराळा. म्हणून अवमान न करता आपले मत, विचार सविस्तर पत्र पाठवून खुलासा करणे कारण अजुन एक महिन्यानंतर हैद्राबाद दलितवर्ग परिषद हैद्राबादी आंबेडकर बी. एस. व्यंकटराव यांच्या अध्यक्षतेखाली भरणार आहे. व मी मातंग समाजाचा प्रतिनिधी या नात्याने जाणार आहे. म्हणून लवकरच महार व मांग यांच्या भावी जीवनाबद्दल खुलासा करणे किंवा एकदम वेगवेगळे गट करणे. पण असे अर्धवट इकडे ना तिकडे, कच्चे ना पक्के ठेवू नये, कळावे.

आपला कृपाभिलाषी

देवीदासराव नामदेवराव कांबळे

ता. पाथ्री, मैहलामाळी वाडा, जि. परभणी (निजामस्टेट)

नोट : पूर्ण पत्र वाचणे व पूर्ण विचार करून अनमान न करता उत्तर देणे. मी आतुरतेने वाट पाहात आहे. उत्तर संक्षिप्त देऊ नका. सविस्तर देणे. नाहीतर तुमचा आमचा मार्ग भिन्न.

सदर पत्रास बाबासाहेबांचे उत्तर —

## " एका मातंग गृहस्थाच्या पत्रास उत्तर "

रा. रा. देवीदासराव नामदेवराव कांबळे यांस अनेक ——, आपणास काय मायना लिहावा याबद्दल मी बुचकळ्यात पडलो आहे. नमस्कार म्हणावा तर आपण दोघेही ब्राह्मण नाही, जोहार म्हणावा तर आपण मांग, फूरमान म्हणावे, तर मी महार, आशीर्वाद म्हणावा, तर मांगाला आशीर्वाद देणारा महार श्रेष्ठ कोण असा अपवाद यायचा, म्हणून काहीच न लिहिता चांगदेवासारखी कोरी जागा ठेवून, आपल्या पत्राचे उत्तर देत आहे. महार समाज व महार पुढारी मातंग जातीवर अन्याय करीत आहेत त्याबद्दल आपले मनातील "खुडखुडी" (मला वाटते, खुमखुमी या मराठी शब्दाचा हा निजामशाही अपभ्रंश असावा) काढून टाकण्याकरिता व एकदाचा "सोक्षमोक्ष करून घेण्याकरिता पत्र लिहिण्याचे योजिले. यात आपण कांहीच वावगे केले नाही. आपण मला 'परमपूज्य' या शब्दसमुच्चयाने संबोधिले आहे, त्याबद्दल मी आपला फारच ऋणी आहे. महार लोक नेहमीच 'परमपूज्य' हे विशेषण लावून मला संबोधितात. पण त्यात विशेष असे काही नाही. महारांनी महाराची स्तुति केली, याला काय किंमत ! आपण मांग आणि मी महार असूनही आपण मला 'परमपूज्य

बाबासाहेब' म्हणालात यातले प्रेम आणि त्याचे स्वारस्य काही और आहे, इतके की, ते सांगता नये.

माझ्या पत्राचे उत्तर न दिल्यामुळे मी गांधींचा तिरस्कार करतो, हा आपला गैरसमज कोणी करून दिला, ते मला समजत नाही. गांधीचा मी तिरस्कार करीत असलो, तरी त्याची कारणे दुसरी आहेत. माझ्या पत्राला त्यांनी उत्तर दिले नाही हे नव्हे. मला आपल्याप्रमाणे अनेक लोक पत्र लिहितात. पण त्यांना कधी उत्तर देण्याचा क्रम मी ठेवलेला नाही. याबद्दल पुष्कळ लोकांस वाईट वाटते, पण ते त्यामुळे माझा तिरस्कार करीत नाहीत. त्यांना ठाऊक आहे की, मी रात्रंदिवस कामात असतो. मला छानशोक, ऐषआराम माहीत नाहीत, नाटक, सिनेमात मी वेळ घालवीत नाही. माझा धंदा, वाचन किंवा सार्वजनिक कार्य या व्यवसायांत मी सतत गुंतलो आहे. मला गांधीसारखे सेक्रेटरी नाहीत. माझे काम मलाच करावे लागते. हे जाणूनच पत्र लिहिणारे माझे मित्र, माझे सहकारी मला क्षमा करतात; माझा तिरस्कार करीत नाहीत. 'उत्तर न दिल्यास मी तुमचा तिरस्कार करीन' असे आपण जे म्हटले आहे, ते मनुष्य स्वभावास धरूनच आहे. आपली योग्यता काय आहे, हे मला माहित नाही. 'मी निजाम इलाख्यायधील मराठवाडा विभागातील मातंग समाजातील शिकलेला, सर्वात पहिला विद्यार्थी आहे,' असे आपले वर्णन आपण केले आहे. तिरस्कार करण्याची पाळी यावी हे वाईटच पण आपण केवळ विद्यार्थीच असता तर आपल्या तिरस्काराची फारशी मातब्बरी वाटली नसती. पण आपण बजावले आहे की, 'मातंग समाजाच्या सुधारणेची सर्वस्वी जबाबदारी माझ्या शिरावर आहे.' मी आपणास सामान्य विद्यार्थी या नात्याने पत्र पाठवीत नसून निजाम स्टेटच्या मातंग समाजाचा भावी पुढारी म्हणून पत्र पाठवीत आहे. म्हणून आपण उत्तर देण्यास अनमान करू नये." ज्यू लोकांमध्ये जसा **मोझेस** तसे मातंग समाजात आपण आहात. हे आपल्या भाषेवरून उघड आहे. आपल्या पत्राला कोण उत्तर देणार नाही! आपल्या मनात माझ्याविषयी तिरस्कार उत्पन्न झाला, तर सर्व मातंग समाज माझा तिरस्कार करू लागेल. तो टाळला नाही तर तो माझ्या अनर्थाला कारणीभूत होणार नाही, असे कोण म्हणेल? मला तरी म्हणता येणार नाही, तो टाळण्याकरिता माझा शिरस्ता मोडून मी आपल्या पत्राचे उत्तर देत आहे.

पहिल्या प्रथम दोन गोष्टीबद्दल आपले आभार मानल्याशिवाय माझ्याने राहवत नाही. महार लोक मला ईश्वरी अवतार मानून माझ्या फोटोचे पूजन करतात आणि माझ्याशिवाय दुसरा कोणी होणारच नाही असा समज करून घेतात, यावर आपण जो कटाक्ष ठेवला आहे तो स्तुत्य आहे. या अंधश्रद्धेचे व भोळेपणाचे अनुकरण मातंग समाजास करू न देण्याचा आपण जो निर्धार केला आहे, तो आपण कृतीत अणावा, अशी माझी आपणास आग्रहाची सूचना आहे. **विभूतिपूजा ही मानवाला कमीपणा आणणारी गोष्ट आहे. मी समतेचा मोठा भोक्ता, नव्हे पुरस्कर्ता**

आहे. मी देव नाही, महात्मा नाहीं, असे सांगून थकलो. पण त्याचा त्यांच्यावर काहीच परिणाम झालेला दिसत नाही. आपण मांग लोकांना माझ्या फोटोची पूजा करू देणार नाही, हे तर चांगलेच आहे. मांग लोकांची अवस, पुनव, ग्रहण मागण्यापेक्षा माझ्या फोटोचे पूजन करणे वाईट आहे, याबद्दल मला काही संदेह नाही, आपण आपली दृष्टी संकुचित केली आहे, याबद्दल मला वाईट वाटते. आपण महार लोकांतूनही हे माझ्या फोटोपूजनाचे खूळ नाहीसे करण्याचे व्रत पत्करले पाहिजे, असे आपल्याला सांगणे मला आवश्यक वाटते. हा आपला मोठाच पराक्रम होईल यात काही शंका नाही. कदाचित एवढा पराक्रम केल्यावर, मातंग समाज आपल्या फोटोची पूजा करू लागेल अशी आपल्याला भीती वाटत असेल, तरी भीती बाळगू नये. आपल्या फोटोची पूजा करण्याची प्रथा माझ्या फोटोची पूजा करण्याच्या प्रथेइतकी कधीच वाईट दुष्परिणामी होणार नाही.

दुसऱ्या एका अभिवचनासाठीही मी आपला आभारी आहे. मी मेल्यावर कसे होईल, अशी चिंता मी अनेक वेळा प्रसिद्ध केली आहे, हे खरे आहे. महारापैकी एकाही तरुणाला मला सांगावयाला हिंमत झाली नाही की, "काही हरकत नाही, तुम्ही मरा, आम्ही चालवू." आपले अभिवचन वाचून आमचे समाधान झाले. द्रोणाने कौरव पांडवांना धनुर्विद्या शिकविल्यानंतर "मला गुरुदक्षिणा कोण देईल?" असा प्रश्न केला. त्याला कोणीच उत्तर देईना. गुरु काय मागतो, कोण जाणे? प्राण मागतो की काय अशा भयाने सगळेच गप्प बसले. एकट्या अर्जुनाला धैर्य झाले. तो म्हणाला, "मागा काय मागावयाचे आहे ते, मी देतो." द्रोणाच्या ठायी मी व अर्जुनाच्या ठायी आपण आहात असे वाटून माझ्या मागून कोणीतरी आहे, या विश्वासाने मला शांति वाटते, द्रोणाने पण केला होता की, राजा द्रुपदाला शिष्याहाती धरून आणीन म्हणून तसे **ब्राह्मण्य नष्ट करणे** हा माझा पण आहे. तो माझ्या आयुष्यात माझ्या हातून पुरा होणे शक्य नाही. आपण तो पूरा करण्यास सिद्ध आहात, हे माझे मी मोठे भाग्य समजतो व त्याबद्दल मी आपले आभार मानतो. ही गोष्ट जर आपल्याला करता आली तर मांग जातीला इतिहासात मोठे स्थान प्राप्त होईल. नमनाला फारच तेल गेले! आता आपण केलेल्या आरोपांना उत्तर देण्याचा मी प्रयत्न करीत आहे. आपले आरोप दोन प्रकारचे आहेत. काही माझ्यावर व्यक्तिगत लागू असणारे असे आहेत. बाकीचे महार समाजाला लागू असे आहेत.

माझ्यावरचा प्रत्यक्ष आरोप काय आहे, हे मला अजूनही समजले नाही. मी फक्त महारांचाच पुढारी आहे, असा मध्यप्रांतातील मांग लोकांनी ठराव रूपाने केलेला माझ्यावरचा आरोप मी वृत्तपत्रांतून वाचला आहे. त्यांतील विधानासंबंधाने मी ता. ४ जानेवारी १९४१ च्या जनतेत लिहिले आहे ते आपण अवश्य वाचून पहावे. मी महारांचाच पुढारी ही कॉंग्रेसची ओरड, त्याचीच री मांगांनी ओढली. असे किती पोटार्थी मांग-महार आहेत की, जे पैशासाठी वाटेल ते करतील. 'पुणे करार' झाला,

त्यावेळी काँग्रेस मला 'सर्व हिंदुस्थानातील अस्पृश्यांचा पुढारी' म्हणून मान्य करीत असे. त्यानंतर मी नुसता मुंबई इलाख्यातील अस्पृश्य लोकांचा पुढारी आहे, असे म्हणू लागली, त्यानंतर नुसत्या महारांचा पुढारी आहे, असे म्हणू लागली. माझी खात्री आहे की, काही दिवसांनी मी कोकणस्थ महारांचाच पुढारी आहे व त्यानंतर मी दापोली तालुक्यातील महारांचा पुढारी, असा प्रचार काँग्रेस करील, व त्याला महारांतूनच माणसे सापडतील असे म्हणावयास हरकत नाही. कोणीही काँग्रेसला विरोध करून पहावा, म्हणजे मी म्हणतो त्याची सत्यता कळेल. चांभारांतील एखादा पुढारी काँग्रेसला विरोध करायला निघू द्या, म्हणजे हाच मासला दिसून येईल. तो दाभोळ्या जातीचा असला, तर तो चांभार जातीचा पुढारी नसून दाभोळ्या जातीचा पुढारी आहे, असे ते म्हणतील. हरळ्या जातीचा असला तर हरळ्यांचा पुढारी म्हणतील; आणि चेवल्यांच्या जातीचा असला तर चेवल्यांचा पुढारी म्हणतील. मांगामध्ये काही १२ पोटजाती आहेत, असे मला समजते. मांगामध्ये काँग्रेसला विरोध करणारा कोणी पुढारी निघाला तरी त्याचीदेखील तीच गत होणार. तो ज्या जातीचा, त्या जातीचा पुढारी, असा शिक्का झाल्याशिवाय रहाणार नाही. ही वस्तुस्थिति मला माहीत असल्यामुळे महारांचा पुढारी म्हटल्याने मला काही नवल वाटत नाही. शिवाय बाकीच्यांनी माझे पुढारीपण सोडले आणि नुसते महारांनी मानले, तर त्यात काही खेद करण्यासारखे आहे, असे मला वाटत नाही, कोठे तरी कार्य करण्यास संधी असल्यास पुरे. महारांची दुर्दशा काही कमी नाही. नुकत्याच महाराष्ट्र प्रांतिक हरिजन सेवक संघाने प्रसिद्ध केलेल्या रिपोर्टात "सर्वांत महारांची स्थिति अत्यंत हलाखीची आहे", असे कबूल केले आहे. त्यांची दुःस्थिति नाहीशी करण्याची मला संधी राहिली तरी पुरे आहे, असे मानून काम करण्याची माझी तयारी आहे. 'नामके वास्ते आणि कामके वास्ते' असे दोन प्रकारचे पुढारी आहेत. मी नामके वास्ते असलेल्या पुढाऱ्यातला नाही. मला काम पाहिजे.

मी पुढारी आहे, मी समाज सेवक नाही. पुढारी या नात्याने चालना देणे, लोकमत तयार करणे, येवढेच माझे काम आहे, त्यात मी जातीभेदाला जागा दिली, असे कोणीही – माझा शत्रूदेखील म्हणणार नाही. मी अस्पृश्य जातीतील सर्वांघरी जेवलो आहे. अस्पृश्यांत सहभोजन व्हावे, सहविवाह व्हावा याचा पुरस्कार मी केला आहे. आणि सहविवाह जरी जारी झाला नसला, तरी चांभार लोक सहभोजनाला तयार नाहीत, पण महारमांगात, महारभंग्यांत सरसहा सहभोजन सुरू आहे. हा माझ्या शिकवणुकीचा परिणाम आहे, असे मी निर्भयपणे म्हणू शकतो. माझ्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभांतून महारांपुरते ठराव कधीच पास झालेले नाहीत, मी महार जातीचे भांडण भांडलो नाही, आणि या भांडणांतून जो लाभ झाला त्यांतला मोठा भाग महारेतर जातींनी घेतला हेही सिद्ध करून देता येईल. मी जी बोर्डिंगे काढली त्यांत जातीभेद कधीच ठेवला नाही, इतर महारांनी जी काढली त्यांत त्यांनीही जातीभेद ठेवलेला माझ्या कानावर आलेला नाही.

स्वतंत्र मजूर पक्ष हा महारांचा पक्ष आहे, असे म्हणण्यात येते. परंतु ते खोटे आहे, स्वतंत्र मजूर पक्षात महार – महारेतर असा भेद नाही. स्वतंत्र मजूर पक्ष जात पहात नाही, गुण पाहतो. गुणाला उतरला तर त्याला त्याच्या लायकीची जागा स्वतंत्र मजूर पक्षात मिळू शकते. राजकारण हे काही पंक्तीभोजन नव्हे. मांग कोणी नाही म्हणून मांग घ्या, भंगी कोणी नाही म्हणून भंगी घ्या, असा नियम स्वतंत्र मजूर पक्ष मानीत नाही. कोणताही राजकीय पक्ष मानू शकणार नाही. नुसत्या शिक्षणाला राजकारणात काही महत्त्व नाही. "मी ग्रॅज्युएट आहे, मला कौन्सिलात घ्या", हा नियम स्वतंत्र मजूर पक्षाला कबूल नाही, कोणाही राजकीय पक्षाला तो नियम मान्य होऊ शकणार नाही. राजकारणात शिक्षण पाहिजे पण शिक्षणापेक्षा शीलाची जास्त जरूरी आहे. स्वतंत्र मजूर पक्ष जात, शिक्षण, शील या तिन्ही गोष्टी पाहून कौन्सिलचे उमेदवार ठरवतो. अस्पृश्यांचे भांडण भांडण्याकरिता स्वतंत्र मजूर पक्ष उभा केला आहे, त्यात एखाद्या मांगाला जागा मिळाली नसेल. तशी अस्पृश्यांतील नाशिक जिल्ह्यातील एक सधन व कार्यकर्त्या अमृतराव रणखांब्यासारख्या माणसाला व सातारा जिल्ह्यातील एका सधन गृहस्थाच्या मुलांस स्वतंत्र मजूर पक्षात जागा मिळाली नाही. यावरून स्वतंत्र मजूर पक्ष मांगांच्या व चांभारांच्या विरुद्ध आहे, असे म्हणण्यात काही अर्थ नाही. स्वतंत्र मजूर पक्ष नालायकांच्या विरुद्ध आहे, मग ते कोणत्याही जातीचे असोत. मांग–चांभार स्वतंत्र मजूर पक्षात नसले म्हणून मांग जातीचे किंवा चांभार जातीचे काही नुकसान झाले आहे, असे मला दिसत नाही. स्वतंत्र मजूर पक्ष महारांचा असला तरी तो महारांकरता भांडत नाही, तो भांडतो साऱ्या अस्पृश्यांकरता, भांडणामुळे जो लाभ होतो, त्याचे वाटप करणे हे त्यांच्या हाती नाही, ते हाती आहे काँग्रेसच्या, महारांच्या पदरात शून्य, असे वाटप जर काँग्रेसने केले नाही, **तर ती काँग्रेस कसली!** स्वतंत्र मजूर पक्षाने हानि केली असेल ती महारांचीच. आपण, महार लोक मांगावर जुलुम करतात असे लिहिले आहे. तो प्रकार आमच्याकडे नाही, आमच्याकडे उलट प्रकार आहे. चांभारांनी, मांगानी काही खोडी काढली तरी महार-गप्प असतात. त्यांना ठाऊक आहे की, मी या बाबतीत त्यांचा पक्ष घेणार नाही. आणि आपण बहुसंख्याक आहोत तेव्हा सोसले पाहिजे; अशी जबाबदारी त्यांना वाटते. आपल्याकडे उलट प्रकार आहे, याबद्दल खेद वाटतो महारांविरुद्ध निजाम सरकारकडे दाद मागावी अगर आपण सत्याग्रह करावा. त्याला माझा पाठिंबा राहील.

शेवटी येंव करा, त्येंव करा नाहीतर तुमचे मार्ग भिन्न अशी आपण जी निकराची भाषा वापरली आहे, तिच्यासंबधी दोन शब्द लिहिणे आवश्यक आहे. अशी भाषा आपण वापरली नसती तर बरे झाले असते. गोवेकरीण जशी वाटेल तेंव्हा अडते, किंवा बेगुमान झालेली बायको उल्या, पुल्या करून, 'घे मेल्या तुझे मंगळसूत्र' (असे म्हणून) तोडावयास तयार होते मग कंटाळून 'जाव जहन्नममे' अशी म्हणण्याची पाळी (नवऱ्यावर) येते, तसा प्रकार होऊ देणे बरे नाही. भिन्न मार्गाने जावयाचे असेल तर

जावे, त्याला मी हरकत करू शकणार नाही, किंवा त्याबद्दल मी काही उदास होऊन मला जे करावयाचे ते बंदही करणार नाही. मात्र भिन्न मार्ग कोणता याचा विचार करून मग तो पत्करावा, मांगांची उन्नति करून त्यांचा स्वाभिमान जागृत करणे, हा या भिन्न मार्गाचा उद्देश असेल तर तो स्तुत्य आहे. पण महारांशी काडीमोड करून, केवळ सनातनी हिंदु किंवा कॉंग्रेस यांची गुलामगिरी करणे, हाच जर या भिन्न मार्गाचा उद्देश असेल, तर त्यांत काही मांग व्यक्तींचा लाभ होईल. पण त्यात मांग जातीचा अनर्थ आहे, यात मला तरी काही शंका नाही, तरी मर्जीनुसार मार्ग चोखळणे. पत्र बरेच लांबले, पण आपण उत्तर सविस्तर आले पाहिजे, असे फर्माविल्यामुळे संक्षिप्त लिहिता आले नाही.

आपला कृपाभिलाषी,

ता. १३–६–४१ (सही) **भीमराव रामजी आंबेडकर**

अस्पृश्य समाजातील मांग, चांभार वगैरे इतर जातींना बाबासाहेब आपल्या चळवळीत एकत्र आणू शकले नाहींत याची जी कारणे होती त्यापैकी त्यांचा स्वभाव-विशेष हे एक कारण होते. ते त्यांच्या, वरील उत्तरात दिग्दर्शित झालेले वाचकांच्या लक्षांत आलेले असेलच.

८–८–४० ला व्हाईसरॉय साहेबांनी जे राजकीय वक्तव्य केले, त्यांत असे आश्वासन दिले होते कीं, हिंदुस्थानच्या राजकीय स्वरूपाच्या ज्या नवीन घटना तयार करण्यात येतील त्यांत अस्पृश्यांना वाटा देण्यांत येईल. हिंदी लोकांचे प्रतिनिधी घेऊन व्हाईसरॉयचे कार्यकारी मंडळ वाढविण्याचे १९४१ च्या जुलैमध्ये घोषित करण्यात आले. या वाढत्या कार्यकारी मंडळांत मुसलमान, हिंदु, पारशी, ख्रिस्ती, शीख, इत्यादि जातींचे प्रतिनिधी घेण्याचे जाहीर करण्यात आले. तेव्हां अस्पृश्यांच्या प्रतिनिधीबद्दल उल्लेख त्यात करण्यात आला नाही. अस्पृश्य वर्गावर हा अन्याय होत आहे व त्याचे निराकरण झाले पाहिजे, असा प्रचार बाबासाहेबांनी सुरू केला. ठिकठिकाणी भरलेल्या सभांमधून या बाबतींत जे ठराव मंजूर करण्यात आले ते मुंबई सरकार व भारत सरकार यांच्याकडे पाठविण्यात आले. या बाबतींत बाबासाहेबांनी भारत मंत्र्यांना पाठविलेली तार अशी—

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भारत मंत्र्यास तार

व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळामध्ये अस्पृश्यवर्गातील एकही सभासद घेण्यात आलेला नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ता. ३१ जुलै १९४१ रोजी भारतमंत्री (कर्नल अमेरी यांना तार पाठविली आहे).

"सहा कोटी अस्पृश्यांचा उपहास करणे व मुसलमानांना ४३ टक्के (जवळ जवळ हिंदुंच्या इतके) प्रतिनिधित्व देणे हे तुमचे करणे आश्चर्यकारकच आहे. यावरून ब्रिटिश सरकारने स्वतःला काही विशिष्ट जातींजवळ गहाण ठेवून घेतले आहे; असे

दिसते. हिंदुस्थानात अस्पृश्य वर्ग हा एक महत्त्वाचा व निराळा घटक आहे असे ब्रिटिश सरकारने विधियुक्त मान्य केले असताही, आणि हिंदी राजकीय घटनेत बदल करतेवेळी अस्पृश्य समाजाची संमति घेणे आवश्यक आहे, असे वेळोवेळी ब्रिटिश सरकारने जाहीर केले असताही व त्याचप्रमाणे अस्पृश्य समाजाचे युद्धाच्या बाबतीत सहकार्य मिळाले असताही, ज्या अर्थी व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात अस्पृशांचा एकही प्रतिनिधी सरकारकडून घेण्यात आला नाही, त्या अर्थी ब्रिटिश सरकारने अस्पृश्य समाजाचा विश्वासघात केला हे स्पष्ट आहे.

अस्पृश्य समाजाच्या हितार्थ व त्याच्या वतीने मी विरोध दर्शवितो. व्यक्तिशः मी ब्रिटिश सरकारच्या मदतीची कधी याचना केलेली नाही, किंवा त्या मदतीवर अवलंबून राहिलेलो नाही, आणि पुढेदेखील मी सरकारच्या मदतीशिवाय माझे कार्य करीत राहीन. कोणाचीही निवड करणे हे तुमच्या हाती आहे. मला जो न्याय पाहिजे तो अस्पृश्य समाजाकरिता पाहिजे. म्हणून मी तुम्हाला असा इशारा देतो की, अस्पृश्य समाज, व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळातील प्रतिनिधित्वावर तिलांजली सोडण्यास तयार नाही. अस्पृश्यांचे प्रतिनिधित्व मान्य करा असे मी परत एकदा निक्षून सांगतो. एक प्रतिनिधित्व जादा घेतल्याने काही बिघाड होईल, असे नाही.

(जनता २–८–४१ पान ३)

मुंबई राजकीय परिषदेचे चिटणीस कुनवर सर जगदीश प्रसाद, के. सी. एस. आय., चार्लटन कॉटेज, नैनीताल हे झाले, व व्हाईस प्रेसिडेंट पंडीत कुंझरू व बॅ. जयकर हे झाले. हे पदाधिकारी नेमण्याचा अधिकार सप्रूंना देण्यात आला होता. सर जगदीश प्रसाद यांच्या १२–९–४१ च्या पत्राला उत्तर सप्रूंनी १४–९–४१ ला दिले. त्यात असा उल्लेख होता को, फजलूल हक्क यांनीं लीगच्या चिटणीसाला पत्र पाठवून जो खुलासा केला तो हे दर्शवितो की, लीगबद्दल मुसलमानांची मने त्रिथरत चालली होती. जीनांच्या हुकुमशाही स्वभावाविरुद्ध मुसलमान लौकरच बंड उभारण्याची शक्यता आहे, असे मत सप्रूंनी प्रदर्शित केले. ("....At any rate, it shows that a spirit of revolt against Jinnah's autocracy cannot be ruled out altogether as a possibility of future").

## लीनलिथगो

ज्या लिनलिथगोला अहमदाबादच्या एका प्रख्यात वैष्णव मंदिरात चांदीच्या चौरंगावर बसविण्यात आले, ज्या लिनलिथगोच्या कारकिर्दीत हजारो लोक गोळीबारात ठार झाले, चिरडाचिरडी झाली. बंगालमध्ये लाखो लोक दुष्काळामध्ये किडयामुंगीप्रमाने मेले. ज्याच्या कारकीर्दीत महात्माजींची उपवासात नाडी सुटली होती, आणि बरेवाईट झाले असते तर त्यासाठी ज्याने चंदन आणून ठेवले, व तीन दिवस देशाला ती बातमी कळू नये म्हणून, बंदोबस्त केला होता, परंतु ती बातमी आलीच तर हिंदुस्थानला

तत्काळ कळावी म्हणून अश्रु ढाळीत, ज्याच्या कारकीर्दीत जयप्रकाश बुलेटीन लिहून ठेवीत होते, असा तो लिनलिथगो! परंतु त्याला आमच्या मंदिरात चांदीच्या चौरंगावर बसविण्यात आले! त्याच्यावर चौऱ्या वारण्यात आल्या, त्यांनी खावांचे, देवांचे फोटो घेतले. परंतु भक्तीभावाने येणारा हरिजन! त्याला तेथे मज्जाव! हा का धर्म?"

स्वीडन, इटली व स्पेन वगळून जो युरोप खंडाचा भाग राहतो तो जर्मनीने १९४१ च्या मे पर्यंत पादाक्रांत केलेला होता. आफ्रिकेच्या उतर भागांतही जर्मनी प्रबळ होऊन बसलेला होता. अशा वेळी रशिया व अमेरिकेचे प्रत्यक्ष साहाय्य मिळाले तरच दोस्तांना जर्मनीचा पाडाव करणे शक्य होते. या देशांनी युद्धात भाग घ्यावा म्हणून दोस्त राष्ट्रांचे वकील, कसून गुप्त प्रयत्न करीत होते. ब्रिटनचे वकील स्टॅफर्ड क्रिप्स हे मास्कोत राहून स्टालिनचे मन वळवीत होते. पण स्टालिन व हिटलर याचा मैत्रीचा करार नुकताच झालेला होता व त्याविरुद्ध वर्तन करण्यास स्टालिन सहजपणे तयार होत नव्हता. हिटलरच्या नाझी तत्वज्ञानाचा तो कट्टर वैरी होता व त्या तत्वज्ञानाचा संपूर्ण नाश व्हावा व करावा अशी त्याची इच्छा होती. पण मैत्रीच्या करारात तो अडकला होता. पण हिटलरने रशियावर २२-६-४१ ला स्वारी केली आणि रशिया दोस्तांचा मित्र झाला. जर्मनीचा मित्र जपान याने पॅसिफिक समुद्रातील डच, फ्रेंच व ब्रिटन यांची सर्व बेटे काबीज केली होती. मलाया, ब्रह्मदेश इत्यादि प्रदेश जिंकून जपान भारताच्या सीमेवर आला होता. जपानने १९४१ च्या डिसेंबरमध्ये पर्ल हार्बरवर हवाई हल्ला केला आणि अमेरिका युद्धात ओढली गेली. जपान भारताच्या सीमेवर आला होता आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या हालचाली, जपानच्या व जर्मनीच्या साहाय्याने भारतावर स्वारी करून भारताला इंग्रजांच्या पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी चाललेल्या होत्या. जपानने १५-२-४२ ला सिंगापूर जिंकले तेव्हा ब्रिटिश सरकारचे धाबे दणाणले. जपान भारतावर स्वारी करणार हे स्पष्ट झाले. मलाया व ब्रह्मदेश येथील लोकांना जपानच्या हल्ल्याला प्रतिकार करण्याची अगर दोस्तसैन्याच्या युद्धांना साहाय्य करण्याची इच्छा नव्हती, हे इंग्रज राज्यकर्त्यांना दिसून आलेले होते. याची पुनरावृत्ति भारतात होऊ नये असे राज्यकर्त्यांना मनापासून वाटत होते. भारतावरील आपली सत्ता सोडावयाची नाही आणि भारतीयांना युद्धाला साहाय्य करण्यास उद्युक्त तर करावयाचे अशा पेचात राजकर्ते होते. भारतातील प्रबळ राजकीय पक्ष म्हणजे काँग्रेस याने अशी भूमिका स्वीकारलेली होती की, इंग्रजांना युद्धात मदत करावयाची नाही, आणि भारतावर परकीय देशाने हल्ला केला तर त्याला अहिंसक पद्धतीने तोंड द्यावयाचे. भारताचे राजकर्ते आणि काँग्रेस यांच्यातील हा पेच सोडविणे, युद्ध जिंकण्याच्या दृष्टीने अत्यंत जरुर आहे, अशी दृष्टी ठेवून अमेरिकेचे अध्यक्ष रुझवेल्ट आणि ब्रिटनचे मुख्यमंत्री चर्चिल हे भारताला युद्धास साहाय्य करण्यास तयार करण्यासाठी काय उपाय योजावेत याबद्दल गुप्त खलबते करीत होते. हे चियाँग कै शेक व त्यांची पत्नी मादाम कै शेक, श्री. जवाहरलाल नेहरू या दांपत्याचे स्नेही होते. म्हणून त्यांनी सदर खलबतांची

बातमी नेहरूंना गुप्तपणे कळविली, आणि युद्ध जिंकण्यासाठी तुम्ही आम्हाला साहाय्य करायला तयार व्हा अशी विनंती केली. एवढेच नव्हे तर ते दांपत्य चीनहून विमानाने दिल्लीला १२-२-४२ ला आले व गांधी, नेहरू वगैरे बरोबर चर्चा करून परत गेले. (The Cripps Mission, P. 19, by R. Coupland) त्यांना कळले की, काँग्रेसवादी लोक जर युद्धाला मदत करण्यास तयार करायचे असतील तर त्यांना काही तरी भरीव आश्वासन दिले पाहिजे. हे मत त्यांनी रुझवेल्ट व चर्चिल यांना कळविले. रुझवेल्टनी हट्ट धरला की चर्चिलने या बाबतीत योग्य ती योजना तावडतोब हाती घेतली पाहिजे, पण साम्राज्यवादी चर्चिल या सर्व वाटाघाटींकडे थंडपणे पहात होता. पण सिंगापूर पडल्यानंतर चर्चिलचे डोळे उघडले. त्यांनी भारतात एक शिष्टमंडळ पाठवायचे ठरविले आणि त्याचे नेतृत्व सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना देण्याचे योजले.

सर स्टॅफर्ड क्रिप्स हे चर्चिलच्या राष्ट्रीय मंत्रीमंडळात लॉर्ड प्रिव्ही कौंसील आणि लीडर ऑफ दी हाऊस ऑफ कॉमन्स होते, ते लार्ड पारमूर (लीडर ऑफ हाऊस ऑफ लार्डस-१९२९-३१) यांचे कनिष्ठ (जन्म २४-४-१८८९) चिरंजीव. ते मिडल टेंपल बारची परीक्षा पास झाल्यावर वकिली करू लागले. त्यांचा ओढा समाजवाद व कामगार चळवळ यांच्याकडे होता. त्यांनी तीन-चार पुस्तके लिहिली होती. ते १९३९ साली भारतात आले ते भारतीय राजकारणाचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठी. यासाठीच ब्रिटिश सरकारने त्यांना पाठविले होते. ते डिसेंबरमध्ये गांधीजींचे पाहुणे म्हणून वर्ध्याच्या आश्रमात तीनचार दिवस (७-१०-डिसेंबर) राहिले होते. जीनांनी मुक्तिदिन साजरा करण्याचे जाहीर केले तेव्हा क्रिप्सनी जीनांची २२ डिसेंबरला भेट घेऊन सल्ला दिला की मुक्तिदिन पाळून लीग व कॉंग्रेस यामधील अतंर जास्त वाढवू नका. त्यांनी नेहरू व जीना यांची भेट घडवून आणली आणि लीग-काँग्रेस सख्य घडविण्याचे प्रयत्न केले. पण त्यांचे उपरिनिर्दिष्ट सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. (Sir Stafford Cripps Souvenir, by A. D. Low).

चर्चिलनी क्रिप्सची, कमिशनचा नेता म्हणून निवड केली. त्यात चर्चिलचा असा डाव होता की, क्रिप्सने रशियात इंग्लंडचा वकील असताना केलेली कामगिरी म्हणजे रशियास इंग्लंडच्या दोस्तांच्यातर्फे युद्धात आणले, त्यामुळे त्याचे राजकीय महत्व फार वाढले होते. आणि आता क्रिप्सनीच मुख्य प्रधान व्हावे, व युद्ध यशस्वी करून दाखवावे असे लंडनच्या राजकीय वर्तुळातून ध्वनी ऐकू येऊ लागले. चर्चिलला हे आवडले नाही. क्रिप्सला भारतात कमिशन घेऊन जाण्यास सांगावे आणि तेथे त्याला अपेशी करण्याचे डावपेच नोकरशाहीतर्फे आणि राजकीय पक्षांतर्फे करावेत, असा चर्चिलचा कावा होता. (The mystery of Sir Stafford Cripps, P. 42, by Ram Manohar Lohiya).

इंडिया ऑफिसचे (भारत मंत्र्यांची कचेरी) प्रमुख मि. एफ. एफ. टर्नबुल आणि त्यांचे चिटणीस मि. ए. डी. ओवेन व मि. ग्रॅहॅम स्पाय आणि क्रिप्स असे

मिशनचे सभासद नेमले. सदर मिशन लंडनहून विमानाने निघून दिल्लीला २३-३-४२ ला पोहोचले. सिंगापूर पतन आणि क्रिप्स कमिशनचे होऊ घातलेले आगमन, या पार्श्वभूमीवर लीग आणि काँग्रेस यांनी आपापल्या भूमिका जास्त ताणून धरण्याचे धोरण स्वीकारले. लीगच्या कार्यकारणीने २१ व २२ फेब्रुवारीच्या बैठकीत दोन ठराव केले. पहिला ठराव - लीगचे ध्येय पाकिस्तान निर्माण करणे आहे, आणि ते साध्य करण्यासाठी लीग हव्या त्या मार्गाचा अवलंब करील. दुसरा ठराव असा होता की, ब्रिटिश सरकारने लीगचा द्विराष्ट्र सिद्धान्त (भारतातील दोन राष्ट्रे – हिंदु व मुसलमान) स्वीकारला नाही तर लीग सरकाराच्याविरुद्ध बंड पुकारील. काँग्रेसने जाहीर केले की, संपूर्ण स्वातंत्र्य आणि अखंड भारत, हेच तिचे ध्येय आहे. (The Cripps Mission, pp. 19-20).

जपानने मलाया, ब्रह्मदेश आणि सिंगापूर जिंकले आणि जपानी सैन्य रंगूनमध्ये ७-३-४२ ला शिरले, तेव्हा चर्चिल यांना भारताच्या सुरक्षितपणाची भीति वाटू लागली. त्यांचे धोरण असे होते की, भारत हा ब्रिटिश साम्राज्यातील कोहिनूर हिरा आहे. तो हातचा दवडायचा नाही. म्हणजे तो हिंदी लोकांच्या हाती पडू द्यावयाचा नाही. जपानच्या हातात तो गेला तरी चालेल. महायुद्धात आपण जिंकू आणि नंतर भारताला जपानच्या हातातून परत मिळवू. चर्चिलच्या या धोरणाला मन्त्रिमंडळातून विरोध झाला. शेवटी, त्याला भारताला स्वातंत्र्य देण्याची योजना मान्य करणे भाग पडले. यासाठी भारतातील पुढाऱ्यांशी चर्चा करण्याच्या हेतूने लंडनहून मिशन पाठविण्याची घोषणा चर्चिलने पार्लमेंटमध्ये ११-३-१९४२ ला केली. (Why Cripps Failed, P. 6, by M. Subramanyam).

---

## प्रकरण ४ — क्रिप्स मिशन योजना

क्रिप्सनी पाच दिवस काँग्रेस, लीग, शीख, इत्यादिकांच्या प्रतिनिधींबरोबर राजकीय पेचप्रसंगाची चर्चा केली. पण त्यांनी लंडनहून आणलेली योजना कोणालाही स्पष्टपणे सांगितली नाही. २९ मार्चला त्यांनी मिशन योजना जाहीर केली.

भावी भारतीय घटना तयार करण्याची योजना आखणे आणि व्हाईसरायच्या कार्यकारी मंडळाची ताबडतोब पुर्नरचना करणे, महायुद्ध संपल्यानंतर भारताला वसाहतीचा दर्जा देणे, आणि राष्ट्रकुलात राहणे अगर स्वतंत्र राहणे, याबद्दल भारताला योग्य ते ठरवून वागण्याची मुभा राहील. राज्यघटना तयार करण्यासाठी घटना सभा निर्माण करावी लागेल. प्रांतिक कायदेमंडळांनी निवडून दिलेल्या सभासदांच्या एकंदर संख्येने ती घटना सभा निर्माण केली जाईल. घटना सभा संयुक्त राज्यसंघाची घटना

तयार करील, त्या घटनेत कोणाही प्रांताला संयुक्त राज्यसंघात राहणे अगर स्वतंत्रपणे राहणे, हे हक्क दिले जातील. प्रांतिक सरकारला हे जे हक्क देण्याचे क्रिप्स योजनेने ठरविले होते त्यात मुस्लिम लीगच्या पाकिस्तानची बीजे पेरून ठेवलेली होती. ती लीगला खूष करून युद्धमोहिमेला मदत करण्यास लौकर तयार करणे, या हेतूने! व्हाईसरॉय हा, मंत्र्यांच्या सल्लामसलतीने प्रत्येक खात्याचा कारभार चालवील आणि त्याचा निर्णय मंत्र्यांवर बंधनकारक राहील. फक्त युद्ध चालू राहीपर्यंत संरक्षणखाते आणि युद्धखाते हे मंत्रीमंडळाच्या ताब्यात राहणार नाहीत. क्रिप्सच्या योजनेतील या सर्व बाबी निरनिराळ्या पक्षांना निरनिराळ्या कारणांमुळे मान्य झाल्या नाहीत.

३० मार्चला क्रिप्सनी श्री. भुलाभाई देसाई, डॉ. आंबेडकर, रावबहादूर एम. सी. राजा, ए. के. फझलूल हक (बंगाल लीगचे अध्यक्ष) पंडित रविशंकर शुक्ल, कुनवर सर महाराजा सिंग (ख्रिश्चन) डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी वगैरे पुढाऱ्यांशी चर्चा केली जवाहरलाल नेहरू व आझाद यांनी क्रिप्सच्या पुढे ३० मार्चला कॉंग्रेसतर्फे योजना मांडली. (१) ब्रिटनने भारताला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याची घोषणा तावडतोब करावी. (२) भारतात आपली राज्यघटना तयार करण्यासाठी घटना परिषद भरविण्याचा हक्क मान्य केला पाहिजे. (३) ही परिषद सार्वत्रिक मतदानाच्या आधाराने निवडण्यात यावी आणि (४) भारतीय केन्द्र सरकार तावडतोब निर्माण करण्याचे जाहीर करावे. ही योजना ब्रिटनने स्वीकारली तर भारत, ब्रिटनला युद्ध जिंकण्यास मदत करील. क्रिप्सनी उलट अशी योजना नेहरू व आझाद यांच्यापुढे मांडली की, (१) ब्रिटन भारताला युद्धसमाप्तीनंतर वसाहतीचे स्वराज्य देईल. (२) भारताने, घटना समिती १९३५ च्या कायद्यातील मतदानाच्या आधारे निवडावी, आणि (३) राज्यघटना युद्धसमाप्ती नंतर तयार करावी. नेहरू-आझादांनी क्रिप्सची योजना नाकारली. ३० मार्चला रात्रौ क्रिप्सनी रेडिओवरून भाषण करून आपल्या योजना, भारताने अजून विचार करून स्वीकाराव्या, अशी भारतीयांना विनंती केली. क्रिप्स मिशनच्या वाटाघाटीत अमेरिकेने साहाय्य करावे, व वाटाघाटी व्हाव्यात, या हेतूने प्रेसिडेंट रुजवेल्ट यांनी आपला विश्वासू चिटणीस म्हणून कर्नल जॉह्न्सन यांना दिल्लीला वॉशिंग्टनहून पाठविले. क्रिप्स, पुढाऱ्यांशी चर्चा करीत असताच कर्नल जॉह्न्सस गुप्तपणे सर्व पुढाऱ्यांची मने ब्रिटनबरोबर सहकार्य करण्यास वळवीत होते. त्यांनी आंबेडकरांशीही चर्चा केली. आंबेडकरांनी त्यांना स्पष्ट सांगितले की, क्रिप्स योजनेत अस्पृश्यांच्या हितसंबंधाचा संदर्भही नसताना मी त्या योजनेस का पाठिंबा द्यावा? जॉह्न्सस म्हणाले, यावेळी तुम्ही जातीय दृष्टी सोडा व व्यापक राष्ट्रीय दृष्टी स्वीकारा. पण आंबेडकरांनी ते मान्य केले नाही. क्रिप्स योजनेला कोणाचाही पाठिंबा मिळत नाही, हे वर्तमान चर्चिल व रुझवेल्ट यांना समजले, तेव्हा त्यानी कर्नल जॉह्न्सस यांना दोन्ही पक्षांना मान्य होईल, अशी काही तडजोड काढा असे सुचविले, तेव्हा जॉह्न्ससने अशी योजना कॉंग्रेसपुढे ठेवली की–संरक्षणखाते भारतीय सभासदांकडे असावे, पण सेनापति व्हॉईसरॉयच्या कार्यकारीणीचा सभासद रहावा, व त्यांने हिंदी संरक्षण मंत्र्याला मार्गदर्शन

करावे. कॉंग्रेसने यांत अशी दुरुस्ती केली की सेनापति हे व्हाईसरॉयचे मंत्री म्हणून नसावेत, ते फक्त व्हॉईसरॉयच्या मंत्रीमंडळाचे सभासद युद्धकाळापर्यंत असावेत. युद्ध संपले की, संरक्षणमंत्र्याच्या अधिकारात त्याने रहावे.

या सर्व योजनांवर खूप चर्चा झाली. कॉंग्रेसने १०-४-४२ ला क्रिप्सला कळविले की, तुमची व कर्नल जॉह्न्सनची योजना आम्हाला मान्य नाही. संपूर्ण स्वातंत्र्य देण्याला ब्रिटन तयार होत असेल, तरच यापुढे बोलणी होतील.

हिंदी कम्युनिष्ट पक्षाची युद्धाला विरोध करणे, सहाय्य करणे, क्रिप्स योजनेला पाठिंबा देणे, अशा वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या स्वरूपाची भूमिका होती. युद्ध सुरू झाले तेव्हा ते ब्रिटीश साम्राज्यशाही व हुकुमशाही सरकारांचे आहे, ते हाणून पाडलेच पाहिजे, म्हणजे त्याला साहाय्य न करणे, अशी प्रथम त्या पक्षाची भूमिका होती. नंतर रशिया युद्धात सामील झाला तेंव्हा ते युद्ध, स्वातंत्र्य-संरक्षणाचे म्हणजे लोकांचे युद्ध होय, म्हणून त्या पक्षाने युद्धाला सहकार्य करण्याची भूमिका स्वीकारली. रशियाला युद्धात आणण्यास क्रिप्स यांचे प्रयत्न कारणीभूत झाले होते, पण त्याला इतर कारणेही होती. युद्ध चालू असताना जर्मनीने पोलंडवर स्वारी केली. तेव्हां पोलंड जर्मनीच्या ताब्यात गेला, तर रशियाला जर्मनीपासून सुरक्षितपणाबद्दल काळजी वाटू लागली. तेव्हा रशियाने पोलंडवर पूर्वेकडून चाल केली. जर्मनीने पोलंडचा पश्चिम विभाग व रशियाने पूर्व विभाग पादाक्रांत केला. तो भाग आपापल्याकडे ठेवावा आणि परस्परावर आक्रमण करू नये असा जर्मनी व रशिया यांच्यात ३ ऑगस्ट १९३९ मध्ये करार झाला. या घटना चालू असता भारतातील कम्युनिष्ट पक्ष दोस्त राष्ट्रांना आणि विशेषतः ब्रिटनला युद्धखोर म्हणून शिव्या देत होता. जर्मनी व दोस्त राष्ट्रे यांच्यातील युद्ध हे भांडवलशाही व साम्राज्यशाही यांचे युद्ध आहे व त्यात भारतीय जनतेने भाग घेऊ नये असा प्रचार कम्युनिस्ट करीत होते. तेव्हा सदर पक्षाच्या कार्यकर्त्यांना सरकारने भारत संरक्षण कायद्याखाली तुरुंगात टाकले आणि पक्ष बेकायदा ठरविला. जर्मनीने रशियावर स्वारी केली तेव्हा रशिया दोस्तांतर्फे महायुद्धात सामील झाला. ब्रिटिश कम्युनिस्ट पार्टी, कॉमिटर्न आणि त्यांचे सूत्रधार यांच्या प्रेरणेने श्री. पूरणचंद्र जोशी यांनी भारत सरकारचे गृहमंत्री सर रेजिनाल्ड मॅक्सवेल यांची १९४२ च्या एप्रिलमध्ये भेट घेतली आणि पक्षावरील बंदी उठविली आणि पक्षाचे कार्यकर्ते व पुढारी यांना तुरुंगातून मुक्त केले म्हणजे पक्षाला युद्धास भरपूर मदत करता येईल अशी आपली मागणी व्यक्त केली. जुलै १९४२ मध्ये ब्रिटिश सरकार आणि भातर सरकार यांनी कम्युनिस्ट पक्षावरील बंदी जुलै १९४२ मध्ये उठविली आणि पुढारी तुरुंगातून मुक्त केले. (Communism in India, by Cene. D. Overstreet and Marshal Wildmiller), P. 205. त्यानंतर कम्युनिस्ट पक्षाने हे महायुद्ध लोकांचे युद्ध आहे; व त्यात भारतीय जनतेने भाग घेतला पाहिजे असा प्रचार सुरू केला. त्या पक्षाने 'लोकयुद्ध' हे साप्ताहिक मुंबईत चालू केले. श्री. मानवेन्द्रनाथ रॉय यांचा डेमोक्रॅटिक पक्ष, यानेही दोस्तांनी युद्ध

जिंकावे म्हणून ज्या योजना भारतात चालू केल्या होत्या त्यांना हातभार लावला. त्याबद्दल त्यापक्षाला सरकारकडून दरमहा १३,००० रुपयांचे सहाय्य मिळत होते सदर पक्षात पुढे लाथाळी सुरू झाली व तो पक्ष विसर्जित झाला.

जनतेचे युद्ध म्हणून कम्युनिस्टांनी जी आघाडी सुरू केली तीत इतर पक्ष सामील होणार नाहीत, हे उघड होते. अशा वेळी इतर पक्षांना क्षुद्र लेखणे आणि आपल्या पक्षाचे घोडे पुढे दामटणे हे एक तंत्र कम्युनिस्टांनी स्वीकारले. मुस्लिम लीगला खूष करण्याचा डावही त्यांना साधावयाचा होता. यासाठी पूरणचंद्र जोशी यांच्या नावे एक निवेदन प्रसिद्ध करण्यात आले होते त्यात लीग आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांनी देशाच्या हितासाठी एकत्र यावे, असा एक मुद्दा होता. त्याचा हेतु हा की, काँग्रेसच्या जोडीलाच लीगचा पक्ष आहे, काँग्रेस हा एकच पक्ष देशाचा प्रतिनिधी नाही. (Communism in India, P. 205, by Cene. D. Overstreet and Marshal Windmiller). क्रिप्सच्या योजनेतील तत्त्वे व तपशील काँग्रेस, लीग व इतर राजकीय पक्ष यांना मान्य नव्हता. पण भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या पोलिट-ब्यूरोने ६-५-४२ ला पत्रक (पार्टी-पत्र) प्रसिद्ध करून काँग्रेस व लीगला सल्ला दिला की, क्रिप्स योजनेच्या पायावर आपले भिन्न विचार दुरुस्त करून घ्यावेत आणि ऐक्य साधवावे, अशा ऐक्याला कम्युनिस्ट पक्ष पाठिंबा देईल. (Communism, P. 204).

लोकयुद्धाच्या चळवळीच्या वेळी बरेच कम्युनिस्ट काँग्रेसचेही सभासद, कार्यकर्ते आणि ए. आय. सी. सी. चे‍ही सभासद होते. त्यांच्या चळवळीचा एक भाग असा होता की, काँग्रेस ही भांडवलवाले आणि साम्राज्यशाही यांचे हस्तकांची संस्था असल्या-मुळे ती बहुजनसमाजाच्या हिताला जागणार नाही. तेव्हां अशा संस्थेला बहुजन समाजाने आपले प्रतिनिधित्व करू देऊ नये, ते प्रतिनिधित्व कम्युनिस्ट पक्षाकडे यावे. त्यांची चळवळ काँग्रेसला बाधक होत चाललेली पाहून या बाबतीत अधिक चौकशी करण्यासाठी काँग्रेसने नेहरू, पटेल आणि गोविंद वल्लभपंत यांची समिती नेमली. समितीने शिफारस केली की सर्व कम्युनिस्टांना काँग्रेसच्या बाहेर पडावयास लावावे. १९४२ च्या डिसेंबरमध्ये ए. आय. सी. सी. ने ठराव पास केला की, कम्युनिस्टांनी राजीनामे द्यावेत. कम्युनिस्ट काँग्रेसमधून बाहेर पडले. (Communism in India, P. 222).

क्रिप्सची योजना स्वीकारण्याबद्दल काँग्रेस आणि लीगही उत्सुक नव्हती. तेव्हां दिल्लीतील राजकीय वर्तुळात निराशेचे वातावरण पसरले. अस्पृशांच्या राजकीय हक्कां-बद्दल डॉ. आंबेडकर, श्री. एम. सी. राजा आणि इतर अस्पृश्य पुढारी यांनी क्रिप्सच्या योजनेसंबंधी अशी भूमिका व्यक्त केली की, घटनासमितीत अस्पृशांना भरपूर प्रति-निधित्व मिळाले नाही तर तिला अस्पृशांतर्फे विरोध करण्यात येईल. समितीत अस्पृशांचे प्रतिनिधी स्वतंत्र मतदार संघातून निवडले पाहिजेत, असे सर्व पुढाऱ्यांचे मत होते.

("Dr. Ambedkar, Mr. M. C. Raja and other Depressed Class leaders object to the constitution making body and urge that if it is set up, the depressed class should have representation on it through separate electrorate", The Times of India, Wednesday, 1-4-42).

क्रिप्स योजना स्वीकारावी आणि भारताने युद्ध जिंकण्यास दोस्तांना मदत करावी, असा प्रचार अमेरिका आणि इंग्लडचे पुढारी व वर्तमानपत्रे यांनी चालविला होता त्याचा वृतांत १-४-४२ च्या टाईम्सच्या पाचव्या पानावर ("V. S. Appeals to India to Accept British Offer. Problem of Defending a Divided Country") प्रसिद्ध झालेला होता. हिंदु महासभा, ख्रिश्चन, शीख वगैरे जातींच्या पुढाऱ्यांनी क्रिप्स योजनेला विरोध केला. (Times — २-४-४२, पा. ७) या जातींनी निरनिराळी कारणे दिली. अस्पृश्यांच्या पुढाऱ्यांनी दोन कारणे दिली ही योजना हिंदूंचे साम्राज्य आणणार आणि अस्पृश्यांच्या स्वतंत्र राजकीय अस्तित्वाला ती मान्यता देत नाही याबद्दलचा वृतांत ३ एप्रिल (शुक्रवार) १९४२ च्या टाईम्सच्या अंकात (पा. १) प्रसिद्ध झाला होता. तो असा—

*"Depressed Classes Criticism, Unminigated Hindu Rule.."*

The cripps proposals are calculated to do the greatest harm to the Depressed Classes, declared Dr. B. R. Ambedkar and Rao Bahadur M. C. Rajah in a letter to Sir Stafford Cripps "Who told you." They say, when we met you on March 30 that the proposals of His Majesty's Government relating to the constitutional development of India will not be acceptable to the Depressed Classes for the reasons which we placed before you at the interview. Since then we have had consultations with many of Depressed Classes representatives in the various provincial and central legislatures and all of them have unanimously endorsed the view we placed before you regarding the proposals.

We are all of us absolutely convinced that the proposals are calculated to do the greatest harm to the Depressed Classes and are mere to place them under an unmitigated system of Hindu Rule. Any such result which takes us back to black days of the ancient past will never be tolerated by us and we are all determined to resist any such catastrophe befalling our people with all the means of our command.

SAFEGUARDS DEMANDED

We request you to convey to His Majesty's Government our deepest anxiety regarding the future of Depressed Classes and to impress upon them that we must look upon it as a break of faith if His Majesty's Government should decide to force upon the Depressed Classes a contribution to which they have not given their free and voluntary consent and which does not contain within itself all the provisions that are necessary for safeguarding their interests.

In the end we want to thank you for assuring us that you called us in our representative capacity and that His Majesty's Government did not regard the Depressed Classes as a minor party-points upon which some doubt had arisen in our mind and about which we asked you for a correct defination of our position.

संरक्षणखाते हिंदी माणसाच्या (मंत्र्याच्या) हाती पाहिजे ही मागणी क्रिप्स मान्य करीत नव्हते. या व इतर मागण्यांवर खूप चर्चा झाली, पण क्रिप्स आणि काँग्रेसचे पुढारी यांच्यातील मतभेत मिटेनात, ही परिस्थिति पाहून अमेरिकेला धास्ती वाटू लागली. जपानचा पराजय करण्यासाठी युद्धात भारताचे साहाय्य मिळविणे अमेरिकेला जरूरीचे वाटत होते. तेव्हा क्रिप्स आणि नेहरू यांच्यातील मतभेद मिटविण्याकरिता अमेरिकेचे अध्यक्ष श्री. रुझवेल्ट यांनी आपला वैयक्तिक प्रतिनिधि म्हणून कर्नल जॉह्ल्सन यांना दिल्लीला पाठविले. कर्नलने ८-४-४२ च्या काँग्रेसच्या कार्यकारिणीच्या बैठकीत नेहरूंच्या करवी क्रिप्सयोजनेकडे जरा सौम्यपणे पाहण्यासाठी वातावरण तयार केले. नेहरू आणि क्रिप्स यांच्याशी वाटाघाटी करून कर्नलने हे साध्य केले होते. युद्ध समाप्तीनंतर भारताला ब्रिटनने स्वराज्य दिले पाहिजे, असे अमेरिकेने जाहीर केलेले होते. आणि हे युद्ध अमेरिकेचे आहे आणि या युद्धात अमेरिका, ब्रिटन व रशिया हे विजयी होणारच, अशी अमेरिकेतील पुढाऱ्यांना आणि जनतेला खात्री वाटत आहे, हा मुद्दा कर्नलने काँग्रेसच्या पुढाऱ्यांना हरतऱ्हेने युक्तिवाद करून पटवून दिला. त्यामुळे क्रिप्स योजनेबद्दल जरासे बरे मत दिल्लीला होऊ लागले; याबद्दलचा वृत्तांत ९-४-४२ च्या टाईम्सने दिला होता. त्यातील महत्त्वाचा भाग असा —

*Congress standing at Cross-Roads-Fresh-Defence Formula-Outlook Less Gloomy —*

*"It is understood that the slight turn for the better that the discussions in the Working Committee have taken since*

*this morning is due largely to the mediation of Colonel Johnson, President Roosevett's personal representative.*

Colonel Johnson has created confidence among Congress leaders by assuring them that the U.S.A. has endorsed the post-war promise of self-government for India, and by stating that this was America's war and the Americans were confident of winning it" (P. 1).

दोन आठवड्यांच्यावर वाटाघाटी होऊन १० एप्रिलला काँग्रेसने आपला निर्णय जाहीर केला की खालीलप्रमाणे काँग्रेसच्या दोन मागण्या राहतील (१) संरक्षणखाते हिंदी मंत्र्याच्या हाती असावे, आणि (२) व्हाईसरॉयना हिंदी मंत्रीमंडळाचा कोणताही निर्णय फेटाळून लावण्याचा (व्हेटो) अधिकार नसावा, या मागण्या क्रिप्सच्या योजनेत घालण्यास क्रिप्समंडळ तयार नाही, म्हणून ती योजना त्याज्य होय. (The Times, Saturday 11-4-42, Delhi Political Talks Fail ? "Congress Unwilling to Accept Cripp's Plan" — P. 1) या बातमीने प्रेसिडेंट रूझवेल्ट दुःखी झाले (कित्ता). लंडनमधील पार्लमेंट आणि राजकीय वर्तुळ यांच्यातही वाद झाले आणि दुःखी वातावरण उत्पन्न झाले. (टाईम्स १३-४-४२, पा. १) क्रिप्स व काँग्रेस यांच्यातील पत्रव्यवहार ११ तारखेस बाहेर पडला (कित्ता पा. ३)

क्रिप्स मिशन हिंदुस्थानचा राजकीय पेचप्रसंग सोडवू शकले नाही याचे कारण, नेहरू जरी या योजनेला अनुकूल होते, तरी गांधी व जीना यांनी तिला विरोध केला, असे मत ॲटलींनी प्रदर्शित केले. गांधी हे संतपुरुष होते. त्यांच्यातील संतपणा, त्यांच्यातील राजकारणी पुरुषापेक्षा जास्त प्रभावी होता, हे गांधीजींच्या विरोधाचे कारण होते, असेही ॲटलींनी मत प्रदर्शित केले.

("The idea was to set up a great constitution making body immediately after the war with a firm promise of Dominion status. The plan was put up on very much lines, we'd discussed with them before the war, when they seemed attracted by it, and the Cripps Mission got very near tc success. Cripps did as good a job as any man could possible have done and there seemed a real chance that Nehru would co-operate. But turned difficult.

Williams : What was your judgement of Gandhi ?

Atlee : A combination of saint and state politician — Gladstone must have been a bit like him — but ideas difficult to reconcile with modern views of progress, difficult for the west to appreciate anyway. But a tremendous force.

Williams : Which did you find uppermost, Politician or Saint ? :

Atlee : On the whole the saint, I think it didn't make any easier. Saints don't fit in awefully well with a democracy any more than do sinners. And the dictatorial saint can be quite as bad as the dictatorial sinner, you know especially if he thinks you're a sinner. Anyway inspite of all Cripps' efforts — and he had a liking for saints himself of course; a bit of the same mixture — he couldn't get Gandhi to agree, nor in the end Jinnah. So we were back where we started" — A Prime Minister Remembers, — pp. 206-207, by Francis Williams, 1961).

क्रिप्सच्या व आपल्या प्रयत्नांना यश आले नाही. याबद्दल वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधीपुढे कर्नल जॉहन्सनने दुःखाचे उद्‌गार काढले. या अपेशाला मुख्य कारण म्हणजे हिंदी राजकारणात जातीयवाद फार तीव्र स्वरूपात आहे, असे ते म्हणाले. ह्या जातीयवादात हिंदुसभा व लीग यांचे पुढारी आणि अस्पृश्यांचे पुढारी आंबेडकर हे प्रमुख आहेत, असे जॉहन्सनचे उद्‌गार वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाले, तेव्हा त्यांना उद्देशून बाबासाहेबांनी एक निवेदन प्रसिद्ध केले. त्यात त्यांनी असा एक मुद्दा मांडला की, अमेरिकेत निग्रो लोकांना जसे वागवेण्यात येते, तसेच हिंदुस्थानात अस्पृश्यांना वागविण्यात येते. निग्रो लोकांचे मानवी हक्क अजून अमेरिकन लोक मान्य करीत नाहीत. तसेच हिंदु लोक अस्पृश्यांचे मानवी हक्क भारतात मान्य करीत नाहीत निग्रो लोक अमेरिकेन गोऱ्यांबरोबर जसा आजही झगडा करीत आहेत, तसा अस्पृश्य हिंदु स्पृश्यांविरुद्ध झगडा करीत आहेत. मग कर्नल जॉहन्सन यांना अस्पृश्यांच्या जातीयवादाची इतकी घृणा का वाटावी ? कांचेच्या घरांत राहणाऱ्यांनी दुसऱ्यांच्या घरांवर दगड फेकण्यासारखी कर्नलसाहेबांची ही वृत्ति आहे. बाबासाहेबांच्या या निवेदनाचा संपूर्ण वृतांत 'इव्हिनिंग न्यूज ऑफ इंडिया' या पत्राने दिला होता. राष्ट्रीय पत्रांनी त्याबद्दल एक अक्षरही प्रसिद्ध केले नव्हते.

क्रिप्स मिशनने अस्पृश्यांचा विश्वासघात केला, असा मुद्दा बाबासाहेबांनी आपल्या भाषणांतून व निवेदनांतून मांडला. यासंबंधी श्री. जोकिम अल्वा यांनी आपल्या ग्रंथात उपहासगर्भ उल्लेख केलेला आहे तो असा —

"He made a slashing attack on the Congress for turning down the proposals brought by Stafford Cripps. Yet it was the same Doctor who on his birthday condemned Sir Stafford Cripps as the worst enemy of the country, Benjamin Guy Horniman, who frequently headlined the

Doctor's activities in his paper 'Bombay Sentinel' quietly gave the shattering report in his brilliant column "Twilight Twitters'. "The Doctor dubbed 'Sir Stafford' the worst enemy of the country on his birthday, but a job makes all the differences when Sir Stafford is hailed as the saviour,' (Men and Supermen of Hindustan, P. 25).

अमेरिकेचे अध्यक्ष एफ. डी. रुझवेल्ट, चीनचे सरसेनापति चियँग कै शेक आणि त्यांची पत्नी मॅडाम कै शेक कांनी भारताला स्वातंत्र्य देण्यात आले तर भारत महायुद्धात दोस्तांच्या बाजूने भाग घेईल, आणि जर्मन व जपान यांनी सर्व आघाड्यांवर जे यशस्वी आक्रमण करून दोस्तांना अपयशाच्या खाईत लोटण्याचे प्रयत्न केलेत, त्याला पायबंद बसेल, अशी विचारसरणी मांडली. पण तिला ब्रिटनचे पंतप्रधान आणि हुजूर पक्षाचे राजकारणी यांनी विरोध केला, आणि नंतर आणीबाणीची परिस्थिती आल्यावर ह्या विचारसरणीला पाठिंबा दिला, पण ती विचारसरणी प्रत्यक्षात अमलांत आणण्याचे जे उघड प्रयत्न झाले ते हाणून पाडण्यासाठी चर्चिल व त्यांचे सहकारी यांनी गुप्त कारवाया केल्या. याबद्दलचे त्रोटक चित्र सुप्रसिद्ध वृतपत्रकार श्री बी. शिवराव यांनी 'दी इलेस्ट्रेटेड विकली ऑफ इंडिया'च्या १३-८-६१ च्या अंकात 'F.D.R. : A Champion of India's Freedom' (पा, ४२-४५) या लेखात रेखाटलेले आहे. या स्वातंत्र्यवादी आणि साम्राज्यवादी राजकारण्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी पडद्यामागे कसे प्रयत्न केले, याची हकिकत या लेखात दिली आहे.

मलाया, ब्रह्मदेश आणि बंगालचा उपसागर ही जपानी सैनिक आणि आरमार यांनी व्यापल्यानंतर चर्चिल अमेरिकेच्या मदतीची याचना करण्यासाठी अमेरिकेला गेले. त्यांनी अध्यक्ष रूझवेल्ट यांच्याशी बोलणी केली, रुझवेल्ट युद्धात पडण्यास तयार झाले नाहीत. थोड्याच दिवसांनी जपान्यांनी पर्ल हार्बरवर हल्ला केला. तेव्हा अमेरिका युद्धात पडली. युद्धातील एकंदर परिस्थितीची पहाणी केल्यानंतर रूझवेल्टना असे दिसून आले की, गुलामगिरीत पडलेल्या देशांना युद्धसमाप्तीनंतर स्वातंत्र्य देण्याची घोषणा केली तर युद्धाला त्यांच्याकडून भरपूर व मनापासून साहाय्य मिळविता येईल व युद्धात दोस्तांना विजय मिळविता येईल. या घोषणेचा स्वीकार चर्चिल आणि स्टॅलिन यानी केला. तिचा खर्डा स्वतः चर्चिलने तयार केला. त्यात त्याने असा मजकूर टाकला की, युद्धसमाप्तीनंतर सर्व लोकांना आपले सरकार कोणत्या स्वरूपाचे असावे, हे ठरविण्याचा हक्क राहील. व त्या हक्कांना मान्यता देण्याचे आम्ही वचन देतो. चर्चिलने हा मजकूर नंतर गाळला. अॅटलांटिक चार्टर म्हणून ज्याची घोषणा करण्यात आली त्याची महिती ब्रिटनचे उपपंतप्रधान मेजर अॅटली यांनी बी. बी. सी. वर दिली. त्यानंतर पार्लमेंटमध्ये सभासदांनी चार्टरसंबंधी प्रश्न उपस्थित केले. त्यांना उत्तर देताना चर्चिलने खुलासा केला की, युरोपामधील जे देश हिटलरने पादाक्रांत केले त्यांना उद्देशून चार्टरची

घोषणा केली; ब्रिटिश साम्राज्यात जे देश आहेत, त्यांना ही घोषणा लागू नाही. हा खुलासा भारताच्या स्वातंत्र्याला डावलणारा आहे, हे सर्वांनी ओळखले व त्याबद्दल अनेक ब्रिटिश मुत्सद्यांनी नापसंति व्यक्त केली. चर्चिलने घोषणेचा केलेला खुलासा ओढून ताणून केलेला आहे, असे भारतमंत्री अमेरी यांनी आपले खाजगी मत व्यक्त केले. भारतातील राजकीय आंदोलन आणि आग्नेय अशियातील जपान्यांचे एकामागून एक जय पाहून रूझवेल्ट, चियांग कै शैक व मॅडाम कै शैक यांनी चर्चिलकडे लकडा लावला की, तुम्ही भारताचे भौगोलिक महत्त्व, विजयाला कसे अनुकूल आहे ते लक्षात घ्या आणि भारतीय जनतेला युद्धात सहकार्य करण्यासाठी उमेद येईल असे धोरण स्पष्ट करा. ब्रिटिशमुत्सद्यांनीही चर्चिलच्या मागे हाच लकडा लावला. तेव्हा चर्चिलने स्टफर्ड क्रिप्स यांना भारतातील राजकीय पुढाऱ्यांशी बोलणी करण्यास पाठविण्यारी तयारी दाखविली.

सर स्टफर्ड क्रिप्स यांची बोलणी नीट व्हावीत आणि भारतीय पुढाऱ्यांनी युद्धाला मदत करण्यास तयार व्हावे; अशी योजना तयार करण्यासाठी रुझवेल्ट यांनी आपला वैयक्तिक प्रतिनिधि म्हणून कर्नल लुईज जॉह्न्सन यांना दिल्लीला पत्र पाठविले. जॉह्न्सनने श्री. बी. शिवराव यांच्या साहाय्याने सर्व पुढाऱ्यांच्या गुप्तपणे भेटी घेतल्या आणि सहकार्याच्या योजनेला पठिंबा द्या; असे कळकळीने सर्वांना विनविले. परंतु, व्हाईसरॉय आणि त्याची नोकरशाही यांना त्यावेळी चर्चिलने गुप्त संदेश लंडनहून पाठविले की, क्रिप्सच्या वाटाघाटी निष्फळ होतील असे धोरण स्वीकारा. त्याप्रमाणे त्यांनी केले व क्रिप्स निराश होऊन परत लंडनला गेले. भारताला स्वातंत्र्याची हमी देणे म्हणजे शरणागति स्वीकारणे, अशी चर्चिलची भूमिका होती. भारताच्या स्वातंत्र्याबद्दल काही बोलावयाचे नाही, आणि भारतावर जपानने हल्ला केला तर त्यासाठी निकराचा प्रतिकार करावयाचा नाही, जपानने भारत गिळंकृत केला तरी चालेल, असे चर्चिलचे मत होते. म्हणूनच क्रिप्सची बोलणी निष्फळ व्हावीत अशी परिस्थिति चर्चिलने तयार केली होती. क्रिप्सचे राजकीय भवितव्य नष्ट करण्यासाठीच चर्चिलने क्रिप्सला भारताची शिष्टाई करण्यास पाठविले होते. जॉह्न्सन अमेरिकेला परत गेल्यानंतर रुझवेल्टला जो गुप्त खलिता सादर केला त्यात सर्व वृतांत निवेदन केलेला होता. (Johnson returned to Washington later in the summer a very sick man, He made a confidential report :

"The Viceroy and other in authority were determined at the time of the Cripps Mission that the necessary concessions should not be made and are still of the same opinion : The British are prepared to lose India, as they lost Burma, rather than make any concessions to the India,

in the belief that India will be returned to them after the war with the *status quo ante prevailing.*"

Johnson stated further that he had been reliably informed that the authorities did not propose to attempt any serious defence of India in the event of Japanese attack; and that he had so stated to Cripps, Cripps naturally refused to believe this, but was prevailed upon by Johnson to confront General Wavell with the allegation. Cripps was reported have told Johnson later that Wavell had admitted that this was the case.

Johnson maintained that in his opinion neither Churchill, the Viceroy, nor Wavell desired that the Cripps' Mission be a success and that in fact they were determined that it should not be. He believed that telegraphic instructions had been sent solely to prevent the success which Cripps was on the point of attaining. Cripps is said have admitted that he considered if possible that Churchill had sent him to India with the delibrate intention of destroying his political future (P. 45 — Ibid).

कर्नल जॉहन्सनचा गुप्त खलिता वाचून रुझवेल्टला वाईट वाटले, तरी त्यांनी भारताला स्वातंत्र्य देण्याची आपली योजना सोडून दिली नाही. त्यांनी मि. वुईल्यम फिलिप्स (हे इटलीत अमेरिकेचे वकील होते.) यांची त्या कामगिरीसाठी योजना केली. हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याबद्दल घोषणा करणे किती अगत्याचे आहे, याबद्दल चर्चिलशी चर्चा करण्याकरिता फिलिप्स लंडनला गेले. चर्चिल, फिलिप्सला भेट देण्यास तयार होईनात. फिलिप्सनी पुनः पुनः प्रयत्न करून चर्चिलशी शनिवार २३ मे १९४२ रोजी भेट घडवून आणली. पण चर्चिल चर्चा करण्यास तयार नव्हते. दुसरे युद्ध होणार असे मी भविष्य केले होते, ते खरे झाले. हिंदुस्थानात रक्ताच्या नद्या वाहतील, असे मी करतो, 'असे उद्गार काढून चर्चिल फिलिप्सशी उद्धटपणे व रागाने वागले, भारताला स्वातंत्र्य देण्याच्या मुद्यावर ते एक शब्दही बोलले नाही. ("Churchill was annoyed, and annoyed with me, that was clear. He got up and walked rapidly back and forth. My answer to you is, Take India it that is what you want! Take it by all means. But I warn you if I open the door a crack there will be greatest blood-bath in all history; yes, blood-bath is all history. Mark my words," prophesied present war and I prophesy the blood-bath (Ibid — P. 45).

फिलिप्स लंडनहून दिल्लीस आले, त्यांनी राजकीय पुढाऱ्यांशी चर्चा केली, पण ते निराश अंतःकरणाने अमेरिकेला गेले. त्यांनी रूझवेल्टला सर्व वृत्तांत सादर केला. भारताला स्वातंत्र्य देण्यास ब्रिटिश तयार नाहीत, हे पाहून भारतामधून युद्धाला साहाय्य मिळविण्याची रूझवेल्ट यांची योजना तशीच गुलदस्तात पडून राहिली.

या पार्श्वभूमीकडे पाहिले तर डॉ. आंबेडकर भारताच्या स्वातंत्र्याला विरोध करीत होते, असा आरोप करणाऱ्यांना आपली भूमिका व विचारसरणी पूर्वग्रहदूषित व चुकीच्या माहितीवर आधारलेली होती, हे मान्य करावे लागले.

• • •

# खंड ९ वा

## प्रकरण : ५

# व्हॉयसरॉयच्या मंत्रिमंडळात

मुस्लिम लीगचे राजकारण पाकिस्तानच्या प्रश्नावर जोम धरू लागलेले पाहून काँग्रेस मधील काही हिंदू पुढाऱ्यांत लीगची मागणी मान्य करून भारत लौकर स्वतंत्र करणे इष्ट वाटू लागले, पण तसा उघड मतप्रचार करण्यास फक्त श्री. राजगोपालचारी पुढे आले. त्यांनी गांधीजी, पटेल व नेहरू यांचे मन वळविण्याचा गुप्तपणे प्रयत्न केला. पटेल व नेहरू यांनी राजाजींना कसून विरोध केला. मग राजाजी पाकिस्तानचा उघड प्रचार करू लागले तेव्हा त्यांच्या सभेत काँग्रेस, रा. स्व. संघ, हिंदुमहासभा इत्यादी पक्षाचे लोक गोंधळ उत्पन्न करून सभा उधळून लावू लागले. राजाजींवर अंडी, बटाटे, कांदे व घाण मातीचे गोळे सभेत फेकले तरीही राजाजींनी आपला हेका सोडला नाही. त्यांनी मुसलमानांची पाकिस्तानची मागणी मान्य करा असा काँग्रेसच्या कार्यकारिणीच्या अलहाबाद येथील बैठकीत २।५।४२ ला ठराव मांडला. त्याला बराच विरोध झाला. तो नामंजूर झाला. (टाईम्स सोमवार ४।५।४२ पान ५) श्री. राजाजीनी आपल्या ठरावाबद्दल खुलासे आणि प्रचार करणारी भाषणे दिल्लींत केली (टाईम्स मंगळवार ५।५।४२ पान ५) श्री. राजाजींनी काँग्रेसच्या सभासदत्वाचा राजिनामा दिला व ते काँग्रेसच्या बाहेर पडले.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे धोरण रशियाच्या हुकुमान्वये ठरत असे. दुसऱ्या महायुद्धासंबंधी हा पक्ष, जनतेत, हे युद्ध साम्राज्यशाही यांचे आहे, म्हणून त्या महायुद्धांत ब्रिटिशांना भारताने मदत करू नये, असा जोराचा प्रचार १९३९ सप्टेंबर ते २२ जून १९४१ पर्यंत करीत होता. २१ जून १९४१ ला रशिया ब्रिटनच्या बाजूने या युद्धांत भाग घेऊ लागला, तेव्हापासून ते १९४५ मे पर्यंत हा पक्ष हे युद्ध जनतेचे युद्ध आहे म्हणून ब्रिटन व रशिया यांना युद्ध जिंकण्यासाठी भारतीयांनी सर्व परीनी सहाय्य करावे असा प्रचार चालविला.

"On June 22, 1941 Germany invaded Russia. This made all the difference to the attitude of the Indian Communists. The War started in September, 1939, right till Germany's invasion on Russia, was considered by the Communists as the imperialist war had they refused to co-operate with the British against Germany and Italy. But suddenly this war became the 'People's War' and the Communist Party of India gave co-operation to the British against Hitler and Mussolini" (Ten years to Freedom page 53).

बॅ. जयकर यांनी ३-६-४२ ला सप्रूंना पत्र लिहिले त्यांत काही राजकीय प्रश्नांवर त्यांनी मतें प्रदर्शित केली. इंग्रज भारत सोडून जातील, या मुद्यावर गांधीजींनी आपली भूमिका संपूर्ण बदललेली आहे आणि याचा भरपूर फायदा जीना घेत आहे. त्यांची लांबलचक मुलाखत आजच्या टाईम्सने प्रसिद्ध केलेली आहे. इंग्लंडमधील पत्रे जीनांच्या भेटींची व भाषणांची लांबलचक माहिती प्रसिद्ध करतात पण जीनांच्या आणि पाकिस्तानच्या विरुद्ध असलेली माहिती ती पत्रें प्रसिद्ध करीत नाहीत.

व्हाईसरॉयच्या मंत्रीमंडळात जादा मंत्री घेतल्याचे वृत्त आजच्या पत्रांतून प्रसिद्ध झालेले आहे. याबद्दल मला विशेष असे काही वाटत नाही. परंतु यांत ब्रिटीश मुत्सद्दी-पणाची मेख आहे. ती म्हणजे फोडा व झोडा ही भेदनिती आणि राज्यकारभाराची प्रमुख खाती ब्रिटिशांच्या हाती आणि सटरफटर खाती हिंदी मंत्र्यांच्या हाती. म्हणजे स्वायत्ततेचा फुगा हिंदी लोकांना देऊन, निर्भेळ स्वातंत्र्यवादी यांना खिजविणे आणि यांच्यात व हिंदी मंत्र्यांत भांडणे पिकविणे, अशी ही युक्ति आहे. ब्रिटिशांच्या हातून भारतीयांच्या हाती जेंव्हा जेंव्हा सत्ता जास्त येईल तेव्हां तेव्हां जीना मुसलमानांच्या वतीने त्या सत्तेत जास्तीत जास्त वाटा उपटतील हे तुम्ही पूर्वी केलेले भाकीत यावेळी खरे ठरले. कारण जीनानी मुसलमान मंत्र्यांच्याकडे चांगली खाती देवविली. राजाजी जिनांची जी आजपर्यंत खुषामत करीत होते ते, हे पाहून सर्द झाले असतील. तरीही त्यांना अजून वाटत असावे की जीना आपला पाकयोजनेचा मसुदा (सी. आर. फार्म्युला) मान्य करतील. असे एकंदरीत राजकीय वातावरण निराशमय आहे. आणि ते जास्त गोंधळ उत्पन्न करणार असा रंग दिसतो.

"Gandhi has now undergone a complete reversal of his views about the British quitting India and Jinnah is taking the fullest advantage of this volte face. In today's Times it is published a long-interview of Jinnah. I am surprised at the space which the A.P.I. and British newspapers give to Jinnah's tirades as compared with the brief space allotted to anti-Pakistan news. I am not moved a bit by the additions

to the Viceroy's Executive Council announced today. Low called here yesterday with an advance copy of the news and asked me my opinion. I said that the charges would not conciliate public opinion. It is the old device of spitting up existing portfolios and handing them over to Indians retaining at the same time all the key portfolios in the hands of Europeans. Imagine Railways going to Benthal and defence going to Noon .................. I impressed the view that judged by contents of this subject, the heading 'man power' interpreted ejusdem generic did not indicate any liberty to organise defence of this country in the popular sentiment required. What Noon's special claims are to hold this portfolios when an important Maharashtrian like Aney is bothering with overseas Indian. It is difficult to see...... ....All these transfers do not part with the genuine thing that Indian opinion coverts. You were right in your prophesy that Jinnah would insist on his pound of flesh and was not big enough to rise to the occasion. His latest interview confirms the view and poor Rajaji is now hoping against hope that eventually Jinnah will accept his midway proposals. Altogether the situation is not most confusing and elastic and may deteriorate more in course of time...").

२-७-४१ च्या हुकुमाने गव्हर्नर जनरलचे एक्झिक्युटिव्ह कौन्सिलातील सभासदांची संख्या सातावरून बारावर वाढविली. या पांच वाढलेल्या जागांवर सर होर्मसजी मोदी, सर अकबर हैदरी, श्री. राघवेंद्र राव, सर फिरोजखान नून आणि श्री. अणे यांची नेमणूक बादशहाने केली. नॅशनल डिफेन्स कौन्सिल १-८-४१ नंतर गव्हर्नर जनरलने स्थापन केले. त्यांत प्रारंभी फक्त संस्थानिकांना जागा दिल्या. त्यानंतर सर्व प्रांतातील प्रतिनिधीसाठी २२ जागा त्यांत वाढविल्या. अल्पसंख्यांक जमातीसाठी २२ पैकी दोन जागा अस्पृश्य वर्गासाठी दिल्या, त्यावर डॉ. आंबेडकर आणि श्री. राजा यांची नेमणूक करण्यात आली.

९-७-४२ च्या हुकुमाने गव्हर्नर जनरलने जाहीर केले की सर सी. पी. रामस्वामी अय्यर, डॉ. आंबेडकर, सर इ. सी. बेनेगल, सर जोगेन्द्रसिंग, सर जे. पी. श्रीवास्तव आणि खानबहादूर सर मोहम्मद उस्मान यांची गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलवर झालेली नेमणूक बादशहाने मंजूर केलेली आहे. डॉ. आंबेडकर यांच्याकडे मजूर खाते देण्यात आले. त्यांच्या नेमणुकीचा हुकूम मी खाली देत आहे.

GEORGE R. I.

George the Sixth by the grace of god of Great Britain, Ireland and the British Dominions beyond the seas, King Defender of the Faith, Emperor of India.

To our Trusty and Well *Beloved Bhimrao Ramji Ambedkar*, Esquire, Doctor of Science, Barrister-at-Law.

GREETING !

We do by this, Our Warrant Our Sign Manual, appoint you, the said Bhimrao Ramji Ambedkar to be, during Our pleasure, a Member of Executive Council of Our Governor-General of India.

II) And we do here by appoint that so soon as you shall have entered upon the duties of your office, this our warrent shall have effect.

Given at our Court at St. James' this ninth day July in the year of our lord one thousand nine hundred and forty-two and in the sixth year of our Region.

By His Majesty's Command
Sd/- L. S. Awery

(प्रबुद्ध भारत : डॉ. आंबेडकर महानिर्वाण विशेषांक जानेवारी १९५७, पान ६३)

बाबासाहेबांच्या नेमणूकीबद्दल अनेकांनी अनेक मते प्रदर्शित केली त्यापैकी एक नमुनेदार मत मी खाली देत आहे.

When the Viceroy's Council was first expanded in 1941, Doctor Ambedkar indignantly the British Government with breach of faith with the Depressed classes for having excluded them from representation. Of course he was terribly put out that he was left out.. Yet he thundered that he "personally never depended on the support of the British; much less did he have it at any time." He continued "I can do without it for the future. No representation for sixty million Depressed classes is a monstrosity. The Doctor was rewarded within a space of a year with a seat when more space was made available on the Viceroy's Council. He demand the congress all along; but that very congress

created the situation for the expansion of the Viceroy's Council. On the eve of his departure to take office in New Delhi, he told the present writer that he would stand no damned nonsense. "I will urge that the British Government either make immediate terms with the congress and arrive at the settlement or lock them all up till the war was over. I won't have half-measures" he was true to his word. The story ran true that he was the foremost amongst the Indian members of the Viceroy's Executive Council who strongly urged the immediate arrest of all the congress leaders the moment the All India Congress Committee passed their historic resolution in Bombay for launching the movement; though the door was kept open for conciliaton in the form of the intervening period by which Mahatma Gandhi was to communicate with the Viceroy and it was to be made a starting point of negotiation" (Man and Supermen of Hindustan, Page 23-24).

१५ फेब्रुवारी १९४२ ला जपानने सिंगापूर जिंकले. ७ मार्च १९४२ ला काही ब्रम्ही लोकांनी रंगून सोडले व ते जपानी सैनिकांना चुकवून रानावनातून भटकत राहिले. युद्धाच्या आघाडीवरील परिस्थिती पाहून ब्रिटिश राज्यकर्त्यांना हिंदुस्थान आपल्या ताब्यातून जातो की काय, अशी भिती वाटू लागली. क्रिप्सला हिंदुस्थानांत पाठवून भारतीय राजकीय पक्षांच्या ध्येयधोरणांचा मागोवा घ्यावा, मग भारताला राजकीय हक्क की संपूर्ण स्वातंत्र्य द्यावे हे ठरवावे, असे चर्चिलने धोरण स्विकारले. क्रिप्सला, ब्रिटीश सरकार हिंदुस्थानात पाठविणार अशी घोषणा चर्चिलने पार्लमेंटमध्ये १३ मार्च १९४२ला केली.[Tragedy of Jinnah page 76-77 by Kailash Chandra.]

रशियाचे सहाय्य मिळविण्याच्या उद्देशाने चर्चिल स्टॅलिनला भेटण्यासाठी प्लेनने मास्कोला १० ऑगस्ट १९४२ ला पोहोचले. स्टॅलीन व मोलोटोव्ह यांनी चर्चिलचे स्वागत विमानतळावर केले. त्यांना स्टॅलिनने आपल्या राजवाड्यात मेजवानी दिली. मेजवानीत ३७ पदार्थ तयार केलेले होते. या वेळी मास्कोतील लोक ब्रेड व इतर धान्य (रेशन) यासाठी ३–४तास दुकानासमोर उभे होते तरी त्यांना रेशन मिळाले नाही. चर्चिलने बोलणे सुरु केले. स्टॅलिन नुसता हुंकार देत होता. पण आपण रशियाला युद्धात दोस्त राष्ट्राच्यातर्फे येऊ देऊ असा स्पष्ट जवाब त्याने चर्चिलला दिला नाही.

[It was Churchill's Shadow, by Ex-Detective Inspector W. H. Hampson, Pages 95-98 (1951).]

पुढे रशिया युद्धात शिरला तो आपोआप. त्यात चर्चिलच्या भेटीच्या संबंध नव्हता. सारांश सर्व बाजूंनी भयानक परिस्थिती निर्माण झाल्यानंतर चर्चिल, साम्राज्य वाचविण्यासाठी सर्व उपाय योजू लागले. क्रिप्स साहेबांना भारतात पाठविण्याचा त्यांचा हेतू भारतात जनता व सरकार यामधील संघर्ष टाळण्याचा होता.

ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्टस फेडरेशनच्या अगोदर स्वतंत्र मजूर पक्ष अस्तित्वात होता. त्या पक्षातर्फे क्रिप्स मिशन पुढे अस्पृश्यांची राजकीय कैफियत बाबासाहेबांनी मांडली. तेव्हा क्रिप्ससाहेबांनी असे उद्‌गार काढले की, मजूर पक्ष काही जातीय राजकारणाचा पाठ पुरावा करू शकत नाही. मग त्यांची कैफियत अस्पृश्य वर्गातर्फे तुम्ही स्वतः मांडणे तुम्हाला तर्कनिष्ठ दिसते काय? तुम्ही दुसऱ्या जातीय संस्थेतर्फे कैफियत मांडा. ही दिल्लीत घटना घडली. तेव्हा बाबासाहेबांनी सर्व पुढाऱ्यांना तारा पाठवून बोलावून घेतले आणि सर्व परिस्थिती त्यांच्यापुढे ठेवून नवी संस्था काढण्याचा आपला मनोदय प्रकट केला. बाबासाहेबांनी संस्थेचे नाव व घटना अगोदरच तयार करून ठेवली होती. नागपूरला अस्पृश्यांतर्फे जंगी परिषदा भरविण्याचे आणि फेडरेशनची स्थापना व घटना तयार करण्याचे ठरविण्यात आले. (हे सर्व सोपस्कार बाबासाहेबांनी अगोदरच दिल्लीत केलेले होते. फक्त त्याला कायदेशीर स्वरुप या वेळी मिळाले). या तीन परिषदांची नावे अशी :

(१) ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस कॉन्फरन्स – थर्ड, सेशन, १८ व १९ जुलै १९४२.

(२) ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस वुईमेन्स कॉनफरन्स २० जुलै १९४२.

(३) समता सैनिक दल कॉन्फरन्स २० जुलै १९४२.

या तिन्ही परिषदेस सुमारे पाऊण लाख लोक उपस्थित होते. त्यात सुमारे २० हजार स्त्रिया होत्या. नागपूर येथील मोहन पार्क येथे नागपूरकरानी परिषदांसाठी प्रचंड मंडप उभारला होता. त्याला आंबेडकर, हरदास, काळू आहेरे व रमाबाई यांच्या नावाचे चार बाजूंना चार दरवाजे होते. १८ व १९ जुलै १९४२ च्या तिसऱ्या – अधिवेशनासाठी अध्यक्ष म्हणून बाबासाहेबांची अगोदर निवड करण्यात आली होती. परंतु त्यांना ९ जुलैच्या हुकुमान्वये व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात घेतल्यामुळे, त्यांना अध्यक्षपद भूषविता आले नाही. ते पद मद्रासचे रावबहादूर एन. शिवराज, एम. एल. ए. (दिल्ली), मद्रास लॉ कॉलिजचे प्रोफेसर आणि किंग्ज-कमिशन कमिटीचे सभासद यांना देण्यात आले. बाबासाहेब आणि शिवराज आणि त्यांचे सहकारी नागपूरला १८ जुलैला सकाळी ९ वाजता आगगाडीने येऊन पोहोचले, तेव्हां त्यांची प्रचंड मिरवणूक स्टेशनपासून मोहन पार्क हॉटेलपर्यंत काढण्यात आली. समता सैनिक दल व त्यांचा बँड अग्रभागी होते. सन्माननीय मंडळी हॉटेलमध्ये चार दिवस राहिली.

दी ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस कॉन्फरन्सचे तिसरे अधिवेशन नागपूर येथे १८ व १९ जुलै १९४२ ला भरविण्यात आले. त्याचे अध्यक्ष रावबहादूर एन. शिवराज बी.ए.बी.एल., एम.एल.ए. (सेंट्रल) हे होते. दी. ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस वुईमेन्स कॉन्फरन्स याचे अधिवेशन २० जुलैला भरविण्यात आले होते. अध्यक्ष सौ. डोंगरे (अमरावती) या होत्या. दी समता सैनिक दल कॉन्फरन्स २० जुलैला भरविली होती. तिचे अध्यक्ष–गोपाळसिंह एच.बी.ई., एम.एल.ए. (पंजाब) हे होते. या तीन परिषदांचा इंग्रजी अहवाल (पाने १२१), श्री. जी. टी. मेश्राम, तिसऱ्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष यांनी ७-९-१९४२ ला "मंगलधाम" इंदोरा, नागपूर येथे प्रसिद्ध केला.

तिसऱ्या अधिवेशनांत पाच ठराव मंजूर करण्यात आले. हे सर्व ठराव राजकीय स्वरुपाचे होते. या अधिवेशनांत बाबासाहेबांचे भाषण झाले. (पान. २६–३६, ४५–४७) ते भाषण संपूर्ण राजकीय स्वरुपाचे होते.

(१) क्रिप्ससाहेबांची राजकीय योजना (पा. ९८–९९).

(२) सदर योजनेस बाबासाहेबांचे निषेध प्रदर्शक निवेदन (पा. १००–१०६).

(३) हरिजन पत्राच्या २–८–४२ च्या अंकात प्रसिद्ध झालेली गांधीजींची मते अस्पृश्यांच्या राजकीय प्रगतीला कशी घातक आहेत हे दर्शविण्यासाठी गांधीजींच्या एक हरिजन एम.एल.ए. ने विचारलेले प्रश्न व गांधीजींनी दिलेली उत्तरे आणि (४) नवीन राजकीय पक्ष, ऑल इंडिया शिड्यूल्ड कास्टस फेडरेशन याची घटना (पा. १०९–२६) ही सदर अहवालात देण्यात आलेली आहेत.

राजकीय स्वरूपाचे जे पांच ठराव झाले त्यांत (१) क्रिप्स योजना अस्पृश्यांना नापसंत आहे (२) घटना परिषद लौकर भरविण्यात यावी याबद्दल मागणी (३) अस्पृश्यांच्या संरक्षणाची तरतूद घटनेत करण्याबद्दल मागणी. अस्पृश्यांच्या हिताची कामे करण्याबद्दल एक मोठी रक्कम प्रत्येक वर्षी अंदाज पत्रकात मंजूर करणे, पब्लिक सर्व्हिस कमीशन, मोठ्या अधिकाराच्या जागा, कायदे मंडळे व स्थानिक स्वराज्यसंस्था यांत भरपूर प्रमाणात अस्पृश्यांना असाव्यात अशा मागण्या केल्या. (४) अस्पृश्यांच्या निराळ्या वसाहती असाव्यात त्यासाठी सेटलमेंट कमिशनर असावा, अस्पृश्यांना सरकारी जमिनी द्याव्यात वगैरे, (५) ऑल इंडिया शेड्युल कॉस्टस फेडरेशनची स्थापना एक प्रमुख मध्यवर्ती राजकीय पक्ष म्हणून करणे. सदर मूळ ठराव मी खाली देत आहे.

## RESOLUTION NO. I

## CRIPPS' PROPOSALS UNACCEPTABLE.

This conference declares that the proposals of His Majesty's Government relating to constitutional charges sent out with Sir Stafford Cripps are utterly unacceptable

to the Scheduled Castes. In the opinion of this conference these proposals were nothing but a betrayal of the interests of the Scheduled Castes and a breach of the assurance given by His Excellency the Viceroy in his declaration of 8th August 1940 on behalf of His Majesty's Government that the constitution, which had not the consent of the Scheduled Castes, would not be imposed upon them.

## PROTEST AGAINST CRIPPS PROPOSALS.

This conference places on record its emphatic protest against His Majesty's Government agreeing to the demand made by the Congress that the new constitution be framed by the Constituent Assembly and also against the proposal of safeguarding the interests of the scheduled castes by a treaty between the New Indian, National Government and the Government of His Majesty's in Great Britain.

## RESOLUTION NO. II

## CONSENT TO CONSTITUTION NECESSARY

This conference declare that no constitution will be acceptable to the Scheduled Castes unless, (i) it has the consent of the Scheduled Castes, (ii) it recognises the fact that the Scheduled Castes are distinct and separate from the Hindus and constitute an important element in the national life of India, (iii) It contains within itself provisions, which will give to the Scheduled Castes a real sense of security under the new constitution and which are set out in the following resolutions.

## RESOLUTION NO. III

## ESSENTIAL PROVISIONS IN NEW CONSTITUTION.

For creating this sense of security in the Scheduled Castes, this conference demands that the following provisions shall be made in the new constitution :

Provisions in provisional Budgets for Scheduled Castes advance:—

(1) That in the budget of every Provincial Government an annual sum, as may be determined upon by agreement, be set apart for promoting the primary education among the children of the Scheduled Castes and another annual sum for promoting advanced education among them and such sums shall be declared to be the first charge on the revenues of the province.

(2) That provision shall be made by law for securing representation to the Scheduled Castes in all Executive Governments, Central and Provincial, the proportion of which shall be determined in accordance with their number, their needs and their importance.

(3) Representation in Public Services : That provisions shall be made by Law for securing representation to the Scheduled Castes in the Public Services, the proportion of which shall be fixed in accordance with their members, their needs and their importance. This conference insists that in case of essential services, such as judiciary, Police and Revenue, provision shall be made that the proposition fixed for Scheduled Castes shall, subject to the rule of minimum qualification, be realised within a period of ten years.

(4) Representation by Statute in all Legislatures and Local Bodies :—

That provision shall be made by law for guaranteeing to the Scheduled Castes representation in all Legislatures and Local Bodies in accordance with their number, needs and importance.

(5) Separate Electorate : That provision shall be made by law whereby the representation of the Scheduled Castes in all Legislatures and Local Bodies will be by the method of Separate Electorates.

(6) Representation on Public Service Commissions : That provision shall be made by law for the representation of the Scheduled Castes on the Public Service Commissions Central and Provincial.

## RESOLUTION IV

## CHANGE IN VILLAGE SYSTEM

That so long as the Scheduled Castes continue to live on the outskirts of the village, with no source of livelihood and in small numbers as compared to the Hindus they will continue to remain untouchables and subject to the tyranny and oppositon of the Hindu and will not be able to enjoy free and full life. For the protection of the Scheduled Castes from the tyranny and opposition of the caste Hindus to enable them to develop to their fullest manhood, to give them economic and social security and also to pave the way for the removal of untouchability this conference has after long and mature deliberation come to conclusion that a radical change must be made in the village system, now prevalent in India and which is the parent of all the ills from which the Scheduled Castes are suffering for so many centuries at the hands of Hindus. Realising the necessity of these changes this Conference holds that along with the constitutional changes in the system of Government there must be a change in the village system now prevalent made along the following lines:—

(1) SEPARATE VILLAGES : The constitution should provide for the transfer of the Scheduled Castes from their present habitation and constitute separate Scheduled Castes villages away from and independent of Hindu villages.

(2) SETTLEMENT COMMISSIONS : For the settlement of the Scheduled Castes in new villages a provision shall be made by the constitution for establishment of a Settlement Commission.

(3) LAND FOR SCHEDULED CASTES : All Government land which is cultivable and which is not occupied shall be handed over to the Commission to be held in trust for the purpose of making new settlement of the Scheduled Castes.

(4) ACQUISITION OF NEW LAND : The Commission shall be empowered to purchase new land under the Land

Acquisition Act from the private owners to complete the scheme of settlement of the Scheduled Castes.

(5) CENTRAL GOVERNMENT TO PROVIDE MINIMUM OF FIVE CRORES PER ANNUM:—

The constitution shall provide that the Central Government shall grant to the Settlement Commission minimum sum of Rs. five crores per annum to enable the Commission to carry out their duty in this behalf.

*Resolution No. V* :

*Establishment of all India Scheduled Castes Federation*

This Conference is of opinion that the time has arrived for the establishment of a Central Political Organization for carrying on the political movement of the Scheduled Castes.

This Conference, therefore, resolves to establish the All India Sceduled Castes Federation as the Central Political Organization of the Scheduled Castes of India and appeals to all political organisations of the Scheduled Castes to merge into this Central Organization and work through it. For execution of this purpose this conference authorises the Conference to form a Committee with himself as a Chairman to frame a constitution for the All India Scheduled Castes Federation. The Committee will submit the report to a provisional council consisting of the following, on whose approval the constitution shall become operative.

*Bengal* : M|s. R. L. Biswas, A. D. Roy, R. S. Dhurya, B. C. Mandal.

*Bombay* : M|s. D. G. Jadhav, P. N. Rajbhoj, B. K. Gaikwad.

*Punjab* : M|s. Gopal Singh, Seth Krisandas.

*C.P. and Berar* : M|s. R. V. Kavade, R. H. Shendre, H. L. Kosare.

*U.P.* : Raj Saheb Shamlal, Raj Saheb Ramsahai, Dr. Dandalal Jaiswal, Shri Badriprasad Balmiki, Shri Babu Tilak Chand.

वरील ठरावांवर खालील वक्त्यांनी भाषणे केली. बी. के. गायकवाड, एम.एल.ए. (नासिक), रायसाहेब शामलाल (अलहाबाद), गोपाळसिंह एम. एल. ए. (पंजाब) एन. एम. दास, बी.ए.बीएल. (कलकत्ता), आर. आर. भोळे, बी.एस.सी., एल.एलबी. (पुणे), ए. डी. रॉय, बी.ए., एम.एल.सी. (जेस्सोर), पी. एम. पट्टणी (अहमदाबाद), मंगीलाल (राजपुताना), बी. एच. वराळे, एम.एल.ए. (कर्नाटक), डी. जी. जाधव, बी.ए., एल.एल.बी. (जळगांव), राईसाहेब, एन. सी. धुरीया (बंगाल), पी. एन. राजभोज (पुणे)), बी. सी. मंडल, बी.ए. (कलकत्ता), बद्रीप्रसाद वाल्मीकी (अलाहबाद) पी. एल. के. तलिब, एम. ए., एल. एल. बी., पी.एडी. (लखनौ), पी. एस. रोहम, एम.एल.ए. (अहमदनगर).

महिला परिषदेत जे ठराव झाले त्यांत घटस्फोट घेणे व देणे, स्थावरजंगम इस्टेटीत वाटा मिळणे, वगैरे प्रमुख ठराव होते, या ठरावावर खालील महिलांची भाषणे झाली.

सौ. राधाबाई कांबळे, जयाबाई चौधरी, कु. मंजुळा कानफाडे, कु. लतिका गजभिये, कु. सुलोचना नाईक, कु. वीरेंद्रबाई तीर्थंकर, कु. चंद्रभागा पाटील, कु. कौसल्या नंदेश्वर आणि कु. इंदिराबाई पाटील.

रावबहादूर शिवराज यांनी आपल्या भाषणात अस्पृश्यांच्या राजकीय हक्कासंबंधी केलेल्या चळवळीचा संक्षिप्त इतिहास सांगितला, आणि कॉंग्रेस, हिंदु लोक आणि सरकार यांनी वेळोवेळी स्विकारलेल्या, विरुद्ध भूमिकेबद्दल त्यांना दोष दिला. डॉ. आंबेडकरांनी क्रिप्सबरोबर जी वाटाघाट केली तीत क्रिप्ससाहेबांनी जे विरोधी धोरण स्विकारले त्याचा संक्षिप्त इतिहास सांगून शिवराज यांनी क्रिप्ससाहेबावर खूप टीका केली. पुणे करारामुळे कॉंग्रेसला अस्पृश्यांच्या राजकीय हक्कावर हव्या त्या मार्गांनी आक्रमण करण्यात वाव मिळाला, या मुद्यावर त्यांनी सोदाहरण भाषण केले, व पुणे करारात योग्य तो फेरफार करा, अगर तो करार रद्द करा, अशी मागणी केली. बाबासाहेबांना अस्पृश्यांतर्फे मंडपात मानपत्र देण्यात आले, तेव्हा त्यांनी मानपत्राला उत्तर देताना जे भाषण केले त्यात कराराने कॉंग्रेसच्या हाती, अस्पृश्यांना प्राणघातक अशी गोष्ट मिळाली आहे, याचे विवेचन केले आणि सदर करारच रद्द केला पाहिजे अशी मागणी केली. कराराची मुदत २४-९-१९३२ ला संपत होती. तेव्हा तो करार रद्द करण्याच्या वाटाघाटी कॉंग्रेसने आमच्या बरोबर कराव्यात अशी मागणी केली. सदर मुद्याला उद्देशून कॉंग्रेस पुढाऱ्यानी असे मुद्दे उपस्थित केले की, करारावर २४-९-१९३२ ला जरी सह्या झालेल्या असल्या तरी १९३५ च्या कायद्यान्वये पहिली निवडणूक १९३७ (फेब्रुवारी) सालात झाली म्हणून दहा वर्षाचा कराराचा काळ १९४७ सालात संपतो. सदर पुढाऱ्यांनी दुसरेही मुद्दे उपस्थित केले, आणि अस्पृश्यांच्या या मागणीचा धिःकार केला. त्यासंबंधीची त्यांची भाषणे कॉंग्रेसच्या सभांमधून होत असत. पुणे करारात फेरफार करण्यासंबंधी उभय पक्षात सम्मती हवी, असे एक कलम होते. अस्पृश्यांतर्फे

आंबेडकर पक्ष आणि हिंदूंतर्फे काँग्रेस आणि काँग्रेस अनुयायी अस्पृश्य यांच्या सह्या करारावर होत्या. करारात फेरफार करण्यास काँग्रेसपक्षीय हिंदू व अस्पृश्य तयार नव्हते, आणि ते १९४६ सालातही तयार (निवडणूकीअगोदर) नव्हते. १९४७ साली घटना–परिषद चालू झाली, तेव्हां पुणे कराराचे महत्त्व शिल्लक राहिले नव्हते. तो करार आपोआपच गतप्राण झाला.

फर्स्ट अँड सेकंड महार बटालियन्स यांचा तळ कामटी येथे होता. बाबासाहेबांना भेटण्यासाठी यांचे ऑफीसर आले, आणि त्यांनी बाबासाहेबांना चहा पार्टीचे आमंत्रण दिले. बाबासाहेब कामटीला गेले व — चहापार्टीनंतर त्यांनी सैनिकांसमोर, त्यांना उद्देशून भाषण केले की, महार आणि महाराष्ट्र यांची शूरत्वाची उज्ज्वल परंपरा तुम्ही सतत डोळ्यापुढे ठेवा आणि मर्दुमकी करून नावलौकीक आणि अधिकार मिळवा. दोन्ही बटालियन्स, त्यांचे कमांडिंग ऑफिसर्स आणि बाबासाहेब यांचा फोटो घेण्यात आला.

नागपूरची परिषद संपल्यानंतर बाबासाहेब मुंबईत आले. दुसऱ्यदिवशी त्यांनी यशवंतराव, मुकुंदराव, द्रौपदी व शंकरमामा यांना आपल्या अभ्यासिकेत बोलावून घेतले. मी दिल्लीला जाणार आहे, तुम्ही सर्वजण नीट रहा, आणि माझी लायब्ररी व्यवस्थितपणे संभाळाअसा उपदेश त्यांनी सर्वांना केला. यासर्वांसाठी त्यांनी कपडे आणले होते ते त्यांना दिले. आणि मग रमाबाईंची आठवण काढून ते म्हणाले 'ती आता असती तर तिला फार आनंद झाला असता! तिने माझ्यासाठी खूप त्रास काढला.' त्यांचा कंठ सद्‌गदीत झाला. डोळयात अश्रू जमा झाले. त्यांचे अश्रू पाहून सर्वजण रडू लागले.

फेडरेशनच्या घटनेचा मराठी अनुवाद श्री. सखाराम मेश्राम वकील, नवी वस्ती, नागपूर, यांनी केला, आणि तो हरिदास आवळे, कार्यवाह मध्यप्रांत, वऱ्हाड शे. का. फे. नागपूर, यानी ३१–१२–४२ ला पुस्तकरुपाने प्रसिद्ध केला. किंमत ४ आणे (पाने १५) "हिंदुस्थानच्या राजकीय जीवनात दलितांना स्वतंत्र व स्वयंपूर्ण दर्जा प्राप्त करून देऊन, त्यांची संख्या त्यांच्या गरजा, व त्यांचे महत्त्व या सर्व बाबीमुळे त्यांना जे हक्क मिळणे अपरिहार्य आहे, ते त्यांचे राजकीय, सामाजिक व आर्थिक हक्क मिळवून देणे, हे अखिल भारतीय दलित फेडरेशनचे उद्देश आहेत" असे भाग (१) यात ध्येय व्यक्त केलेले आहे. घटना २३ भागांत लिहिलेली होती.

नागपूर परिषदेत मंजूर झालेल्या ठरावाच्या प्रती प्रांतिक गव्हर्नर, आणि व्हाईसरॉय यांच्याकडे पाठविण्यात आल्या. परंतु सरकारने काही ठरावाना महत्व दिले. काहीना दिले नाही, ज्यांना महत्व दिले त्या ठरावातील मागण्या पुढील काळात मध्यवर्ती सरकारने अंशतः का होईना पण मंजूर केल्या.

राजकारणात जातीयवाद आणू नये या धोरणाने बाबासाहेबानी १९३६ सालात भारतीय स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला पण काँग्रेस व सरकार यांच्या अडेलतट्टू धोरणा-

मुळे जातीयवाद १९३७ सालानंतर राजकारणात धुमाकूळ घालू लागला, आणि मग बाबासाहेबानाहि जातीयवादाचा मार्ग स्विकारणे अटळ होऊन बसले. म्हणूनच त्यांनी १९४२ सालात अस्पृश्यांची राजकीय संस्था (फेडरेशन) स्थापन केली.

क्रिप्सच्या योजनेत पाकिस्तान निर्मीतीची बीजे आहेत, हे काँग्रेस पुढाऱ्यांनी ओळखले होते. ती योजना त्याज्यकरण्याची इतर कारणे उघडपणे काँग्रेसने जाहीर केली होती. परंतु या गुप्त कारणांची वाच्चता त्यांनी फारशी केली नाही. ब्रिटीशांची ही झोडा आणि फोडाचीकुटिल नीती हाणून पाडली नाही तर लीग तिचा फायदा घेईल हे उघड होते म्हणून या परिस्थितीला पायबंद घालणारी चळवळ देशात सुरू होणे जरूर होते. गांधीजींच्या प्रेरणेने काँग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक मुंबईत ६ ते ८ ऑगस्ट १९४२ ला भरविण्यात आली आणि तीत सर्व राजकीय परिस्थितीचा विचारविनीमय होऊन "छोडो भारत" याबद्दलचा ठराव मंजूर करून काँग्रेसने ब्रिटीशांना "भारत सोडून जा" असा संदेश दिला. ८ ऑगस्टला रात्री सर्व काँग्रेस–पुढाऱ्यांना पकडून तुरुंगात टाकण्यात आले आणि ९ ऑगस्टपासून मुंबईत व सर्व देशात ब्रिटीश सरकारविरुद्ध आंदोलने सुरू झाली. या आंदोलनात सरकारी कचेऱ्या, रेल्वेस्टेशने, पोष्ट ऑफिसेस, बस, ट्रामगाड्या व आगगाड्या जाळण्याची चळवळ आणि सरकारी खजिने लुटण्याची धाडशी कृत्ये सुरू झाली. याच चळवळीतून सातारा जिल्ह्यात प्रतिसरकार (पत्री सरकार) सुरू झाले. ऑगस्ट क्रांतीच्या ज्वाला सर्व देशभर पसरलेल्या पाहून क्रिप्सनी न्यूयॉर्कमधील आपल्या वास्तव्यात भारतीय राजकाणातील पेचप्रसंगावर एक लेख न्यूयॉर्क टाईम्सच्या २३–८–४२ च्या अंकात प्रसिद्ध केला. हिंदू मुसलमानांचे जेव्हां ऐक्य होईल तेव्हांच हे पेच सुटतील आणि ते ऐक्य जोपर्यंत हिंदू लोक मुसलमानांच्या हक्काना मान्यता देणार नाहीत तो पर्यंत होणार नाही असा त्या लेखातील मुख्य सूर होता.

["....When I was in India, it was not possible to get the leaders of Congress party and the Moslem League even to meet, much less to discuss, any constitutional question. .... the Moslem League, which upon any communal or religious issue speaks for a greater majority of Moslem population of 90,000,000 ...." (Warning to the West, page 107 by Krishanalal Shridharani.)]

क्रिप्स योजना अयशस्वी झाली, याची जी कारणे आहेत त्यांत हे एक कारण आहे की मुसलमानेतर अल्पसंख्यांक जातींनी एकमत करून मुसलमानांना विरोध केला नाही. तसे झाले असते तर मुसलमानांना बाजूला करून सदर योजनेत फेरफार झाले असते. प्रत्येक जातीने स्वतःच्या फायद्याकडे पाहून त्या योजनेला विरोधच केला. असा एक विचारप्रवाह क्रिप्सयोजनेच्या अयशस्वीतेबद्दल वहात होता.

"The attitude of the chief non-Moslem minorities to the constitutional proposal was not unanimous. Roughly speaking, the Depressed Classes and Sikhs took one view, the Indian Christians, the Anglo-Indians and the European community took another.

It was only to be expressed perhaps that the political leaders of the Depressed classes, who number some 60 millions, would disapprove of the scheme. Their attitude is familiar. In opposition to Mr. Gandhi, whose interest in their welfare is well-known. They claim to be regarded, not as a part of the great Hindu society but as a distinct community which must be protected by special safeguards from caste-Hindu domination. All that could said to reassure them was, first, that they would obtain the same measure of representation in the constitution making body as they now possess in the Provincial legislatures and accordingly, that the Treaty to be concluded with that body would provide in accordance with the undertakings given by the Majesty's Government, for the protection of social and religious minorities — a phrase which, as Sir Stafford stated was included to cover the Depressed Classes. But those assurances were not enough. "We are all of us absolutely convinced,' wrote Dr. Ambedkar and Mr. Rajah, "That the proposals are calculated to do the greatest harm to the Depressed Classes and are sure to place them under an unmitigated system of Hindu rule." (The Cripps Mission, page 20 by R. Coupland).

व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात (Executive Council) जादा हिंदी सभासद घ्यावेत याबद्दल व्हाईसरॉय यांनी ८ ऑगस्ट १९४० ला एक जाहीर निवेदन केल्यानंतर सर्व राजकीय पक्षाबरोबर चर्चा केली. तेरा सभासदापैकी आठ सभासद हिंदी असावेत, पण सर्व सत्ता व्हाईसरॉयच्या हाती असावी आणि सभासद फक्त सल्लागार म्हणूनच रहावेत असा निर्णय चर्चेनंतर व्हाईसरॉय यांनी २२ जुलै १९४१ ला जाहीर केला. राष्ट्रीय संरक्षण मंडळ याची ही भूमिका सल्लागाराचीच ठरविण्यात आली. सर्व मुद्यावरील निर्णय फक्त व्हाईसरॉयच घेतील, असे ठरविण्यात आले. रुझवेल्टनी आपले स्पष्ट मत जाहीर केले की, अॅटलांटिक चार्टर हा सर्व देशांना लागू करण्यात येईल व त्या अन्वये प्रत्येक देशाला स्वयंनिर्णयाचा हक्क

मिळेल. चर्चिलनी ९ सप्टेंबर १९४१ च्या कॉमन्समध्ये जे भाषण केले त्यात त्यांनी जाहीर केले की ऑगस्ट १९४० च्या निवेदनांत जरी भारताला स्वयंनिर्णयाचे आश्वासन दिले होते तरी ॲटलांटिक चार्टर भारताला लागू करता येणार नाही; या राजकीय डावपेचामुळे भारतीय राजकीयपक्षांत ब्रिटिशांबद्दल संताप वाढू लागला. मुस्लिम लीगची बैठक मुंबईत २५ ऑगस्ट १९४१ ला भरली. लीगने राष्ट्रीय संरक्षण मंडळातील आपल्या सभासदांना राजीनामे देण्याचा निर्णय घेतला. तेव्हां शिकंदर हयात खान वगैरेंनी राजीनामे दिले. पण व्हाईसरॉयने जीना वगैरेंची समजूत काढून पुन्हा सर शिकंदर हयात खान व फझलुल हक्क यांना मंडळाचे सभासद म्हणून घेतले. या घडामोडीमुळे जीना व मुस्लिम लीग याबद्दल मुसलमानांमध्ये आदरभाव पसरला.

डॉ. आंबेडकर यांनाही राष्ट्रीय संरक्षण मंडळात व्हाईसरॉयनी घेतले तेव्हा त्यांनी एक निवेदन काढले की मी हिंदुसमाजाचा कट्टर टीकाकार आहे म्हणून ब्रिटिश सरकार माझा उपयोग हिंदी-स्वातंत्र्याविरुद्ध करील, पण मी हिंदी समाज आणि त्याचे असंख्य सामाजिक दोष यांच्या विरुद्ध जे टीकेचे प्रचंड प्रहार केलेले आहेत त्यापेक्षा शेकडोपटीने जहरी व हृदयभेदक टीकेचे प्रहार मी ब्रिटीश राज्यकर्त्यांवर करीन, आणि माझा राजनिष्ठेच्या नावावर ब्रिटिश राज्यकर्ते अस्पृश्यांचा उपयोग, आपले साम्राज्य स्थीर करण्यासाठीच करणार असेल आणि तेवढ्यासाठीच त्यांना अन्न देत असेल तर अस्पृश्यांना मी ब्रिटिशांच्या पाशवी पंजातून बाहेर काढीन.

("I have directed for these many years bitter and virulent attacks on Hindu Society and its numerous evils, but I can assure you that I shall direct attack a hundred-fold more bitter, more virulent, more deadly against the British than I have done against Hindus if my loyalty is going to be exploited for crushing my own people and taking away from them last dry bone from which they draw their sustenace." (Ten Years To Freedom, page 58-59.) आंबेडकरांनी या निवेदनाने आपली राजनिष्ठा आणि समाजनिष्ठा यांचे प्रदर्शन केले पण ते हिंदुसमाज, राजकीय पुढारी आणि ब्रिटिश राजकर्ते यांना पटले नाही.

व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळांत बाबासाहेबांची नेमणूक झाल्यावर ते दिल्लीला रहावयास गेले. त्यांना २२, पृथ्वीराज रोड, नवी दिल्ली येथे बंगला रहाण्यास मिळाला. या बंगल्यात आपल्याला बड्या बड्या लोकांचे स्वागत करावे लागेल, भोजने द्यावी लागतील, तेव्हां बंगल्याची सजावट उत्तम झाली पाहिजे असे साहेबांना वाटू लागले. या बाबतीत त्यांनी कु. डेंसरबाई यांचे सहाय्य घेण्याचे ठरविले. त्यांनी त्यांना दिल्लीला बोलावून घेतले. बंगला सुशोभित करण्यासाठी लागणारे पडदे, स्वयंपाकाला व जेवणाला (युरोपियन व हिंदी पद्धतीप्रमाणे) लागणारे सामान, विकत घेण्यास डेंसरबाईंना परत

मुंबईस यावे लागले. त्यांनी मिसेस ई. एम. मफ्फत बाईच्या सहाय्याने सुमारे आठ हजार रुपयांचे सामान खरेदी केले व दिल्लीतील साहेबांचा बंगला अद्यावत सुशोभित केला; तेव्हां त्या बंगल्यात साहेबांनी पहिली चहापार्टी दिली, ती ड्रेशरबाई व त्यांचे सहकारी बिशप रॉबीन्सन. बिशप पिकेट यांना. या पार्टीला बडे लष्करी व मुलकी अधिकारीही हजर होते. ड्रेशरबाईनी मजजवळ उद्गार काढले की, इतकी सुंदर पार्टी उभ्या जन्मात मला पहावयास मिळाली नव्हती.

आपणाला डॉक्टरसाहेबांच्या उपयोगी हरघडी पडता यावे म्हणून मी दिल्लीत एका हॉटेलात स्वतंत्रपणे सहा महिने राहिले होते. व नंतर मुंबईस परतले अशी हकीकत ड्रेशरबाईनी मला सांगितली.

कु. ड्रेशरबाई याचे संपूर्ण नांव व पत्ता :- Miss Mildred G. Drescher, 363 Benjamin Ave. S.E. GrandRapids 6, Michigan, U.S.A. हा पत्ता कु. क्लायनर (Miss G. Kliner W.D.C.S. of the Methodist Church, Club Back Road, Agripada, Bombay-8.) यांनी मला दिला. श्री. रमेश कांबळे यांनी मला त्यांच्याकडे २२-८-५० ला नेले होते ते सदर पत्ता मिळविण्यासाठीच. मी बाईना चरित्रखंड १ ची प्रत व पत्र सदर पत्त्यावर पाठविले. यांनी उत्तर दिले ते असे :-

"Dear Mr. Khairmoday,

I was very glad to receive your book in Marathi and your letter about our great Dr. Ambedkar. I do wish I could remember Marathi well enough to enjoy reading it but I find I have forgotten it because I have been away from India so long.

I have quite file about the Doctor and early in 1958 I shall try to send answers to your questions. My mother has been very ill for months, and has just died so I will have more time.

I feel Dr. Ambedkar was one of India's great souls and I shall be glad to help in any way I can write his story.

Do try to write a book in English about him that the world may know of him and his brave struggle.

Sincerely

Sd|- Mildred G. Drescher.

ड्रेशरबाई माझ्या घरी १७ एप्रिल १९५८ ला सकाळी ९-४५ च्या सुमारात आल्या तेव्हा जरा मी गोंधळून गेलो. बरोबर कु. कमिशार होत्या. ड्रेशरबाई खाटमांडूला

मिशनच्या कामासाठी जाणार होत्या व गडबडीने त्या मला भेटण्यास आल्या असल्याचा खुलासा केला. त्यांनी मला १८ एप्रिलला २२, क्लब बॅन्क रोड, W.D.S. of the Methoditt Church आग्रीपाडा येथे भेटण्यास सांगितले. त्यांना मी जे प्रश्न विचारले होते ते त्यांनी लिहून काढले होते. मी त्यांना भेटलो तेंव्हां त्यातील काहीना त्यांनी स्वहस्ते उत्तरे लिहिली. काहीची तोंडी माहिती सांगितली आम्ही सकाळी ९ ते ११–५५ वाजेपर्यन्त बोलत बसलो होतो.

त्यांची थोडक्यात माहिती अशी :—

**वडिल** – माईल्य आर. ड्रेशर जन्म २३–३–१८६८
मृत्यु ८–३–१९५२.

**आई** : मिनर्व्हा एन्. ड्रेशर, जन्म ९–१०–१८७०, मृत्यु २०–११–१९५७.

**मिल्डेड** : जन्म ४–१०–१८८८, जोन्स (मिचिगॅन) येथे.

**शिक्षण** : मिचिगॅन बेर्टर्न कॉलिजातून युनिव्हर्सिटी ऑफ मिचिगॅनची बी.ए. व एम.ए.

**जीवन** : शिक्षिका म्हणून जीवनास सुरवात. नंतर समाजसेवेस वाहून घेण्याचे ठरविले. एप्रिल १९२० सालात हिंदुस्थानात आल्या व नागपूर (मध्य प्रांत) येथे मिशन स्कूलमध्ये शिक्षिका म्हणून काम करू लागल्या. त्यांनी तेथे मॅकोसाबाग नॉर्मल स्कूल स्थापन केले. व ते भरभराटीस आणले. त्यांची बदली मुंबई येथील आग्रीपाडा मिशन मध्ये १९३० मध्ये झाली. त्या अस्पृश्यांच्या वस्तीत फिरत व त्यांच्या अडीअडचणीच्या वेळी मदत करीत असत. १९३५ च्या धर्मांतरांच्या चळवळीत त्यांनो लक्ष घातले. त्या अस्पृश्यांच्या लग्नसमारंभांना व सभांना उपस्थित असत. त्यामुळे त्यांचा व बाबासाहेबांचा परिचय झाला. तो परिचय दृढावत् गेला, तो इतका की, दोघे एकमेकांच्या घरी येत जात व वेळीप्रसंगी एकत्र जेवण घेत.

८ ऑगस्ट १९६२ रोजी सकाळी (बुधवार) सकाळी १०–१५ वाजता ड्रेशरबाई माझ्या घरी एकाकी आल्या. बरोबर कु. सुमित्राबेन त्रिकमचंद (२१, क्लब बॅक रोड, आग्रीपाडा) या त्यांच्या सहकारी होत्या. दोघी सुमारे एक तास माझ्याशी गप्पा मारीत बसल्या ड्रेशरबाईने काही कागदपत्रे व स्वतःचे तीन फोटोग्राफ मला स्वतःहून दिले. आणि ११ ऑगस्ट ला ४ वाजता आग्रीपाडा येथे भेटून बोलू या, असे आमन्त्रण देऊन त्या गेल्या. ११ ऑगस्टच्या भेटीत आम्ही तासभर गप्पा मारल्या व ड्रेसरबाईंनी आमचे (श्री. ना. ता. क्षीरसागर नाना भाऊसाहेब कांबळे, धोंडीराम गोपाळ वाघमारे हे माझ्या बरोबर ड्रेहारबाईना पाहण्यास आले होते.) चांगले स्वागत केले.

या दोन्ही वेळच्या बैठकीत ड्रेहारबाईनी जी माहिती सांगितली ती मी येथे देत आहे. बाबासाहेबांना त्या "डॉक्टरसाहेब" या नावाने संबोधत असत. ही हकिकत सांगताना त्यांचा आवाज सद्गतीत होत असे आणि डोळे पाणावत असत.

मी डॉक्टर साहेबांना माझ्या घरात (मुंबई) एक खोली राखून ठेवली होती. अत्यंत महत्त्वाची पत्रे, लेख अगर वक्तव्ये लिहावयाची असाल्यास ते सदर खोलीत बसून लिहीत असत व तेथेच माझ्या टाईप रायटरवर लेखनिक छगनलाल मोदी ते साहेबांचे लिखाण टाईप करत असे. काही वेळेला डॉक्टरसाहेब सदर खोलीत झोपत असत. त्यांना एकांताची फार जरुरी भासली तर ते तसे मला सांगत व मी त्यांच्या खाण्यापिण्याची व रहाण्याची व्यवस्था करीत असे. ते व्हाईरॉयच्या मंत्रीमंडळात गेले तेव्हां ते दिल्लीहून मुंबईस आले तर मी त्यांना माझ्याकडे विश्रांतीस घेऊन जात असे. हा आमचा इतका स्नेहसंबंध वाढलेला पाहून मिशनच्या लोकांचा व माझ्या मित्रांचा असा समज झाला की आम्ही दोघे लग्न करणार, अशी माहिती डेशरबाईनी स्वतःहून १७।४।५९ ला मला देत असताना मी मध्येच म्हणालो तशा अफवा मीही अनेक लोकांच्याकडून ऐकलेल्या आहेत. पण खरा प्रकार काय ते सांगा. तेव्हा त्या म्हणाल्या आमची मैत्री बौद्धिक होती. मला डॉक्टर साहेबांचा १२ वर्षांचा सहवास मिळाला व मी त्यांच्या उपयोगी थोडी बहुत पडले, याबद्दल मला अभिमान व आनंद वाटतो. मी डॉक्टर साहेबांना लग्नाबद्दल कधीही विचारले नाही. ते माझ्याशी इतके मनमोकळेपणाने रहात असत की त्यामुळे लोकांनी आमच्याबद्दल वाईट ग्रह करून घेतले. इतकेच नव्हे तर आमच्या मिशनचे प्रमुख बिशप डब्लू. पिकेट यांच्याकडे काही लोकांनी तक्रारी तोंडी व लेखी केल्या होत्या. पण बिशपसाहेबांनी मला कधीच खुलासा विचारला नाही. मी स्वतःच त्यांना या बाबतीत स्पष्ट विचारले की डॉ. आंबेडकर हे माझे परमस्नेही आहेत. ते माझ्याकडे येतात. व त्यामुळे तुमच्या मिशनबद्दल काही गैरसमज उत्पन्न झाले असतील अगर तुमच्या कार्यात काही व्यत्यय येत असेल तर तसे मला स्पष्ट सांगा मी डॉ. आंबेडकरांशी असलेली मैत्री तोडते. यावर बिशपने सांगितले की तसे करण्याची जरुरी नाही. मी डेशरबाईना म्हटले की तुम्ही, डॉक्टर साहेबांनी खिस्ती धर्म स्वीकारावा म्हणून प्रयत्न करीत होता, व त्यासाठी तुम्ही त्यांच्यासाठी खस्ता खात होता. त्यांनी खिस्ती धर्म स्वीकारला तर त्यांचे लाखो अनुयायी खिस्ती होतील अशी तुमची श्रद्धा होती; म्हणूनच तुम्ही डॉक्टरसाहेबांशी लग्न करण्यास तयार झाला असाही एक सूर मी ऐकलेला आहे. त्यावर त्या म्हणाल्या की डॉक्टर साहेबांनी खिस्ती धर्म स्विकारावा असे मी एकदाही म्हटलेले नव्हते. आमच्या या मैत्रीबद्दलच्या संबंधात अनेक लोकांचे इतके दृढ ग्रह झालेले होते की मी १९४७ साली अमेरिकेला गेले, तेंव्हा माझ्या मैत्रीणींना वाटले की मी डॉक्टरसाहेबांशी विवाहबद्ध झाले, नाही म्हणून निराशेने परत आले आहे. मी सेवानिवृत्त झाले, म्हणून परत आले यावर त्यांचा विश्वासच बसेना. डॉक्टरसाहेबांनी १९५६ साली बुद्ध धर्माचा स्वीकार केला. ती बातमी जगातील वर्तमानपत्रानी प्रसिद्ध केली. तेव्हांही माझ्या मैत्रीणी (अमेरिकेत) मला म्हणाल्या, Don't you feel yourself heart broken or something काय उत्तर देणार मी ? बोलणाऱ्यांच्या तोंडाला हात लावता येत नाही !

११ ऑगस्टच्या आमच्या बैठकीत ड्रेशरबाईंनी आपल्या आठवणी सांगताना त्या हसून म्हणाल्या की, माझी अशी आठवण आहे की ती तुम्हाला विनोदी वाटेल, कदाचित खोटीही वाटेल. १९३५ च्या धर्मांतराच्या चळवळीत आम्ही अनेक ख्रिस्तसेवक डॉक्टर-साहेबांच्या सान्निध्यात आलो. त्यांपैकी काहींनी डॉक्टरसाहेबांना ख्रिस्ती धर्मावरील ग्रंथ दिले. आमच्या आग्रीपाडा मिशनचे प्रमुख बिशप पिकेट यांनी डॉक्टरसाहेबांना चहापार्टी आपल्या घरी दिली. तेंव्हां डॉक्टरसाहेब चहा पिता पिता ख्रिस्ती धर्मातील अनेक पंथाबद्दल चिकित्सक रितीने पिकेट यांना प्रश्न विचारीत होते. तेंव्हा पिकेट व मी त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देत असू. पण त्या उत्तरांकडे डॉक्टरसाहेबांचे फारसे लक्ष नव्हते. कारण ते मधून मधून पिकेट साहेबांच्या लायब्ररीकडे पहात होते. तेंव्हा पिकेट म्हणाले "डॉक्टरसाहेब! तुम्हाला हवी ती पुस्तके न्या, आणि वाचून परत करा" हे ऐकताच डॉक्टरसाहेब चहा पिण्याचे सोडून ताडकन् उठले व त्यांनी पुस्तकांच्या चार सेल्फवरून २५-३० पुस्तके स्वतः काढली. चहापान संपल्यावर डॉक्टरसाहेब पुस्तके घेऊन गेले. पांचसहा महिने झाले तरी ती पुस्तके परत येईनात म्हणून मी व बिशप पिकेट जवळ जवळ एक वर्षभर राजगृहावर जाऊन डॉक्टरसाहेबांना विनंती करत असू की पुस्तके परत द्या. ते म्हणत की ती आता कोठे मिक्सअप झालीत ती शोधून मी परत करीन पण तसे डॉक्टरसाहेबांनी दोन वर्षे केले नाही. मग मी एकदा डॉक्टर-साहेबांना म्हटले की मी पिकेटची पुस्तके तुमच्या लायब्ररीतून शोधून काढते व त्याचवेळीं तुमचा लायब्ररीचा कॅटलॉग तयार करते तेंव्हा ते म्हणाले की मी ज्या ऑर्डरने काही ग्रंथ ठेवले आहेत ती ऑर्डर तुम्ही विस्कळीत कराल, आणि १०-१५ हजार ग्रंथाचा कॅटलॉग करायला तुम्हाला पाच सहा महिने लागतील. इतका वेळ तुम्ही खर्च करू शकणार नाही. शेवटी मी व पिकेट, डॉक्टरसाहेबांना भेटलो; ते जरा रागाच्या भरातच. आमची पुस्तके द्या, असे मी व पिकेट रागाने म्हणालो, तेव्हा डॉक्टरसाहेब उठले व चार पाच ठिकाणीहून १०-१२ पुस्तके शोधून काढली व बाकीची तुम्ही शोधा असे ते आम्हाला म्हणाले. तेव्हा मिळालेली पुस्तके घेऊन आम्ही रागारागाने राजगृहाबाहेर पडलो. पिकेट मला रस्त्यात म्हणाले की, तू डॉक्टरसाहेबांच्या लायब्ररीची नेहमी स्तुती करतेस. ती लायब्ररी मोठी जी झाली ती अशाच रितीने झाली असावी.

ही आठवण सांगताना ड्रेशरबाई हसत होत्या त्यांचे बोलणे संपल्यानंतर मी म्हणालो की, तुमची हकिकत सत्य आहे. आपल्या लायब्ररीत चांगल्या ग्रंथांची भर पडावी यासाठी बाबासाहेब मला १९२३ ते १९२९ च्या काळात गप्पा मारताना सांगत असत की मज जवळ पैसा नाही. आणि ग्रंथांचे तर भयंकर आकर्षण. मग, Buy, borrow or steal या तत्वांचा मी मार्ग स्वीकारला. माझे पोट मोठे तेव्हां येथील लायब्ऱ्यातून मला जितके ग्रंथ पॅंटमध्ये घालून वर कोटाची बटने लावून घरी आणता आले तेवढे मी आणले. मी ही चोरी करीत आहे, पाप करीत आहे असे मला वाटले नाही, आणि अजूनही वाटत नाही. या ग्रंथांचा मी सदुपयोग करीन. त्यातील ज्ञानाच्या ज्योतीने

मी आपल्या समाजात आत्म शक्तीचे दिव्य उभे तेज करीन, अशी माझी मनोदेवता मला सांगत असते; असे मला ते म्हणत असत. पुढे १९३० ते १९४६ च्या काळात बाबासाहेबांनी मुंबई सरकारचे रेकॉर्ड ऑफीस, मुंबई युनिव्हर्सिटी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, गोखले स्कूल ऑफ पॉलिटिक्स, वगैरे ठिकाणहून जे ग्रंथ आणले ते परत केले नाहीत, अशा तक्रारी मी कांही लोकांकडून ऐकल्या आहेत, हेही मी ड्रेशरबाईना सांगितले. आणि सर्व ग्रंथांचा त्यांनी जितका उत्तम उपयोग केला तितका इतरांना करत आला नसता. ते ग्रंथ धूळ खात पडले असते; असेही मी माझे मत ड्रेशरबाईना सांगितले. त्या म्हणाल्या, He was a wonderful man a real genius. ( ते अद्वितीय पुरुष होते. ते खरे खुरे बुद्धीवंत होते.) मी म्हणालो, 'यांत वाद नाही. पण त्यांच्याही लायब्ररीतून अनेकांनी ग्रंथ नेले ते परत केले गेले नाहीत, हेही तितकेच खरे आहे' आम्ही सर्वजण मनापासून हसलो.

ड्रेशरबाईनी यशवंतराव व मुकुंदराव यांना भेटण्याची इच्छा दाखविली. मुकुंदराव वारले म्हणून मी सांगितले. यशवंतरावांनी ड्रेशरबाईना भेटण्याचा प्रयत्न केला; पण त्या ठरलेल्या तारखेच्या अगोदरच मुंबईतून खाटमांडूला गेल्या. त्यामुळे त्यांची भेट झाली नाही.

११ ऑगस्टला आमची बैठक संपली तेव्हां ड्रेशरबाईनी मला बाबासाहेबांचे छोटे इंग्रजी चरित्र लिहून मला द्या, मी ते अमेरिकेत प्रसिद्ध करण्याचे प्रयत्न करीन. त्यांची इच्छा ही होती की अमेरिकनांना डॉक्टरांची माहिती मिळावी. सुमारे ६० पानांचे टंकलिखित चरित्र, मी लिहून ड्रेशर बाईना, अमेरिकेला पाठविले. पण ते प्रसिद्ध झाल्याचे अद्याप तरी मला समजले नाही. ड्रेशरबाई व आंबेडकर चळवळीवर प्रबंध लिहून पी. एच. डी. मिळविलेल्या झेलियटबाई यांची न्यूयॉर्कला भेट झाल्याचे त्यांनी मला कळविले होते. अमेरिकेत, बाबासाहेबांबद्दल माहिती देण्याचे त्यांनी ठरविले होते. पुढे मात्र या बाबतींत त्यांनी काय केले हे कळविलेले नाही.

११ ऑगस्ट १९६२ ला आमची बैठक संपल्यावर ड्रेशरबाईनी आमचे ३ स्नॅपस् (फोटो) घेतले. आम्ही त्यांचा निरोप घेऊन संध्याकाळी सहा वाजता परतलो.

● ● ●

# खंड १

## प्रकरण : ६

# व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात

व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे सभासद झाल्यापासून साहेबांनी स्वतःच्य कचेरीचे कामकाज वाचन आणि 'शूद्र पूर्वी कोण होते?' Who Were The Shudras?) व 'गांधी आणि कॉंग्रेस यांनी अस्पृश्यांसाठी काय केले?' (What Gandhi and Congress Have Done To The Untouchables) या दोन्ही ग्रंथाचे लेखन यामध्ये स्वतःला गुरफटून घेतले. ते इतके की, जवळ जवळ एक वर्षभर त्यांनी बाह्य जगाचा आणि विशेषतः अस्पृश्यांच्या चळवळीतील कार्यकर्त्यांचा संबंध तोडला. त्यानंतर त्यांनी भाऊराव गायकवाड यांना ९-८-४२ ला पत्र पाठवून कळविले की, मी तुम्हांला पुष्कळ दिवस पत्र पाठविले नाही. मी येथे आल्यापासून आपल्या लोकांचे हित साधण्यासाठी काय काय करता येईल, याचा शोध घेतला व त्याप्रमाणे मी या जागेवर जोपर्यंत आहे तो पर्यंत आपल्या लोकांचे हित जेवढे मला साधता येईल तेवढे मी साधणार आहे. दिल्लीत माझ्या अध्यक्षतेखाली जी कामगार परिषद झाली तिला हजर रहाण्यास मी खात्यातर्फे सर्वश्री दोंदे व भोळे यांना आमंत्रणे पाठविण्याची व्यवस्था केली यापूर्वी अस्पृश्य लोकाना अशी संधी मिळाली नव्हती. अस्पृश्यांतून लष्कर भरतीसाठी (रिक्रूटिंग) अधिकारी नेमावेत याबद्दल मी प्रयत्न करीत आहे. तुम्हीही रिक्रूटिंग ऑफिसर व्हावे. या नोकरीत तुम्हा सर्वांना आपल्या लोकांचे भले करता येईल. माझा स्वतःचा दर्जा उंचावला आहे पण आपल्या चळवळीची जी खालच्या दर्जाची पातळी आहे ती उंचावण्याची आपण शिकस्त केली पाहिजे. मी चळवळी-पासून दूर आहे. ही चळवळ चालू ठेवणे व तिची पातळी उंचावणे ही जबाबदारी मी तुमच्या शिरावर टाकीत आहे. ती तुम्ही खात्रीने पार पाडाल. असेही साहेबांनी या पत्रात लिहिले होते. डॉ. श्रीमती साळुंकी व काळे यांनी मजसंबंधी जी आस्था दाखविली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे, असे त्यांना कळवा, अशीही या पत्राने श्री. गायकवाडांना विनंती केली होती मी ते पत्र खाली देत आहे. —

Member of Council,
Labour

22, Prithviraj Road,
New Delhi.
9-8-1942

My Dear Bhaurao,

You must have been wondering why I have not written to you so far. The reason is not that I am too idle to write. In fact I do much more writing than I did before. But the matter is I have not had enough spare time to write or to do anything outside office work.

I like to know if you had any communication from Hulland. I have not heard from him. As I said you should not reject the offer if it comes to you. It will give you a very great opportunity of serving our people. Although I am away from humble life I cannot forget the necessity of maintaining the movement we have built at its level, if we do not succeed in raising its level. In my absence much of these responsibility must fall on you and I have no doubt that you will carry it through. I am determined to help our people in every way I can, during the tenure of my office. I have already given a start by inviting Donde and Bhole as delegates to the Labour Conference which was recently held in New Delhi under my Chairmanship. Such a thing has never happened before. I have done many more things in the course of the work. I will write in detail about them sometime later on. In the meantime I want you to convey my kindest regards to Dr. Salunki for her appreciation and the trouble she has taken on my behalf and also to Kale. I am trying to find out what can I do for Appa.

Remember me to Rama Pala.

Yours Sincerely,
Sd.|- B. R. A.

रिक्रूटिंग ऑफिसर, मि. डब्लू बी हुलंड, आय सी एस., पुणे यांना बाबा साहेबांनी लिहिले होते की, मुंबई इलाख्यात सैन्य भरतीसाठी, गायकवाड इत्यादिना नेमावे. मि. हुलंडने गायकवाड यांना ६-८-४२ ला पत्र (D.O. No. R.O.P. 80) पाठवून मेटीस बोलाविले. गायकवाड यांनी ११ तारखेस उत्तर दिले की मी भेटीस

येतो. भेट २० व २१ तारखेला झाली. मराठ्यांची सैन्यात भरती करण्यासाठी सरकारने रिक्रूटिंग बोर्ड नेमलेले आहे, तसे महारांच्या सैन्यभरतीसाठीही स्वतंत्र बोर्ड नेमावे अशी गायकवाड यांनी श्री. हुलंडना विनंती केली. या विनंतीचा आपण सहानुभूतिपूर्वक विचार करू असे त्यांनी वचन दिले. परंतु सदर बोर्ड नेमण्यात आले नाही. ऑनररी असिस्टंट रिक्रूटिंग ऑफिसरची जागा श्री. भाऊराव गायकवाड यांनी स्वीकारली. पगार दरमहा १५० रुपये आणि प्रवास भत्ता दरमहा २०० रुपये. श्री. गायकवाड व इतर लायक लोक यांना आपल्या खात्यांत, मोठ्या अधिकाराच्या जागा देण्याची याच वेळी दिल्लीत साहेब खटपट करीत होते. मजूर मंत्री म्हणून साहेबांनी आपल्या खाजगी चिटणीसामार्फत गायकवाडना ता. २४ ला पत्र पाठविले की, लेबर वेलफेअर ऑफिसर फॉर द वेस्टर्न एव्हिएशन सर्कल, या जागेचा तुम्ही स्वीकार कराल की नाही? पगार दरमहा रु. ५०० अधिक प्रवास भत्ता. मुदत आरंभी ३ महिने. ३१ ऑगस्टला गायकवाडनी पत्राने आपली संमती कळविली. या जागेचा पगार रु. ८००, व प्रवासभत्ता आणि शिवाय फर्स्ट क्लासचा रेल्वे प्रवास, असा असावा, असा नंतर साहेबांच्या प्रयत्नाने ठरला. या प्रयत्नाआधिच गायकवाड यांनी रु. ५०० द. म. पगार स्वीकारला, त्यामुळे जरा गोंधळ झाला, व त्याबद्दल साहेबांनी गायकवाड यांना रागाने तीन पत्रे लिहिली. (२९ ऑगस्ट, २ व ४ सप्टेंबर). मुंबईच्या गव्हर्नरचा बिनसरकारी सल्लागार म्हणून मला नेमले तर मला आपल्या लोकांचे बरेच काम करता येईल असे गायकवाडनीं ३१ ऑगस्टला साहेबांना पत्र लिहिले. त्या जागेची मुदत ३० सप्टेंबरपर्यंत होती. ती वाढवीली किंवा नाही, याबद्दल गायकवाडनी साहेबांना कांही कळविले नाही. त्यांनी २६ सप्टेंबरला साहेबांना पत्र लिहिले; त्यात ३० सप्टेंबरला या जागेची मुदत संपते, असा मोघम उल्लेख होता, यामुळे साहेबांनी चिडून गायकवाडना २ सप्टेंबरला पत्र लिहिले की असले विचित्र वर्तन तुम्ही का करता? तुम्हाला नोकरी नको की काय? तुम्ही स्पष्ट का लिहीत नाही? हे तुमचे वागणे तुमच्या महात्मेपणाला शोभणारे आहे असे मी समजून गप्प बसू की काय? (.... Your appointment has been extended upto 30th September. You informed me just two days before the date of expiry. This was rather surprising. Is it an indication that you do not want the job or is it one of your Mahatmatic ways? ....')

१४ जुलै १९४२ काँग्रेस कार्यकारी समितीने 'भारत छोडो' (Quit India) हा ठराव मंजूर करून ब्रिटिशांना आपले भारतातील साम्राज्य समाप्त करून स्वदेशाला परतण्याची जाहीर नोटीस दिली. तेव्हा सर्व पक्षांच्या राजकीय पुढाऱ्यांनी या ठरावाच्या अव्यवहार्यपणाबद्दल सडकून टीका केली. सर तेजबहादूर सप्रू, डॉ. आंबेडकर, सर सिकेंदर हयात खान, जीना, ब्रिटिश लेबर पार्टी व राजाजी यांनी काँग्रेसच्या या ठरावाबद्दल

नापसंती व्यक्त केली. सर तेजबहादूर सप्रूंनी टाईम्स ऑफ इंडियाच्या २५ जुलै १९४२ च्या अंकात लेख प्रसिद्ध करून या ठरावाच्या अनिष्ट परिणामाचे दिग्दर्शन केले. युद्धाने निर्माण केलेल्या आणीबाणीच्या काळात 'भारत छोडो' ही चळवळ हाती घेणे हे बेजबाबदारपणाचे आणि मूर्खपणाचे धोरण होय, असे बाबासाहेबांनी आपले मत व्यक्त केले. सर्व राजकीय पक्षांची बैठक गांधीजींनी बोलवावी आणि तित राजकीय स्वातंत्र्याला पोषक असे निर्णय घेऊन त्यांची अम्मल बजावणी सर्व पक्षांच्या सहकार्याने करावी. असेही बाबासाहेबांनी सुचविले. (Ten Years to Freedom, pages 74-75) पण या सूचना काँग्रेसने स्वीकारल्या नाहीत. 'भारत छोडो' चळवळ ८ (९) ऑगस्ट १९४२ ला सुरू झाली व तीत हल्ले, जाळपोळ, खून, गोळीबार यांचे सत्र १९४४ अखेरपर्यंत टिकले.

नव्या दिल्लीत शुक्रवारी ७–८–१९४२ जॉईंट लेबर कॉन्फरंस भरली तेव्हा बाबासाहेबांचे "Need for Uniformity in Labour Legislation (मजूरहित संबधीच्या कायद्यात एकवाक्यता असणे जरूर आहे या विषयावर भाषण झाले ते मी येथे देत आहे :–

INDIAN INFORMATION, SEPTEMBER 15, 1942

DR. B. R. AMBEDKAR ON THE NEED FOR UNIFORMITY IN LABOUR LEGISLATION.

Here is the full text of speech delivered by the Hon'ble Dr. B. R. Ambbdkar, Member for Labour, Government of India, at the Joint Labour Conference in New Delhi on Friday, August 7, 1942.

I have great pleasure in welcoming you to this tripartite Labour Conference. I can hardly convey to you adequately the sense of gratitude which I and the Government of India feel for the ready response which you have given to our invitation and the trouble that you have taken to be present here this morning. I hope and trust that this ready response on your part will be followed by an equally willing cooperation in making this Conference a success and in carrying through its purposes to fruition.

I do not wish to detain you long; these are days of grave emergency and I realise that everyone must return tc his post as soon as he can. I will not, therefore, make any lengthy speech on this occasion but will contain myself with touching upon a few points with a view to bringing home to you the significance of the conference and to state its aims and objects.

## TWO SPECIAL FEATURES

As you know, there have been so far three Labour Conferences held in New Delhi under the auspices of the Labour Department of the Government of India. The first one was held on January 22 and 23, 1940, the second on January 27 and 28, 1941, and the third on January 30 and 31, 1942. The present conference is thus the fourth of this series. You will realise the significance of this conference better if I tell you in as few words as I can the special features which mark off this Conference from the previous ones. In the first place, although the previous conferences met regularly at certain fixed periods, permanency was not a part of the plan of those conferences. There could have been a break in their regularity and the idea could have been abandoned without doing violence to any rule or convention or understanding. The present conference has permancy as a part of its plan.. The organisation that we want to set up will have the permanancy and regularity of a standing committee, ready to function when called upon tc do so.

More important than this feature of the conference is the second feature to which I want to draw your particular attention. It relates to the composition of the conference. The previous conferences were representative of Governments only — the representatives of the Central Government, provincial Governments and some of the Indian States' Governments — formed the only constituents of the conference. The most necessary and the most important elements, namely, the Employers and the employees, were not represented at these conferences. Care was no doubt taken to establish contact and even to consult the organisations representing the Employers and the Employees. For instance, my distinguished colleague the Hon'ble Sir. A. Ramaswami Mudaliar, when he was the member in charge of Labour, did take occasion when he visited Calcutta to meet the representatives of Labour and of employers.

Similarly, my distinguished colleague, the Hon'ble Sr. Firoz Khan Noon, to whom we owe the project of the present conference, did in his tenure of office as Labour Member seek occasion to take counsel with the organisations of Employers and Employees. It is for the first time, however, in the history of these Labour Conferences that the representatives of the Employers and the Employees have been brought face to face within the ambit of a joint conference. To my mind this is a feature of the conference which should find a very ready welcome from all concerned, and particularly from the representatives of the Employees. Ever since the Witley Commission, in its Report on Labour in India, put forth the proposal that there should be established in India as a permanant body an Industrial Council, the representatives of labour have agitated for effect being given to that recommendation. For various reasons it did not until now become possible to realise the ideal of an Industrial Council. I do not claim that the proposal which this conference is called upon to give effect to amounts to a complete realisation of that cherished ideal. But there can be no doubt that this Conference seeks to pave the way towards the realisation of that ideal, and I am sure you will not deem it an exaggeration if I say that it marks a long stride on the road which leads to that goal.

## LABOUR LEGISLATION

I will now say a word or two with regard to the aims and objects of this conference. Some of you who are familiar with the proceedings of the previous conferences will know that one of the primary objects which brought those conferences into being was the great desire to avoid the danger arising out of the diversity in Labour Legislation with which this country was threatened as a consequence of Provincial independence in Labour legislation.

So long as the Government of India was a unitary Government, uniformity in labour legislation was not difficult to obtain. But the federal constitution created by

the Government of India Act of 1935 by including Labour legislation in the Concurrent Legislative List had created a very serious situation. It was feared that if there was no central legislation each Province might make a particular law specially suited to itself, but different from that of its neighbour by allowing Provincial considerations to dominate over considerations of general and national importance.

## THREE MAIN OBJECTS

The conferences were called to supply a most necessary corrective to this tendency and to foster among Provincial Governments a regard for the wholesome principle of uniformity in Labour legislation. In constituting this conference I do not propose to abandon this object of uniformity in Labour legislation with which the three previous Conferences were mainly concerned. It will remain one of the objects which this Conference will pursue. But to this I would like to add two other objects, namely, the laying down of a procedure for the settlement of industrial disputes and the discussion of all matters of all-India importance as between Labour and capital. Our Conference will have, therefore, three main aims and objects :—

(i) the promotion of uniformity in Labour legislation;

(ii) the laying down of a procedure for the settlement of industrial disputes; and

(iii) the discussion of all matters of all-India importance as between employers and employees.

In regard to the first it is unnecessary to say why we have included it in our aims and objects. Uniformity in Labour legislation can never cease to be a matter of importance to so large a country like India with its many administrative and provincial jurisdictions. It must therefore, continue to occupy our attention in the future as it has done in the past.

## INDUSTRIAL DISPUTES

As to industrial disputes both Labour and Capital have, since the war, behaved with a sense of responsibility and

the number of strikes that have taken place has not been on a very extensive or disturbing scale. There was some tendency at the beginning of this year for an increase in industrial unrest, but the laying down of a procedure for adjudication of disputes under the Defence of India Rule 81-A has resulted in some reduction in recent months. That procedure will, we hope, prove an efficient and a reliable machinery, but it is a procedure for the settlement of industrial disputes as one of the aims and objects of the Conference which we propose to set up.

In desining the last item included in our aims and objects we have deliberately used wide language so as not to exclude from the deliberation of the Conference anything that is of importance to labour and capital. But I like to tell you what we have in mind in employing......this broad expression "matters of all-India importance." We want to include in it all matters relating to Labour Welfare and the maintenance of Labour morale. So understood I need hardly say this object though placed last may be regarded as the highest in importance. We certainly regard it as most urgent. The urgency I need hardly say is due to the necessities of the war.

### A WAR OF SUPPLIES

The present war is a war of supplies and supplies depend upon peace in industry. How to secure peace in industry is a pressing problem for us today. I may not be wrong if I say that peace in industry depends upon two things. In the first place, it depends upon the existance of the machinery ready at hand for the quick settlement of industrial disputes. Secondly, it depends upon the prompt removel of all such conditions in industry which may fray tempers and bring about a deterioration in the morale of people engaged in it. But there remain a large number of questions which are too small to lead to an industrial dispute, but which are big enough to raise temper. Most of those matters which are liable to raise tempers relate to

what in ordinary parlance is disignated as matters affecting social welfare. For dealing with such problems we have no machinary, and it is mainly the necessity to provide immediately a machinary for advising Government as to how such matters should be peacefully and satisfactorily dealt with that has led Government to institute this Conference forthwith.

## THE TASK AHEAD

Such is the significance of this Conference and such are its aims and objects. Now as to the task before this Conference, you will perhaps find our agenda to be a very meagre fare. There is no much meat in it. But that is unavoidable. We cannot place before you any agenda other than the one we have placed until we have reached a decision on the preliminary question as to whether we agree upon the plan of having such a conference and what its constitution should be. That being the position, all I can do today is to call upon you to decide upon the following matters :—

(1) The desirability of establishing a Labour conference as a permanent organisation to meat at least once a year;

(2) The desirability of instituting a Standing Advisory Committee of this Conference which would meet whenever Government thought it necessary to invite them to meet and to advise Government on matters placed before it; and

(3) Defining in general terms the procedure for the constitution of these bodies.

As regards the constitution of these bodies, it may be desirable for me to place before you the plan which, we think, is best suited for the purpose of a tripartite conference like this.

## PLENARY CONFERENCE

We propose to constitute two bodies :—

(1) a Plenary Conference, and (2) a Standing Advisory Committee.

The Plenary Conference will be composed of representatives of the Central Government, of Provinces, of States, of employers and of employees. In general, each Province or large State will be entilted to be represented, and those States not individually represented would be represented by a nominee of the chamber of Princes. Representation would also be given to the main associations of employers and employees, and it would also be open to Government to nominate representatives of classes of employers or employees who in their opinion were not otherwise adequately represented. It would not in the case of the Plenary Conference be possible to ensure that the representation of employers and employees should be equal to that of Government representatives.

## STANDING ADVISORY COMMITTEE

The constitution of the Standing Advisory Committee would be more rigid, and as you will see from the text of the resolution that will be placed before you that we propose to distribute the representation as follows:— 1 representative of the Government of India, 6 representatives of Provinces, 3 representatives of states, 5 representatives of employers and 5 representatives of employees, with the Labour Member of the Central Government as Chairman.

In suggesting this constitution for the Standing Advisory Committee we have followed as closely as we can the principles underlying the constitution of the Governing Body of the International Labour Office which was set up under the auspices of the League of Nations. There are three principles which to my mind underlie that constitution. First, equality of representation between Government and non-Government representatives. This is illustrated by the provision contained in Article 7, Clause 1, whereby out of 32 representatives 16 represent Governments and 16 represent employers and workers. We have given effect to this principal by going 10 seats to Government and 10 seats to Industry.

The second principle is equality of representation as between employers and employees. This is provided by the same Article whereby the 16 non-Government seats are divided equally between employers and employees. We recognise this by distributing the 10 seats alloted to Industry equally between employers and employees.

## THE THIRD PRINCIPLE

The third principle is an assurance of representation to certain interests by reservation. This will be found in Article 7 which by clause (2) reserves 6 out of 16 Government seats to non-European States and by clause (4) reserves two seats from the quota of employers' seats to non-European States. We propose to adopt this principle by allowing one representative from the quota of each, employers and employees, to be nominated by the Labour Member of the Central Government. This will ensure some representation of interests other than those represented by the main employers and employees, organisations. I have the justice and fairness of these proposals will appeal to you and that you will not find any difficulty in giving them your approval.

We are setting up these bodies at the centre, but as you know very well Labour is much more concerned with Provincial Government than with the Central Government, and it seems to me that a body set up at the top will require to be supported from the bottom, and therefore if Provincial Government would desire to set up similar bodies in their own provinces to deal with question with which the Central Organisation would deal, I give on behalf of the Central Government an assurance that we should undoubtedly encourage any suggestion on this general point.

## PLENARY LABOUR CONFERENCE AND STANDING COMMITTEE TO BE SET UP

A resulation setting up a Plenary Labour Conference and a Standing Committee was unanimously adopted at the Tripartite Labour Conference.

The conference was attended by nearly 50 delegates, representatives of the Central and Provincial Governments, of certain states and of all important organisations of workers, and was opened by the Hon'ble Dr. B. R. Ambedkar.

Representatives of employers and workers were in full agreement with the objects of the conference.

Mr. V. V. Giri, President of the All-India Trade Union Congress, welcomed the institution of the Conference and hoped that it would busy itself, not merely, with discussions but with the question of the advancement of labour conditions and of peace in industry.

Mr. Jamnadas Mehta, President of the Indian Federation of Labour, remarked that the method of the conference should ensure peace and contentment in industry, particularly at this critical period.

Sir A. R. Dalal and Mr. Sri Sri Ram, the presidents of the two all-India associations of employers, led their respective delegations. Representatives of the Chamber of Princes, and of Hyderabad, Baroda and Gwalior also took part in the discussions. All the delegates welcomed wholeheartedly the participation of the Indian States.

The Plenary Conference will consist of 44 members with the Labour Member of the Government of India as Chairman. Twenty-two members will represent various Governments, 11 workers and 11 employers.

Similarly the Standing Committee, consisting of 20 members with the Labour Member as its Chairman, will have equal numbers of representatives of Government on the one hand, and of employers and workers on the other.

The Hon'ble the Labour Member, who also presided at the conference, accepted on behalf of the Government of India the principle that representatives of all organisations of employers and workers should be appointed in agreement with such organisations.

He also stressed the fact that the constitution of the Conference now adopted was in no sense intended to be rigid; the working of the Conference and the committee under the present constitution would be watched and suggestions for amendments would be considered as they arose in the light of experience of the working of the bodies.

The conference also discussed generally the subject of labour welfare and labour morale in wartime. Delegates both of workers and employers stressed the need for Government ensuring adequate supplies of food grains to workers at resonable prices.

दिल्ली येथील डिप्रेस्ड क्लासेस वेलफेअसर असोशिएशन (नंतर दिल्ली शेड्यूल्स कास्टस वेलफेअर असोसिएशन Registered and Recognised by Government) एम. ए. रोड आंबेडकर भवन, न्यू देल्ही, या संस्थेतर्फे बाबासाहेबाना वेंजार्स,रेस्टॉरंट, येथे २३ ऑगस्ट १९४२ रोजी इंग्रजीत मानपत्र देण्यात आले ते असे :-

*"Address of Welcome to The Honorable Dr. B. R. Ambedkar, M.A., Ph.D., Bar-at-Law. Member, Viceroy's Executive Council.*

Respected Sir,

We are all proud of this opportunity of having you in our midst this evening. We have assembled to pay our homage to the laudable services that you have rendered to the cause of the uplift of the Depressed Classes. Before you took up the cause of the Depressed Classes, they were submerged in ignorance and darkness. Their woeful plight moved your mighty soul. From the very advent of your political career you had to contend against innumerable difficulties. You had to face the apathy of your own people and hostility of others. But the righteousness of you cause and your unbending spirit led you on even to greater effort and it is indeed very gratifying to note that your efforts have, to a large extent, been crowned with success in your life time. We all hope that the time is not very far off when you will see the full realisation of your goal of the complete emancipation of the Depressed Classes. By your perseverence and steadfastness in the face of the in sur-

mountable difficulties you have set a noble example for all of us to follow. For all your sacrifices the whole community owes a very heavy debt of gratitude to you and we therefore pray to God that you may be spared for many more years to come to guide the destinies of your community.

Sir as you are fully aware, the age-long subservience of our community has placed us under many disadvantages and disabilities. To give a few instances, the economic condition of our community is very poor and our education is much neglected. The allotment of lands administered by the Central Government to members of the Depressed Classes will help a good deal in bettering their economic conditions. Similarly, if the Central Government sets apart annually a sufficient grant to be expended on the education of the Depressed Classes, it will help considerably in removing illitaracy and ignorance from among them. The legitimate claims of educated young men from our community to employment in Government services are generally overlooked mainly due to the absence of a fixed percentage of our representation in Central Services. We believe that this difficulty can be overcome if definite percentage of our representation is fixed by the Central Government for posts administered by them. We would also suggest that the appointment of members of our community on the Federal Public Service Commission and also in the Home Department to look after the interests of the Depressed Classes, will go a long way in achieving the decided result.

In the end, Sir, we thank you very much for gracing this occasion with your presence and for giving a patient hearing to what we have said.

We beg to remain

Sir,

Your most obedient servants,

'Depressed Classes Welfare Association,

Delhi'.

Dated : 23rd August, 1942.

अस्पृश्यांची दुःखे आणि ती दूर करण्यासाठी सरकारने कोणते उपाय योजले पाहिजेत या संबंधी बाबासाहेबांनी २९-१०-४२ ला एक ५६ पानांचा खलिता गव्हर्नर जनरल यांना सादर केला होता. तो Delhi Printing Works, Delhi येथे छापून घेतला होता. या खलित्याच्या मुखपृष्ठावर

'CONFIDENTIAL'

Not for Circulation

—x—

Grievances of the Scheduled Castes

By

The Hon'ble DR. B. R. AMBEDKAR,

M.A., Ph.D., D.Sc., Barrister-at-Law,

Member, Governor General's Executive Council.

Memorandum Submitted

to

His Excellency the Governor General,

on the 29th October, 1942.

—x—

22, Prithviraj Road, New Delhi.

असा मजकूर होता. या खलित्याचा सारांश खाली देत आहे.

भाग पहिला—राजकीय दुःखे

### १) मध्यवर्ती कायदेमंडळात अपुरे प्रतिनिधित्व

१९४१ च्या शिरगणतींत हिंदूतील प्रमुख जाती व इतर धर्मीय यांची लोक संख्या २९,५८,०८,७२२ होती. त्याचे प्रमाण कसे पडते ते खाली दिलेले आहे.

| | लोकसंख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १) हिंदु | १५,०८,९०,१४६ | ५०.०० |
| २) मुसलमान | ७,९३,९८,५०३ | २३.६ |
| ३) अस्पृश्य | ३,९९,२०,८०७ | १३.५ |
| ४) आदिवासी | १,६७,१३,२५६ | ५.७ |
| ५) शीख | ४१,६५,०९७ | १.३ |
| ६) हिंदी ख्रिस्ती | ३२,४५,७०६ | १.० |
| ७) युरोपियन | १,२२,७८८ | १ पेक्षा कमी |
| ८) अँग्लो-इंडियन | १,१३,९३६ | ,, |
| ९) पार्शी | १,०१,९६८ | ,, |

मध्यवर्ती कायदे मंडळातील प्रतिनिधींची संख्या खालील प्रमाणे :–

निवडून आलेले—१०२

सरकारने नेमलेले—३९ (२० अधिकारी व १९ बिन अधिकारी)

एकूण १४१

१४१ सभासदांची जातवार माहिती येणे प्रमाणे :–

| | निवडलेले | सरकारने नेमलेले अधिकारी+बिन अधिकारी | एकूण | शे. प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १) हिंदु | ५६ | १२ | ६८ | ४८.५ |
| २) मुसलमान | ३४ | १० | ४४ | ४१.०० |
| ३) शीख | २ | २ | ४ | २.८ |
| ४) पार्शी | १ | ३ | ४ | २.८ |
| ५) युरोपियन | ८ | ८ | १६ | ११.३ |
| ६) हिंदी ख्रिस्ती | – | १ | १ | – |
| ७) अँग्लो–इंडियन | – | १ | १ | – |
| ८) अस्पृश्य | – | १ | १ | १.४ |

वरील माहिती वरून हे स्पष्ट होते की हिंदूना शेकडा ५४.९ जागा निवडणुकीने मिळालेल्या आहेत. या शिवाय शेकडा ४१ जागा नॉमिनेशनने (सरकारने नेमलेले सभासद) त्यांना मिळालेल्या आहेत. हिंदूंचे लोकसंख्येचे प्रमाण ५० आहे; हे लक्षांत घेता त्यांना जादा जागा मध्यवर्ती सरकारांत मिळालेल्या आहेत. मुसलमानांना शेकडा ३३·५ जागा निवडणुकीने मिळालेल्या आहेत. या शिवाय शेकडा ३७ जागा नॉमिनेशने त्यांना मिळालेल्या आहेत. मुसलमानांचे लोकसंख्येचे प्रमाण शेकडा २३·६ आहे. हे लक्षात घेता त्यानांही जास्त जागा मिळालेल्या आहेत. अस्पृश्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत त्यांना निदान १० तरी जागा मध्यवर्ती कायदेमंडळात मिळावयास हव्या होत्या. पण त्यांना फक्त एकच जागा आणि तीही नॉमिनेशनने देण्यांत आलेली आहे. अस्पृश्यांना आपले प्रतिनिधी मध्यवर्ती कायदेमंडळात निवडून देण्याचा हक्क नाही. कांही जातींना जादा व कांहीना फार कमी अशा जागा देण्यांत आलेल्या आहेत. यामुळे अल्पसंख्यांक जातीवर फार अन्याय झालेला आहे. हिंदू, मुसलमान, वगैरे जातींना जास्त प्रतिनिधित्व असल्यामुळे त्यांचे कायदेमंडळात सदैव वर्चस्व चालू राहते व हे लोक आपल्या फायद्यासाठी इतर जातीतील सभासदांचा हवा तसा उपयोग करू

शकतात व अल्पसंख्याक सभासदांची मुस्कटदाबी करू शकतात. हिंदूस्थानांतील सध्याची राजकीय परिस्थिती कशी आहे व तीत सुधारणा घडवून आणण्यासाठी कोणते उपाय योजले पाहिजेत, याबद्दल सप्टेंबर (१९४२) मध्ये वादविवाद झाला. तेव्हां हिंदु, मुसलमान व शीख लोकांना आपापल्या पक्षातर्फे बोलता आले. पण अस्पृश्यांचे प्रतिनिधी रा. ब. एन. शिवराज यांना अस्पृश्यांतर्फे बोलण्याची संधी देण्यांत आली नाही. ही दुःसह व अनिष्ट परिस्थिती नष्ट केली पाहिजे. अस्पृश्यांना जादा जागा मिळाल्या पाहिजेत. नॉमिनेशनच्या जागा जशा जशा रिकाम्या होतील तशा त्या अस्पृश्यांसाठी राखून ठेवलेल्या जागा मानण्यांत याव्यात व भराव्यात. अस्पृश्यांना निवडणुकीचा हक्क नसल्यामुळे अस्पृश्यांना जादा जागा देण्यासाठी हा उपाय योजला पाहिजे.

## २) मध्यवर्ती मंत्रिमंडळांत अपुरे प्रतिनिधित्व

प्रांतिक व मध्यवर्ती मंत्रिमंडळात प्रमुख अल्पसंख्यांक जातींना प्रतिनिधित्व देण्यांत यावे हे तत्त्व गोलमेज परिषदेत मंजूर करण्यात आले होते तेव्हापासून मुसलमान व इतर प्रमुख अल्प संख्याक जाती यांचे प्रतिनिधी दोन्ही प्रकारच्या मंत्रिमंडळात घेण्यात आले. परंतु अस्पृश्य समाज हा एक अल्पसंख्यात जमात समजण्यात येत असूनही तिचे प्रतिनिधी सरकार दोन्ही प्रकारच्या मंत्रिमंडळात घेत नाही. हा अस्पृश्यांवर सरकार अन्याय करीत आहे. मध्यवर्ती मंत्रिमंडळात १५ सभासद आहेत. त्यात शिखांचा व अस्पृश्यांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी आहे. आणि मुसलमानाचे तीन प्रतिनिधी आहेत. अस्पृश्यांची संख्या शीखांच्या आठपट आहे तरी दोन्ही जमातींना सारखाच एक एक प्रतिनिधी देण्यात आलेला आहे. मुसलमानांची लोकसंख्या अस्पृश्यांच्या लोकसंखेच्या दुप्पट आहे, तर त्यांना या हिशेबाने दोन प्रतिनिधी द्यायला हवेत, पण त्यांना तीन प्रतिनिधी दिलेले आहेत. सारांश अस्पृश्यांना निदान दोन प्रतिनिधी, मध्यवर्ती मंत्रिमंडळात देणे जरूर व इष्ट आहे. अस्पृश्यांची ही मागणी सरकारने तावडतोब मान्य केली पाहिजे.

## ३) सरकारी नोकऱ्यांत प्रवेश

प्रांतिक व मध्यवर्ती नोकऱ्यांत अस्पृश्यांचा व्हावा तसा अद्याप प्रवेश झालेला नाही. कांही उच्च प्रतीच्या सरकारी नोकऱ्यांत तर अस्पृश्यांचा प्रवेश होऊ नये असेच एकंदर सरकारचे धोरण आहे. ऑल इंडिया सर्व्हिसेस (I.C.S.) उच्च प्रतीच्या सरकारी नोकरीत १९४२ साली कोणत्या जातीचे किती लोक होते हे खालील माहितीवरून दिसून येईल.

| | एकंदर | Through competition | Through nomination | लो. सं. प्रमाण (अधिक व कमी) |
|---|---|---|---|---|
| १ युरोपियन्स | ४४८ | ३३६ | १५२ | |
| २ हिंदू | ३६३ | ३३२ | ३१ | +१३·८ |
| ३ मुसलमान | १०९ | ३५ | ७४ | −४·४ |
| ४ हिंदी-ख्रिस्ती | २३ | १० | ४ | +३·० |
| ५ अँग्लो इंडियन्स | ९ | ८ | १ | +१·४७ |
| ६ पार्शी | ९ | ८ | १ | +१·७७ |
| ७ शीख | ११ | ५ | ६ | +०·७ |
| ८ अस्पृश्य | १ | | १ | −१३·५ |
| ९ इतर | ४३ | २८ | १५ | |
| | १०५६ | ७७१ | २८५ | |

१०५६ आय. सी. एस मध्ये फक्त एक अस्पृश्य माणूस असावा ही सरकारला लाजिरवाणी गोष्ट नाही काय ? मध्यवर्तीसर कारच्या उच्च प्रतीच्या नोकऱ्यात अस्पृश्यांचा शिरकाव झालेला नाही, याची जाणीव सरकारला आहे याबद्दल गृहखात्याचा मेमोरँडम नंबर 4|5|38 Ests (s), तारीख १-६-१९३९ यामध्ये सरकारने कबुली दिलेली आहे, पण ही अनिष्ट परिस्थिती नष्ट करण्यासाठी कांहीही उपाय योजलेले नाहीत.

निरनिराळ्या जातीसाठी नोकरीत जागा राखून ठेवण्यासाठी सरकारने जी तत्त्वे स्वीकारलेली आहेत, व जे उपाय योजलेले आहेत, या सर्व भानगडीमुळे उच्च प्रतिच्या सरकारी नोकरीत अस्पृश्यांचा शिरकाव झाला नाही. कारण अस्पृश्यासाठी निराळी तत्त्वे (नियम) व इतर जातीसाठी निराळी तत्त्वे (नियम) सरकारने आचरणांत आणली. सरकारी नोकऱ्यात उच्च वर्णीय हिंदूंचा विशेषतः ब्राह्मणांचा ज्यास्त भरणा झालेला आहे व त्यामुळे मागासलेल्या जातींतील लोकांना नोकऱ्यात प्रवेश मिळणे कठीण झालेले आहे. तेव्हा ही परिस्थिती सुधारण्यासाठी सरकारने मागासलेल्या जातीतील लोकांसाठी नोकऱ्यांचे प्रमाण राखून ठेवावे, असे १०–३-२३ च्या मध्यवर्ती कायदे-मंडळातील आपल्या भाषणांत श्री. नायर यांनी सरकारला विनंती केली की निरनिराळ्या नोकऱ्यासंबंधी जी विषमता उत्पन्न आलेली आहे, ती दूर करण्यासाठी प्रत्येक प्रकारच्या नोकरीत तिसरा हिस्सा राखून ठेवला जाईल. या प्रमाणाने अहिंदू जातींचे समाधान झाले नाही. त्यांनी हा प्रश्न गोलमेज परिषदेत उत्पन्न केला व सरकारने हे प्रमाण वाढवावे, अशी मागणी केली. ती सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया व मध्यवर्ती सरकार यांनी मान्य केली. ही बाब गृहखात्याचा ठराव नंबर F. 14-17-B-33. ता. १–७–३४ यात

समाविष्ट केलेली आहे. कोणत्या जातींना कोणत्या प्रमाणांत नोकऱ्या द्यावयाच्या, याची नोंद या ठरावात केलेली आहे. याबद्दलची माहिती खालील प्रमाणे आहे. :–

| अल्पसख्यांक जाती | आय. सी. एस. इतर भारतीय नोकऱ्या (शेकडा) | रेल्वे व कस्टमस (शेकडा) | पोस्ट व टेलिग्राम | अप्रेंजिगत डिपार्टमेंट प्रिव्हेंटिव्ह सर्व्हिसेस |
|---|---|---|---|---|
| १ मुसलमान | २५ | २५ | २५ | फक्त |
| २ अँग्लो-इंडियन | — | ८ | ५ | अँग्लो |
| ३ इंडियन-ख्रिश्चन | $८\frac{1}{2}$ | ६ | $३\frac{1}{2}$ | इंडियनस |
| ४ शीख | — | — | — | जातीसाठी |
| ५ पार्शी | — | — | — | |

या ठरावाच्या तिसऱ्या स्तंभात असे जाहीर केलेले आहे की अस्पृश्य जातीसाठी नोकऱ्यात प्रमाण राखून ठेवणे यात कांही हशील नाही कारण त्या जाती फार मागासलेल्या व अशिक्षित आहेत. तथापी योग्य व लायक उमेदवार या जातीतून पुढे आले तर त्यांचा नोकऱ्यांत प्रवेश करण्यांत येईल. या नोकऱ्या हिंदूसाठी म्हणून ठेवण्यात येतील त्यातूनच कांही जागा अ-पृश्य उमेदवारांना देण्यात येतील. यावरून हे स्पष्ट होते की अस्पृश्य जातीना सरकारने नोकऱ्यासाठी अल्पसंख्यांक गणलेले नाही, आणि त्यांच्यासाठी स्वतंत्र प्रमाण राखून ठेवलेले नाही. या ठरावाच्या ७ (३) स्तंभात असे जाहीर केलेले आहे की, हिंदी ख्रिश्चन्स साठी जे $८\frac{1}{2}$ टक्के प्रमाण राखलेले आहे ते त्या जातींतील उमेदवारांनी पुरे केले नाही तर त्या जागा मुसलमान जातींतील लोकांना देण्यात येतील. यावरून हे स्पष्ट होते की, सरकार नोकऱ्याच्या बाबतीत मुसलमान धार्जिणे होऊन इतर जातीवर अन्याय करीत आलेले आहे व अस्पृश्याबद्दल तर सरकार बेफिकीर आहे. १९२०–४२ च्या काळात हिंदूनी ४३५ पैकी ३३२ जागा कॉंपिटिशनने मिळविल्या तरी त्यांना ३१ जागा नॉमिनेशने देण्यात आल्या. याच काळात मुसलमानांनी ३५ कॉंपिटिशनने मिळविल्या आणि त्यांना ७४ जागा नॉमिनेशनने देण्यात आल्या. याच काळात शीखांनी ५ जागा कॉंपिटिशनने मिळविल्या व त्यांना ६ जागा नॉमिनेशनने देण्यात आल्या. अस्पृश्यांनां कॉंपिटिशने एकही जागा घेता आली नाही व त्याना फक्त एक जागा २२ वर्षांच्या काळात नॉमिनेशनने देण्यात आली. ही परिस्थिती किती भयानक आहे याची सरकारला दादही नाही.

अस्पृश्यांची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यासाठी जे अनेक उपाय योजावयाचे आहेत त्यापैकी सरकारी नोकऱ्यांत अस्पृश्यांची भरपूर प्रमाणात भरती करणे, हा एक प्रमुख उपाय आहे. व तो उपाय सरकारला योजता येईल. म्हणून आय. सी. एस.

मध्यवर्ती आणि प्रांतिक स्वरूपाच्या इतर नोकऱ्यांसाठी अस्पृश्य वर्गांना अल्पसंख्यांक गणण्यात यावे आणि त्यांच्यासाठी $१३\frac{1}{2}$ टक्के जागा राखून ठेवण्यात याव्यात. अस्पृश्यांच्या या मागणीला सवर्ण हिंदू लोक विरोध करतील हे खरे आहे. परंतु त्यांचा हा विरोध अनैतिक ठरेल; कारण अस्पृश्य जाती या अल्पसंख्याक जाती आहेत, व अल्पसंख्याक जातींना जे राजकीय व इतर हक्क सरकारकडून देण्यात येतील ते सर्व हक्क अस्पृश्य जातींना मिळाले पाहिजेत, या तत्त्वाला सवर्ण हिंदूंनी मान्यता दिल्यानंतर पुणे करार १९३२ मध्ये तयार करण्यांत आला. या तत्त्वाला हरताळ फासण्याची सवर्ण हिंदूमध्ये अपप्रवृत्ती उत्पन्न झाली तरच ते अस्पृश्यांच्या उपरनिर्दिष्ट मागण्यांना विरोध करतील, तेव्हा सरकारने अशा विरोधाना न जुमानता अस्पृश्यांच्या वरील मागण्या तावडतोब मान्य केल्या पाहिजेत; व त्यासंबंधी स्पष्ट खुलासा जाहीर केला पाहिजे.

अस्पृश्यांची सरकारी नोकऱ्यांत भरपूर प्रमाणात भरती करण्याच्या बाबतीत इतर उपाय योजणे जरूर आहे. (१) वयोमर्यादा वाढविणे (२) परीक्षेची फी कमी करणे (३) अस्पृश्यांच्या हितसंरजणासाठी जे जे उपाय योजण्यात येतील, त्याची अंमलबजावणी योग्य रीतीने होते की नाही, यावर देखरेख करण्यासाठी एक अस्पृश्य वर्गातील अंमलदार नेमणे; हे, ते इतर उपाय होत. अस्पृश्यांची वयोमर्यादा नोकऱ्यासाठी कांही प्रांतात ३ वर्षांनी वाढविण्यांत आलेली आहे. आय. सी. एस. व इतर मध्यवर्ती नोकऱ्यासाठी वयोमर्यादा तीन वर्षांनी वाढविण्यात आली पाहिजे. आय. सी. एस. (रु. १००), इंडियन ऑडिट अकौंटस (८२–८०) व इतर मध्यवर्ती सर्व्हिसेस (रु. ३०) यांसाठी भरावी लागणारी फी देण्याचे सामर्थ्य अस्पृश्य उमेदवारांचे नसते. म्हणून त्यांना सवलती देण्याचे धोरण सरकारने स्वीकारावे. कोणत्याही परीक्षेसाठी जी फीची रक्कम द्यावी लागते त्याचा चौथा हिस्सा अस्पृश्य उमेदवारांनी भरावा असे सरकारने जाहीर करावे. अस्पृश्यांच्या हितासाठी जे उपाय सरकारने हाती घेतलेले आहेत, त्यांची अंमलबजावणी काटेकोर रीतीने होणे जरूर आहे. म्हणून मध्यवर्ती सरकारचे मजूर व गृहखाते यांतर्फे याबाबतीत अस्पृश्य वर्गीय अधिकारी नेमण्यांत यावा.

## फेडरल पब्लिक सर्व्हिस कमिशनवर अस्पृश्यांचे प्रतिनिधी

या कमिशनवर दोन युरोपियन, एक हिंदू व एक मुसलमान असे चार सभासद आहेत. यावरून हे उघड होते की या कमिशनचे सभासद जातीय तत्त्वावर नेमण्यात आलेले आहेत. हे तत्त्व अस्पृश्यांच्या बाबतीत लागू केलेले नाही. अस्पृश्यांची लोकसंख्या मुसलमानांच्या लोकसंखेच्या निम्मी आणि युरोपियनांच्या लोकसंखेच्या तीनशे पटाहूनही जास्त आहे. असे असता युरोपियन व मुसलमान यांना या कमिशनवर प्रतिनिधीत्व देण्यात आलेले आहे आणि अस्पृश्यांना नाकारण्यात आलेले आहे. हा अन्याय सरकारने तावडतोब दूर करावा.

## भाग २ रा – शैक्षणिक दुःखे

शिक्षण प्रसार हा अस्पृश्य समाजाच्या सर्वांगिण प्रगतीचा मूळ पाया होय. आर्टस व कायदा या विषयांत शैक्षणिक प्रगती समाधानकारक झालेली आहे. सायन्स व टेक्नॉलॉजी या विषयातील शैक्षणिक प्रगती कांहीच नाही. आणि परदेशी शिक्षणक्रमात तर अस्पृश्यांचा अजून शिरकावच व्हायचा आहे. अस्पृश्यांना सायन्स व टेक्नॉलॉजी या विषयासाठी सरकारने जर दर वर्षाला २ लाख रुपयांची योजना आखली तर अस्पृश्यांना तिचा फायदा घेता येईल. त्याचप्रमाणे अस्पृश्यांना परदेशांतील विश्वविद्यालयांतील शिक्षण घेण्यासाठी दर वर्षाला १ लाख रुपयांची योजना हाती घेतली तर अस्पृश्यांना तिचा फायदा घेता येईल. या दोन्ही योजनामुळे अस्पृश्यांमध्ये वरिष्ठ दर्जाच्या अधिकाराच्या जागेवर काम करण्यास योग्य असे उमेदवार तयार करतां येतील. १९१९ च्या कायद्यातील १५० (२) कलमान्वये सरकारला अशा कार्यासाठी पैसे खर्च करण्याचे अधिकार आहेत. मध्यवर्ती सरकारच्या अधिकारकक्षेत न येणाऱ्या बाबीसंबंधी सरकार खर्च करीत आलेले आहे. या बाबीची माहिती खालील प्रमाणे :-

| शिक्षणसंस्था | मध्यवर्ती सरकारची वार्षिक मदत | |
|---|---|---|
| १) इंडियन वुईमेन्स युनिव्हर्सिटी, मुंबई | ५०,०००/– | (१९३७–३८ व १९४१–४२ |
| २) विश्वभारती, शांतिनिकेतन | २५,०००/– | |
| ३) इंटर–युनिव्हर्सिटी बोर्ड इंडिया | १,०००/– | |
| ४) इंटर–प्रॉव्हिन्सियल बोर्ड फॉर ॲंग्लो – इंडियन अँड युरोपियन एज्युकेशन | ३६००/– | |

### शास्त्रीय संस्था

| | |
|---|---|
| १) इंडियन असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स, कलकत्ता | १८,०००/– |
| २) रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल, कलकत्ता | २५००/– |
| ३) इंडिया स्टॅटिस्टिकल इन्स्टिटयूट, कलकत्ता | ३७,०००/– |
| ४) नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सायन्स ऑफ इंडिया, कलकत्ता | ६०००/– |
| ५) विश्वेश्वरानंद वेदिक रिसर्च इन्स्टिटयूट, सिमला | २५००/– |
| ६) इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, बंगलोर | १,५०,०००/– |
| ७) भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूट, पूना | ४,०००/– |
| ८) बोस रिसर्च इन्स्टिटयूट, कलकत्ता | ४५,०००/– |

### इतर संस्था

| | |
|---|---|
| १) इंडियन ऑलिंपिक असोसिएशन | २,०००/- |
| २) गर्ल गाईडस असोसिएशन, इंडिया | २,५००/- |
| | एकूण २,९९,१००/- |

या शिवाय मध्यवर्ती सरकार मुस्लिम युनिव्हर्सिटी ऑफ अलिगढ, व हिंदू युनिव्हर्सिटी ऑफ बनारस यांना वार्षिक मदत म्हणून प्रत्येकी ३ लाख रुपये दरवर्षी देत असते. म्हणजे सरकार वर्षाला सुमारे ९ लाख रुपये विद्यावृद्धीसाठी मदत देत असते. त्यात अस्पृश्यांसाठी अशी निराळी रक्कम नाही. म्हणून सरकारने यासाठी वर सांगितल्या प्रमाणे दरवर्षी ३ लाख रुपये खर्च करावेत.

धनबाद येथील इंडियन स्कूल ऑफ माईनस् ही शाळा मध्यवर्ती सरकारच्या ताब्यात आहे. भूगर्भशास्त्र, खनिज पदार्थ व इंजिनिअरिंग या विषयात तेथे उच्चतम शिक्षण देण्यांत येते. तेथून शिकून तयार झालेले लोक खनिज उत्पादनाच्या उद्योगधंद्यात मोठ्या अधिकारावर नेमले जातात. या शाळेत ९७ विद्यार्थी आहेत. त्यांत अस्पृश्य वर्गाचा एकही विद्यार्थी नाही. सरकारने या शाळेत अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी कांही जागा राखून ठेवाव्यात व त्यांना शिष्यवृत्त्या, नादाऱ्या देऊन त्यांच्या शिक्षणास उत्तेजन द्यावे.

सेंट्रल बोर्ड ऑफ एज्युकेशन या संस्थेची पुनर्रचना होणे जरूर आहे. या बोर्डावर मध्यवर्ती व प्रांतिक शिक्षणखात्याचे मंत्री, मध्यवर्ती व प्रांतिक कायदे मंडळे, विश्वविद्यालये, स्त्रिया व अस्पृश्यवर्ग यांचे प्रतिनिधी असले पाहिजेत. प्रांतिक व मध्यवर्ती शिक्षण खत्याच्या शिक्षण विषयक सर्व बाबी या मंडळापुढे प्रथम ठेवण्यात याव्यात. त्यानंतर बोर्डाच्या शिफारशीप्रमाणे त्यांची अंमलबजावणी व्हावी. अशी योजना अमलात आणली तर अस्पृश्य वर्गाच्या शैक्षणिक प्रगती बद्दल बोर्डाला भरीव कार्य करता येईल. या करता या बोर्डावर अस्पृश्यांचे दोन प्रतिनिधी असले पाहिजेत.

### तांत्रिक शिक्षणाची आबाळ

ज्या उद्योगधंद्याना तांत्रिक ज्ञानाची जरुरी आहे, असे ज्ञान अस्पृश्य वर्गात अद्याप पसरलेले नाही. याचे कारण असले ज्ञान प्राप्त करून घेण्याची साधने या वर्गाजवळ नाहीत व सरकार अशी साधने त्यांना उपलब्ध करून देत नाही. याबद्दलची दोन उदाहरणे पहा म्हणजे हा मुद्दा जास्त स्पष्ट होईल. सरकारी छापखाने व रेल्वेचे कारखाने छापखान्यांतील कंपोझिटर, प्रिंटर, प्रूफ रिडर, बुक बाईंडर इत्यादी कामे रेल्वे वर्कशॉपमधील प्राथमिक यंत्र व तंत्र विषयक कामे शिकण्यासाठी अस्पृश्य वर्गीय विद्यार्थ्यांना ॲप्रेंटिसशिप्स दिल्या तर त्यात सरकारला मोठी तोशीस लागणार नाही. तेव्हा सरकारने ही व्यवस्था करावी म्हणजे अस्पृश्य समाजात तांत्रिक शिक्षण घेण्याची आवड उत्पन्न होईल.

## भाग ३ रा – इतर दुःखे

अस्पृश्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांच्या पुढाऱ्यांनी कोणते प्रयत्न केले व सरकारने कोणते प्रयत्न केले, याबद्दलची माहिती देण्याचे प्रसंग जेव्हां जेव्हां सरकारावर येतात तेव्हां तेव्हां सरकार या बाबतींत कांही माहिती प्रसिद्ध करीत नाही, किंवा केलीच तर ती बाब फार महत्वाची नाही असे समजून तीबद्दल थोडासा मजकूर प्रसिद्ध करण्यांत येतो. मध्यवर्ती सरकारच्या ब्युरो ऑफ पब्लिक इन्फरमेशनने १९३५–४० काळातील हिंदुस्थानची परिस्थिती दाखविणारा ग्रंथ "Indian and the Aggressor" या नावाने प्रसिद्ध केलेला आहे, त्यावरून ही उणीव दिसून येते. काँग्रेस हिंदुमहासभा, मुस्लिम लीग इत्यादि पक्ष व त्यांचे पुढारी यांच्या हालचालीबद्दल भरपूर माहिती या ग्रंथात देण्यात आलेली आहे. मात्र अस्पृश्यांच्या बाबतींत तीन पाने खर्च करून अगदी नगण्य अशा किरकोळ बाबीसंबंधी माहिती देण्यांत आलेली आहे. १९३६ सालांत अस्पृश्यांनी धर्मांतराची घोषणा व चळवळ करून हिंदू समाजच काय पण सर्व जग हादरून सोडले होते. त्याद्दल एक अक्षरही सदर ग्रंथात आलेले नाही. या ग्रंथात शीख व मुसलमान यांच्या संबंधी जास्त माहिती देण्यांत आल्यामुळे या जातीसंबंधी पार्लमेंटच्या सभासदांनी व भारतमंत्री यांनी आपल्या भाषणांत या जातींचा उल्लेख केला. सारांश, अस्पृश्यासंबंधी सरकारी धोरण पक्षपातीपणाचे आहे व ते अस्पृश्यांच्या हितांना बाधक आहे तरी सरकारने हे धोरण सोडून द्यावे.

अस्पृश्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सरकारला आपली कंत्राटे अस्पृश्यांना देता येतील. या बाबतींत अस्पृश्यांची टेंडरे संमत करून घेण्याबद्दल कांही अटी शिथिल करण्यांत याव्यात.

## भाग ४ था – दलितांबद्दल सरकारचे कर्तव्य

हिंदुस्थानात कंपनी सरकारचे राज्य स्थापन झाल्यानंतर, राज्यकर्त्यांनी उच्च वर्णीय हिंदू आणि विशेषतः ब्राह्मण यांना शिक्षण व नोकऱ्या या संबधी फार सवलती दिल्या व मागासलेल्या वर्गांना, आणि विशेषतः अस्पृश्य वर्गाला या बाबतीत दूर ठेवले; हे Report of the Board of Education of the Bombay Presidency for the year 1850-51 यावरून दिसून येते. शैक्षणिक कार्यात योग्य तो फेरबदल घडवून आणण्याच्या दृष्टीने या प्रश्नांचा विचार करण्यासाठी सरकारने १८८२ साली 'हंटर कमिशन' नेमले होते. मुसलमान समाजात विद्याप्रसार कसा करावा, यासंबंधी या कमिशनने अनेक शिफारसी केल्या. अस्पृश्य समाजाबद्दल या कमिशनने एक अक्षरही लिहिले नव्हते. ब्रिटिश साम्राज्याचा पाया हिंदुस्थानात अस्पृश्यांच्या सैनिकी बळवरच घालण्यात आला. पण या पायावर ब्रिटिश साम्राज्याची गगनचुंबी इमारत उभारल्यानंतर राज्यकर्त्यांनी अस्पृश्यांच्या सैन्यभरतीला १८९२ साली बंदी

घातली. तिसरी गोष्ट अशी की, सरकार हिंदी लोकांपेक्षा अँग्लो इंडियन लोकांना जास्त सवलती देते त्याचे एकच उदाहरण खाली देता येईल.

| हुद्दा | अँग्लो इंडियन पगार प्रमाण | इंडियन्स पगार प्रमाण |
|---|---|---|
| **नॉर्थ वेस्टर्न रेल्वे** | | |
| १) परमनंट वे | ६२५-२५-६७५ | ४७५-२५-५०० |
| २) इन्स्पेक्टर | ५५०-२५-६०० | ४००-२५-४०० |
| ३) ड्राईव्हर्स | २६०-१०-२८० | रु. १ ते २ दररोज |
| **इस्ट इंडिया रेल्वे** | | |
| ट्रेन एक्झॅमिनर्स | ३००-२५-४०० | १२०-१५-१८० |
| **जी. आय. पी. रेल्वे** | | |
| हेड ट्रेन एक्झॅमिनर्स | २७५ | १२५-२७५ |
| | ३१५ | |
| | ३६५ | |
| वार्शिंग चार्जमेन | १४५ | ११५ |

पगारातील हे विषम प्रमाण १९२० पर्यंत होते. त्याबद्दल ओरड व चळवळ करण्यांत आल्यानंतर ते विषम प्रमाण बंद करण्यांत आले. तरी पण इतर सवलती अँग्लो-इंडियन लोकांना अजूनही कांही खात्यातून मिळत असतात. आणि यासाठी सरकारला, दरवर्षी तीनलक्ष, दहा हजार रुपये (३,१०,०००) खर्च करावे लागतात.

अशा परिस्थितीत, अस्पृश्यांसंबंधी सरकारचे जे कर्तव्य आहे ते त्याने पाळण्याचे प्रथम ठरविले पाहिजे. या बाबतींत सरकारला कांही खर्च करावा लागला तर तो त्याने आनंदाने केला पाहिजे. तरच अस्पृश्यांच्या सर्वांगिण उन्नतीला जोर मिळेल.

व्हाईसरॉयच्या मंत्रीमंडळात गेल्यानंतर अस्पृश्यांच्या हितसंवर्धनासाठी बाबासाहेबांनी उघडपणे आणि गुप्तपणे जेवढी कामे त्यांना करता येतील तेवढी त्यांनी केली. या मंत्रिमंडळात काँग्रेसचा प्रवेश झाला की आपणाला तशी कामे करतां येणार नाहीत, तसा आपणाला वावही मिळणार नाही, हे ते जाणून होते. म्हणून काँग्रेसचा मंत्रिमंडळातील प्रवेश जेव्हां जेव्हां खाजगी रीतीने अगर सार्वजनिक रीत ने चर्चेस येईल तेव्हां तेव्हां बाबासाहेब सदर मुद्याला कडक भाषेत विरोध करीत असत. हे काँग्रेसवादी पक्षातील लोकांना आवडत नसे. या संबंधीचा एक मासला श्री. आल्वा यांच्या ग्रंथात पहावयास मिळतो. तो असा :—

'Having been set firmly in the Viceroy's Council, he would not wel-come any idea of National Cabinet. 'We are the National Cabinet; Why do you want another? They would not work miracles and do nothing better than our-selves. We are running the administration truly well," with these words he laid the flattering function unto his soul and unconsciously expressed his dread of a Congress-League Cabinet embodying the best National interests. Why should he not occupy the gadi as long, as the War lasted? He insulted the Legislative Assembly in his first speech on the floor of the House. He called them an old, diseased and good-for-nothing chamber, forgetting that the expanded Viceregal Council was created in the teeth of Natoinal opposition and commanded no approval of the country'. (Men and Supermen of Hindustan, pp. 25, 26).

हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याचे जाहीर केले तर हिंदुस्थानातील काँग्रेस, लीग वगैरे राजकीय पक्ष युद्ध जिंकण्यास ब्रिटिशांना मदत करतील, असे लोकमत लंडनच्या राजकीय पक्षांत पसरू लागले. हे पुढारी हे मत वेळोवेळी खाजगी जाहीर रीतीने बोलून दाखवीत असत. याचा परिणामी लंडनच्या जनमतावर झाला ही परिस्थिती ब्रिटिश पंतप्रधान मि. चर्चिल व त्यांचे साथीदार साम्राज्यवादी, हुजूर पक्षीय सभासद आणि मोठमोठे व्यापारी व गर्भश्रीमंत यांना पसंत पडली नाही. या लोकमताला आळा घालण्यासाठी मि. चर्चिल यानी १०-९-४२ ला कॉमन्समध्ये भाषण करतांना या मुद्याचा उल्लेख केला. हिंदुस्थानांत काँग्रेसपक्ष जरी प्रमुख राजकीय पक्ष आहे, तरी त्यांत ९ कोटी मुसलमान व ५ कोटी अस्पृश्य लोक सामावलेले नाहीत. हे लोक काँग्रेसचे विरोधक आहेत. काँग्रेस पक्ष बहुसंख्य हिंदी लोकांची प्रातिनिधिक संस्था नाही. तिच्या स्वातंत्र्याच्या चळवळीला बऱ्याच हिंदी जनतेचा पाठिंबा नाही. शिवाय हिंदुस्थानात ९ कोटी ५० लक्ष प्रजा असलेली संस्थाने आहेत. त्यांच्याशी ब्रिटिश सरकारचे करार मदार झालेले आहेत. ही सर्व परिस्थिती लक्षांत घेता काँग्रेसच्या चळवळीपासून जे दूर आहेत त्यांचे संरक्षण करणे हे ब्रिटिश सरकारचे कर्तव्य आहे. हिंदुस्थानाला स्वातंत्र्य देणे म्हणजे ब्रिटिश सरकारच्या संरक्षणाखाली जे साडेतेवीस कोटी लोक आहेत, त्यांना स्वातंत्र्यवादी लोकाच्या हवाली करणे होय. ब्रिटिश सरकार या स्वातंत्र्यवादी लोकांना तोंड देत आलेले आहे व पुढेही देईल मी इंग्लंडच्या राजाचा पंतप्रधान झालो आहे तो ब्रिटिश साम्राज्यांचा विध्वंस करण्यासाठी नव्हे! ("The Indian Congress Party does not represent all India. It does not represent the majority of the people of India.

It does not even represent the Hindu masses. It is a political organisation built around a party machine and sustained by certain manufacturing and financial interests. Outside that party and fundamentally opposed to it are 90 million Muslims in the British India, who have their rights of self-expression, 50 million Depressed Classes or Untouchables, as they are called, because they are supposed to defile their Hindu Co-religionists by their presence or by their shadow, and 95 million subjects of the Princess of India with whom we are bound by treaty...... We have not entered this war for profit or expansion, but only for honour and to do our duty in defending right. Let me, however, make this clear. We mean to hold our own, I have not become the King's First Minister to preside over the liquidation of the British Empire". India Unreconciled:— A documentary history of Indian political events from the crisis of August 1942 to February 1944, by Devdas Gandhi, p. 22).

श्री. अमृतलाल विठ्ठलभाई ठक्कर, अखिल भारतीय हरिजन सेवक संघ, यांनी मि. चर्चिल यांनी आपल्या भाषणांत जी माहिती दिलेली आहे ती अतिरंजित व बऱ्याच अंशी खोटी आहे, असा खुलासा करणारे पत्रक काढले. पूर्वी अस्पृश्यांची जी स्पर्शास्पर्शाच्या बाबतीत सोचनीय स्थिती होती ती आता राहिलेली नाही. त्यांची अलीकडे परिस्थिती सुधारलेली आहे. आणि स्पृश्य हिंदूची मनोवृत्ती दिवसेंदिवस बदलत चाललेली आहे, असा श्री. ठक्कर यांच्या म्हणण्याचा आशय होता. श्री. चर्चिलच्या भाषणातील खोटी व अतिरंजित माहिती आपल्या राजकीय हेतूबद्दल प्रचार म्हणून सांगितलेली आहे व ती शिष्टसंमत नाही असे श्री. टक्कर यांनी या पत्रकात म्हटले आहे. ("I know I am too small a man to criticise the latest bitter speech of Mr. Churchill on the present Indian situation except on one question of fact which he has grossly exaggerated and that is with regard to the Harijans or Scheduled Castes, who he called depressed classes or untouchables, and who are said, 'to defile their presence or by their shadow!' Regarding what he said about the '90 millions of Muslims' '95 millions subjects of Princess of India,' and the large elements among Hindus, Sikhs and Christians in British India, I leave it for politicians to judge. Mr. Maxton Labour|Member put the question. "I am sure what Mr. Churchill has said is true in fact, but is it good propaganda?

I can say, without any fear of contradiction, that what Mr. Churchill said of the Harijans is not a fact, but false propaganda.

As a matter of fact a great majority of the Harijans or Schedules Castes are not untouchables, Defiling by shadow was confined to a very small section of them in the small area of the Malabar coast, and even this has not existed in recent times. It is now a myth — Even the very small section of Harijans, that is the sweeper or scavangers' castes, who form only 5.04 per cent of the total population of Harijans can be said, only by the widest stretch of imagination, to defile a very orthodox section of their co-religionists, who broadly form 5 per cent of the total Hindu population, by presence or by shadow is past history, and the charge ought not to be levelled against Hindu Society of the present by any fair-minded person.

Mr. Churchill has not at all taken into consideration a great change brought about in the social status of Harijan Community during the last ten years by the reform movement aimed at doing justice to them. Today a large number of them are to be seen in Legislative and Ministerial bodies, Municipal and Rural Councils, Colleges, Schools and playgrounds, and even in common Messes enjoying equal rights with other section of the Hindu community. Witness for instance, the marvellous effect of throwing open a large number of important temples in the State of Travancore and Indore and in the Britist districts of Tamil Nad, which are more conservative areas than other parts of India. But the Hindu community should be grateful to Mr. Churchill for calling Harijans the co-religionist of Hindus. For even that is denied by some malicious propagandists, which abusing the Hindu community.

It is true that Harijans still suffer from certain social disabilities, to remove which efforts are being made on an extensive scale. But it is not fair to say that in the year 1942, 50 millions of Harijans defile their Hindu co-religionists by their presence or by their shadow? And even

though coming from the mouth of the Premier of Great Britain, can it be anything else but false propaganda? The mild Hindus are always attached by people of their faiths. But this particular definition from the high personage with very wide and onerous responsibility is nothing less than propaganda of a very bad type and makes a mountain out of the mole-hill." .*Ibid*, pp. 22-23).

पार्लमेंटमध्ये क्रिप्ससाहेबानी आपल्या हिंदी शिष्टाईबद्दल झालेल्या टीकेला उत्तर देणारे भाषण ११-९-१९४२ ला केले. महात्मा गांधी यांच्या भूमिगत डावपेचामुळे आपली शिष्टाई यशस्वी झाली नाही, असा क्रिप्सनी एक मुद्दा उपस्थित केला. त्याबद्दल श्री. राजाजी, हिंदू (पत्र) वगैरेनी जाहीर निषेध १४-९-४२ ला व्यक्त केला. (India Unreconciled, p. 53).

हिंदुस्थानातील राजकीय परिस्थितीबद्दल मध्यवर्ती कायदे मंडळात चर्चा व्हावी म्हणून सरकारने १५ ते १८ सप्टेंबर १९४२ हे चार दिवस मुक्रर केले. सध्याची जी राजकीय परिस्थिती हिंदुस्थानांत उत्पन्न झालेली आहे तिला काँग्रेसची बेजबाबदार चळवळ हीच कारणीभूत आहे, असा गृहमंत्री सर रोजिनाल्ड मॅक्सवेल यांनी आपल्या भाषणांत सिद्धांत मांडून चर्चेला आरंभ केला. त्यांनी काँग्रेसच्या अपकृत्यांचा पाढा वाचला. चर्चेत २० सभासदांनी भाग घेतला. त्यांत मुसलमान, हिंदू व शीख हे होते. अस्पृश्यातर्फे रावबहादूर एन्. शिवराज आणि डॉ. आंबेडकर होते. काही वक्त्यांनी सरकारची बाजू उचलून धरली तर कांहीनी काँग्रेसची (India unreconciled, pp. 311-65). रा. ब. एन्. शिवराज यांनी अस्पृश्यांची भूमिका मांडली. ती अशी – आम्ही हिंदी स्वातंत्र्याचे विरोधक अगर वैरी नाही. हिंदी राज्याचा कारभार सर्वस्वी आपल्याच हाती यावा, असे आम्हाला वाटत नाही. पण राज्यकारभारात आम्हाला योग्य व न्याय वाटा मिळाला पाहिजे. आम्ही हे युद्ध दोस्त राष्ट्रातर्फे यशस्वी व्हावे, असे इच्छितो. ते यशस्वी करण्यासाठी आम्ही आमच्या शक्तीप्रमाणे सरकारला साहाय्य करीत आहोत. आमचे हितसंबंध सरकारने सुरक्षित ठेवले पाहिजेत. सरकारने कोणाच्या नादी लागून आमच्या हितसंबंधावर जर निखारे ठेवले तर आम्ही युद्ध यशस्वी व्हावे म्हणून जे देशांत प्रयत्न चाललेले आहेत त्यांत प्रचंड अडथळे उत्पन्न करू; मग त्यासाठी आम्हाला रक्तपात करावा लागला तरी आम्ही मागेपुढे पहाणार नाही.

'Rao Bahadur N. Shivraj': We (the Schedules Castes) have never said at any time that we stood for continued slavery of India or that India should be under a foreign domination.' We have always made it plain that we shall not interfere with any measure or any agitation that is

carried on for the freedom of this country. When we have been all the time claiming is a just and right share in the administration of the country, not with a view to run the Government ourselves but with a view to see that the Government is not run against us. It is for this purpose that all our leaders from whatever platform they have spoken, have mentioned this particular aspect of the question. We are not anxious to run the Government of India. We do not certainly like to become the President of the Indian Republic, or become the Viceroy of India at once. Sir I wish to conclude my statement by saying that we feel that the question of the Scheduled Castes will be ultimately settled before the tribunal of the United States and secondly, we are interested in the victory of the United Nations. Towards that end we shall do everything to see that we support this war effort. There is a particular point which I wish to mention, viz. that if the Government should let us down in the matater of giving protection in this emergency, we shall be obliged to take our own action which may lead to bloodshed and obstruction of the war effort'. (India Unreconciled, pp. 344-45).

डॉ. आंबेडकर यांनी आपल्या भाषणांत खालील विचारसरणी मांडली.

काँग्रेसच्या पुढाऱ्यांना तुरुंगात डांबून टाकले म्हणून कांही विरोधी पक्षाचे सभासद सरकारवर टीका करतात. काँग्रेस ही अहिंसाव्रत पाळणारी संस्था आहे, असे जे त्यांचे म्हणणे आहे ते बरोबर नाहीं. गेल्या तीन चार वर्षांतील काँग्रेस चळवळीचा इतिहास पाहिला तर असे दिसून येते की, काँग्रेसने हिंसावादाचा अवलंब केलेला आहे. तेव्हां हिंसावादी कृत्ये करणाऱ्या राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांना तुरुंगात ठेवले हे सरकारने योग्यच केले. कांही विरोधक सभासदांचे असे म्हणणे आहे की, सध्यांच्या सरकारची पुर्नरचना करून देशांत राष्ट्रीय सरकार म्हणजे राष्ट्राचा कारभार चालविणाऱ्या सरकार-वर नियंत्रण ठेवू शकणारे कायदेमंडळ उत्पन्न करणे. असे प्रस्तुतचे कायदेमंडळ नाही. ज्या कायदेमंडळांत सर्व धर्माचे व जमातीचे योग्य प्रमाणांत प्रतिनिधी निवडून येणे व मग त्या प्रतिनिधींनी सरकार निर्माण करणे. हे असे सरकार राष्ट्रीय स्वरूपाचे होईल. इतर स्वरूपाचे सरकार राष्ट्रीय स्वरूपाचे होणार नाही. परंतु नेमकी हीच गोष्ट बहुसंख्यांकांच्या प्रतिनिधींना नको आहे. त्यांना अल्पसंख्यांकांना सरकारांत स्थान द्यावयाचे नाहीं. मग राष्ट्रीय सरकार कसे होणार व चालणार ? डॉ. आंबेडकरांचे सदर भाषण पुढील प्रमाणे होते.

'Dr. B. R. Ambedkar:— "The critics of Government have said that the Government were not justified in arresting the members of the Congress, and as I understand the agreement correctly, the argument is to be that Congress is a body which believes in non-violence and that if the Congress had been allowed to be free they certainly would have controlled the situation in such a manner that they would have prevented violence from emerging. It seems, to me that the Members who take that line have not correctly read what has happened to the Congress and the members of the working committee during the last two years with regard to the principle of non-violence. Sir, as I read the proceedings of the Congress during the last two or three years, the impression that has been left upon my mind is that there has been a terrible landslide in the principle of non-violence as has been proclaimed by the Congress.

It has been said by the Members of the opposition that, although repression may be justifiable, by the circumstances of the moment, it should not be the duty of the Government merely to stop with repression but that Government must take some constructive step. When one begins to examine the constructive steps to which reference has been made from different sections of the House, one cannot but be surprised at the bewildering medley of suggestions that have been made. I, therefore, pick upon only one which appears to me something definite and something which you can put your teeth in and examine. The suggestion has been made that the Government of today should be recast, refashioned, and should work as a National Government. Now in order that I may be able to present to the House the point of view which I am urging with regard to this suggestion it would be better if I began by stating what the Government is, what its nature is. The Government is rested not in the Governor-General, not in a single authority, but it is vested in the Governor-General-in-Council. Every member of the Executive Council is a colleague of the Governor-General. That fact can ever be forgotten and

ought never to be forgotten; and my submission therefore, is that if Indians are wanting a Government which is democratic, which excludes autocracy, and which is by law — not by convention only — imposes upon those who are in charge of the administration a collective responsibility, then my submission to the House is this : That you cannot revise a better form of Government than the one we have. I know it has been said against this Government that although that may be so, this Government is subject to the veto of the Viceroy and of the Secretary of State. With regard to the veto of the Viceroy I would like to point out that the veto is confined to matters which relate to the safety and tranquility of India. It is not a general Veto. It is not a veto which applies to the day-to-day administration of the country.

The only question, the only quarrel that can arise — I can perfectly understand that sort of quarrel — is where should the veto be ? Should it lie with the Secretary of State, should it be with the Viceroy, or should it lie at any other place or in some other organisation ? That can be the only point of quarrel. As to the existance of the Veto, I submit that there can be no quarrel among those who believe in responsibility, among those who believe in democratic Government. The question, therefore, that arises is this. If we are not have the veto with the Secretary of State, where are we to have it ? It seems to me that if you want to transfer the veto from the Secretary of State, the only place where I can see it can be rightly placed in the legislature. There is no other place for the veto.

The question, therefore, is this, and I think it is a simple question. Can we transfer the veto to the Legislature as it exists today ? What is the composition, what is the charactor of this Legislature ? Now, Sir, it is quite true and I do not think I am saying anything derogatory to this House that having regard to the efflux of time, this House is almost in a deceased state. It was elected for three years, but it has been sitting for almost nearly nine years. I do not

know to what extent the present Members of this House can be said to derive a mandate from their constituencies which can be regarded as direct and fresh, if it has not become stable by the efflux of time. I won't say anything about it, but let us proceed further and examine the composition of the House. Examine the legislature from any point of view you like, examine it in the point of view of the mandate, examine it from the point of view of the composition of Legislature, its representative character. Examine it also from the point of view of the electorate which is represented and have no doubt about it that this House cannot be regarded as sufficiently representative to impose a veto on a National Government.

Mr. Jamnadas M. Mehta : Why did you call session ? (There were some more interpretations).

Dr. B. R. Amberkar : The point therefore, is this. Either you must acknowledge the fact that this House is not representative enough to have the Veto deposited to it, or you must consider whether during the period of the war it is possible for us to enter upon refastioning this Legislative Assembly in such a manner that it will contain a sufficient number of Hindus, a sufficient number of Mussalmans, a sufficient number of the Depressed Classes, and all the other elements, which go to make up the national life of the country. Therefore, my submission is that this decision which has been made for a National Government is certainly the result of confused thinking, is the result of the desire of most people to avoid what I regard as the most crucial question, namely, a communal settlement because until we get a communal settlement it is quite impossible to refastion this House, in a manner in which it would be regarded as fit to receive the veto powers over the Executive that may be fastioned under the new Constitution" (Ibid, pp. 354-56).

काँग्रेसने हिंसावादाचा अलिकडे अवलंब केलेला आहे, हा डॉ. आंबेडकरांच्या भाषणातील मुद्दा चुकीचा आहे, हे सिद्ध करण्याचा डॉ. पी. एन्. बानर्जी यांनी प्रयत्न केला. सध्याचे मध्यवर्ती कायदे मंडळ प्रतिनिधिक स्वरूपाचे नाही, या डॉ. आंबेड-

करांच्या मुद्यावर श्री. हुसेनभाई ए. लालजी आणि नवाबजादा महंमद लियाकत अलिखान यांनी कडाडून हल्ला केला. तेव्हां त्यांच्यात शाब्दीक चकमक झाली.

(Liaquat Ali Khan.........He made certain observations regarding this House I think it was in bad taste.| If there have not been any general elections during the last eight years, the responsibility cannot be thrust on the shouıders of the Members of this House, the responsibility is on the Government of which he is a party today......

Dr. B. R. Ambedkar — What is the electorate behind this Legislature ? (Interruption).

Ali Khan — I say that there is greater popular sanction behind this Legislature than behind the Government of which Dr. Ambedkar is a part." — Ibid p. 359.

गांधीजींची तुरुंगातून सुटका व्हावी, या मूळ मुद्यावर, सरकारने १९४२ च्या ऑगस्ट नंतर देशांत जी हिंसात्मक व विध्वंसक कृत्ये हिंदुस्तानात झाली व ती काँग्रेसच्या प्रेरणेने अशी भूमिका घेऊन गांधीजी व इतर काँग्रेस पुढारी यांना, तुरुंगातून मुक्त करण्याचे नाकारले.

मि. चर्चिल यांनी जे पार्लमेंट मध्ये १०-९-४२ ला भाषण केले, त्याचा, सौम्य भाषेत निषेध करणारे संयुक्त पत्रक मवाळ पक्षांच्या पुढाऱ्यांनी व इतरांनी (सर चुनीलाल सेटलवाड, सर तेजबहादूर सप्रू, चक्रवर्ती राजगोपालचारी) मिळून काढले. सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेट, टाईम्स, लंडन (१०-१०-४२). मँचेस्टर गार्डीयन (११-९-४२) वगैरे पत्रांनी चर्चिलच्या भाषणावर टीका केली की, ब्रिटिश साम्राज्य विनाशाच्या पंथास लागले असतां चर्चिलने असले उद्दाम भाषण करून हिंदी राजकीय पक्षांना दूर लोटले, हे हितावह नाही. (India unreconciled, p. 52).

१९४२ च्या सप्टेंबरमध्ये दिल्लीत हिंदुमहासभेच्या कार्यकारणीची आणि आयटक (ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसच्या) सर्व साधारण मंडळाची सभा भरविण्यांत आली तेव्हां दोन्ही सभेत असा ठराव मंजूर करण्यांत आला की, हिंदुस्थानातील प्रमुख राजकीय पक्षांशी ब्रिटिश सरकारने वाटाघाटी करून भावी हिंदी राज्याची रूपरेखा आखावी; हिंदुस्थानाला संपूर्ण स्वातंत्र्य युद्धोत्तर काळांत देण्यात येईल, आणि युद्ध समाप्तीनंतर हिंदीलोकांचे राष्ट्रीय सरकार हिंदुस्थानांत सुरू करण्यांत येईल, अशा घोषणा ब्रिटिश सरकारने केल्या तर हिंदी जनता ब्रिटिशांना युद्धात यशस्वी होण्यास मनापासून सहाय्य करील. अमेरिकेचे अध्यक्ष मि. रुझवेल्ट आणि चीनचे सर सेनापती मार्शल चांग-कै-शेक यांना हिंदुमहासभेने तार पाठवून विनंती केली की हिंदुस्थानात

हिंदी राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यांस ब्रिटिश सरकारला तुम्ही भाग पाडा (India Unreconciled, pp. 23 and 27).

मजूरांच्या आशा आकांक्षाचे योग्य चित्रण करणारी भाषणे दिल्लीतील रेडिओवरून व्हावीत अशी सरकारने योजना तयार केली. मजूरांच्या चळवळीशी निगडीत असलेल्या आणि प्रत्यक्ष चळवळीशी फारसा संबंध नाही, परंतु त्या चळवळीचा ज्यांनी चांगला अभ्यास केला आहे, अशा व्यक्तींकडून ती भाषणे घडवून आणावीत असे धोरण आंखलेले होते. डॉ. आंबेडकरांनीही मजूरमंत्री म्हणून पहिले भाषण करावे असेही ठरविण्यांत आले. त्यांनी हे भाषण मुंबई रेडिओवरून ९ नोव्हेंबर १९४२ च्या रात्री केले. त्यांनी भाषणाचा विषय 'Why Indian Labour is Determind to Win this War?' हा घेतला. याच शिर्षकाखाली हे भाषण Delhi Printing Works, Delhi येथे छापून प्रसिद्ध करण्यांत आले.

मजूर लोक दुसरे महायुद्ध यशस्वी करण्यासाठी रात्रंदिवस प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहेत. कारण भारतात स्वातंत्र्य, समता व बंधुत्त्व या तत्त्वावर अधिष्ठित झालेले सरकार यावे, अशी त्यांची मनोमय इच्छा आहे. यासाठी हिटलर व मुसोलिनी यांच्या झोटींगशाही सरकारचा व अंमलाचा संपूर्ण नायनाट केला पाहिजे, हे भारतीय मजूरांना पटलेले आहे. ही झोटींगशाही या युद्धात यशस्वी झाली तर जगातील मजूर लोकांना गुलाम म्हणूनच जगावे लागेल, ही जाणीव हिंदी मजूर लोकांना झालेली आहे. म्हणूनच हे युद्ध जिंकण्यासाठी आपण रात्रंदिवस श्रम केले पाहिजेत हेही ते जाणतात. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तीन तत्त्वांवर उभारलेले सरकार मजूर लोकांना हवे आहे. घटनात्मक लोकशाहीचे सरकार त्यांना नको आहे. कारण त्यांत त्यांना मतदानाशिवाय कसलाही भाग घेता येत नाही. म्हणून आतापर्यंत जे विशेष हक्क, अधिकार वैगरे कांही लोकांना देण्यांत आले ते नष्ट करावेत व समाजांतील सर्व माणसांना समान पातळीवर ठेवावे; आणि परस्परांशी जे दैनंदिन व्यवहार होतात त्यांत ममत्व (आपुलकी) आणली पाहिजे. राष्ट्रीयत्वापेक्षांही आपुलकी (ममत्व) ही भावना फार प्रबळ असल्यामुळे सर्व हिंदी जनतेने आपल्या दैनंदिन व्यवहारांत ही भावना उराशी बाळगली पाहिजे; म्हणजे मजूर, शिक्षक वगैरे लोकांत बंधुभाव निर्माण होईल. ही उद्दीष्टे (तत्त्वे) नजरेसमोर ठेऊन भारतीय मजूर, हे युद्ध जिंकण्यासाठी जिवापाड कष्ट करीत आहेत व करीत राहतील. अशा प्रकारचा भाषणाचा सारांश होता. ते भाषण मी येथे देत आहे :—

## "WHY INDIAN LABOUR IS DETERMINED TO WIN THIS WAR ?"

By

DR. B. R. AMBEDKAR,
M.A., Ph.D., D.Sc.,
Barrister-at-Law.

(Broadcast Talk from the Bombay Radio Station on 9th November, 1942).

—x—

Delhi Printing Works, Delhi.

"There is to be a series of broadcasts by persons who are connected with and interested in Labour. My talk to-night is the first of this series, the subject of my talk is of a general sort. It is to serve as an introduction to the series, the title I have chosen for the subject is '*Why Indian Labour is determined to win this War.*' There is one fact which must arrest the attention of all. It relates to the attitude of Indian Labour towards the War. In the midst of this sudden surge of non-co-operation with and opposition to the war effort which we are witnessing in India, Labour has been actively co-operating in the prosecution of the war. Of this there can be no question. This, labour has done and is determined to do notwithstanding the many efforts that are being made to dissuade it from doing.

During the war Labour has secured many gains and will no doubt secure many more. As pointed out by me recently, Labour has obtained security through legislation. It has obtained the right to safety, care and attention, through the conditions of welfare which have been enforced by the Central Government upon the Employees for the benefit of Labour. But, if Labour is determined to do its utmost to accelerate war effort, it is not simple because of the lure of these immediate gains. There are other and stronger reasons which are at the base of this determination. Labour is not content with securing merely fair conditions of work. What Labour wants is fair conditions of life. Let me explain what Labour means by fair conditions of life (page 1).

Labour wants liberty. There is perhaps nothing new in this. What is new is Labour's conception of liberty. Labour's conception of liberty is not merely the negative conception of absence of restraint. Nor is Labour's concep-

tion of liberty confined to the mere recognition of the right of the people to vote. Labour's conception of liberty is very positive. It involves the idea of Government by people. Government by people, in the opinion of Labour, does not mean Parliamentary Democracy. Parliamentary Democracy is a form of Government in which the function of the people has come to vote for their masters and leave them to rule. Such a scheme of Government, in the opinion of Labour, is a travesty of Government by people. Labour wants Government which is Government by the people in name as well as in fact. Secondly, liberty as conceived by Labour includes the right to equal opportunity and the duty of the State to provide the fullest facilities for growth to every individual according to his needs.

Labour wants equality. By equality Labour means abolition of privileges of every kind in law, in the civil service, in the Army, in taxation, in trade and in industry. In fact the abolition of all processes which lead to inequality.

Labour wants Fraternity. By fraternity it means an all pervading sense of human brotherhood, unifying all classes and all nations, with "peace on earth and goodwill towards man" as its motto.

These are Labour's ideals, they constitute the New Order, the establishment of which alone can save humanity from destruction. How can this New Order be established if the Allied Nations lose the (page 2) war? That is the supreme question which Labour knows it would be fatal to shirk or to avoid. Can this New Order be established by sitting idle and refusing to fight? Labour believes that Victory for the Allied Nations is the only hope of such a New Order coming into being. If the Allies fail, sure enough there will be a New Order. But the New Order will be no other than the Nazi Order. It will be an Order in which liberty will be found to be suppressed equality denied, and fraternty expurgated as a pernicious doctrine.

This is by no means the whole of the Nazi New Order. There are parts of the Nazi Order which must compel

every Indian to give anxious thought to its dangers, no matter what his religion, his caste and his political faith. The most important part is the one which enunciates the creed of racial gradation. This is the principal dictum in the Nazi Order.. The Nazi regard the German Race as the Race of Supermen. They are pleased to place the other White Races below the German race. But to the Brown Races — and Indians are included in this category — they give the last place in the gradation. As though this is not humiliating enough, the Nazis have declared that the Brown Races shall be the serfs of the German and the White Races, They are not to have education, they are not to have any liberty — political or economic. The fury with which the British Government has been denounced by Hitler in has Mien Kamf for having given Indians education and political liberty, is quite well-known. The Nazi ideology is a direct menace to the liberty and freedom of Indians. Given this fact, there is the strongest reason why Indians should come forward to fight (page 3) Nazism. No one compares the Nazi Order with the New Order which labour has in view, can have any doubt that Labour has in view, can have any doubt that Labour, in making up its determination to fight for the Allies and to defeat and destroy Nazism, has taken up a position which is the only position which all sensible people can take.

There are, however, people who refuse to take this view.

There are some who think that they do not mind a Nazi Victory and the coming of the New Nazi Order. Fortunately, not many of these are to be found in the country. Those who take this view are not serious themselves. Nobody takes them seriously. They are embitttered politicians who will not be satisfied unless they are allowed to disstate their way and whose motto is "all or nothing".

There are pacifists who argue that all wars are wrong. They argue that the troubles of world are largely due to the wars that have devastated and deraced human civiliza-

tion which men have built up at the cost of so much human effort. This is true. But in spite of all this, Labour refuses to accept pacifism as a principle of life. Wars cannot be abolished by merely refusing to fight when attacked. Peace obtained by surrender to the forces of violence is not peace. It is an act of suicide for which it is difficult to find any justification. It is a sacrifice of all that is noble and necessary for maintaining a worthy human life to the forces of savagery and barbarism. Surrender is not Labour's way to abolish war. Only two things will, in the opininn of Labour, abolish war. One is to win the war and the other is to establish a just peace. In the view of Labour both are equaly important. Labour holds that the (page 4) origin of war does not lie in man's thirst for blood. The origin of war is to be found in the vile peace that victors often impose upon the vanquished. According to Labour, the duty of the pacifist is not to sulk and to refuse to fight when war is on. Labour believes that the duty of the pacifist is to be active and alert both when the war is on and also when the terms of peace are being forged. The pacifist fails to do the right thing at the right time. The pacifists are active against war when war is on. They are inactive and indifferent when the war is over and peace is being made. In this way pacifists lose both, war as well as peace. If Labour proposes to fight this war, it is because pacifism is not the Labour's way of abolishing war.

There are pessimists who say that there is no guarantee that victory will be followed by a New Order. There is perhaps room for this pessimism. The New Order, which is the ideal of labour, has its roots in the French Revolution. The French Revolution gave rise to two principles — the principle of self-government, and the principle of self-determination. The principle of self-government expresses the desire of the people to rule itself rather than be ruled by others whether rulers be absolute monarchs, dictators, or privileged classes. It is called 'democracy'. The principle of self-determination expresses the desire of a people united

by common ideals and common purposes to decide, without external compulsion, its political status whether independence, inter-dependence, or Union with other peoples of the world. This is called nationalism. The hope of humannity was centres on the fructification of these principles. Unfortunately (page 5) after a lapse of nearly 140 years, these principles have failed to take roots. The old regime has continued either in all its nakedness or by making sham concessions to these two principles. Barring a few countries, there was neither self-government nor self-determination in the world. All this of course is true. But this is no argument against the attitude taken by Labour, namely that the preliminary condition for the establishment of the New Order is Victory over the forces of Nazism. All that this means is that Labour must be more vigilant and that the war must not stop with Victory over Nazis, but there must be no peace unless there is Victory over Old Order where ever it is found.

More serious opponents of Labour are, of course, the Nationalists. They accuse labour of taking an attitude which is said to be inconsistent and injurious to Indian nationalism. Their second objection is that Labour agrees to fight for war without getting any assurances about India's independence. These are questions so often posed and so seriously argued that it is necessary to state what Labour thinks of them. As to nationalism, Labour's attitude is quite clear, Labour is not prepared to make a fetish of nationalism. If nationalism means the worship of the ancient past — the discarding of everything that is not local in origin and colour — then Labour cannot accept nationalism as its creed. Labour cannot allow the living faith of dead to become the dead faith of the living. Labour will not allow the ever expanding spirit of man to be strangled by the hand of the past which has no meaning for the present and no hope for the future; nor will it allow it to be cramped in a narrow jacket of local particularism. (page 6). Labour must now insist upon constantly renovat-

ing the life of the people by being ever ready to borrow in order to repair, transform and recreate the body politic. If nationalism stands in the way of this re-building and re-shaping of life, then Labour must deny nationalism.

Labour's cread is internationalism. Labour is interested in nationalism only because the wheels of democracy — such as representative Parliaments, responsible Executive, constitutional Conventions, etc., — work better in a community united by national sentiments. Nationalism to labour is only a means to an end. It is not an end in itself to which Labour can agree to sacrifice what it regards as the most essential principles of life.

As to independence Labour fully recognize its importance. But Labour thinks that there is a wrong approach to the question of independence and a misunderstanding about its importance. The independence of a nation ex-hypothesis does not tie it up to any particular form of Government or organisation of society. External independence is quite compatible with internal slavery. Independence means nothing more than that a nation has liberty to determine its form of Government and its social order without dictation from outside. The worth of independence depends upon the kind of Government and the kind of society that is built up. There is not much value in independence if the form of Government and the order of society are to be those against which the world is fighting today.. Labour thinks that more emphasis ought to have been placed on New India and less on 'Quit India.' The appeal of a New India with a New Order is bound to be (Page 7) greater than the appeal of independence. Indeed the vision of a New Order in a New India would very greatly strengthen determination to win freedom. Such an approach would certainly have stopped the many embarrassing questions which are being asked, namely, freedom for what and freedom for whom.

Secondly, immediate realisation of independence as a condition for a support to the war effort, Labour finds it

difficult to understand. This condition marks a sudden development in the attitude of some people to the war effort, and could be justified only if there was any sudden conspiracy to rob India of her right to freedom. But there is no evidence of any such conspiracy. Nor can such a conspiracy, if there were any, succeed no matter who the conspirators are. In the view of Labour no one can deprive India of her right to freedom if she demands it with the combined strength of a united people. If India's independence is in the balance, it is because of disunity among Indians. The enemies of India's independence are Indians and no others.

Labour's attitude to this war is framed after a full realization of what is involved in the war. Labour is aware that it must win both, war as well as peace, if war is to be banished from the world. Labour is aware that it is not enough to defeat the Nazis and to destroy the possibilities of the New Nazi Order coming into being. Labour is aware that, if thus is a war against the New Nazi Order, it is not a war for Old Order. It is a war on both the Old Order as well as the Nazi Order. Labour is aware that the only compensation for the cost of this war is the establishment of a New Order in which liberty, equality (page 8) and fraternity, will not be mere slogans but will become facts of life. But the question of all questions is how can the hope of this New Order materialise? On this question Labour is quite emphatic. Labour insists that for the materialization of all these ideals there is one condition that is primary and that is success in the war. Without success in the war there can be no self-government and self-determination for India. Without victory in the war, independence will be an idle twaddle. This the reason why Labour is determined to win this war.

This war is full of potentialities for good. It promises to give birth to a New Order. Labour finds that this war is different from other wars. There are two features which distinguish it from other wars. In the first place, this war is not altogether a war for the division of the world's terri-

tory amongst the most powerful nations of the world as the preceding wars have been. In this war, the division of the world's territory is not the only cause. This is a war in which there is a conflict of ideologies relating to the forms and systems of Government under which humanity is to live. In the second place, this war is not altogether a mere war as other wars have been. Its object is not merely to defeat the enemy, to march on to his capital and to dictate a peace. This war besides being a war is also a revolution — a revolution which demands a fundamental change in the terms of associated life between man and man and between nation and nation. It is a revolution which calls for a revision of the terms of associated life — a replanning of the society. In this sense it is a people's war, and if it is not, it could and should be made into a people's war. Given these facts, Labour cannot be indifferent to this war (page 9) and to its outcome. Labour is aware how the efforts in the past for the establishment of a New Order have been frustrated time and again. That is because democracy, after it was brought into being, was left in Torry hands. If the people of the world take care to see that this mistake is not committed again in future, Labour believes that by fighting this war and establishing the New Order the world can be made safe for democracy.

The country needs a lead and the question is who can give this lead. I venture to say that Labour is capable of giving to the country the lead it needs. Correct leadership apart from other things, requires idealism, and free thought. Idealism is possible to the Aristocracy, though free thought is not. Idealism and free thought are both possible to Labour. But neither idealism nor free thought is possible to the Middle-Class. The Middle-Class does not possess the liberality of the Aristocracy, which is necessary to welcome and nourish an ideal. It does not possess the hunger of the New Order, which is the hope on which the labouring classes live. Labour, therefore, has a very distinct contributon to make in bringing about a return to the same and

safe ways of the past which Indians had been pursuing to reach their political destiny. Labour's lead to India and Indians is to get into the fight and be united. The fruits of Victory will be independence and a New Social Order. For such a Victory all must fight. Then the fruits of Victory will be patrimony of all, and there will be none to deny the rights of a united India to share in that patrimony. (page 10)."

● ● ●

# खंड ९

## प्रकरण ७

## व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळांत (पुढे चालू)

गांधीजींनी व्हाईसरॉय यांना १४–८–४२ ला येरवाड्याच्या (पुणे) तुरुंगातून पत्र पाठवून, हिंदी राजकीय परिस्थितीबद्दल काँग्रेसची भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर त्या दोघांमध्ये बराच पत्रव्यवहार झाला. पण कोणीही आपल्या तत्त्वापासून मागे सरण्यास तयार होईना. गांधीजींचा तुरुंगवास, हिंद–छोडो चळवळ आणि युद्धाची सामुग्री हिंदुस्थानांतून समरांगणावर नेण्याची सरकारची धडपड, यामुळे हिंदी राजकीय वातावरणात जी एक अभेद्य भिंत उभी राहिली, ती लवकर नष्ट करा; अशी सर्व पक्षांची मागणी असतांही सरकार त्याबद्दल अनुकूल मत प्रदर्शित करीत नाही, हे पाहून कांही पुढाऱ्यांना संताप आला. त्यांनी आपल्या परीने हा संताप व्यक्त केला. सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांनी व्हाईसरॉयच्या कार्यकरिणीतील आपल्या सभासदत्वाचा (Member of Information and Broadcasting) राजीनामा दिला व तो व्हाईसरॉयनी २१ ८ ४२ ला स्वीकारला. डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी यांनी आपल्या फडणीस पदाचा राजीनामा १६–११–४२ ला दिला. तोही व्हाईसरॉयनी स्वीकारला. (India Unreconciled pp. 59 to 100). गांधीजींनी २१ दिवसांचे उपोषण १०–२–४३ ला सुरू केले तेव्हां सर होमी मोदी, श्री. नलीनी रंजन सरकार, श्री. एस. एस. आणे यांनी राजीनामे दिले तेव्हा श्री. व्ही. व्ही कालिकर यांनी १५–२–४३ ला कौंसिल ऑफ स्टेट मध्ये असा ठराव आणला की, सरकारने गांधीजींना तुरुंगातून तावडतोब मुक्त करावे, आणि राजकीय पेच प्रसंग सोडवून देशात चांगले वातावरण निर्माण करावे. या ठरावावर कडक्याचा उहापोह झाला. गृहमंत्री मि. रेजिनाल्ड मॅक्सवेल यांनी सरकारची बाजू मांडून ठरावाला विरोध केला. अखिल हिंदी पुढाऱ्यांच्या परिषदेत गांधीजींना लौकर तुरुगातून मुक्त करा असा ठराव संमत करून तो सरकारकडे पाठविला. सर्व राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांनी या बाबतींत २१–२–४३ ला मि. चर्चिल यांना तार पाठविली. मि. चर्चिलचे नकारात्मक उत्तर २२–८–४३ ला आले.

गांधीजींनी २१ दिवसांचे उपोषण ३-३-४३ ला सोडले. त्यांचे उपोषण यशस्वी झाले, याबद्दल त्यांना जगांतील बहुतेक थोर व्यक्तींकडून अभिनंदनपर पत्रे आली. 'आम्हाला गांधीजींची भेट, तुरुंगात ३१-३-४३ ला घेऊं द्या,' अशी विनंती करण्यासाठीं मुंबईत सर्व पक्षीय पुढाऱ्यांची परिषद ९ व १० मार्च १९४३ ला भरली व तीत मंजूर झालेला ठराव मुंबई व हिंदी सरकारकडे पाठविला. पण सरकारने आपले धोरण बदलले नाही. प्रेसिडेंट रूझवेल्ट यांचा वैयक्तिक प्रतिनिधी फिलिप्स यांना गांधीजीबरोबर येरवडयाच्या तुरुंगात चर्चा करून त्यांचे युद्धाला साहाय्य करण्याबद्दल मन वळविण्याचा ध्यांस लागलेला होता. सरकारने २५-४-४३ ला मि. फिलिप्स यांची विनंती नाकारली. गांधीजीनी श्री. जीना यांना तुरुंगातून २६-३-४३ ला पत्र लिहिले ते सरकारने पुढे जाऊ दिले नाही. याप्रमाणें राजकीय पेचप्रसंग सोडविण्यासाठी जी भूमिका पुढारी व इतर लोक तयार करूं पहात होते त्यांचे सर्व प्रयत्न सरकारनें हाणून पाडले. (India Unreconciled, pages 57-180).

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या १०१ वी जयंतीप्रित्यर्थ भारत सेवक समाज, (servants of India Society) पुणे, या संस्थेने पुण्यातील आपल्या गोखले मेमोरीयल हॉलमध्ये जानेवारी १९४३ मध्ये एक मोठा समारंभ केला. त्या समारंभात बाबासाहेबांनी भाषण करावे याबद्दल त्यांना 'डेक्कन सभा ऑफ पूना' या संस्थेने आमंत्रण दिले. बाबासाहेबांनी भाषणाचा विषय 'रानडे, गांधी आणि जीना' असा घेतला. भाषण १८ जानेवारी १९४३ ला झाले. बाबासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी हॉलमध्ये श्रोत्यांची खच्चून गर्दी झाली होती.

रानडे, गांधी आणि जीना या तिघांत विचारवंत आणि व्यवहारी राजकारणी कोण होते, ही मध्यवर्ती कल्पना भाषणात ठेवून बाबासाहेबांनी त्या कल्पनेचा तारतम्य दृष्टीने विस्तार केला. आणि त्यांनी असे दाखविले की रानडे हे गांधी आणि जीना यांच्यापेक्षा फार श्रेष्ठ दर्जाचे राजकारणी आणि विद्वान पुरुष होते. रानडे १६ जाने. १९०१ साली दिवंगत झाले, तेव्हां सातारा हायस्कूलला सुट्टी मिळाली होती. तेव्हां रानडे यांचे नाव आपण प्रथम ऐकले, अशी बाबासाहेबांनी एक आठवण सांगितली त्यावेळी ते हायस्कूलमध्ये पहिलीत (इंग्रजी) होते. अस्पृश्यांना लष्करात घेऊ नये असा ब्रिटिश सरकारने १८९२ मध्ये निर्णय घेतला. त्या निर्णयाविरुद्ध महार मिलिटरी पेन्शनर्स लोकांनी सरकारला अर्ज करण्याचे ठरविले. तो अर्ज न्या. रानडे यांनी तयार केला. त्यांच्या या कृत्याबद्दल महार पेन्शनर्स नेहमी आदरयुक्त उद्‌गार काढीत असत, अशी दुसरीही आठवण बाबासाहेबांनी त्यावेळी सांगितली. कार्याबद्दल कळकळ, तळमळ आणि प्रामाणिकपणा हे सद्‌गुण ज्या पुरुषाच्या अंगात आहेत, तो पुरुष मोठा मानला जातो. तो या सद्‌गुणांमुळे, समाजांतील अनिष्ट चालीरीती नष्ट करतो आणि समाजाला सन्मार्गावर आणून सोडतो. रानडयांच्या आगोदरचा काळ म्हणजे ब्राह्मणी सत्तेचा होता. त्या सत्तेने हिंदुसमाज अत्यंत हीन, दीन आणि मानसिक, शारिरिक, बौध्दिक,

नैतिक व अध्यात्मिक बाबतीत दुर्बळ आणि निःसत्व करून टाकलेला होता. ब्राह्मणांचे हे, हिंदुसमाजाला आत्मघातकी असणारे वर्चस्व धर्माच्या नांवाखाली सर्रास चालत होते. यासाठी त्यांनी पुराणे व शास्त्रे लिहिली ती हिंदुसमाजाला नागविण्यासाठी आणि लुबाडण्यासाठी ! आपली इच्छा तृप्त करण्यासाठी, ब्राह्मण राक्षसी उपाय योजीत असत. त्यांना हिंदू जर इच्छित धन, धान्य, अगर इतर वस्तू देण्यास नकार देत असतील तर ब्राह्मण चाकू अगर वस्तऱ्याने स्वतःच्या अंगावर जखमा करून ते हिंदूकडून जबरीने काढून घेत. प्रसंग पडल्यास विषप्रयोग करून दात्यांच्या घरासमोर प्राण देण्याच्या ते धमक्या देत. दात्यांच्या अंगणात लाकडांचा कुड उभारून त्यावर म्हाताऱ्या ब्राह्मण स्त्रिला बसवीत आणि दात्याला धमकी देत की मला ती वस्तू दे नाही तर कुडाला आग लावून ही म्हातारी जाळून टाकतो; त्याचे (ब्रह्महत्तेचे) पाप तुला लागेल. स्वतःची बायको आणि मुले दात्यांच्या अंगणांत उभी करून ब्राह्मण त्याला म्हणत असे, माझी इच्छित वस्तू दे; नाही तर या सर्वांचा शिरच्छेद करतो; त्याचे पाप तुला लागेल. दात्यांच्या उंबरठ्यावर बसून इच्छित वस्तू मिळेपर्यंत धरणे धरणे, हाही एक ब्राह्मणांचा जालीम उपाय होता. ब्राह्मणेत्तर हिंदू स्त्रियांचा उपभोग घेण्याची वहिवाटही ब्राह्मणांनी चालू केली. कालिकत, झामोरिन यांच्या राजवाड्यांत ही प्रथा पुष्कळ दिवस चालू होती. ब्राह्मणाने स्वतःच्या पत्नीशी संभोग केला तर ती पवित्र होते असा समज समाजात रूढ झाला. त्यामुळे वल्लभ पंथ आणि इतर धार्मिक पंथ यांच्यात ही रूढी सुरू झाली.
("The Brahmin systematically preyed on society and profiteered in Religion. The Puranas and Shastras which he manufactured in tons are a treasure trove of sharp practices which the Brahmins employed to befool, beguile and swindle the common mass of poor, illiterate and superstitious Hindus. It is impossible in this address to give references to them. I can only refer to the coercive measures which the Brahmins had sanctified as proper to be employed against the Hindus to the encashment of their rights and privileges. Let those who want to know read the preamble to Regulation XXI of 1795. According to it whenever a Brahmin wanted to get anything which could not be willingly got from his victim, he resorted to various coercive practices, accelerating his own body with knives and razors or threatening to swallow some poison were the usual tricfls he practised to carry out his selfish purposes. There were other ways employed by the Brahmin to coerce the Hindus which were as extraordinary as they were shameless. A common practice was the erection in front of the house of

his victim of the Koorh ,......) — a circular enclosure in which a pile of wood was placed within the enclosure an old woman was placed ready to burnt in the Koorh if his object was not granted. The second desire of such a kind was the placing of his women and children in the sight of his victim and threaten to behead them. The third was the Dhurna-starving on the doorstep of the victim. This is nothing. Brahmi's had started making claims for a right to deflower the women of non-Brahmins. The practice provided in the family the Zamorin of Calicut and among the Vallabhachari sect of Vaishnavas. What depths of degradation the Brahmins had fallen to! If as the Bible says, the salt has lost its flavour wherewith shall it be salted? No wonder the Hindu Society had its moral bonds loosened to a dangerous point. The East India Company had in 1819 to pass a regulation (VII of 1819) to put a stop to this moral degeneracy. The preamble to the Regulation says that women were employed wholesale to entice and take away the wives or female children for purposes of prostitution, and it was common practice among husbands and fathers to desert their families and children. Public consience there was none, and in the absence of consience it was futile to expect moral indignation against the social wrongs. Indeed the Brahmins were enjoyed in defending every wrong for the simple reason that they lived on them. They defended untouchability which condemned millions to the lot of the helot. They defended castes, they defended female child marriage and they defended enforced widow-hood — the two great props of the Caste System. They defended the burning of the widows, they defended the social system of graded inequality with its rule of hyper-gamy which led the Rajputs to kill in their thousands the daughters that were born to them. What shames! What wrongs! Can such a Society show its face before civilized nations? Can such a society hope to survive? Such were the questions which Ranade asked. He concluded that on only one conditions it could be saved — namely regorous social reform." pp. 29-31).

अशा तऱ्हेच्या अधःपाताच्या कर्दमांत रुतून बसलेल्या हिंदुसमाजाला प्रथम वर काढणे, हा उपाय त्या समाजाला राजकीय स्वातंत्र्य देण्याअगोदर योजला तरच त्या समाजाला राजकीय स्वातंत्र्याचा आस्वाद घेता येईल. ज्या समाजातील बहुजन समाजाला कसलेही स्वातंत्र्य नाही, वा अधिकार नाहीत त्या समाजाला राजकीय स्वातंत्र्याचा काय उपयोग ? ते राजकीय स्वातंत्र्य पूर्वीच्याच मूठभर अधिकारारूढ जातीला म्हणजे ब्राह्मणांना उपभोगता येईल. मग ते ब्राह्मण बहुजन समाजावर कायमची आपली पकड बसवतील. अशी हिंदुसमाजांत जर स्थिती उत्पन्न झाली तर हिंदुस्थान देशांत सर्वाधिकारित्वाचे (हुकूमशाही) राज्य सुरू होईल. ब्राह्मण समाज तरी सामाजिक नीतिमत्तेची उपासना करीत होता काय ? धार्मिक सत्तेच्या जोरावर ब्राह्मण लोक बहुजन समाजाची पिळवणूक करीत होते. हिंदुसमाजांत सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक समता नव्हती. त्यामुळे तो समाज जातिभेदांनी खिळखिळा झालेला होता. ही स्थिती प्रथम सुधारणे जरूर होते. मग राजकीय सुधारणेकडे वळणे प्राप्त होते. अशी तर्कशुद्ध विचारसरणी रानड्यांची होती; म्हणून ते राजकीय सुधारणेपेक्षा सामाजिक सुधारणेला जास्त महत्व देत होते.

"Ranade argued that there were no rights in the Hindu Society what the moral sense of man could recognize. There were privileges and disabilities, privileges for a few and disabilities for a vast majority. Ranade struggled to create rights. Ranade wanted to vitalize the concience of the Hondu Society which had become moribund as well as morbid. Ranade aimed to create a real social democracy, without which there could be no sure and stable politics. The conflict was between two opposing points of view and it centred round the question, which is more important for the servival of a nation, political freedom or strong moral fiber. Ranade took the view that moral stamina was more important than political freedom. This was also the view Lucky the great historian who after a careful and comparative study of history came to the conclusion that : "The foundation of a Nation's strength and prosperity is laid in pure domestic life, in commercial integrity, in a high standard of moral worth, and of public spirit, in simple habits, in courage, uprightness, and certain soundness and moderation of judgement which springs quite as much from character as from intellect. If you would form a wise judgement of the future of a nation, observe carefully whether

these qualities are increasing or decreasing. Observe carefully what qualities count formost in public life. Is character becoming of greater or less importance? Are the men who obtain the highest posts in the nation men of whom in private life, irrespective of party competent judges speak with genuine respect? Are they of sincere convictions, consistent lives and indisputable integrity? It is by observing this current that you can best cast the horoscope of a nation?

Ranade not only wise but he was also logical. He told his opponents against playing the part of Political Radicals and Social Tories. In clear and unmistakable terms he warned them by saying:—

"You cannot be liberal by halves. You cannot be liberal in politics and conservative in Religion. The heart and the head must go tother. You cannot cultivate your intellect enrich your mind, enlarge the sphere of your political rights and privileges, and at the same time keep your heart closed and cramped. It is an idle dream to expect men to remain enchained and enshacked in their own superstition and social evils, which they are struggling hard to win rights and privileges from their rulers. Before long these vain dreams will find their dreams lost.

Experience has shown that these words of Ranade have been true, even prophetic" (pp. 37-39).

राजकीय सुधारणा घडवून आणण्यासाठी जे लोक प्रयन्न करीत होते. त्यांना सरकारकडून त्रास होत होता; पण समाजाकडून त्यांचा गौरव होत होता. मामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी जे लोक झटत होते त्यांना समाजाकडून जातिबहिष्कार वगैरे उपायांनी अतोनात त्रास होत होता. हा त्राम महन करून सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी जे लोक झटत होते त्यांची संख्या फार थोडी होती. कारण या त्रासांच्या अग्निकुंडात आपली आहुती देणारे ध्येयवादी लोक थोडेच असतात. राजकीय क्षेत्रात सरकारकडून त्रास झालेल्या लोकांना हौतात्म्य प्राप्त करून देऊन समाज त्यांचा गौरव करीत असे. यामुळे राजकीय क्षेत्रात जास्त लोक पडले. अशी परिस्थिती असतांना रानड्यांनी सामाजिक सुधारणेचे शिंग फुंकले. त्यांनी सामाजिक सुधारणेचे मार्ग आणि उपाय विशद करून दाखविले समाजाने या सन्मार्गाने जाऊन आपली प्रगती करून घेतली पाहिजे, हे रानड्यांनी जीव तोडून सांगितले. अस्पृश्य समाज, हिंदु स्त्रिया

आणि ब्राह्मणेत्तर लोक हे आपल्या भोगांची आणि उपभोगाची केवळ साधने होत, असे ब्राह्मणांनी मानून त्यांचे समाजांतील सामाजिक जीवन पशुतुल्य केलेले होते. याविरुद्ध चळवळ करण्यासाठीं रानडे यांनी सामाजिक सुधारणा परिषद सुरु केली. या परिषदेच्या चळवळीमुळे सामाजिक सुधारणेला अनुकूल वातावरण उत्पन्न झाले. प्रतिकूल वातावरण उत्पन्न करण्याची चळवळ ब्राह्मणांतील प्रतिगामी विचारांच्या लोकांनी केली. तेलंग, चिपळूणकर आणि टिळक हे या विरोधकाचे पुढारी होते. त्यांनी रानडे व त्यांचे सहकारी यांच्यावर कटु टीका केली. रानडे, त्यांच्या टिकेला अगर पाताळयंत्री विरोधाला भ्याले नाहीत. त्यांनी सामाजिक सुधारणेची चळवळ धिम्मेपणाने पण अत्यत कळकळीने आणि प्रामाणिकपणे चालवून त्या चळवळीची वाढ केली. समाजातील जुनी घाण नष्ट करून सामाजिक श्रेष्ठ दर्ज्याची नितिमत्ता निर्माण करणे हे रानड्यांचे ध्येय होते. 'Ranade's aim was to cleanse the old order if not to build a new one. .......... improving the moral tone of Hindu Society.')

गांधी आणि जीना यांनी समाजिक सुधारणेपेक्षा राजकारणावर ज्यास्त भर दिला. ते दोघेही आत्मकेंद्रीय होते. त्यांच्या अहंकाराला सीमा नव्हती. ते स्तुतीचे चहाते आणि टीकेची वैरी होते. राजकारण हे त्यांचे स्वतःच्या मालकीचे हत्यार होते. ते स्वतःला स्वयंभू समजत. ते परस्परांना कमी लेखित असत. त्यांच्या या दुर्गुणांमुळे हिंदी राजकारणाला व्यापाराचे स्वरुप प्राप्त झाले. या व्यापारी स्वरुपाला हिंदुराजकारणी पुरुष प्रमुख्याने कारणीभूत झाले. हे व्यापारी स्वरूप म्हणजे राजकीय गलिच्छ अधःपात होय. ('Indian politics, at any rate the Hindu part of it, instead of being spiritualised has become grossly commercialised so much so that it has become a byword for curruption." p. 50) गांधी आणि जीना यांनी आपल्या य दुर्गुणांमुळे हिंदी राजकारणाला अनिष्ट वळण लावले. त्यामुळे परस्परामधील देवाणघेवाण करण्याच्या राजकारणातील प्रमुख तत्त्वाला हिंदुस्थानात वाव राहिला नाही; ही हिंदी राजकारणाची फार मोठी हानी झालेली आहे. ("They will not meet except on preposterous conditions. Jinnah insists that Gandhi should admit that he is a Hindu. Gandhi insists that Jinnah should admit that he is one of the leaders of the Muslims. Never has there been such a deplorable state of bankruptcy of statemanship as one sees in these two leaders of India" p. 51).

रानडे हे गांधी आणि जीना यांच्यापेक्षा मोठे बुद्धिमान आणि विद्वान होते. पण ते आत्मनिष्ठ व अहंमन्य नव्हते. ते अत्यंत नम्र आणि शालीन होते. ('His intellectual attainments could have justified any

amount of pride, may even insolance. But he was the most modest of men' p. 52). रानड्यांनी उदारमतवादी राजकीय पंथ निर्माण केला. ते सनदशीर साधनांचा अवलंब करीत असत. सदर पंथ पुढील काळात इतका सरकार धार्जिणा बनला की जहाल पंथातील लोकांनी त्याला मवाळ हे सार्थ नाव दिले. या मवाळ पंथाने रानड्यांच्या राजकीय तत्वज्ञानाचा विचका केला. हा पंथ आपल्या दुष्कृत्यांनी हास्यास्पद झाला (पान ७२) त्यात रानड्यांचा दोष काय? रानड्यांनी तत्त्वे सांगितली. त्याचा पाठपुरावा चांगल्या रीतीने केला नाही. पण रानडे हे राजकारणापेक्षा सामाजिक सुधारणेला फार महत्व देत. ते धंदेवाईक राजकरणी नव्हते. ("Ranade was principally a social reformer. He was not a politician in the sense of one who trades in politics." p. 53). गांधी आणि जीना हे धंदेवाईक राजकारणी पुरुष होत. राजकारणापुढे त्यांना कशाचीही किंमत वाटत नव्हती. रानडे सामाजिक सुधारणा ही राजकारणाची जननी मानीत होते. हा त्याचा दृष्टीकोन शास्त्रशुद्ध होता. समाज सुधारून तो बळकट झाला तर तो स्वातंत्र्याला लायक होईल, अशी रानड्यांची विचारसरणी होती. म्हणून ते गांधी व जीना यांच्यापेक्षा श्रेष्ठ ठरतात. अमेरिकेत प्रथम भरीव सामाजिक सुधारणा झाली व त्यामुळे ते संघटित होऊन स्वातंत्र्यप्रिय झाले. अमेरिकेचे श्रेष्ठ अध्यक्ष अब्राहम लिंकन म्हणत असत की, युरोप, आशिया आणि आफ्रिका खंडातील सर्व सैन्य एकत्र केले व त्याचे सेनापतिपद नेपोलियन बोनापार्टला दिले; तरी ते सैन्य अमेरिकेच्या भूमीवर एक पाऊल, एक क्षणभरही ठेऊ शकणार नाही; कारण अमेरिकन लोक स्वातंत्र्याचे वारे प्यालेले आहेत आणि ते त्यांच्या स्वातंत्र्यावर हल्ला करणाऱ्यांना जमीनदोस्त करतील. (पा. ६७), अशा स्वातंत्र्याच्या आणि संघटनेच्या कल्पना लिंकनने अमेरिकेला दिल्या व त्या अमेरिकन लोकांनी व्यवहारात आणल्या. रानड्यांनी हिंदुस्थानला, हिंदी स्वातंत्र्याच्या खऱ्या (योग्य) कल्पना दिल्या. पण हिंदी लोकांनी त्या व्यवहारात आणल्या नाहीत. यावरून त्या कल्पना बाद ठरत नाहीत. त्या कल्पना चिरंजीवी आहेत. मॅझिनी म्हणे, तुम्ही माणसांना ठार करू शकाल पण तुम्हाला महत्वाची कल्पना ठार करता येणार नाही. ("You may kill men, you cannot kill a great idea." p. 83).

बाबासाहेबांच्या भाषणाचा सारांश येणेप्रमाणे होता. तो वर्तमान पत्रातून प्रसिद्ध झाला तेव्हां त्यावर अनेक हिंदू तसेच मुसलमान पुढारी आणि लेखक यांनी निर्दय हल्ले चढविले. या भाषणातील कांही भाग गाळून ते भाषण १९४३ साली पुस्तक रुपाने मुंबईतील ठॅकर अँड कंपनी लि. या प्रकाशना तर्फे ('Ranade, Gandhi and Jinnah, — Address Delivered on the 101st Birthday Celebration of Mahadeo Govind Ranade. Held on the 18th January 1943 in the Gokhale Memorial Hall, Poona; by The Hon'ble Dr. B. R. Ambedkar M.A., Ph.D., D.Sc., Bar-

at-Law, Member, Governor General's Executive Council". यां शीर्षकाने प्रसिद्ध केले. हे पुस्तक बाबासाहेबांचे आठवे वाङ्मयीन आपत्य होय. पृष्ठ संख्या ८५ पस्तावना पाने ५ किंमत दिलेली नाही.) पुस्तकाची भाषाशैली सुबक आहे. वाक्ये लहान लहान, पण शब्दांचे प्रहार म्हणजे आसुडाचे फटकारे होत. ब्राह्मण-ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी भाषणावर टिकास्त्राचे प्रखर हल्ले चढविले; या बद्दल बाबासाहेबांनी पुस्तकाच्या प्रस्तावनेत ( १५ मार्च १९३४३, २२, पृथ्विराज रोड, नवी दिल्ली ) शेवटी खालील उद्गार काढलेले आहेत :—

"I am condemned because I criticized Mr. Gandhi and Mr. Jinnah for the mess they have made of Indian politics, and in doing so I am alleged to have shown towards them hatred and disrespect. In reply to this charge what I have to say is that I have been a critic and must continue to be such such.. It may be I am making mistakes but I have always felt that it is better to make mistakes than to accept guidance and direction from others or to sit silent and allow things to deteriorate. Those who have accused me of having been actuated by feelings of hatred forget two things. In the first place this alleged hatred is not born of anything that can be called personal. If I am against that can be called personal. If I am against them it is because I want a settlement. I want a settlement of some sort and I am not prepared to wait for an ideal settlement. Nor can I tolerate any one on whose will and consent settlement depends to stand on dignity and play the Grand Moghul. In the second place, no one can hope to make any effective mark upon his time and bring the aid that is worth bringing to great principles and struggling causes if he is not strong in his love and his hatred. I hate injustice, tyranny, pompousness, and humbug, and my hatred embraces all those who are guilty of them. I want to tell my critics that I regard my feelings of hatred as a real force. They are the only the reflex of the love I bear for the causes I believe in and I am in no wise ashamed of it. For these reasons I tender no apology for my criticism of Mr. Gandhi and Mr. Jinnah, the two men who have brought India's political progress to a standstill.

The condemnation is by the Congress press, I know the Congress Press well. I attach no value to its criticism. It has never refuted my arguments. It knows only to criticise, rebuke and revile me for everything I do and to misreport, misrepresent and pervert everything I say. Nothing that I do, pleases the Congress Press. This animosity of the Congress Press towards me can to my mind not unfairly, be explained as a reflex of the hatred of the Hindus for the Untouchables. That their animosity, has become personal is clear from the fact that the Congress Press feels offended for my having criticised Mr. Jinnah who has been the butt and the target of the Congress for the last several years.

However strong and however filthy be the abuses which the Congress Press chooses to shower on me I must do my duty. I am no worshipper of idols. I believe in breaking them. I insist that, I — if I hate Mr. Gandhi and Mr. Jinnah — I dislike them, I do not hate them — it is because I love India more. That is the true faith of a nationalist. I have hopes that my countrymen will some day learn that the country is greater than the men, that the worship of Mr. Gandhi or Mr. Jinnah and service to India are two very different things and may even be contradictory of each other".

लीगचे समाधान केल्याशिवाय भारताला स्वातंत्र्य मिळणे अशक्य आहे, हा श्री. राजाजींनी आपला मुद्दा वेळोवेळी भाषणांतून मांडला. शेवटी त्यांनी मुसलमानांना जे पाकिस्तान द्यावयाचे त्याचे स्वरुप नक्की केले व त्याबद्दची आपली योजना ८-७-४४ ला जाहीर केली. हिंदुमहासभा व शीख यांनी ती योजना फेटाळली. ही योजना पाकिस्तान संबंधीचा "सी. आर. फॉर्म्युला" या नावाने प्रसिद्धीला आली. तिच्यातील मुख्य मुद्दे असे : (१) भारताच्या स्वातंत्र्याच्या मागणीला लीगने कॉंग्रेला पाठिंबा द्यावा (२) युद्ध संपेपर्यंतच्या मध्यंतर काळात जे मध्यवर्ती सरकार निर्माण होईल ते कॉंग्रेस आणि लीग यांचे होईल, (३) युद्ध संपल्यानंतर पाकिस्तांन व हिंदुस्थान असे देशाचे भाग करण्यासाठी त्यांच्या सीमा ठरवाव्या, त्या ठरविण्यासाठी एक कमिशन नेमावे, (४) कमिशन ज्या शिफारशीं करील त्याप्रमाणे पाकिस्तान व हिंदुस्थान यांच्या सीमा ठरवाव्यात आणि (५) ब्रिटिशांकडून भारताला संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात आल्यानंतर पाकिस्तान व हिंदुस्थान यांच्या निर्मितीची योजना हाती घ्यावी.

'सी. आर. फॉर्म्युला ' याचे मूळ इंग्रजी स्वरूप असे होते : —

*'The Rajaji Formula'* (July 8, 1944). Basis for terms of settlement between the Indian National Congress and the all-India Muslim League to which Gandhiji and Mr. Jinnah agree and which they will endeavour respectively to get the Congress and the League to approve:

1) Subjects to the terms set out below as regards the Constitution for free India, the Muslim League endorses the Indian demand for Independence and will co-operate with the Congress in the formation of a Provisoinal Interim Govrernment for the transitional period.

2) After the termination of the War, a Commission shall be appointed for demarcating contiguous districts in the North-West and East of India wherein the Muslim population is in absolute majority. In the areas thus demarcated, a plebiscite of all the inhabitants held on the basis of adult suffrage or other practicable franchise shall ultimately decide in favour of forming a sovereign state separate from Hindustan such decision shall be given effect to, without prejudice to the right of districts on the border to choose to join either state.

3) It will be open all parties their of view before the plebiscite is held.

4) In the event separation, mutual agreements shall be entered into for safeguarding Defence and Communications, and for other essential purposes.

5) These terms shall be binding only in case of transfer by British of full power and responsibility for the Government of India. (My Days With Gandhi, by Nirmal Kumar Bose, pp. 31-32).

लीगने जरी पाकिस्तानच्या योजनेने मुसलमान समाजात चैतन्य आणले होते तरी तिच्या कांही पुढाऱ्यांना 'पाकिस्तान मिळविणे' ही साध्य होणारी घटना वाटत नव्हती. काँग्रेसला अडविण्यासाठी पाकिस्तानची योजना ब्रिटिशांच्या हातात देऊन लीगने काँग्रेस व हिंदू यांना हा जबरदस्त खोडा घातलेला होता. लीगचे एक पुढारी सर फिरोझखान नून यांनी १९४६ च्या एप्रिलमध्ये असे उद्गार काढले होते की हिंदू जर

आम्हाला पाकिस्तान आणि स्वातंत्र्य देण्यास तयार होतील तर ते आमचे मित्र आहेत, असे आम्ही समजू. जर ब्रिटिश लोक ते (पाकिस्तात आणि स्वातंत्र्य) आम्हाला देतील तर ते आमचे मित्र आहेत असे आम्ही समजू. आणि हे दोघेही ती आम्हास देणार नसतील तर रशिया देश आमचा मित्रोत्तम आहे, असे आम्ही समजू. ('If the Hindus give us Pakistan and Freedom then the Hindus are our best friends. But if neither will give it to us, then Russia is our best friend'. Pakistan, p. 13, by Keith Callard).

लीग व तिचे पुढारी यांना पाकिस्तानची संपूर्ण कल्पना १९४७ पर्यंत नव्हती आणि पुढाऱ्यांमध्ये पाकिस्तानच्या क्षेत्राबद्दल एकमत नव्हते. परंतु मुसलमानांना पाकिस्तान हवे, या मागणीच्या प्रचारकी जोरावर लीगच्या पुढाऱ्यांनी मुसलमानांच्या राजकीय आकांक्षाना उच्च पातळीवर नेऊन हेलावत ठेवले, आणि मुसलमानांच्या प्रक्षुब्ध मनोवृत्तींना हिंदू काँग्रेस व ब्रिटिश सरकार यांच्या विरुद्ध संघटीतपणे उभे केले. यामुळे मुसलमानांना ब्रिटिशांच्या सहाय्याने लष्कर पोलीस, न्याय वगैरे खात्यात व त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त नोकऱ्या १९३५ ते १९४६ च्या काळात मिळत गेल्या. हा फायदा मुसलमानांना दिसला व ते लीगच्या मागे संघटीतपणे उभे राहिले. (Muslim Politics, by Humayun Kabir, Inside India, by Halide Edib, and Warning to West, by Krishnalal Shridharani).

काँग्रेस ही फक्त सवर्ण हिंदूंची राजकीय संस्था आहे व ती हिंदूतील अस्पृश्य समाजाच्या राजकीय हक्कांना नेस्तनाबूद करते. लीग ही मुसलमानांची राजकीय संस्था असली तरी ती इतर धर्मांतील अल्पसंख्य मागासलेल्या वर्गांची पाठराखी आहे, असा लीगचे पुढारी काँग्रेसच्या विरुद्ध प्रचार करीत असत. १९४६ मध्ये दिल्लीला भारतीयांचे कामचलाऊ सरकार निर्माण करण्यांत आले त्यांत लीग सामील झाली. तेव्हां चार मुसलमान व एक अस्पृश्य, लीगतर्फे कामचलाऊ सरकारांत लीगने घुसविले. हे अस्पृश्य मंत्री म्हणजे बॅ. जोगेंद्रनाथ मंडल हे होत. कायदा व मजूर ही खाती त्यांच्याकडे देण्यांत आली. आपण अस्पृश्यांचे कैवारी आहोत. ही भूमिका लीगने पुढे चालू ठेवली. पाकिस्तानची घटना समिती निर्माण करण्यांत आली तेव्हा तिचा पहिला अध्यक्ष बॅ. मंडल यांना करण्यांत आले. अस्पृश्यांचे चार प्रतिनिधी सर्वश्री अक्षयकुमार दास, धनंजय रॉय, बिरतचंद्र मंडल आणि प्रेम हरी बरमा यांना घटना समितीत घेण्यात आले. अक्षयकुमार दास हे १९४७ पर्यंत लीगचे सभासद होते. बिरतचंद्र मंडल आणि प्रेम हरी बरमा हे १९४७ पर्यंत काँग्रेसचे सभासद होते. बॅ. जोगेंद्रनाथ मंडल हे शेडयूलकास्टस फेडरेशनचे बंगालमधील पुढारी होते. ते लीगतर्फे मध्यंतर सरकारात आले, त्याबद्दल त्यांनी डॉ. आंबेडकरांची संमती घेतलेली नव्हती. त्यांचे पाकिस्तान

घटना समितीचे अध्यक्षपद म्हणजे लीगच्या हातातील बाहुले होय, हे त्यांना लौकरच कळून आले. लियाकत अलीखान व इतर लीग पुढारी यांच्याशी मंडलांचे मतभेद होऊन खटके उडू लागले. १४-१०-५७ च्या घटना समितीच्या बैठकीत या मतभेदावर खडाजंगी चर्चा झाली. तेव्हा बॅ. मंडल घटना समितीच्या अध्यक्षपदाचा व सभासदत्वाचा राजिनामा न देताच कलकत्याला गेले व तेथेच स्थायिक झाले. ते ऑगस्ट १९४७ ते सप्टेंबर १९५० पर्यंत पाकिस्तानचे मंत्री होते. घटना समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी दोन महिने काम पाहिले. (Pakistan, by Klith Callard, pp. 246-47).

पाकिस्तानच्या राज्यघटनेचा उपोद्घात (Preamble of the Constitution of the Islamic Republic of Pakistan) असा होता :—

In the name of Allah, the Beneficent the Merciful.

Whereas sovereignty over the entire Universe belongs to Allah, Almighty alone, and authority to be exercised by the people of Pakistan within the limits prescribed by Him is sacred trust;

Whereas the Founder of Pakistan, declared that Pakistan would a democratic State based on Islamic principles of social justice;

........................................................................

Wherein the Muslims of Pakistan should be enabled individually and collectively to order their lives in accordance with the teachings and requirements of Islam;

Wherein adequate provision should be made for the minorities freely to profess and practice their religion and develop their culture.

(Pakistan, p. 330)

घटनेत अल्पसंख्यांकडून स्वधर्म व संस्कृती यांच्या संबंधी संरक्षण दिलेले होते तरी पाकिस्तानचा राज्यकारभार इस्लामी धर्माबरहुकूम चालविण्याचे ध्येय घटनेत नमूद केले होते. त्यामुळे अल्पसंख्यांक लोकांच्या संरक्षणाकडे पाकिस्तानचा कानाडोळा होणे शक्य होते. त्यामुळेच बॅ. मंडल यांना पाकिस्तानातून जाणे भाग पडले असावे.

१९५१ च्या शिरगणतीप्रमाणे पाकिस्तानांतील अल्पसंख्यांकांची लोकसंख्या खालीलप्रमाणे होती.

(हजार)

| | १) सवर्णहिंदू | २) अस्पृश्यहिंदू | ३) ख्रिस्ती | ४) दुसरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| पूर्व पाकिस्तान | ४१८७ | ५०५२ | १०७ | ३५९ | ९७०५ |
| पश्चिम ,, | १६२ | ३६९ | ४३४ | ७ | ९७२ |
| एकूण | ४३४९ | ५४२१ | ५४१ | ३६६ | १०६७ |

(Census of Pakistan, 1951, Table 6 : Pakistan, p. 232).

पाकिस्तानातील अस्पृश्यांची लोकसंख्या सवर्ण हिंदूंच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. तरीही त्यांना पाकिस्तानात फारसे महत्व नाही. याला कारण त्यांचा मागासलेपणा होय. अस्पृश्यांच्या हितसंरक्षणासाठी 'ऑल पाकिस्तान शिड्यूल्ड कास्टस फेडरेशन' ही संस्था चळवळ करीत असे. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ दिले तरच त्यांचे राजकीय हक्क शाबूत रहातील अशी फेडरेशनने चळवळ सुरू केली आणि १९५५ च्या नोव्हेंबर मध्ये जाहीर परिषदेत तशी मागणी केली. संयुक्त मतदार संघ व राखीव जागा फेड-रेशनला मान्य नव्हत्या. फेडरेशनच्या स्वतंत्र मतदार संघाला श्री. डी. एन. बरोई (पूर्व बंगाल) यांनी पाठिंबा दिला नाही. पाकिस्तानमधील इतर अस्पृश्य पुढाऱ्यांनीही सदर मागणीला विरोध केला. 'ईस्ट बेंगाल मायनॉरिटिज कॉन्फरन्स'नेही विरोध केला. या मुद्यावर १९५४ च्या निवडनुका लढविण्यांत आल्या. त्यांत बरोईच्या पक्षाला एकही जागा मिळाली नाही. फेडरेशनला ३८ पैकी २७ जागा मिळाल्या (डॉन, ५-४-५४). बरोईला सरकारी नोकरी मिळतांच त्यांनी स्वतंत्र मतदार संघाला पाठिंबा दिला. (Pakistan, pp. 247-48). श्री. ए. के बरोई हे पाकिस्तानच्या लोकसभेचे एप्रिल १९५३ ते ऑक्टोबर १९५४, आणि श्री. अक्षयकुमार दास हे सप्टेंबर १९५५ ते सप्टेंबर १९५६ पर्यंत सभासद होते. ते पुनः राजकारणात पडले नाहीत.

पाकिस्तान काश्मीर ताब्यात घेण्यास उतावीळ झालेले आहे, त्याची अनेक कारणे आहेत. भावानिक कारण हे की काश्मीर हा बहुसंख्य मुसल्मानांचा प्रांत आहे. हिंदूंच्या म्हणजे हिंदुस्थानच्या ताब्यात जाणे; म्हणजे पाकिस्तानच्या दुबळेपणाचे प्रदर्शन होईल. जुनागड व हैदराबाद ही मुसल्माल बहुसंख्य संस्थाने आपल्या ताब्यात घेऊन पाकिस्तानवर अन्याय केला आहे; त्यातून काश्मीरही हिंदुस्थानने घेतला तर पाकिस्तानवर अन्यायाचा कळस होईल. पश्चिम पाकिस्तानच्या सरहद्दी संरक्षणाच्या बाबतीत क्षमता नसलेल्याच आहेत. काश्मीर मिळाला तर संरक्षणाचे दृष्टीने पश्चिम पाकिस्तान भक्कम होईल. काश्मीरांत आर्थिकदृष्ट्याही पुष्कळ योजना यशस्वी करता येतील.

मध्यवर्ती सरकारच्या एका 'गॅझेटेड पोस्ट' साठी श्री. डोईफोडे नांवाच्या चांभार समाजातील एक पदवीधराने अर्ज केला होता, त्यासंबंधी त्याने श्री. भाऊराव गायकवाड

यांची शिफारस घेऊन एक पत्र साहेबांना पाठविले की, सदर जागा मला मिळावी या संबंधी आपण योग्य ते प्रयत्न करणे. या संबंधात बाबासाहेबांनी श्री. गायकवाड यांना २४-८-४३ ला एक उत्तर पाठविले. या उत्तरात आपल्या स्वभावाचे आणि सुशिक्षित अस्पृश्यांना नोकऱ्या मिळवून देण्याच्या बाबतीतील स्वतःच्या भूमिकेचे दिग्दर्शन केले आहे. डोईफोडे 'यांना मी पाहिलेले नाही, व त्यांची माझी जानपछान नाही. अशा कांही गोष्टी आहेत की मी त्या करू शकत नाही, आणि अशा कांही गोष्टी आहेत की मी त्या मुद्दाम करणार नाही. माझा स्वभाव तुम्हाला माहीत आहे. डोईफोडे यांच्याबद्दल मी कांही करू शकत नाही. ही बाब पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या सर्वस्वी स्वाधीनची आहे. त्यात मी ढवळाढवळ केली व माझ्या विरुद्ध गव्हर्नर जनरल यांजकडे तक्रार केली तर काय परिस्थिती उत्पन्न होईल? आपल्या सुशिक्षित तरुणांना नोकऱ्या उपलब्ध व्हाव्यात म्हणून मी प्रयत्नांची शिकस्त करीत आहे. त्या सर्वबाजूंनी लायक असणाऱ्या उमेदवारांना मिळाव्यात. त्या सोम्यागोम्यालाच मिळाव्यात असे जर मी करूं लागलो तर लायक तरूणांचा हिरमोड (विश्वासघात) करण्याचे पातक करीन.

सदर पत्रात साहेबांनी दुसऱ्या एका मुद्याबद्दल संताप व्यक्त केलेला आहे. श्री. दौ. गु. जाधव यांनी साहेबांना लिहिले की सध्या तात्पुरत्या कारकुनांच्या (टेंपररी क्लार्कस) जागा आहेत. कांही दिवसांनी त्यांचे रेल्वे इन्सपेक्टर्समध्ये रुपांतर होणार आहे. सदर जागेसाठी अर्ज पाठवा म्हणून मी (जाधव) आपल्या बऱ्याच तरुणांना सांगितले. पण कोणीही अर्ज केलेला नाही. हा प्रकार पाहून माझा भयंकर संताप झाला. आपल्या पोरांना झालेले आहे तरी काय? ते इतके कां बेफिकीर रहातात? जाधवांना तुम्ही (गायकवाड) साहाय्य कराल का?

सदर पत्र मी खाली देत आहे :-

"22, Prithviraj Road,
New Delhi.
Date : 24-7-43

My dear Bhaurao,

I have this day received a letter from Mr. R. M. Doiphode, B.A., with your endorsement. I don't know Doiphode, at any rate I don't remember him. There are things I can do, there are things which I cannot do and there are things which I won't do. You know my nature, how hard it is. Doipode's matter is one of those which I cannot do. It is a matter entirely within the jurisdiction of the Public Service Commission and they may well resent my intrusion

in their affairs. Not many people are friendly to me. Any body may write to the Governor General complaining of my trying to influence them. I shall never lord myself in that situation. I am responsible for creating opportunities for our boys. But I don't think it is necessary or obligatory on you or on me to take up the cause of any *particular* boy. We might thereby be doing injustice to other boys who might have equal chance. You will now understand why I am not inclined to intervene.

There is another matter to which I want to draw your attention. Jadhav writes to me that he has many vacancies of temporary clerks and these temporary clerks are afterwards taken up as Railway Inspectors, that he has asked many of our boys to join, but he has not had one. This considerably annoys me. What has happened to our boys and why are they so indifferent. Can you help Jadhav ?

Yours Sincerely,
Sd.|- B. R. A.

Mr. Gandhi and the Emancipation of the Untouchables हे ७५ पानांचे पुस्तक साहेबांचे नववे वाङ्मयीन आपत्य होय. हे १९४३ च्या डिसेंबरमध्ये प्रसिद्ध झाले. प्रकाशक ठॅकर अँड कंपनी, लिमिटेड, मुंबई. या पुस्तकाला साहेबांनी १-९-१९४३ ला प्रस्तावना ( २२, पृथ्वीराज रोड, न्यू दिल्ली ) लिहिले. हे पुस्तक का लिहिले व प्रसिद्ध केले व त्याचे हेतू कोणते, यावद्दल प्रस्तावनेत माहिती दिलेली आहे.

दुसरे महायुद्ध चालू असता त्यावेळी जे प्रश्न उपस्थित झालेले होते ते महायुद्ध यशस्वी करण्याच्या दृष्टीने सोडविणे, ही व्यापक भूमिका स्वीकारून आंतरराष्ट्रीय ऐक्य सांधण्यासाठी 'इंस्टिटयूट ऑफ पॅसिफिक रिलेशन्स' ही संस्था कार्य करीत होती. कॅनडा राज्यातील क्युबेक शहरात १९४२ च्या डिसेंबरमध्ये या संस्थेचे अधिवेशन भरणार होते. हिंदुस्थानांतील अस्पृश्यांच्या प्रश्नासंबंधी या अधिवेशनात विचारविनिमय व्हावा, असे या संस्थेतील भारतीय विभागाच्या अध्यक्षांना वाटले. म्हणून त्यांनी बाबासाहेबांना जुलैमध्ये विनंती केली कीं या बाबतींत तुम्ही आपले विचार प्रदर्शित करणारा एक प्रबंध पाठवा. साहेबांनीं आपला प्रबंध ऑगस्टमध्ये अध्यक्षांकडे पाठविला. त्या अधिवेशनात त्या प्रबंधावर चर्चा झाली. तो प्रबंध अधिवेशनाच्या अहवालांत छापला. जगातील स्वातंत्र्य व बंधुभाव ही नष्ट करून जगावर आपले अनियंत्रित स्वामित्व प्रस्थापित

करण्यासाठी साम्राज्यवाद, व हुकुमशाही ही, हे महायुद्ध लढवीत आहेत, आणि लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी ही राष्ट्रे या आक्रमक शक्तींना तोंड देत आहेत. त्यांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांकडे कानाडोळा केला तर, त्यांनी जरी जगात लोकशाही प्रस्तापित केली तरी ती खरीखुरी लोकशाही नसणार, तर ती जगातील निग्रो, ज्यू इत्यादि पददलित लोक आणि हिंदुस्तानांतील अस्पृश्य लोक यांना त्यांच्या हीन अवस्थेमध्ये ठेवून नांदू इच्छिणारी बेभरवशाची लोकशाही होईल म्हणून निग्रो, ज्यू इत्यादि लोकांच्या अवनत अवस्थेबद्दल जशी 'पॅसिफिक रिलेशन्स कॉन्फरन्स' कळवळ्याने विचार करून योग्य ते उपाय योजील, तशीच उपाययोजना अस्पृश्यांच्या बाबतीतही झाली पाहिजे. कारण वर्णद्वेषाच्या अगीत निग्रो व ज्यू हे जसे जगातील निरनिराळ्या भागात होरपळून निघत आहेत, तसेच हिंदू धर्मातील ब्राह्मण्य संरक्षक सनातन्यांच्या अमानुष जातीद्वेषाच्या ज्वालामुखीत होरपळून गेलेले हिंदुस्थानांतील अस्पृश्य लोक आहेत. जोपर्यंत या अस्पृश्य लोकांचे जीवन ब्राह्मण्यग्रस्त सवर्ण हिंदूंच्या टाचेखाली चिरडत राहील तोंपर्यंत हिंदुस्थानांतील लोकशाही ही बेगडी लोकशाहीच राहील. या प्रबंधातील मुद्दे परिषदेत मांडण्यांत यावेत, त्यावर चर्चा व्हावी, त्या चर्चेला जगातील सर्व देशांत प्रसिद्धी द्यावी, म्हणजे अस्पृश्यांचे प्रश्न त्यांना समजतील. एवढे करूनही अस्पृश्यांचे प्रश्न जर तसेच भिजत राहू दिले तर लोकशाही राष्ट्रे व हिंदुलोक यांची भावी जगातील लोक छी, थू करीत रहातील हे निर्विवाद होय! वरील आशयाचे विचार साहेबांनी मांडले.

("......There is generally agreed among the thoughtful part of humanity that there are...... problems which the Peace Conference is expected to tackle. They are (1) Imperialism, (2) Racialism, (3) Anti-Semitism, and (4) Free traffic in that merchandise of death there are plague glands in which nations cruelty to nation and man's inhumanity to man have their origin. There is no doubt that these problems must be tackled if a new and a better world is to emerge from the ashes of this terrible and devastating war. What my fear is that the problem of the Untouchables may be forgotten as it has been so far. That would indeed be a calamity. For the ills which the Untouchables are suffering, if they are not as such advertised as those of the Jews, aret not less real. Nor are the means and methods of suppresison use by the Hindus against the Untouchables less effective because they are less bloody than the ways which the Nazis have adopted against the Jews. The Anti-Semitism of the Nazis against the Jews is in no way different in

ideology and in effect from the Sanatanism of the Hindus against the Untouchables.

The world owes a duty to the Untochables as it does to all suppressed people to work their shackles and to set them free. I accepted the invitation to write this Paper because I feel that it was the best opportunity to draw the attention of the world to this problem in comparison to which the problem of the Slaves, the Negroes and the Jews is nothing. I hope the publication of this paper will serve as a notice to the Peace Conference that this problem will be on the Board of Causes which will have to hear and deside and also to the Hindus that they will have to answer for it before the bar of the world.")

या दहा प्रकरणांत विभागलेल्या पुस्तकात बाबासाहेबांनी जे विचार प्रदर्शित केलेले आहेत त्याचा सारांश मी खाली देत आहे.

हिंदु, मुसलमान व शीख या लोकांच्या हातात हिंदुस्थानच्या राज्ययंत्रांची सूत्रे असल्यामुळे या लोकांनी अस्पृश्यांचा उपयोग निवडणुकीच्या वेळी आपल्या बाजूने व्हावा म्हणून अस्पृश्यांची गणना शिरगणतीच्या वेळी हिंदू, मुसलमान व शीख अशीच व्हावी, असे प्रयत्न करण्यांत आले, याबद्दलची माहिती पहिल्या प्रकरणांत साहेबांनी दिलेली आहे. हिंदू, मुसलमान व शीख यांच्या या प्रयत्नांना बळी पडण्याचे अस्पृश्यांनी नाकारले तर त्यांना अतोनात छळ सहन करावा लागतो. या परिस्थितीमुळे अस्पृश्यांची लोकसंख्या बरोबर किती आहे याची खरी माहिती शिरगणतींत नोंदविण्यात येत नसते. याचे दुष्परिणाम अस्पृश्यांना भोगावे लागतात.

("The census has been cooked all over. But it is the Untouchables who have suffered most form the cooking of the census. That being so, the census figure regarding the total population of the Untouchables in British India cannot be accepted as giving a correct total. . . . . p. 11).

रोमन, स्पार्टन, ब्रिटिश व अमेरिकन लोकांनी गुलाम पाळलेले होते. त्यांनी गुलामांना स्वातंत्र्य दिले. ही फार महत्त्वाची ऐतिहासिक घडामोड झाली. हिंदूचे गुलाम अस्पृश्य लोक आहेत. जोपर्यंत ब्राह्मण्यग्रस्त विचारसरणी हिंदूंमध्ये अस्तित्वात राहील तोपर्यंत अस्पृश्य हे हिंदूंचे गुलाम म्हणून राहतील. हिंदूनी स्वातंत्र्यासाठी काँग्रेसतर्फे जी चळवळ चालविलेली आहे तिला कांही अमेरिकन व ब्रिटिश मजूर पुढारी व वर्तमानपत्रे पाठिंबा देतात. त्यांना ज्यू लोकांचा जो छळ होतो तो दिसतो. परंतु सहा कोटी अस्पृश्यांचा जो शतकानुशतके हिंदूंनी छळ केला व अद्याप करीत आहेत, तो या

लोकांना दिसत नाही. हिंदूंच्या स्वातंत्र्य मिळविण्याच्या प्रयत्नांना हे लोक उचलून धरतात. अस्पृश्यांनी गुलामगिरीतून मुक्त होण्याची जी चळवळ चालविली आहे ती या लोकांना दिसत नाही. हिंदूंचे स्वातंत्र्य प्राप्तीचे स्वप्न असे आहे की, ब्रिटिशांना हिंदुस्थानांतून हकलून दिले की, ती सत्ता आपण घेणार व इतरांवर राज्य करणार असल्या स्वातंत्र्य प्राप्तीला अस्पृश्यांनी हातभार लावला तर ते आपली गुलामगिरी कायम स्वरूपात चालू ठेवतील.

("Now nobody in India, outside the Hindus, knows that whatever may be its title it is beyond question that the Congress is a body of middle class Hindus supported by the Hindu Capitalists whose object is not to make Indians free but to be independent of British control and to occupy places of powers now occupied by the British. If that kind of Freedom which the Congress wants, has achieved there is no doubt that the Hindus would do the Untouchables exactly what they have been doing in the past,".......... pp. 13-14).

अस्पृश्यांची हिंदूंच्या गुलामगिरीतून मुक्तता करावयाची असेल तर त्यांना राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य प्रथमतः मिळाले पाहिजे. या बाबतींत १९-७-४२ ला नागपूरला भरलेल्या ऑ. इं. शे कास्टस कॉन्फरन्सने जे ठराव केलेले होते. त्यातील मागण्या अस्पृश्यांना देण्यांत आल्या पाहिजेत. या मागण्यांना हिंदूंचा विरोध आहे व हे सर्व विरोधक हिंदु काँग्रेसचे अनुयायी आहेत. मुसलमानांच्या पाकिस्तानला उचलून धरणारे जे हिंदू आहेत त्यांत श्री. राजगोपालचारी हे प्रमुख आहेत. मुसलमानांच्या पाकिस्तानला पाठिंबा देतांना या लोकांच्या जिभा व लेखण्या अष्टौप्रहर कार्य करीत राहतात. परंतु अस्पृश्यांच्या मागण्याबद्दल हे राष्ट्राभिमानी हिंदू लोक मूग गिळून स्वस्थ बसतात. परंतु अस्पृश्यांची एकी भंग करून त्यांना आपल्या कच्छपी लावण्यासाठी हे लोक अहर्निश गुपचुप झटत असतात. अशा लोकांच्या भजनी अस्पृश्य लोक लागले तर त्यांचा पुराच घात होईल. म्हणून त्यांना स्वतंत्र, राजकीय व आर्थिक जीवन जगता येईल, अशी सरकारने तरतूद केली पाहिजे. मग हिंदुस्थानांत खरीखुरी लोकशाही अस्तित्वात येण्यास प्रतिकूल परिस्थिती उत्पन्न होईल.

("...... The Hindus are prove to think that they and Untouchables are joined together by the will of God as the Bible says the husband is joined to his wife and they will say in the language of the Bible that those whom God is pleased to join let no man put asunder. The Untouchables are determined to repudiate any such view of their relations

with the Hindus. They want the link to be broken and a complete divorce from the Hindus affected without delay........" p. 50.

"What is the reaction of the Hindus to the demands of the Muslims, the Sikhs and Untouchables ? Notwithstanding the extravagance of their demands the Hindus are ever ready to conciliate the Musalmans and the Sikhs, particularly the former. They not only want to be correct in their relationship with the Musalmans, they are prepared to be considerate and even generous. Mr. Rajagopalachari's political exploits are too fresh to be forgotten. Suddenly he enrolled himself as a soldier of the Muslim League and proclaimed a war on his own kin and former friends and for what ? Not for their failure to grant the reasonable demands of the Muslim but for their not considering the most extravagant one, namely Pakistan !! What is Mr. Rajgopalachari's response to the demands of the Untouchables ? So far as I am aware there is no response. He does not even seem to be aware that there are 60 million Untouchables in this country and that they too like the Muslims are demanding political safeguards. This attitude of studied silence and cold indifference of Mr. Rajagopalachari is typical of the whole body of Hindus. The Hindus have been opposing the political demands of the Untouchables with the tenacity of a bulldog and the perversity of a renegade. The Press is theirs and they make a systematic attempt to ignore the Untouchables. When they fail to ignore them they buy their leaders; and where they find not open to purchase they systematically abuse him, misrepresent him, blackmail him, and do everything possible that lies in their power to suppress him and silence him......" pp. 60-61.

"......What does Mr. Gandhi propose to do after he gets his victory over the British ? Does he propose to use the freedom he hopes to get to make the Untouchables free or will he allow the freedom he gets to be used to endow the Hindus with more power than they posses, to hold the Untouchables as their bondsmen ?........ pp. 65.

"......What has Mr. Gandhi done to reform Hindu Society that his work and life he cited by democrats as a witness of hope and assurance ? His friends have been informed of the Harijan Sevak Sangh and they continue to ask, "Is not Mr. Gandhi working to uplift the Harijans ?" Is he ? What is the object of this Harijan Sevak Sangh ? Is it to prepare the Untouchables to win their freedom from their Hindu masters, to make them their social and political equals ? Mr. Gandhi had never any such object before him and he never wants to do this, and I say he cannot do this. This is the task of a democrat and revolutionary — Mr. Gandhi is neither. He is a Tory by birth as well as by faith. The work of the Harijan Sevak Sangh is not to raise the Untouchables. His main object, as every self-respecting Untouchable knows, is to make India safe for Hindus and Hinduism. He is certainly not fighting the battle of Untouchables. On the contrary by distributing through the Harijan Sevak Sangh petty gifts to petty Untouchables he is buying, benumbing and drawing the claws of the opposition of the Untouchables which he knows is the only force which will disrupt the caste system and will establish real democracy in India, Mr. Gandhi wants Hinduism and the Hindu Caste System to remain intact. Mr. Gandhi also wants the Untouchables to remain as Hindus. But as what ? Not as partners but as poor relations of Hindus. Mr. Gandhi is kind to the Untouchables. But for what ? Only because he wants to kill, by kindness, them and their movement for separation and independence from Hindus. The Harijan Sevak Sangh is one of the many techniques which has enabled Mr. Gandhi to be a successful humbug.

Turn to Pandit Jawaharlal Nehru. He draws his inspiration from the Jeffersonian Declaration, but he ever expressed any shame or any remorse about the condition of the 60 millions of Untouchables ? Has he anywhere referred to them in the torrent of literature which comes out from his pen ? Go to the youth of India if you want. The youths who fill the Universities and who follow Pandit's

lead are ever ready to fight the political battle of India against the British. But what do these children of the leisureds, class Hindus have done to redress the wrongs their forefathers have done to the Untouchables ? You can get thousands of Hindu youths to join political propaganda but you cannot get one single youth to take up the cause of breaking the caste system or removing Untouchability. Democracy and democratic life, justice and conscience which are sustanied by a belief in democratic principle are foreign to the Hindu mind. To leave democracy and freedom in such Tory hands would be the greatest mistake democrats could commit. It is therefore very necessary for the American friends of the Hindus to ask Mr. Gandhi and the Hindus to declare their War aims, so that they may be sure that the fight of the Hindus against British is really and truly a fight for freedom........" pp. 69-71).

जनता पत्र १९३९ च्या नंतर कसेबसे चालले होते. व कांही दिवस बंद पडले होते. सदर पत्राची उणीव भरून काढावी म्हणून नाशिकच्या कार्यकर्त्यांनी नाशिकला नवे वर्तमापत्र सुरु करण्याचे ठरविले होते. सदर पत्राला साहेबांचा आशीर्वादात्मक संदेश मिळावा म्हणूनही श्री. भाऊराव गायकवाड यांनी १९४३ च्या ऑक्टोबरमध्ये बाबासाहेबांना विनंतीचे एक पत्र लिहिले. वर्तमानपत्र (साप्ताहिक) काढण्याबद्दल साहेबांनी आनंद व्यक्त केला; पण त्यांनी गायकवाडांना २६–१०–४३ ला उत्तर देताना विचारले कीं, सदर पत्र चालवावयाचे तर पैशाचा भरपूर पाठिंबा पाहिजे. ज्याला लिहिण्याचे अंग व अनुभव आहे अशा गृहस्थाला संपादक करावे. तुम्ही कोणाला संपादक करणार ? वर्तमान पत्राचा दर्जा उच्च असला पाहिजे. त्यांत भरपूर माहिती आणि विचार यांनी भरलेले लेख आले पाहिजेत. या साठी संपादक नुसता पदवीधर असून उपयोग नाही. तो अभ्यासू व विशाल दृष्टीचा समाजसेवक असला पाहिजे. त्याच्या लेखनाने वाचकावर मोहिनी टाकली पाहिजे व वाचकांची व वर्गणीदारांची संख्या दिवसेंदिवस वाढविली पाहिजे. असा संपादक तुमच्या जवळ आहे काय ? त्याबद्दल तुम्ही कांहीच लिहिलेले नाही. वर्तमान पत्र चालविणे किती दगदगीचे आहे, याचा मला पूर्ण अनुभव आहे व म्हणूनच मी तुम्हाला सूचना देतो कीं, हे कार्य धिम्मेपणाने व विचारांती करावे. सदर पत्राचे नांव " कैवारी " अगर त्या अर्थाचे नसावे. या सर्व गोष्टींची माहिती तुम्ही मला दिली तर तुमच्या नूतन वर्तमान पत्राला मी संदेश पाठवीन.

श्री. गायकवाड यांनी दुसरी गोष्ट पत्रात लिहिली होती की नाशिकच्या मंडळींनी एक वसाहत स्थापन करण्याचे योजलेले होते. त्या वसाहतीचा नकाशा काढलेला होता.

त्या वसाहतीची कल्पना या पत्रात दिलेली होती. तो नकाशा श्री. रोहम यांचे बरोबर साहेबांच्याकडे दिल्लीला पाठविलेला होता. साहेबांना सदर वसाहतीची कल्पना आवडली. त्या वसाहतीत सभागृह व प्रार्थनागृह ठेवावे असे साहेबांनी सुचविले. याच पत्रात श्री. गायकवाड यांना कोळशाच्या खाणीवर समाजकल्याण अधिकारी, नेमण्याचे ठरविल्याचे व त्याबद्दलचे भाऊरावांचे मत विचारले आहे. ते पत्र असे :—

"New Delhi
Date : 26-10-43.

My dear Bhaurao,

I have had your letter regarding the project of starting a Paper. I am glad to know that there are a good few enthusiastic people who are prepared to run a Paper. I have been so much in this Paper business that I have learned to be more cautious and less enthusiastic. The running of a paper does not merely involve the question which of course is a very big question of finance it also involves the question of maintaining a standard of writing which will make it a respectable paper and which will attract readers. With the question of finance, I am not concerned because it will not be my responsibility. But I am very much concerned with the other question. Who is the Editor, what are his qualifications, these are the questions about which you have given no information. Without this information I am unable to bless the project. I have not given much thought to the question of name. That may be considered later. I am however not in favour of any such name as *Keyawari* (Kaiwari) or anything analogous to it.

I am returning the plan of the colony which Roham brought to me. I like it. I would suggest only two things. There is no provision for a Common Hall. I should like to have one. It can also be a place of worship. All those who have plots should contribute towards the cost of it. Another thing I would like is uniform elevation of an uniform plan.

Your term has been extended for two months. It may not be possible to extend further. We may be appointing

Welfare Officers for Coal-Mines. Would you like to take one of these posts ? Let me have your answer soon

Yours Sincerely,
Sd|- B. R. Ambedkar."

नाशिकला साप्ताहिक चालू करण्याचा नाशिककरांचा प्रयत्न फलद्रुप झाला नाही. त्यांची वसाहतीची योजनाही अस्तित्वात आली नाही, साहेबांनी देऊ केलेली नोकरी गायकवाडांनी स्वीकारली. ते लेबर वेलफेअर ऑफिसर, वेस्टर्न सर्कल, सेंट्रल पी, डब्ल्यू. डी. झाले.

बाबासाहेब व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात गेल्यानंतर त्यांनी जनतेच्या, विशेषतः अस्पृश्य समाजाच्या प्रगतीसाठी अनेक योजनासंबंधी मनन केले व त्या योजना कार्यान्वित करण्यासाठी मिळेल त्या व्यक्तींचा, अधिकाऱ्यांचा आणि संधीचा ते सदुपयोग करू लागले. बाबासाहेबांनी हे प्रयत्न १९४१ ते १९४५ च्या काळांत केले. त्यांतील बरेचसे 'अज्ञात' या कोटीत राहिले, आणि थोडेसे 'ज्ञात' कोटीत समाविष्ट झाले. हे 'ज्ञात' प्रयत्न पडद्यामागचे होते. पण त्यांना संबंधित व्यक्तींनी प्रकाशात आणले. अशा प्रयत्नांपैकी खालील प्रयत्न स्पृहणीय होत. त्यांत बाबासाहेबांची समाजाच्या प्रगतीसाठी वाटणारी कळकळ, त्यांना सहानुभूती दाखवूनही त्यांच्या कार्याला आयत्या वेळी खो घालणारे लोक व आयत्या वेळेला सहाय्य करणारे लोक इत्यादि गोष्टी उघडकीस येतात :–

## डॉ. आंबेडकर व मी

डॉ. आंबेडकर व्हाईसरॉयच्या एक्झीक्युटिव्ह कौंसिलचे सभासद होते त्यावेळची गोष्ट. साल १९४४ असेल. मी असेंब्लीच्या फायनान्स कमिटीचा सभासद होतो. त्या वेळेस ते एक दिवस रिसेस अवरमध्ये (मधल्या सुट्टीत) मी असेंब्ली हॉलमध्ये बसलो असतांना माझ्या सीटजवळ आले व मला म्हणाले "देशमुख, फायनान्स कमिटीसमोर मी पाठविलेले एक प्रपोजल उद्याच्या मिटिंगमध्ये येईल. ते प्रपोजल पास करून घेण्याला मदत करा. मुस्लीम लीगच्या सभासदांनी ते पास करून घेण्यास मदत करण्याचे कबूल केले आहे." प्रपोजलचे स्वरूप सांगताना ते म्हणाले, अस्पृश्यांच्या हुशार व उच्च शिक्षण घेतलेल्या मुलांना आणखी उच्च शिक्षणाकरिता परदेशात स्कॉलरशिपस देऊन पाठवावे; मी ह्या मताचा आहे की अशी मुले शिकून आली व त्यांना सरकारने महत्त्वाच्या जागा दिल्या तर अस्पृश्यता नाहीशी होण्यास खूप मदत होईल. अस्पृश्यांना हिंदूंची देवळे मोकळी करण्याने कांही अस्पृश्यता जाणार नाही. Key Positoin मध्ये असल्याने, महत्त्वाच्या जागी असल्याने त्यांचा सामाजिक दर्जा वाढेल, प्रतिष्ठा वाढेल स्पृश्य व अस्पृश्य यांचे दळणवळण तूर्त वरच्या थरातीलच का म्हणाना वाढेल व अस्पृश्यता नाहीशी होईल." "मदत करीन" असे मी त्यांना आश्वासन दिले.

मंदिरप्रवेशाच्या सत्याग्रहाची चिथावणी, मग कोणा बेजबाबदार पुढाऱ्याने दिली असा विचार सहजच मनांत आला. दुसरे दिवशी सर रायसन ह्या फायनान्स मेंबरच्या अध्यक्षतेखाली कमिटीची सभा सुरु झाली. आणि काय आश्चर्य! आंबेडकरांच्या भरवशाच्या म्हशीला टोणगा झाल. मुस्लिम लीगचे जे असेंब्लीचे सभासद होते त्यांच्यापैकी प्रत्येकाने ह्या डॉ. आंबेडकरांच्या प्रपोजलला विरोध केला. अनेक हरकती घेतल्या. त्यापैकी मुख्य आठवतात त्या ह्या :—

१) हे प्रपोजल नवीन तऱ्हेचे आहे. ह्याला (प्रेसिडेन्ट) Precedent नाही २ ह्यांना स्कॉलरशिप दिली व नंतर त्यांनी धर्मांतर केले तर? मी त्यांचे आक्षेप खोडून काढले. पण खरी मदत झाली (अध्यक्ष) सर रायसनची आणि ते प्रपोजल पास झाले. मी सभा संपल्यावर खोलीच्या बाहेर आलो व पाहतो तो श्री. श्रीकिसन, असोसिएटेड प्रेसचा पूर्वीचा रिपोर्टर—हजर. तो म्हणाला 'देशमुख, मी बऱ्याच वेळेपासून इथे उभा आहे. मला डॉ. आंबेडकरांनी पाठविले. काय झाला त्यांच्या प्रपोजलचा निकाल?

मी म्हणालो, 'बाबा रे प्रपोजल पास झाले. पण मुस्लिम लीगच्या मेंबर्सनी खूपच विरोध केला; मला (तर) डॉ. आंबेडकर म्हणत होते हे लोक त्यांना मदत करणार आहेत म्हणून! खूप मदत! गळ्यात टाकण्याची! इतके म्हणून मी दिल्लीतील वेस्टर्न कोर्ट हॉटेलमधील खोलीत जाऊन चहा घेतला. कांही वेळाने डॉ. आंबेडकरांचा फोन आला, 'माझेकडे चहाला या' मी कांही वेळाने त्यांचे बंगल्यावर गेलो. त्यांनी फायनान्स कमिटीच्या सभेचा हालहवाल विचारला. सभेत झालेल्या चर्चेची हकीकत (मी) त्यांना सांगितली. त्यांनी नंतर मला आपल्या बंगल्याच्या कंपाऊंडातील अनेक तऱ्हेचे गुलाब लावलेला बगीचा दाखविला. नंतर बंगल्याच्या हॉलमध्ये आम्ही दोघे गेलो तितक्यांत किसन केक घेऊन आला. आम्ही चहाच्या टेबलापाशी बसलो असतांना मी, डॉ. आंबेडकरांना म्हणालो 'मी आताच चहा घेऊन आलो. तेव्हां चहा नको पाणी मागवा.'

त्यांच्या प्रपोजलला मदत केल्याबद्दल त्यांनी माझे आभार मानले, मी त्यांची रजा घेऊन वेस्टर्न कोर्ट मध्ये आलो. मी ही गोस्ट गोपाळला सांगितल्यावरं गोपाळ म्हणाला—'डॉ. आंबेडकरांना महाराष्ट्राबद्दल खूप अभिमान आहे. ते एकदा म्हणाले होते, ईश्वरा! तुला जर मला फिरून जन्मास घालावयाचे असेल तर महाराष्ट्रात घाल. अशी मी प्रार्थना करीन."

वर दिलेल्या फॉरेन स्कॉलरशिपच्या प्रपोजलनंतर डॉ. आंबेडकर फिरून एकदा मजकडे असेंब्लीचे काम चालू असताना असेंब्लित भेटले. त्यावेळेस डॉ. आंबेडकर मला म्हणाले, लष्कर भरतीसंबंधी चर्चा चालू आहे तर तुम्ही महारांना सैन्यात भरती करण्यासंबंधी बोला! मी 'बरे आहे' म्हणालो व त्या ठरावाला मदत करणारे भाषण

केले.' (गोविंद गोपाळ, पाने ११८-१२०, लेखक : कॅ. गोविंद विनायक देशमुख नागपूर १९६४)

बॅ. देशमुख हे डॉ. गोपाळराव देशमुख (मुंबई) यांचे थोरले बंधु, त्यांचे 'गोविंद गोपाळ' हे पुस्तक दोन्ही भावांची स्मृती चित्रे होत.

• • •

# खंड ९

## प्रकरण : ८

# अस्पृश्यांचा लष्करी पेशा

अस्पृश्य समाज मूळचा क्षात्रवृत्तीचा होता. फार प्राचीन काळात त्यांची राज्ये महाराष्ट्रात होती. ती आर्यसंस्कृतीच्या बलाढ्यवाल्यांनी नष्ट केली. ते बौद्ध धर्माचे अनुयायी होते. बौद्ध धर्म सोडून ब्राह्मणी आर्यधर्म स्वीकारण्याचे त्यांनी नाकारले. इतरांनी (हल्लीचे मराठे) बौद्ध धर्म सोडून ब्राह्मणी आर्य धर्म स्वीकारला, म्हणून आर्यांनी त्यांना क्षत्रिय वर्णांत जागा दिली. असे कांही ग्रंथकारांचे मत मत आहे. या संदर्भांत "The Martial Race of India" by Lieut. General Cir George MacMunn, K.C.B., K.C.S.I., D.S.O., Colonel Commandent. The Royal Artillary, या ग्रंथातील खालील उतारा विचार करण्यासारख आहे :—

"The Maharattas are certain folk of semi-Aryan extraction who own and cultivate the land of the coastal plains and hills north and south of Bombay, the spurs and valleys of the wall of Western Ghats, and the uplands known as the Deccan, more properly Dekhan, and the lower lands and jungles of the Konkan. Because some Aryan or Jat race, because they were men of thaws and hearts and because they were prepared to leave Buddhism, and came back to the Brahmin fold, therefore, they were admitted to have *something*, it is not quite clear what of Rajput status...... (pp. 97-98) अस्पृश्यांनी बौद्ध धर्म सोडून ब्राह्मणी धर्म स्वीकारण्याचे नाकारल्यानंतर त्यांच्यावर ब्राह्मणी धर्मांतील शास्त्रांनी इतकी बंधने लादली की शेवटी ते लोक अस्पृश्य, अदृश्य वगैरे पदाला जाऊन पोहोचले, तरी इमानदारीबद्दल ते महशूर होते.

आर्य धर्माची सूत्रे हालविणारे ब्राह्मण आणि त्यांच्या तंत्राने चालणारे क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांनी अस्पृश्यांवर जी कडक बंधने घातली व ती पाळण्यासाठीं त्यांनी अस्पृश्यांचा जो अनन्वित छळ केला, त्याचा मुख्य हेतू हा की, अस्पृश्यांना उत्पन्नाची सर्व क्षेत्रे बंद करून त्यांना कायमचे दरिद्री करावयाचे व त्यांचे जीवन सर्वस्वी सवर्णांच्या मुठीत ठेवावयाचे; असे झाले म्हणजे अस्पृश्य लोक लाचारीने सवर्णांच्या सेवेत (गुलामगिरीत) जीवन कंठीत रहातील. अशा दुर्घट परिस्थतीला तोंड देऊन अस्पृश्य लोक, मुसलमानांच्या हिंदुस्तानवर स्वाऱ्या होऊ लागण्या अगोदर, हजारो वर्षे आपले लाचारीचे जीवन जगत होते. मुसलमानी सत्तेचा पाया हिंदुस्थानात रुजविण्यास ज्या हिंदूंच्या जाती कारणीभूत झाल्या त्यांत अस्पृश्यांतील जाती, विशेषतः महार, मांग व चांभार यांचा भरणा अधिक होता.

हिंदुधर्मातील चातुर्वर्ण्य सिद्धांताप्रमाणे फक्त क्षत्रियांनीं शस्त्रे हाती धरावीत, असा दंडक होता. ब्राह्मण, वैश्य व शूद्र यांना शस्त्रे वापरण्याची मनाई होती. शूद्रातील अतिशूद्र – अस्पृश्य यांनी शस्त्रे हाती घेणे, हे तर महा धर्मभ्रष्टाकार समजले जाई. या धर्मभ्रष्टाकारास शिक्षा देहांताची असे. हिंदुसमाजातील खालच्या थरातील जातींना जर शस्त्रे वापरू दिली तर त्यांची ते उन्नती करून घेतील व अशा तऱ्हेने त्यांचा सामाजिक दर्जाही वाढेल, ही भीती चातुर्वर्ण्याच्या रक्षकांना होती. शूद्र – अतिशूद्र यांच्या हाती शस्त्रे आली तर ते जातिभेदाविरुद्ध सशस्त्र बंड करतील आणि सर्व उच्चवर्णीय हिंदूंचा शिरच्छेद करतील ही या चातुर्वर्ण्य संरक्षकांना जबरदस्त भीती वाटत असल्यामुळे त्यांनी शूद्रातिशूद्रांना शस्त्रे वापरण्याची मनाई करणारे धार्मिक कायदे आपल्या 'स्मृती'मध्ये घातले. त्यांची अंमलबजावणी हिंदूराजे धार्मिक भावनेनें करीत होते. मुसलमानांनी हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या, तेव्हां त्यांना शूद्रातिशूद्रांची दैन्यावस्था दिसून आली. या लोकांना आपल्या छत्राखाली आणले तर ते आपल्या साम्राज्यासाठीं लढू शकतील, हे त्यांनी हेरले. मुसलमानांनी आपल्या सैन्यात शूद्रातिशूद्रांची भरती केली. या सैनिकांनी मुसलमानी साम्राज्याची पाळेमुळे हिंदुस्थानच्या भूमींत रुजविण्यास मोठ्याप्रमाणांत मदत केली शूद्रातिशूद्रांच्या हातांत शस्त्रे आली, ती वंशपरंपरेनें तशीच त्याच्या हातांत राहिली. हिंदूंच्या धार्मिक निर्बंधांना ती शस्त्रे शूद्रातिशूद्रांच्या हातातून काढून घेण्याचे सामर्थ्य राहिले नव्हते. कारण ब्राह्मणी धर्माचे पाठिराखे हिंदुराजे इतके समर्थ नव्हते. मराठे आणि पेशवे यांच्या कारकीर्दींत शूद्रातिशूद्रांना शस्त्रे वापरणे आणि समरात लढणे शक्य झाले. याचे कारण मराठे व पेशवे यांना मुसलमान आणि इंग्रज यांच्याविरूद्ध लढण्यासाठीं मोठे मनुष्यबळ हावे होते. मुसलमानांच्या सैन्यावर टेहळणी करणे, किल्ल्यातील माचीवर (पायथ्याशी) राहून किल्ल्यावर जाणाऱ्या येणाऱ्यावर नजर ठेवणे, किल्ल्यातील लोकांना जळण व गवत-वैरण पुरविणे आणि चोरदरवाजे व गुप्तभुयारे संरक्षण (कोणाला त्यांची माहिती न देता) करणे वगैरे कामासाठी शिवाजी महाराजांनी महारांचा उपयोग सैन्यांतील व गावपंढरीतील नोकर म्हणून केला. महारांचा मुसलमानी

सैन्यांत प्रवेश ज्या प्रमाणांत झाला होता तेवढ्या प्रमाणांत मराठ्यांच्या सैन्यांत झालेला नव्हता.

("CHHATRAPATI SHIVAJI employed the MAHARS to watch jungles at foot of the hill forts, act as scouts and kept the forts supplied with wood and foder. The Mahar recruits came from the provinces of BOMBAY Presidency and MADHYA PRADESH". The Regimental History of the MAHAR M.G. Regiment, by *Colonel* Major General S.P.P. Thorat, DSO (1954), page 3).

श्री. छत्रपति शिवाजी महाराज यांनी महारांना जंगलांतील मार्ग, डोंगरकिल्ल्यावर जाणारे गुप्त व उघड मार्ग यांच्यावर देखरेख करणे आणि डोंगरी गडांतील लोकांना जळण व वैरण पुरविणे, या कामावर नेमलेले होते. ही कामे म्हणजे लष्कराच्या संरक्षणाच्या नाड्या होत्या. त्या छत्रपति शिवाजी महाराजांनी महारांच्या हाती दिल्या होत्या, यावरून हे स्पष्ट होते की, महाराज महार जातीच्या इमानदारीची निःशंकपणे कदर करीत होते. याशिवाय गडमाचीवर महारांची वसती ठेवणे, हाही महाराजांनीच पायंडा पाडला. ही अवघड कामे करण्यासाठी महाराजांनी जसे महार कुटुंबांना वडिलो-पार्जीत नोकरीवर ठेवले तसेच त्यांनी हजारो महार तरुणांना सैनिक म्हणून रणांगणावर शत्रूविरुद्ध लढविले. परंतु, यासंबंधीचे स्पष्ट उल्लेख उच्च वर्णीय बखरकारांनी आपल्या बखरीत केलेले नाहीत. परंतु, महाराजांच्या नंतरच्या मराठेशाहीच्या काळांत हजारो महारांनी जे शौर्य गाजविले त्याबद्दल त्यांना ठिकठिकाणी इनामी जमिनी, सरदारकी व पाटिलकी दिल्याचे पुरावे अस्तित्वात असल्याचे दिसून आले. स्पृश्यवर्णीय बखरकारांनी हा, महारांच्या बाबतीत जो अन्याय केला, तितक्या तिव्रतेने इंग्रज ग्रंथकारांनी केलेला नाही. कारण, त्यांना ऐतिहासिक दृष्टी होती. आणि ते जरी राज्यकर्ते होते तरी सद्गु-णांचे चहाते होते, म्हणून त्यांनी स्वतःच्या इंग्रज लढवय्याबद्दल जसे साग्र वर्णन केलेले आहे तसे इंग्रजेत्तर लढवय्यांबद्दल जरी केले नाही, तरी त्यांना अनुल्लेखाने मारलेले नाही. बऱ्याच महार शूर लढवय्यांबद्दल त्यांनी गौरवपर लिहून ठेवलेले आहे.

लंडनमधील कांही व्यापाऱ्यांनी पूर्वेकडील हिंदुस्थान व इतर देश यांच्यात व्यापार करण्यासाठी "दी कंपनी ऑफ मर्चंटस ऑफ लंडन ट्रेडिंग अन्टू दी ईस्ट इंडिज" या नावाची संस्था स्थापन केली. त्या संस्थेला एलिझाबेथ राणीने ३१ डिसेंबर १६०० रोजी व्यापाराची सनद दिली. कंपनीने हिंदुस्थानांत व्यापाराची केंद्रे, सुरत, मुंबई, मद्रास वगैरे ठिकाणी वसविली.

सुरत येथे कारखाना सुरू करण्यासाठी कंपनीला दिल्लीच्या बादशहाने, ११ जानेवारी १६१३ ला कंपनीचा प्रतिनिधी कॅप्टन बेस्ट याच्या हाती, दिल्ली दरबारात सनद दिली. १६४० पर्यंतच्या काळात कंपनीने मुंबई व मद्रास प्रांतात व्यापाराची केंद्रे

उघडली, मद्रास येथे एक किल्ला बांधण्याची कंपनीने परवानगी मिळविली आणि तेथे 'फोर्ट सेंट जॉर्ज' किल्ला बांधला. कंपनीने बंगालमध्ये कारखाना सुरू करण्यासाठी शहाजहान बादशहाकडून १६३४ साली सनद मिळविली. याप्रमाणे मुंबई, मद्रास व बंगाल या प्रांतात कंपनीने पन्नास वर्षांच्या काळांत (१६०१-१६५०) व्यापाराचे जाळे पसरविले या व्यापाराच्या संरक्षणासाठी कंपनीने लंडनहून आणलेल्या नोकरांना लष्करी शिक्षण देऊन तयार केले (The Army in India and its Evolution, Government of India Publication, 1924, page 2).

पोर्तुगीज राजाची कन्या 'कॅथेराईन ऑफ ब्रॅगंझा' हिचा विवाह लंडनचा राजा चार्लस याच्याबरोबर १६६२ मध्ये झाला; तेव्हां तिला मुंबई बेट अंदन देण्यात आले. पोर्तुगीज गव्हर्नर आता दुसऱ्या चार्लसचा प्रतिनिधी म्हणून राहू लागला, व त्याच्या दिमतीला युरोपातील बहुवंशीय शिपायांचे सैन्य देण्यात आले. या सर्वांचा खर्च खूप होत असे. व त्यांतून फायदा कांहीच होत नसे. शिवाय मुंबई बेटाचा गव्हर्नर व सुरतेत राहणारा कंपनीचा अध्यक्ष यांचा आपापल्या हक्क व मानपानाबद्दल नेहमी खटके उडत. प्रत्येक जण म्हणे माझी योग्यता जास्त. या दोघांच्या तक्रारी लंडनला जात. या सर्व कटकटींना लंडनचे राज्यकर्ते व कपनीचे डायरेक्टर्स कंटाळून गेले. तेव्हां राजाने मुंबई बेट वर्षाला १० पौंड या दराने कंपनीकडे गहाण ठेवले, कंपनीने मुंबई बेटाचा ताबा २७ मार्च १६६८ ला घेतला, आणि त्याचा कारभार सुरतेच्या अध्यक्षाकडे सोपविला. मुंबईत डेप्युटी गव्हर्नर नेमण्यात आला. राजाचे बेटातील सैनिक कंपनीच्या अधिपत्याखाली आले. २ गनर्स, २१ तोफा, ५ अधिकारी, १३९ शिपाई व ५४ टोपसी असे हे सैन्य होते. शिपाई युरोपातले होते आणि टोपसी पोर्तुगीज वडील व हदी आई यांचे पुत्र होते. कंपनीच्या मालकीची लढाऊ सेना ही अशी अस्तित्वात आली. (किता पान ३)

मुंबईत दोन रजपूत कंपन्या १६८३ मध्ये उभारण्यात आल्या. प्रत्येक कंपनीत एक रजपूत अधिकारी आणि १०० रजपूत शिपाई असत. कंपनीच्या हिंदी सेनेचा पाया हा असा घातला गेला. कंपनीचा एजंट चार्लस आयर याने चिट्टनुट्टी येथील कंपनीच्या कारखान्याचे संरक्षण करण्यासाठी किल्ला बांधावयास १६९६ मध्ये नबाबाची संमती मिळविली. तो किल्ला 'फोर्ट विलियम' या नांवाने संबोधण्यात येऊ लागला. लंडनमधील कांही व्यापाऱ्यांनी हिंदुस्थानांत व्यापार करण्यासाठी दुसरी एक कंपनी काढली व तिला राजाकडून १६९८ ला सनद मिळविली. या कंपनीला पहिल्या कंपनीपेक्षा जास्त सवलती मिळालेल्या होत्या. या दोन कंपन्यांचा हिंदुस्थानात बराच संघर्ष झाला. नंतर त्यातील समजूतदार लोकांनी ह्या दोन कंपन्या एकत्र करण्याची योजना आखली व ती यशस्वी करून १७०८ मध्ये 'युनायटेड कंपनी ऑफ मर्चंटस ऑफ इंग्लंड ट्रेडिंग टू दी ईस्ट इंडिज' ही कंपनी अस्तित्वात आणिली. या कंपनीचे हे भले थोरले नाव मागे पडून प्रचारात 'ईस्ट इंडिया कंपनी' हेच नाव स्थीर झाले. ईस्ट इंडिया कंपनीने

मुंबई, मद्रास व बंगाल यांना इलाख्याचे रूप दिले व प्रत्येक इलाख्यातील व्यापारीक्षेत्राच्या संरक्षणासाठी सैन्य त्या इलाख्याच्या प्रेसिडेंटच्या अधिपत्याखाली ठेवले. याप्रमाणे कंपनीची इलाख्यातील सेना तयार झाली.

या सेनेत युरोपियन सैनिक व अधिकारी, गोवानीज टोपसी व हिंदी शिपाई यांचा भरणा होता. टोपसी व हिंदी शिपायांचे अधिकारी टोपशी व हिंदीच असत. हे शिपाई आपले कपडे व हत्यारे स्वतःचेच वापरीत असत. कंपनी त्यांना फक्त नक्त पगार देत असे. (कित्ता पान ४–५). १७४१ मध्ये मुंबईमध्ये एक रेजिमेंट होती. तीमध्ये ९३१ टोपसो (गोवानीज शिपाई) अकरमासे हिंदी होते. (कित्ता पा. ६).

कंपनीने प्रत्येक इलाख्यातील सेनेत, घोडदळ, पायदळ आणि तोफखाना वगैरे विभागात जास्त लोकांचा भरणा केला आणि १७४८ मध्येमेजर स्ट्रिंगर लॉरेन्स याला कंपनीच्या सेनेचा प्रमुख सेनापती (कमांडर-इन चीफ) म्हणून नेमला (कित्ता पा. ७–८).

युरोपमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापीत करावे म्हणून इंग्लंड व फ्रान्स हे देश परस्पराशी १७०० ते १७५० च्या काळांत एक सारखे लढत होते. या वेळेस त्यांचे वैमनस्य हिंदुस्थानांतही चालू होते. युरोपमधील लढायांसाठी प्रत्येकांना आपापल्या प्रदेशांतील लकांची सैन्यांत भरती करणे भाग पडले. तेथील सैनिक हिंदुस्थानांत मोठ्या संख्येने पाठविणे दोन्ही देशांना शक्य नव्हते. अशा परिस्थितीत फ्रेंचांच्या हिंदुस्थानातील प्रमुख 'डुप्ले' याने हिंदुस्थानांतील आपले वर्चस्व वाढविणे व टिकविणे या उद्देशाने हिंदी लोकांची सैन्यांत भरती करण्याची योजना हाती घेतली. त्याने मद्रास प्रांतात मुसलमानांची फलटण १७४८ मध्ये उभारली. (The Armies of India, p. 4 by Major G. F. McMunn 1911) ईस्ट इंडिया कंपनीचा बंगालमधील सेनापती रॉबर्ट क्लाइव्ह यानेही हिंदी सेना उभारण्याची योजना १७५७ साली हाता घेतली. ज्या पक्षाकडे ज्यास्त हिंदी सैनिक व हत्यारे, तो पक्ष हिंदुस्थानांत प्रबळ होणार हे इंग्रज व फ्रेंच या दोघानांही पटलेले होते. म्हणून प्रत्येक पक्षाने हिंदी सैनिकांची आपापल्या सैन्यांत भरती करण्याचा सपाटा चालविला. त्यांना नवे गणवेश व पाश्चात्य पद्धतीची हत्यारे देऊन त्यांचा वापर कसा करावयाचा याचे शिक्षणही दिले व त्याना त्यांत तरबेज केले. (The Army in India and its Evolution, p. 9). १७९६ मध्ये कंपनीच्या सैन्यांत १६००० युरोपियन सैनिक व ५७००० हजार हिंदी (बंगाल २४०००, मद्रास २४०००, मुंबई ९०००) सैनिक होते. (कित्ता पा. ११) कंपनीने हिंदुस्थानांत प्रदेश जिंकणे, आणि जिंकलेल्या प्रदेशावर सत्ता चालविणे, आणखी नवे प्रदेश जिंकणे, या प्रचंड कार्यासाठी कंपनीला, आपल्या सैन्यात वेळोवेळी वाढ करावी लागली. ही वाढ हिंदुस्थानांतील सर्व धर्माच्या व जातींच्या लोकांतून करण्यांत आलेली होती. शिवाजी महाराज आपल्या

स्वराज्याच्या स्थापनेसाठी सर्व जातींतील सैनिकांच्या सहाय्याने लष्करी जय मिळवीत होते, तेव्हां ईस्ट इंडिया कंपनीच्या वखारी व कारखाने यांच्या संरक्षणासाठी, लष्करी अधिकारी, हिंदू धर्मातील भरती होण्यास येतील त्या लोकांची आपल्या लष्करात भरती करीत. त्यांच्या बळावर वखारी व कारखान्यांना सुरक्षितता मिळे. त्यांच्या लष्करांत जातिभेद फार काटेकोरपणे पाळला जात नसे. मराठे व ब्राह्मण शिपाई, महार शिपायांच्या पंक्तीला बसून जेवत. अंथरुणाला अंथरुण लाऊन झोपत. कंपनीच्या लष्करांत मराठे व ब्राह्मण शिपायांपेक्षा महार शिपायांचा भरणा अधिक होता. महार शिपाई इतरांपेक्षा जास्त लढाऊवृत्तीचे होते, असे त्यावेळच्या लष्करी अधिकाऱ्यांनी लेखी मते प्रगट केली होती.

('5. The rise of MARATHA power under the leadership of Shivaji (1645) coincides with the rising of the first bodies of sepoy troops by the East India Company for the defence of their factories, whilst the MARATHA power embraced all castes and creeds in their army. Writing in the eighteenth century JOHN JACOB could say, "In the Bombay Army, the Brahmin stands shoulder to shoulder in the ranks, nay, sleeps in the same tent with his Purwariee fellow soldier and dreams not of any objection to this arrangement. If this subject be mentioned to a Brahmin sepoy, the ready answer is, "What do I care? Is he not the soldier of the State?" The early Bombay Army of the eighteenth and nineteenth centuries was not predominantly composed of MARATHAS but of MAHARS, RICHARD BURTON himself an officer in a Bombay Regiment at the turn of eighteenth century, took the Parwaree as the typical sepoy" (The Mahar Regiment, p. 3).

शिवाजी महाराजांच्या लष्करात महारांना अस्पृश्य मानले जात नसे. पण पुढे पेशवाईच्या काळांत लष्करांतील लोकांत उच्चनीच-जातिभेदाचे थैमान जास्त माजले. मराठ्यांच्या पयदळात अस्पृश्य वर्गातील सैनिक होते. या पायदळ सैनिकांना 'पाईक' म्हणून संबोधण्यात येत असे. या पाईकांपैकी जे महार असत त्यांना ('नाईक' किंवा 'नायक'चा अपभ्रंश) 'नाक' हे नावापुढे लावत असत, व जे मांग जातीचे होते त्यांना 'राऊत' हे उपपद लावत असत. मराठ्यांच्या लष्कराच्या तोफा बैलगाडीतून समरांगणावर नेत असत, या तोफा बैलगाडीवर चढविणे, बैलगाड्या समरांगणावर नेणे तेथे तोफांची व्यवस्था लावून त्या डागणे व उडविणे ही कामे महार व मांग पाईकांना नेमून दिलेली होती. पायदळातील स्पृश्य वर्गीय अधिकारी घोड्यावर बसून समरांगणावर जात असत. प्रत्येक अधिकाऱ्याच्या दिमतीला दोन अस्पृश्य पाईक असत. एक घोड्याचा मोतद्दार

व दुसरा घोड्याला दाणाचारा घालणारा. स्पृश्यवर्गीय अधिकारी व सैनिक हे जातिभेदाच्या व उच्चनीचतेच्या भावनेने पछाडलेले होते. ते अस्पृश्य–पाईकांना चांगल्या तऱ्हेने वागवीत नसत. तरीही अस्पृश्य–पाईक ही मानहानी सहन करून तेथेच रहात, नोकरी सोडून जात नसत कारण, हा एकच त्यांना पोटापाण्याचा व्यवसाय होता आणि ज्यांचे आपण मीठ खातो त्यांच्याकरता आत्मार्पण करण्याची नितिमत्ता अस्पृश्य समाजाच्या अंगी बाणलेली होती. शिवाय पायदळातील नोकरी ही महारांची जवळ जवळ वंशपरंपरागत हक्काची बाब झालेली होती. त्यामुळे लष्करी नोकरी म्हणजे अस्पृश्यांची मिरासदारी, असा एक सामाजिक द्वेषभाव दृढमूल झालेला होता. (An impression persists in the minds of many that only the dregs of Indian society would take service as soldiers in the Bombay regiments of the East India Company. And there may be a *prima facie* ground for such an opinion; for in the armies of the Maratha Chiefs all the infantry were men of lower castes and were treaded with disdain. The pure Maratha warrier rode on horse back; and for each horseman there were two foot soldiers, one who attended to the animal and another who cut grass or fodder for it. these foot soldiers or paiks must have been of the Mahar and Mang castes.

The Mahar footman was known as Nak, and the Mang footman as Raut. The Maratha artillery was dragged along by large teams of bullocks, and there many have been room for outcastes by the yokes of those teams. A field officer of the British Army describes the Maratha soldiers of the armies which joined the Bombay Army under Major General Abercomley in the compaign against Seringapatan in 1791. They were remarkably plain but neat in their appearance. Mild in their aspect, humane in their disposition, polite and unaffected in their address, they were distinguished by obedience to their chiefs and attachment to their country...... The Maratha infantry ...... is composed of black Christians and despicable poor wretches of the lowest caste, uniform in nothing but the bad taste of their musquets, none of which are either clean or complete; and few are provided wtth either ammunition or accountrements.

They are commanded by half-caste people of Portuguese and French extraction, who draw off the attention of spectators from the bad clothing of their men by the profusion of antiquated lace of their own....... The Marathas do not appear to treat their infantry with more respect than they deserve, as they ride through them without any ceremony on the march, and on all occasions evidently consider them as foreigners, and a very inferior class of people and troops." (The Mahar Flock, page 59-60).

फ्रेंच आणि इंग्रज यांच्या सैन्यात जी भरती होती ती इंग्लंड, फ्रान्स, वगैरे देशांतून हिंदुस्थानांत आलेल्या लोकांची ! यांत दरोडेखोर, खुनी, वगैरे लोक होते. शिक्षा चुकविण्यासाठी ते हिंदुस्थानांत पळून आलेले होते. युरोपियन सेनांच्या पलटणीतून कांही कारणामुळे परागंदा झालेले लष्करी व आरमरी शिपाई यांचाही भरणा हिंदुस्थानांतील फ्रेंच आणि इंग्रज यांच्या पलटणीत होता. ईस्ट इंडिया कंपनीने सर्व जातींच्या लोकांची भरती आपल्या पलटणींत करून घेतली. कंपनीचे अधिकृत लष्कर इ. स. १७५४ सालांत प्रचंड रूपाने उभे केले गेले. (The Armies of India, page 5). १७९६ च्या पूर्वी कंपनीच्या लष्करात हिन्दी लोक बऱ्याच मोठ्या प्रमाणांत मोठ्या जागेवर अधिकारी होते. त्यांच्या हाताखाली काम करणारे युरोपियन अधिकारी व सैनिक हिन्दी अधिकाऱ्यांच्या वर्चस्वाविरुद्ध तक्रारी करीत. १७९६ मध्ये कंपनीच्या लष्करी श्रेष्ठींनी लष्कराची पुनर्रचना करून हे शल्य कमी करण्याचे कार्य केले, ते हिंदी अधिकाऱ्यांना हळूहळू युरोपियन अधिकाऱ्यांच्या हाताखाली आणणे, व हिंदी अधिकाऱ्यांच्या हाताखाली आणणे, आणि युरोपियन अधिकारी युरोपियन अधिकाऱ्यांच्या हाताखाली आणणे हे होय. या धोरणाला हिंदी अधिकारी व सैनिकांनी खूप विरोध केला, पण कंपनीच्या लष्करी श्रेष्ठींनी त्यांचा विरोध धाब्यावर बसविला याचा परिणाम हिंदी सैनिकांनी वेलोर (मद्रास) येथील लष्करी छावणीत बंड करण्यात झाला. हे बंड कंपनीच्या लष्करी श्रेष्ठींनी मोडले व हिंदी सैनिक व अधिकारी यांच्यावर कडक नजर ठेवली इ. स. १८२४ मध्ये हे धोरण जाहीर केले व हिंदी सैनिकांना वरच्या ( अधिकारांच्या ) जागा देण्याचे धोरण रद्द केले. यामुळे हिंदी सैनिकांत असंतोषाचा अग्नि धुमसत राहिला; आणि १८५७ च्या बंडात असंतुष्ट सैनिकांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे भाग घेतला. बंडाचा मोड झाल्यानंतर पार्लमेंटने कंपनीच्या लष्करी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. हिंदी लष्कराची पुनर्रचना करण्यासाठी शिफारस करण्याचा विचारविनिमय करण्यासाठी पार्लमेंटने 'पील कमिशन' १८५८ मध्ये नेमले. हिंदी सैनिक आणि युरोपियन

सैनिक यांच्या परस्परामधील चालू असलेला द्वेष, संशय वगैरे गोष्टींची जाणीव कमिशनला झाली तेव्हां त्याने हिंदी सैनिकांना, बंदुका, तलवारी व इतर शस्त्रे वापरता येऊं नयेत म्हणून त्यांची भरती अर्टिलरीमध्ये करू नये, अशी एक शिफारस सदर कमिशनने केली. दुसरी शिफारस अशी होती की सैनिकांचे प्रमाण हिंदी २ व युरोपियन १ (२:१) या प्रमाणात असावे. निरनिराळ्या जातींच्या पलटणी हिंदी अधिकाऱ्यांच्या हाताखाली न ठेवता ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हाताखाली ठेवाव्या, म्हणजे निरनिराळ्या जातींच्या पलटणींना परस्पराविरुद्ध खेळविण्याचे सूत्र ब्रिटिशांच्या हातात राहील, अशी तिसरी शिफारस होती. ही परिस्थिती पाहून **राजा राम मोहन रॉय** यांनी लष्कराचे हिंदीकरण झाले पाहिजे अशी सरकारकडे मागणी केली. या मागणीला इंडियन नॅशनल काँग्रेसने पहिल्या तीन अधिवेशनांत पाठिंबा दिला. लो. टिळक व नामदार गोखले यांनीही या मागणीला पाठिंबा दिला होता. पण ब्रिटिश सरकारने या मागणीला संमती दिली नाही. १९१४ ला पहिले जागतिक युद्ध सुरू झाले तेव्हां सरकारला हिंदी लोकांच्या मदतीची गरज वाटू लागली, तेव्हां हिंदी लोकांना वरच्या अधिकाराच्या जागा देण्याचे धोरण त्याने जाहीर केले. (The Rise of The Indian Army — by Victor Longer, The Times of India, 26-1-1969, Page I).

१८५७ साली इंग्रजाचे लष्कर २, ११, ५३८ शिपायांचे होते. (किता, पा. ३५) त्यांत रजपूत जाट मराठे, ब्राह्मण, पठाण, मोगल, गुरखे, शीख, महार, चांभार वगैरे लोक होते. शिखांतील महजबी (झाडूवाले) या अस्पृश्य जमातीने आपल्या लढवय्या वृत्तीने इंग्रजांना फार खूष केले. या **महाजबींनी, गुरु तेगबहादूर** (गुरु गोविंदसिंग नंतरचा दुसरा गुरु) **याचे मुसलमानांनी छिन्न विछिन्न केलेले शरीर, मुसलमानी सैनिकांच्या ताब्यातून, लढून अमृतसरला आणले होते.** (The Armys of India, page 131).

मद्रास प्रांतात मिशनऱ्यांनी खिस्ती केलेले पारिया जातीचे लोक इंग्रजांच्या पलटणींत शिरले. रॉबर्ट क्लाईव्हने ३०० युरोपियन आणि ३०० पारिया सैन्यानिशी अर्काटच्या किल्ल्यावर हल्ला केला आणि प्राणपणाने तो जिंकला. पारिया सैनिक भाताची पेज पीत व युरोपियन सैनिकांना भात खावयास देत अशा रीतीने लढाई यशस्वी केली; अशी अख्यायिका आहे. (The Martial Races of India, pages 144 and 169). महारांच्या अनेक लढवय्यांनी लढायांत मर्दुमकी गाजवून कंपनीच्या लष्करांत अंमलदाराच्या जागा मिळविलेल्या होत्या. १७८७ साली मुंबईच्या पश्चिम समुद्र किनाऱ्यावर जी लढाई झाली तीत मरीन बटालियन मधील हविलदार **मदनाक येसनाक** याने मर्दुमकी गाजविली. म्हणून त्याला जमादार करण्यात आले. त्याच लढाईत **सुबनाक वाहनाक** याने शौर्याची शर्थ केली.

म्हणून त्याला चांदीचा बिल्ला आणि साखळी बक्षीस देण्यांत आली, आणि त्याला हविलदार करण्यात आले. १८१० मध्ये इंग्रज व फ्रेंच यांच्या आरमारांची जी लढाई हिंदी महासागरात झाली तीत मरिन बटालियन मधील **धोंडनाक पुलनाक** याने मोठे शौर्य दाखविले. म्हणून त्याला रुप्याचे पदक बक्षीस दिले आणि त्याला लेफ्टनंट हविलदार म्हणून बढती देण्यात आली. (किता पा. ४)

ज्यांच्या नोकरीत महार लोक रहात त्या धन्याशी ते अत्यंत इमानदारीने वागत असत. प्राण संकटात असले तरी ते धन्याशी बेईमान होत नसत. ते शत्रूंचे कैदी झाले, आणि त्यांना कितीही मोठी आमिषे दाखविली, किंवा त्यांचा खूप छळ केला तरी ते महार लढवय्ये, शत्रूना सामील होत नसत किंवा शरण जात नसत. याचे एक नमुनेदार उदाहरण, मराठयांच्या दुसऱ्या युद्धाच्या वेळी ब्रिटिशांना पहावयास मिळाले. फ्रेंच अधिकारी इंग्रजांच्या सैनिकांना कैदेत चांगले वागवीत. त्यांना चांगले अन्न, कपडे व पैसे देत आणि इंग्रजांची नोकरी सोडून फ्रेंचांची नोकरी पत्करा म्हणून मने वळविण्याचा प्रयत्न करीत. मराठयांच्या दुसऱ्या युद्धाचे वेळी फ्रेंचांच्या या आमिषाला पुष्कळ ब्रिटिश सैन्यातील कैदी बळी पडले. आरमारातील आयरीश, मद्रासी व बंगाली लोकही त्याला बळी पडले पण मुंबईचे महार शिपाई पाघळले नाहीत, उलट जे फ्रेंचांचे हस्तक होऊन चांगले कपडे घालून फ्रेंचांचे सैनिक म्हणून मिरवीत होते त्यांना हे मुंबईचे महार कैदी सैनिक उघडपणे शिव्या देत असत. हे स्वाभिमानाचे, महार कैद्यांचे वर्तन पाहून फ्रेंचांनी त्यांचा खूप छळ केला. तेव्हां त्यातील बरेचसे महार सैनिक फ्रेंचाच्या तुरुंगातच मेले. फक्त १२ कैदी जिवंत राहिले. ब्रिटिशानी जेव्हा फ्रेंचाचा पाडाव केला तेव्हा हे १२ महार सैनिक त्याना परत मिळाले. ब्रिटिशांनी त्यांचा जाहीरपणे गौरव केला, आणि त्यांना १९१० मध्ये खास पदके बहाल केली (किता पां. ४५)

दुसरे बाजीराव पेशवे आणि इंग्रज यांचे मैत्रीचे संबंध फार दिवस टिकले नाहीत. त्यांच्यातील वैमनस्य कांही काळ धुमसत राहिले, आणि शेवटी १८१७ च्या नोव्हेंबरमध्ये त्याचा स्फोट झाला पेशव्यांच्या सैन्याने इंग्रजांच्या पुण्यातील वकिलातीवर जेव्हां हल्ला केला तेव्हां वकिलातीचे संरक्षण करण्यात कर्नल बर यांनी खूप प्रयत्न केले पण पेशव्यांच्या प्रचंड सेनेपुढे प्रथम त्यांचे प्रयत्न निष्फळ झाले. नंतर इंग्रजांच्या माऱ्यापुढे पेशव्याचे सैन्य पुण्याच्या उत्तर दिशेकडे पळून गेले. बाजीरावाने सैन्याची नीट जमवाजमव करून पुनः एकदा कर्नल बर याच्या सैन्यावर (पुण्यातील इंग्रज वकिलातीवर) हल्ला केला. यावेळी सेकंड बटालियन फर्स्ट रेजिमेंट बॉम्बे नेटिव्ह इन्फंट्री, हिचा मुक्काम पुण्याच्या वायव्येस ३८ मैलावर असलेल्या शिरुर गांवात होता. तिचा प्रमुख कॅप्टन फ्रान्सिस स्टॉटन हा होता. कर्नल बरला, पेशव्यांच्या प्रचंड सैन्याला दुसऱ्यांदा तोंड देणे अशक्य वाटल्यामुळे त्याने कॅप्टन स्टॉटनला पुण्याच्या वकिलातीच्या संरक्षणाकरतां मदतीस येण्याबद्दल तातडीने संदेश पाठविला. कॅप्टन स्टॉटन शिरुरहून

पुण्याकडे जाण्यास सेकंड बटालियनला घेऊन ३१ डिसेंबर १८१७ ला रात्री ८ वाजता निघाला हिच्यात बहुसंख्य सैनिक महार होते. कॅप्टन स्टाँटनबरोबर ५०० पायदळ, ३०० घोडदळ, ५ बटालियन ऑफिसर्स, २०६ पौंऊडर तोफा आणि त्या चालविणारे २४ ब्रिटिश सैनिक, एवढा लवाजमा होता. सुमारे २५ मैलाचा रात्री प्रवास केला. त्यानंतर ही बटालियन पहाटेस भीमा नदीच्या तीरावर आली. तेव्हां पेशव्यांचे प्रचंड सैन्य नदीच्या दुसऱ्या तीरावर लढाईस सज्ज असलेले दिसले. त्यांच्या सैन्यांत ५ हजार पायदळ व २५ हजार घोडदळ होते. पेशव्यांच्या सैन्याने आपणाला खत्म केले तर कर्नल बरला ते खत्म करतील आणि हे पाहून मध्य हिंदुस्थानांतील शिंदे, होळकर व भोसले हे जनरल स्मिथला मोडून टाकतील, आणि यामुळे ब्रिटिश राज्याचा हिंदुस्थानातील पायाच उखडला जाईल, हे भविष्य इंग्रज लष्करी अधिकाऱ्यांना दिसत होते. म्हणून कॅप्टन स्टाँटन पेशव्यांच्या सैन्याचा कसा पाडाव करता येईल याचा व्यूह रचीत होता. त्याने पेशव्यांच्या सैन्याला हुलकावण्या देऊन कोरेगांव खेड्यांत प्रवेश केला. या गावाला मातीचे कुसू होते. हे कुसू आणि गावातील घरे यामुळे पेशव्यांच्या घोडदळाला गावात शिरून लढाई करणे कठीण होते, हे स्टाँटने हेरून, गाव आपल्या ताब्यात घेतला, आणि भीमा नदीच्या किनाऱ्यावर आणि शिरूरला जाणाऱ्या रस्त्यावर, जेथून पेशव्यांच्या सैन्यावर अचूक मारा करता येईल अशा ठिकाणावर त्याने दोन तोफा डागल्या. गावाच्या मध्यभागी जी गढी होती तिच्यावर त्याने तोफ डागली नाही. त्यामुळे पेशव्यांचे सैन्य गावात शिरतांना त्यावर तोफेचे गोळे झाडून तो सैन्याचा ग्रामप्रवेश थांबवू शकला नाही. त्यामुळे गावातील चकमकीत त्याला आपले बरेचसे सैनिक गमवावे लागले. (किता ५–६)

पेशव्यांच्या सैन्यांत अरब, गोसावी आणि मराठे यांचा भरणा होता. तेही चांगले लढवय्ये होते. त्यांच्या माऱ्यापुढे इंग्रज सैनिकांनी अनेक वेळा कच खाल्ली. त्यांची झोप उडाली, तहानभूक हरपली आणि ते शत्रूला शरण जाऊ या म्हणून ओरडू लागले. लेफ्टनंट चिशोल्म आणि इतर अधिकारी स्टाँटनला पुनः पुनः तेच सुचवू लागले. घनघोर युद्धांत तरुण अधिकारी लेफ्टनंट पॅटिन्सन आणि लेफ्टनंट चिशोल्म हे या लढाईत कामी आले. चिशोल्मच्या देहाचे शत्रूनी तुकडे तुकडे केले होते. त्याकडे लक्ष वेधवून, स्टाँटन आपल्या सैनिकांना सांगत होता की तुम्ही जर शत्रूला शरण गेलात तर तुमचा किती छळ करतील हे तुम्ही या तुकडे करण्यावरून लक्षांत घ्या व प्राणपणाने लढा; मरण पत्करा पण शरण जाऊ नका. मग इंग्रज सैनिकांनी निकराचे हल्ले चढविले. आणि १ जानेवारी १८१८ ला रात्री ९ वाजता पेशव्यांच्या सैन्याने पळ काढला इंग्रज सैनिकांनी त्यांचा पाठलाग केला तो भीमा नदीपर्यंत. नदीतील पाणी पिऊन त्यांनी आपली २५ तासांची तहान भागविली. पेशव्यांच्या सैन्याला पळ काढावयास लावणारी जी प्रमुख तुकडी होती ती सर्व महार सैनिकांची होती. त्यांनी आपल्या ४० पट संख्येने असलेल्या पेशव्यांच्या सैन्याला पळवून लावले. हे महारांचे शौर्य पाहून

बाकीच्या, पेशव्यांच्या सैन्याचा धीर खचला व सर्वच सैन्य पळू लागले. इंग्रजांच्या एकंदर ८३४ (सैनिक व अधिकारी) लढवय्यापैकी २७५ लढवय्ये मेले अगर जखमी झाले. आणि पेशव्याचे सुमारे ६०० लोक कामास आले. (किता ६–७)

कोरेगावच्या विजयाबद्दल भीमा नदीच्या तीरावर इंग्रजांनी विजयस्तंभ उभारला. त्यांच्या एका बाजूला जखमी व कामास आलेल्यांची नावे इंग्रजी व मराठी भाषेत कोरलेली आहेत आणि त्याच्या पश्चिमेच्या बाजूवर इंग्रजीत विजय लेख कोरलेला आहे तो असा :–

THIS COLUMN

Is erected to commemorate the defence of Koregam by a Detachment Commanded by Captain Staunton of the Bombay Establishment which was surrounded on the 1st of January 1818 by the Peshwas' whole army under his personal command, and withstood throughout the day a series of the most obstinate and sanguinary assault of his best troops. Captain Staunton, under the most appalling circumstances preserved in his desperate resistance, and seconded by the unconquerable spirit of his detachment, at length achieved the signal discomfiture of the enemy and accomplished one of the proudest triumphs of the British Army in the East.

TO PERPETUATE

The memory of the brave troops to whose heroic firmness and devotion it owes the glory of that day, the British Government has directed the names of their Corps and of the killed and wounded to be inscribed on this monument.

MD CCCXII

(The Mahar M.G. Regiment, Pages 7-8).

इ. स. १८२६ मध्ये काठियावाड, १८४६ मध्ये मुलतान आणि इ. स. १८८० मध्ये कंदाहार येथे ज्या लढाया इंग्रजानी केल्या त्यांत महार लढवय्यांनी आपल्या शौर्याचा झेंडा उभारला. इ. स. १८८० मध्ये दुसरे अफगाण युद्ध झाले; त्यांत अफगाणिस्थानांत असलेला इंग्रजांच्या 'डुब्रो' येथील तळावर शत्रूंनी हल्ला केला, तेव्हां त्या तळाचे संरक्षण करतांना १९ वी बाँबे इन्फट्री (पायदळ) ने शौर्याची कमाल केली. १९ व्या मुंबई पायदळांत बहुसंख्य लढवय्ये महार होते. या लढाईला १६ एप्रिल १८८० रोजी विशेष रंग आला. तो असा की एका माऱ्याच्या ठिकाणावर शत्रूंनी हल्ला केला, तेव्हां तेथील

इंग्रज सैनिकांनी माघार घेतली. पण त्यातील तिघांनी मात्र पाय रोवून, त्या ठिकाणी शत्रूला तोंड दिले. शत्रूंची संख्या ३०० होती. त्या संख्येपुढे या तिघांचा निभाव लागणार नाही म्हणून सहकाऱ्यांनी त्यांना माघार घेण्यास सांगितले. पण ते तिघे शूर वीर जागेवरून हाल्ले नाहीत. त्या तिघांनी तीन तास लढत दिली व तीनशे शत्रूपैकी बऱ्याच जणांना यमसदनास पाठविले. जेव्हां त्यांच्या जवळची काडतुसे संपली तेव्हां ते शत्रूंच्या घोळक्यात शिरून बंदुकीचा उपयोग लाठी सारखा करून शत्रूला झोडपू लागले. लढता लढता ते धारातीर्थी पडले. ते तीन महावीर म्हणजे मेजर सिडने जेम्स वॉडबी, प्रायव्हेट इलाही बक्ष आणि प्रायव्हेट सोननाक ताननाक! (महार, शिवाजी महाराजांच्या सैन्यात होते तेव्हांपासून त्यांच्या नावापुढे नाक हे उपपद लावण्यात येत असे. तीच प्रथा पुढील काळांत इंग्रजी अमदानीतही चालू राहिली.) या शूर वीरांचे स्मृतिचिन्ह म्हणून मुंबईतिल युरोपियन जिमखान्या जवळच्या रस्त्याला 'वॉडबी रोड' हे नाव देण्यांत आले, आणि आलेक्झान्ड्रा गर्ल्स हायस्कूलच्या भिंतीत एक शिलालेख ठेवण्यांत आला. तो शिलालेख असा :-

"This Road is named after Major Sidney James Waudby, who with Elahi Bux and Private Sonnak Tannak (nak was a characteristic suffix to Mahar names that dates from their service in Shivaji's armies) all of the 19th Bombay Infantry, fell on the 16th April 1880, in fence of Dubro, post in Afganistan which, when warned that an attack in force was imminent, they refused to abandon and most gallantly held for three hours against three hundred of the enemy, many of whom were slain. Eventually when all their ammunition was expended they dashed into the amidst of their foes and died fighting. The odds are even greater than at Koregaon and the heroes were of the same castes, a Europen, a Muslim and the Mahar, who had made up the Bombay Regiments from the start".

(The Mahar MG Regiment, pp. 8-9)

मुंबई इलाख्यांत ईस्ट इंडिया कंपनीने इ. स. १८५७ पर्यंत आणि त्यानंतर ब्रिटिश सरकारने ज्या लष्करी पलटणी उभारल्या त्यात बहुसंख्य सैनिक महार होते. रत्नागिरी जिल्ह्यातून २१८० महार सैनिक या पलटणींत १८८० च्या आगोदर होते. (किता : ४) इतर जिल्ह्यातूनही महार सैनिकांची संख्या बरीच मोठी होती. या पलटणींची संख्या २९ होती. त्यांच्यांत जी स्थित्यंतरे वेळोवेळी झाली ती अशी :—

| Previous Name of Unit | Present Name of Unit | Remarks |
|---|---|---|
| 1) 1st Bombay Native Infantry | 1) 1st BN The Grenadiers | — |
| 2) 2nd -do- | 2) 2nd -do- | — |
| 3) 3rd -do- | 3) 1st BN The Maratha Light Infantry | |
| 4) 4th -do- | 4) 1st BN The Rajputana Rifles | — |
| 5) 5th -do- | 5) 2nd BN The Maratha Light Infantry | — |
| 6) 6th -do- | 6) ........................ | 6) Disbanded |
| 7) 7th -do- | 7) ........................ | 7) Disbanded |
| 8) 8th -do- | 8) 3rd BN the Grenadiers | 8) — |
| 9) 9th -do- | 9) 4th -do- | 9) — |
| 10) 10th -do- | 10) 3rd BN The Maratha Light Infantry | 10) — |
| 11) 11th -do- | 11) 111 Mahars in World War 1914-'18 | 11) Disbanded |
| 12) 12th -do- | 12) ........................ | 12) Disbanded |
| 13) 13th -do- | 13) ........................ | 13) Disbanded |
| 14) 14th -do- | 14) The Maratha Light Inf.-Centre | 14) — |
| 15) 15th -do- | 15) ........................ | 15) Disbanded |
| 16) 16th -do- | 16) 4th BN the Maratha Light Infantry | 16) — |
| 17) 17th -do- | 17) 5th -do- | 17) Disbanded |
| 18) 18th -do- | 18) ........................ | 18) Disbanded |
| 19) 19th -do- | 19) 2nd BN the Jat Regiment | 19) — |
| 20) 20th -do- | 20) 2nd BN Rajputana Rifles | 20) — |
| 21) 21st -do- | 21) (THFN 121st Pioneers) | 21) Disbanded |
| 22) 22nd -do- | 22) 3rd BN The Rajputana Rifles | 22) — |
| 23) 23rd -do- | 23) 4th BN The Rajputana Rifles | 23) — |
| 24) 24th -do- | 24) ........................ | 24) Disbanded |
| 25) 25th -do- | 25) 5th BN The Rajputana Rifles | 25) — |
| 28) 26th -do- | 28) (THEN 128th Pioneers) | 28) — |
| 29) 29th The Bombay Marine BN | 29) . ...................... | 29) Disbanded |

(The Mahar MG Regiment Appendix C, page 95)

या सर्व बटालियन्समधून अनेक महार सैनिकांनी निरनिराळ्या रणक्षेत्रात शौर्य गाजविले आणि कांही जण उच्च दर्जाचे लष्करी पदावर विराजमान झाले. त्यापैकी कांही अधिकाऱ्यांची नांवे मी खाली देत आहे.

१) **फर्स्ट ग्रेनेडियर बॉंबे ईन्फंट्री** : सुभेदार रंगनाक महादनाक, सुभेदार परसनाक, सुभेदार धोंडनाक आणि जमेदार गणनाक परसनाक.

२) **सेकंड " " "** सुभेदार मेजर धर्मनाक सबनाक, सुभेदार इट्टनाक, सुभेदार हरनाक भागनाक, सुभेदार रंगनाक देवनाक, जमेदार, भागनाक गंगनाक, जमेदार शिवनाक गौनाक, जमेदार भागनाक व जमेदार इट्टनाक.

३) **फोर्थ बॉंबे रायफल्स** : सुभेदार शिवनाक चांगनाक, सुभेदार शिवनाक पांडनाक, सुभेदार रंगनाक आणि बापनाक रंगनाक, जमेदार गंगनाक रूपनाक, जमेदार सुदनाक रामनाक, जमेदार कूटनाक दुलनाक. जमेदार कृष्णनाक, जमेदार शिवनाक.

४) **फिफ्थ बॉंबे लाईट इन्फंट्री** : सुभेदार चांगनाक रामनाक.

५) **सिक्सथ बॉंबे इन्फंट्री** : सुभेदार मेजर रामनाक नामनाक, सुभेदार मेजर सखनाक, सुभेदार जननाक रामनाक, सुभेदार रंगनाक नामनाक, सुभेदार धर्मनाक रामनाक, सुभेदार रामनाक महादनाक, जमेदार सखनाक रामनाक, जमेदार अर्जुननाक लकनाक, जमेदार लकनाक रामनाक.

६) **सेव्हनथ बॉंबे इन्फंट्री** : **सुभेदार रामनाक मालनाक** (डॉ. आंबेडकरांचे पिताजी), सुभेदार देवनाक चांगनाक, सुभेदार गवोरनाक दादनाक, सुभेदार महादनाक मालनाक.

७) **एट्‌थ बॉंबे इफन्ट्री** : सुभेदार मेजर चांगनाक, सुभेदार गोंडनाक इट्टनाक, सुभेदार, सुदनाक, सुभेदार इट्टनाक.

| | |
|---|---|
| ८) नाइन्थ बॉंबे इन्फन्ट्री | : सुभेदार मेजर आणि सरदार बहादूर इट्टनाक भिकनाक, सुभेदार चांगनाक गोंदनाक, जमेदार लकनाक भिकनाक, जमेदार सकनाक भिकनाक, जमेदार इटनाक. |
| ९) टेन्थ बॉंबे इन्फट्री | : सुभेदार लकनाक |
| १०) ट्वेल्थ बॉंबे इन्फन्ट्री | : सुभेदार मेजर आणि बहादूर गंगानाक सजनाक, सुभेदार केसनाक गोंदनाक. |
| ११) थर्टीन्थ बॉंबे इन्फन्ट्री | : सुभेदार धर्मनाक देवनाक, जमादार, ताननाक. |
| १२) फोर्टीन्थ बॉंबे इन्फट्री | : सुभेदार हिरनाक, जमेदार लकनाक सोननाक. |
| १३) फिफ्टीन्थ बॉम्बे ईन्फन्ट्री | : सुभेदार इट्टनाक लकनाथ, जमेदार अर्जुननाक देवनाक, जमेदार धर्मनाक. |
| १४) सेव्हन्टीन्थ बॉंबे इन्फन्ट्री | : सुभेदार भिकनाक जननाक, सुभेदार रुपनाक, सुभेदार बाबनाक चांगनाक, सुभेदार गणनाक माननाक, सुभेदार गोणनाक गणनाक, सुभेदार गणनाक बाळनाक, सुभेदार काननाक, सुभेदार माननाक, जमेदार गंगानाक गणनाक. |
| १५) एटीन्थ बॉंबे इन्बन्ट्री | : सुभेदार भिवनाक गोणनाक. |
| १६) नाइन्टीन्थ बॉंबे इन्फन्ट्री | : सुभेदार बहादूर, गंगाराम कृष्णाजी (यांचे आडनाव भातनकर), सुभेदार रामनाक लकनाक, सुभेदार कृष्णनाक बापनाक, सुभेदार सोमनाक जावनाक, सुभेदार रामनाक गंगानाक (मुलतानच्या लढाईत शौर्य गाजविले.) सुभेदार इट्टनाक मल्हारनाक, सुभेदार सोमनाक शंकरनाक, सुभेदार भागनाक रामनाक, सुभेदार गोवारनाक काळनाक, जमेदार सोननाक तुल्नाक, जमेदार काळनाक, जमेदार इट्टनाक, जमेदार लकनाक जमेदार बाननाक, जमेदार पांडनाक. |

१७) ट्वेंटिएथ बॉंबे इंन्फट्री : सुभेदार मेजर रामनाक चांगनाक, सुभेदार लकनाक हरनाक (तलवार बहादूर), सुभेदार सोननाक हिरनाक (तलवार बहादूर) सुभेदार सकनाक.

१८) ट्वेंटिफर्स्ट् मरीन : सुभेदार मेजर दडिवडकर, सुभेदार सुदनाक कमळनाक, सुभेदार देवनाक गुंडनाक, सुभेदार जयनाक हरनाक, सुभेदार रामनाक बबनाक, सुभेदार दुलाबनाक, सुभेदार कमळनाक, सुभेदार शिवनाक हिरनाक, सुभेदार जननाक बाळनाक, जमेदार बाळनाक काळनाक, जमेदार जननाक गणनाक जमेदार गोंडनाक रामनाक, जमेदार बाळनाक रामनाक, जमेदार नारायण, जमेदार सायगांवकर (सॅपर्स अँड मायनर्स ऑर्डर ऑफ मेरिट.)

१९) ट्वेंटी फोर्थ बॉंबे इन्फन्ट्री : सुभेदार येसनाक दादनाक.

२०) ट्वेंटी सिक्सथ बॉंबे इन्फन्ट्री : सुभेदार देवनाक माल्नाख.

२१) ट्वेंटी एट्थ बॉंबे इन्फन्ट्री : सुभेदार माननाक येसनाक, जमेदार अमृतनाक.

(शिवराम जानबा कांबळे–चरित्र, पा. १४७–१४९). ईस्ट इंडिया कंपनीच्या बीस इंन्फट्री रेजिमेंटस आणि एक मरीन कोर यामध्ये आठ सुभेदार मेजर, बत्तीस सुभेदार आणि चौतीस जमादार महार जातीतील होते, अशी माहिती अलेक्झांडर रॉबर्टसन यांनी THE MAHAR FOLK या ग्रंथात (पा. ५९) दिलेली आहे.

ईस्ट इंडिया कंपनीतील शिपाई कमलनाक विटनाक याला १ जानेवारी १९४७ ला जमेदार म्हणून आणि ५ एप्रिल १८५० ला सुभेदार म्हणून बढती मिळाली, तेव्हा मुंबईच्या गव्हर्नरकडून त्याला जी प्रशंसापत्रे मिळाली ती अशी होती :–

The photostate certificate of the grant of the rank of Jamadar and Subedar to KAMALNAC VITNAC (CUMBLENAK WITNAC) are reproduced as under :—

THE GOVERNOR IN COUNCIL OF BOMBAY

To Cumblenac Witnac Greating by Virtue of the power and Authority to us given, We do hereby constitute and

appoint you Cumblenac Witnac to be a Jemadar in the Service of the East India Company, on the Bombay Establishment. You are therefore carefully and diligently to discharge the Duty of Jemadar by doing and performing all and all manner of things there unto belonging; and you are to observe and follow such orders and Directions, from time to time, as you shall receive from us the Governor in Council for the time being or any other your superior officer, according to the Rules and Discipline of War; and you are to rank as Jemadar on the list of Jemadar on the Bombay Establishment, from the First day of January One thousand Eight Hundred and Forty Seven Dated in BOMBAY CASTLE, this first day of June One Thousand Eight hundred and forty seven.

Registered, by Order, in the Secretary's
Office, Military Department — Sd|-
Lieut Col. — Sd|-
Secretary to the Government — Sd|-
Military Department — Sd|-

(The MAHAR MG Regiment, page 91)

THE GOVERNOR IN COUNCIL OF BOMBAY

To Kamalnac Vitnac Greeting by Virtue of the Power and Authority to us given we do hereby constitute and appoint you Kamalnac Vitnac to be Subedar in the Service of the East India Company, on the Bombay Establishment. You are therefore carefully and diligently to discharge the Duty of Subedar by doing and performing all and all manner of things thereunto belonging, and you are to observe and follow such Orders and Directions, from time to time as you shall receive from Us the Governor in Council for the time being, or any other your Superior officer, according to the Rules and Discipline of War : and you are to rank as Subedar on the List of Subedar on the Bombay Establishment, from the Fifth day of April One thousand Eight Hundred and Fifty dated in Bombay Castle, This thirtieth Day of December One thousand Eight hundred and Fifty.

Registered by order in the Secretary's office
Military Department Sd|-
(The MAHAR MG Regiment, page 93).

इ. स. १८५७ च्या बंडात ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यात जे लोक शिरले त्यांत पैशासाठी लढणाऱ्या स्पृश्य आणि अस्पृश्य वर्गीय सैनिकांचा जास्त भरणा होता.

('How eagerly the sepoy flocked to the Company's service, both merceneries, descendents the low caste men, and now the high caste yeomen, is one of the glories of the British memories' — The Armies of India, pp. 173). इ. स. १८५७ च्या धामधुमीत इंग्रजांशी इमान ठेवून जे सैनिक लढले, त्यात रजपूत मराठे, शीख, गुरखे, अस्पृश्य खिस्ती, महार आणि चांभार हे प्रमुख होते. केवळ याच सैनिकांच्या शौर्यामुळे इंग्रजाचे साम्राज्य बंडखोर शिपायांच्या तावडीतून सहीसलामत टिकू शकले.

इ. स. १८५७ च्या नंतर हिंदी लष्कराची पुनर्रचना करण्यात आली. पूर्वी बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश आणि पंजाब या प्रांतातील ब्राह्मणादि जातीतील शिपायांची लष्करांत वंशपरंपरेने जादा भरती होत असे. ती पुनर्रचनेत कमी करण्यांत आली. पठाण शीख, मुसलमान, डोग्रा गुरखा, मराठे, दक्षिणी मुसलमान, महार, मद्रासी खिश्चन (अस्पृश्य), इत्यादि जातींतील तरुणांचा भरणा करण्यांत आला. १८५८ पासून कंपनीचा कारभार इंग्लंडच्या राणीकडे आला. त्यामुळे कंपनीचे लष्कर राणीचे झाले. १८७९ मध्ये हिंद लष्कराची संख्या २ लाख (६५ हजार ब्रिटिश आणि १ लक्ष ३५ हजार हिंदी) झाली. (The Army in India and its Evolution, page 21). १८८७ मध्ये हे सैन्यबळ २,२५,६९४ (७२,६०२ ब्रिटिश आणि १,५३,०९२ हिंदी) एवढे झाले. (कित्ता पान १९८) हिंदी सैन्यात उत्तर व दक्षिण भारतातील स्पृश्य सैनिकांचा भरणा बराच होता आणि अस्पृश्य सैनिकांची संख्या कमी होती. स्पृश्य सैनिकांच्या मनांत १८५८ ते १८९० च्या काळांत जातिश्रेष्ठत्वाची आग उफाळली. अस्पृश्य सैनिक अधिकाऱ्यांच्या हाताखाली काम करणे ते कमीपणाचे मानू लागले. बँडच्या पथकांत बहुसंख्य सैनिक व अधिकारी महार होते. त्यांनी वाजविलेली वाद्य तोंडात धरून वाजविणे, हे धर्मभ्रष्टपणाचे होय ही जाणीव स्पृश्य सैनिकांना झाली. त्यामुळे ते ब्रिटिश अधिकाऱ्याकडे तक्रारी करू लागले. इतर लढाऊ पथकातील स्पृश्य सैनिकही अशाच प्रकारे अस्पृश्य अधिकाऱ्यांच्या हाताखाली काम करणे कमीपणाचे मानू लागले. धर्मांधतेने व्यग्र झालेले हे स्पृश्य वर्गीय सैनिक आपापल्या अस्पृश्य वर्गीय सहकाऱ्याबरोबर आणि अस्पृश्य वर्गीय अधिकाऱ्याबरोबर कांही ना कांही कारणांमुळे तंडे-बखेडे माजवू लागले. ही परिस्थिती अशीच चालू ठेवली तर हिंदी सैनिकांना इ. स. १८५७ च्या बंडाची नवी पुनरावृत्ती काढण्याची बुद्धी होईल, आणि तसे झाले तर आपले भारतातील

साम्राज्य धोक्यांत येईल, अशी भीति ब्रिटिश मिलिटरी अधिकाऱ्यांना वाटू लागली म्हणून त्यांनी हिंदी लष्कराची पुनर्रचना करण्याचे ठरविले. प्रत्येक जातीची स्वतंत्र पलटण निर्माण केली तर हिंदी सैनिकांतील जातिवैमनस्याचा काटा उपटून टाकला जाईल. असे अधिकाऱ्यांना मनोमन पटले. म्हणून भारतीय लष्कराची पुनर्रचना जातीय पायावर १८८५ मध्ये करण्यांत आली. पण ही योजना निर्वीघ्नपणे पार पडण्याचे लक्षण दिसेना. स्पृश्य वर्गीय सैनिक हे अस्पृश्य वर्गीय सैनिक व अधिकारी यांच्या विरुद्ध उघडपणे ताठ्याने वागू लागले. लष्करी शिस्तीप्रमाणे या स्पृश्य सैनिकांना शिक्षा करून वठणीवर आणणे, हा एक उपाय ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हाती होता. पण सर्वच स्पृश्य सैनिक अस्पृश्य सैनिकांशी व अधिकाऱ्यांशी बेजबाबदारपणे वागू लागलेले पाहून सर्व आपराध्यांना शिक्षा करणे म्हणजे १८५७ च्या बंडाच्या पुनरावृत्ती-लाच आमंत्रण देण्यासारखे होते. तेव्हां हिंदी सैन्याची पुनः पुनरर्चना करणे, ब्रिटिश अधिकाऱ्यांना जरूर वाटू लागले. प्रथम त्यांनी असे पाऊल उचलले की, सैन्यांत नवीन अस्पृश्यांची भरती करणे बंद केले दुसरे पाऊल त्यांनी असे टाकले की, सैन्यात ज्या अस्पृश्यांच्या पलटणीत व जे अस्पृश्य अधिकारी इतर स्पृश्य पलटणीत होते, त्यांना नोकरीतून काढून टाकणे. १८९३ मध्ये ज्या इलाखा पलटणी होत्या त्या बंद केल्या, व त्यांची पुनर्रचना, रजपूत, शीख मराठा वगैरे उच्च वर्णीय जातीच्या पायावरन केली.

ई. एच् एच्. कोलिन, सेक्रेटरी टू दी गव्हर्नमेंट, मिलिटरी डिपार्टमेंट, यांनी पत्र क्रमांक २८३२-बी, दिनांक १५ ऑक्टोबर १८९०, सिमला, दी सेक्रेटरी टू दी गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, लिमिटरी डिपार्टमेंट, ला पत्र पाठवून सांगितले की, मध्यवर्ती सरकार १८८७-८८ पासून नेटिव आर्मीची लढावू प्रवृत्ती कोणत्या उपायांनी सुधारावी (efficiency of the Native Army by improving the material of which it is Composed), याबद्दल मुंबई सरकारने आपले विचार प्रदर्शित करावेत, (Vol. 13|1891, Military Deptt., pages 1-2). मुंबई सरकारने ठराव नं. २०२२, मिलिटरी डिपार्टमेंट, २० ऑक्टोबर १८९१ यांत आपले विचार प्रदर्शीत केले. त्याबरोबर मुंबई सरकारने १४ पानांचा छापील मेमोरँडम जोडला होता (Memorandum — Improvement of the fighting efficiency of the Native Army. Recruiting and reorganization of the Bombay Army). दि. १ जानेवारी १८९० ला मुंबई इलाख्यातून मराठे ६,७३७, परवरी (मांग व रोमाशी धरून) १८७३, आणि इतर हिंदू (बहुसंख्य कनिष्ट जातीतील) १०७५ एकूण ९,७०० शिपाई होते, अशी माहिती सदर मेमोरँडममध्ये दिलेली होती. (Analysis of caste return of the Bombay Army, dated 1st January 1890).

(Vol. 13|1891, Military Deptt., pages 9-22). या मेमोरॅन्डमच्या २९ व्या परिच्छेदांत मुंबई सरकारने असे मत प्रदर्शित केले की, धेड, परवरी आणि इतर कनिष्ठ जातींना मऱ्हाटा कंपनीत मुळीच प्रवेश देऊ नये. ('29 The enlistment of 'Dhers', 'Purwaris' and other low caste men in the Maratta Companies should be strictly forbidden'). या व इतर मुद्यासंबंधी कमांडिंग ऑफिसर्स यांची मते मागविण्यांत आली. शेवटी दी ॲडज्युटंट जनरल यांनी प्रत्येक मुद्यावर आपले मत प्रदर्शित केले की [(Confidential) Now it has been declared as non-Confidential)] letter No. 1712/335, dated 3rd May 1892, Mahabaleshwar, to the Secretary to the Government, Military department Mahabaleshwar. Pages 65-73, Vol. 13/18 Military Deptt.) कनिष्ट जातीतील लोकांना लष्करात प्रवेशबंदी घालावी, या मुद्यावर ॲडज्युटंट जनरलने पाठिंबा दिला. क्लास कंपन्या उभाराव्यात या मुद्यालाही त्याने पाठिंबा दिला. सर्व मुद्यावर जे निर्णय ॲडज्युटंट जनरलने घेतले त्यांना कमांडर-इन-चीफ याने पाठिंबा दिला. (Cnfidential Resolution, Military Department, Bombay Castle, N 01009|24-C, dated 1st June 1892, page 91, Vol. 13|1891 Military Deptt.) या सर्व निर्णयांचा शेवटचा निकाल लावण्यासाठी एक कमिटी नेमली तिचे अध्यक्ष आणि जे गॅट्रॅक्रे, ब्रिगेडियर-जनरल आणि अल्जिनॉन कुरे हे होते. व डब्ल्यू. सी. ब्लॅक लेफनन्ट कर्नल, मेंबर्स हे होते. या कमिटीने दि. ९ मे १८९२ च्या बैठकीत सदर निर्णयावर मते प्रदर्शित केली. मेमोरॅंडमच्या परिच्छेद २९ व ३० यावर कमिटीने जी मते दिली ती अशी :-

'29. The total number of Maratta Companies proposed in the memorandum is 54, giving a total of about 5,600|- men. As we have now in our ranks 6,258 Marattas (Konkanis and Dekhanis), and three regiments which formerly enlisted a proportion of Marattas are being, or are about to be, converted into Frontier regiments, it is believed that even if men of the imferior classes (so called Marattas following trades, C) be debarred enlistment in future, there will (page 122) be no great difficulty in obtaining the required number; but to make them up we shall have to take Konkani Mahrattas of the approved classes. It is stated that the class of Mahratta which it is most desirable to obtain is the short, sturdy man from the hill country at the edge of the Ghats, and that it is understood that these hill Mahrattas or Mawalis are the only partion of the race who retain any martial spirit worth considering.

सातारा, पुणे व नगर येथील, आणि एकदा क्षात्रतेज गाजविलेल्या कुलाबाऱ्यातून फारसे मराठे आले, नाहीत. इतर जिल्ह्यातून ते फारसे आलेच नाहीत, असे म्हटले तरी चालेल. ३३९० लढाऊ सैनिक दरमहा पुरविले पाहिजेत अशी या इलाख्याकडे सरकारची मागणी आहे, म्हणून सैन्यभरतीचे काम जोराने चालविले पाहिजे. दक्षिणीमुसलमान तर अगदीच थोडे मिळाले आहेत. कोकणी महारांनी मात्र आपले नाव राखले व त्यांची आता दुसरी पलटण तयार होत आहे. दक्षिणी महार अगदिच थोडे आले. ब्राह्मणांची एक कंपनी फार दिवसांपूर्वीच मंजूर झाली होती, पण त्यांत पुरेसे लोक आले नाहीत जे आले ते मात्र उत्कृष्ट व चलाख बुद्धीचे आहेत. मंडाऱ्यांची एक डबल कंपनी तयार झाली असून आणखी एक उभारत आहे. दक्षिणी कोळ्यांनी छत्रपती शिवाजीच्या वेळी आपले क्षात्र तेज चमकावले होते, व १८५७ च्या बंडाच्या वेळेपर्यंत त्यांचे पुष्कळ लोक लष्करांत होते. पण आता मात्र एका डबल कंपनीची सुद्धा भरती झाली नाही. बेरड, लिंगायत हे अगदीच थोडेथोडे येत आहेत. काठेवाडयांची एक फलटणही कदाचित तयार होईल. गुजराथेतून मात्र सैन्यांत मजूरांची पुष्कळ भरती झाली आहे. मांग व चांभार यांच्यांत प्रयत्न करून पहावयाचे आहेत. मुंबई इलाख्यापैकी तेलगू मंडळीही एक कंपनी उभारण्याच्या विचारांत आहे.

ह्या सैन्यभरतीच्या कामी कोल्हापूरचे महाराज **राजर्षि छत्रपती शाहू** यांनी फार मोठे कार्य केले. त्यांनी त्याबद्दल फार कळकळ दाखविल्यामुळे सरकारने त्यांचे व **कागलकरांचे** अभिनंदन केले आहे. कोल्हापूरहून पुष्कळ लोक मिळाल्यास त्यांची एक पलटणच सरकार मंजूर करील. बिन लढाऊंच्या संख्येत गेल्या तीन महिन्यांत सुरतेने पहिला नंबर मिळविला आहे. व याचे श्रेय **मि. कोठवला** यांस आहे. सिंधमधून लढाऊ लोक फारसे मिळाले नाहीत. पण मजूर मात्र पुष्कळ मिळाले. पंजाब व संयुक्त प्रांताशी तुलना केली तर मुंबई अद्याप फार मागे आहे व म्हणून ह्या पेक्षा अधिक सैन्यभरती त्वरीत व्हावी व इलाख्याचे नाव रहावे, एतदर्थ अधिक प्रयत्न करणे जरूर आहे.' (केसरी, ५-३-१९१८).

पहिल्या महायुद्धांत (१९१४-१८) महार सैनिकांची जी भरती झाली, तिच्य बद्दलची माहिती The Mahar MG Regiment या ग्रंथात दिलेली आहे ती अशी :-

महायुद्धाच्या प्रारंभीच्या काळांत महार लोक पलटणीतील कामगार म्हणून पलटणीत घेतले गेले. ॲडज्युटंट जनरलने २३ जानेवारी १९१७ ला भारत सरकारचे मुख्य चिटणीस यांना कळविले की, महारांच्या दोन खास कंपन्या उभारण्याचे प्रयत्न करणे इष्ट आहे. प्रत्येक कंपनीत २१८ महार सैनिक राहतील. एक कंपनी सिकंदराबादची ६३ वी पायदळ आणि दुसरी कंपनी सेंट थॉमसची ८८ वी पायदळ यांना जोडण्यांत येईल. २३ एप्रिल १९१७ पर्यंत २१८ महार पलटणींत आले. याचे श्रेय भरतीला जे

लोक मदत करतात त्यांना दिले पाहिजे. या लोकांत रावबहादूर आर. जी. नाईक एम. बी. ई. आणि गणपत गोविंद (रोकडे) हे प्रमुख आहेत. जुलै १९१७ मध्ये १११ वी महार बटालियन उभारण्यांत आली. (पा. १०)

१९१६ व १९१७ सालांत दोन महार बटालियन्स उभारण्यांत आल्या. त्यांना वायव्य सरहद्दीवर व त्याही पलीकडे हिंदुस्थानाच्या तिकडील सीमारक्षणासाठी ठेवण्यांत आले. या खडकाळ कांटेरी व हिम प्रदेशांत इतर बटालियन्सना चांगला तग धरता आला नव्हता. महार बटालियनने वझिरिस्तानच्या लढयांत शौर्याची कमाल केली. पूर्वीच्या ज्या इतर बटालियन्स येथे होत्या त्यांना पठाणांच्या पुढे हात टेकावे लागले होते. पठाणांनी त्यांच्यापासून बंदुका व काडतुसे लुटून नेली होती. महार बटालियन-कडून एकही बंदूक त्यांना लुटता आली नाही.

भारतीयांनी फ्लँडर्स, मेसापोटेमिया, पॅलेस्टाईन, आफ्रिकेतील जंगले आणि गॅलिपोलीच्या टेकडया या रणभूमीवर, पहिल्या महायुद्धांत अतुल पराक्रम केल्यावर अकरा शूर योद्धयांना व्हिक्टोरिया क्रॉसिस देण्यांत आले. हे क्रॉसेस पूर्वी हिंदी लढव-य्यांना मिळत नसत. १९१७ सालांत किंग्ज कमिशन हिंदी तरुणांना देण्याचे ठरले, पूर्वी ते त्यांना मिळत नसे.

१११ वी महार बटालियनला समरांगणांत फार काळ राहता आले नाही. कारण १९१७-१८ च्या काळांत युद्ध बरेच मंदावले होते. तेव्हां १११ व्या महार बटालियन मधील उमद्या सैनिकांना हलक्या कामगारांची कामे करणे भाग पडले. १९२० मध्ये ती पलटण वायव्य सरहद्दीवर सहा महिने होती. त्यानंतर तिची बदली एडनला झाली. तेथे ती, ७१ वी पंजाबी बटालियनला जोडण्यांत आली. तिला १९२२ मध्ये एडनहून हिंदुस्थानांत आणून व तिचे विसर्जन करण्यात आले (It returned to INDIA in 1922 for disbandment, as no place in the post-war army could be found for a single class battalion; especially such a young battalion on untried under a modern war conditions.' The Mahar MG Regiment, page 10). महार बटालियन बंद केल्यामुळे लष्करी पेशाचे महार समाजसेवक यांनी या कृत्याबद्दल निषेध व्यक्त करण्याची चळवळ सुरू केली. त्यांनी सभा भरविल्या व सभेतील ठराव मुंबईचे गव्हर्नर साहेब व मिलिटरी ऑफिसर्स यांच्याकडे पाठविण्याचा सपाटा चालविला.

**श्री. गणपण गोविंद रोकडे** हे मिलिटरी अकौन्टस खात्यांत अहमदनगर येथे नोकरीवर होते. त्यांनी कांही लोकांच्या साहाय्याने एक अर्ज (इंग्रजी) छापून घेऊन तो हिंदुस्थानचे सेनापति, सिमला. यांना १० ऑगस्ट १९२२ ला पाठविला. त्यांत त्यांनी १११ महार बटालियनच्या गौरवपर कार्याचा उल्लेख केला आहे. ती माहिती अशी :

१) १११ महार बटालियनला १९१७ ते १९२२ च्या काळात १४ ठिकाणी लढाऊ व बिन लढाऊ कामे करावी लागली.

२) १९१४–१८ या काळांत महार तरुणांना प्रायव्हेट, म्यूल ड्रायव्हर्स, आर. ए. डेपो, एस. अँड टी. कोर; एम्. डब्ल्यू. एस; लेबर कोअर, गोऱ्या अधिकाऱ्यांचे खाजगी नोकर म्हणून लष्करी पेशांतील निरनिराळ्या रेजिमेंटसमध्ये प्रवेश मिळाला. त्यांनी दिलेली आपपली कर्तव्यकर्मे चोख बजावली, व ती बजावीत असतांना कित्येकांनी प्राणार्पण केले. (३) १११ व्या महार बटालियनने झोब, वझिरीस्तान वगैरे ठिकाणी पराक्रमाची कामे केली. याबद्दलचे लष्करी खात्याच्या दप्तरातील काही पुरावे असे आहेत :–

(Extracts from correspondence on Mahar Battalion).

'Farewell message of the Commandant, Zhob Forces, wherein the 111th Mahars were serving :

Head Quarters, Zhob, Zoralai, No. 23/49/Z.O.

Dated, at Zoralai, 7th October 1920.

On the departure of the 111th Mahars from Zhob Forces, the Commandant, Zhob, wishes to thank Lieut. Colonel Dyke, the British and Indian Officers, N.C.O.s and men of the Battalion for the good work they have done during the time they formed part of the Zhob Force.

It is entirely due to the energy and hard-work 111th Mahars that the Murgha-Lakaband Sector has become a model Sector of the Harnai Fort, Sandeman line.

Although frontier conditions were at the outset strange to the personnel of the Battalion, officers and men quickly adapted themselves to their new surroundings and by their determination and hard work rapidly assimilated the Special training requisite for Mountain Warfare.

The Lakaband Column has during the past summer been of the greatest value to Zhob Force safeguarding the raiders routes from Zhob towards Murgha and Musa Khel. This detachment has made for itself a name in the Lakaband are a where the inhabitants have learnt to show the greatest respect of the 111th Mahars.

The attitude of a small picketting party suddenly attacked near Zorozai showed that the Regiment is imbued with the spirit of the offensive.

The Commandant, Zhob, bids farewell to the Mahars with regret at their leaving his Command and wishes all ranks God speed and the best of luck in Mesopotemia.

Sd|- W. W. Brindley, Captain'.

Letter, No. 23|50|Z.O., dated 7th October 1920, from the Commanding Head Quarters, Zhob, Zorozai to the General Staff, 2nd Idian Division, Quetta.

'On the departure of the 111th Mahars from Zhob, I wish to bring forward to the notice of the G.O.C., 2nd Indian Division, the excellent behaviour of this Battalion.

The Battalion has suddenly brought from the peaceful life of a down country station to the semi-war condition of the Indian Borderland. All ranks have shown the greatest energy and determination to assimilate frontier conditions.

The Battalion has proved itself imbued with the proper offensive spirit by the single instance when a weak detachment proceeding enroute picketting (picquetting) duty was suddenly attached by outlaws. The N.C.O. in charge immediately fixed bayonets, charged and routed their assaultants who were numerically superior to thsm. The Battalion seized every opportunity to make itself really efficient fighting Unit and benefitted much by forming its one Mountain Warfare. School at Lakaband.

The 111th Mahars have improved the Lakaband-Murgha Sector very much. The posts are now clear, comfortable and securely wired, Murgha Post and surroundings are now clean and complete with facilities for the training and comforts of soldiers (e.g. Musketry, Range, Bothing Pool, etc.) which have been construed entirely by the Battalion.

The excellent marching power of the Battalion has been shown by the frequent operations carried out by the

Lakaband column by day and by night. The good state of discipline is evident from the behaviour of the smallest detachment along the road.

I am indebted to Lieut. Colonel Dyke, Captain Grant M.C. and Leiut. Boyce, M.C., M.M., for the way in which they have worked and made the Battalion into a good fighting Unit which has, during its tour in Zhob turned the attitude of the inhabitants from what at the outset was bordering on contempt into, as it is now, one of deep respect.

Sd|- D. Baird, Colonel
Commanding Zhob.'

—x—

Letter, No. 353/8-G.S., dated 26th October 1920, from G.O.C. 2nd Indian Division, to the General of the Staff, Poona, Distt. No. 11965|10|G of 1-11-1920.

"I have great pleasure in forwarding a report by the Commandant : Zhob, the excellent behaviour of the 111th Mahars while servicing under my Command.

I had opportunity while touring recently in the Zhob of testing thoroughly, the possibilities of this Battalion and fully endorse all the Colonel Baird says of their soldierly spirit and high standard of military efficiency.

The three officers mentioned by Colonel Baird have done sterling work, both which in Zhob and in producing this satisfactory work.

Sd|- A. Campbell
Major General Commanding,
2nd Indian Division."

**श्री. रोकडे** यांनी आपल्या १०–८–१९२२ च्या अर्जासोबत **श्री. शिवराम जानवा कांबळे** यांच्या १४ डिसेंबर १९१० च्या छापील अर्जाची प्रत पाठविली होती. रोकडे यांनी सदर अर्ज मध्य विभागाचे रेव्हेन्यू कमिशनर, मि. एल. जे. माऊंटफोर्ड यांच्या

मार्फत सरसेनापतीकडे पाठवितांना जो शेरा दिला त्यातील १११ वी महार बटालियन ठेवण्याबद्दलचा भाग असा होता.

"According to the Officer Commanding, the Regiment has shaped well. It is free from all political influences. It is animated by a spirit to do well so as to justify the claim of the untouchables to respect in the eyes of other castes and it bears with it the traditions of the memoirs of the 2nd Battalion of the First Regiment, afterwards the 1st Grenadiers who fought and died for us at Koregaum in 1818. I can see nothing more calculated to uplift the low caste Mahars than the retention of the Regiment." (Revenue Commissioner, Montford's recommendation to Govt. of India on Mahar appeal to retain Mahar Battalion).

११ वी महार बटालियनचे विसर्जन करूं नये, या संबंधात दुसरा अर्ज सरसेनापतींना २८ ऑगस्ट १९२२ ला **रावबहादूर आर. जी. नाईक, श्री. लिंगय्या नायडू** आणि **श्री. पापय्या जालिया थद्ये** यांनी बेळगांवहून दक्षिण विभागाचे कमिशनर **मि. पी. आर. कॅडेल** (C.S.I., C.I.E., I.C.S.) यांच्या मार्फत पाठविला. कमिशनरांनी या प्रश्नासंबंधी पूर्वी ज्या सभा भरविल्या होत्या त्या संबंधी अनुकूल मत प्रदर्शित केलेले होते. ३१–१२–१९२१ ला भरलेल्या बेळगांवातील सभेत त्यांनी असे मत प्रदर्शित केले की, महार, या सरकारबद्दल राजनिष्ठ आहेत व त्यांची पलटण चालू ठेवणे हे सरकारचे कर्तव्य आहे. ['The Mahars have been proverbial for their loyalty to the existing Government and such a body of men can be absolutely relied upon.' (Speech of P. R. Cadel, Governor of Bombay, at Belgaum Mahar meeting on 28-8-1922)].

या अर्जांना १३–९–१९२२ चे [No. A|15369|1 (A.G.6), Army Head Quarters, India,Adjustant General's Branch Simla]. ॲडज्युटंट जनरलने उत्तर पाठविले की, महार १११ व्या पलटणीबद्दल जो सरकारने पूर्वी निर्णय घेतलेला आहे तो बदलता येत नाही. फर्स्ट सॅपर्स अँड मायनर्स यांत ड्रायव्हर्स म्हणून आणि इंडियन सिग्नल कोअरमध्ये महार उमेदवारांना नोकऱ्या मिळतील. परंतु या दिलेल्या वचनाप्रमाणे महारांना लष्करी पेशांत प्रवेश मिळाला नाही. या प्रमाणे अस्पृश्यांच्या लष्करी पेशाचा तात्पुरता का होईना शेवट झाला.

दिल्लीतील मध्यवर्ती कायदेमंडळांत १४ मार्च १९२५ ला अर्थ मंत्री ऑ. सर आलेक्झांडर मुडियम यांनी जाहीर केले की, हिंदी तरुणांची लष्करात जास्त प्रमाणात

भरती व्हावी व त्याबद्दल त्यांना हिंदुस्थानातच शिक्षण देण्याचे कॉलेज सुरू करावे, या बद्दल विचार विनिमय करण्यासाठी भारत सरकार, एक मंडळ नेमण्याचा विचार करीत आहे. त्यानंतर जूनमध्ये हे मंडळ नेमण्यांत आले. ते इंडियन संधर्स्ट (अगर स्कीन) कमिटी या नावाने प्रसिद्ध आहे. त्याचे अध्यक्ष लेफ्टनंट जनरल सर अँड्रयू स्कीन के. सी. बी., के. सी. आय. ई., सी. एम. जी., चीफ ऑफ दी जनरल स्टाफ, आणि सभासदः– १) पंडित मोतीलाल नेहरू एम. एल. ई. २) श्री. एम. ए. जीना एम.एल.ए. ३) ऑनरेबल सरदार जोगेंद्र सिंग, मिनिस्टर ऑफ ॲग्रिकल्चर, पंजाब सरकार ४) दी ऑनरेबल सर फिरोज सेठना, मेंबर ऑफ दी कौन्सिल ऑफ स्टेट, ५) दिवाण बहादूर रामचंद्रराव एम. एल. ए. ६) नवाब सर साहिबजादा अबदूल क्वायूम सी. सी. आय. ई , एम. एल. ए. ७) सुभेदार मेजर अँड ऑनररी कॅप्टन हिरा सिंग, सरदार बहादूर एम. बी. ई., एम. एल. ए. (१६ वी रजपूत) ८) डॉ. झियाउद्दीन अहमद, सी. आय. ई., एम. एल. सी., प्रोव्हाईस चॅन्सलर, अलिगड मुस्लिम युनिव्हर्सिटी; ९) कॅप्टन जे. एन. बानर्जी, बार–ॲट–लॉ, १०) मेजर ठाकूर झोरावर सिंग, एम. सी. चीफ सेक्रेटरी कौन्सिल ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन, भावनगर स्टेट (हिंदी संस्थानचा प्रतिनिधी) ११) रिसालदार मेजर अँड ऑनररी कॅप्टन हाजी गुलनवॉज खान, सरदार बहादूर (१८ वी लार्सन) (१२) मेजर बाळासाहेब डफळे, ७ वी रजपूत रेजिमेंट, आणि (१३) मि. ई. बर्डन, सी. एस. आय., सी. आय. ई , आय. सी. एस., सेक्रेटरी टू दी गव्हर्नमेन्ट ऑफ इंडिया इंन दी आर्मी डिपार्टमेन्ट हे होते. पं. मोतिलाल नेहरूंनी ११ मार्च १९२६ ला राजिनामा दिला. या मंडळाने ज्या शिफारसी केल्या त्यातूनच डेहराडूनला मिलिटरी कॉलेज, (The Prince of Wales' Royal Indian Military College, Dehra Dun) पुढे काढण्यांत आले. १९१८ च्या पूर्वी हिंदी माणसाला किंग्ज कमिशन देण्यांत येत नसे. ते फक्त गोऱ्या लोकांना दिले जात होते. दुसऱ्या महायुद्धांत हिंदी लोकांना सुरवातीला 'व्हाईसरॉयज' व नंतर 'किंग्ज' कमिशन देण्यांत येऊ लागले. (Report of the Indian Sandhurst Committee, 1927).

या कमिटीच्या शिफारसी हिंदी समाजातील सुस्थितितील हिंदु व इतर जमातीतील तरूणांना अधिकारी म्हणून निर्माण करणे, याकडे दृष्टी ठेवून केलेल्या होत्या. अस्पृश्य समाजांतील लोकांच्या लढाऊ वृत्तीला या कमिटीने मुळीच महत्त्व न दिल्यामुळे अस्पृश्यांना लष्करांत प्रवेश मिळावा व त्यांच्यातून लष्करी अधिकारी निर्माण व्हावेत या संबंधी कमिटीने अहवालांत एक चकार शब्दही लिहिला नाही.

सरकार अस्पृश्यांच्या लष्कर भरतीस उत्तेजन देत नाही, हे पाहून अस्पृश्यांचे समाजसेवक व मिलिटरी पेन्शनर्स यांना फारच वाईट वाटले; परंतु त्यांनी पुनः पुन्हा प्रयत्न करण्याचे आपले व्रत सोडले नाही. ते एकसारखे सभा भरवून तींत, यासंबंधी ठराव पास करून ते वरिष्ठांकडे पाठवीत असत. अशी मिलिटरी पेन्शनर्सची एक

सभा ता. ८–६–१९२८ ला दामोदर हॉल, परळ, मुंबई येथे भरली होती. या सभेचे अध्यक्ष **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** होते. यांत पेन्शनर्सनी महारांना मिलिटरीत भरती करवून घेण्याबद्दलची मोठी कळकळीची व सरकारची अर्जवी करणारी भाषणे झाली. नंतर बाबासाहेबांचे भाषण झाले. त्यांनी आपल्या भाषणांत, सरकारच्या कृतघ्नपणाचा इतिहास सांगून सरकारच्या धोरणावर प्रखर टीका केली. याबाबतींत सर सेनापतीकडे एक शिष्टमंडळ नेण्यांत यावे; असा ठराव या सभेत मंजूर करण्यांत आला. पण असे शिष्टमंडळ निर्माण झाले नाही आणि सरसेनापतीकडेही गेले नाही.

सारांश, महार सैनिकांनी रणक्षेत्रांत अद्भूत पराक्रम केले व ब्रिटिशांचे साम्राज्य भारतात वाढविण्यास इतर जातीतील हिंदी सैनिकांपेक्षा कणभर जास्तच प्रयत्न केले; परंतु संपूर्ण हिंदू सैनिक व अधिकारी यांच्यातील जातिभेदाच्या द्वेषाग्नीपुढे ब्रिटिशांना महार वीरांना थारा देणे दुरापास्त झाले. केवळ ब्रिटिश साम्राज्यात १८५७ ची द्वितीय आवृत्ति, महार व चांभार सैनिकांच्या लष्करातील अस्तित्वामुळे होऊ नये, हीच भावना राज्यकर्त्यांची असल्यामुळे त्यांनी अस्पृश्यांना लष्करांत भरती देणे बंद केले.
('There are no Mahars in the Indian Army now, unless they be employed as *sais* in the field of artillery or as motor mechanics in the armoured car units. But an attempt was made during the great world war to embody a battalion of such men. The response to the recruiting officer was slow, present case as in the past who enlisted. Two companies of them were trained alongside of two companies of Panjab Christians. They formed 71st - 111th Regiment; but they were not required on any battlefield though they attained a high standard of discipline and of athletic efficiency. In education and in physique the two wings of the regiment were unequal. It is significant that the Army could find comradeship for the Mahars only among Christians. The regiment was disbanded at the end of the war.

Well may a disinterested student of Indian History ask, Why did the Bombay regiments cease to recruit Mahars? The answer which comes most readily to mind is that caste prejudice on the part of Maratha soldiers made it difficult to maintain discipline and *esprit de corps* and commissariat efficiency in a complex modern army, if untouchables be in the ranks. But the easy and obvious answer is not the whole truth; and the spirit of history demands that the truth be faced.

The facing of the truth demands a retrospective of the history of the Bombay regiments. ....What European Officers of the Company's service in 1796 did to Indian officers of that time, King's Army Officers at a later period did to the Company's officers. That is to say, the amount of military service may have increased in India, but the amount of understanding in the Sepoy mind did not increase; and there was a dwindling number of Indian officers who had reason to be proud of their British connection. Wise soldier-statesmen like the friends, Sir Thomas Munrao and Sir John Malcum, both of whom began their Indian career before they were twenty years of age, and advanced through labour and fighting from rank to rank until they were Governors of Madras and Bombay respectively, foresaw this trend of military officers had protested vigorously against the superseding of responsible and honourable Indian officers. There seems to be little about that if the temper of such statesmen, their manners and their sympathetic understanding of the mind of the Indian people, had been copied and the Sepoy revolt of 1857 might have never been happened.

While changes were taking place in the Commissioned ranks of the India regiments, there was going on a change in the *esprit de Corps* of those regiments. It has always been the policy of officers of the Bombay regiments to have men of a number of castes in their ranks. During the war with the Peshwa there was a marked increase in the proportion of Rajput and Hindustani Sepoys in the Bombay regiments, and after the defeat of the Peshwa the Bombay Army came more and more into touch with the northern regiments. In the Hindustani regiments the men put caste before the regiment. In the old Bombay units soldiers belonged to a regiment rather than to caste. As the change in the character and the experience of the officers was taking place, there was working in the Bombay regiments a change of devotion from the corps to caste. This was almost inevitable since the war-like classes who used to form both an army and a caste must needs find employment in Bombay units.

Along this line of study will be found the main reason for the exclusion of Mahars from the ranks of Bombay regiments when after 1857 the Imperial Government found it desirable for reasons of economy and of military policy to reduce the number of Indian regiments.

Furthermore there happened in the Civil Government a process parallel to that which occurred in the Bombay Army. The direct officer who does the real work of administration and who knows the people because he moves among them and listens to their petitions, has occasion to appreciate the local knowledge possessed by the Mahar and his mental quickness. But there has been a tendency to honour the Secretariate staff more than the man in the district. The officer who spends his days sitting at a bureau cannot be expected to see any political power in a caste of field babourers and weavers and village messengers and masons and roadmakers, even though they have a fine military record. One has heard over and over again the remark that the Mahar has no political significance. The remark just prove that the maker of it has little memory and little understanding of such events as the battle of Koregaon. The mind which suffers from such frailties is hardly fitted to retain the empire given to it.

But circumstances are changing rapidly in the political world, and rival communities, Moslems, Hindus, Sikhs see in the Mahar vote something of potential value when the form of Government is democratic.

Mahar Sepoys had not a little to do with the establishment of British dominion in India, as Mahar servants had not a little to do with the possibility of European domestic life in India. The British failure to remember this may not be a cause or even an occasion, but it is manifestly a concomitant of the decline of that dominion. (The Mahar Folk, page 63-66).

१९२३ ते १९२६ पर्यंतच्या काळांत महार मिलिटरी पेन्शनर्स आणि समाज सेवक यांनी अस्पृश्यावरील प्रवेशबंदी दूर करा अशा अर्थाचे अनेक विनंती अर्ज मुंबई व मध्यवर्ती सरकार यांच्याकडे पाठविले. परंतु त्यातून कांही निष्पन्न झाले नाही.

लष्करी नोकरी ही अस्पृश्यांच्या उपजिविकेचे आणि सामाजिक प्रतिष्ठा (दर्जा) वाढविण्याचे दुहेरी साधन आहे, हे बाबासाहेब खाजगी बैठकीतून बोलत असत. समाजांतील लोकांच्या तुटपुंज्या धडपडीकडेही त्यांचे लक्ष होते. हे दुहेरी साधन अस्पृश्यांना कशा रीतीने उपलब्ध करुन देता येईल याबद्दल त्यांचा त्या बाबतींत सखोल चिंतन चालले होते. ते उपलब्ध करुन देणे, हे एक त्यांनी आपल्या आयुष्याचे ध्येय ठरविलेले होते. म्हणून त्यांना जेव्हां जेव्हां व जेथे जेथे या बाबतींत उघड वा आडून प्रयत्न करण्याचे प्रसंग मिळत तेव्हां ते त्यांचा चांगला उपयोग करीत असत. त्यांच्या या प्रयत्नांना १९४२ साली यश मिळाले. त्याबद्दलचा इतिहास पुढे येईलच.

१९१७ सालांत किंग्ज कमिशन हिंदी तरुणांना देण्याचे ठरल्यानंतर त्यांच्या-साठी सँढर्सट येथील लष्करी कॉलिजमध्ये दहा जागा त्यांच्यासाठी राखून ठेवल्या. एस्थर कमिटी रिपोर्ट १९१९ ला प्रसिद्ध झाला, त्यांत हिंदी लष्करासंबंधी बऱ्याच उत्तेजक शिफारशी केल्या होत्या. त्यांच्यावर मार्च १९२१ मध्ये मध्यवर्ती कायदे मंडळात चर्चा झाली तेव्हां सर पी. सी. शिवस्वामी अय्यर यांनी अनेक ठराव मांडून हिंदी लष्कराला प्राधान्य देण्यासंबंधी व भारतीयांच्या अधिकारात सैन्य यावे, अशी मागणी केली. याचा परिणाम असा झाला की घोडदळ व पायदळ यांच्या आठ तुकड्या १८२३ ला सर्वस्वी भारतीयांच्याच उभारण्यांत आल्या. स्कीन कमिटीचा रिपोर्ट १९२५ मध्ये प्रसिद्ध झाला. या कमिटीवर बॅ. जीना व मोतीलाल नेहरू होते यांच्या प्रयत्नांनी भारतीय लष्कराचे भारतीयकरण व्हावे, मिलिटरी कॉलिज सुरु व्हावे, वगैरे शिफारशी कमिटीने केल्या. पण सरकारने त्या स्विकारल्या नाहीत. सरकारने सँढर्सट् मध्ये २० जागा भारतीयांसाठी राखून ठेवल्या. पहिल्या राऊंड टेबल कॉन्फरन्सच्या डिफेन्स सबकमिटीवर तेजबहादूर सप्रू, श्रीनिवास शास्त्री, फिरोज सेटना, बॅ. जयकर, डॉ. मुंजे, व बॅ. जीना होते. त्यांनी लष्कराचे भारतीयकरण व्हावे म्हणून खूप खटपट केली. पण ब्रिटिश सरकारने डेहराडून येथे इंडियन मिलीटरी ॲकॅडमी सुरु करून बाकीच्या शिफारशींकडे काना डोळा केला.

(The Rise of Indian Army, by Victor Longer, The Times of India Magazine, 26-1-1969, page I).

सरकार अस्पृश्यांच्या लष्कर भरतीला उत्तेजन देत नाही हे पाहून अस्पृश्यांचे समाजसेवक व लष्करी पेन्शनर्स यांना फार वाईट वाटले. तथापी त्यांनी पुनः पुनः प्रयत्न करण्याचे व्रत सोडले नाही. ते अनेक सभेमधून सरकारला ठरावांचे रुपाने विनंती करीतच असत. अशी मिलिटरी पेन्शनर्सची एक सभा ८-६-१९२८ ला रात्री ७-३० वाजता मुंबईला परळ येथे दामोदर हॉलमध्ये **बाबासाहेब आंबेडकरांच्या**

अध्यक्षतेखाली भरली होती. या सभेत जी भाषणे झाली ती सरकार बद्दल मोठी आजीजी व राजनिष्ठा दाखवून! मात्र बाबासाहेबांनी आपल्या भाषणांत सरकारच्या कृतघ्नपणाचा इतिहास सांगून सरकारच्या धोरणावर कडक टीका केली. या बाबतीत सरसेनापतीकडे एक शिष्टमंडळ न्यावे असा ठराव या सभेत मंजूर करण्यांत आला, पण असे शिष्टमंडळ अस्तित्वात आलेच नाही.

बाबासाहेब हिंदी वर्तुळ परिषदेसाठी १९३० साली गेले तेव्हापासून त्यांनी अस्पृश्यांच्या लष्कर भरती संबंधीच्या धोरणांत बदल कसा घडवून आणता येईल. याबद्दल लंडनमधील अनेक रिटायर्ड मिलिटरी ऑफिसर्स आणि विद्यमान ऑफिसर्स यांच्याशी विचार विनिमय केला.

१-१-१९३१ ला भरलेल्या अल्प संख्यांक जमातीच्या सबकमिटीच्या तिसऱ्या बैठकीत बाबासाहेबांनी हा प्रश्न उपस्थित केला. अस्पृश्यांच्या लष्करी पेशावर सरकारने जी १८९२ सालापासून कुऱ्हाड उगारलेली आहे त्यामुळे अस्पृश्यांवर सरकारने फार मोठा अन्याय केलेला आहे, आणि हा अन्याय दूर करण्यात आला पाहिजे असा त्यांच्या भाषणाचा सारांश होता.

('......Upto 1982 practically whole of the Madras Army and the whole of the Bombay Army consisted of members drawn from the Depressed Classes. All the great wars in the history of India has been fought with the help of sepoys drawn from the Depressed Classes, both in Bombay Presidency and in Madras. Yet in 1892, a rule or regulation was made which debarred the Depressed Classes from entry into the military service, and even to day, if you ask a question in the Legislative Council as to why this is done, the answer is that the bar of untouchability does create inseparable difficulties in the recruitment of these classes,......' Proceedings of Sub-Committees Vol. III (Minorities|2nd R. T. Conference page 76) Ambedkar's speech dated 1-1-1931.

बाबासाहेबांच्या या प्रयत्नातूनही कांहीच निष्पन्न झाले नाही. पेन्शनरांचेही प्रयत्न चालूच होते.

'महार सेवा संघ' मुंबई यांच्या विद्यमाने चिपळूण येथे पांचवे अधिवेशन १२-५-३४ ला भरले होते. अध्यक्ष, सिनियर ऑफिसर, पेन्शनर, हिरू रामजी धुत्रे (देवकेकर) होते. आणि स्वागताध्यक्ष होते, पेन्शनर, सुभेदार राघोराम संजन घाटगे (यरेडकर), ऑनररी मॅजिस्ट्रेट, हे होते. अस्पृशांची भरती लष्करात करावी हा एक ठराव सभेत मंजूर झाला व तो सरकारकडे पाठविला.

युद्धाचे ढग युरोपच्या आकाशांत जमा होऊ लागलेले १९३९ ला दिसू लागले. इंग्लंड व ब्रिटिश साम्राज्य यांना भाग घेणे भाग पडले. या युद्धांत जर ब्रिटिश साम्राज्यातील देशांनी, इंग्लंडला बिनशर्त मदत केली नाही तर ब्रिटिश साम्राज्याची धडगत रहाणार नाही व त्याचबरोबर साम्राज्यातील देशांनाही वाईट दिवस येतील. तेव्हां भारतातील अस्पृश्यांनी सरकारशी अडवणुकीचे धोरण न ठेवता सैन्यात दाखल व्हावे व सरकारला सर्व बाजूंनी सहाय्य करावे असे पत्रक 'Depressed Classes and the War' या शीर्षकाखाली **रा. ब. एन्. सी. राजा**, एम. एल. ए. प्रेसिडेंट, ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस असोसिएशन, यांनी जाहीरकेले. (टाईम्स ५–५–३९, पा. १६) याला उद्देशून मी, (चरित्रकार **श्री. चां. भ खैरमोडे**) 'The coming War and the Harijans' हा लेख बॉंबे क्रॉनिकल' मध्ये Yound Harijan या टोपण नावाने लिहिला. अस्पृश्यांना मदतीची जरुरी पडेल तेव्हां त्यांना जवळ करावयाचे व आपले काम फत्ते झाले की त्यांना दूर लोटायचे हे सरकारचे धोरण अस्पृश्यांच्या लष्करी पेशासंबंधी १८९२ ते १९२२ च्या काळांत होते हे लक्षांत घेऊन अस्पृश्यांनी रा. ब. राजाच्या पत्रकाचा विचार करावा; आणि हे युद्ध संपल्यानंतर, अस्पृश्यांच्या लष्करी पेशाबद्दल हमखास व कायमची तजवीज करण्यात येईल असे सरकारने आश्वासन दिले तरच आम्ही सैन्यात दाखल होऊ, असे जाहीर करावे, असा माझ्या या लेखाचा मतितार्थ होता.

**श्री. शिवराम जानबा कांबळे** यांनी १–८–१९८९ ला चेअरमन, आर्मी इंडियनायझेशन, डिफेन्स डिपार्टमेंट, सिमला, यांना एक अर्ज पाठविला. या अर्जाला १८–९–३९ ला उत्तर आले की, हिंदूतील प्रमुख जातींची अस्पृश्यता, प्रमुख जातीचे· लोक, लष्करातही मानतात (पाळतात); व त्यांच्या भावना लष्करी अधिकारी लक्षात घेतात) म्हणून सरकार लष्करात अस्पृश्यांना घेत नाही. ज्या पलटणीतील अधिकारी (स्पृश्य हिंदूर अस्पृश्यांच्या भरतीला विरोध करीत नाहीत, त्या पलटणीच्या अधिकाऱ्याच्या मर्जीवा अस्पृश्यांची लष्कर भरती अवलंबून आहे, असे सरकारी धोरण असल्यामुळे अस्पृश्यांच्य लष्कर भरतीबाबत खास सोयी करणे शक्य नाही. ते मूळ उत्तर असे :–

'No. B|56113|A. G. 2.
Army Head Quarters, India,
Adjutant General Branch,
Simla, the 19th August 1939.

From : The Adjutant General India,
To
Mr. Shivram J. Kamble,
1373, Kamathipura, 6th Lane,
Camp Poona.
MEMORANDUM.

With reference to his letter, dated the 1st August 1939, addressed to the Chairman, Indianization Committee, Mr. Shivram J. Kamble is informed that Mahars are eligible for recruitment in the Indian Army as a sub-class of Hindus. Although there is now no separate unit for Mahars, any unit authorised to recruit Hindus without restriction as to sub-class may take Mahars if it wishes to do so.

2. The general recruiting policy of Army Headquarters is, however, to prescribe the main classes to be recruited and to leave the selection of sub-classes to the discretion of officers commanding units. Moreover, owing to the limited size of the Indian Army, extended recruitment of Mahars can be arranged only at the expense of some other deserving class now serving.

In these circumstances, it is regretted that Army Headquarters cannot take any action to extend special facilities to Mahars in the matter of recruitment of the Indian Army.

Sd|-

For Adjutant General in India'.

३ सप्टेंबर १९३९ ला इंग्लंडने जर्मनी व इटली यांच्या विरुद्ध युद्ध पुकारले तेव्हां लगेच हिंदुस्थानच्या व्हाईसरॉयने पत्रक प्रसिद्ध केले की, हिंदी लोकांनी हे युद्ध जिंकण्यासाठी इंग्लंडला सर्व तऱ्हेने मदत करावी. व्हाईसरॉयच्या या घोषणेचे स्वतंत्र मजूर पक्षा (Independent Labour Party) तर्फे, स्वागत करणारे, पत्रक बाबासाहेबांनी काढले. आपल्याला जरूर पडेल तेव्हांच हिंदी लोकांना लष्करी शिक्षण देण्यास व त्यांच्या लष्करी पेशाचा उपयोग करण्यास सरकार तयार होते; एरव्ही सरकार हिंदी लोकांच्या लष्करी पेशाबद्दल बेफिकीर रहाते; एवढेच नव्हे तर कांही जातींनाच उत्तेजन देते व इतर जातींना जवळही करीत नाही, सरकारचे हे स्वार्थी व घरसोडीचे वर्तन निंद्य होय. सरकारने हे निंद्य धोरण टाकावे. हिंदी लोकांना लष्करी शिक्षण द्यावे, त्यांत स्पृश्य-अस्पृश्य असा भेद करू नये, आणि युद्ध समाप्तीनंतर या सर्व लष्करी शिक्षण घेतलेल्या लोकांना लष्करात कायमचे ठेवण्याची हमी द्यावी. शिवाय सरकारने हेही जरूर जाहीर करावे की युद्ध समाप्तीनंतर हिंदुस्थानला जो राजकीय दर्जा ब्रिटिश सरकार देईल तो वसाहतीचे स्वराज्य (डोमिनियन स्टेटस) हा होय. मग हिंदी लोक युद्धाला हातभार लावतील. शेवटी बाबासाहेबांनी असेही या पत्रकांत म्हटले होते की स्वतंत्र मजूर पक्ष युद्धास सर्वतोपरी साहाय्य करण्यास तयार आहे. कारण या बाबतीत

सरकारला अडविण्याची ही वेळ नव्हे.' ते पत्रक ता. १४-९-३९ (गुरुवार च्या टाईम्स मध्ये प्रसिद्ध झाले होते) ते असे :—

## INDIA MUST SUPPORT BRITAIN.

## DR. AMBEDKAR ON MUTUAL DUTIES.

The views that India should support Great Britain in the War is expressed by Dr. B. R. Ambedkar, President of the Independent Labour Party, outlining the parties attitude, in a statement to the press.

Tracing the events that led upto the war and attitude of Germany towards other nations. Dr. Ambedkar states that, having regard to the aspirations and ambitions of the Indian people, and having regard to the fundamental conflict between them and German ideal, India cannot avoid taking up the challenge of Germany and showing her readiness to vindicate her right to reach her destiny. The Independent Labour Party therefore has no hesitation in saying that this is a war which the Indian people, in their own interests should support and held Great Britain to prosecute.

## IN THE COMMONWEALTH

Referring to the attitude of certain other parties towards the war, Dr. Ambedkar observes that so far as no one can visualise the near future, the best thing for India is to remain within the British Commonwealth of nations and strive to achieve the status of equal partnership therein. good long part of the road to that status has already been covered and the part that remains is also within reach. There is no knowing what India's fate would be under a new master.

At the same time Dr. Ambedkar emphasises that the British have certain duties towards India, and the first and foremost of them is to prepare Indians to defend their country, and to introduce compulsory military training for all persons within certain age.

It is astonishing, Dr. Ambedker adds, that Government should call Indians to become combatants only when the war is on, and allow them to lapse into unserviceable non-

combatants as soon as the war is over. There is feeling that the reason why the British do not wish to introduce compulsory military training in India, is that they cannot trust Indians. Steps must be taken to remove such a suspicion. Recruitment to the Standing Army must be open to all communities.

## STATUS OF DOMINION

The second duty of the British towards India is to reassure her of the status she is to occupy in the British Empire. The reluctance of the British Parliament to embody in the preamble to the Government of India Act, the statement that India is ultimately to occupy the status of a Dominion has caused much heart-burning. The British must see that the doubts of India on this point are removed as early as possible.

The Independent Labour Party supports the appeal made by His Excellency the Viceroy to India to help Britain in the War. It agrees that this is no time for making conditions." — (The Times of India, 14-9-1939).

व्हॉईसरॉय साहेबांच्या घोषणेला उद्देशून श्री. भास्करराव जाधव यांनी टाईम्सला एक पत्र त्यांच्या वैयक्तिक जबाबदारीवर (मराठ्यांचा प्रतिनिधी अगर पुढारी म्हणून नव्हे) लिहिले होते. व्हॉईसरॉय साहेबांच्या घोषणेने कोणत्याही राजकीय पक्षाला उत्साह आला नाही. सदर घोषणेत व्यवस्थीतपणे राजकीय हेतुबद्दल खुलासा केला असतां तर राजकीय पक्षांना त्या घोषणेचा अन्वयार्थ लावता आला असता, असा श्री. जाधवाच्या म्हणण्याचा इत्यर्थ होता. मनुष्यबळ व युद्धसाहित्याला उपयुक्त अशा जिनसांचा पुरवठा करणे, या दोन्ही गोष्टी हिंदुस्थानातून करता येतील. मनुष्यबळ पुरविण्याच्या बाबतींत मराठा समाज आपल्या पूर्व परंपरेला जागेल. श्री. जाधवांचे हे पत्र २६–१०–३९ च्या टाईम्समध्ये प्रसिद्ध झाले होते ते असे :–

## 'MARATHAS AND WAR'

Sir, — His Excellency the Viceroy has made his declaration, but he has not succeeded in enthusing any party. The Congress Working Committee has condemned it. The liberals are also not satisfied with it. Mr. Jinnah is sitting on the fence and his party may take office, at last in certain provinces, if and when the Congress Ministers resign.

I do not expect Congress will carry on propaganda hostile to British Government in order to create disturbances leading to breaches of peace. India can help Great Britain in two main directions providing recruits and supplying war materials; War materials can be purchased in any quantity and there is no dearth of any quantity and there is no dearth of merchants who will be ready to supply the demand when there is a prospect of profit. Indian merchants and bankers will subscribe liberally to future loans. As for recruiting, Sir Sikandar Hayat Khan has given an assurance that the Punjab, the Sword-arm of India will keep its reputation and provide a million fighters.

Although I am not authorised to speak on behalf of the Marathas, from my knowledge of my people I can confidently say that the Marathas who have for two thousand years maintained their reputation as though fighters, will not lag behind when a call is made and recruiting propaganda is vigourousely carried on. His Highness the Maharaja of Kolhapur and other Maratha Princes have clearly given a lead in this matter and the Maratha people, who from the sword-arm of Bombay province, will not fail to respond.

In the last World-War, His late Highness Shahu Chhatrapati asked the Marathas to partake freely of horse-flesh in order to prolong the defence of Kut and the Maratha soldiers obeyed him. The House of the Great Shivaji is held in high veneration and the example so nobly set by His Highness Rajaram Chatrapati Maharaj Saheb of Kolhapur will certainly be followed by the Marathas and thousands and lakhs of Marathas will join the army.

Bombay B. V. Jadhav.'

(The Times of India, 26-10-1939).

महाडचे श्री. एस. बी. सावंत यांनी श्री. भास्करराव जाधव यांच्या पत्राला उद्देशून टाईम्सला पत्र पाठविले. त्यांत त्यांनी असे विचार प्रदर्शित केले की मराठा समाज आपापसातील फुटीमुळे आणि योग्य पुढाऱ्यांच्या अभावामुळे, राजकीय दृष्ट्या नगण्य झालेला आहे, आणि श्री. जाधव यांनाही सदर समाजाला एकत्र करणे

अशक्य झाल्यामुळे हा समाज इतर राजकीय पक्षांचे भक्ष्य बनला आहे. मराठा संस्थानिकांचे पुढारीपण, मराठा समाज आतां मान्य करणे अशक्य आहे. तेव्हां मराठा समाजाची दुही नष्ट करावी मग युद्धोपयोगी चळवळ हाती घ्यावी, वगैरे मुद्दे श्री. सावंत यांनी उपस्थित केले. ते पत्र ३-११-३९ च्या टाईम्समध्ये प्रसिद्ध झाले होते. ते असे :-

## MARATHAS AND WAR

Sir, — Mr. Jadhav's letter of immence topical importance for the side lights it throws upon the organisation of the Marathas as a political party. We witness today the disconcerting spectacle of a powerful community like that of the Marathas, with age-long traditions sinking into oblivion, thanks mainly to the proverbial disunity and want of leadership "If the 'sword-arm' of the province" is asked to subscribe its quota of man-power without our leaders being able to take counsel together and consolidate our position as much on the political as on the fighting front, our leader call for the recruitment would degenerate into an unrigorous call to serve as common-folder. But unfortunately so helplessly disunited is our community that even Mr. Jadhav who has represented it not only in the provincial and Central Legislatures but also at the Round Table Conference hesitates to speak on its behalf. The old leaders have either deserted us or else disowned by us. We are fast being absorbed by existing political parties with the result that we have a foot in every camp but have no camp of ours. We are owned by every political organisation but are trusted by none.

A suggestion is put that the Princes should take up the leadership. But this is calling old tunes which are out of date in the progressive world of today. The natural leadership of Princes has long ago disappeared. It is for the people themselves to organise and to frame their policy. If we now fail to awake and arise we will forever be fallen. Can we not rise to the occasion? Can we not even forget our differences and put up a united front? Is there no silver lining to the dark cloud of melancholy that over-

hangs our political existence together? I refuse to answer in the negative.

Mahad, October 26, S. B. Sawant.

(The Times of Indaia, 3-11-1939).

मराठे तरुण लष्करात जातील, पण ते पद्धतशीर रीतीने आणि मराठ्यांच्या ऐक्याच्या जोरावर जातील तर मराठा समाजाला युद्धानंतर इंग्रज सरकारशी राजकीय हक्क मागण्यास भरपूर वाव (क्षेत्र) मिळेल, असा श्री. सावत यांच्या पत्राचा ध्वनी होता. अस्पृश्यांना लष्करांत प्रवेश मिळत नसल्यामुळे तो सरकारने द्यावा ही अस्पृश्यांची मुख्य मागणी होती. त्या मागणीतच भावी काळात राजकीय हक्क मागण्यासाठी अयतेच क्षेत्र तयार होत होते, हा त्याचा गर्भीत अर्थ होता. परंतु त्यावेळी त्याकडे कोणाचे लक्ष नव्हते. **ही दृष्टी बाबासाहेबांकडे होती**; यांत तीळमात्र संदेह नाही. अस्पृश्य तरुणांनी मिळेल त्या लष्करी खात्यात आपला शिरकाव करून घ्यावा, आणि सरकारने अस्पृश्यांना लढावू सैनिक म्हणून स्वीकारावे आणि त्यांच्या स्वतंत्र पलटणी उभारण्यात या दोन मुद्यावर बाबासाहेब, सभेतून व खाजगी भेटीतून प्रचार करीत होते. ते २८ जानेवारी १९४० ला रत्नागिरीला असतांना त्यांचे दर्शन घेण्यास हजारो लोक आले. त्यांत सैन्यात भरती होण्यास तयार झालेले कुणबी व महार जातीचे तरुण होते. या तरुणांना त्यांनी उपदेश केला की तुमच्या बापजाद्यांनी इंग्रज लोकांना पूर्वी फार मोठ्या प्रमाणांत लष्करी साहाय्य केले होते व सरकारनेही त्यांची बूज राखली होती. लष्करी पेशातील महारांचा दर्जाही उचावला होता. १८९२ ला महारांना, लष्कर प्रवेशावर बंदी घातल्यामुळे त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती एकदम खालावली, आता लष्करात पराक्रम करून तुम्ही सरकारला लष्करी प्रवेश बंदी उठवावयास भाग पाडा आणि आपल्या महार समाजाचा दर्जा (उचवावा) असा बाबासाहेबांनीत्यांना उपदेश केला. याबद्दलचा वृत्तांत ३१-१-४० च्या टाईम्समध्ये (पा. ११) प्रसिद्ध झालेला होता तो असा :-

'MAHARAS URGED TO JOIN ARMY.

DR. AMBEDKAR'S APPEAL.

Ratnagiri, January 29.

An appeal to Kunbis and Mahars to come forward and join the Army was made by Dr. Ambedkar, when a number of Mahars recently enrolled as recruits came in a body last evening to pay their respect to him as their leader.

Dr. Ambedkar expressed appreciation of their decision to enrol. Military occupation, he said, was closed to them

on account of caste prejudices, although they had rendered good service in the past. At one time practically ¾ of the Bombay army was drawn from the Mahars and they had fought a great many battles on the side of the British, including the famous battle of Goregaon, when the Peshwa was defeated and the British established their supremacy.

After the mutiny of 1857, he went on, other classes joined the Army. Their prejudices had to be respected and the recruitment of Mahars was therefore stoped. The new recruits had this the responsibility to regain their past position in the army'. (The Times of India, 31-1-1940).

१९४० च्या पूर्वार्धात बाबासाहेबांनी महारांना लष्करात प्रवेश मिळावा व त्यांच्या पलटणी तयार कराव्यात, याबद्दल चळवळ व पत्रव्यवहार केला. मुंबईचे गव्हर्नर यांनी बाबासाहेबांच्या चळवळीकडे सहानुभूतीने पाहून, हिंदुस्थान सरकारला, महारांना लष्करात प्रवेश देण्यास भाग पाडले. या बाबतीत १९४१ च्या जूनमध्ये सरकारी हुकूम निघाला. तेव्हां बाबासाहेबांनी टाईम्सला एक पत्र पाठविले व त्यात इंग्रज सरकारच्या दुष्ट धोरणाचा इतिहास देऊन त्याबद्दल कडक शब्दात आपला निषेध व्यक्त केला. महारांची लष्करात भरती करण्यांचा हुकूम मुंबईच्या गव्हर्नराच्या मध्यस्तीने निघाला व आपल्या फार दिवसांच्या प्रयत्नांना यश आले. महार तरुणांनी, लष्करांत नोकरी करण्याची ही जी संधी आलेली आहे, तिचा स्वतःच्या व समाजाच्या हितासाठी उपयोग करावा, आणि ब्रिटिश सरकारने युद्ध–समाप्तीनंतर महारांना लष्करी पेशात कायमचे राहू द्यावे, अशी विनंतीही त्या पत्राने, बाबासाहेबांनी केलेली होती. ते पत्र १८–६–४१ च्या टाईम्समध्ये प्रसिद्ध झाले होते ते असे :–

Readers Views; Recruitment of Mahars Sir :— The Mahars have been a martial people. The army of the East India Company which successfully fought against the army of the Peshwa was recruited from the Mahars. The last battle between the Peshwa and the British was faught at Koregaon in the Poona District. There is a column at Koregaon raised by the British to commemmorate the battle. On the column are inscribed the names of the soldiers who fell in the battle on the side of the British. Nine out of ten names are of Mahars. The recruitment of Mahars continued upto 1892 and in all the wars, the Mahars have proved their martial qualities. All of a sudden the recruitment of Mahars was stoped in 1892. Ever since the Mahars have nursed a

grievance against the British Government for what they regarded as very ungreatful conduct. There is much injustification for this grievances, for there can be no doubt that without the help of the untouchables the British would never have been able to conquer India.

The Mahars carried on a great agitation against their banishment from the army. But it bore no fruit. It was during the war of 1914 that the British Government under necessity lifted the ban and raised the Mahar Battalion. It was raised at the fog end of the war and the battalion had no apportunity to go on war service and show its mettle. It was posted in Waziristan in the North-West Frontier Province, and it is on record while almost every battalion stationed in the N.W.F. lost some rifles and ammunation to the Pathans, who are in the habit of raiding ammunition and rifle depots to arm themselves, the Pathans did not succeed in stealing a single rifle or a single cartridge from the Mahar battalion. It was expected that the British Government, having re-enfranchised the Mahars for military purposes, would continue the Mahar Battalion and add tc it more Mahar Battalions. But instead the British Government on the excuse of economy, disbanded the Mahar Battalion. This caused great bitterness in the minds of Mahars. When the present war came, the Mahars hoped that their turn would come. But the steps taken by the British Government in the early stage of the war only added insult to injury. The Mahars were only wanted for labour corps and not for the combatant ranks. The labour corps is safer than the combatant ranks, but the Mahars wanted to join the combatant ranks. One of the banalities of the British Government in India is there distinction between martial and non-martial classes. Nothing has been more disastrous. It is a pity that so great a catastrophe as the war was necessary to enforce the British Government to give up this senseless distiction. It is stated that Government have directed to raise a Mahar battalion. The credit

must go to H.E. The Governor of Bombay. On my making it a grievance, he took up the matter with the Central Government and brought it to a successful issue. I appeal to the Mahars to take advantage of this apportunity both for their sake as well as the sake of the community, and also appeal to the British Government to keep faith with the Mahars and not to disband them from the army after the war is over.

Bombay (Dr.) B. R. Ambedkar

(The Times of India, 18-6-1941)

जपानने, १९४१ साली फेब्रुवारीत, जर्मन व इटलीच्या बाजूने दुसऱ्या महायुद्धात प्रवेश केला. त्या देशाने आपल्या लष्करी सामर्थ्यावर ब्रिटिश साम्राज्यातील अग्नेय आशियातील प्रदेश भराभर काबीज केले तेव्हां भारत, ब्रह्मदेश, सिलोन, सिंगापूर इत्यादी प्रमुख भागांच्या संरक्षणाची ब्रिटिश सरकारला भयंकर चिंता वाटू लागली. तेव्हां त्यांनी **प्रादेशिक सैन्य** भरतीचा जोर केला. साम्राज्यातील इतर देशांतून व भारतातून लाखो लोक लष्कर भरतीसाठी पुढे आले. त्यांना सर्व आघाड्यांवर पाठविण्यात आले. या लष्कर भरतींत अस्पृश्यांचा फारसा भरणा नव्हता; कारण स्पृश्य शिपाई अस्पृश्य शिपायांबरोबर काम करण्यास तयार नव्हते, त्यामुळे अधिकारी वर्ग अस्पृशांना आपल्या बटालियनमध्ये घेण्यास तयार नसत म्हणून सरकार त्यांना भरती करून घेत नव्हते. या सरकारी अन्यायाविरूद्ध महार सैनिक व अधिकारी यांनी जाहीर सभांतून खूप हकाटी केली; पण तिचा काही उपयोग झाला नाही. दुसऱ्या महायुद्धात जपानने उडी घेतल्यानंतर सरकारने महारांची पलटण उभारण्याचे जाहीर केले. तेव्हां जनता पत्राच्या २१–६–१९४१ च्या अंकात 'महारांची नवी पलटण, जिवावर बेतले म्हणजेच आमची आठवण होते' या मथळ्याखाली अग्रलेख लिहून, संपादकाने सरकारच्या गेल्या ५० वर्षांतील स्वार्थी व कृतघ्न कृत्याबद्दल खरपूस समाचार घेतला. अस्पृश्यांनी या संधीचा भरपूर उपयोग करून, लष्करी पेशांत नांव काढावे असाही सल्ला, सदर अग्रलेखात दिला होता.

दुसरे महायुद्ध सुरू झाले, तेव्हां हजारो महार तरुणांनी आम्हाला लष्करात घ्या, अशा अर्थाचे अर्ज सरकारकडे पाठविले. या विनंतीला सदन एरिया रिक्रूटिंग स्टाफ व त्यांचे प्रमुख कर्नल **के. ई. फ्रँक्स**, डी. एस. ओ. आणि असिस्टंट डायरेक्टर ऑफ रिक्रूटिंग साउथ, यांनी तावडतोब पाठिंबा दिला. त्यांनी पलटणीतील बीन लढाऊ सेवक म्हणून त्या महार तरूणांना निरनिराळ्या पलटणींत व पथकांत नोकरीवर ठेवले. १९४० मध्ये महार तरुणांच्या अँब्युलन्स रक्षक म्हणून दोन पलटणी उभारण्यांत

आल्या. महार रेजिमेंट तयार करावी, असा हुकूम मिलिटरी खात्याने १९४१ च्या सप्टेंबर मध्ये काढला, तेव्हां फर्स्ट महार बटालियन बेळगांव येथे १ ऑक्टोबर १९४१ ला उभारण्यांत आली. ही बटालियन बेळगावहून कामटी (नागपूर) येथे नेण्यात आली. सेकंड महार बटालियन, कामटी येथे १ जून १९४२ ला उभारण्यांत आली. तिसरी महार बटालियन, १ नोव्हेंबर १९४३ रोजी नौशेरा (वायव्य सरहद्द प्रांत) येथे उभारण्यांत आली. या प्रमाणे महारांच्या तीन बटालियन्स अस्तित्वात आल्या. त्यांचे रेजिमेंटल सेंटर, सागर (मध्य प्रदेश) येथे ठेवण्यांत आले. येथे बटालियन्सच्या नव्या शिपायांना सर्व प्रकारचे शिक्षण देऊन तयार करण्यांत येत असे. या तिन्ही बटालियन्सना दुसऱ्या महायुद्धात समरांगणावर जाण्याचा प्रसंग आला नाही. त्या अंतर्गत शांतता राखीत होत्या. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर **त्यांनी काश्मिरच्या समरांगणांत एवढी मर्दुमकी गाजवली की, लष्करी अधिकाऱ्यांनी व खुद्द सरसेनापतींनी महार सैनिक, हिंदी सेनेतील उत्कृष्ट लढवय्ये आहेत असे जाहीरपणे गुणगौरवपर उद्गार अनेक वेळा काढले.**

26. At the out break of this (World-War II) war, the MAHARS immediately started petitioning for a MAHAR unit to be raised. This petition was backed by SOUTHERN AREA RECRUITING STAFF, specially by colonel K. E. FRANKS, DSO, Assistant Director, of Recruiting South several thousands of MAHARS had again by now disappeared in labour and other units.

27. In 1940 an opportunity was given to them as special troops to ambulance units. Two troops were thus raised and were a great success.

28. In Sept. 41 sanction was received to start the MAHAR REGIMENT. The 1st Battalion of MAHAR REGIMENT was thus raised on 1st Oct. 41 at BELGAUM. This Bn later moved from BELGAUM to KAMPTEE for various reasons. There are now three Bns with a Regimental centre. The 2nd Bn was raised on 1st June 42 at KAMPTEE and the 3rd Bn was raised at NOWSHERA in the N. W. Frontier Province on 1st Nov. 43. The training company which formed the nucleus of the present Regimental centre was raised on 1st Oct. 1942.

29. All these Bns were war raised and as such they did not get the chance to go to the fighting areas. Although

their fighting qualities could not be tried in the world War II, the latest events show that the MAHARS are one of the finest soldiers in the Indian Army' (The MAHAR MG Regiment, Page 11).

दुसरे महायुद्ध संपल्यावर हिंदी लष्कराची पुनर्रचना कमांडर–इन–चीफ, फिल्ड मार्शल सर क्लॉड आचिनलेक यांनी केली. तेव्हा सर्व हिंदी लष्करातून दोन रेजिमेंटसना मिडियम मशिनगन रेजिमेंटस् म्हणून ठेवण्याचे ठरविले. त्यांत एक रेजिमेंट महारांची होती. या दोन्ही रेजिमेंटस्चे नामांतर इन्फंट्री बटालियन्समधून मशिनगन बटालियन्स-मध्ये १ ऑक्टोबर १९४६ ला करण्यात आले. (कित्ता, पा. ११)

पहिली व दुसरी महार बटालियन यांच्यात जे नवे महार तरुण भरती होतील त्यांना लष्करी शिक्षण देण्यासाठी कामठी येथे १ ऑक्टोबर १९४२ ला जे केंद्र सुरू करण्यात आले त्याचे नेतृत्व कॅप्टन **एफ. डी. मार्शल**, यांच्याकडे होते. या केंद्रातील शिक्षक दोन्ही महार बटालियन्स आणि फिफ्थ मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटल सेंटर यांतून घेतलेले होते. या शिक्षक कंपनीचे रूपांतर १ जून १९४३ रोजी महार ट्रेनिंग बटालियनमध्ये करण्यांत आले. या शिक्षण केंद्रात पहिले शिक्षक म्हणून सुभेदार मेजर **दतू यादव** हे फिफ्थ मराठा लाईट इन्फंट्री मधून घेण्यात आले. मेजर **मार्शल** यांना लेफ्टनंट कर्नल म्हणून बढती मिळाली व त्याच्या जागी लेफ्टनंट कर्नल **जी. ए. क्रॉफर्ड** हे फिफ्थ मराठा लाईट इन्फंट्रीमधून १ फेब्रुवारी १९४४ ला आले. १९४६ मार्चमध्ये फिल्ड मार्शल सर **क्लॉड ॲचिंनलेक** यांनी फर्स्ट महार बटालियन गरडाई, वजिरीस्तान येथे सांगितले की ही बटालियन मशिनगन रेजिमेंट म्हणून निवडण्याचे ठरलेले आहे. १ ऑक्टोबर १९४६ ला कामटीच्या शिक्षण केंद्राचे **'महार मशिनगन रेजिमेंट सेंटर'** असे पुनश्च नामांत्तर करण्यांत आले. लेफ्टनंट कर्नल **आर. एच. लो** यांनी त्याचे नेतृत्व स्वीकारले. महार बटालियनमध्ये महाराष्ट्रातील महार तरुणांची भरती होत होती. त्या भरतीला उत्तेजन द्यावे म्हणून हे रेजिमेंटल सेंटर १५ ऑक्टोबर १९४६ ला कामटीहून नगर जिल्ह्यातील आरणगांव येथे नेण्यांत आले. (कित्ता, पा. १३)

On December 24, 1947, enemy numbering between four to six thousand attacked our positions near Jhangar, the attack being premeded by heavy mortar and small arms

fire. It looked as if nothing could stop the onslaught of the tribesmen but the Mahars held their posts with matchless courage. In the hundreds of tribesmen were moved down by the devastating fire of the Mahar Machine-gunners who, when their ammunition was exhausted, fought the enemy in a hand-to-hand battle.

The bravery of this Battalion was recognised by the award of one Maha-Vir-Chakra and five Vir Chakras to its men. Their matchless courage and devotion to duty played a most important part in turning the tide of the battle at a critical moment.

## KEEN SPORTSMAN

Being a war-like people, the Mahars are keen sportsman. They like rough games like wrestling and tug-of-war. Delightful folk-dances dating back to ancient times are even today common among the Mahars and they continue to practice this art in their units. Some time ago, the staff and students of the staff-college, Wellngdon, wish to give a present to a selected unit as a gesture of their appreciation of its excellent work during the Kashir operations. Thus unique privilege was given to a battalion of the Mahar Regiment. The Staff-College sent an individual gift to each man and this was accompanied by a letter which read :
"Dear Comrade,

We greatly value you heroism and services during the Kashmir campaign. Our good wishes for your quick success are always with you. Please accept this small gift from us." (The Times of India, Sunday 26|10|52).

दुसऱ्या कौटुंबिक संमेलनाच्या प्रसंगी जे खेळाचे सामने झाले त्यात फुटबॉल रस्सी-खेच (टग-ऑफ-वार) व कुस्त्या हे प्रमुख खेळ होते. या खेळात तिसऱ्या बटालियनमधील महार जवानांनी जय मिळविले. तिसऱ्या बटालियनला 'चँपियन बटालियन' हे नांव देण्यात आले. (किस्ता, पा. ६८)

एक अधिकारी व दोन मशिनगन तुकड्या हे बराकपूरला २१–९–१९५३ ला पोहोचतील अशा बेताने पाठवून द्या, असा तावडतोबीचा हुकूम तिसऱ्या बटालियनच्या अधिकाऱ्यांना १८ सप्टेंबर ला मिळाला. बराकपूरहून कोरियाच्या रणक्षेत्रावर जे हिंदी

लष्कर पाठविण्याचे ठरले होते, त्यात तिसऱ्या बटालियन मधील एक अधिकारी व दोन तुकड्या यांचा समावेश करावयाचा होता. दोन तुकड्या व एक अधिकारी यांची निवड, त्यांची शरिरिक तपासणी आणि इतर सोपस्कार तातडतोब करून के. के एस. बक्षी यांच्या नेतृत्वाखाली दोन तुकडया (७५ जवान) अंबाला छावणीतून २० सप्टेंबरला रवाना करण्यात आल्या. २५–९–१९५३ला या तुकड्या कलकत्त्याच्या डमडम विमानतळावरून विमानाने कोरियाकडे गेल्या. भारतातून जवान व अधिकारी मिळून ५७५ लोक, पाच अमेरिकन लष्करी 'ग्लोबमास्टर्स' विमानांनी कोरियात नेण्यांत आले. कोरियात जनरल ऑफिसर कमांडिंग, कस्टोडियन फोर्स, १) मेजर जनरल. एस. पी. पी. थोरात, डी. एस. ओ. हे हिंदी लष्कराचे प्रमुख अधिकारी होते. ते दोन तुकड्यांना भेटण्यास आले, आणि त्या तुकड्यांना ब्रिगेडियर राजेंद्रसिंग पटेल यांच्या नेतृत्वाखाली कार्यान्वित केले. निरलष्करी भागांत शत्रूना न येऊ देणे, युद्ध कैद्यांना छावणीत आणणे व त्यांच्यावर पहारा करणे आणि प्रसंगोपात युद्धात भाग घेणे, ही कामे महार जवानांना देण्यांत आली. १ नोव्हेंबर १९५३ ला महार जवानांनी आपल्या बटालियनचा दहावा वाढदिवस साजरा केला तेव्हा महार रेजिमेंटचे कर्नल, मेजर जनरल एस. पी. पी. थोरात डि. एस. ओ. आणि दोन अधिकारी ब्रिगेडियर गुरुबक्षसिंग, डेप्युटी कमांडर, कस्टोडियन फोर्स आणि लेफ्टनंट कर्नल जी. के. करंदीकर, ए. ए. अँड क्यू, एम. जी. एच. क्यू, सी. एफ. १, हे समारंभास उपस्थित होते. कोरियातील सर्वस्वी प्रतिकूल असलेल्या वातावरणांत आपण भारतीयांनी शांतता प्रस्थापित करण्याचे कार्य हातात घेतलेले आहे आणि ते आपण यशस्वी करणे, हे आपले कर्तव्य आहे, आणि तुम्ही महार जवान या कर्तव्यात आघाडीवर रहाल अशी मी अपेक्षा करतो, अशा आशयाचे भाषण श्री. थोरातांनी केले. (कित्ता पान ६९–७०).

हिंदी सैनिकांची जेथे (कोरियांत) छावणी होती त्या भागाला 'हिंद नगर' हे नांव देण्यात आले होते. तेथूनच हिंदी जवानांच्या कार्यक्रमाचे हुकूम बाहेर पडत असत. यावेळी कांही प्रसंग इतके स्फोटक होते की त्यातून हिंदी जवान कसे निभावून निघतील, याबद्दल अधिकाऱ्यांना काळजी लागली होती. तीन प्रसंग तर विशेष महत्वाचे होते. एक प्रसंग युद्ध कैद्यांच्या छावणीवर महार जवान पहारा करीत असता एका कैद्याने दुसऱ्या कैद्याचा खून केला व त्याचे शव त्याने छावणीतच पुरले. या गुन्हेगाराला शोधून काढणे व त्याला सजा देणे क्रमप्राप्त होते. या छावणीत हजारो कैदी होते. त्यांच्यावर १७५ महार जवानांना पहारा करावा लागे. त्यांचा पहारा चालू असता हा खून झाला म्हणून गुन्हेगार शोधून काढणे ही जबाबदारीही त्यांचीच होती. त्यांच्या अधिकाऱ्याने वरिष्ठाकडून हुकूम मिळविला की, एकादा कैदी हल्ला करीत आहे अगर पळून जात आहे असे अंदाजाने समजले की जवानांनी त्यांच्यावर गोळ्या झाडाव्यात. मग त्यांत कदी मेला तरी त्याबद्दल जवानांना जबाबदार धरले जाणार नाही. महार जवानांनी

तो हुकूम सर्व कैद्यांना वाचून दाखविला आणि खूनी कैदी शोधून काढण्यासाठी सर्व कैद्यांना एकएकटे अधिकाऱ्यापुढे येऊन त्यांच्या प्रश्नांना उत्तरे द्यावीत व कोणी पळून जाण्याचा प्रयत्न केलाच, तर त्याला ठार करण्यांत येईल असे स्पष्टपणे सांगितले. कैद्यांची एक, एक नावे पुकारताच ते कैदी आपल्या तंबूतून बाहेर येऊन अधिकाऱ्यांच्यापुढे जबानी देत. असा हा क्रम चालू असता एक कैदी छावणीतून पळून जाण्यासाठी धावला, तेव्हां एक महार जवानाने त्याला एकाच गोळीत खाली लोळविले. हाच गुन्हेगार कैदी होता. चेअरमन, **एन. एन. आर. सी.**, ले. जनरल **के. एस. थिमय्या,** डि. एस. ओ. यांनी कॅप्टन **बक्षींना** पत्र पाठवून, या खुन्याला शोधून काढण्याच्या सहासी कृत्याबद्दल जवान व अधिकारी यांचे अभिनंदन केले.

(I was impressed by the manner in which all ranks conducted themselves during the operation for identification parade. The explosive situation was handled very well indeed. Please convey my appreciation to all ranks who participated in the operation." —The Mahar MG Regiment, page 71).

दुसरा प्रसंग १८–१ १९५३ चा. या वेळीही सुभेदार **सी. के. खंडारे** आणि **वीस महार जवान** यांनी युद्ध कैद्यांना अशाच गुन्ह्याबद्दल जाब विचारले व गुन्हेगार शोधून काढले. तिसरा प्रसंग २०–१–१९५४ चा बावीस हजार युद्ध–कैदी युनोच्या लष्करी अधिकाऱ्याकडे नेऊन पोहोचविणे, हे काम जवानांनी १८॥ तास खपून यशस्वी रीतीने पार पाडले. या कार्यात कैद्याना गडबड करण्यास जवानांनी वाव दिला नाही. हे काम अत्यंत चोख रीतीने बजावल्याबद्दल **जी. ओ. सी.** ने आभार प्रदर्शनाचा हुकूम हिंद नगरमध्ये प्रसिद्ध केला.

(I wish to thank each one of you for the magnificent manner in which you worked and behaved throughout this operation. Anyone who has taken part in a mammoth operation of this magnitude can justifiably take pride that he too had contributed to its success. I am confident that as a result of the import, humane and just treatment which you constantly gave to the P.W., they will remember you with gratitude. I shall remember their loud and prolonged cheers of "Sainara" (Good Bye) as they shook warmly by the hands while crossing the limits of HIND NAGAR. In the end I thank you again for the magnificent work you have done to date. JAI HIND". (The Mahar MG Regi-Ment, pages 71-72; GOC's order, dated 20-1-54, congratulat-

ing two platoons of 3rd Mahar Battalion, for handing over 22,000 non-repatriated prisoners of War in Korea to the U.N. Command in Korea in the most disciplined manner which evoked praises from other military officers also in Korea).

"I would like to take this opportunity to express my heart-felt joy for the operation which you, your JCOs and men have extended to all ranks of this Battalion during your associations with us in KOREA.

महार जवानांनी या युद्धकैद्यांना इतक्या प्रेमाने वागविले होते की, जेव्हां त्यांना 'हिंदनगरातून' जवानांनी युनोच्या लष्करी अधिकाऱ्यांच्या तांब्यात दिले जात असतां 'बरे येतो, नमस्कार आमुचा' असे म्हणून आपली कृतज्ञता त्या कैद्यांनी, महार जवानांना दाखविली. (किता पा. ७०–७३)

कोरियातील कामगिरी संपवून महार जवान, 'एस. एस. कॅप्टन हॉबसन' य ब्रिटिश बोटीने १६–२–१९५४ ला भारतात परत येण्यास निघाले. इतर भारतीय जवान दुसऱ्या चार बोटीतून निघाले. हाँगकाँग, सिंगापूर या मार्गाने बोटी आल्या त्या दोन्ही ठिकाणी तेथील भारतीयांनी, जवानांना मेवा मिठाई व फळे, बोटीवर जाऊन वाटली व त्यांचे अभिनंदन केले. मलायातील भारतीय वकील श्री. गोपाळ मेनन व त्यांच्या पत्नीने जवानांना भेटून त्यांचे अभिनंदन केले व फळे व मिठाई यांचा त्यांना अल्पोपहार दिला, सिंगापूरहून निघालेली बोट मद्रासला ५–३–१९५४ ला सकाळी पोहोचली. तेथे जवानांचे स्वागत करण्यासाठी मद्रासचे मुख्य मंत्री श्री. राजगोपालाचारी, मद्रास एरियाचे जी ओ सी, मेजर जनरल **सी. जे. कोटोच** आणि परदेशी वकील व मद्रासचे प्रमुख नागरिक हे सर्व बोटीवर उपस्थित राहिले. भारताचे पंतप्रधान यांनी जवानांच्या कामगिरीबद्दल प्रसंशा व अभिनंदन करणारे **जे सी ओ** ला पत्र पाठविले होते ते त्यांनी जवानांना वाचून दाखविले. वुमेन हॉस्पिटल कमिटीने जवानांचा सत्कार केला. नृत्य व गायन यांत मद्रासच्या प्रमुख कलावंतानी भाग घेतला होता. हा भव्य व मनोहरी स्वागत समारंभ पाहून आपल्या कार्याचे योग्य चीज झाले असे जवानांना वाटले (कित्ता पा. ७२–७३)

मद्रासहून जवानांचे गट आपल्या पलटणीच्या छावणीत ११–३–१९५४ पर्यंत जाऊन पोहोचले. (कित्ता पा. ७३)

भारतातील निरनिराळ्या भागातील उच्च लष्करी अधिकाऱ्यांनी जवानांचे अभिनंदन करणारी पत्रे त्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांना पाठविली. तिसऱ्या महार बटालियनमधील ज्या महार जवानांनी कोरियात उत्कृष्टपणे कामगिरी बजावली त्याबद्दल कोरियातून (हिंद नगर) ले. कर्नल **एम. आर. बुधवारे, एम. सी. कमांडर, सिक्सथ बटालियन, जाट रेजिमेंट** यांनी जे पत्र पाठविले त्यांतील एक उत्तारा असा होता :–

It is really a pleasure for me to review the past few months during which you all the worthy respresentatives of 3 MAHAR MG have shared our joys and hardships with us over here.

Kindly convey our thanks to your JCOs and men (The MG Regiment, Pages 73-74). A letter of congratulations from Lt. Col. M.R. BUDHWARE, M.C. Commander 6th Bn the JT Regiment, HINDNAGAR, Korea, to the office of 3 Mahar Bn., on the excellent work done by Mahar Jawans in KOREA.

तिसऱ्या महार बटालियनचे अधिकारी

**कमांडिंग ऑफिसर्स**

१) ले. कर्नल **आर. एन. डी. फ्रीयर** एम. सी.
१४ नोव्हेंबर ४३ ते २१ नोव्हेंबर ४४

२) ले. कर्नल **पी. सी. मिडलटोन** पी एस सी
२१ नोव्हेंबर ४४ ते २० नोव्हेंबर ४५

३) ले. कर्नल **एन. डी. फ्रीयर** एम्. सी.
२० नोव्हेंबर ४५ ते १३ फेब्रुवारी ४७

४) ले. कर्नल **खलीद जान**, १३ फेब्रुवारी ४७ ते २८ सप्टेंबर ४७

५) ले. कर्नल **हरि सिंग** पी. एस. सी., २० ऑक्टोबर ४७ ते १२ फेब्रुवारी ४९

६) ले. कर्नल **डी. एस. भंडारी** पी. एस. सी.
१३ फेब्रुवारी ४९ ते २६ जुलै ४९

७) ले. कर्नल **भाग सिंग** एम. एस. सी., २७ जुलै ४९ ते २३ डिसेंबर ४९

८) ले. कर्नल **एच. सी. टेलर**, २४ डिसेंबर ४९ ते २० एप्रिल ५४

९) ले. कर्नल **जि. के. करंदिकर** पी. एस. सी., २१ एप्रिल ५४

**सुभेदार मेजर्स**

१) **भोलाजी रांजणे**, १ नोव्हेंबर ४३ ते सप्टेंबर ४९

२) **सोनु सावंत**, ऑक्टोबर ५१ ते १ सप्टेंबर ५३

३) **बसवंत बंदसोडे**, १ सप्टेंबर ५३

(The Mahar M.G. Regiment, page 75).

२५ वी बटालियन (महार रेजिमेंट) आरगन टँक, बेळगाव येथे १ ऑगस्ट १९४२ ला उभारण्यांत आली. यांत २५ टक्के महाराष्ट्रीय आणि ७५ टक्के महार जवान होते. या बटालियनने सांताक्रुज, मुंबई येथे राहून डॉकयार्ड, मानखुर्द व बुचर बेटे यांच्यावर इतर महत्वाच्या सागरी किनाऱ्यावर पहारे केले. १३ एप्रिल १९४४ ला मुंबई डॉकयार्डस येथे स्फोट झाला व चोहोकडे आगी लागल्या. त्यावेळी आगीपासून सरकारी व खाजगी मालमत्ता वाचविण्याचे अचाट साहसाचे कार्य या बटालियनने केले. हे काम पाहून एक जनरलने उद्‌गार काढले की, 'कार्यनिष्ठेत महार जवान रजपुतांसारखे आहेत. १५ ऑगस्ट १९४५ ला 'यशोदिन' (व्हिक्टरी–डे) मुंबईत साजरा करण्यांत आला तेव्हां या बटालियनने मुंबईत सर्व भागात फिरून उत्तम बंदोबस्त ठेवला. १५ ऑगस्ट १९४५ ला ही बटालियन देवळालीला गेली. तेथे १ मार्च १९४६ ला या बटालियनला सांगण्यात आले की ही बटालियन बंद करण्यांत येणार आहे. कॅप्टन व्ही एन्. लिमये यांनी या बटालियनला देवळालीहून कामटीला नेले; आणि तेथे १५ मार्च पर्यंत बटालियन बरखास्त करण्याची सर्व कामे उरकून घेण्यात आली. या बटालियनमधील बरेच महार जवान व त्यांचे अधिकारी यांना महार मिडियम गन रेजिमेंटच्या इतर बटालियनमध्ये सामील करून घेतले. (कित्ता पा. ७६–७८).

**या २५ व्या बटालियनचे अधिकारी**

१) ले. कर्नल **व्ही' चँबियर** १ ऑगस्ट ४२

२) ले. कर्नल **एच. एस. आय पिअरसन** १९ सप्टें. ४२

३) ले. कर्नल **सी. बी. पुनाप्पा** २१ जून ४३

४) ले. कर्नल **आर. एच. लो.** २४ फेब्रुवारी ४६ ते १५ मे ४६

**सुभेदार मेजर**

१) ऑनरेबेल सब–मेजर **लाडकोजीराव भोसले**
१ ऑगस्ट ४२ ते जानेवारी ४६
बहाद्दूर ओ. बी. आय.

२) सुभेदार मेजर **रावजी सावंत** जानेवारी ४६ ते मे ४६

जम्मू आणि काश्मिरच्या समरभूमीवर मराठे आणि महार जवान शौर्याने' उत्साहाने आणि चिकाटीने लढले म्हणून त्यांना शत्रूंना खडे चारता आले, आणि दिगंत किर्ती मिळविता आली. मराठे जवान 'हर हर महादेव' व 'छत्रपति शिवाजी महाराज की जय' अशा विजयी घोषणा देत शत्रूवरर हल्ले करीत. महार जवानही या घोषणा करीत आणि शिवाय त्यांना लढण्यास स्फूर्ती देणारी आणखी एक घोषणा **'जय भीम'** ही होय! जम्मू व काश्मिर या समरांगणांत जे महार जवान कामसा आले त्यांची यादी खालील प्रमाचे :—

ROLL OF HONOUR

THOSE WHO DIED IN J. & K. OPERATION

| | | |
|---|---|---|
| 269 | Hav..... | RAWOO KAMBALE |
| 6015 | Hav..... | DADU PARANJAPE |
| 3625 | Hav..... | PANDURANGA RASAL |
| 267 | Hav..... | SEWAK JADHAV |
| 514 | Naik | BARKYA KAMBLE |
| 3508 | P\|L\|Nk. | MARUTI TAMBE |
| 4529197 | Sep. | YESHWANT KAMPLE |
| 4528471 | ,, | MARUTI SARJE |
| 6472 | ,, | GURUBALA SABLE |
| 6151 | ,, | TUKARAM KAMBLE |
| 7331 | ,, | SONYA POWER |
| 4528475 | ,, | SURYAJI HATE |
| 7367 | ,, | JANU TAMBE |
| 4528865 | ,, | GANGARAM MOHITE |
| 4529634 | ,, | NANA SONAWANE |
| 4530025 | ,, | BABU KHANDIZOD |
| 4529523 | ,, | KONDIBA AKHADE |
| 4528523 | Swpr. | BABU LACHMAN |

(The Mahar MG Regiment page 86)

खालील जवानांना शौर्याची कामे केल्याबद्दल सरसेनापतींची प्रशस्तीपत्रे मिळाली :—

RECEPIENTS OF C-IN-C's

COMMENENDATION CARDS
DURING PRE-PARTITION PERIOD

| | | |
|---|---|---|
| 22952–10 | Sub. | (Now Cap) RAO S. WANKHADE |
| 16767–10 | Sub. | PANDIT KHADTALE |
| 4531966 | Hav. | KRISHNA SONAWANE M.V.C. |
| 4528664 | Sep. | PUNDLIK MAHAR, Vr.C. |

—x—

RECEPIENTS OF MENTION-IN-DESPATCHES
CERTIFICATES IN J & K OPERATIONS

18687-10 Sub. BIKURAM GHATGE
46475-10 Jem. MARUTI KAMBLE
41 (NYA) Jem. ANANT SAWANT
4531828 Hav. MAHADEO MOHITE
4531813 ,, BHUJANGA KAMBLE
4531827 ,, RAMACHANDRA ALVE
4531972 ,, SAHADEV GHADGE
4531907 ,, BARKU JADHAV
4532379 ,, RAJARAM KENGALE
35 Naik BAPU KAMBLE
4532679 Naik RAMA KARAPKANDE
4531850 L|Naik SHRIPAT SALVI
4532532 Sep. APPA DHALU
(The Mahar MG Regiment, page 87).

१११ वी महार बटालियनने (१९१४-१८) खांद्यावरील पट्टा वापरला तो "111 MAHARS" या अक्षरांचा होता. १९४२–४६ च्या काळांत महार रेजिमेंटने जवानांच्या टोपीवर जो पट्टा वापरण्यासाठी घेतला त्यावर कोरेगांवचा विजयस्तंभ होता. त्याच्या दोन्ही बाजूना उतरत्या पट्यावर "कोरे" (उजवी बाजू) आणि "गांव" (डावी बाजू) आणि विजयस्तंभाच्या तळाशी "महार" ही अक्षरे वर्तुळाच्या एका भागात बसविलेली होती. हा बॅज **मेजर ईलमॉर्टल मॅन्स** या दुसऱ्या महार बटालियनच्या अधिकाऱ्याने तयार केला होता. (किता पा. ८९) महार रेजिमेंटसचे रूपांतर १ ऑक्टोबर १९४६ ला मिडियम मशिनगन रेजिमेंटमध्ये झाले. तेव्हां टोपीवरील वापरण्याचा बॅज तयार करण्यांत आला. त्यांत मध्यावर विजयस्तंभ, त्याला छेदणाऱ्या दोन म्यान केलेल्या तरवारी परस्परांना खालच्या बाजूस छेदणाऱ्या दाखवियात आल्या होत्या, टोकांना जोडणारी एक कमान तरवारीच्या म्यानांच्या टोकावर टेकलेली आणि त्या कमानींवर KORE (उजवी बाजू) व 'GAON' (डावी बाजू) ही अक्षरे कोरली होती. तळाच्या पट्टीवर 'The MAHAR REGIMENT' ही अक्षरे होती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जो बॅज टोपीसाठी तयार केला त्यांत स्तंभाच्या ठिकाणी उभी कट्यार काढली बाकीचे सर्व पूर्वी प्रमाणेच होते; मात्र वरील टोकांच्या कमानीवरील KORE ऐवजी 'यश' व GAON ऐवजी 'सिद्धी' ही अक्षरे घालण्यांत आली (किता, पा. ९०) या चार बॅजेसची चित्रे येणे प्रमाणे.




(1) १११ व्या महार बटालियने १९१४ ते १८ पर्यंत बापरलेली खांद्यावरचा बॅज.




(2) हा टोपीवरचा बॅज १९४२–१९४६ पर्यंत महार १११ बटालियनसने 'इन्फट्री रेजिमेंट' म्हणून काम केले त्या वेळी वापरला गेला. या बॅजचे डिझाईन २ न्याा महार रेजिमेंटचे अधिकारी मेजर **ईल मॉर्टलमनस** यांनी तयार केले होते. मध्य भागत कोरेगावचा विजयस्तंभ, ब्रिटिश व पेशवे यांच्या मध्ये झालेल्या लढाईत ब्रिटिशांच्या वतीने शौर्याने लढून विजय संपादन केलेल्या महार वीरांच्या स्मरणार्थ होता. (The Mahar MG Regiment p. 89).




(3) १ ऑक्टोबर ४६ मध्ये १ ल्या महार रेजिमेंटचे रुपांतर मिडियमगन रेजिमेंटमध्ये झाल्यावरचा टोपीवर लावायचा बॅज अशाप्रकारचा वापरात आला.



(4) (१५ ऑगस्ट १९४७ च्या) स्वातंत्र्यानंतर पेशव्यांवर मिळविलेल्या विजयाचे प्रतिक, ब्रिटिश सत्तेत कायम असणारा विजयस्तंभ बदलून त्या जागी कट्यार आली व "कोरेगांव" ऐवजी "यश सिद्धी" ही अक्षरे असलेला बॅज वापरात येऊ लागला आहे. हा बॅजचे डिझाईनने Regt. Centre केले.

ले. कर्नल घाशीराम यांनी सागर येथे ३० नोहेंबर १९५३ ला महार रेजिमेंटल सेंटरचे नेतृत्व स्वीकारले. त्यांनी सेंटरमध्ये उपयुक्त योजना सुरू केल्या. त्यांनी हिंदीत महार सैनिक संचलन गीत "महार सैनिक" हे स्वतः रचले व ::A Marching Song of MAHAR SAINIK" म्हणून प्रचारांत आणले. (कित्ता पा. २४)

ते गीत असे :—

## " महार सैनिक "

१

वीर शिवाजी के बालक हम,
हैं महार सैनिक हम, हम, हम।
ना मशिनगन मे ही कौशल,
निपुण सभी शस्त्रो में हम, हम।
वीर शिवाजी के बालक हम ॥

२

जन-सेवक हैं, सैनिक-वर हैं,
दृढ़ता शील दया के घर हैं।
मातृ-भूमि-सेवा-हित करते,
हम हरदम कर श्रम, श्रम, श्रम।
वीर शिवाजी के बालक हम ॥

३

चोह पड़ रही धूप कड़ी हो,
वर्षा की लग रही झड़ी हो।
आँधी या तूफान उठा हो,
चमक पड़े बिजली चम, चम, चम।
वीर शिवाजी के बालक हम ॥

४

तो भी कार्य न छोड़ें हम,
धर्म से मुँह न मोड़े हम।
कठिनाई से कभी न डरते,
आगे बढ़ते कदम-कदम।
वीर शिवाजी के बालक हम ॥

५

पर नारी माँ-बहिन हमारी,
उनकी रक्षा के प्रणधारी।
तजे कुसंगति; संगति प्यारी,
धर सहन शक्ति हम, हम, हम।
वीर शिवाजी के बालक हम ॥

६

फैशन त्याग सादगी लावें,
व्यसनोको हम दूर भगावे।
सैनिक "रमतेराम" जतावे,
हृदिलै मानवता हम, हम, हम।
वीर शिवाजी के बालक हम ॥

७

विद्या धारण ध्येय हमारा,
जन–सेवा संकल्प हमारा।
ब्रह्मचर्य में नित रत रहकर,
रहें सत्य पर दृढ़ हम, हम, हम।
वीर शिवाजी के बालक हम ॥

८

महार सैनिक को अति प्यारा,
मरून रंङ्गका ध्वज यह न्यारा।
सैनिक–शक्ति प्रबलता द्योतक,
झंडा उँचा रहे हमारा —

९

जन–सेवक हैं सैनिक–वर हैं,
दृढता शील दया के घर हैं।
मातृ–भूमि–सेवा–हित करते,
हम हरदम कर श्रम, श्रम, श्रम
वीर शिवजी के बालक हम ॥

(किता पा. ९६)

महार रेजिमेंटच्या शौर्याची कीर्तीदुंदुभी परदेशांतही वाजू लागली. स्टाफ कॉलिज, वेलिंग्टन (लंडन) कॉलिजचे महार रेजिमेंटच्या अतुल पराक्रमाबद्दल अभिनंदन करून प्रत्येक सैनिकाला एक एक नजराणा पाठविला. त्यांनी रेजिमेंटला अभिनंदनपर पत्रही लिहिले. असा मान यापूर्वी कोणत्याही पलटणीला मिळालेला नव्हता. महार रेजिमेंटने आपले नांव भारताच्या इतिहासात उज्वल व अजरामर केले !!

१ ऑक्टोबर १९५५ रोजी सागर (मध्यप्रदेश) येथे महार रेजिमेंटमधील काश्मिर लढ्यांत जे महार सैनिक व अधिकारी रणांगणांत कामास आले; त्यांचे स्मारक म्हणून खेळाचे आखाड बांधण्यांत आले. त्याचे उद्घाटन **जनरल एस. पी. पी. थोरात** यांच्या हस्ते करण्यांत आले. (टाईम्स, ३–१०–५५).

चीन व पाकिस्तान या देशांनी भारतीय प्रदेशावर आक्रमण केले तेव्हां भारताच्या जवानांनी मोठ्या धैर्याने या शत्रूंबरोबर मुकाबला केला. त्यावेळी अनेक लष्करी अधिकारी आणि जवान यांनी पराक्रमाची शर्थ केली. या शूर वीरांमध्ये महारही होते. त्यांच्या पराक्रमाची जी कांही थोडीबहूत माहिती वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध झालेली आहे त्यापैकी कांही माहिती मी येथे देत आहे :—

१९६२ आणि १९६३ सालांत महार वीरांनी चीनच्या विरुद्ध ज्या धैर्याने लढे लढविले, त्याबद्दलच्या अनेक रोमांचकारक सत्यकथा व दंतकथा महाराष्ट्रीय समाजात प्रसृत आहेत. सत्यकथेबद्दलचे दोन वृत्तपत्रीय पुरावे मी येथे देत आहे:–

**१) बाजी प्रभूच्या जिद्दीने बेफाम लढलेला**
**वीर हवालदार कांबळे**
**झुंजार वीरांचा राष्ट्रपतींकडून गौरव**

दिल्ली, दि. १०—नेफामधील सेला उतारावर लढणाऱ्या मिडियम मशिनगन तुकडीचे नेते हवालदार **गोविंद कांबळे** (महार रेजिमेंट) यांनी आपल्या मर्दुमकीची कमाल करून रणांगणावर देह ठेवला. त्यांच्या असामान्य शौर्याबद्दल राष्ट्रपतींनी त्यांना अशोक चक्र (मरणोत्तर) दिले आहे.

नेफामधील हेनकर ठाण्याचे प्रमुख **पंढरीनाथ अनंत रेगे** (असाम रायफल्स) यांनी २० ऑक्टोबरला अवघ्या १०० सैनिकासह ५०० चिन्यानी चढविलेल्या हल्ल्याला निकराने तोंड दिले व प्रत्यक्ष हातघाईच्या लढाईनंतरच आपल्या सैनिकांनी हे ठाणे सोडले. या लढाईत मेजर **रेगे** यांनी जे असामान्य धैर्य व उच्चप्रतिचे नेतृत्व दाखविले याबद्दल त्यांना अशोक चक्र देण्यात आले आहे.

नेफा आघाडीवर असामान्य शौर्य दाखविल्याबद्दल फ्लाईट लेफ्टनंट **कृष्णपंत सेनी, जी. डी. पायलट** सेकंड लेफ्टनंट **सुरेंद्रनाथ टंडण** गढवाल रायफल्स, हवालदार **मलकियत सिंग**, पंजाब रेजिमेंट (मरणोत्तर), लान्स नाईक **हस्तबहादूर गुरुंग**, आसाम रायफल्स, रायफल्समन **बाजीराम थापा**, असाम रायफल्स, आणि रायफल्समन **पूर्णबहादूर तामंग**, असाम रायफल्स, यांनाही अशोकचक्र देण्यास मान्यता दिली.

## २) शौर्याचा मूर्तिमंत पुतळा

नेफामधील सेला उतारावर लढणाऱ्या मिडियम मशिनगन्स तुकडीचे नेतृत्व हवालदार **कांबळे** यांच्याकडे होते. १८ नोव्हेंबर १९६२ रोजी चिनी सैन्याने, या विभागावर जोरदार हल्ला केला, शत्रूच्या मशिनगन्समधून आगीचा वर्षाव होत असतांही हवालदार **कांबळे** या खंदकातून त्या खंदकाकडे धाव घेऊन जवानांना मार्गदर्शन करीत होते. प्रत्यक्ष समोर टाकलेला शत्रू, मशिनगन्समधून होणारा गोळ्यांचा वर्षाव त्यांच्या खिजगणतीतच नव्हता. परंतु अखेर त्या घातकी शत्रूच्या गोळ्या, त्या शूर वीराच्या दोन्ही पायांत घुसल्या ! परंतु हा वीर कांही लेचापेचा नव्हता, पाय कामातून गेले तरीही हवालदार **कांबळे** धडपडत धडपडत व असह्य यातना आनंदाने सोशीत मिडियम मशिनगन्सच्या खंदकात परतले. नंतर कंपनीला माघार घेण्यास सांगण्यात आले, त्यावेळी त्यांनी आपल्या कंपनीतील जवानांना माघार घेता यावी म्हणून शत्रूवर गोळ्यांचा वर्षाव चालूच ठेवला. जवान सुखरूप माघारी वळले; परंतु असे करीत असतां भारतमातेचा हा सुपुत्र मात्र झालेल्या जखमांमुळे धारातीर्थी पडला.

मेजर **पंढरीनाथ अनंत रेगे** नेफामधील हेनकर ठाण्याचे प्रमुख होते व त्यांचेपाशी सुमारे १०० जवान होते. २० ऑक्टोबर १९६२ रोजी या ठाण्यावर सुमारे ५०० चिन्यांनी हल्ला केला. रेगे यांच्या नेतृत्वाखालील या १०० जवानांनी आपल्या शक्तीच्या पांचपट असलेल्या या चीनी सैन्याबरोबर अगदी निकराचा लढा दिला. शत्रूला या ठाण्यावर चार वेळा हल्ला करावा लागला आणि कित्येक चिनी सैनिक बळी

द्यावे लागले. सरते शेवटी हातघाईची लढाई झाल्यानंतरच आपल्या जवानांनी हे ठाणे सोडले. शत्रूला येथे बराच काळ थोपवून धरल्यामुळे दळणावळणाची साधने बराच काळ चालू ठेवता आली. या लढाईत **मेजर रेगे** यांनी असामान्य धैर्य आणि उच्च प्रतीचे नेतृत्व दाखविले" (नवशक्ती, शनिवार ११-१-१९६३, पा. ५)

ज्या भारतीय जवानांनी मर्दुमकीची शर्थ केली त्यांना १) महावीर चक्र २) अशोक चक्र वर्ग १, ३) वीर चक्र ४) अशोक चक्र वर्ग २, आणि ५) अशोक चक्र वर्ग ३; असे महा सन्मानदर्शक पदके देण्याचा निर्णय राष्ट्रपतींनी घेतला. ही पदके कोणला द्यायची त्यांची नांवे जाहीर करण्यात आली. त्यांत **वीरचक्र** ज्यांना द्यावे त्यांच्या यादीत मेजर **पंढरीनाथ आनंद रेगे** आणि हवालदार **गोविंद कांबळे** (मयत) यांची नावे आहेत. कच्छ युद्धातील वीरांचा गौरव करण्यासाठी राष्ट्रपतींनी २९ जून १९६५ ला जी घोषणा केली तींत पहिल्या महार बटालियनमधील हवालदार **गोपीनाथ भिंगारदिवे** यांना तिसऱ्या श्रेणीत किताब **वीरचक्र देण्याचे जाहीर** करण्यात आले. (नवशक्ती, ३०-६-१९६५, पा. १)

महार रेजिमेंटला ३ फेब्रुवारी १९७० ला सागर (मध्यप्रदेश) येथे राष्ट्रपतींच्या हस्ते ध्वज अर्पण करण्याचे वृत्त 'नवशक्ति' पत्राने २९ जानेवारी १९७० च्या अंकात (पा. ६) प्रसिद्ध केले; तेव्हा सदर पत्राने "सागर येथे भूदलाच्या महार रेजिमेंटमधील शिक्षण पूर्ण केलेल्या ताज्या दमाचे जवान राष्ट्रध्वजाचा शेव हातात घेऊन राष्ट्रनिष्ठेची शपथ घेत असतांना घेतलेले हे छायाचित्र आहे" असा खुलासा करून ते छायाचित्र प्रसिद्ध करून खालील मजकूर प्रसिद्ध केला :—

**"महार रेजिमेंटला ३ फेब्रुवारी रोजी राष्ट्रपतीच्या हस्ते ध्वज अर्पण केला जाणार.**

**मध्यप्रदेशातील सागर येथे होणारा समारंभ**

(आमच्या प्रतिनिधीकडून)

सागर (मध्यप्रदेश, दि. २८—येत्या दि. ३ फेब्रुवारीचा दिवस हा भारतीय सेनादलातील तरुण महार रेजिमेंटच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनी नोंदला जाईल. त्या दिवशी येथील एका थाटाच्या समारंभात राष्ट्रपती **डॉ. व्ही. व्ही. गिरी** हे या शूर व धाडसी महार रेजिमेंटला (नवे नाव कॉस्मॉपॉलिटन) ध्वज अर्पण करणार आहेत.

भारतीय सेनादलातील महार वा कॉस्मॉपॉलिटन, हा बहुमान मिळविणारी सर्वात तरुण रेजिमेंट आहे. तसेच महारांना राष्ट्रपतींनी ध्वज देण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

## दुर्मिळ बहुमान

**राष्ट्रपतींकडून ध्वज दानाचा सन्मान मिळणे याचा अर्थ, युद्ध व शांततेच्या काळांत एखाद्या रेजिमेंटने केलेल्या बहुमोल सेवेला, सेनादलाच्या सर्वोच्च अधिकाऱ्याने विशेष मान्यता देणे, असा होतो, आणि महार रेजिमेंटच्या अल्पकालीन इतिहासात त्या रेजिमेंटने केलेले पराक्रम हे कोणत्याही रेजिमेंटला भूषणावह वाटणारे आहेत.**

तसे पहाता महार रेजिमेंटचा जन्म १९४१ च्या ऑक्टोबर महिन्यांतील असला तरी त्यांची परंपरा फार जुनी आहे. अगदी शिवाजीच्या काळापासून व त्यानंतर ब्रिटिशांच्या नेतृत्वाखालील बॉम्बे नेटिव्ह इन्फंट्रीमध्ये महारांनी निष्ठेचे व पराक्रमाचे अपूर्व दर्शन घडविले आहे.

## आधुनिक इतिहास

महारांची वेगळी बटालियन म्हणून पहिला उल्लेख १९१७ सालच्या जुलैमध्ये केलेला आढळतो. त्या वेळी तथाकथित "११ महार बटालियन" निर्मिण्यांत आली. त्याच दरम्यान चालू असलेल्या पहिल्या जागतिक युद्धात अखेरच्या पर्वातील महार बटालियनची प्रशंसनीय कामगिरी लक्षांत घेऊन ती बटालियन '७१ व्या पंजाब फलटणींत' समाविष्ट करण्यात आली.

स्वातंत्र्योत्तर काळांत महार रेजिमेंटच्या स्वरूपात खूपच बदल झाला आहे. आज या रेजिमेंटमध्ये महारापेक्षा महारेत्तरांचीच भरती अधिक आहे आणि हे भारतातील एकात्मता घडवून आणण्यात भारतीय सेनादलाने बजावलेल्या कामगिरीचे एक महत्वाचे प्रतीक आहे.

## अपूर्व कामगिरी

१९४६ मधील गोष्ट! त्यावेळी इन्फट्री रेजिमेंट या नावाने ओळखल्या जाणाऱ्या महार रेजिमेंटने सत्तांतराचे वेळी नागरी अधिकाऱ्यांना सहकार्य करून सुमारे ४० लाख निर्वासितांना, प्रतिकूल परिस्थितीत अत्यंत सुरक्षितपणे भारतात आणण्याची अवघड कामगिरी यशस्वीरित्या पार पडली आहे.

यानंतर १९४७ मधील पाकचे काश्मिरवरील आक्रमण, १९६२ मधील चीनचे भारतावरील आक्रमण या प्रत्येक वेळी महार रेजिमेंटने गाजवलेला पराक्रम अधिकाऱ्यांच्या प्रशंसेला पात्र ठरत आहे.

आतापर्यंत या रेजिमेंटने केलेल्या कामगिरीबद्दल त्या रेजिमेंटला दोन महावीर चक्रे; ११ वीर चक्रे; दोन शौर्य चक्रे; व इतर अनेक पारितोषके मिळाली आहेत.

१ डिसेंबर १९४८ पासून 'महार रेजिमेंटल सेंटर' सागर येथे असून सध्या तेथे नव्या रिक्रुटांना नऊ महिन्यांचे शिक्षण देण्यात येते.

येत्या दि. ३ फेब्रुवारी रोजी **'ध्वज अर्पण'** समारंभानिमित्त या रेजिमेंटच्या जुन्या निवृत्त सैनिकांचे एक संमेलन भरविण्यांत येणार असून त्याला काही हजार लोक उपस्थित रहातील अशी अपेक्षा आहे.

रेजिमेंटमधील जवानांत भावनात्मक ऐक्य वाढीला लागण्यासाठी येथे एक 'ज्ञान मंदिर' म्हणून प्रार्थना स्थान निर्माण करण्यात आले आहे. दुबळे झालेले जवान व त्यांचे कुटुंबीय यांच्या साहाय्यासाठी रेजिमेंटने पुर्नवसनाचे एक कार्य हाती घेतले असून त्या दृष्टीने कुक्कुट पालन केंद्र व गवळीवाडा चालविण्यात येत आहे. आणखी एक कल्याण-योजना म्हणून शिक्षण विषयक सोयी व सवलती निर्माण करण्याचा मानस आहे. परंतु अपुऱ्या निधीमुळे ती योजना इतक्यांत फलद्रुप होणे कठीण दिसते' (नवशक्ति, २९–१–१९७०, पा. ६)

राष्ट्रपति **श्री. वराह व्येंकट गिरी** यांनी सागर येथे महार रेजिमेंटला ३ फेब्रुवारी १९७० ला खास भरविलेल्या मोठ्या समारंभात ध्वज दिला, त्याचे वृत्त 'दी टाईम्स ऑफ इंडियाच्या' ४ फेब्रुवारीच्या अंकात पा. ८ वर दिलेले होते ६ फेब्रुवारीच्या अंकात (पा. १६) टाईम्सने ध्वजार्पण समारंभाचा फोटो दिलेला होता. रेजिमेंटचे जनरल आणि कर्नल व अनेक रणक्षेत्रांवर अतुल पराक्रम करून दाखविणारे महार सैनिक आणि अधिकारी ३ फेब्रुवारीच्या समारंभात उपस्थित होते. महार लोकांनी, शिवाजीचे सैन्य, आणि ब्रिटिशांचे सैन्य, आणि स्वातंत्र्योत्तर कालांत, भारतीय सैन्य, यांच्यात फार मोठ्या मर्दुमकीची कामे केली. याबद्दलचे गौरवपूर्ण उल्लेख राष्ट्रपतीनी आपल्या भाषणांत केले. **या रेजिमेंटमध्ये जरी सर्व धर्मांचे व प्रांताचे शिपाई आहेत तरी बहुसंख्य शिपाई महार जातीचे आहेत असा खुलासा राष्ट्रपतींनी केला.** ६ फेब्रुवारी १९४८ च्या लढाईत **कृष्णा सोनावणे** या महार सैनिकाने ७०० पाकिस्तानी हल्लेखोर एकट्याने ठार केले, आणि स्वतःच्या अंगात पाकिस्तानी शत्रू सैनिकांच्या गोळ्या शिरल्या असतांना त्याने पाकिस्तानी आक्रमकांना थोपवून धरण्यासाठी लढत लढत प्राणार्पण केले व भारतीय सैन्याचे एक महत्त्वाचे ठिकाण सुरक्षित ठेवले, याचाही राष्ट्रपतींनी उल्लेख केला. हा लढवय्या **आपल्या रेजिमेंटला वीर चक्र मिळवून देणारा पहिला महार सैनिक होय! ते वीरचक्र त्याला मृत्यूनंतर देण्यात आले.** १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाल्यानंतर पाकिस्तानातून भारतात निर्वासितांना आणताना व कोरिया, कांगो वगैरे देशांत शांतता प्रस्थापित करण्याचे जे कार्य या रेजिमेंटने केले त्याबद्दल आणि १९४७–४८ च्या काश्मिर युद्धात, १९६१ च्या गोवा मुक्तिसंग्रामात, १९६२ च्या लडाख व नेफा संग्रामात आणि १९६५ च्या कच्छ, सियालकोट व लाहोर या संग्रामात महार शिपायांनी जे पराक्रम गाजविले, त्याबद्दलही राष्ट्रपतींनी गौरवाचे उद्‌गार काढले. हा ध्वज गडद चेरी-फळाच्या (मरून) रंगाचा असून त्यावर रुपेरी दोऱ्याने बंदुकांचे भरतकाम केलेले होते. हे वृत्त असे :–

"PRESIDENT PRESENTS TO COLOURS TO MAHAR REGIMENT

SAGAR, February 3 : Mahar, one of the youngest of the youngest of the Indian Army received colours from the President, Mr. V. V. Giri, at an impressive function here today.

President at the function were array of generals and colonels of the Regiment and valiant officers of the Mahars who had distinguished themselves in several battles.

Mr. Giri said that the Regisment consisted of men from almost all the states and religions in the country apart from a substantial number of Maharas from Western India. Its career was replate with acts of heroism, gallantry and devotion to duty which anyone could be justifiable proud. The battalions of the regiment had served with distinction during the Jammu & Kashmir operations in 1947-48, liberation of Goa in 1961, in a Ladakh and NEFA in 1962 and Kuach and in the Sialkot and Lahore Sectors in 1965.

The President said that the contigents of the regiment acquitted themselves will in their foreign assignments in Korea and Congo and brought credit not only to tthe regiment but also to the Indian army and the country. They rendered valuable service in the maintenance of law and order whenever they were called upon by the civil authorities to do so, particularly country and in Nagaland. Thus in war and peace, their record was second to none and was all the more enviable for a young regiment.

PROUD RECORD

Mr. Giri hoped that the colours which the regiment received would inspire its men to attain greater glory. It was confident that the Jawans of the Mahar would not consider any sacrifice too great to uphold the honour of their colours.

Maj.-Gen. K. V. Krishna Rao explained to press the history and the proud record of the Mahars.

The Mahar soldiers served with distinction in Shivaji's army and letter in the Bombay Native Infantry in July 1917. A battalion of the Mahars, called 111 Mahars, was raised and it saw action in the dying phase of Warld War I. It was later amalgamated with the 71st Punjab Regiment.

The Mahars hoisted their own regimental flag on October 1, 1941, when the last battalion was raised. Soon after some of them served in Iran and Iraq.

## GALLANT ACTION

On February 6, 1948, an unassuming Mahar non-commissioned officer, N. K. Krishna Sonawala (Sonawane), inflicted 700 casualties on the Pakistan raiders and saved a vital position although he was himself severely wounded. He was the first Mahar to have won Vir Chakra for the regiment. Lt. Col. (now Colonel) C. S. Sangha was also decorated with Mahavir Chakra for the commendable courage and leadership during the war against Pakistani.

The regiment has also received 11 Vir Chakras in its young life. It was constituted into an infantry only in 1963-64.

Last year, the regiment was awarded a dull cherry backle and other special items of dress by the Chief of the Army Staff in recognition of its distinguished service in war and peace.

The colours of the regiment is dull cherry. It is embroidered with guns in silver thread'. (The Times of India 4-2-1970, page 8).

**व्हिक्टर लॉंगर** यांचा दी टाईम्स ऑफ इंडिया मॅगेझिन, ता. २६ जानेवारी १९६९ पा. १ यात 'The Rise of The Indian Army' हा लेख प्रसिद्ध झाला होता. त्यात त्यांनी हिंदी सैनिकांचे पोषाख वेळोवेळी कसे होते यांची सहा चित्रे दिली होती. ती १७७३ मऱ्हाट्टा सिपॉय, १८०१ मधील **नाईक**, बाँबे ग्रेनेडियर बटालियन (युरोपियन), १८३० मधील मद्रास शिपॉय, १८९० मधील प्रायव्हेट, ९ वी बेंगॉल इंफन्ट्री, १९०४ मधील हविलदार मेजर, २५ वी पंजाबीज आणि १९१२ मधील कलर हविलदार, ९५ वी रसेल्स इन्फट्री यांची होत. १७७३, १९०४ आणि १९१२ ची युरोपियन पोषाख आणि डोक्यास मराठी फेटा या स्वरूपाची होती.

लष्करातील घटक अनेक आहेत त्यांच्या बद्दलची माहिती मेजर सी. एल. प्राऊडफूट यांनी 'know your Military Terms. या शीर्षकाखाली २३ डिसेंबर १९६२ च्या टाइम्स ऑफ इंडियाच्या अंकात दिली होती. त्या लेखाचा सारांश असा :—

| | |
|---|---|
| १) सेक्शन :– | ८ ते १० शिपाई यांची तुकडी सिनिअर एन. सी. ओ. (Non-commissioned officer) प्रमुख अधिकारी |
| २) प्लटून :– | २५ ते ३५ शिपाई (३ ते ४ सेक्शन) ज्युनिअर ऑफिसर प्रमुख अधिकारी |
| ३) कंपनी :– | ८० ते १२० शिपाई (३ ते ४ प्लटून्स) कॅप्टन किंवा मेजर, प्रमुख अधिकारी |
| ४) बटालियन :– | ४०० ते ८०० शिपाई. (४ ते ६ कंपन्या) लेफ्टनंट कर्नल प्रमुख अधिकारी. बटालियन ही पायदळाची लढाऊ घटक होय. |
| ५) ब्रिगेड :– | ४,००० ते ५,००० शिपाई, ब्रिगेडियर प्रमुख अधिकारी ब्रिगेडमध्ये शासन भाग, तोफखाना भाग, आणि शस्त्रागार भाग यातील कांही लोक असतात. |
| ६) डिव्हिजन :– | १२,००० ते २०,००० शिपाई (तीन ब्रिगेडस) मेजर जनरल प्रमुख अधिकारी. |
| ७) कोअर :– | तीन डिव्हिजनस. लेफ्टनंट जनरल प्रमुख अधिकारी. |
| ८) आर्मी :– | तीन कोअर्स. सिनियर जनरल प्रमुख अधिकारी, एखाद्या देशांत बऱ्याच आर्मीज असतात. |
| ९) आर्मर :– | टॅंक्स व आर्मड कार्स. प्रत्येकात एक मोठी तोफ आणि एक अगर दोन मशीन गन्स असतात. |
| १०) सिग्नलस :– | वायरलेस आणि टेलिफोनन्सच्या सहाय्याने रणभूमीवरील अधिकाऱ्यांना संदेश व लेखी खलिते पाठविणारा विभाग. |
| ११) इंजिनिअर्स :– | माईन फिल्डस तयार करणे, शत्रूंच्या माईन फिल्डस् नष्ट करणे, रस्ते पूल तयार करणे, रेल्वे लाईन्स घालणे, पाणी पुरवठयाची साधने तयार करणे. |

१२) लॉजिस्टिक्क :- अन्नसामुग्री, हत्यार पुरवठा आणि संदेश पोहोचविणे, या संबंधी कामे करणारा विभाग.

१३) पिकेट :- संरक्षणाचे दृष्टीने अनुकूल अशा ठिकाणांवर (विशेषतः टेकडयांवर) लहान टोळ्या टेहाळणीसाठी ठेवणे.

१४) पेट्रोल :- शत्रूच्या हालचालीची माहिती मिळविण्यासाठी, अगर शत्रूच्या ठिकाणावर छापे घालण्यासाठी, अथवा विशेष महत्त्वाच्या कामगिरीबद्दल पाठविलेले लोक.

१५) हत्यारे :- मॉर्टर (बाँब दूर फेकणारे), मशिनगन्स, एम्. एम्. जी. (मिडियम मशिनगन), लाईट मशिनगन (एल. एम्. जी.) सब मशिनगन, रायफल, ग्रेनेड, बझूका, आणि रेकॉइल लेसगन.

—x—

# खंड ९ वा

## प्रकरण ९ वे

# गांधी–जीना वाटाघाटी

क्रिप्स योजना सर्व पक्षांनी नाकारल्यानंतर हिंदी राजकारणांत, पुढे काय ? असा प्रश्न उपस्थित झाला. लीग आणि काँग्रेस यांच्यात बोलणी व्हावीत, ऐक्य व्हावे आणि एकमुखाने सर्व राजकीय पक्षांनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी ब्रिटिश सरकारकडे करावी, असे विचारी राजकीय पुढाऱ्यांना वाटू लागले. या बाबतीत पुढारी सर्वांशी गुप्तपणे चर्चा करू लागले. ही बातमी दिल्लीत पसरली तेव्हां ती बाबासाहेबांना समजली. त्या बातमीबद्दल व तितून काय निपन्न होईल ते याबद्दलचा कानोसा घेण्यासाठी, आणि इतरही कामासाठी बाबासाहेब दिल्लीहून मुंबईला आले. ते बोरीबंदर स्टेशनवर मंगळवार दिनांक ३–९–४४ ला उतरले. टाईम्स ऑफ इंडियाच्या प्रतिनिधीने त्यांची मुलाखत बुधवारी ४–९–४४ ला घेतली. **गांधी–जीना** यांच्या वाटाघाटीबद्दल बाबासाबांचे मत त्याने विचारले. तेव्हां बाबासाहेब म्हणाले, या वाटाघाटी फिसकटतील. याचे कारण दोघेही कमालीचे हट्टी आहेत. गांधीजींनी जीनांना भेटण्याची इच्छा प्रदर्शित करणारे पत्र गुजराथीत पाठवून उद्गार काढले की, जीना हे मुळचे लोहाना (हिंदू) आहेत व त्यांना गुजराथी भाषा येते. वाटाघाटीची बोलणी आम्ही गुजराथीतून करू. ही बातमी प्रसिद्ध झाली तेव्हा मी ओळखले की वाटाघाटी फिसकटणार. या वाटाघाटी फिसकटण्यास इतरही कारणे आहेत. वाटाघाटी, पाकिस्तान निर्मिती गृहीत धरून केल्या जातील. ही निर्मिती श्री. राजगोपालाचारी यांच्या पाकिस्तान निर्माणाच्या योजनेप्रमाणे व्हावी, असा गांधीजींचा दावा होता. या योजनेतील मुख्य भाग म्हणजे, लीगने स्वातंत्र्याला पाठिंबा द्यावा, म्हणजे काँग्रेस, पाकिस्तान निर्मितीची राजगोपालाचारीची योजना धसास लावील. या मुद्यावर जीना स्वातंत्र्याला पाठिंबा देणे कसे शक्य आहे ? त्यांत त्यांना खात्रीलायक असे काय वाटेल ? लीगने काँग्रेसशी तात्पुरते सरकार तयार करण्यास सहकार्य करावे अशी राजगोपालांच्या योजनेत तरतूद आहे. ही अट जीना कसे स्वीकारतील ? ती

काँग्रेस पाळील, याची काय खात्री ? तात्पुरते सरकार तयार करतांना पाकिस्तान निर्मितीची अट तुम्ही पाळा, असे जीनांनी विचारले तर काँग्रेसला तसे करणे शक्य आहे काय ? कारण हे तात्पुरते सरकार हे स्वयंसिद्ध असणार. ही अट पाळण्यास भाग पाडणारी उच्चतम कोणती शक्ति आहे ? तिसरे कारण असे की, राजगोपाल-चारींच्या योजनेत पाकिस्तान व हिंदुस्थान यांच्यात संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, जकाती वगैरेबद्दल तह व्हावा असे कलम आहे. हे कलम पाळणे हे पाकिस्तान निर्मितीनंतर. पण पाकिस्तान निर्माण होईलच, याची जीनांना, गांधीजी अगर काँग्रेस हे अगाऊ, खात्रीपूर्वक वचन कोणत्या आधारावर देऊ शकतील ?

या होणाऱ्या वाटाघाटींत मुख्य प्रश्नांसंबंधी स्पष्ट खुलासा गांधी अगर जीना यांनी केलेला नाही, ही विशेष नवलाची गोष्ट आहे. (१) मुस्लिम लीगचा पाकिस्तानचा ठराव हा काँग्रेसला मान्य आहे, असे काँग्रेसने स्पष्ट जाहीर केलेले आहे काय ? (२) लीगच्या बाहेर जे मुसलमान आहेत त्यांच्या पाकिस्तानाबद्दलच्या मताला लीग किंवा काँग्रेस मान देते काय ? (३) पाकिस्तानच्या सीमा, पंजाब व बंगाल यांच्या सध्याच्या सीमासारख्या रहातील की, वंशभिन्नता तत्वावर त्या आधारिल्या जातील ? (४) लाहोरच्या ठरावात 'जरूर तर सीमांच्या बाबतींत योग्य ते फेरफार करता येतील, असे म्हटले आहे याचा अर्थ काय ? या सीमाबद्दलची योजना लीगकडे आहे काय ? (५) मध्यंतरीच्या काळांत पाकिस्तान स्वतंत्र्य किंवा सार्वभौम राष्ट्र होईल, असे लाहोरच्या ठरावात म्हटले आहे, त्याचा अर्थ काय ? (६) जीनांना बंगाल व पंजाब यांच्या सध्याच्या सीमा पाकिस्तानसाठी मान्य असतील तर त्या प्रदेशात रहाणाऱ्या अस्पृश्यादि मुसलमानेत्तर रहिवाशांचे सार्वत्रिक मत पाकिस्तानांत रहावे की नको, या बद्दल अजमावणे व तसे त्यांच्याकडून कबूल करवून घेणे जरूर आहे. जीना यासाठी तयार आहेत काय ? (७) पूर्व व पश्चिम पाकिस्तान यांना जोडणारा मार्ग, उत्तर प्रदेश बिहार या मधून निश्चित करावा, अशी जीनांची मागणी आहे काय ? हे व इतर प्रश्न प्रमुख आहेत. याबद्दल गांधी व जीना यांनी स्पष्टपणे विचार विनिमय केलेला नाही. आणि सर्वांत मोठा प्रश्न असा आहे की, लीग आणि काँग्रेस हे दोन पक्ष, पाकिस्तानची निर्मिती इतर पक्षांना डावलून करतील तर ती निर्मिती त्या पक्षांना कशी मान्य होईल ? अस्पृश्यांना तर ती कधीच मान्य होणार नाही.
(Times of India, 5-9-44 — Dr. Ambedkar on Communal Talks, No Agreement Without Harijans' Consent).

काँग्रेस लीग ऐक्य कसे साधता येईल, याबद्दल विचार विनिमय करण्यासाठी बॅ. जीनांबरोबर पंडित जवाहरलाल नेहरू, राजाजी इत्यादिकांनी बोलणी सुरू केली. या बाबतीत गांधीजीनीही बॅ. जीनांशी चर्चा करावयाचे ठरविले. हिंदुस्थानाला लवकर स्वातंत्र्य मिळण्यासाठी श्री. राजाजी, लीगची पाकिस्तानची मागणी काही अटींवर मान्य करीत होते. ८ सप्टेंबर १९४४ रोजी वुईमेन्स कॉलेजच्या (मुंबई) विद्यार्थिनींपुढे

भाषण करतांना त्यांनी याबद्दलचे असे मुद्दे मांडले. (The Times of India, dated 9-9-1944, p. 7). गांधी-जीना बैठक ९ सप्टेंबरला सुरवात होणार आहे, त्यांत लौकर आशादायक निर्णय होवो, अशी राजाजींनी इच्छा प्रदर्शित केली. ९ सप्टेम्बरच्या टाईम्सने गांधी-जीना यांचे फोटो पा. ७ वर प्रसिद्ध करून वर 'They Meet In Bombay Today' हा मथळा दिला होता.

सप्टेंबरच्या बैठकीचा वृत्तांत ११ सप्टेंबरच्या टाईम्सने "Gandhi — Jinnah Talk Begin in Bombay. Discussion to Continue Today." या मथळ्याखाली पान ५ वर दिला होता. दोघांचे फोटो पान १ वर दिले होते 'Momentous Political Talks' असे फोटोला शीर्षक होते. ९ सप्टेंबरला बॉंबे क्रॉनिकलने पहिल्या पानावर जीना-गांधी हस्तांदोलन करीत आहेत असे व्यंगचित्र दिलेले होते. या बैठकीची जाहीरात त्या व्यंगचित्राच्याखाली "Momentous Gandhi—Jinnah Talk will Open Today" असा मथळा देऊन छापली होती ही बैठक जीनांच्या बंगल्यावर (१०, माऊंटप्लेजंट रोड, मलबार हील), येथे शनिवारी संध्याकाळी चार वाजता सुरू झाली. ती तीन तास पांच मिनिटे चालली. या बैठकिचा वृत्तांत आपापल्या वृत्तपत्रांना पाठविण्यासाठी ७५ वार्ताहार बंगल्याच्या आवारांत आलेले होते. ११ सप्टेंबरची बैठक सायंकाळी ५-३० ते ७-१५ पर्यंत चालली, बैठकीच्या सुरवातीला फोटोग्राफरनी गांधी-जीनांचे फोटो घेतले. फोटो घेण्याच्या अगोदर गांधीजींनी, जीनांच्या गळ्यात आपल्या हाताचा विळखा घातला. जीनांना ते प्रेमाने भेटत होते. गांधीजींनी जीनांना इतके दृढ अलिंगन दिले की जीनांना, फोटोग्राफर्सच्या समोर, गांधींना सांगावे लागले की, " तुम्ही मला खाली पाडता की काय ?"
("......Gandhiji then said 'Let me hug you'. With that he put his arm around Mr. Jinnah's shoulder. It was noticed that the hands were twitching as if with excitment. "Don't make me fall", Mr. Jinnah said as Gandhiji tightened his embrace. After a moment during which they posed, the Mahatma with his arms on Mr. Jinnah's shoulder, Gandhiji said, "That will do. Let us go in" (The Bombay Chronical, Tuesday dated 12-9-44, p. 1) हा फोटो, गुरुवार १४ सप्टेंबर रोजी क्रॉनिकलने पहिल्या पानावर वरील मथळ्याली छापला होता.

१२ सप्टेंबरच्या बैठकीत जीनांनी अशी भूमिका घेतली की, हिंदुस्थानची फाळणी झालीच पाहिजे, आणि ती आत्ताच ! फक्त याच पायावर हिंदुस्थानचे राजकीय प्रश्न सोडविण्यास लीग कॉंग्रेसशी सहकार्य करील. (टाईम्स, १३-९-१९४४ पा. ४) Indian Political Notes — Gandhi-Jinnah Talks). गांधी-जीनांच्या

या बोलण्याला उद्देशून डॉ. मुंजे यांनी लाहोर येथे, यू. पी. हिंदु विद्यार्थी परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून भाषण केले. त्यात गांधी, राजाजी वगैरे काँग्रेसचे पुढारी यांनीच लीगचे जास्त लाड केले आणि जीनांना डोक्यावर चढविले व त्यांनीच आता हे पाप नष्ट केले पाहिजे, असे उद्‌गार डॉ. मुंजानी काढले. (टाईम्स, १५-९-१९४४ पा. ४)

गांधीं-जीना बोलणी सुरु झाल्यानंतर १३ सप्टेंबरला सर स्टॅफर्ड क्रीप्स यांनी, न्यूयॉर्क मधील सायंपत्र P. M. याच्या लंडनमधील प्रतिनीधी- मि. रॉ. ओटले याला बुधवार, १३ सप्टेंबरला मुलाखत दिली. तिचा उद्देश हा होता की, हिंदुस्थानांतील राजकीय गुंतागुंतीची स्पष्ट कल्पना अमेरिकन लोकांना द्यावी. काँग्रेस आणि लीग हे दोन प्रमुख राजकीय पक्ष आहेत, आणि इतर अल्पसंख्यांक जाती आहेत. प्रमुख पक्ष एकत्र आले आणि अल्पसंख्यांकांना भरपूर संरक्षण मिळाले कीं ब्रिटिश सरकार हिंदुस्थानची राजकीय मागणी तावडतोब मान्य करील.
("Minority Problem Stands in Way. Sir S. Cripps on Indian Deadlock." The Times of India, Friday, dated 15-9-44, p. 4).

रावबहादूर **डी. ए. सुर्वे**, माजी दिवाण, कोल्हापूर यांनी प्रॉव्हिंसियल रूरल डेव्हलपमेंट बोर्ड याचे उद्घाटन करतांना, कोल्हापूर येथे असे उद्गार काढले की गव्हर्नर साहेबांच्या कारकीर्दीत मागासलेल्या वर्गाचे हीतसंरक्षण होत आहे. तथापि लाखो मराठे, दरिद्री आणि अज्ञानी आहेत. त्यांना स्वतंत्र प्रांत मिळाला तर ते आपली सर्वांगीण सुधारणा लौकर करतील.
("Separate Province For Marathas — Mr. Surve's Views." The Times of India, Thursday, dated 21-9-44, p. 4).

'वॉशिंग्टन पोस्ट' या पत्रात अर्धे पानभर एक जाहीरात, २० सप्टेंबरला छापली होती. अमेरिकेचे चीन मधील वकील **वुइलियम फिलिप्स**, जनरॉलिसिमो **चियांग-कै-शेक** केटकीचे सिनेटर **ऑलबर्ट चँडलियर** आणि इलिनॉईसचे रिप्रेझेंटेटिव्ह **काल्विन जाह्नसन** यांनी हिंदुस्थानला लौकरच स्वातंत्र्य द्यावे, याबद्दल जे उद्गार काढले ते या जाहिरातीत दिलेले होते. जपानवर लौकर जय मिळविण्यासाठी व टिकाऊ (शाश्वात) जागतिक शांततेसाठी भारताला लौकर स्वातंत्र्य देणे अत्यंत जरूर आहे, असे सर्वांचे मत होते.
("Cause of Indian Freedom — Propoganda in U.S." The Times of India, Thursday, dated 21-9-44, p. 4).

**डॉ. आंबेडकर** मुंबईहून हैद्राबादला २० सप्टेम्बरला पोहोचले. स्टेशनवर त्यांचे स्वागत करण्यासाठी संस्थानचे, राजकीय खात्याचे चिटणीस **नवाब मोईन, नवाबजंग बहादूर**, ब्रिटन रेसिडेन्टचे प्रतिनिधी, कॅप्टन **डब्लू. पी. कॅन्सन**, आणि

फेडरेशनचे अनुयायी आले होते. (टाईम्स, २१-९-४४ पा. ४) हैद्राबादला त्यांचा जाहीर सभेत सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देतांना ते म्हणाले, अस्पृश्य वर्ग हा हिंदुसमाजाचा भाग नाही, तो स्वतंत्र अल्पसंख्यांक वर्ग आहे. हिंदूंनी हे मान्य केले नाही तर त्यासाठी अस्पृश्य लोक हिंदूंच्याबरोबरचा लढा, प्राणपणाने लढतील. मुसलमानांचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व हिंदू मान्य करतात. आणि अस्पृश्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाला विरोध करतात. हा हिंदूंचा मतलबी कावा आहे. तो अस्पृश्यांनी हाणून पाडला पाहिजे. राजकीय सत्तेत अस्पृश्यांना वाटा पाहिजे. आणि राज्यकारभाराची सूत्रे त्यांच्या हातात आली पाहिजेत. हेच फेडरेशनच्या चळवळीचे ध्येय आहे. हिंदुस्थानाला लौकर स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. आणि त्याचबरोबर अस्पृश्यांचे राजकीय स्वातंत्र्य मांन्य झाले पाहिजे. सभेत, बाबासाहेबांना फेडरेशनतर्फे मानपत्र देण्यांत आले. गांधी-जीन बोलणी चालू आहेत, त्यांचे निर्णय डॉ. आंबेडकरांनी मान्य केले तरच फेडरेशन त्या निर्णयांना पाठिंबा देईल, असे मानपत्रांत मत प्रदर्शीत केले होते. ("Dr. Ambedkar's Plea, Harijans Share in Power". The Times of India, Friday, dated 22-9-44, p. 5). हैद्राबादहून बाबासाहेब मद्रासला गेले.

**श्री. इ. व्ही. रामस्वामी नायकर** यांच्या पत्राला उत्तर देतांना **बॅ. जीना** यांनी असे मत प्रदर्शीत केले की, मद्रास प्रांतात ९० टक्के आदि द्रवीड (ब्राह्मणेत्तर) लोक आहेत. तेव्हा त्यांनी द्रविडीस्थानची चळवळ चालविली आहे ती योग्यच आहे. त्याला माझा पाठिंबा आहे. परंतु द्रविडीस्थान निर्माण करण्यासाठी तुम्ही झटले पाहिजे. मी फक्त पाकिस्तान निर्माण करण्यास झटत आहे. ("Mr. Jinnah's Reply to Mr. Naicker. Dravidastan Issue" *Ibid*).

शनिवार, २३ सप्टेंबरला मद्रास येथे फेडरेशनच्या वर्किंग कमिटीची बैठक भरविण्यांत आली. अध्यक्ष **रा. ब. एन्. शिवराज** एम. एल. ए. (सेन्ट्रल) हे आले होते. **बाबासाहेब** आमंत्रित पाहुणे म्हणून बैठकीला आले होते. बैठकीत ११ ठराव मंजूर करण्यात आले. त्यांचा सारांश असा :— अस्पृश्य वर्ग हा स्वतंत्र वर्ग आहे. त्याला स्वतंत्र राजकीय संरक्षण पाहिजे. त्याला स्वतंत्र मतदार संघ पाहिजे. त्याला कायदे मंडळे आणि प्रधान मंडळे यांत भरपूर प्रतिनिधीत्व पाहिजे. हिंदुस्थानाला जी राजकीय घटना ब्रिटिश सरकार देईल ती अस्पृश्यवर्गाचे संमतीने देण्यात यावी. त्या घटनेत अस्पृश्य वर्ग हा राजकीय दृष्टीने स्वतंत्र आणि अल्पसंख्यांक वर्ग आहे, हे मान्य करण्यांत आले पाहिजे. अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी प्रांतीक अणि मत्यवर्ती सरकार यांनी भरपूर आर्थिक मदत दिली पाहिजे. हिंदुस्थानच्या राज्यघटनेत आणखी काही गोष्टींची यादी नमूद केली पाहिजे. त्या गोष्टी म्हणजे अस्पृश्यांना स्वतंत्र वसाहती साठी

विस्तीर्ण प्रदेश राखून ठेवणे. त्या वसाहती उभारण्यासाठी भरपूर द्रव्य सहाय्याची योजना करणे. आणि (या गोष्टी योग्य रीतीने अंमलात आणण्यासाठी) अधिकारी नेमणे. प्रांतिक आणि मध्यवर्ती सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या राज्यकारभारातील खात्यांत अस्पृश्यांसाठी योग्य प्रमाणात जागा राखून ठेवणे. आणि प्रांतिक व मध्यवर्ती पब्लिक सर्व्हिस कमिशनरवर अस्पृश्यांचे प्रतिनिधी नेमणे. गांधी–जीना बोलणी संपल्यानंतर फेडरेशनची बैठक कलकत्ता येथे घेण्याचे जाहीर करण्यांत आले. ("Scheduled Castes : Plea — Separate Element". The Times of India, dated 25-9-44, p. 5).

रविवार, २४ सप्टेंबरला मद्रासमध्ये बाबासाहेबांचे जाहीर भाषण (सुमारे १०० मिनिटे) झाले. व्हाईसरॉयने हिंदुस्थानच्या राजकीय प्रश्नांसंबंधी जे वक्तव्य केले ते बरोबर आहे असे ते म्हणाले. **गांधी, शास्त्री** वगैरे पुढाऱ्यांनी लंडनच्या वर्तुळ परिषदेत (१९३०) हिंदुस्थानच्या राजकीय हक्कांवर बोळा फिरविला. त्यांनी तसे केले नसते तर हे आमचे बिकट राजकीय पेचप्रसंग निर्माण झाले नसते. आम्ही अस्पृश्य व ब्राह्मणेत्तर यांनी ब्राह्मणसत्तेखाली आजपर्यंत हजारो वर्षे पशूचे जीवन व्यतीत केले. आम्ही देशासाठी लढलो, मेलों, स्वार्थत्याग केले. हे सर्व ब्राह्मणी चष्म्यातून पाहणाऱ्या **गांधी-शास्त्री** पुढाऱ्यांना दिसून येत नाही. दिसून आले तरी ते त्याबद्दल कधी चांगले उद्गार काढीत नाहीत. हे लोक स्वतःला देशाभिमानी समजतात. पण आमच्या देशसेवेला आणि देशाभिमाना हे लोक कवडीचीही किंमत देत नाहीत. या हिंदू लोकांनी आपला दृष्टीकोन बदलला पाहिजे, असे माझे त्यांना सांगणे आहे. त्यांनी आपल्या मागण्या मान्य कराव्यात, आणि आजचे संघर्ष नष्ट करावेत. तसे त्यांनी नाही केले तर आम्ही आर्यलंडाचा पुढारी सर **एडवर्ड कार्सन** यांच्याप्रमाणे हिंदूंना म्हणू की तुम्ही ज्या सवलती आम्हाला देऊं पहाता त्याकडे आम्ही ढुंकूनही पहाणार नाही. कारण तुमची गुलामगिरी स्वीकारण्यास आम्ही तयार नाही ! गांधी, जीनांना काय देणार आहेत, ते कळत नाही. पण त्यांनी जीनांना खूष करण्यासाठी जर कांही जास्त दिले तर ते अस्पृश्यांच्या वाट्यातूनच दिले जाईल. असे होऊं नये, हीच आमची इच्छा आहे. हिंदूंनी आपले मन साफ करावे आणि अस्पृश्यांशी समेट करावा.

मद्रासच्या मुक्कामात बाबासाहेबांनी श्री. नायकर यांच्यांशी द्रविडीस्थान आणि स्वाभिमान संरक्षण चळवळ याबद्दल चर्चा केली.

या वरील प्रकरणाचा वृत्तांत मंगळवार, २६ सप्टेंबरच्या टाईम्समध्ये (पा. ५) "Let us Come to Terms — Dr. Ambedkar's Plea to Mr. Gandhi" या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेला होता.

मुंबईत गांधी–जीना बोलणी चालू होती. तींतून काय निष्पन्न होणार, याबद्दल लंडनच्या टाईम्स पत्राने अग्रलेख लिहून पुष्कळ तर्कवितर्क काढलेले होते. कॉंग्रेस

आणि लीग यांच्यांत समझोता झाला तर सर्व कांही ठीक होईल, अशी ज्यांची समजूत आहे ती चुकीची आहे. कारण या पक्षाशिवाय इतर पक्ष, अल्पसंख्य जाती, संस्थाने, यांचेही हक्क लक्षांत घेणे जरूर आहे, असे टाईम्सने आपले मत प्रदर्शित केले. ब्रिटिश-जनतेला खऱ्या परिस्थितीचे ज्ञान करून दिल्याबद्दल **श्री. भानवेंद्र रॉय** यांनी लंडन टाइम्सला पत्र पाठवून त्यांचे अभिनंदन केले. क्रिप्सची योजना प्रमुख राजकीय पक्षाशिवाय इतर जनतेच्या हक्कांबद्दल मूग गिळून बसली म्हणूनच ती त्याज्य ठरली; असे **रॉयनी** आपले मत प्रदर्शित केले. अस्पृश्यवर्ग, संस्थाने, शेतकरी व कामगारवर्ग यांचे हक्क लक्षात घेऊन जी राजकीय योजना पुढे येईल ती यशस्वी होईल, असे **रॉयनी** आपले मत दिले. ("Interests Invalued in Settlement Cripps Plan Failure". The Times, Wednesday, dated 27-9-44, p. 5).

९ ते २७ सप्टेंबरच्या काळात बहुधा दररोज **गांधी-जीना** बोलणी होत होती. ती ता. २७ च्या बैठकीत संपली. **गांधीजी,** बिर्ला हाऊसपासून जीनांच्या बंगल्यावर जात असत. **जीना** एकदाही बिर्ला-हाऊसवर गेले नाहीत. **गांधी-जीनांचे** एकमत झाले नाही. बोलणी फिसकटली. याचा वृत्तांत गुरुवार २८ सप्टेंबरच्या टाईम्सने पहिल्या पानावर "Gandhi—Jinnah Talks Fail — Basic Clash of Views on Pakistan Issue — Not the Final End of Effort at Unity" असा मजकूर, शीर्षकाखाली प्रसिद्ध केला होता. बॉबेक्रॉनिकलने हा वृत्तांत २८ सप्टेंबरच्या अंकात पहिल्या पानावर दिला होता. त्याचे शीर्षक—
"Breakdown of Gandhi—Jinnah Parleys. Not final End of our Efforts Says Quaide-e-Azam — ......................
.............. in Lahore Resolution. Gandhi's Proposals Meeting Substance of League's Demand Turned Down."
असे होते. पाकिस्तानची मागणी जीना सोडण्यास तयार नव्हते. आणि ती मागणी लीगने केलेल्या स्वरुपातच त्यांना हवी होती. अन्यथा नको. हेच, बोलणी फिसकटण्याचे प्रमुख कारण होते. त्यांच्या बैठकीत ज्या चर्चा झाल्या त्यासंबंधी व त्या अगोदर दोघांत पत्रव्यवहार होत होता. हा पत्रव्यवहार २८ सप्टेंबरच्या टाईम्सच्या ३, ४, ५ आणि ९ पानांवर प्रसिद्ध झाला होता. तो २८ सप्टेंबरच्या क्रॉनिकलमध्ये १, २ व ५ पानांवर प्रसिद्ध झालेला होता. गांधीजींचे पहिले पत्र, पाचगणीहून १७ जुलैला **ब्रदर जीना'ला** गेले. नंतरच्या पत्रांत गांधीजी, जीनांना **'डीयर कायदे-आझम'** म्हणू लागले. जीना गांधीजींना सर्व पत्रांत 'डीयर मिस्टर गांधी' म्हणूनच उल्लेख करीत.

पाकिस्तान म्हणजेच 'द्विराष्ट्र सिद्धांत.' हे पाकीस्तान कोणत्या प्रदेशांचा समूह? या गांधीजींच्या मुद्याला जीनांनी १७ सप्टेंबरच्या आपल्या पत्रात उत्तर दिले की या मुद्याची सविस्तर माहिती देणारे बरेचसे वाङ्मय प्रसिद्ध झालेले

आहे. त्यात **डॉ. आंबेडकर** यांचा ग्रंथ (Thoughts on Pakistan) आणि M.R.T.'s Nationalism in Conflict in India हे दोन ग्रंथ प्रमुख होत. ते तुम्ही वाचा असे जीनांनी गांधीजींना सांगितले. ("There is a great deal of discussion and literature on this point which is available and it is for you to judge finally, when you have studied this question thoroughly, whether the Musalmans and Hindus are not two major nations in this Sub-Continent. For the moment I would refer you two publications, although there are many more — Dr. Ambedkar's book and M.R.T.'s *Nationalism in Conflict in India.*") Times, dated 28-9-44, p. 4). या मुद्याबद्दल गांधीजींनी, आपल्या १९ सप्टेंबरच्या जीनाला लिहिलेल्या पत्रात असे विचार प्रदर्शित केले की, द्विराष्ट्र सिद्धांताबद्दल तुम्ही जी मते मांडलीत ती मला पटली नाहीत. डॉ. आंबेडकरांनी जो पाकिस्तानसंबंधी ग्रंथ लिहिला आहे तो उत्कृष्ट आहे. पण त्यानेही माझे समाधान होऊ शकले नाही. M.R.T. चा ग्रंथ मी पाहिलेला नाही. ("Dr. Ambedkar's thesis, while it is ably written, has carried no conviction to me. The other book mentioned by you, I am sorry to say, i have not seen. *Ibid*). आंबेडकरांच्या या ग्रंथाबद्दल गांधीजींनी असे उद्गार काढले की हा ग्रंथ म्हणजे गटर इन्सपेक्टरचा अहवाल होय! असे फ्री प्रेसने प्रसिद्ध केले होते.

९ ते २७ सप्टेंबर १९४४ पर्यंत चाललेल्या **गांधी–जीना वाटाघाटी** शेवटी फिसकटल्या. भारताचे राजकीय वातावरण १९४४ सालांत कसे होते, आणि त्यांत लीग आणि जीना यांना किती महत्व प्राप्त झाले होते, हे वरील हकीकतीवरून स्पष्ट होते. खुद्द गांधीजी जीनांच्यापुढे कसे शरणांगत झाले होते आणि जीना, त्यांना किती उद्दामपणे वागवीत होते, हेही स्पष्ट होते. गांधीजींना देशाचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ही शरणांगती पत्करावी लागली; त्या स्वातंत्र्या इतकेच गांधीजींना हरिजनसेवेचे प्रेम होंते. पण त्यांनी अस्पृश्यांचे शंभर टक्के प्रतिनिधी डॉ. आंबेडकर यांना उभ्या आयुष्यात गांधीजींनी कधी आलिंगन दिले का? (२४–९–३२ ला येरवड्याच्या तुरुंगात उपास सोडला तेव्हां, अगर त्या नंतरच्या काळांत, त्यांनी बाबासाहेबांपेक्षा सहस्त्रपटीने खालच्या दर्जाच्या अस्पृश्यांना हरिजनांचे प्रतिनिधी बनविले आणि त्यांना कायदेमंडळे वगैरे ठिकाणी नेऊन बसविले. पण त्या प्रतिनिधींनी किती हरिजन कार्य केले? या बाबतींतलां सर्व इतिहास पुढील काही वर्षांत घडला तो मी योग्य त्या ठिकाणी दिलेला आहे.

## प्रकरण १० वे

# बाबासाहेबांचा दक्षिणेंतील यशस्वी दौरा

**गांधी–जीना** वाटाघाटी फिसकटल्यानंतर भारताच्या राजकीय क्षेत्रांत जे आडवे तिडवे वारे वाहू लागले त्यामुळे अस्पृश्यांच्या राजकीय हक्कासंबंधी आपली भूमिका काय आहे हे स्पष्ट करण्यांकरिता फेडरेशनची बैठक, मद्रास येथे भरविण्याचे **बाबासाहेबांनी** ठरविले व त्या प्रमाणे कार्यकर्त्यांना त्यांनी आदेश दिले. त्या बैठकीच्या अगोदर काही दिवस त्यांनी हैद्राबाद संस्थान आणि दक्षिण भारत येथील प्रमुख ठिकाणांना भेट देण्याचे मुकर केले. या दौऱ्यात बाबासाहेबांचे प्रचंड स्वागत अस्पृश्यांनी तर केलेच, पण स्पृश्यांनी आणि त्यांच्या संस्थांनीही त्यांना चहा–पाटर्या व जेवणे देऊन त्यांचे मनापासून व उत्साहाने स्वागत केले; आणि बाबासाहेबांनी त्यांच्या सत्कार–समारंभाना आणि मानपत्रांना उत्तरे देताना खुमासदार भाषणे केली की, ते स्पृश्य लोक आणि बरेचसे काँग्रेसवादी लोकही बाबासाहेबांच्यावर खूष झाले. कांही विरोधक काँग्रेसवादी लोक व वर्तमान पत्रे यांनी बाबासाहेबांच्या भाषणांतील मुद्यासंबंधी विपर्यास करणारी टीका करण्याचा मोका वाया जाऊ दिला नाही. आपली राजकीय, धार्मिक व सामाजिक मते आणि फेडरेशनची भूमिका या संबंधी तार्किक व ऐतिहासिक दृष्टीनी विवेचन करून बाबासाहेबांनी आपली भाषणे रंगविली होती. ते दिल्लीहून रेल्वेने (स्पेशल सलून) हैद्राबादला १९–९–४४ ला आले. हैद्राबाद शिडयुल्ड कॉस्टस फेडरेशनतर्फे आणि फेडरेशनच्या महिला व विद्यार्थी यांच्या शाखा, यांच्यातर्फे त्यांचे नामपाली स्टेशनवर मोठ्या थाटाचे टोलेजंग स्वागत करण्यात आले.

फेडरेशनचे अध्यक्ष **श्री. जे. एच. सुबिया,** मुख्य चिटणीस **श्री मनोहर** व **श्री. सी. एस. पथिराजन,** महिला शाखेच्या अध्यक्षा **श्रीमती राजमणि देवी** आणि विद्यार्थी शाखेचे व इतर प्रमुख कार्यकर्ते यांनी बाबासाहेबांना, हारतुरे स्पेशल सॅलूनमध्येच दिले. **नबाब मोईन नबाब जंग बहादूर** (पोलिटिकल सेक्रेटरी व इन्फरमेशन मेम्बर) कॅप्टन **डब्लू. पी. कॅशान** (अंडर सेक्रेटरी टू दी ऑनरेबल दी रेसिडेन्ट व ए. डी. सी. टू हिज एक्सलन्सी नबाब ऑफ छत्तारी) यांनी हैद्राबाद संस्थानातर्फे बाबासाहेबांना

हारतुरे दिले. त्यांनी बाबासाहेबांना ४ वाजता चहा पार्टी दिली. नंतर सलून दुसऱ्या रेल्वेच्या गाडीला जोडण्यात आला व बाबासाहेब सिकंदराबादला रेल्वेने गेले; तेथे महिलांनी बाबासाहेबांना ओवाळले. स्टेशनवर हजारो स्त्री, पुरुष व मुले. "आंबेडकर की जय", "आंबेडकर झिंदाबाद" अशा विजयी गर्जना करीत होते. फेडरेशनचे स्वयंसेवक (समता सैनिक दल) बंदोबस्त ठेवीत होते.

स्टेशनपासून जी, मैदानापर्यंत बाबासाहेबांची जंगी मिरवणूक काढण्यात आली ती, मार्केट स्ट्रीट, के. इ. एम. हॉस्पीटल रोड, किंग्जवे घामंडी वगैरे प्रमुख रस्त्यातून गेली. मैदानात विस्तीर्ण शामियाना उभारण्यात आला होता. त्यात बाबासाहेबांना, **श्री. सुब्बिया** यांच्या अध्यक्षतेखाली फेडरेशन, महिला शाखा व विद्यार्थी शाखा यांच्यातर्फे तीन मानपत्रे देण्याचा समारंभ झाला. मानपत्रे इंग्रजी, हिंदी व तेलगु भाषेत होती. **श्री. सुब्बिया** यांनी बाबासाहेबांचे चरित्र व कार्य यासंबंधी श्रोत्यांना माहिती दिली.

१) डॉ. आंबेडकर हेच आमचे खरे व एकमेव पुढारी आहेत.

२) गांधी–जीना वाटाघाटीत जे नीर्णय घेण्यात येतील ते अस्पृशांना बंधनकारक नाहीत, कारण त्या नीर्णयांत अस्पृशांचा हात नाही.

३) अस्पृश हे या देशाचे मूळ रहिवाशी व भूमीचे मालक आहेत; परंतु ते आतां गुलामांचे जीवन जगत आहेत.

४) ही अस्पृशांची गुलामगिरी नष्ट करण्याचे महान कार्य डॉ. आंबेडकरांनी चालविलेले आहे. त्यासाठी अस्पृशांना कसायला जमिनी, सरकारी खात्यात नोकऱ्या आणि शैक्षणिक व राजकीय क्षेत्रांत जादा सवलती मिळणे अवश्य आहे. यामुळे अस्पृशांची आर्थिक परिस्थिती सुधारेल व त्यांची गुलामगिरी नष्ट होईल. अशा अर्थाचे मुद्दे तिन्ही मानपत्रांत होते.

बाबासाहेबांनी तिन्ही मानपत्रांना उत्तरे देण्यासाठी जे भाषण केले, ते हिंदुस्तानीतून. अस्पृश्यांवर होत असलेल्या अन्यायाबद्दलचे जळजळीत उद्‌गार व ते अन्याय दूर करण्यासाठी अस्पृशांनी चालविलेला लढा याबद्दल पंचेचाळीस मिनीटे बाबासाहेबांनी भाषण केले. व ते लाखो अस्पृशांनी कानात जीव आणून ऐकले व मंत्रमुग्ध नागाप्रमाणे ते डोलत राहिले. अस्पृश्य समाजांत पुरुष व स्त्री ही एका ध्येयाने प्रेरीत होऊन पुढे आली पाहिजेत त्यांनी आपल्या हक्कांसाठी संघटीतपणे लढले पाहिजे व ते असे की समरांगणावर प्राण अर्पून यश हाती घेतले पाहिजे.

"बाबासाहेबांना तीन मानपत्रे दिली; पण तीत एकही मराठींत नाही, म्हणून ती उणीव अंशतः भरून काढण्यासाठी मी बाबासाहेबांना एक मराठी कविता अर्पण करतो" असे सभेत बोलून एका विद्यार्थ्याने बाबासाहेबांचे गुणगान करणारी एक मराठी कविता मोठ्या जोसांत म्हटली व श्रोत्यांच्या टाळ्या मिळविल्या.

**बाबासाहेबांना**, तामिळनाडू डिप्रेस्ड क्लास ख्रिश्चन असोशियनतर्फे, मेमोरांडम्– मद्रास येथे २१–९–१९४४ ला नजर केला. ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करून अनेक वर्षे झाली तरी आमच्यांत सामाजिक, आर्थिक राजकीय व धार्मिक बाबतीत आमची काही प्रगती झाली नाही. ख्रिस्ती धर्मात जे पूर्वी सवर्ण हिंदू होते व आता ख्रिस्ती आहेत त्यांनी आपल्या वाड–वडिलांच्या पूर्वीच्या जातिभेदाच्या व श्रेष्ठकनिष्ठपणाच्या कल्पना अजून उराशी धरलेल्या आहेत. ते आम्हाला जवळ करीत नाहीत व हिंदू आम्हांला बरे पहात नाहीत. आम्ही मागासलेले ख्रिस्ती म्हणून इंग्रज सरकारने ज्या आम्हांस थोड्या सवलती दिल्या होत्या, त्या कॉंग्रेस सरकारने रद्द केल्या व दिवसा नाही बाप, व रात्री नाही आई अशी आता आमची स्थिती झालेली आहे. या घोर परिस्थितीतून आम्हाला बाहेर काढा, अशी मेमोरंडमम्ध्ये प्रमुख विनंती होती' तुमची गाऱ्हाणी, प्रांतीक व मध्यवर्ती सरकारच्या कानी घालतो, असे बाबासाहेबांनी त्यांना आश्वासन दिले.

**कुमारराज सर मुथिमा चेट्टिमार** यांनी बाबासाहेबांना २२–९–४४ रोजी सायंकाळी अड्यार येथील आपल्या "चेट्टिमाड हाऊस, या राजवाड्यच्या विस्तीर्ण मैदानात चहापार्टी दिली. मद्रास सरकारचे बडे अधिकारी व जज्ज व प्रमुख नागरिक असे २५० निमंत्रीत पाहुणे होते. बाबासाहेबांनी यजमान व पाहुणे यांच्याशी मनमुराद गप्पा मारल्या. व समारंभ संपला. त्यानंतर अर्ध्या तासाने बाबासाहेबांचा, सर्दन इंडिया चेम्बर ऑफ कॉमर्स या संस्थेच्या इमारतीत सत्कार झाला. त्यांत संस्थेच्या प्रवक्त्यांनी मजूर चळवळीला सरकारने आळा घातला नाही, तर औद्योगिक व व्यापारविषयक प्रगति देशात होणार नाही. अशा आशयाचे भाषण केले. त्याला उद्देशून बाबासाहेबांनी उत्तर दिले की, कामगारविषयक कायदे करण्याचे सर्व अधिकार प्रांतिक सरकारांना दिलेले आहेत. मध्यवर्ती सरकार फक्त या विषयाची देखरेख करीत राहील. हे कायदे करताना प्रांतिक सरकारने मजूर व मालक यांच्या हितांना परिपोषक असेच कायदे करावेत. पुढे राष्ट्रीय सरकार येईल तेव्हां या बाबतींत योग्य ते धोरण स्विकारले जाईल पण माझे मत असे आहे की, मजूरांचे किमान वेतन ठरविण्याचे धोरण या सरकारने स्वीकारु नये. मालकांच्या नफ्याची कमाल मर्यादा काय असावी, हे ठरविण्याचे धोरण स्वीकारावे. कामगारांना आजारपणात योग्य ती मदत करणे या बद्दलच्या योजना प्रांतीत सरकारने हाती घ्याव्यात, असा केंद्र-मजूर खात्याने त्यांना सल्ला दिलेला आहे. कामगार आणि मालक यांच्यात होत असलेले तंटे सामोपचाराने मिटवावेत व उभयपक्षी आपलेपणा रहावा, यासाठी सरकार लौकरच तीन बडे अधिकारी (कमिशनर्स ऑफ कान्सीलिएशन) सर्व ब्रिटीश हद्दींत तीन भागात नेमणार आहे. सरकारने आतापर्यन्त ६८०००/– लोकांना तांत्रीक शिक्षण देऊन पोटापाण्यास लावलेले आहे तांत्रिक शिक्षणाचा विस्तार सर्वत्र व्हावा, अशी सरकार तरतूद करणार आहे. लढाई संपल्यानंतर जे औद्योगिक आंदोलन सुरु होईल त्यांत अशा शिक्षित तंत्रज्ञांचा भरपूर उपयोग करता येईल.

सदर्न इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स या संस्थेने बाबासाहेबांना आपल्या कचेरीत मानपत्र दिले. **श्री. शेषाचलम् चेट्टियार** यांनी स्वागतपर भाषण केले. श्री. टी.व्ही. **इथिराजलू चेट्टियार** यांनी मानपत्र अर्पण केले. ते म्हणाले की **डॉ. आंबेडकर** कायदे मंत्री झाल्यानंतर त्यांनी कामगार, मालक व सरकार यांचे परस्पर संबंध सलोख्याचे राहण्याबद्दल धोरण अंमलात आणून या क्षेत्रात नवीन पायंडा सुरु केला. लेबर स्टँडींग कमिटी व लेबर इन्व्हेस्टिगेशन कमिटी यांच्यातर्फे सरकारने कामगारांच्या हिताची जी कामे केलेली आहेत, त्याबद्दल चेंबरला समाधान वाटते. औद्योगिक प्रगती देशात झाली तरच महायुद्धानंतर युद्धांत गुंतलेले लाखो कामगार यांना, या औद्योगिक क्षेत्रात नोकऱ्या मिळू शकतील. तरी सरकारने या प्रश्नाची दखल घेतली पाहिजे.

मानपत्राला उत्तर देताना **बाबासाहेब** म्हणाले की, मजूरांच्या सुखी जीवनाच्या सर्व योजना हाती घेणे आताच्या सरकारला शक्य नाही. कारण हे सरकार तात्पुरते आहे. युद्धसमाप्तीनंतर जे सरकार या देशात येईल, त्यांचे हे काम आहे. मात्र या सरकारने हे लक्षात ठेवले पाहिजे की, सर्व उद्योग खाजगी मालकीचे रहातील. ते उद्योगपती औद्योगिक प्रगतीच्या गोंडस नावाखाली मजूरांना पिळून काढतील व सर्व फायदे व नफे स्वतः उपटतील. म्हणून या फायद्यातून व नफ्यातून उद्योगपतींनी कामगाराच्या हितासाठी ठराविक रकम खर्च केली पाहिजे, असे बंधन त्यांच्यावर घातले पाहिजे.

शुक्रवारी २२ सप्टेंबर १९४४ ला संध्याकाळी मद्रास म्युनिसीपल कॉर्पोरेशनतर्फे चांदीच्या करंड्यांतून मेयर **डॉ. सयद् नियामथुल्ला** यांच्या हस्ते बाबासाहेबांना मानपत्र अर्पण करण्याचा जंगी समारंभ, रिपन बिल्डीगजमध्ये झाला. या समारंभात अनेक प्रतिष्ठीत नागरिक सरकारी अधिकारी आणि कार्पोरेटर्स उपस्थित होते. कॉंग्रेस पक्षीय-कार्पोरेटर्सनी मानपत्राला विरोध केलेला होता व म्हणून ते समारंभाला उपस्थित राहिले नव्हते.

मानपत्राला उत्तर देताना **बाबासाहेबांनी** कार्पोरेशनचे आभार मानले. हे मानपत्र एकमताने देण्याचे कार्पोरेशनने ठरविले असते तर मला जास्त आनंद झाला असता असे ते म्हणाले. **बाबासाहेबांचे** दिव्य विद्यार्थी जीवन, भव्य बुद्धिवैभव आणि थोर शैक्षणिक, सामाजिक व राजकीय कार्य यांच्यासंबंधी मानपत्रात जे गौरवपर उल्लेख होते, त्याबद्दल ते म्हणाले की, ही माझ्याबद्दलची अतिशयोक्ति झालेली आहे. हे गौरवपर उल्लेख, मी केलेल्या कार्यांना उद्देशून आहेत, माझ्या वैयक्तिक मोठेपणाला उद्देशून नव्हेत, असे मी मानतो. सध्याच्या सरकारबद्दल चोहोकडून टीका ऐकण्यात येते. सरकार जनतेच्या हितासाठी काही करीत नाही ही टीका अवास्तव आहे. मजूरांची स्थिती सुधारावी म्हणून सरकारने तांत्रिक शिक्षण देण्याची योजना, औद्योगिक तंटे मिटविण्याची लवाद योजना, मालक व मजूर यांच्यात जे करार मजूरांना

जाचक होतात ते बदलण्याची योजना, मजूरांना फायदेशीर असे कायदे प्रांतिक सरकारच्या संमतीने करणे वगैरे गोष्टी सरकारने केल्या आहेत. हे सरकार तात्पुरते आहे. युद्ध संपल्यानंतर जे राष्ट्रीय सरकार येईल त्याला यापेक्षा जास्त कार्य, मजूर व आम जनता यांच्या हितासाठी करता येईल. हे सरकार आपण निवडून देणार आहोत. पण या सरकारांत कोणते लोक येतील? १९३५ च्या कायद्यान्वये ज्या निवडणुका झाल्या, तेव्हां जे सरकार प्रत्येक प्रांतात आले त्यांत मुख्यमंत्री ब्राह्मण, निम्याहून अधिक मंत्री ब्राह्मणेत्तर अशी मंत्रीमंडळे झाली. आपले हस्तक उपमंत्री केले, मोक्याच्या व मोठ्या पगाराच्या नोकऱ्या त्यांनी ब्राह्मणांना दिल्या. त्यात त्यांचे सगेसोयरे होतेच. यामुळे खरा फायदा ब्राह्मण समाजाचा झाला व फार थोडा ब्राह्मणेत्तर समाजाचा झाला. ही परिस्थिती १९३७ च्या निवडणुकीत मतदारांनी काँग्रेसला सात प्रांतात अधिकारावर आणले त्या नंतर दिसून आली. सर्व ठिकाणी मुख्यमंत्री ब्राह्मण झाले, याचा अर्थ ब्राह्मणांचे राज्य सुरु झाले. ब्राम्हण मतदारापेक्षा ब्राह्मणेतर संख्येने जास्त आहेत. पण ब्राम्हणाना ते निवडून देतात व ब्राम्हण मंत्रीमंडळे अशी निर्माण करतात की त्यांच्याच हाती राज्य कारभाराची सारी सूत्रे राहिली पाहिजेत. भारताला स्वातंत्र मिळालेच पाहिजे, स्वातंत्र्यच्या काळात राष्ट्रीय सरकार आले पाहिजे व राज्यकारभार लोकशाही तत्त्वावर चालला पाहिजे. मी स्वातंत्र्यासाठी सरकारशी झगडा करावयास तयार आहे. पण स्वातंत्र्यच्या काळात राष्ट्रीय सरकार व लोकशाही यांच्या नावाखाली भारतातील बुद्धिजीवी अल्पसंख्यांक लोक व ब्राम्हण हेच आता राज्य करणारे झालेले आहेत. या जाती जर राज्ययंत्रणा बहुजन समाजाच्या हिताला दूर सारुन स्वतःच्या स्वार्थासाठी व अधिकारासाठी राबविणार असतील तर या स्वातंत्र्याला, राष्ट्रीय सरकारला व लोकशाहीला कवडीचीही किमत राहणार नाही, त्यापेक्षा सध्याचे सरकार पुरवले. ते ब्राम्हणासाठी काही करीत नाही तर सर्वांसाठी विशेषतः बहुजन समाजासाठी करते.

अशा अर्थाचे भाषण बाबासाहेबांनी कार्पोरेशनच्या मानपत्राला उत्तर देताना केले ते भाषण इंग्रजीत होते, त्याचे वृत्तांत बऱ्याच पत्रांनी प्रसिद्ध केले होते, त्यापैकी एक मी खाली देत आहे.

"MADRAS, Sept. 23 — The Governing class in this country is the Bramhin Community. The 1937 elections resulted in our having Bramhin Prime Ministers in seven provinces with half the Ministry as Bramhin. If a National Government was formed and if it goes into the hands of the Governing Class, do you really think that it will do better than the present Government of India which was criticised so much ?" observed Dr. B. R. Ambedkar, Labour member

with the Govt. of India replying to the Civic Address presented to him by the Madras Corporation last evening at the Ripon Buildings.

NO OPPONENT OF NATIONALISM

I am no opponent of Nationalism, Swaraj or Independance added Dr. Ambedkar, if it could be assured of that independance, education and welfare is promised to the Nation. I will certainly fight for Nationalism and Independance; but if all this long talk, tall philosophy is followed by nothing else than what we call "One-step-dance" and if it is confined to the governing class and political power is used to strengthen that community and disenfranelise the right of others, well the Govt. of India may not be established as it is being done now ?

The chief guest on arrival was received by the Mayor Commissioner and the councillors, there was a large gathering present. The member of the Congress Principal Party were conspicious by their absence.

The address which was read out by Dr. Syed Nijamathulla, Mayor, was presented inclosed in a beautiful silver casket, Dr. Ambedkar was garlanded and introduced to the Councillors present.

"It is a very kind thought on your part" said Dr. Ambedkar to have decided to present me this address of welcome to your city. I am not a resident of Madras, and having played no part in civic life as such, I have no claim on your consideration. None the less you have decided to present this address to me. I feel deeply grateful because it is something to which I cannot lay any claim. If I may refer to the fact and I do so without any spirit of controvercy or criticism, I read in the papers that this address was not voted unanimously and that there was some amount of dissent (Laughter). I refer to this because I feel that I should welcome the address all the more than I would have done if it was voted unanimously. Most of the acts which we do unanimously are either formal or acts which are

nothing more than "convertional lies of civilisation" which we practically do every day and which have no meaning at all (cheers). It is an indication at any rate that there was a part of the corporation which was sincere and insistant on presenting me this address.

You have very kindly referred to my university careed, the work I have done as a teacher, lawyer and Member of the Bombay Legislative Council in terms which are to my mind somewhat extravagant. Let me assure you that I am not so vain as to believe that what you said is really my due. I make it that the language you have used is indicative of the great sympathy which you have for the cause in which I have laboured so long and that what you have said is really in support of the cause than of my own individual personality.

## NOT AN IDEAL BODY

Reference has been made to the work of the Madras Corporation in respect of the slum clearance, food for the children of working classes. It would not be appropriate if I were to parade what the Government of India has done in this connection. However, just to ward off criticism that has been sometimes levelled against the Government of India that it is a very slow machine and grinds very slowly, I may say that the Government of India during the last few years has not been an ideal body waiting upon time to carry out some of the most necessary reforms which every Government is bound to perform. I wish to refer to a great piece of work which Government of India has done for the working population during the last few years. I would refer to the scheme of technical training which has imparted skill to unskilled men to the extent of 68,000 people. There are three to four hundred training centres spread throughout India and it is our hope and aspiration that the scheme of technical training which we have built up will not be scrapped at the end of the war and that it would be a permanent part of the educational system of this country whereby children of the working classes who had no oppor-

tunity of reaching university education could have the opportunity of having better skill and thus improving their earning capacity (cheers). There are several pieces of legislation which the Government has put through during war. For instance, there is the provision of compulsory arbitration of industrial disputes. Hitherto the Government of India had no authority to prescribe terms and conditions of employment of workmen. It was only a matter for the private individual with nothing more than a private contract between a worker and employer to determine the wages and conditions of employment. Today we have a law where by if the Government of India was satisfied that the terms and conditions of employment were not satisfactory they had the authority to impose terms and conditions which they thought were right and proper. I hope that although this piece of legislation has emerged as a result of the war, it will not die with the war and that it would become a permanent of our legislation system in the country (cheers). What we have done, we are conscious, is indeed very small. But I do want the public to understand that the Government of India in the matter of legislation is not in a very happy position.

In the first place, a large part of the labour legislation is written the authority and jurisdiction of the provinces. It is they who are in a position to make labour laws. The authority of the Government is found in what is called the concurrent piece of legislation you are all aware that although the Government of India has been given a concurrent right to pass labour legislation, there is a definite provision in the Government of India Act that whether the legislation proceeds from provincial authority or form the concurrent jurisdiction of the Central legislature, the administration of labour is entirely in the hands of the provincial Government. Consequently....when the Government of India thinks that it should undertake legislation through its concurrent powers of legislation, it has to consult the provincial Governments before it can do so. After

all when the legislation is passed, it is to be carried out by the provincial Government and unless the Government of India has the prior consent of the provisional Government, it thinks, that there is no use of passing the legislations which the administrative bodies are not prepared to look at. These are our difficulties. Our legislative speed is not as fast as other people expect. But I would say and assure that the Government has no deadened heart. It is quick and is thinking of re-organisation in labour matters (Applause).

Maney people criticise the Government of India and I wonder whether it is worthwhile doing so. The Government of India may not have done much; But does it matter? To me, it seems, present it does not. After all, the question is whether the New Government of India has done or will not do, the question to my mind which we all call National Government will do better. Let me humbly submit that it is a far more crucial question that the question which we are all thinking about. I am quite prepared to admit for the purpose of argument, that the present Government of India may be taken as caretaker's Government. "we are all looking forward to a new Government and the quest of questions which worries me is, will this National Government do better. I also express a certain degree of doubt We are all saying that once we are given a power, adult suffrage, we will have swept all evils make clearances put everybody on the boulevards so that they can walk erect as human beings. I entertain grave doubts. I have studied sufficiently the hastory of Europen Government and I have been one of those who has been completely disillusioned of the allegation that has sometimes been made that all human evils will disappear once a parliamentary Government is established based upon adult suffrage History gives no foundation and no support for a proposition on this kind. None whatever it seems me that we are suffering from certain disillusionments or asking false questions ourselves. It is right to say that whether you have adult suffrage, or not, or a framework of popular Government or a frame

work of any other Government, there is inherent in every society in every country, two classes, the governing class and the subject class. Whether they come on the surface or whether they are hidden behind some kind of clouds, makes no matter. You give adult suffrage or any kind of power or election what happens is this, The governing class is elected to govern, the subject class never gets a chance. Am I making a wide statement? I do not think so. There is a foundation for what I say.

### BRAHMIN DOMINATION

Let us examine the results of the elections in 1937, we had the widest of suffrage, the results of elections and true votes. What happened? In the seven Congress provinces. I do not wish to speak about it — what I said then came to be true and the truth was that in this country, no matter what you do, you have got the Brahmin community as the Governing community (laughter). That came to surface. Nothing else did. In the seven provinces, we had Brahmin Prime Ministers. Half the Ministry was Brahmin in composition. I am not saying this as a matter of criticism, but I am only stating facts. If the elections proved anything, it proved only this; that in the heart of this country there was one community that was destined to be the governing class..It has come as the governing class. I do not think we should ask the question whether every country is not entitled to self-government but we should ask whether the governing class in any country has a sense of responsibility so that the Government of that country can be entrusted to the community. We have forgotten the fact that the right to the govern must be really decided in the ilght of the responsibility of the governing class. After all if the governing class is to govern, the question is, what is the outlook of that governing class, what is philosophy, what does it believe in. If you have a governing class which believes in what you care graded inequality, one on the top of the other which does not believe in inequality, and believes that man is not man and he must not be touched and that a certain class alone is entitled to education and property and

not the other and that the latter is born servile and must die in servility, the question that I ask is this. If a National Government was formed and if it went in to the hands of the governing class, do you really think that the National Government will do better than the present Government of India ?

I am no opponent of a National Government, I am no opponent of Swaraj. I am no opponent of Independence. If I can be assured that I could have independence, education and welfare, which are promised to the nation, I certainly will fight for independence, for nationalism for ...... (cheers & applause). But if all this long talk, tall philosophy is followed by nothing else than what we call "One-step-dance" if it is confined to the governing class and if political power is used to strengthen that community and to disfranchise the rights of others, then the present Government of India may not be criticised so much as it is being criticised now "(Loud applause) ........"

(The Liberator, dated 24-9-1914 — Dr. Ambedkar on Reforms undertaken By Ceneral Government. Reply to Civic Address).

**बाबासाहेबांनी** कॉर्पोरेशनच्या मानपत्राला उत्तर देताना जे सत्य वस्तु-स्थितीदर्शक स्पष्ट उद्‌गार काढले होते, त्याबद्दल मद्रास येथील काही विचारवंतांनी व दोन तीन वर्तमानपत्रांनी बाबासाहेबांना धन्यवाद दिले. बाबासाहेबांच्या भाषणावर स्फुट लिहिताना **दी लिबरेटर** या पत्राने शनिवार दि. २३ सप्टेंबर १९४४ च्या अंकांत बाबासाहेबांच्या प्रत्येक मुद्यावर प्रकाश टाकणारी माहिती देऊन ते मुद्दे जास्त स्पष्ट केले, आणि इतके सुंदर, सोपपत्तिक, मुद्देसुद आणि सत्यान्वेषी भाषण केल्याबद्दल सदर पत्राने बाबासाहेबांच्या भाषणांची व सद्‌गुणांची मुक्त कंठाने स्तुति केली. त्या पत्रातील स्फुट विशेष माहितीने भरलेले असल्यामुळे मी ते येथे उद्‌धृत करतो.

"AN OUTSPOKEN UTTERANCE"

In presenting a civic address to Dr. Ambedkar last evening, Madras honoured itself, Dr. Ambedkar is the accredited leader of a great community, which has for centuries been deprived of the rights of ordinary citizenship. By his high attainments, his courageous leadership

and outstanding equalities he has proved himself to be a leader of worthy of respect by all irrespective of party differences over small matters. It is to be regretted therefore that a civic address to such a person should have been opposed by a political party — the Congress party and that its members should have refrained from attending the function. This attitude however is neither now nor surprising. A party that has always been guided by totalitarian methods and which has not been conspicuous for its appreciation of the decencies of public life and the amenities of public conduct, should not be expected to lose one opportunity to show its hostility to leaders of other schools of political thought. We, however, feel with Dr. Ambedkar that the civic address was all the more eloquent of the regard in which he is held, because it was free from the conventional lines of Civilisation."

In this reply to the address presented, Dr. Ambedkar spoke with refrosting candour and gave expression to views which are shared by the bulk of our countrymen. At a time when schemes of political reforms are being considered, when the goal of independence is being pressed, it is well to have a correct appreciation of the various factors that should be taken into consideration. It is but natural that under such circumstances, the lessons of the past should not be forgotten — particularly the lessons of the immediate past. Referring these lessons, Dr. Ambedkar observed, "In this country no matter what they did, the Bramhins were the governing community. They came to the surface and nobody else. In each of the seven provinces they had Bramhine Prime Ministers with half the ministry of Bramhins. The elections proved that in this country there was only one community that was destined to be governing class and it came out as the governing class." It will interest our readers to note that even when there was a change in the Ministry, it was always a Bramhine who was chosen as Prime Minister thus establishing the convention that it was only an Amurath that should succeed an Amurath. The setting up of the Congress Parliamentry Board was itself an

ingenious way of ensuring that the time honoured governing class should exercise authority and control. Thus in the very choice of Congress Candidates it was not the Provincial Congress Committees that had the final voice but the Chairman of the Parliamentry Board. Nay, the presidents of the Provincial Committees even, had no say in the matter, but it was left to a Congress member like Mr. Rajgopalacharya to take these recomendations and obtain the final approval of the Parliamentry Board. Is it any wonder that under such circumstances, Non-Bramhins with any degree of independence and those who were not likely to prove themselves docile and submmissive had no chance of being even nominated as candidates ? Would it surprise any of our countrymen that under these circumstances a person like Dr. Ramalinga Reddy who was the leader of the Congress opposition in the previous legislative was not selected and was put into cold storage when hundreds of persons whose fame and name were hidden in the Congress archives suddenly found themselves in the limelight and were chosen as a candidates ?

If even in the selection of candidates the power was centred in the Parliamentary Boards. Is it any wonder that when it came a choice of Prime Ministers it was entirely left to a handful to decide ? Naturally all the Prime Ministers were Bramhins. Mr. Rajgopalachari, Mr. Kher, Pandit Pant, Mr. Bardolai, Pandit Shukla etc. like genusomne — all had to be of the chosen race and they in turn saw it that the Ministry was atleast fifty percent pure with members of the governing race. You may extend the franchise as much as you can, you may give adult franchise and you may even give adoloscents and even children the franchise, but what will come to the surface will be the governing race. Not only were nearly fifty percent of the ministry Bramhins but practically all the important portfolios with power and patronage must be in their hands and under their control. Thus to take our own presidency in to — Consideration, Finance, Police, Public Services, Revenue, Medicine and Public Health, Industries, Religious Endowments — in fact

everything of importance had to be under their control. Over and above this, even over the few departments which were thrown as crumbs to the ill-qualified Non-Bramhins, Muslims or Depressed Class Ministers, the Prime Minister had to exercise due control and direct and dictate the policy that had to be pursued. The procedure whereby all power was so effectively concentrated in the representatives of a small community was followed in the other six provinces as well and so once more under the guise of a democratic form of government, the wise rule of the successors of the Peshwas was continued. The inevitable result of such policy was the further enslavement of other nationalities and the exercise of uncontrolled power and authority with the help of British administrators and Governors to put down such elements as may dare to raise their feble voices of protest. The abuse of the much condemned criminal law -- Amendment Act to put down the so called Hindi agitators in this presidency, the installing of Vidya Mandir in the Central Provinces and Bombay furnish eloquent proof of the nature of the democracy that one should expect.

The warning that Dr. Ambedkar has given is therefore, timely and essential "we ought to ask the question" says, "Whether the governing class in a particular country has a sense of responsibility, so that the government of the country can be entrusted to that country. We have all forgotten the fact that the right to govern must be decided in the light of the sense of responsibility of the governing class. What is the outlook of the governing class ? What is its philosophy ? What does it believed in ?" Answering these questions, Dr. Ambedkar pertinently observes, "If you have governing class which believe in graded inequality if it believes you must not touch another human being, if it believes that a certain class alone is entitled to education and not others, if it believes that one class alone is entitled to property and another class is born to be servile and to die in servility, if a national government was formed and if it went in to the hands of this governing class, do you think that such a national government will be better than

the present government of India ?" These doubts are by no means imaginary. They are on the other hand based on the bitter experience of the past and on the black prospects of the present. It is no use hiding the truth that the governing class has little or no sympathy for the masses. In words of great *Dathos*, their orators may speak with eloquence of a Burke or a Cobden, but their performance will give the lie direct to their eloquent offusions. Their interest in education is limited to the facilities available for their own community. Their fight for jobs will be most strenuous when the jobs are to benefit their kith and kin. Their plea for self government will be most vigorous, so long as it will help to keep their men in power. If there is no possibility of such a consumation, they will commit a somersault and ask for Section 93 to come into vogue. Dr. Shyam Prasad Mukherjee when he urged the British Government to overthrow the present Bengal Ministry and introduce Government under Section 93 was by no means expressing his personal views or wishes. He is by no means the exception. And in framing of the future constitution, the different nationalities have to take these facts into consideration and see to it that the political future of India does not yield to them the Dead Sea fruit of servility and enthrone the governing class once more in authoritarian rule, "Dr. Amberkar has rendered a great service to the cause of freedom and the future of India by his outspoken uttarances and we thank him sincerely for it."

मद्रास कार्पोरेशनने बाबासाहेबांना मानपत्र दिले. त्याबद्दल कार्पोरेनवर आणि त्या मानपत्राला उत्तर देताना बाबासाहेबांनी जे भाषण केले त्यावर मद्रासच्या फ्री प्रेस या पत्राने रविवार दि. २४–९–४४ च्या अंकात विरोधी दृष्टिकोनातून टीका केली ही टीका "Dr. Ambedkar's Antitics" या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाली होती.

मानवतेच्या सुखसंवर्धनासाठी ज्या व्यक्तिंनी कांही कार्ये केलेली आहेत व ज्यांचा जगात नांवलौकीत झालेला आहे अशाच व्यक्तींना कार्पोरेशनने मानपत्र द्यावे, इतरांना देणे हे कॉर्पोरेशच्या इभ्रतीला न शोभणारे आहे. आंबेडकर हे अशा व्यक्तीपैकी नाहीत. ते सरकारचे हस्तक आहेत. आपल्या मालकाची स्तुतीस्तोत्रे गाणे, हेच त्यांचे मुख्य कार्य होय. म्हणूनच त्यांनी सध्यांच्या साम्राज्यशाही हिंदी सरकारची

बाजू मांडण्याचा हास्यास्पद प्रयत्न केला. हिंदी सरकारने काम केले याचा पाढा त्यांनी वाचला. पण सरकारने लोकांसाठी केलेली कामे किती कमी व तात्पुरत्या स्वरुपाची आहेत हे कार्पोरेशनच्या लक्षांत आलेले नाही. **आंबेडकरना** मानपत्र देण्यात कार्पोरेशनने आपले हंसे करून घेतले आहे. १९३७–३९ च्या काळांत काँग्रेसचे जे मंत्री निवडले ते असक्यातमक्या जातीचे म्हणून निवडले नाहीत. ते जनतेच्या विश्वासातील प्रतिनीधी म्हणून त्यांची निवड करण्यांत आली. ब्राह्मण व काँग्रेस यांच्या संबंधीचा द्वेश आपल्या भाषणांत प्रगट करुन आंबेडकरांनी आपले खरे स्वरुप प्रगट केले. अशा **आंबेडकरांना** मानपत्र देण्यांत कॉर्पोरेशनने अप्रस्तुतपणा व अडाणीपणा दाखविला, हे बरे झाले नाही. अशा अर्थाची ही टीका होती. मूळ इंग्रजी मजकूर मी येथे देतो.

"Such of these Councillors of the Corporation of Madras who voted for the presentation of a civic address to Dr. Ambedkar cannot congratulate themselves either for their wisdom or sense of propriety that prompted their action. Such civic honours are generally intended to be given sparingly to very distinguished persons not merely because they have done great services to humanity and won universal renown. The recepients of such honours in turn are expected to have a due sense of propriety and proportion in the sentiment they express on the occasion. Dr. Ambedkar has rarely been known to possess such qualities and his reply to the civic address of the Madras Corporation was noted neither for its sanity nor for its appropriations. On the contrary, it was one more evidence of his usual aborrations. Problems connected with municipal administration and labour are many and the learned Doctor had no dearth of subjects to dilate upon. And yet he could think of nothing better than a pitiable defence of the Government of the day and a sort of unbridged communal tirade against the congress to suit the occasion. Evidently he thought it was his holy duty to enlighten the ignorant people of this benighted province upon the little known virtues of the present administration and the efficiency of the wonderful measures taken by it for the betterment of labour in this country. There is nothing strange in an obedient servant eulogising his master's virtues, real and imaginary and Dr. Ambedkar is no ordinary Slave of the ruling bureaucracy. One of

such measures which exites his administration is the scheme of technical training by which 68,000 men had been made into skilled workmen through 300 or 400 training centres. What wonderful achievement for a population of 400 millions! In the same breath he only hopes that such measures would not stop into the war times and that they would continue even after the war. In pre-war time as we have pointed out once before, institutions for technical training were negligible in the country and it is true that within the last 2 or 3 years their numbers were increased not as permanent factors but only to Subserve the immediate war purposes. Even while the learned Doctor is expressing such pious hopes, the process of reduction in the number of these institutions is going on. The introducting of the principle of arbitration in the labour disputes and legislation to better their conditions of service are other measures were expediated upon to prove the Governments worthiness. But he too has to confess that the almighty — administration is powerless in the present state of affairs to pursue the matter further and to put such good things on a permanent basis as much of that work is under the jurisdiction of the Provincial Governments and even while the Centre has concurrentt jurisdiction it has to abide by the wishes of the local bureaucrates. What wonderful spirit of democracy rules the Government of India so as not to interfere at all with the discretion of the local Governments.

The learned Doctor is certainly not behind anyone in his desire for a National Government, Swaraj or independence. Only he finds it impossible to visualise a better alternative for the present Government and herein lies the most wonderful part of his performance in his reply to the civic address. He takes for granted that in every country there are always two classes, namely, the governing one and the governed. But according to him in this country the former has always been and would ever be Brahmins and they would not care for those who can never have the

chance to govern. He protects, that he is not making any wild statement when he asserts that in each of the seven Congress provinces we had a Brahmin Prime Minister with Brahmins forming half the Ministries. At any rate so far as Madras was concerned only three out of ten Ministers were Brahmins. Most of the legislators were other members of that much maligned community; and they were not unconscious of their communal rights. All the same, leaders of the Congress Parties in the legislatures and Ministers were chosen not because they happened to command the confidence of the people at large and their elected representatives most of whom were certainly not Brahmins, None of such Congress Ministries need be ashamed of their work. More than the Government or any other party, it is the Congress and its leaders who have done the greatest possible service under present day circumstances to the Depressed classes. With all the notorious shortness of public memories even Dr. Ambedkar cannot deny that his community got much more in the matter of representation to the legislatures from Congress leaders than from the Government. Whatever might have been the ancient habits and prejudices in the matter of treatment of Scheduled Classes, Congress leaders have been unceasing in their efforts to improve their condition and none can show a better record of work in that direction than Gandiji, the foremost leader of the Congress. Not withstanding all the aderrations of Dr. Ambedkar and men of his ilk, the Depressed Classes know only too well on whom to rely for their salvation in future also. Even assuming for arguments sake that the condition of the community has not improved and that the attitude of the so-called governing classes has not changed from what it was in mediaeval times, it is pity, the learned Doctor is unable to visualise, that the governance of the country by some or other of its own people is any day mere conducive to safeguard the interests of its people as a whole then any administration by foreigners who cannot help having this own vested interest to subserve at the expense of the masses of that country. History would tell him that India under

Mohammedan rule was more prosperous than now economically for the simple reason that the then ruling class who formed part of the people of the land and looked to its intersts without frittering away its resources for the benefit of others. Perhaps Dr. Ambedkar is not unaware of these obvious truths and if still he trots out the Brahminology as an argument against the attainment of freedom of India or formation of a National Government, he has no other go except to play the stale stunt as he has to dance to the tune of his Imperial masters". (The Madras Free Press dated 24-9-44).

शेड्यूल कॉ. फे. च्या कार्यकारिणीची बैठक मद्रास येथे शनिवारी २३ सप्टेंबर १९४४ ला भरली होती. अध्यक्ष **रावबहादूर एन. शिवराज,** M.L.A. (Central) हे होते. या बैठकीला **बाबासाहेब** आमंत्रणावरून हजर राहिले होते. बैठकीत ११ ठराव मंजूर करण्यात आले. शीख आणि मुसलमान यांना क्रिप्सच्या योजनेत ज्या अर्थाने अल्पसंख्यांक मानण्यात आले त्याच अर्थाने अस्पृश्य वर्गाला मान्यता द्यावी. कारण तो सर्व शीख व मुसलमान या वर्गाप्रमाणेच अल्पसंख्यांक म्हणून जगतो. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नांची निरगांठ लौकर सोडविण्याच्या दृष्टिने 'हदूनी या सरकारी मान्यतेला मान तुकवावी. अस्पृश्यांना कायदे मंडळे, जिल्हा तालुका बोर्डे, म्युनिसीपालीटीच्या, सरकारी खात्यातील (प्रांतिक आणि मध्यवर्ती) नोकऱ्या, शिक्षण, वसाहती, औद्योगिक व्यवसाय वगैरे बद्दल आर्थिक साहाय्य, यांची सोय सरकारने करावी, आणि अस्पृश्यांना स्वतंत्र राजकीय जीवन जगण्याची तरतूद करावी अशा अर्थाचे ठराव बैठकीत मंजूर झाले. या बैठकीचा वृत्तांत "Scheduled Castes Plea — Seperate Element" या मथळ्याखाली टाईम्स ऑफ इंडियाच्या २५–९–१९४४ च्या अंकात (पा. ५ सोमवार) आला होता.

ऑल इंडिया शेयूल कास्टस् फेडरेशनच्या कार्यकारी मंडळाची बैठक शनिवारी २३–९–१९४४ ला तिसऱ्या प्रहरी रावबहादूर **एन. शिवराज** यांच्या रांयपेटा, मद्रास, येथील घरात भरली होती. २३ पैकी १८ सभासद उपस्थित होते. अध्यक्ष शिवराज होते. **बाबासाहेब** खास आमंत्रणावरून उपस्थित होते. बैठकित खालील ठराव मंजूर झाले. १) **गांधीजी** यांना व्हॉईसरायने १५-८-४४ ला पत्र पाठविले होते. अस्पृश्य वर्ग हा हिंदी समाजाचा महत्वाचा व निराळा भाग आहे, आणि स्वातंत्र्याची देणगी भारताला देण्याच्या अगोदर त्या वर्गाची संमती घेतली जाईल असे सदर पत्रात व्हाईसरायने मत प्रदर्शित केलेले आहे. असा प्रचार काही वर्तमानपत्रे करीत आहेत. अस्पृश्य वर्ग हा स्वतंत्र व अगदी वेगळा वर्ग आहे, आणि तो धार्मिक दृष्टीने अल्पसंख्य आहे. क्रिप्सच्या योजनेप्रमाणे हे मत खरे आहे.

भारताला स्वातंत्र्य लौकर मिळविण्याच्या दृष्टीने हे खरे मत सर्व राजकीय पक्षांनी व विशेषतः हिंदूंनी मान्य केले पाहिजे. तरच हिंदू व अस्पृश्य समाज यांच्यात परस्पराबद्दल स्नेहभाव राहील. अस्पृश्यांच्या संमतीशिवाय भारताला स्वातंत्र्याची देणगी देण्यात येणार नाही, असे ब्रिटिश सरकारने जाहीर केलेले आहे व त्याला व्हॉईसरॉयने जाहीरपणे पाठिंबा दिलेला आहे, याबद्दल कार्यकारी मंडळाला आनंद होत आहे.

२) घटनात्मक संरक्षण व तरतूदी-भारताची जी राज्यघटना (अ) अस्पृश्यांच्या संमतीशिवाय तयार करण्यात येईल, व (ब) तीत अस्पृश्य वर्ग हा स्वतंत्र आणि अगदी वेगळा वर्ग आहे, असे मान्य करण्यात आलेले आहे. (क) राज्यघटनेत खालील योजनांची तरतूद केली पाहिजे.

(१) अस्पृश्यांच्या दुय्यम आणि उच्च शिक्षणाला मदत देण्यासाठी प्रांतिक व मध्यवर्ती सरकार यांच्या अंदाजपत्रकांत कांही ठराविक रक्कम नमूद करण्यात आली पाहिजे. (२) अस्पृश्यांच्या वसाहती निर्माण करण्यासाठी वसाहत अधिकारी नेमणे व त्या वसाहतीसाठी स्वतंत्र राखीव जमिनी ठेवणे, याबद्दल प्रत्येक सरकार जबाबदार असले पाहिजे (३) कायदेमंडळ, राज्यकारभाराचे कार्यकारी मंडळ, नगरपालिका व स्थानिक स्वराज्यसंस्था, पब्लिक सर्विस कमीशन सरकारी नोकऱ्या, यांत अस्पृश्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत आणि त्यांच्या प्रगतीसाठी भरपूर राखीव जागा ठेवणे, ही प्रत्येक सरकारची जबाबदारी समजली पाहिजे. (४) वरील तरतुदी घटनेच्या प्रमुख तरतुदी म्हणून समजाव्यात, आणि त्यात फेरफार करण्याचा हक्क कोणत्याही सरकारला नसावा. (५) या तरतुदांची अंमलबजावणी कशी होते याबद्दल देखरेख करण्यासाठी, एक अधिकारी-ऑडिटर जनरलच्या दर्जाचा (१९३५ च्या कायद्याच्या १६६ कलमान्वये)-नेमण्यात यावा. त्याने आपला अहवाल सरकारला सादर करावा; आणि गुन्हेगार अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्याचा त्याला अधिकार असावा. (६) जातीय प्रश्नांचा उभय पक्षाला हितदायक असा लौकर निकाल लावणे इष्ट आहे. तथापि, गांधी व जीना हे हिंदु मुसलमानांच्या प्रश्नासंबंधी जी गुप्त खलबते करीत आहेत ती मंडळाला नापसंत आहेत. जातीय प्रश्न अशा काही रीतींनी सोडविण्याचा खटाटोप करणे, हे कोणाही जातीला हितवाह नाही, यामुळे जातीजातीत अविश्वास वाढेल. सर्व जातींनी मिळून आपआपल्या हिताची बाजू मांडून त्याबद्दल निर्णय घेणे, ही पद्धत सर्व जातींना मान्य होईल व त्याचपद्धतीने जातीय प्रश्न सोडविले पाहिजेत असे मंडळाचे ठाम मत आहे.

### ३) निवडणुका :

१) १९३५ च्या कायद्यान्वये ज्या निवडणुका झाल्या त्यावरून अस्पृश्यांना बाधक संयुक्त मतदार संघ व राखीव जागेबद्दलचा अनुभव आलेला आहे. राखीव जागेवर हिंदू आपल्या हातांत बाहुले म्हणून वागू इच्छिणारे अस्पृश्य उमेदवार निवड-

तात व मताधिक्याने निवडून आणतात. यामुळे अस्पृश्यांच्या खऱ्या प्रतिनिधीला निवडणुकींत यश मिळत नाही. म्हणून मंडळाची अशी मागणी आहे कि संयुक्त मतदार संघ व राखीव जागा ही पद्धत बंद करावी व स्वतंत्र मतदार संघाची पद्धत अंमलात आणावी.

२) संसदीय राज्यकारभाराची पद्धत हिंदुस्थनांत चालू करणे जरी जरूर आहे. तरी त्या पद्धतीतील अस्पृश्यांच्या हिताला बाधक असणारे धोके डोळ्याआड करतां येत नाहीत. या पद्धतींत बहुसंख्य जमात राज्ययंत्रणा काबीज करते व ती अल्पसंख्य जमातीच्या हिताबद्दल उदास असते. म्हणून अनेक जाती असलेल्या या हिंदुस्थान देशाला संसदीय राज्य कारभाराची पद्धत लागू करणे इष्ट नाही. या देशातील सर्व जातींनी मान्य केलेली राज्यपद्धतच सुरू करणे इष्ट होईल.
या मंडळाची अशी मागणी आहे कि प्रांतिक व मध्यवर्ती सरकारची घडण पुढील-प्रमाणे असली पाहिजे त्याचप्रमाणे अस्पृश्यांना जादा सवलती असाव्यात.

अ) बहुसंख्य व अल्पसंख्य जातीतील निवडून आलेल्या प्रतिनीधींनी एकमताने निवडलेल्या व बदलता येणाऱ्या प्रतिनीधीचे मंत्रीमंडळ असावे अल्पसंख्यांकाचे मंत्री अल्प संख्यांकाच्या प्रतिनिधींनी याच पद्धतीने निवडावेत.

ब) मुसलमानांना नोकऱ्यांमध्ये जो हिस्सा मिळेल तेवढाच हिस्सा अस्पृश्यांना मिळावा. याची तरतूद राज्यघटनेत असावी

४) भावी संरक्षण :

स्वराज्यप्राप्तीनंतर सवर्ण हिंदुंच्या हातात सर्वाधिकार येथील व ते अस्पृश्यांना परोपरीने छळतील व नाडवतील. त्यांच्या या भावी त्रासांपासून अलिप्त रहावे व स्वतःची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सुधारणा करावी, यासाठी अस्पृश्यांना सवर्ण हिंदुपासून दूर असलेल्या सरकारी जागेत वसाहती करणे क्रमप्राप्त आहे. यासाठी हे मंडळ अशी मागणी करते की घटनेमध्ये खालीलप्रमाणे तरतूद केली पाहिजे. १) अस्पृश्यांची स्वतंत्र गांवे स्थापन करणे व तेथे आसपासच्या गांवातील अस्पृश्यांना रहाण्यास नेणे. २) या नव्या वसाहती निर्माण करण्यासाठी वसाहत मंडळाची नेमणूक करणे. ३) जेथे जेथे सुपीक जमिनी असतील व अगर नव्या जमिनी निर्माण करता येतील त्या जमिनी या वसाहत मंडळाने विश्वस्त म्हणून ताब्यात घ्याव्यात व त्याचा नव्या वसाहती स्थापण्यासाठी उपयोग करावा. (४) वसाहत मंडळाला लँड ॲक्विझिशन ॲक्टच्या अन्वये खाजगी मालकीच्या जमिनी वसाहतीसाठी ताब्यात घेण्याचा हक्क असावा. (५) मध्यवर्ती सरकार या वसाहत मंडळाला दरसाल पाच कोटी रुपये वसाहतींचा कार्यक्रम पुरा करण्यासाठी देईल, अशी घटनेत तरतूद असावी.

५) डॉ. आंबेडकर हेच अस्पृश्यांचे एकमेव व खरे प्रातिनिधीक पुढारी आहेत. त्यांच्यावर आमचा संपूर्ण विश्वास आहे. अस्पृश्यांच्या हितासंबंधीची बोलणी

कोणा पुढाऱ्यांशी, पक्षांशी अगर सरकारशी करण्याचा फक्त **डॉ. आंबेडकर** यांनाच अधिकार व हक्क आहे; व या बाबतीत आमचा त्यांना संपूर्ण पाठिंबा आहे.

### ६) मंडळाची पुढील बैठक कलकत्त्यात भरविली जाईल :

फेडरेशनच्या मंडळाने जे ठराव मंजूर केले ते ध्येयवादी दृष्टीने पहांता इष्ट नसले तरी व्यावहारीक दृष्टिने आणि अस्पृश्यांच्या हिताच्या दृष्टिने उत्तम असे वाटतात. असे मत मद्रास येथील **दी हिंदु** या पत्राने मंगळवार दि. २६–९–४४ च्या अंकात "Future of Scheduled Caste." हे स्फुट लिहून आपले मत व्यक्त केले. अस्पृश्यांनी पूर्वीच्या दुःखदायक सामाजिक घटनांचा वेळोवेळी उद्‌घोष करून हिंदु समाजाला चिडविणे आणि आपले स्वतंत्र राजकीय अस्तित्व रहावे अशी सरकारला मागणी करणे, याबद्दल सदर पत्राने नाक मुरडले. अस्पृश्यांच्या या वागणुकीने ब्रिटिश सरकारला भारताला स्वातंत्र्य देण्याच्या बाबतीत टाळाटाळ करायला सबब मिळते व यांत सर्व देशाबरोबर अस्पृश्यांचेही नुकसान आहे. असे मत प्रदर्शित करून सदर पत्राने बाबासाहेबांना विनंती केली की, त्यांनी या बाबतीत, दृष्टीकोन बदलावा.

एम्. अँड. एस् एम् रेल्वे ईम्प्लॉईज युनियनने **बाबासाहेबांना** पेरांबुर येथील आपल्या कचेरीत शनिवारी २३–९–१९४४ ला संध्याकाळी मानपत्र दिले. अध्यक्ष **श्री. सी. कृष्णमूर्ती** होते. **श्री. शिवसुब्रम्हनियम** यांनी मानपत्र वाचले. या युनियनमध्ये जे अस्पृश्य कामगार होते त्यांच्यातर्फे दुसरे मानपत्र देण्यांत आले. ते अध्यक्षांनी वाचले.

दोन्ही मानपत्रांना उत्तर देतांना **बाबासाहेब** म्हणाले, मद्रास प्रांत हा खुळया धार्मिक समजुतीचा बालेकिल्ला आहे. पण आज येथे ज्या कामगार लोकांच्यातर्फे ही सभा भरविलेली आहे त्यांत ख्रिस्ती युरोपियन, अँग्लोइंडियन, हिंदू, मुसलमान, अस्पृश्य ख्रिस्ती अस्पृश्य वगैरे मजूर व अधिकारी आहेत. यावरू हेच सिद्ध होते कीं, दारिद्य ही या सर्वांना एकत्र बांधणारी दोरी आहे. तुम्ही सर्व कामगार एकजुटीने राहिला तर तुम्हाला आपले सध्याचे दारिद्र्याचे जिणे नष्ट करण्याचे मार्ग चोखाळता येतील. महायुद्ध संपल्यानंतर भारताला जादा राजकीय हक्क मिळणार आहेत; याबद्दल वाद नाही. पण ते हक्क सर्वस्वी दुसऱ्यांच्या हातांत न जाता त्यांत मजूरांचाही मोठा हिस्सा असला पाहिजे. कारण हातात राजकीय सत्ता असली की कोणत्याही वर्गाला आपली सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यास मदत होते. म्हणून कामगार वर्गाने ट्रेड युनियनच्या चळवळीला सांभळता सांभळता भारताला जे राजकीय हक्क मिळणार आहेत ते वसाहतीच्या स्वराज्याचे असावेत अशी चळवळ केली पाहिजे. भारताच्या घटनेत कामगारांचे जे खास हक्क नमूद केले जातील त्यांत राजकीय हक्कांना प्राधान्य दिले पाहिजे मध्यवर्ती कायदे मंडळात ५० टक्के आणि प्रांतिक कायदेमंडळात ३० टक्के जागा कामगारांसाठी राखून ठेवल्या पाहिजेत. यासाठी तुम्ही चळवळ करा. मजूर

खाते माझ्याकडे आहे. ते मला सुव्यवस्थित करावयाचे आहे. मजूरांचे जास्तीत जास्त कल्याण करणे, हेच माझे ध्येय आहे.

अस्पृश्य मजूरांना उद्देशून बाबासाहेब म्हणाले, रेल्वे, पोस्ट आणि तारयंत्र खात्यात १३ टक्के जागा राखण्याचे मध्यवर्ती सरकारने ठरविलेले आहे. पण अस्पृश्य वर्गाच्या शिक्षणाची प्रगती पहाता ८·१/३ टक्के जागा अस्पृश्य वर्गाच्या वाट्याला येतात. तरी अस्पृश्य वर्गात शिक्षणाची प्रगती झपाट्याने व्हावी आणि या १३ टक्केवारीचा भरपूर फायदा समाजाला मिळावा.

**श्री. आर. डी. मेनार्ड,** जनरल, मॅनेजर, एम अँड एस रेल्वे यांनी **बाबासाहेब** आभार मानले. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** हे मजूरांचे हितकर्ते आहेत, अशा अर्थाचे त्यांचे भाषण होते.

**श्री. एस. फ्रॅन्सिस,** सेक्रेटरी. तामीळनाड डिप्रेस्ड क्लास खिश्चनस असोशिएशन, त्रिचिनापल्ली, यांनी गुरुवारी (२२ सप्टेंबर) **बाबासाहेबांची** भेट, मद्रास रेल्वे स्टेशनमध्ये **बाबासाहेबांच्या** सलूनमध्ये घेतली होती. त्यांनी खिस्ती अस्पृश्य कामगार आणि हिंदु अस्पृश्य कामगार यांच्यात फरक करण्यात येतो व त्यामुळे खिस्ती अस्पृश्य कामगारांचे फार नुकसान होत चालले आहे. हिंदु अस्पृश्य कामगार आणि खिस्ती अस्पृश्य कामगार यांना समान सवलती असाव्यात, अशी त्यांनी भाषणात विनंती केली.
(The Mail, Madras, 24-9-44, The Liberator, 25-9-44 and The Hindu, 26-9-44)'.

ताडेपल्लिगुडम् या शहराला **बाबासाहेब** जेव्हां भेट देतील तेव्हां त्यांचे भव्य स्वागत करण्याचे तेथील अस्पृश्य वर्गांनी ठरविले. राजमहेंद्री शहरात **बाबासाहेब** जेव्हा येतील तेव्हां त्यांना मानपत्र देण्याचा निर्णय तेथील म्युनिसिपल कौन्सिलने घेतला. (The Hindu, 26-9-44). गुडीवुडा येथे जेव्हां **बाबासाहेब** येतील तेव्हा त्यांना मानपत्र देण्याचा निर्णय म्युनिसिपल कौन्सिलने घेतला. (The Hindu,1-10-44)

मद्रास येथील मेमोरियल हॉल, पार्क टाऊन, येथे रविवार दि. २४-९-४४ रोजी संध्याकाळी अस्पृश्यांची प्रचंड जाहीर सभा झाली. अध्यक्ष **रावबहादूर एन. शिवराज** होते. यासभेत **बाबासाहेब** आले तेव्हा लोकांनी उठून त्यांचे प्रचंड टाळ्यांनी व जयघोषांनी स्वागत केले. अध्यक्षांनी **बाबासाहेबांचे** स्वागत करणारे भाषण केले. त्यांना या सभेत (१) मद्रास आदि द्रवीड वर्कर्स असोसिएशन. (२) साऊथ इंडियन बुद्धिस्ट असोसिएशन व (३) शेड्यूल कास्ट फेडरेशन ऑफ दी सिव्हील अँड मिलीटरी स्टेशन, बंगलोर (४) मद्रास शेड्यूल कास्टस स्टूडंटस असोसिएशन (६) आंध्र प्रॉव्हिन्सियल शेड्यूल कास्टस वेलफेअर असोसिएशन आणि इतर संस्थांतर्फे मानपत्रे देण्याचा समारंभ झाला. एका तरुणाने बाबासाहेबांना भगवान बुद्धाचे सुंदर रंगीत चित्र अर्पण केले. मानपत्राबद्दल आभार मानून **बाबासाहेबांनी** या सभेत भाषण केले त्यांत त्यांनी

प्रतिपक्षांना प्रक्षोभक वाटणारी पूर्वीची कांही माहिती सांगितली या भाषणाचे वृत्तांत दी हिंदु आणि दी मेल (२६–९–४४) या मद्रासमधील पत्रांनी प्रसिद्ध केलेला होता. त्या वृत्तांवरून **बाबासाहेबांचा** सदर भाषणाचा सारांश मी येथे देत आहे.

मी मद्रासला आल्यानंतर येथील जनतेने माझे मोठया प्रमाणात व अनेक ठिकाणी स्वागत केले हे पाहून मला आनंद झाला. एरवी सवर्ण हिंदु व काँग्रेस पक्षीय लोक मला पाण्यांत पहातात. माझा पाणउतारा करण्याचा एकही प्रसंग ते दवडत नाहीत तसा आताही त्यांनी दवडलेला नाही पण माझे जे इतरांनी प्रचंड स्वागत केले त्यापुढे ही हीन अंतःकरणाच्या लोकांची कोल्हेकुई म्हणजे 'नगाऱ्यापुढे टिमकीची घाई' असा प्रकार झाला.

भारतात राजकीय क्षेत्रात आज जी कोंडी निर्माण झालेली आहे ती काँग्रेस व इतर राजकीय पक्षाचे पुढारी यांच्या भ्रममूलक विचारसरणीमुळे आणि नालायकीमुळे झालेली आहे. मद्रासचे रहिवाशी **श्रीनिवास शास्त्री** हे कांही दिवसापूर्वी म्हाणाले की, **आंबेडकराने गांधीजीवर** वेळोवेळी टीका केली. **गांधीजी** म्हणजे राष्ट्राचा आत्मा त्यांच्यापुढे **आंबेडकर** म्हणजे कः पदार्थ. जेव्हां जेव्हां आंतरराष्ट्रीय परिषदेत भारताचा प्रश्न चर्चिला जाईल तेव्हां तेव्हां **आंबेडकरला** त्या परिषदेत भाग घेऊ देऊ नये. **गांधीजी** आणि **शास्त्री** यांनी दुसऱ्या वर्तुळ परिषदेच्या वेळी १९३० साली लंडनमध्ये कोणते कोणते घाणेरडे व राष्ट्रघातकी प्रकार केले, याची माहिती तुम्हांपुढे ठेवली म्हणजे हे सवर्ण हिंदू मला कां शिव्याशाप देतात, याचा उलघडा होईल.

मी वर्तुळ परिषदेत अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची मागणी केली ती एका भूमिकेवरून, ती भूमिका म्हणजे राजकीय क्षेत्रात अस्पृश्य वर्ग हा हिंदु समाजापासून अलग असा निराळा भाग असावा. हेतु हा कि, अस्पृश्य वर्ग राजकीय दृष्टीने प्रबळ झाला तर तो हिंदूतील इतर जातींना व इतर अहिंदू समाजाला आपल्या राजकीय हक्कांमुळे मुठीत ठेवू शकेल व तो स्वतः आत्मप्रगती करून घेऊन इतर समाजाच्या दर्जाला जाऊन पोहोचेल. माझ्या या भूमिकेमुळे गांजीजी व इतर हिंदुप्रतिनिधी यांच्या अंगचा तिळपापड उडाला. माझी भूमका हाणून पाडण्यासाठी त्यांनी मुस्लीम प्रतिनिधींशी गुप्त खलबते केली. त्यांनी मुसलमानांना सांगितले तुमचे १४ मुद्दे मी काँग्रेसला मान्य करावयास भाग पाडतो; पण तुम्ही अगोदर अस्पृश्यांचा राजकीय हक्कांना जो पाठिंबा देता तो काढून घ्या. या बाबतीत गांधी व मुसलमान यांच्या वाटाघाटीनंतर एक गुप्त करार झाला; त्याची प्रत मज जवळ आहे. परंतु सांगण्यास आनंद वाटतो की, ठरल्याप्रमाणे मुसलमानांनी अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांना दुसऱ्या वर्तुळ परिषदेत विरोध केला नाही. याप्रमाणे **गांधीजींची** फजिती झाली. त्यांची फजिती दुसऱ्यांदा झाली. **गांधीजीने** असे मत परिषदेत मांडले की, प्रांतिक स्वायतत्ता आणि मध्यवर्ती (फेडरल) संयुक्त सरकार भारताला दिले तर काँग्रेस त्याचे स्वागत करील.

तेव्हां मी गांधीना विचारले, हे मत मांडण्यासाठी काँग्रेसने तुम्हाला अधिकार दिलेला आहे काय? तेव्हां ते म्हणाले, हे माझे वैयक्तिक मत आहे. पण ते मी काँग्रेसला स्विकारण्यास लावीन. तिसरी फजितीची वेळ म्हणजे, गांधीजीनी परिषदेत असे मान्य केले की, मध्यवर्ती सरकारांत संस्थानिकांना आपले प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क असावा. या **गांधीजींच्या** मताबद्दल मी विरोध दाखविला व त्यांना विचारले, हे मत तुम्ही कोणत्या तत्त्वावर अगर अधिकाराच्या द्वारे प्रगट केले. त्यांनी उत्तर दिले नाही. गांधीजी प्रमाणे **श्रीनिवास शास्त्री** व **सप्रू** यांनी भारताला संयुक्त (फेडरल) सरकार द्यावे अशी मागणी केली तेव्हां ब्रिटिश मंत्रीमंडळीतील मंत्र्यांना आनंद झाला हे एवढयाश्या लहान राजकीय हक्कावर खूष दिसतात असे ते म्हणाले. **शास्त्री** हे बोलूनचालून ब्रिटिशांचे हस्तक आहेत हे सर्वांना माहिती आहेच. ते ब्रिटिशांना न दुखवता जेवढे कमीतकमी राजकीय हक्क मागता येतील तेवढे मागत आलेले आहेत. मी त्यांच्या या मागणीला विरोध केला. भारत वसाहत राज्याला योग्य आहे व तीच राज्यघटना (डोमिनीयन स्टेटसची) देण्यात यावी, अशी मी मागणी केली, तिच्या पुष्ठ्यर्थ मी तर्कशुद्ध व माहितीपूर्ण भाषण केले. **गांधीजी** अगर **शास्त्री** यांनीच भारताच्या राजकीय प्रगतीचा गाडा खुंटाविला. मी नाही! या प्रगतीला जितकी गती मिळेल तितकी देण्यात यावी, असा मी वर्तुळ परिषदेत प्रयत्न केला. आणि आपल्या मूर्खपणांने देशाच्या राजकीय प्रगतीचा खून करणारे हे देशद्रोही देशभक्त म्हणून देशात वावरतात व लोक त्यांना खांद्यावर घेऊन नाचतात, आणि लोक मला देशद्रोही म्हणतात! केवढे हे ऐतहासिक असत्य!!

मी वर्तुळ परिषदेत जी भूमिका घेतली ती क्रिप्सच्या योजनेन नमूद केलेली आहे. तिला उद्देशून व्हाईसरॉयने आपले मत एका निवेदनात मागे व्यक्त केले. त्या बद्दल काँग्रेस पक्षांनी आरडाओरडा केली की, अस्पृश्य वर्ग हा हिंदुसमाजापासून राजकीय दृष्ट्या वेगळा वर्ग नाही. आम्ही अस्पृश्य वेगळे राहिलो तरच आमचा निभाव लागेल. याचा अर्थ हे विरोधक असा करतात की, आम्ही स्वातंत्र्याला विरोध करतो. भारताला स्वातंत्र्य मिळावे, ही आमचीही मागणी आहे. पण ते स्वातंत्र्य अस्पृश्यांच्या हिताला बाधक होणार नाही अशी अगोदर तरतूद झाली पाहिजे, अशी आमची भूमिका आहे. नाही तर, स्वातंत्र्य मिळाले आणि सारा कारभार वरच्यांच्या हाती गेला तर आमचे हाल कुत्रा खाणार नाही असे होतील, अशी आम्हाला भिती वाटते. म्हणूनच आमची मागणी आहे की, ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य द्यावे आणि राज्यघटनेत अस्पृश्यांच्या स्वतंत्र राजकीय आस्तित्वाचे कलम नमूद करावे आणि त्यांना भरपूर राजकीय हक्क द्यावेत, की ज्या योगे ते लौकरच आपली सुधारणा घडवून आणू शकतील आणि इतर समाजाच्या मांडीला मांडी लावून बसू शकतील. यात तुम्हाला कसला देशद्रोह दिसतो? **गांधी–जीना** वाटाघाटीवरून आम्ही काय बोध घ्यावा? या वाटाघाटी करण्याच्या अगोदर **गांधींनी** इतर अल्पसंख्यांक जातींच्या पुढाऱ्यांशी विचारविनीमय केलेला नव्हता.

त्यांना वाटते की, अस्पृश्य, ख्रिस्ती, शीख, वगैरे अल्पसंख्यांक जातींच्या जातीयवादात काहीच संबंध नाही. त्यांना वाटते की जातीयवाद म्हणजे हिंदु व मुसलमान या दोघांचेच भांडण. राजकीय क्षेत्रांत जो जातीयवाद उत्पन्न झालेला आहे त्या वादाशी सर्व अल्पसंख्यांक जातींचा संबंध येतो. म्हणून त्यांच्याशी अगोदर विचारविनीमय करून **गांधीनी जीनाशी** बोलणी केली असती तर त्यांना सर्वांचा पाठिंबा मिळाला असता. ही बोलणी फिसकटली, ही गोष्ट वेगळी. पण जर ती यशस्वी झाली असती. तर त्यांचे निष्कर्ष अल्पसंख्यांक जातींना मान्य करता आले असते काय? निदान अस्पृश्यांनी तरी ते मान्य केले असते. मुसलमानांना खुश करण्याकरितां गांधीजी जीनांना जे जे कांही जादा देणार ते अस्पृश्यांच्या वाटयांतूनच, ! मग आम्ही ते कसे मान्य करूं? अस्पृश्यांना हिंदी राजकारणात नेस्तनाबूद करणे, हेच गांधींचे ध्येय आहे त्यासाठी अस्पृश्य लोक सतत झगडत राहतील.

अस्पृशांना माझे वेळोवेळी हेच सांगणे आहे की तुम्ही राज्यकर्ते होण्याची महत्वाकांक्षा बाळगा व ती सफल करण्यासाठी रात्रंदिवस प्रयत्न करीत रहा. यासाठी तुम्ही कोणाच्या मदतीची वाट पाहू नका. ब्रिटीश सरकारवर अगर कोणा राजकीय पक्षावर अवलंबून राहू नका स्वतःच्या हिंमतीवर, सामर्थ्यावर तुम्ही आपली संघटना, मतभेद विसरुन तयार करा. एक झेंडा व एक पक्ष तुम्ही तुम्ही साऱ्या भारतात उभा केला तर तुम्ही भारताचे राज्यकर्ते होऊ शकाल! हा एक पक्ष म्हणजे फेडरेशन! हिंदी राज्यघटना तयार करण्यात ब्रिटीशांनी अस्पृश्यांना बाजूला सारले तर ती घटना अस्पृश्यांना मान्य होणार नाही.

सवर्ण हिंदूना मी असे जाहीरपणे सांगतो की, तुम्ही आमचा दोन तीन हजार वर्षे छळ केलेला आहे. तो आम्ही विसरतो पण तुम्ही तो पुढे चालू करण्याचा जो दुष्ट डाव चालविलेला आहे तो आम्ही हाणून पाडू. तुम्ही स्वातंत्र्यासाठी लढला. तुम्ही स्वार्थत्याग केला. आम्हीही स्वातंत्र्यासाठी लढू. अनंतरीतीने स्वार्थत्याग करू व स्वातंत्र्य मिळवू. पण नंतर आमची काय स्थिती होणार, याची जाणीव आम्हाला आहे. ती तुम्हाला नाही. १९१६ साली आयर्लंडच्या स्वातंत्र्याचा प्रश्न विचारासाठी आला तेव्हा त्या देशांतील कॅथोलीक लोकांचा पुढारी (**रेमंड** याने), प्रॉटेस्टंट लोकांचा व आयर्लंडचा पुढारी सर **एडवर्ड कार्सन** यांना सुचविले की, तुम्ही स्वातंत्र्याला पाठिंबा द्या आम्ही तुम्हाला ज्यादा संरक्षक हक्क देतो. तेव्हां **कार्सनने** उत्तर दिले, "तुमच्या ज्यादा हक्कांना आम्ही ठोकराने उडवितो. तुमचे आमच्यावर राज्य नको." ही भूमिका अस्पृश्यांना घेतां आली असती पण ती त्यांनी घेतलेली नाही. तुम्ही आम हिंदु लोक खरोखर देशभक्त असता तर अस्पृश्यांचे हे प्रश्न तुम्ही उत्पन्न होऊच दिले नसते. पण तुम्ही खरे देशभक्त नाही. देशभक्तीच्या नावाखाली तुम्हाला चातुर्वर्ण्याचे राज्य आणावयाचे आहे. भावी इतिहास तुम्हाला खरोखरीच देशद्रोही ठरवील.

हिंदी राज्यघटना तयार करण्यात अस्पृश्यांना तुम्ही समानतेने जवळ करा नाहीं तर तुमच्या देशद्रोहीपणाची जगात छी : थू : होईल.

असा **बाबासाहेबांच्या** भाषणाचा सारांश होता. भाषणानंतर टाळ्यांचा प्रचंड कडकडात व **'जयभीम' आंबेडकर झिंदाबाद** वगैरे जयघोषणांचा जल्लोष झाला. प्रेक्षकात हजारो लोक इंग्रजी न समजणारे होते. त्यांच्यातर्फे कांही गृहस्थानी तामीळ-मध्ये भाषण करून विनंती केली की बाबासाहेबांच्या भाषणाचा गोषवारा तामिळीमध्ये सांगावा. तेव्हां अध्यक्षांनी खुलासा केला की या भाषणाचा अनुवाद, आम्ही लौकरच प्रसिद्ध करु व मोफत वाटू तेव्हांही टाळ्यांचा कडकडाट झाला.

मेल पत्राने (२६–९–४४) बाबासाहेबांच्या भाषणाचा वृत्तांत बराचसा विस्तृत दिलेला होता. त्यांतील काही भाग मी येथे उद्धृत करतो......

"SHASTRI — A "LAP DOG" OF BRITISH GOVERNMENT

Let me begin my saying that in this city of Madras, Dr. Ambedkar said, "I, have heard two comments made by a very distinguished citizen of this city which have been very uncomplementary to me — the speeches recently made by the Rt. Hon. U. S. Shrinivas Shastri. Mr. Shastri on one occasion, when his mind was not perturbed by this issue of Pakistan and when he still regarded Mr. Gandhi as the embodiment of India's soul, who alone in fulness can represent India at any International gathering, said that whatever might happen, the public of India should take a great deal of precaution to see that under no circumstances I had a place in any international conference. I was somewhat surprised to hear that kind of language from that old venerable politician, I was searching my heart in order to find out wether really in the whole of my public career which I am ready to admit is not so extensive as that of the Rt. Honourable Shastri was probably as glorious as that of his, whether during the short span of my public life; I have done something so disgraceful that India would be ashamed to see me sitting at an International gathering, I do not wish to use any abusive language, for I could have very easily said that the Rt. Hon. Shastri was a "lap-dog" of the British Government. He has been sitting on the lap of the British Government all this while and if he had achieved any notoriety and greatness either in India or

outside, it was largely due to the fact that the British Government had been pleased to make him a "show boy", I do not wish to say that what Mr. Shastri has said, is really Croakings of an old crow sitting on a diseased bowel."

What is that most of the congressmen have been generally saying ? The scheduled castes have been inimical to the general interests of the country, it was stated.| I would like to say that I have sat side by side with the greatest man in this country viz. Mr. Gandhi the Rt. Hon. Shastri, Sir Tej Bahadur Sapru, and I can enumerate a host of public men in India who undoubtedly occupy the first place and rank in India's politics.| I have watched him doing what a Nationalist can be expected to do, and I am confident, not only confident but proud that whenever any public question came up at the Round Table Conference, I was far ahead of the gentlemen who are supposed to be the patriots of India (cheers).

GANDHI'S DOINGS AT R.T.C.

Most people assembled here do not know the doings of Mr. Gandhi at the R.T.C. You all think that the parts we played there were glorious ones. Is that the true story ? What did Mr. Gandhi do ? You all know that in 1930 when Gandhi attended the R.T.C. a mandate was imposed upon him that he should ask for Independence and that India should not accept anything less than Independence, something which was undoubtedly beyond the many super politicians in India were prepared to ask.| What did he do ? It is regrettable to state and I think in view of the fact that I am so invariably accused of having played the part of a "black lag" at the R.T.C. I must state the story, 'You will be surprised to' hear what I may tell you. This old amable gentleman who went to the R.T.C. with a mendate to demand nothing short of Independence, what did he do ! He said to Sir Samuel Hoare, the then Secretary of State, that he was quite prepared at this stage to be content with Provincial Autonomy, a most extraordinary thing.| Those of us who do not belong to the congress, on the other side,

had taken up a stand that whether in 1930, India was ripe or prepared for Dominion status or not, the Indian people would insist in all circumstances to have at least some share of responsibility at the centre. Indians would never agree to be content with merely Provincial Autonomy but they would insist upon some introduction of responsibility at the centre. The old gentleman was of course expected to go much beyond that, as his mandate was independence. Curiously, unfortunately and fatally for this country, the old gentleman was so manouvered that he was made to agree that in the circumstances of 1930, he was prepared to be content with and accept the recommendations by the Simon Commission.| Gentlemen, who rescued the situation ? Sir Samuel Hoare, the then Secretary of State and the conservative Party which was in office were very anxious to close down the R.T.C. A great point was that we had appointed a Tripartite Commission, representing the three Parties in the Parliament, the liberal, Labour and Conservative Parties, Sir Samuel Hoare looked upon it as a point of honour that Parliament should stand by the recommendations of Simon Commission and should not proceed beyond that they had recommended.| Mr. Gandhis attitude was God sent interference. The argument presented by Sir Samuel Hoare that if Mr. Gandhi is not the greatest man in India, who was greater than him ? Who is Sapru, who is Dr. Ambedkar and who is Jinnah ? If Mr. Gandhi is content with Provincial Autonomy, the whole show should be closed down and the conference shut up and the Parliament should be proud to frame a bill in terms of the Simon Commission· I was who protested against that kind of thing, we said such a thing we can never have and we can never be a party to it, we raised so much disturbance that the British Cabinet was obliged to appoint a small Cabinet Committee in order to take evidence as to what the real sense of the Representatives of the R.T.C. was Representations were invited in order to test the case and I was one of the patient men who were called upon to give evidence before the cabinet committee.| It was presided over by the

Lord Chancellor, The Prime Minister and the Secretary were the other two members. I like to say and I am proud of the fact that I was one of those who told the committee of the cabinet that even the Depressed Classes will not tolerate the Parliament going back, Is that an ignorable part that one can say I have played ? Can it be said that the Scheduled Castes stood against responsibility at the centre ?" "Let me tell you another instance," continued Dr. Ambedkar, "we have got innumerable Native States in this country, really 1/3 of our population lives under the rule of the Indian Princess, where there is no law, where everything is done at the personal authority and at personal whims of Princess. It was one of the decisions at the R.T.C. that the Indian States should be brought in as one of the elements in the All-India Federation.| The great issue was whether the representations of the Indian States should be elected by the people themselves or whether the representatives of Indian States should be nominated by the, Princess. It was one of the greatest issues over which a long controvercy was going on for good many days. Probably, some of you may be under the impression that on an issue like this, so important, so vital, and I may say, so dear to Mr. Gandhi in his own terms, what was the attitude of Mr. Gandhi on this point ? You will be surprised to hear that Mr. Gandhi bodily went over to the Princess nominating representatives of the states to the conference. It was I alone, a single individual member of the R.T.C. who fought from the very beginning to the end over this issue (cheers). Even the Rt. Hon. Shastri — I may tell you very funny stories about this old gentleman — (voices we shall be glad to hear them). We were all very much opposed to Federation. It was one of the important points which I maintained from the beginning to the end that the politics of British India should not be mixed up with the politics of Indian States. British India has been separated from Indian India, particularly for over 150 years. No doubt, we have common destiny. None the less, the fact remains that we in British India have travelled a different Road. The Indian

States have been going along a different road. We have got different sorts of political education which they have not.

## PROBLEM OF INDIAN STATES

We have inherited different political traditions, and therefore I was all along insisting that British India should be permitted to travel on her road for political emancipation rather than have her destiny mixed up complicated by the introduction of Indian States. The Rt. Hon. Shastri was one of our colleagues, or "conspirators". We were only three, Sir Chintamani, Shrinivas Shastry and myself who hugged only hearts with the British India. We had put him — (Shastri) up our Champion, being a glorious man who can command greater respect than an youngster one like me. A day before when he was to speak at the Plennary Session I and Chintamani took him to lunch to know whether he was still sour. We found that it was. We walked from Jermy Street to king James' Palace when at 3 O'clock the Rt. Hon. was scheduled to speak. My friends! What did he say ? He got up and said, "My dear Prime Minister, I am a Champion". My heart and Sir Chintamani's were strong enough. Otherwise we should have died of heart-failure'. Mr. Sastri said that he was in favour of Federation and he was running after me telling me that I was a strong patriot and I was up-turning our apple carts, why don't you keep quiet? If Mr. Gandhi was sincere and if the cause of the people of Indian States was dearer to him, it was necessary that they should be emancipated frcm the tyranny and oppression of personal rule of the Princes. He was the first man who ought to have said that representation should be made by elections. Mr. Gandhi instead said, he was in favour of the Princess nominating their representatives. I may tell you one thing. There is one thing, I know that Mr. Gandhi knows very little of politics, (Laughter), I am not saying this in any carping spirit, I am not passing any judgement over him nor to receive cheap applause. But I know it is fact. What happened is this? I was present at the First R.T.C. Mr. Gandhi was not obvious I knew many things and snags, I knew

what strategy and tactics different parties were adopting and I was very anxious that before Mr. Gandhi opened his mouth he should be warned about the land of lies, so that he may know what he should say, and what he should not. At the second R.T.C. when Mr. Gandhi came, I was also a member of Federal Structure Committee. Of course being a representative of the Scheduled Castes, I could not expect to have the first place by the side of the Lord Chancellor who presided (Laughter)."

Giving the order of names of persons, Dr. Ambedkar said, he sat somewhere in the last. "Obviously, when Mr. Gandhi came on the first day, an agenda was placed before us for discussion. I was very much worried by the fact that having regard to Mr. Gandhi's immaturity in political knowledge and having regard to the fact that he was not present at the first R.T.C. I was thirsting to get the first chance to speak so that I could expose the whole business and let Mr. Gandhi know what the situation was.

Dr. Ambedkar narrated here how he spoke to the Lord Chancellor of his little temperature and managed to be allowed by the Lord Chancellor to speak first. The Lord Chancellor asked Mr. Gandhi if he has any objection, Mr. Gandhi for generosity's sake said, no. Dr. added that he spoke for about an hour and a half, and it was probably one of the largest speeches that he had made in that country. After having made the speech and having tendered false excuse, he had to keep appearances and walked out of the Conference. He then added that he was the only man sitting in the whole of London waiting for the approach of evening in order to find out what Mr. Gandhi has spoken. Precisely at midnight, a report of the proceedings of the Conference reached his door. On opening the packet delivered to him by the postman Dr. Ambedkar said, "I found the very first sentence of Mr. Gandhi's speech "My heart is with Dr. Ambedkar but my head is not with him." Everything that I had suggested in my speech he counteracted. I was very furious and I really had temperature although in

the morning — I had none (Cries of Shame Shame). The next morning I went to the Conference. Mr. Gandhi and others were there. As the proceedings were open, I intervened and told the Lord Chancellor that before, the proceedings commenced, I might be permitted to ask Mr. Gandhi certain questions. That is the cause of quarrel between myself and Mr. Gandhi, I asked Mr. Gandhi three questions. One of them was whether he had received any mandate from the Congress in support of this statements that he would welcome the representation of the India Princess by nomination and whether the matter was ever discussed by the Congress, whether the Congress had passed any resolutions and whether he was authorised to do anything. The other question asked of him related to the indirect elections : The Conservative Party was keen on having indirect elections to which we were all opposed. Mr. Gandhi had agreed in his speech that he saw no objection to indirect election. I asked Mr. Gandhi whether it was not a fact that this principle of indirect election was brought out in the Home Rule Bill prepared by Mrs. Annie Besant and which was for that very reason rejected by the Congress The other question I forget at this distance of time. The Lord Chancellor turning to Mr. Gandhi asked him what answer he had to give. Mr. Gandhi refused to give any answer.

If the past has been *sold* (told) if India has been let down, it is not by me, it is not by Scheduled Classes, it was led down by Mr. Gandhi, Mr. Shastri and others.

### PARALLEL FROM IRELAND.

Proceeding, Dr. Ambedkar reminded the Hindus, of the situation in Ireland and How a last effort was made in 1916 towards the uniting the country, referring to the conversation between Mr. Redmond representing the Southern Irish Catholics and Sir Edward Carson, the Irish Leader, and the reply that Carson gave to Redmond when the latter asked the former to ask for any safeguards he liked: "Damn your safeguards, I do not want to be ruled by you." I would

like to tell the Hindu brethern that we in India have a thousand excuses to adopt the attitude of Mr. Carson. We were in justice bound to tell the Hindus, "Damn your safeguards, we do not want your rule. Did we say so ? Have we said it either ? No, we have not said it, although we have every right and every justification to say so. We have played our part in much more humbler manner. We have said, "if you want Home Rule which as the President the Hindu Maha Sabha said would be nothing more than "Home Rule." Still we are large hearted enough because, we realise the interest of the country as a whole. We have said if you want Home Rule, you have it; we will support you. There is only one small condition that we maintain and that condition is : give us reasonable safeguards. That is an attitude which is much more nobler than the one adopted by Carson.

"I would like to ask Mr. Shastri, Mr. Gandhi or any Congress politician whether this attitude is not patriotic, whether it is noble-minded, or whether it is not generous. How much we are forgetting the Brahmanical rule under which we have been suffering for the last 2,000 years in the hope that if we are given safeguards, we may with the help of the other generous elements in the country be able to build up a system in which not only this country will grow to its fullest manhood and nationhood. Can you expect greater generosity, greater and noble spirit than the one we exhibited in all this political controversy. I therefore would like to tell our Hindu brethren that they should better revise their mentality and take into account the sacrifices we are prepared to make, the risks we are prepared to take. Let us come to terms and settle this question. I am quite willing, and prepared to agree. But unfortunately, I have not found adequate response from the Hindu Community. They had been pooh-poohing every time we raised our heads.

Dr. Ambedkar recalled how in 1932, when the question of the Scheduled Castes first came up to the surface and was

placed on the same plane as that of the Muslims and whenever the franchise committtle went in order to investigate and assertain the total number of Scheduled Castes people in the different provinces, he found that all Hindus liberal, narrow minded, broad minded Hindus, all joining together in one conspiracy to tell the Committee that there was no such a thing as Depressed or Scheduled Classes in our country, (shame, shame). It was the same story in U.P., Bihar, Punjab and other places. Why? The answer is very simple. Our Hindu brethern had come to realise that this Majecty's Government had decided to give separate representation to the Scheduled Classes in the Legislature and that the amount of representation would depend upon the Scheduled Castes, and as they could not defeat the project of His Majesty's Government, these substerranean methods were employed to defeat this project by saying that there were no Scheduled Castes at all. That was the sort of strategy a mean strategy that was employed by the Hindus in 1932. Today I find the Hindus are employing another sort of strategy.

## GANDHI-WAVELL CORRESPONDENCE

Dr. Ambedkar drew the attention of the gathering to the Gandhi-Wavell Correspondence particularising the one letter, dated 15th July 1944, which he said was very important and critical. The Viceroy in the letter had stated that while His Majesty's Government was prepared to grant India freedom at the end of the war, His Majesty's Government insist upon one thing, viz. that the constitution shall come into existence which will have the consent of what you call the important elements in the national life of India. The Viceroy also went further and particularised what important elements were. Fortunately for us, and unfortunately for our Hindu brethren he mentioned the Scheduled Classes as an important element in the National Life of India (cheers).

## SEPARATE REPRESENTATION FOR SCHEDULED CASTES

Dr. Ambedkar also referred to the controversy in some sections of the Press that this statement of the Viceroy was new and that it was a departure from the proposals which were put forward on behalf of His Majesty's Government by Sir Staflord Cripps. That is the thing which annoyed him and he could not understand the false and malicious propaganda. He looked to the Hindu Newspapermen and Editors at last to keep themselves thoroughly informed of what they were talking about, know the fact and their launch upon any criticism they liked to make. Dr. Ambedkar said that he need not say how strongly the Simon Commission emphasised the need for giving separate representation to the Scheduled Castes. Could anyboody say that the Scheduled Castes were not a separate and an important element? What made his Majestey's Government give them separate representation at the R.T.C. They had not been a sub-head, or a branch or a sub-community of the Hindus. Why should His Majesty's Government give them separate representation ? They were given separate representation because they (His Majesty's Government) recognised the fact that they were a separate element. Then there was the J.P.C. Report. It is all old history. There has been a great deal after.

"I would like to tell our Hindu brethern" proceeding Dr. Ambedkar said, that it is much better that they drop this idea, and reconsile themselves to the fact that for good or bad, the Scheduled Castes are a separate element in the National life of India. I like to tell them in categorical terms and in a precise manner, — Make no mistake about it.

## JINNAH — GANDHI TALKS

I have nothing else to say on the main problem. People have been asking me, why don't you say something about the talks that are going on between Mr. Jinnah and Mr. Gandhi. I really do not know that anybody can say something about these talks. The talks are so prolonged

that one is in a very difficult position to speculate what is going on between these two old and amiable gentlemen, or whether there is life in the talks. But, I would like to say one thing. I do not take these conversations and I will give you some reasons. Giving the reasons, Dr. Ambedkar said that the communal problem was not mostly a problem between the Hindus and the Muslims. The communal problem was a wider problems. It was a problem where not only Muslims but also Christions, Scheduled Classes and probably other minorities were involved. Consequently in a matter of such nature, the wisest, safest and the most honest course would be for all representatives of the different minorities to sit together, place there cards on the table, let each one know what the other one is asking and let all of them get in common consultation with just regards to their rights of others and give a decision which might be upheld by all. These sectional settlement and arrangements have a bad smell and a bad odour. They appear to me as deals between the two men who have decided to rob the third man and better their position. I do not know what Mr. Jinnah is demanding from Mr. Gandhi. I do not know what Mr. Gandhi is inclined to give to Mr. Jinnah. But I am very much purturbed that if Mr. Gandhi gives Mr. Jinnah something more than Mr. Jinnah is entitled to, that something more is goinp to someone out of my share. You can therefore, well understand why I am so very concerned about his talks. It is the most important policy of Mr. Gandhi somehow to aequire strength for the Congress by getting the help of the largest party in this country and to intimidate the British Government and to force it to come to terms without being obliged to grant the demand of the Scheduled Classes.

Mr. Gandhi in all his public career ever since the communal problem has loomed large has done only one thing and that is to neglect the Scheduled Castes (cries of Shame, Shame), to by-pass them and to leave them where they are. In this connection Dr. Ambedkar referred to his unpleasent experience of Mr. Gandhis tactics in this matter.

At the R.T.C. Mr. Gandhi tried to isolate me. I am not going to use the language of Hitler that he was encircling me (Laughter) which was a better word. Although he did isolate me and cut off every kind of support which I made on behalf of the Scheduled Castes. For a long time he failed and ultimately he used a weapon which I am sorry to say, no honest men would have used. He went to the Muslims and told Mr. Jnnah that he was prepared to grant his 14 demands and bargained for one concession. Mr. Jinnah was told that he should not agree to "this dirty dog of an untouchables." I have got in my possession a document which was drawn up between the Muslim League and Mr. Gandhi at the R.T.C. I am not speaking without any authority. Fortunately for us the Muslims had a certain amount of sense of shame and remorrse. I hope and trust that he (Mr. Gandhi) had not tried it on this occasion when he is meeting with Mr. Jinnah.

"You should realise", Dr. Ambedkar went on to say, "what our object is. Our aim and aspiration is to be a governing community. Let all of you bear that in mind and let all of you write it on the walls of your houses so that every day you should remember that the aspirations which we cherish, and the cause, which we are having is not a cause of a petty character. It is the biggest cause that we have ever cherished in our hearts. That is to see that we are recognised as the governing community. If you recognise that, you will recognise what tremendous effort we have to make in order to carry it into effect. Mere words will not count, mere resolutions will not count. It may be that Mr. Gandhi will treat this as bluff and put it aside. We shall have to prove both Mr. Gandhi and His Majesty's Government, and I repeat, even to His Majesty's Government this time we mean business (Hear, hear). Absolute business, and we shall demand business from His Majesty's Government. We shall not allow anybody to Shilly-Shally. When His Majesty's Government has given any word, we shall expect His Majesty's Government to honour that word. There is no use depending on the good will of His Majesty's

Government, nor is there any use, in depending on the good ourselves. We must build up our own strength. We must remove other causes."

"COME UNDER ONE BANNER"

Dr. Ambedkar in conclusion, said that he had been noticing great enthusiasm among the Scheduled Classes perhaps due to his arrival in the city. They could never gather strength by carrying on their local activities in a local manner and with local spirit. They must all learn to come under one banner, under one association and under a single political body, and thereby make the world that they were united under one organisation known as the All-India Scheduled Castes Federation. He in conclusion, thanked the organisers for the honour done to him.

Some among the gathering insisted that the speech of Dr. Ambedkar be translated into Tamil. They were assured that the Tamil translation of the speech would be printed and circulated among them free of charge.

The meeting terminated with cries of "Long Live Dr. Ambedkar." (The Mail, 26-9-44).

# खंड ९

## प्रकरण ११ वे

# दक्षिणेतील यशस्वी दौरा (पुढे चालू)

एम्. सी. राजा मेमोरियल हरिजन हॉस्टेल येथे बाबासाहेबांचा सत्कार २५–९–४४ रोजी रात्री करण्यांत आला. मद्रासच्या दौऱ्यात **बाबासाहेबांनी** निरनिराळ्या भाषणांत हिंदू लोक, त्यांचे ब्राह्मण पुरोहीत, वेद, कॉंग्रेस, गांधीजी, जीना, इत्यादिकांवर टीकेचे कोरडे ओढले. याबद्दल इंडियन एक्सप्रेस या मद्रासच्या पत्राने २६–९–४४ (मंगळवार) च्या अंकात **बाबासाहेबांवर** सडकून टीका केली. तिचा सारांश असा कीं **आंबेडकर** स्वतःला तर्कवादी समजतात, मग ज्या तर्काने ते कॉंग्रेस, हिदुलोक, वेद, **गांधी जीना** यांच्यावर उखडले त्याच तर्काने त्यांचे स्वतःचे पुढारीपण, जस्टीस पक्षाचे पुढारीपण व त्यांची विदेशी चळवळ ते का पाहत नाहीत ? त्यांचे पुढारीपण व त्यांचा पक्ष यांच्यातही पुष्कळ दुर्गण आहेत, (हे) ते कां मान्य करीत नाहीत ? अस्पृश्य वर्गाकडे हिंदूनी चांगल्या बुद्धीने पहावे, अशी **गांधींनी** चळवळ सुरू केली; तिच्यावर घसरणे, हे स्पृश्य व अस्पृश्य समाजांतील अंतर नष्ट करण्यास उपयोगी न पडता ते अंतर वाढविण्यातच **आंबेडकरांच्या** तर्कदुष्ट टीकेचा उपयोग होतो. ज्या **गौतमबुद्धाला आंबेडकर** वंदनीय मानतात. त्याने भिक्कूंना उपदेश केला कीं, भिक्कूनो! मी तुमच्या हातांत एकुलते एक हत्यार दिलेले आहे; ते तर्कवादाचे! जे तुमच्या धर्माहून निराळा धर्म आचरतात त्यांना शिव्याशाप देण्यांत, या तर्काचा तुम्ही उपयोग केलात तर समाजात तेढ उत्पन्न होईल! भिक्कूंनो तुम्ही जखम बरी करण्यास झटा, जखम करू नका! **आंबेडकर** बुद्धाचे हे उद्गार कसे दृष्टीआड करू शकतात? येथे त्यांचे तर्कशुद्ध वागणे होत नाही. **गांधीजीच्या** चळवळीकडे जर ते सहानुभूतीने पहातील व स्वतःही दिल जमाईचे भाषण व वर्तन करतील, तर अस्पृश्यांचे प्रश्न सोडविण्यास ते मदत करतील.

ती टिका मी खाली देत आहे. :—

"SENSE AND NONSENSE

Speaking at the reception given to him at the M.C. Rajah Memorial Harijan Hostel, the Hon'ble Dr. B. R Ambedkar claimed credit for being an outspoken man. We presume therefore, he would not object to others being equally outspoken. Much of what the Scheduled Castes leader has been saying at meetings in the city appears to us as a curious mixture of sense and nonsense. No one can question the right of Dr. Ambedkar to be bitter and hostile to everybody except perhaps to the British Government. The question for people who believe in reason is, whether hysterical abuse can help a cause however good. Dr. Ambedkar is undoubtedly one of the best of causes in the world today. Why is he then so keen on spoiling it by attacks upon others, who have at least as much claim as he has to their own view points?

Dr. Ambedkar spoke on rationalism at one meeting and proved that he himself was certainly no rationalist. Pride and Prejudice are always enemies of reason and he reeked with both at the meeting. He said that the Vedas contained nothing but 'tomfoolery', and that Geeta was a worthless document. But he praised the Buddha who was according to his the first man in the history of the world, who preached the doctrines of liberty, equality and fraternity. The Buddha himself never, however, called the Vedas tomfoolery. Again and again he went to the Vedas to pick out the best in them for the making of his revolutionary and glorious teaching. He did not reject the final authority of the Vedas; and so we also well might, without irrationally dismissing the whole of them as tomfoolery. But the Buddha was also the first in the History of the world to teach the unassailable sovereignty of reason. Let us present Dr. Ambedkar with a question from the Prophet he admires as much and betrays so completely: "The only instrument I leave in your hands is reason. Abuse of those who hold a different doctrine will only increase cleavage. Oh Bhikkus! heal but not wound."

We wish to point out two typical instances in which the votary of reason from the Viceroy's Executive Council exposed himself in the sorcery role of an irrationalist. At a luncheon party given in his honour Dr. Ambedkar went all out against Gandhiji and Congress with slave mentality because Congressmen, according to him, gave unthinking support to Gandhiji in everything. Gandhiji, said the speaker, had never done one real good thing in his life for India and yet he still continued to be the Congress leader who has never even once been out on his trial for all his follies. He then attacked Mr. Jinnah as an autocratic leader and the whole Muslim League as his nominated show. But having unburdened himself of this vigorous "rationalist" attack upon the "irrational" allegiance of the Congress and the League to their leaders, what had this hot-gospeller of pure rationalism to say in regard to the leadership of the Justice Party and the Scheduled Castes? He damn the fact that neither the Justice Party nor the Scheduled Castes had as yet cultivated community not only in the cities but in the vast rural areas. It is this task that numerous workers under Gandhiji have undertaken with no other motive than that of national service. It is just this task again that the handful of educated and progressive Harijans under Dr. Ambedkar's leadership have shirked so far. That being so and while those who do such work will expect no thanks from Dr. Ambedkar is too much to hope that the Scheduled Castes' leader would at least spare them his personal abuse? Dr. Ambedkar criticised the Justice Party leaders for neglecting the Non-Brahmin masses who live in the villages and for concentrating too much on job picking. We are afraid Dr. Ambedkar is on the same wrong path and that it will be good for him to swallow a dose of the same medicine he offered to the Justices. The Scheduled Castes' leader expressed a prediction in favour of dependence upon the British Government for all that was necessary for the progress of the community. We grant that a long suppressed community has the need to do so but not necessarily

by antagonising all the radical political and social forces in the country.

We have nothing but the fullest sympathy for the political, social and economic demands of the Scheduled Castes. That is why we are afraid that many of Dr. Ambedkar's utterances would please the opponents of the Scheduled Castes more than their friends, and that he considerably reducing his usefulness as the leader of his community by adopting such wholly unnecessary tactics. The Indian Express, 26-9-44).

मद्रासमधील बाबासाहेबांचे असलेले वास्तव्य पाहून त्यांना अनेक ठिकाणची भाषणाची आमंत्रणे आली. त्यामध्ये 'मद्रास रॅशनल सोसायटीचे'ही आमंत्रण होते. या संस्थेतर्फे बाबासाहेबांचे, 'रॅशन्यालिझम् इन् इंडिया' (भारतातील तर्कवाद) या विषयावर प्रभात टॉकीज ब्रॉडवे, येथे, माजी काँग्रेसमंत्री रामनाथन् यांच्या अध्यक्षतेखाली, रविवार दि. २४–९–४४ सकाळी, सौ एम्. एम्. मुथु यांनी बाबासाहेबांचे स्वागत केले, त्यानंतर बाबासाहेबांचे ओजस्वी भाषण झाले. ते म्हणाले :—

भारताच्या इतिहासाचा अर्थ इतिहासकार, पंडित आणि तत्वज्ञानी असा लावतात की, भारतात तत्वज्ञान, अध्यात्मज्ञान आणि जातीय तत्वज्ञान या विषयावर खूप विचार आणि वाङ्मय निर्माण झाले. पण राजकीय आणि सामाजिक विषयांवर कांहीच विचार व वाङ्मय उत्पन्न झालेले नाही. पूर्वीचा भारतीय समाज राजकारणी व इतिहासप्रेमी नव्हता, असे या विद्वानांचे मत आहे. भारतीय इतिहासाचा हा अर्थ बरोबर नाही. माझा इतिहासाचा अभ्यास असा आहे की, इतर कोणत्याही देशांत राजकीय व सामाजिक अंदोलने जितकी झाली, त्याच्या अनेक पटीने तीं भारतात झाली. भारताचा सारा इतिहास राजकीय व सामाजिक क्रांत्यांनी भरलेला आहे. या क्रांत्या फ्रेंच क्रांतीपेक्षा विस्तीर्ण व अवाढव्य स्वरूपाच्या होत्या. या क्रांत्या बुद्ध व हिंदुधर्म यांच्या झगड्यांतून निर्माण झाल्या. बुद्ध धर्म हिंदुस्थानांतून नष्ट झाला नाही, अगर तो करून घेण्याची त्यांना जरूर भासली नाही.

इतिहासकार म्हणतात की, बौद्ध व हिंदु यांचा झगडा तत्वासाठी होता. हे खरे नाही. हा झगडा सत्य म्हणजे काय या संबंधी होता. बुद्धाने सत्याची व्याख्या सोपी केलेली होती. जे मानवाच्या 'दशेंद्रियांना' पटते ते सत्य. सत्याची निवड करण्यासाठी कोणा अधिकारी व्यक्तिची जरूरी नाही, असा बुद्धाचा तर्कवाद होता. याच्य उलट ब्राह्मणी धर्माचा वाद होता. जे वेदांत आहे ते सत्य, असे त्यांचे म्हणणे आहे. मी वेद वाचले आहेत. ब्राह्मण इतके बुद्धीमान असून त्यांनी वेदांना कां बरे इतके पावित्र्य दिले. अथर्व–वेदात मंत्र दिलेले आहेत इतर वेदांतही असेच भारूड आहे. या

मंत्राना व भारूडांना पवित्र मानण्याची सक्ती ब्राह्मणांनी लोकांवर केली कारण त्यांना लोकांवर आपली हुकूमशाही यावच्चंद्रदिवाकरौ लादण्याची बुद्धी झाली. बुद्धाला असली हीन बुद्धी सुचली नाही. जे तुमच्या इंद्रियांना पटते ते सत्य, असे बुद्धाने सांगितले. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व याचा उद्घोष करणारा जगातील पहिला महापुरुष बुद्ध होता. त्याला विरोध करणारे ब्राह्मण हे वर्णभेद व वर्गभेद याचा पुरस्कार करणारे होते. या पार्श्वभूमीवर ब्राह्मणी धर्म आणि बौद्ध धर्म यांच्यात झगडा सुरू झाला. या झगडयांत बौद्ध हे क्रांतीकारक विचारसरणीचे होते, आणि ब्राह्मण हे प्रतिक्रांतीवादी (जीर्णमतवादी) होते. या झगडयाचे अंतीम स्वरूप हे होते की, देशांत बौद्ध धर्माची किंवा हिंदु धर्माची सत्ता प्रस्थापित झाली पाहिजे. हा झगडा शतकानुतके चालला. त्यानंतर भारतात इस्लामचे आक्रमण झाले. ते झाले नसते तर हा झगडा तसाच पुढे चालू राहिला असता.

हिंदू म्हणतात भगवद्‌गीता हा फार पवित्र ग्रंथ आहे. मला या ग्रंथाबद्दल आदर नाही. याचे कारण हे की, जी तत्वे व सत्ये तर्काला पटणार नाहीत. अशा तत्वांना व सत्यांना गीतेने तत्वज्ञानाची आभरणे घालून लोकांची दिशाभूल केली त्यामुळे लोकांना बुद्धाने सुरू केलेली धार्मिक, सामाजिक, राजकीय, राज्यकारभार-विषयक आणि तर्कवादविषयक क्रांती समजली नाही व म्हणून त्यांनी तिला पाठिंबा दिला नाही. त्यामुळे ती क्रांती यशस्वी झाली नाही. हिंदूचा दुसरा ग्रंथ मनुस्मृती. याने धर्म व राजकारण यांना एका चौकटीत बसवून असा आभास निर्माण केला की, चातुर्वर्ण्य हे केवळ धार्मिक सिद्धांतमय तत्व नाही, तर ते राजकीय तत्व आहे.

आपले राजकीय व सामाजिक जीवन तर्कशुद्ध सिद्धांतावर उभारले असले पाहिजे. आपल्या जीवनांत तर्कवादाला स्थान नाही. आपले जीवन अंधश्रद्धेवर उभारलेले आहे. दोन वर्षापूर्वी **गांधीजी** म्हणाले पाकिस्तान ही चीज पापमय आहे. त्यांच्या अनुयायांनी माना डोलावल्या. आता ते म्हणतात मुसलमानांना पाकिस्तान हवे असेल तर आपण ते द्यावे की नाही याचा विचार केला पाहिजे. त्यांच्या अनुयायांनी 'होय' म्हटले. आमच्या सामाजिक, राजकीय व बौद्धिक जीवनांत अंधश्रद्धेने केवढे थोतांड माजविले आहे, याचे हे उदाहरण आहे. गांधीजींच्या तत्वज्ञानाची खरी किंमत आपणाला कळून आली. गांधीजी देशाला फार मोठ्या नुकसानीच्या गर्तेत पाडत आहेत.

असा बाबासाहेबांच्या भाषणाचा सारांश होता.

(The Hindu, Madras, 25-9-44 — "Rationalism In India — Dr. Ambedkar's Address."

या भाषणांतील कांही मूळ भागांचा वृत्तांत The Liberator, Madras, या पत्राने २५–९–४४ च्या अंकात "Rationaiism In India — Revolution

and Counter Revolu-tion — Ambedkar's Address,
या शीर्षकाखाली दिला होता तो मी येथे वाचकांच्या माहिती करता उधृत करतो :—

"DR. AMBEDKAR'S ADDRESS.

The subject of rationalism in India is undoubtedly of great interest to Indians and one of profound influence. So as the Hindu society and a social life are concerned, the subject has been completely neglected. There has been very many false notions about India's history which have been given currency to buy persons who have very great authority in the field of literature. It has been said by very profound writers of Indian History that India has had no politics at all and that all ancient Indian writers concerned themselves with writing about philosophy, religion, metaphysics and that they have not bothered about politics. It has been alleged that the ancient Indian people were not historical or a political race. That has been the opinion to this day. It has also been stated that India has no history at all and that though Indian life and society have been moving in a stereotyped steel frame which once fixed has remained as it has been, and consequently the historian of India has nothing else to do but to describe what the steel-frame is. It has also been said that countries can be said to have some special and political revolutions undertaken with the object of changing the frame-work political revolution before.

I have been only a politician and I can say no claim for any profundity either as a student of literature or of history, or philosophy. But I have elevated some part of my time to the study of an ancient hostory, and I have come to the opposite conclusions to those propounded by many scholars. My study has shown to me that the ancient Indians have political race that history has known. No country in the ancient past has had such revolution affecting the society morals, government and philosophy which can be proved to have been privilege of the ancient Indians. India probably was one of country which preached rationalism such as the kind of which the world before

nowhere has seen. India has been a land of revolutions in comparison to which the French Revolution would be only "Bagatella" and nothing more.

## DIFFERENCES BETWEEN BRAHMINISM AND BUDDHISM.

Students of Indian History, in my judgement, must bear one fact in mind and it is the one which has been completely neglected by the historians who have written about history of India. It is a fundamental fact and unless that was borne in mind, no one can understand the history of India. The fundamental fact is that there has in ancient India, a great struggle between Buddhism and Brahmanism. The history of India is nothing if it is not one of great struggle. It is not even a struggle as has been repeated by professors of philosophy but a quarrel over same creed. It was not only a revolution in doctrine but a revolution in the political and social philosophy. The quarrel betwsen Buddhism and Brahmanism was on this one issue and that was "What is truth? What can be accepted as truth? That is the bedrock of the question with which rationalism deals. The answer that Buddha gave as to what was truth was fundamentally different from the one which the Brahmins gave. Buddha said that truth was something to which any one of the "Dasa Indriyas" can bear witness. The Brahmanic doctrine of truth was that it was something which was declared by Vedas (Laughter). They should make no mistake but that was the most important doctrine of Brahminism. The Buddhists were revolutionaries and Brahmins were counter-revolutionaries. That was the difference between Buddhism and Brahminism. Why the Brahmins from the ancient times insisted that the Vedas must be accepted as the Final authority of all social and religious doctrines, it is something difficult to say. But I am surprised that so clever a people like the ancient Brahmins
prised that so slever a people like the ancient Brahmins
should have insisted upon fastening such tremendous sanctity and authority on such books which consisted nothing else but tomfoolery.

## FORGERY IN THE VEDAS

Dr. Ambedkar analysing some of the aspects of the Vedas by citing certain examples said that certain portions were a 'forgery' which were introduced at later stage. They did it because they wanted some kind of sacred sanction for their theory. That to his mind was the only reason why the Brahmins had insisted upon so un-rationalistic an approach to social theories. The struggle between Buddhism and Brahmanism was for supremacy. When Buddhism evaporated, they lost tremendously. Buddha was the first person to preach the message of liberty, equality, fraternity in the history of the world. They had lost because the revolution was so overwhelmed by the counter-revolution. They had also lost the spirit of rationalism, and that was the reason why the whole of the Hindu Society was in grossest superstition; idolatory and all sorts of evil practices, which were practised in the name of the religion. Buddha's rationalistic approach to truth had been lost. Today they were in the grip of counter-revolutionaries. The gospel of the counter-revolutionaries is the Bhagvat Geeta and Manu Smruti.

The tragedy of today is that the non-rationalistic ideology has even entered politics. Political leaders are on trial in every country. But what is the solution in India? Mr. Gandhi is never on trial (laughter). Has he been on trial? No, if he says something, everybody must accept it as though it is from the Vedas. If he says the opposite, we have got to accept it. Two years ago Mr. Gandhi said Pakistan was a sin. Congressmen said it was a sin. I have also written a book on Pakistan and I was called as one whose intelligence has been mortgaged to the Muslim League and prostituted .... and all that. Today Mr. Gandhi says Pakistan is not a sin. This is only one illustration of irrationalism — which has not entered only our social and intelliectual but also political thought.

I am sure unless we do something very quickly, we may bring greater disaster to this country........."

या भाषणाचा वृत्तांत या मद्रासच्या 'द मेल' या दैनिकानेही २४-९-४४ च्या अंकात *"Equality — Need of Country — Dr. Ambedkar Attacks Brahmin Domination".*
या मथळ्या खाली प्रसिद्ध केला होता.

दक्षिण भारतात पूर्वी (१९२०-३६) ब्राह्मणेतरांचा पक्ष (जस्टिस पार्टी) फार प्रबळ होता, तो १९३७ च्या नंतर डबघाईस आला. त्याचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न जून १९४४ पासून सुरू झाले. यासाठी मद्रास प्रांतात बऱ्याच सभा झाल्या. अशा तऱ्हेची एक मोठी सभा २४-२५ सप्टेंबर १९४४ ला सालेम या शहरात भरविण्याचे जाहीर झाले होते. **बाबासाहेबांना** या चळवळीची माहिती मिळाली तेव्हां त्यांना ब्राह्मणेत्तर पुढाऱ्यांच्या बरोबर चर्चा करून या विषयाची संपूर्ण माहिती मिळविण्याची इच्छा झाली. त्यांनी सदर चळवळीचे प्रमुख **श्री. ई. व्ही. रामस्वामी नाईकर** यांना भेटण्यास या म्हणून आमंत्रण पाठविले, तेव्हां **श्री. नाईकर बाबासाहेबांना** भेटण्यासाठी मद्रसला शनिवार दि. २३-९-१९४४ ला आले. **चेट्टीनाड हाऊस** अड्यार येथे दोघांनी दोन तास चर्चा केली. ब्राह्मणेत्तर पक्षाच्या सामाजिक व धार्मिक कार्यक्रमाला आपला पाठिंबा आहे व पुढेही राहील, असे **बाबासाहेबांनी श्री. नाईकर** यांना आश्वासन दिले. **'करूर'** येथे भरणाऱ्या ब्राह्मणेत्तर परिषदेला उपस्थित राहाण्यासाठी **श्री. नाईकर** मद्रास येथून दि. २३ सप्टेंबरच्या रात्री रेल्वेने गेले. (The Liberator, and The Indian Express, dated 25-9 44 and The Hindu, dated 26-9-44).

ब्राह्मणेत्तर पक्ष मद्रास प्रांतात बळवला तर महाराष्ट्रांत व इतर प्रांतातही ब्राह्मणेत्तर पक्ष संघटना करून राजकीय क्षेत्रात उतरेल. अशी वेळ आली तर फेडरेशनने या पक्षाशी कितपत दूरचे व जवळचे संबंध ठेवावेत आणि फेडरेशनच्या राजकीय भूमिकेला त्यांचा पाठिंबा कसा मिळवावा हा विचार **बाबासाहेबांच्या** मनांत प्रामुख्याने त्यावेळी घोळत होता हे उघड आहे. परंतु तो पक्ष जोरदार झाला नाही. बाबासाहेबांचे पुढचे बेत पूर्ण झाले नाहीत.

रविवार दि. २४ सप्टेंबरला दुपारी दोन वाजता मद्रास शहरांतील अस्पृश्य महिलांतर्फे **बाबासाहेबांना** रायपेठा येथील **'वुडलॅंडस'** या भव्य इमारतीत चहा-पार्टी देण्यांत आली. स्त्रियांनी चळवळीत भाग घ्यावा व आपल्या समाजाच्या उन्नतीच्या कार्याला हातभार लावावा, अशा अर्थाचे भाषण त्यांनी तेथे केले. आपल्या समाजांतील शिकलेल्या लोकांना आपल्या जातीचा नामनिर्देश करण्याची भीती वाटते ही नामुष्कीची गोष्ट आहे, असेही ते म्हणाले.

**'दी संडे ऑब्झर्व्हर'**, मद्रास या पत्राचे संपादक, **श्री. पी. सुब्रह्मनियन मुदालियार,** यांनी **बाबासाहेबांना** कोनेमर हॉटेलमध्ये दुपारचे जेवण दिले. जेवणा-

नंतर हॉटेलच्या ग्रीन रूममध्ये अमंत्रित पाहुणे (सरकारी अधिकारी व इतर) गप्पा मारण्यास बसले, त्यावेळी यजमानाने **बाबासाहेबांना** ब्राह्मणेत्तर चळवळी संबंधी मार्गदर्शक विचार प्रदर्शित करण्याची विनंती केली. तेव्हां बाबासाहेबांनी आपले विचार प्रदर्शित केले.

ब्राह्मणेत्तर पक्षाचे सुशिक्षित तरुण येथे आलेले असतील व त्यांच्यापुढे आपणास एखाद्या तत्त्वज्ञान्याप्रमाणे विद्वता प्रचूर भाषण करावे लागेल व तसे करण्यांत मला उत्साही वाटला असतां पण येथे (नवविचारांच्या) तरुणांपेक्षा जुने पुढारी व कार्यकर्तेच जास्त संख्येने असलेले पाहून माझ्या उत्साहावर पाणी पडले आहे. तरी पण मी माझे विचार तुमच्यापुढे मांडतो.

मद्रास ब्राह्मणेत्तर पक्ष (जस्टीस पार्टी) १९१७ ते १९३७ पर्यंत या इलाख्यात वीस वर्षे अधिकारावर होता. असे असाताही तो पक्ष १९३७ च्या निवडणुकीत का पडला? हा प्रश्न विचारण्यासारखा आहे. ब्राह्मणेत्तर पक्ष निर्माण झाला, ही एक लोकशाहीच्या दृष्टीने मोठी महत्वाची ऐतिहासिक घटना होय. ती फार महत्वाची आहे. ब्राह्मणेत्तर या शब्दाने त्याला जातीयवादी स्वरुप प्राप्त झाले हा पक्ष लोकशाहीच्या दृष्टीने महत्वाचा होता. हिंदू समाजात ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर असे दोन वर्ग हजारो वर्षे अस्तित्वात आहेत. ब्राह्मणवर्ग विषमता मानतो. त्याच्या हातांत धार्मिक व राजकीय सत्ता हजारो वर्षे अनियंत्रिपणे चालू आहे. ब्राह्मणेत्तर वर्ग समतेचा पुरस्कर्ता आहे. त्याने हुकूमशहा ब्राह्मणवर्गावर आतापर्यंत हजारो वेळा निकराचे हल्ले केले. ते समाजांत समता निर्माण करण्यासाठी. पण हुकूमशहा ब्राह्मणवर्ग, धार्मिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मोक्याच्या सर्व जागा बळकावून बसलेला असल्यामुळे ब्राह्मणेत्तर पक्षाचे सर्व हल्ले त्याने नेस्तनाबूद केले. त्यामुळे ब्राह्मणवर्ग हा ब्राह्मणेत्तर वर्गाचा अनियंत्रित राज्यकर्ता म्हणून अद्याप तसाच राहिलेला आहे. ब्राह्मणेत्तर वर्ग समतेचा पुरस्कर्ता आहे पण त्याला विषमतेच्या पुरस्कर्त्या ब्राह्मणवर्गाला नेस्तनाबूद करून समाजात समता आणि देशांत लोकशाही स्थापन करता आली नाही.

**ब्राह्मणेत्तर पक्ष या इलाख्यात वीस वर्षे सत्तारुढ होता तरी त्याला ब्राह्मणवर्गाला नेस्तनाबूद करता आले नाही, याची अनेक कारणे आहेत. त्यापैकी प्रमुख कारण म्हणजे या पक्षातील लोकांचा स्वार्थांधपणा, गतानुगतिकत्वाची ओढ, सुशिक्षित ब्राह्मणेत्तरांची समाजापासून अलिप्त रहाण्याची प्रवृत्ती, पक्षातील ध्येय धोरणांचा संकुचितपणा आणि संघटनेतील शिथिलता ही होत. हा पक्ष १९१७ ते १९३७ या वीस वर्षात सत्तारूढ झाला. पण त्याला जनतेच्या हिताचे कार्य करण्यापेक्षा ब्राह्मणवर्गाला शिव्याशाप देणे हेच जास्त महत्वाचे वाटले. त्यातच त्या पक्षाची सारी शक्ती खर्च झाली. खेडेगावांतील जनता दारिद्र्याने**

पिडलेली आहे; ती सावकारांच्या पाशांत आडकलेली आहे. तिच्या हितासाठी उद्योगधंदे काढणे, सावकारांच्या तावडीतून तिला सोडविणे, वगैरे कार्य करण्याचे भान या पक्षाला राहिले नाही. आपल्या नातलगांना नोकऱ्या देणे, हेच मुख्य कार्य या पक्षाने केले. नोकऱ्यावर लागलेले तरुण ब्राह्मणेत्तर, समाजापासून अलित राहून चैनीत दिवस काढू लागले. ब्राह्मणांना शिव्याशाप देणारे ब्राह्मणेत्तर ब्राह्मणांप्रमाणे गंध लावणे, पूजा करणे, पोशाख करणे वगैरे ब्राह्मणी आचार विचारांचा अवलंब करून राहू लागले. यामुळे ब्राह्मण्य नष्ट करण्याचे जे ब्राह्मणेत्तर पक्षाचे धोरण होते ते सांधीकोपऱ्यात पडून राहिले आणि ब्राह्मण्य तसेच जिवंत राहिले. ब्राह्मणेत्तर पक्षाला ब्राह्मणांपासून आपण अगदी निराळे आहोत, त्यांचे व आपले तत्वज्ञान यात जमीन अस्मानाचे अंतर आहे, याची पूर्ण कल्पना आली नाही. व त्याप्रमाणे वर्तन करण्याचे ध्येय त्यांना साध्य करता आले नाही. ब्राह्मण हे पहिल्या दर्जाचे ब्राह्मण होत व आपण दुसऱ्या दर्जाचे ब्राह्मण आहोत हीच कल्पना ब्राह्मणेत्तरांच्या वागणुकीवरून सिद्ध झालेली आहे. ब्राह्मणेत्तर पक्षाचे पुढारी हेही (विद्वान व तर्कशुद्ध विचार करणारे) उच्च दर्जाचे नव्हते. त्यांच्यात पक्षाचे धोरण व्यापक करून पक्षाला लोकशाही स्थापन करण्यासाठी राबविता आले नाही. पुढारी कसे असावेत ? स्पष्ट धोरण आखणारे व त्या धोरणाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी जीवाचे रान करणारे. गांधी अगर जीनासारखे पुढारी नसावेत. गांधी आज एक मत देतील तर उद्या त्याच्या उलट देतील. अशी उदाहरणे अनेक देता येतील. पाकिस्तानाबद्दल त्यांनी आतापर्यन्त अनेक परस्पर विरोधी मते प्रकट केली आहेत. जीना तर हुकूमशहा आहेत. ते लीगमधील कार्यकारी मंडळ स्वतः तयार करतात. लोकांनी निवडलेल्या प्रतिनीधींना ते मान्यता देत नाहीत. गांधी व जीना यांना त्यांचे अनुयायी पुढारीपणा पासून च्यूत का करीत नाहीत? कारण तसे झाले तर काँग्रेस व लीग या पक्षांत बजबजपुरी माजेल, हे ते ओळखतात. कारण या दोन पुढाऱ्यामुळेच त्यांच्या पक्षांत संघटना टिकून राहिलेली आहे. ब्राह्मणेत्तर पक्षांच्या पुढाऱ्यांनाही दूर केले तर त्या पक्षाची संघटना होणार नाही. कारण ही संघटना मुळी विस्कळीत आहे. ती सिमेंटप्रमाणे घट्ट नाही. म्हणूनच १९३७ च्या निवडणुकींत त्या पक्षाला ब्राह्मणेत्तर मतदार बहुसंख्य असतांही हार खावी लागली.

अशा अर्थाचे भाषण बाबासाहेबांनी केले. त्याचा वृत्तांत मद्रास येथील मेल (२४–९–४४), लिबरेटर (२५–९–४४), हिंदू (२६–९–२४) व इंडियन एक्सप्रेस (२६–९–४४) या पत्रात प्रसिद्ध झालेला होता.

२४ सप्टेंबरला हॉटेल कॉन्नेमार येथे भाषण करतांना बाबासाहेबांनी गांधीजींवर कडक शब्दांत टीका अली.

("......In the Congress party, Gandhiji continued to be its leader, who could have accepted Gandhiji as a leader in any other country, a man who has no vision, who has no knowledg, and who has no judgement, a man who has been a failure all his life in public life. There is no important occasion when India was about to succeed, when Gandhiji brought about anything good. That is my individual opinion." The Indian Express, Madras, Tuesday, 26-9-44).

त्याच दिवशी (शिवराज) मेमोरियल हॉलमध्ये केलेल्या भाषणातही बाबासाहेबांनी श्रीनिवासशास्त्री आणि गांधीजी यांच्यावर जहाल शब्दांत टीका केली.

"....In some of his recent speeches The Rt. Hon. V. S. Srinivasan Shastriar had said that he considered Mr Gandhi as the embodiment of India's soul, and that Mr. Gandhi should represent India at any international gathering and that great precautions should be taken to see that in no circumstances should persons like him (Dr. Ambedkar) be given a place at any future international conference.

"....I was searching my heart in order to find out whethre really in the whole of my public career which I am ready to admit is not so extensive as that of the Rt. Honourable Shastri nor probably as glorious as that of his, whether during the short span of my public life, I have done something so disgraceful that India would be ashamed to see me sitting at an International gathering. I do not wish to use my abusive language, for I could have very easily said that the Rt. Hon. Shastri was a 'lap-dog' of the British Government. He has been sitting on the lap of the British Government all this, while and if he had achieved any notoriety and greatness either in India or outside, it was largely due to the fact that the British Government had been placed to make him a 'Show-boy'. I do not wish to say that what Mr. Shastri has said is really croaking of an old crow sitting on the tree, with the diseased bowels....". "....What Mr. Shrinivasan Shastriar had said was probably typical of what most Congress-men had been saying, namely that the Scheduled Castes, in so far as they had been under his leader-ship, had been inimical to the general interests of the

country. Most people did not know what Mr. Gandhi did at the Round Table Conference. They all thought that the part he played was a glorious one. The Mahatma, Dr. Ambedkar added, went to the conference with a mandate to demand independence, something which was far beyond what many sober politicians in India were prepared to ask. But what did Mr. Gandhi do ? "This old medieval gentleman who went to the conference with a mandate to demand nothing short of independence said Sir Samuel Hoare that he was quite prepared to be content with provincial autonomy. (Cries of Shame)". —The Mail, Madras 26-9-44.

१९४४ पर्यंतच्या भारतीय राजकारणांत जेवढी प्रगतीकारक वाटचाल व्हायला पाहिजे होती तेवढी प्रगती झाली नाही. याचे कारण काँग्रेसमधील **गांधीजींचे** नेतृत्व होय. आणि त्यामुळेच भारताच्या स्वातंत्र्याचा ठेवा भारताला लौकरात लौकर मिळविता येत नाही, अशी जाणीव **बाबासाहेबांना** झालेली होती. म्हणूनच त्यांनी भाषणांत कडक आग पाखडली. या बाबतींत इतर राजकीय पुढाऱ्यांनीही तेच केले. **नेताजी सुभाषचंद्र बोस** यांनी याच दृष्टीकोनातून **गांधीजीवर** आणि काँग्रेसच्या राजकारणावर वेळोवेळी कोरडे ओढले. हे संपूर्ण सत्य समजावून घेण्यासाठी भारतीय राजकारणाचा १९४४ पर्यन्तचा धावता इतिहास लक्षात घेणे जरूर आहे.

१९१९ ते १९२९ या काळांत गांधीजी, काँग्रेसचे अनभिषिक्त सम्राट होते. असहकार, कोर्ट–कचेऱ्यांवर बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, खिलाफत, खादी, ग्रामीण उद्योग वगैरे क्षेत्रांत त्यांनी ज्या योजना राबविल्या त्यामुळे जनतेत विलक्षण जागृती झाली. परंतु खिलफत, असहकार, ग्रामीण उद्योग वगैरे योजनांबद्दल म्हणावे तसे यश न आल्यामुळे जनतेत वैफल्य निर्माण झाले आणि विशेषतः **गांधीजींनी** मुसलमानांचे कोडकौतुक इतके केले की त्यामुळे हिंदुसमाजातील विचारवंतांना शुद्धी, संघटना वगैरे चळवळीसाठी हिंदु–महासभा व आर्य समाज यांच्या तर्फे मुसलमानांच्या विरूद्ध चळवळी करणे क्रमप्राप्त झाले. काँग्रेसमधील सच्चे व राष्ट्रीय वृत्तीचे जे पूर्वी **जीनादी** मुसलमान होते, त्यांच्यापेक्षा खिलाफतीच्या चळवळीसाठी **गांधीजींनी** **मौलाना महमद अली** व **मौलाना शौकत अली** यांचे स्तोम माजविले. त्यामुळेच काँग्रेसमधून **जीना** वगैरे मुसलमान बाहेर पडले व त्यांनी मुस्लिम लीगच्या वतीने मुसलमानांचा सवता सुभा प्रस्थापित केला. १९३०–३१ ची सत्याग्रहाची चळवळ सर्व भारतात पसरली पण तिच्यातूनही राष्ट्रहिताचे भरीव कार्य झाले नाही. १९३१ मध्ये **गांधीजींना** काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधी म्हणून लंडनच्या वर्तुळ परिषदेस हजर रहावे लागले. तेथे त्यांनी अशी भूमिका घेतली की

काँग्रेस हीच आमजनतेची प्रतिनिधिक राजकीय संस्था आहे व तिच्या मागण्या रास्त आहेत. इतर हिंदी प्रतिनिधींना काही किंमत नाही. त्यामुळे हिंदु मुस्लिम ऐक्य व जातीय ऐक्य यासाठी गांधीजींनी १९१७ पासून जे प्रयत्न केले त्यावर १९३१ साली बोळा फिरविला गेला. कारण त्याच साली वर्तुळ परिषदेत हिंदुमुस्लीम व अल्पसंख्य व बहुसंख्य हे झगडे उत्पन्न झाले, व तेथूनच पुढे ते वृद्धिंगत होत गेले. लीगतर्फे मुसलमानांनी १४ मागण्या केल्या. आणि १९४० च्या लाहोर अधिवेशनांत लीगतर्फे पाकिस्तानची मागणी करण्यांत आली.

तरुण सुशिक्षित व अभ्यासू काँग्रेस सभासदांमध्ये **गांधीजींच्या** नेतृत्वाबद्दल असलेली श्रद्धा १९३२ ते १९३४ च्या काळात ओसरत चालली. या लोकांचे स्पष्ट मत झाले की **गांधीजी** श्रीमंताचे पाठीराखे आहेत, तसेच ते साम्राज्यशाहीशीही तडजोड करणारे आहेत. भारताच्या स्वातंत्र्याला चालना देणारे क्रांतिकारक विचार व आचार यांच्याकडून अपेक्षित असणे व्यर्थ होय! या विफल मनोवस्थेतून या लोकांनी काँग्रेस सोशॉलिस्ट पार्टी (१९३४) अखिल भारतीय किसान सभा, अखिल भारतीय विद्यार्थी संघ वगैरे संस्था १९३४-१९३५ सालात काढल्या. या संस्थांनी डाव्या विचारसरणीचा पाठपुरावा करून भारतातील साम्रज्यशाहीला हैराण करायचे ध्येय ठरविले. १९३५ च्या कायद्यान्वये भारतात निवडणुका होतील, त्यावर जनतेने बहिष्कार पुकारावा म्हणून कॉ. सो. पार्टीतर्फे चळवळ, १९३६ साली सुरू झाली. या चळवळीतून 'ॲटिमिनिस्ट्री' (प्रधान मंडळावर बहिष्कार) चळवळ निघाली. या चळवळींना **सरदार शार्दूल सिंग कवीश्वर** (पंजाब), **रफी किडवाई** (उत्तर प्रदेश), **विजयालक्ष्मी पंडित, जवाहरलाल नेहरू, शरदचंद्र बोस,** वगैरे काँग्रेस पुढाऱ्यांचा नैतिक पाठिंबा होता. १९३७ च्या फेब्रुवारीमध्ये १९३५ च्या कायद्यान्वये निवडणुका झाल्या. त्यांत भाग घेऊ नये असे बहुतेकत काँग्रेस सभासदांचे मत होते. पण वर्किंग कमिटीने, वादविवादानंतर निवडणुका लढविण्याचे ठरविले, या निवडणुकीचा ज्वलंत प्रचार **नेहरूंनी** असीम उत्साहाने केला आणि १३ पैकी ७ प्रांतात काँग्रेसला माताधिक्य मिळवून दिले. (१) सरहद्दप्रांत, (२) उत्तर प्रदेश, (३) बिहार, (४) मुंबई, (५) मध्ये प्रदेश (६) मद्रास आणि (७) ओरीसा या सात प्रांतात काँग्रेस राजवट जुलै १९३७ मध्ये सुरू झाली. सप्टेंबर १९३८ मध्ये आसाम प्रांतातही (८) काँग्रेस मंत्रिमंडळ झाले. सिंधमध्ये व बंगालमध्ये काँग्रेसच्या पाठिंब्यावर राष्ट्रीय मुस्लिम पक्षांची मंत्रीमडळे पुढे आली. पंजाबमध्ये **सर सिकंदर हयात खान** या काँग्रेस विरोधकाच्या पक्षाचे मंत्रिमडळ झाले.

कॉ. सो. पार्टी वगैरे पक्षांच्या चळवळीमुळे खुद्द कॉन्ग्रेसमध्ये डावा गट व उजवा गट उत्पन्न झाला. डाव्या गटाचे नेतृत्व कांही दिवस **नेहरूंनी** केले पण ते गुप्तपणे. सुरवातीला त्यांना **गांधीवाद** सर्वस्वी मान्य नव्हता. त्यांचा कल डाव्या विचारसरणीकडे होता. पण त्यांना **गांधी** व **गांधीवादी** उजवा गट यांना दुरवयाचे नव्हते त्यामुळे

उघडपणे डाव्या गटात जाणे अगर स्वतःला, स्वतंत्र पक्ष स्थापने, हे करण्याचे धाडस त्यांना १९३७-३९ मध्ये करतां आले नाही. काँग्रेसमध्ये गांधी गटाचे वर्चस्व १९४० मध्ये प्रस्थापित झाल्यानंतर ते त्या गटात उघडपणे गेले. **गांधींनी** त्यांना आपला राजकीय वारस म्हणून जानेवारी १९४२ मध्ये जाहीर केले.

डाव्या गटाचे काँग्रेसमधील एक पुढारी **नेताजी सुभाषचंद्र बोस** यांचे व **गांधीजी** आणि उजवे गटवाले यांचे खटके १९३७ सालापासून उडू लागले **बोस** काँग्रेसचे अध्यक्ष असतांना त्यांनी देशात रुजू लागलेला गांधीवाद उखडून टाकणे व त्याऐवजी अधुनिक पद्धतीची क्रांतिकारक विचारसरणी तेथे रुजू करणे, याबद्दल जेवढे म्हणून कार्यक्रम हाती घेतले, त्यांना **गांधी** व उजवा गट यांनी विरोध केला. युरोपांत जी युद्धजन्य परिस्थिती उत्पन्न झालेली होती ती पाहून **बोस** यांना वाटले की, लौकरच युद्ध होणार व त्यात इंग्लंडवर ताण पडणार, अशा वेळी 'वैऱ्याची अडचण ती आपली सोय,' या सूत्राचा उपयोग करून भारताला स्वतंत्र करणे, ही **बोस** यांची मनीषा होती. अशा तऱ्हेची विचारसरणी भारतात रुजू व्हावी म्हणून ते धडपड करीत होते प्रसंग आला तर भारताने युद्धाच्या खाईत आडकलेल्या इंग्लंडविरुद्ध सशस्त्र बंड करावे व भारत स्वतंत्र करावा, असे ते म्हणत. **गांधी** व गांधी गट हे सत्य व अहिंसा यांचे पूजक, त्यांना **बोसची** ही विचारसरणी पटली नाही. म्हणून त्यांचे खटके उडू लागले. बोस काँग्रेसचे अध्यक्ष असतांहि वर्किंग कमिटीवर गांधी व गांधी गट यांचेच वर्चस्व चालू होते, यामुळे **सुभाषचंद्र बोस** यांना सतत झगडा करावा लागला. शेवटी त्यांनी परिस्थितीला त्रासून अध्यक्ष पदाचा राजिनामा दिला, काँग्रेसमधून ते बाहेर पडले व त्यांच्याबरोबर डाव्या गटातील काही काँग्रेस सभासदही बाहेर पडले; त्यांच्या सहाय्याने **बोसबाबूंनी** २९-४-१९३९ ला **'फॉरवर्ड ब्लॉक'** स्थापन केला; आणि त्या पक्षातर्फे इंग्लंडला हैराण करणारे कार्यक्रम त्यांनी सुरू केले. अँटी इंपिरियालिस्ट कॉन्फरन्स, नागपूर १९३९ ऑल इंडिया अँटी-काँप्रमाईज कॉन्फरन्स, रामगड, १९४०, वगैरे प्रमुख कार्यक्रम होत. इंग्लंडने ३-९-१९४९ ला महायुद्धात प्रवेश केला. **गांधींनी** व्हाईसरॉय **लॉर्ड लिनलिथगो** यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली कीं, इंग्लंड भारत यांचे परस्परांत कितीही भेद असले आणि भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न अद्याप सुटलेला नसला तरी इंग्लंडची सध्याची युद्धजन्य अडचण लक्षांत घेऊन भारताने त्या देशाला युद्ध जिंकण्यासाठी विनशर्त मदत करावी. काँग्रेसच्या अधिवेशनांत १९२७ ते १९३८ सालांत युद्धविरोधी ठराव मांडणारे **नेहरू** यांनी **गांधीजींना** पाठिंबा दिला या घटनेमुळे, लीग, हिंदुमहासभा आणि खुद्द काँग्रेस यांच्या पुढाऱ्यांना आश्चर्य वाटले व त्यांनी **गांधी** व **नेहरू** यांच्या निवेदनाला आपला पाठिंबा नाही, असे जाहीर केले. कॉं. कार्यकारी मंडळ, फॉरवर्ड ब्लॉक, वगैरेंनी **गांधी** व **नेहरू** इंग्लडशी जे सहकार्य करण्यास तयार झाले त्याविरुद्ध देशभर प्रचंड आघाडी उघडली. या मुद्याचा ऊहापोह होऊन १४-९-३९ ला याबद्दल एक लांबलचक ठराव मंजूर

करण्यांत आला. त्यांत मुख्य मुद्दे दोन १) इंग्लंडने आपली युद्धध्येये जाहीर करावीत, आणि २) भारताला स्वातंत्र्य द्यावे, म्हणजे मग भारत लोकशाही राष्ट्रांच्या बरोबर युद्धात सहकार्य करील. या ठरावाला उद्देशून व्हाईसरॉयने १७–१०–३९ ला असे जाहीर केले कीं, व्हाईसरॉय राज्यकारभारासाठी 'कन्सलटेटिव्ह ग्रुप' (सल्लागार मंडळ) नेमणार आहे व त्यात हिंदी लोकांनाही घेतले जाईल. भारताला वसाहतीचे राज्य (डोमिनियन स्टेटस) देण्याचा प्रश्न केव्हांतरी पुढे विचारात घेतला जाईल. व्हाईसरायचे हे निवेदन लंडनमध्ये प्रसिद्ध झालेल्या व्हाईटपेपरमध्ये नमूद करण्यात आले. त्यात १९३५ चा कायदा युद्ध संपेपर्यंत बाजूला सारलेला आहे, आणि भारताचा राज्यकारभार चालविण्यासाठी व्हाईसरॉयला जादा अधिकार दिलेले आहेत, हे जाहीर करण्यात आले. या अधिकाराच्या जोरावर व्हाईसरॉयने नागरिक हक्क, सभा, मिरवणुका, यांना टाचेखाली रगडले. लोकशाही व स्वातंत्र्य यांचे खंदे पुरस्कर्ते असणाऱ्या इंग्लंडने ही जी दुष्ट कारवाई केली, त्यामुळे सारे पक्ष चिडून गेले. काँ. का. मंडळाने २९-१०-३९ रोजी व्हाईसरॉयच्या १७ १०–३९ च्या निवेदनाला उत्तर देणारा ठराव मंजूर केला. भारतात नागरी स्वातंत्र्याची व लोकशाहीची गळचेपी करण्याचे जे धोरण सरकारने जाहीर केलेले आहे त्याचा निषेध या ठरावात नमूद केलेला होता. सरकारने हे धोरण तसेच चालू ठेवले तर देशात सविनय कायदेभंग–चळवळ सुरू करण्याचेही त्यांत जाहीर केलेले होते. काँग्रेस मंत्रीमंडळे ज्या प्रांतात होती त्यांना ठरावात आदेश दिलेला होता की, सरकारी धोरण जाचक दिसले की राजीनामे देणे. व्हाईसरॉयने गव्हर्नर्सना आदेश दिले की, तुम्ही ब्रिटिश सरकारचे युद्ध प्रयत्न यशस्वी करण्यात सतत झटा; त्यात काँग्रेस मंत्रीमंडळांनी सहकार्य केले तर ठीक, राजिनामे दिले तरी ठीक. शेवटी मंत्रिमंडळांनी राजिनामे दिले, आणि सरकारने निरनिराळ्या मंत्र्यांना व पुढाऱ्यांना पकडून तुरुंगात टाकले. या सर्व प्रकारांमुळे भारतात इंग्लंडच्या विरूद्ध द्वेषाग्नी पसरू लागला. घातपाताची कृत्ये होऊ लागली. या परिस्थितीला आळा घातला नाही तर भारतात अराजक माजेल. म्हणून **गांधी नेहरू** वगैरे समझोता करण्यात तयार असलेल्या पुढाऱ्यांशी बोलणी करण्यास ब्रिटीश (वॉर कॅबिनेट) मंत्रीमंडळाने काही विद्वान लोकांना हिंदुस्थानांत पाटविले. त्यापैकी **एडवर्ड थॉमसन, क्रिप्स** वगैरे प्रमुख होते. या लोकांची **गांधी, नेहरू, आझाद** वगैरें बरोबर बोलणी झाली या बोलण्यांच्या आधाराने काँ. का. मंडळाने पुण्यातील बैठकीत २७–७–४० ला ठराव मंजूर केला की, सरकारने भारताच्या स्वातंत्र्याची हमी द्यावी, मग भारत, युद्धाला मदत करेल. या ठरावाला उद्देशून व्हॉईसरॉयने ८८–१९४० ला जाहीर केले की व्हॉईसरायचे कार्यकारी मंडळ व सल्लागार मंडळ यांत काही हिंदी लोकांचा समावेश करण्यात येईल. **गांधींनी** काँग्रेसशी असलेला संबंध तोडलेला होता ही सर्व परिस्थिती पाहून त्यांनी १९४० च्या ऑक्टोबर मध्ये निवेदन प्रसिद्ध केले की, आपण स्वतः युद्धाला सहाय्य करणाऱ्या भारतातील प्रयत्नांना सविनय विरोध

करण्यासाठी चळवळ करणार! त्यांची ही चळवळ लौकरच सुरू झाली. पण ती जोरावली नाही. **गांधी** व **नेहरू** यांचे तडजोडीचे प्रयत्न सुरू झालेले पाहून **बोस** यांनी फॉरवर्ड ब्लॉकतर्फे भारतात अँटी कॉम्प्रमाईजची चळवळ सुरू केली आणि रायगड येथे काँग्रेसचे अधिवेशन १९४० सालात भरले तेव्हा तेथेच अँटी-कॉम्प्रामाईज कॉन्फरन्स त्यांनी भरविली. The Indian Struggle, 1935-42 by Subash Chandra Bose 1952. काँग्रेस व सरकार यांच्यात समेट व्हावा अशा अर्थाचा ठराव कॉं. का मंडळाने वर्ध्याच्या बैठकीत १६-१-४२ ला मंजूर केला. ब्रिटिश मंत्रीमंडळाने चीनचे जनरल **चियाँग कै शेक** यांना विनंती केली, की भारतात तुम्ही जा व **गांधी** व **नेहरू** यांच्याकडून नवकी समेटाची योजना करवून घ्या. **शेक** भारतात फेब्रु. १९४२ ला आले. पण काही साह्य न मिळवताच ते परत गेले. मग अमेरिकेकडून टेकनिकल मिशन भारतात मार्च १९४२ ला आले. त्यात अनेक मुत्सद्दी, पत्रकार, विद्वान आणि लष्करी तज्ज्ञ अधिकारी होते. त्यांनीही गुप्त बोलणी भारतात केली. पण त्यांनाही यश आले नाही.

सिंगापूर बंदर हे ब्रिटिशांचे पूर्वेकडील तटबंदीच्या दृष्टीने अभेद्य व मोठे लष्करी केंद्र होते. ते जपान्यांनी आठ दिवसांच्या लढाईनंतर १५-२-४२ ला जिंकले, आणि मलाया पायाखाली घालून जपानी सैन्य ब्रह्मदेशात शिरले. ही विपरीत परिस्थिती पाहून इंग्लंडच्या तोंडचे पाणी पळाले. भारताच्या नैऋत्य सीमेवरही जपानी सैन्य आले तेव्हां ब्रिटिश मंत्रीमंडळाला भारताचे सहाय्य मिळविण्याची निकड भासली. मुख्य प्रधानाने पार्लमेंटमध्ये ११-३-४२ ला घोषणा केली की, भारतीय राजकारणातील गुंतागुंत सोडवण्यासाठी आम्ही सर **स्टॅफर्ड क्रिप्स** यांना भारतात पाठवीत आहोत. **क्रिप्स** मार्च १९४२ मध्ये भारतात आले. त्यांची योजना अशी होती: युद्ध संपल्यानंतर भारताला वसाहतीचे स्वराज्य देणे, ते स्वीकरणीय वाटले नाही तर भारताचे दोन तुकडे करून एक मुस्लिमांना देणे. ही योजना कॉं. का. मंडळाने १०-४-४२ च्या बैठकीत फेटाळली. **क्रिप्स** ११-४-४२ ला भारतातून लंडनला परतले. अलाहाबादला कॉं. का. मंडळाची बैठक २७ एप्रिल ते १ मे १९४२ पर्यंत भरली. मुसलमानांची पाकिस्तानची मागणी काँग्रेसने मान्य करावी, असा, **चक्रवती राजगोपालाचारी** यांनी बैठकीत ठराव मांडला. त्यावर कडाक्याची चर्चा झाली, व ठराव फेटाळला गेला. त्यांनी ब्रिटिशांशी सहकार्य करून आपल्या पदरात स्वातंत्र्याची देणगी, जेवढी पडेल तेवढी घ्यावी, असा दुसरा ठराव मांडला. तोही फेटाळला गेला. **गांधीजी** या बैठकीस हजर नव्हते. परंतु सरकारशी सहकार्य करू नये याबाबतचा ठराव त्यांनी लिहून पाठविला होता. त्याची भाषा-रचना अशी होती की तीतून **हिटलर, मुसोलिनी** व **जपान** यांना पाठिंबा द्यावा असा अर्थ निघत होता. **नेहरूंनी** तसे बोलूनही दाखवले. **नेहरूनी** ठराव तयार केला आणि **गांधीजींच्या** ठरावाऐवजी **नेहरूंचा** ठराव बैठकीत

मांडला. एखादे परकीय सैन्य भारतात घुसले तर त्याच्याशी भारत अहिंसात्मक असहकार पुकारील, आणि इंग्लंड व भारत यांच्यात जोपर्यन्त सख्य झालेले नाही तोपर्यन्त भारताला जपान अगर इतर राष्ट्रे यांच्या विरूद्ध लढणे अगर न लढणे याचा विचार करण्याची जरूरी नाही, असा **नेहरूंचा** ठराव होता. तो **गांधी** गटाने हाणून पाडला, पण अध्यक्ष **मौलाना आझाद** यांच्या मध्यस्तीने तो ठराव मंजूर झाला. या बैठकीनंतर **राजाजींनी** कॉंग्रेस सोडली. **गांधीजींचा** ठराव ब्रिटिश सरकारने प्रसिद्ध केला, आणि **गांधीजी** फॅसिस्टांचे हस्तक आहेत, असा जगभर डांगोरा पिटला. या बाबत **नेताजी सुभाष बोस** यांनी वर्णन केलेले आहे. ते असे—

"In his original draft resolution, the Mahatma said, "Britain is incapable of defending India.... The Indian Army is a sagregated body, unrepresentative of the Indian people, who can in no sense regard it as their own..... Japan's quarrel is not with India. She is warring against the British Empire. If India were freed her first step would probably he to negotiate with Japan. The Congress is of opinion that if the British withdrew from India, India would probably be to negotiate with Japan. The Congress or any other aggressors attacking India." In the same draft resolution the committee assured the Japanese Govt. and people that India bore no enmity towards Japan, etc. Nehru's draft which was finally accepted by the Congress working committee contained no reference to Japan or to Britain's incapacity to defend India.

A few months later, the British Govt. made a great fuls over Gandhiji's draft resolution, by suddenly giving it worldwide publicity and simultaneously trying to paint Gandhi as a pro-fascist agent.....

The much criticised draft resolution showed that Gandhi was not an ideological fanatic like Nehru and was much more of a realist than the later. The outstanding feature of the Congress meeting was the departure from the Congress movement of Rajgopalachari, the leading protagonist of a compromise with Britain."

(The Indian Struggle, 1935-42, by Subhash Chandra Bose, 1952, pp. 39-40).

अलाहाबादच्या बैंठकिनंतर नेहरू युद्धाला सहाय्य करावे अशा तऱ्हेचे मत मधून मधून प्रदर्शित करीत. तेव्हा गांधी. काँ. का. मंडळ व जनता यांच्यातून त्याबद्दल न पसंती व्यक्त होत असे. भारतातील राजकारणात माजलेली कोंडी फोडण्याचा शेवटचा प्रयत्न करण्यासाठी काँ. का. मंडळाची बैठक वर्ध्याला ६–७-४२ ला भरली. व तीत 'छोडो भारत' हा ठराव १४ जुलैला मंजूर झाला. त्यावर ८-८–४२ ला मुंबईतील बैठकीत शिक्कामोर्तब झाले. आणि पुढील दोन वर्षात सर्व देशभर जाळपोळ, पोलीस व मिलिटरी यांचे जनतेवर गोळीबार, सातान्यात प्रती सरकारची स्थापना, सरकारी तिजोन्यांवर तरूणांचे हल्ले इ. प्रकारांनी सरकार व जनता हे दोघेही हैराण झाले. त्यानंतर गांधीजी, इतर पुढारी आणि लाखो लोक यांना तुरुंगात डांबून टाकण्यात आले. **गांधींनी** प्रायोपवेषण करून स्वतःची मुक्तता करुन घेतली. त्यानंतर लीगचे स्वातंत्र्य संपादनात सहकार्य मिळविण्याचे प्रयत्न, गाधींनी जीनांशी बोलणी करून केले ते प्रयत्नही यशस्वी झाले नाहीत.

**गांधीजीबद्दल नेताजी बोस** यांनी खालील विश्लेषण केलेले आहे की, गांधी जीर्ण मतांचा पाठपुरावा करणारे ब्रिटिश साम्राज्याशी हातमिळवणी करणारे आणि पूंजिपती वहिवाटदार, सरंजामदार याचे पाठीराखे आहेत. गांधीवाद हा संपूर्ण प्रतिगामी असल्याने त्यातून सामाजिक, आर्थिक व राजकीय क्रांती हाणे, हे त्रिकाळ अशक्य आहे. म्हणून गांधीवाद नेस्तनाबूत करणे, हे प्रत्येक क्रांतीकारक व्यक्तीचे व पक्षाचे आद्य कर्तव्य आहे. हे नेताजींचे मत खालील उतान्यात दिसून येते.

"The Forward Block is to the left movement, what the Gandhiji's are to the right movement. Philosophically speaking the former may be regarded as the 'anti-thesis' of the later. Though the Forward Block has always desired to work with the close co-operation with the Gandhiji's on the anti-imperialist front, the differences between the two are deep and fundamental. Gandhism encourages an ultimate compramise with imperialism. Socially, Gandhism is intimately linked up with the "Haves" — the rested interests. As the "have-nots" are becoming class-contious, as is inevitable, the breach between them and the Gandijites is wodening. One therefore finds that unlike what was the position twenty years ago, today Gandhism does not appeal to large masses of the peasantry and factory workers, nor does it appeal to middle class youths and students, the vast majority of whom sympathise with the poverty stickem masses; with regard to the future, Gandhian ideas of post

struggle reconstruction which are partly medieval and partly anti-socialist contrary to those of forward block which has a thoroughly modern outlook and stands for socialist reconstruction." — (page 98 — Abid).

उपरिनिर्दिष्ट परिस्थिती लक्षात घेतली तर **बाबासाहेबांनी** मद्रासमधील आपल्य निरनिराळ्या भाषणांत काँग्रेस पक्षाचे पुढारी आणि विषशेतः **गांधीजी** यांच्यावर कडक टीका का केली हे लक्षात येईल. **श्री. जे. बी कृपलानी, श्री. राजगोपालाचारी श्री. जयप्रकाश नारायण, श्री. कन्हैयालाल मुन्शी, श्री. राममनोहर लोहिया** वगैरे पूर्वीचे श्रेष्ठ दर्जाचे काँग्रेस पुढारी यांनी १९५० नंतरच्या काळात काँग्रेस व काँग्रेस पुढारी यांच्यावर जळजळीत टीकास्त्रे फेकली. हे या संदर्भात लक्षात घेतले तर बाबासाहेबांच्या भूमिकेचे स्वरुप विशेष खुलून दिसेल.

**बाबासाहेब** मद्रासहून राजमहेंद्रीकडे जाण्यासाठ सोमवारी रात्री २५–९–४४ ला निघाले. ते द्वारपौडी स्टेशनला मद्रास मेलने मंगळवारी २६–९–४४ ला सकाळी येऊन पोहोचले. तेथून ते मोटारीने रामचंद्रपूरला आले. तेथे अस्पृश्यांनी त्यांचे स्वागत केले. तेथून त्यांची मोटार कोकीनाडाकडे निघाली. रस्त्यात बेलंगी या गावच्या अस्पृश्यांनी बाबासाहेबांना मानपत्र दिले. संध्याकाळी ते कोकीनाडाला पोहोचले. तेथे त्यांना ईस्ट गोदावरी डिस्ट्रिक्ट बोर्डातर्फे मानपत्र दिले. बोर्डाचे अध्यक्ष रावबहादूर बी. बी. **सर्वेरायडू** हे मानपत्रसमारंभाचे अध्यक्ष होते. मानपत्राला उत्तर देताना बाबासाहेबांनी भारताची सध्याची परिस्थिती व तीत देशाचे हिताचे धोरण कोणते याबद्दल भाषण केले. युद्धाला बिनशर्त मदत करणे, सशर्त मदत करणे, काहीच मदत न करणे आणि युद्धाला विरोध करणे असे विचारप्रवाह भारतात चालू आहेत. यामुळे देशांतील राजकीय परिस्थितींत मोठा गोंधळ उत्पन्न झालेला आहे. युद्धाकडे पाहण्याची निरनिराळ्या पक्षांची व पुढाऱ्यांची दृष्टी वेगवेगळी आहे. हे युद्ध आमचे नव्हे, यात ब्रिटिशांचा पराजय झाला तर बरेच; वगैरे उद्‌गार हे पक्ष व पुढारी काढतात पण ही त्यांची भूमिका चुकीची आहे. ब्रिटिशांचे राज्य संपून भारतात जपान अगर जर्मनी यांचे राज्य सुरू झाले तर भारतातील सर्व लोकांना पशूसमान जीवन घालवावे लागेल. ब्रिटिशांनी भारतावर अनेक अन्याय केलेले आहेत व त्याविरुद्ध भारतीयांना, चळवळ करण्याची व बोलण्याची घटनात्मक स्वतंत्रता होती व आहे. परंतु जपान अगर जर्मनीच्या हुकूमशाही राज्यांमध्ये हे स्वातंत्र्य उपभोगायला मिळणार नाही. युद्ध संपल्यानंतर भारताला जादा हक्क नक्की मिळतील व ते हक्क मिळवण्यासाठी युद्धात जपान व जर्मनी यांचा पाडाव करण्यासाठी भारतातील सर्व पक्षांनी हातभार लावणे आपल्याच हिताचे आहे. या बाबतीत "छोडो भारत" चळवळ करुन युद्धाला उपयुक्त प्रयत्न जे होतात ते गुप्तपणे हाणून पाडण्याचे ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले त्यांना त्यांना सरकारने तुरुंगात डांबले; यांत सरकारकडून अन्याय झालेला नाही. **जीना** आणि

**गांधी** यांच्यात जी तडजोड व्हावी असे लोकांना वाटते तेवढ्या तडजोडीवरून भारताचे राजकीय प्रश्न सुटणार नाहीत. अस्पृश्य, हिंदू, मुसलमान वगैरे सर्व वर्गातील व पक्षांतील लोकांनी एकत्र बसून हे प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न करावे. **बाबासाहेबांचे** ते भाषण अशा आशयाचे होते.

संध्याकाळी कोकीनाडा येथील शेड्यूल्ड कास्टस फेडरेशन, रचुपेटे डिस्प्रेस्ड क्लासेस असोसिएशन, वर्मा आंध्र इव्हयक्यूज असोसिएशन, वलंदरपेटा आदि आंध्र असोसिएशन आणि प्रबोधन साहित्य समिती या संस्थांतर्फे बाबासाहेबांना पी. आर. कॉलिज हॉल मध्ये मानपत्रे देण्यात आली. त्यांना उत्तर देताना बाबासाहेबांनी भाषण केले. कोणताही वर्ग अगर कोणतीही जात एखाद्या देशाच्या समाजात प्रभुत्व गाजवणारी का होते ? त्या वर्गाच्या अगर जातीच्या हातात सत्ता असते म्हणून. मग ती सत्ता आर्थिक, धार्मिक, राजकीय अगर इतर कसलीही असो. ब्राह्मणांनी हे पाचसहा हजार वर्षांपूर्वी ओळखले. म्हणून ब्राह्मण लोक आपली जात सर्व हिंदू समाजाच्या डोक्यावर मिऱ्या वाटणारी कशी करता येईल याबद्दल विचार करीत होते. त्यासाठी त्यांनी वेदांत चातुर्वर्ण्यांची उत्पत्ती केली, समाजाचा प्रमुख, देवळांचा प्रमुख, गावांचा प्रमुख ब्राह्मणच असला पाहिजे. ब्राह्मणाला सर्व जातीच्या बायका करता याव्यात, त्याला आपला मुख्य प्रधान, पुरोहीत, सेनानी राजाने करावे, वगैरे नियम मनू व इतर धर्मशास्त्रकार यांनी आपापल्या स्मृतीग्रंथात तयार करून ते हिंदू समाजाच्या बोकांडी मारले. ब्राह्मणांचे हे श्रेष्ठत्व झाणून पाडण्यासाठी ब्राह्मणेत्तरांनी वैदिक काळात व नंतर एकंदर सात मोठे झगडे केले. ब्राह्मण मूठभर व ब्राह्मणेतर लाखोनी मोजता येतील असे असता या झगड्यात ब्राह्मणेतरांना हार खावी लागली. कारण ब्राह्मणेतर लोक ते ब्राह्मणी जातीभेदाच्या विषाने मानवी सद्‌गुणांना मुकलेले होते. तेव्हा अस्पृष्य वर्ग जर सामर्थ्यशाली व्हावयाचा असेल तर त्याच्या हातात राजकीय व आर्थिक सत्ता आली पाहिजे. राजकीय सत्ता हस्तगत करण्याचा मोका सध्या अस्पृश्यांना प्राप्त झालेला आहे. त्यांना अशी संधी गेल्या हजारो वर्षांत मिळाली नाही. या संधीचा फायदा घेण्यासाठी त्यांनी आपापासातील मतभेद सोडून द्यावेत व शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनमध्ये सामील व्हावे. तुम्ही राजकीय सत्ता काबीज केली की, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक सत्ता मिळवण्याचे मार्ग तुम्हाला मोकळे होतील.

मात्र या मार्गात एक मोठी मानसिक अडचण आहे. गांधी व कॉंग्रेस यानी हरिजन सेवक संघातर्फे अस्पृश्यातील लहानथोर विद्यार्थ्यांव्यतिरिक्त इतरांना आर्थिक मदत देण्याचे सत्र सुरु केले. यात त्यांचा हेतू पवित्र नसून दुष्ट आहे. त्यांना माहीत आहे की आपल्या पैशाने हे लोक मिंधे होतील. व आपल्या बाजूने राहून, 'ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी' या न्यायाने कॉंग्रेसच्या चळवळीला उचलून धरतील. महाभारतातील पांडवांची बाजू न्यायाची व

कौरवांची अन्यायाची होती हे माहिती असूनही भीष्म व द्रोण हे कौरवांचे मीठ खाणारे होते म्हणून त्यांनी कौरवांना सहाय्य केले व शेवटी त्यांचा सत्यानाश झाला. त्याचप्रमाणे हरिजन म्हणून जगणाऱ्या अस्पृश्यांची परिस्थिती होणार आहे. म्हणून मी आमच्या तरुण विद्यार्थ्यांना धोक्याची सूचना देतो की, या संपळ्यात अडकून पडू नका. माझ्या इशाऱ्याचे तुम्हाला प्रत्यंतर पाहावयाचे असेल तर तुम्ही हरिजन सेवक संघवाले, अगर काँग्रेसवाले हिंदू किंवा **गांधी** यांना सामाजिक समतेची मागणी करून पाहा. ते तुम्हाला दटावून गप्प बसायला लावतील, हे मी नक्की सांगू शकतो.

अस्पृश्यांना उद्देशून केलेल्या बाबासाहेबांच्या भाषणांचा आशय असा होता.

(The Hindu, Madras 26-9-44, 28-9-44, 1-10-44; The Search Light, Patna, 1-10-44).

बाबासाहेब गुरुवारी २८–९–४४ ला संध्याकाळी राजमहेंद्री येथे आले. बरोबर **श्री. पां. ना. राजभोज** जनरल सेक्रेटरी, फेडरेशन, आणि **श्री. व्ही. रामकृष्णन्** आ. सी. एम्. लेबर डिपार्टमेंट हे होते. त्यांना म्युनिसिपालीटीतर्फे म्युझियम हॉलमध्ये मानपत्र देण्यात आले. म्युनिसिपल चेअरमन **श्री सोमिना कामेश्वरराव** आणि म्युनिसिपल कमिशनर **श्री. के. व्यंकटाद्रि चौधरी** यांनी त्यांचे स्वागत केले. **बाबासाहेबांचे** अद्वितीय विद्यार्जन, त्यांनी केलेली अस्पृश्यांतील जागृती आणि त्यांच्यासाठी व कामगारांसाठी त्यांनी केलेली कामे, याबद्दलचा मानपत्रात उल्लेख करून म्युनिसिपालिटीने लोकोपयुक्त व अस्पृश्यांना हीतकारक अशी कोणती कामे केली, याबद्दलची माहिती देण्यात आली होती. सरकारकडे काही मागण्याही केलेल्या होत्या.

लोकोपयोगी कामे केल्याबद्दल बाबासाहेबांनी म्युनिसिपालीटीचे अभिनंदन केले. अस्पृश्यांच्या शिक्षणाची सोय केल्याबद्दल त्यांनी तिचे आभार मानले. भारतातील ही एकच म्युनिसिपालिटी अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करीत आहे, इतर म्युनिसिपालिटयांनी हा धडा गिरवावा, असे उद्‌गार काढले.

**गांधी–जीना** वाटाघाटी फिसकटल्याबद्दल त्यांनी दुःख प्रदर्शित केले. या वाटाघाटी, मुळी, एकांगीच होत्या. त्यांत अल्पसंख्यांक जातींना स्थान नव्हते. राजकीय प्रश्न सोडविण्याची ही खरी रीत नव्हे. सर्वांनी एकत्र बसावे, घटना तयार करावी, या घटनेवर सह्या कराव्या, आणि त्या घटनेप्रमाणे आम्हाला भारतात राजवट करू द्यां अशी मागणी करण्याकरिता शिष्टमंडळ लंडनला पाठवावे. ते मंडळ एकट्या **गांधीचे** असले तरी चालेल. पण त्यांनी भारताची मागणी व्यवस्थितपणे मांडली पाहिजे. हे मी असे म्हणतो याचे कारण **गांधीनी** आतापर्यंत भारतात विलक्षण राजकीय जागृती निर्माण केली; पण तिचा फायदा देशस्वातंत्र्यासाठी कसा करून घ्यावा, याची दूरदृष्टी **गांधीजींजवळ** नाही. दूरदृष्टि ज्या देशात नाही त्याचा सत्यानाश होतो असे जुन्या करारात

एक वचन आहे. गांधींच्या संबंधात त्याची आठवण होते. शिवाय गांधींजवळ संपूर्ण स्वातंत्र्याची आच नाही. **गांधींची** तुलना कधी कधी **एब्राहॅम लिंकनशी** करण्यात येते. लिंकन हा प्रथम संयुक्त राष्ट्र कसे उभारता येईल हे महत्त्वाचे मानीत होता. त्या त्याच्य निर्मितीसाठी निग्रोची गुलामगिरी ठेवणे अगर नष्ट करणे हे त्या निर्मितीच्या प्रश्नावर अवलंबून असावे. असे मानीत होता, व त्याप्रमाणे त्याने प्रथम गुलामगिरी नष्ट करण्याचे नाकारले व काही वर्षांनी म्हणजे १८६३ साली त्याने गुलामगिरी नष्ट केल्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. कारण गुलामांचा उपयोग लढाया जिंकून युनियन अभंग ठेवणे, हे त्याला जरूरीचे वाटले. **गांधींचेही** असेच आहे. त्यांना स्वातंत्र्य हवे, पण वर्णाश्रमही हवा. समाजात संपूर्ण समता त्यांना नको आहे. अशा वृत्तीच्या पुढाऱ्यांजवळ दूरदृष्टी कशी असणार ? स्वातंत्र्याचा प्रश्न निघाला की अल्पसंख्यांक जाती आपापल्या संरक्षणासाठी जादा राजकीय हक्क मागतात. असले हक्क मागणे म्हणजे राष्ट्रद्रोह होय, अशी भावना **गांधी** व काँग्रेस यांनी देशांत पसरविली आहे. भारताला स्वतंत्र करण्यासाठी १८८५ मध्ये काँग्रेस उत्पन्न झाली. पण **गांधींच्या** नेतृत्वामुळे काँग्रेसने पाकिस्तानचा प्रश्न उत्पन्न केलेला आहे. अशा परिस्थितीत भारताचे राजकीय पेच कसे सुटणार ? ते फक्त पक्षांच्या व जातींच्या हार्दिक सहकार्यानेच सुटतील,

**बाबासाहेबांच्या** भाषणाचे सार असे होते. त्या भाषणाचा वृत्तान्त दी फ्री प्रेस. मद्रास दी हिंदू, मद्रास या दोन पत्रांत २–१०–४४ रोजी प्रसिद्ध झालेला होता. त्यातील काही भाग मी येथे उद्धृत करतो.

"We are meeting today under the shadow of very sad piece of news that has come...... It has been reported that the talks between Mr. Gandhiji and Mr. Jinnha have failed. We have never been able to muster together. We have never been able to sink our differences and patch up things in order to march on. Something has always happened at the most critical moment. The Old Testament somewhere says, "The Nation which has lost its vision will be destroyed." One of the defects which I have noticed in Mr. Gandhi is the complete lack of vision. I wonder what the founders of the congress would think of this Pakistan. Those who met for the first time in 1885, in order to see that India get Homerule, no doubt, by stages, never dreamt that the movement will be carried on in such a manner, in such a spirit, that just about the time when India was about to reach her destiny, India would be cut up into parts. We are told that the old fellows who had started the Congress

were too slow. They were only arm-chair philosophers and were doing nothing but sending letters to the Vice-roy. It was said that those methods did not suit the country. The result was that the most dynamic movement was started under the aeges of Mr. Gandhi. We had mass movement and agitations. We had everything except light and vision. He added that Mr. Gandhi is approximated to a large extent to Abbraham Lincoln. The attitude that Abbraham Lincoln took with regard to the question of slavery was very much the attitude about the minorities problem that Mr. Gandhi took in India. Abraham Lincoln was passionately devoted to the Union. He was the upholder of the slave system, yet the proclamation of the freedom of the slaves was issued in 1863 by Abraham Lincoln. He was freed to do so in order to win the Negroes to get their help for the Northern Armies. Mr. Gandhiji's attitude seemed to be exactly the same. He always said, "I want freedom, but I want Chaturwarnashram Dharma," One of the reasons why Mr. Gandhi had failed all along was because of this attitude of his. I hope and trust that Mr. Gandhii will be able to realise the mistake," said Dr. Ambedkar.

Dr. Ambedkar pointed out that every one desired Independence for the country and added that they did not however realise that there is in politics a graded system of equality. They wanted equality and liberty and freedom for minorities. Any Indian who objects to the provision of safeguards to the minority interests is not a friend of this country and he is not a democrat. He is the enemy of the country. May I again say that this is probably the finest opportunity that this country has. There are many friends who believe that because the British Government has not given any clear declaration to the position of India after war that they are rather apprehensive as to what will happen. He did not feel apprehensive about India's future after the war. He did not believe that the destiny of this country would depend on the decision of one man, however great he might be in the British Empire. We are the

makers of the destiny of this country. The whole thing depends on how much solidarity we can build up among ourselves. If we could manage our internal affairs, our quarrels in such manner that we can draft a constitution which can be signed by all those who are the representatives of the different sections and communities in the country. We can send Mr. Gandhi as the single and solitary representative of the people to the Prime Minister or to any body. It depends upon what ideas Mr. Gandhi will have....." (The Hindu — 2-10-44).

**बाबासाहेब** दिल्लीला परतताना हैदराबादजवळच्या एका स्टेशनात लोकांनी त्यांचा सत्कार केला. त्यांना त्या प्रचंड सभेत तीन मानपत्रे अर्पण करण्यात आली. ते दक्षिणेतील यशस्वी दौरा संपवून ५–१०–४४ ला दिल्लीला परत आले.

**बॅ. जयकर** यांनी ३-११-४४ ला **सप्रूंना** मुंबईहून पाठवलेल्या पत्रात, **गांधी-जींना** वाटाघाटी फिसकटल्या व त्या प्रकरणांतील दोषांचा पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला, याचा जागतिक विचारसरणीवर असा परिणाम येईल की हिंदी लोकांमध्ये राजकीय दृष्टी, बुद्धी आणि राष्ट्रीय भावना, ही अजिबात नाही, म्हणुनच त्यांनी हिंदी राजकारणाचा हा असा पोरखेळ केलेला आहे. **गांधींच्या** शरणागतीमुळे **जीना** शेफारले आणि या परिस्थितीचा उपयोग ब्रिटिशांनी लीगला डोक्यावर घेणे व काँग्रेसला पायाखाली तुडविणे असा करून घेतलेला आहे आणि जीनांना हे माहीत आहे की **गांधींकडून** जे कांही आपल्याला (लीगला) मिळेल त्यापेक्षा जास्त ब्रिटिशांकडून मिळणारच. मग **गांधींना** किंवा हिंदूंना का भीक घाला? पहिल्या वर्तुळ परिषदेत ज्या घटना घडल्या त्यांचीच ही पुनरावृत्ती आहे. आता गांधी उपास करतील अशी अफवा आहे. काँग्रेसचे लोक या उपवासाला उचलून धरतील. त्यांनी उपवास केला तर जगातील सूज्ञ म्हणतील की भारताचे राजकीय दिवाळे निघाले. **गांधी, जीना** व सरकार यांच्या निरनिराळ्या तऱ्हा आहेत. ते कोणाचे ऐकण्यास तयार नाहीत त्यामुळे आपण अपक्षीय भूमिकेवरून हे समझोत्याचे काम करीत असतो त्याला कोणी किंमत देत नाही. तरी पण आपण आपले प्रयत्न करीत रहावे. यश येवो न येवो. यासाठी अपक्ष पुढाऱ्यांची परिषद भरविण्याच्या तुमच्या विचारास माझा पाठिंबा आहे. नाहीतर ब्रिटिश लोक भारताच्या गळ्यात त्यांना आवडणारी राज्यघटना बांधतील आणि वर डांगोरा पिटतील की आम्ही भारताला स्वातंत्र्य दिले.

("The Press has published a report that the Mahatma is in correspondence with you suggesting that you should call a conference of all parties under your invitation at a conve-

nient place. I share your view as regards the futility of such a step. I am very doubtful whether under present conditions revealed by the correspondence between Jinah and Gandhi, as also by the circumstances which led to the breakdown of their negotiations, any good will result from any initiative on our part. Of course Jagdish Prasad's suggestion that a few of our group should meet in Delhi at an early date, stands on a different footing. But, let us consider what is it that we can do, having no control over events and being outside the two large political organisations, the Congress and the League ? What do you think can be done ? I am more or less convinced that, which Gandhi and Jinnah are in their present mood and also the Government, no suggestion, of course, will have any effect on the Indian situation. The Gandhi—Jinnah talks and the consequent correspondence have, in my opinion, done incalculable harm to the country. The British appear to be convinced that they have nothing to fear from these bodies. On the contrary, there is the possibility of their wooving the Muslim League with promises which they will refuse to make to the Congress. Why should Jinnah settle with his countrymen when he can get better terms from the British Government ? It is the same old story as at the first Round Table Conference and it hurts one's self respect to be constantly urging the Government and the Congress to do something which neither of them is disposed to respond to. Events must take their course and I suppose that, in the last resort, the British will force a constitution on India of their liking and blazon it forth as the grant of a free Constitution. We have bungled very badly and if Gandhi now undertakes a fast, which he has threatened, it will be the last straw on the camel's back. Congress-men, of course, will applaud this step, but it will be in the opinion of the word, the ruin of their and of the country's reputation for political sanity. I am frankly stating my views here....").

स्थायी समितीची (स्टँडिंग कमिटी)

बैठक आलावादला २ व ३ डिसेंबर १९४४ ला भरविण्याचे मुक्रर केल्यानंतर सप्रूंनी सर्व अपक्षीय विचारवंतांना आमंत्रणे पाठविली. त्यात **लॉर्ड बिशप ऑफ कलकत्ता, सर बी. एन्. राव मिर्झा इस्माईल, डॉ. पी. के. सेन** (रिटायर्ड जज्ज) वगैरे प्रमुख होते. **जयकरांना** २१-११-४४ ला पाठविलेल्या पत्रांत सप्रूंनि (ही बातमी) असे उद्गार काढले की, मुसलमान प्रतिनिधी मिळणे कठिण झालेले आहे. आणि तो मिळाला तरी लीग त्याचे प्रतिनिधित्व मान्य करणार नाही. एवढेच नव्हे तर आपण जे अपक्ष भूमिकेवरून राजकीय क्षेत्रात सर्वांची एकी करण्याची खटपट करीत आहोत, तिलाच जीना किंमत देणार नाही. तरी पण सर्वांकडून आपली कितीही अवहेलना झाली तरी तशा अपमानास्पद मनस्थितींतही आपण आपले प्रयत्न करीत राहणे हे आपले कर्तव्यकर्म आहे

("....The real difficulty is in getting Mohamedans. I am in communication with some. I think the condition that the members of this committee should be those who have not violently committed themselves to our view or the other and who do not belong to the Congress, the League or the Hindu Sabha, is quite a sound one. Some time or there we shall have to apply to individual leaders or interview. I do not mind getting rebuff. I have said so publicly. If they see us well and good. If they do not see us we can go on with our work .... It does not matter to me how much I am decried by one part or another but I am anxious that our recommendation must be firm, just and solid. I am veay sorry to have undertaken this responsibility but I have done so in public interest and particularly because the Mahatma is willing to co-operate with us, which is a great thing. No doubt Jinnah was repudiate and authority and perhaps may saw we should have consulted him....").

भारतीय राजकारणाची कोंडी फोडावी आणि राजकारणाला प्रगतीचे योग्य वळण लागवे या हेतूंनी 'सप्रू कमिटी' स्थापून तिच्यातर्फे सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींचे मत सरकार व काँग्रेस याच्यापुढे ठेवावे, अशी सप्रू व त्यांचे मित्र हे खटपट करीत होते. या कमिटात अस्पृश्यांचे प्रतिनिधी पाठवा, अशी सप्रूंनी बाबासाहेबांना २४-११-४४ ला पत्राने विनंती केली. अस्पृश्यांच्या प्रतिनिधींनी आपले मत निर्भिडपणे कमिटींत मांडावे, याबद्दल सप्रूंनी सदर पत्रांत मत प्रदर्शित केले होते. अस्पृश्यांच्या हितसंरक्षणाची योजना तुम्ही पाठवा, अशींही त्यांनी बाबासाहेबांना विनंती केलेली होती. या पत्राला बाबासाहेबांकडून उत्तर न आल्यामुळे सप्रूंनी त्यांना दोन एक्सप्रेस तारा, १९, अल्बर्ट रोड, अहमदाबाद येथून दिल्लीला केल्या.

(1) Please send me two promised names with address and relevant literture — dated 1-12-44, (2) Anxiously awaiting Scheduled Castes names Concilliation Committee Stop Expect also other material. Stop. Wire reply — dated 4-12-44."

बाबासाहेबांनी ६–१२–४४ ला सप्रूंना उत्तर दिले कीं, तुमची कमिटी ही अल्पसंख्याक जातींच्या राजकीय मागण्यांचा काटेकोरपणाने विचार विनिमय करणारी व त्यानंतर निरपेक्ष रीतीने अहवाल प्रसिद्ध करणारी अशी छोटी संस्था आहे व असावी अशा समजूतीने मी तुमच्याशी सहकार्य करण्याचे वचन दिले होते पण तुम्ही या कमिटींत जे लोक घेतलेत ते जातीयवादी प्रश्नांकडे पूर्वग्रह दूषित दृष्टीने पाहणारे निगरगट्ट लोक आहेत. त्यांना पक्षीय राजकारण इतर सर्व प्रश्नापेक्षा, श्रेष्ठ वाटते. म्हणून अशा कमिटीवर अस्पृश्यांचे प्रतिनिधी पाठविणे मला प्रशस्त वाटत नाही. कारण त्यांतून काही चांगले निष्पन्न होईलसे मला वाटत नाही. अल्पसंख्यकांच्या मागण्या योग्य आहेत की अयोग्य आहेत आणि त्याची कारणे सांगणे एवढे कार्य कमिटीने न्याय बुद्धीने करावे आणि तशा कार्याला योग्य असे लोक कमिटीवर घ्यावेत. हे तुम्ही केलेत तर मी तुमच्या कमिटीशी सहकार्य करीन, एरवी नाही.

बाबासाहेबांचे मूळ पत्र असे :–

"Bhimrao R. Ambedkar, M.A., Ph.D., D.Sc., Barrister-At-Law, Member, Governor General's Executive Council.

22, Prithviraj Road, New Delhi. 16th December 1944.

Dear Sir Tej,

I was on tour the last fortnight. Consequently, I did not get your letter and telegram until I reached here yesterday evening. In the meanwhile, I read in the Press the names of those whom you have chosen to be members of your Committee. I am sorry to say, the personnel of the Committee has forced me to take a different view. I must say that some of the members do not inspire confidence in me. They are persons who have been parties to the commercial controversy and are imbued with pre-conceived notions in regard to the question of minority rights. I always understood that your committee was to be a committee of pure jurists who would express an opinion on the reasonableness minorities in India. This is what I had bargained for when I assured you my co-operation. But I

find that your Committee is quite different, both in its composition as well as its purpose. Under the circumstances, I must decline to nominate members of the Scheduled Castes on the Committee. I am prepared to co-operate if you will reconsider the personnel of your Committee and eliminate from it every active and partisan person, and make it a small body who will do nothing more than report.

I am,

Your Sincerely,
Sd|- B. R. Ambedkar.

The Rt. Hon'ble Sir Tej
Bahadur Sapru."

या पत्राला सप्रूंनी १०–१२–४४ ला उत्तर दिले. कमिटीत घेतलेले लोक कॉंग्रेस, लीग हिंदुमहासभा अगर अन्य राजकीय पक्ष यांचे अनुयायी नाहीत. त्यांनी कधीकाळी पूर्वी जातीय प्रश्नांवर मते प्रदर्शित केलेली असतील. पण त्याचे आता स्तोभ कशाला माजवावे. कमिटीतील लोकांनी राजकीय प्रश्नांवर सर्व बाजूंनी विचार करावा आणि देशाच्या व सर्व राजकीय पक्षांच्या पसंतीला पडेल असा कार्यक्रम तयार करावा व तो देशापुढे मांडावा यासाठी कमिटीत चार सेवानिवृत्त जज्ज आहेत. व इतरही अनुभवी पुढारी आहेत. त्यांच्या प्रयत्नांनी जो कार्यक्रम ठरेल तो आपण मान्य करूं. त्यासाठी आपणाला सर्वांच्या शिव्या सहन कराव्या लागतील हे सर्व लक्षांत घेऊन तुम्ही अस्पृश्यांचे एक दोन प्रतिनिधी कमिटीवर पाठवा. ते तुम्हाला शक्य नसेल तर तुम्ही माझ्याशी सर्व प्रश्नांवर वैयक्तिक चर्चा करा. या संबंधात तुम्ही मला पूर्वी सर **जगदीश प्रसाद** यांच्या समक्ष वचन दिलेले होतेच. तरी राजकीय प्रश्नांसंबंधी जे वाङ्मय आहे ते मजकडे लौकर पाठवा आणि वैयक्तिक चर्चेसंबंधी वेळ व स्थळ कळवा. असा सप्रूंच्या पत्राचा आशय होता. संपूर्ण पत्र असे :–

Personal. 10th December 1944

I thank you for your letter of the 6th of December which I received. I had been waiting all this time to hear from you. I see now that you cannot see your way to nominating members of the Scheduled Castes on the committee because you have taken exception to the names of those whom I have chosen to be the members of my Committee. I am very sorry to see that you have arrived at this decision. I have taken good care to exclude men who

belonged to either the Congress, the Muslim League or the Hindu Mahasabha. It would be impossible for me to find persons who have not at one time or another expressed some kind of opinion, but the point is whether these persons can approach to the question now with a free mind. There are four retired judges and I have no doubt that they will play a great part in weighing documents and coming to certain conclusions. It was never the intention — and I did not say this to you — that the committee would consist wholly of retired Judges. I am sure I could never have given you this impression to you as I did not give it to any one else. I, therefore, think that you are wrong in saying that my Committee was to be a Committee of "pure jurists". In fact I may remind you that you said to me in the presence of Sir Jagdish Prasad that I could talk over to you and you would be good enough to supply me with the necessary material. You did not think that I did not need to have any representatives of the Scheduled Castes on the Committtee if I talk over matters to you, but both Sir Jagdish Prasad and I thought that was desirable to have one or two membrs of the Scheduled Classes. As I have announced the personnel of the Committee it is out of question for me to reconsider the personnel and ask any man to leave the Committee.

Am I to take that I am not to approach you also for private discussions of anything in this connection which I may require to discuss with you? I am afraid you have taken a wrong view of my attitude. I am fully alive to the nature of the criticism that has been in certain circles and I am quite ready to work in the midst of these difficulties, leaving it to the country to consider whether we have arrived at independent conclusion or not.

Thanking you for your letter,

The Hon'ble Dr. B. R. Ambedkar, Yours Sincerely
Member, Sd|-- T. B. Sapru
Governor-General's Executive Council,
22, Prithviray Road,
New Delhi."

बॅ. जयकर यांनी सप्रूंना ७-१२-४४ ला पत्र लिहिले. त्यांत त्यांनीही कमिटीत घेतलेल्या लोकांबद्दल नापसंती दर्शविली. (“......I should have discarded some of the names which, it appears, you have been forced to accept.”) “महाराष्ट्रातून हिंदुमहासभेतर्फे तुम्हांला विरोध होणार नाही. दोन तीन वर्तमान पत्रांशी तसे मी संधान बांधलेले आहे. तुम्हांला विरोध होणार तो लीग व मवाळ पक्ष यांचा. टाईम्स ऑफ इंडियाने तर कमिटीतील सर्व प्रतिनिधी काँग्रेसचे बगलबच्चे आहेत असा प्रचार चालविलेला आहे. तरी तुम्ही पुढे चला. मी आतापर्यंत तुम्हांला साथ दिली आणि पुढेही देईन, प्रामाणिकपणाने!” असे जयकरांनी सप्रूंना सदर पत्रांत प्रोत्साहन दिले.

सप्रूंनी राजा सर महाराज सिंग (10, Mall Avene, Lucknow) यांना ९-१२-४४ ला पत्र लिहिले. त्यांत इतर मुद्याबरोबरच एक असा मुद्दा मांडला की, डॉ. आंबेडकर यांनी आमच्या कमिटीच्या बाबतीत विनाकारण गैरसमज करून घेतला. ते आम्हालाच धमक्या देत आहेत, आम्ही त्यांच्या बाबतीत फार निराश झालो. ते कमिटीसाठी प्रतिनिधी पाठवित नाहीत. मद्रासमधील मित्रांना एक दोन प्रतिनिधी कमिटीसाठी पाठवा, अशी मी तार केली आहे.

(“(Ambedkar has been very disappointing with the Committee as he was under the impression that it was going to be a Jurists' Comittee and as feels that there are men on this unwieldly committee who should not be those. He therefore, says that he is not nominating any representatives of his. I have wired to friends in Madras to mention to me two names from among the Scheduled Castes.”)

कमिटीतर्फे एक प्रश्नावली व कार्यक्रम तयार करून कमिटीचे कामकाज जानेवारी १९४५ च्या अखेरीस हाती घेण्याचे ठरले. प्रश्नावली सावरकर, जीना इत्यादी पुढाऱ्यांच्याकडे पाठवून त्यांची उत्तरे मागविण्याचा कार्यक्रम दोषास्पद आहे, कारण त्यात पाकिस्तानबद्दल इतके प्रश्न आहेत की, ही कमिटी पाकिस्तान निर्माण करण्यास अनुकूल वातावरण तयार करीत आहे, असा सर्वत्र समज पसरेल, आणि तो समज कमिटीच्या कार्याला घातक ठरेल असे बॅ. जयकर यांनी १२-१२-४४ ला पत्र पाठवून सप्रूंना कळविले.

(“Its for the draft questionnaire, which I have received, part 1 seems to be all right, but part 2 is, likely to create the impression that the questions are a form inviting detailed suggestions in support of Pakistan. ......I think it will be disastrous if your Committee begins by crrating detailed consideratton of Pakistan......”)

मला जी पत्रे येतात ती ४–५ दिवस उशीरा हाती पडतात, कारण सरकारतर्फे ती फोडली जातात. तुम्हाला येणारी माझी पत्रे यांचीही हीच अवस्था आहे. युद्ध काळात हे अटळ आहे. असा खुलासा सरकार करील. आपण सरकारच्या दृष्टीने निरुपद्रवी आहोत, असे असताही सरकार आपली पत्रे फोडून वाचते व म्हणून ती उशीरा आपल्या हाती पडतात. सरकार इतक्या क्षुद्र मनोवृत्तीचे आहे. हे युद्ध लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी आम्ही लढत आहोत, ही **चर्चिलची** दांभिक उक्ती होय, असेच म्हणावे लागते. **जयकरांनी** या पत्रात ता. क. म्हणून वरील माहिती **सप्रूंना** कळविली, आणि पत्रे लिहितांना मजकूराबद्दल सावधगिरी बाळगा असा त्यांना इशाराही दिला.

(P.S. Please note my warning that all our letters are opened and sometimes delayed four or five days. This is worse than what happened in Linlithgow's times and yet they justify this as a war necessity. It is disgraceful that the Government should think to this low level of political spying and yet Churchill talks of democracy. So, better be careful so as to what you write. Even you and I are not immune from such espionage.").

**सप्रूंनी सर महाराज सींग** (10, Mall Avenue, Lucknow) यांना १५–१२–४४ ला लिहून कळविले की, कन्सिलियेशन कमिटीची बैठक दिल्ली किंवा अलाहाबाद येथे घेण्याचा निर्णय २–३ दिवसांनी प्रसिद्ध करू. या बैठकीला उपस्थित राहण्याची आमंत्रणे **जीना, सावरकर, शामा प्रसाद मुकर्जी** वगैरे पुढाऱ्यांना पाठविलेली आहेत. **जीना** या आमंत्रणाला तिरस्कारपूर्ण नकार देईलच ! लीडर व अमृतबझार पत्रिका या पत्रांनी **जीनांचे** मत प्रसिद्ध केलेले आहे. अपक्ष राजकीय परिषद आणि तिची रिकन्सिलिएशन कमिटी ही आपणास मान्य नाही, असे **जीनांचे** उद्गार आहेत. या परिषदेचे अगर कमिटीचे प्रतिनिधी म्हणून माझ्याकडे कोणी चर्चेस आले तर ते मला खपणार नाही. वैयक्तिक भूमिकेस सप्रू आले तर मी त्यांच्याशी चर्चा करीन, एरवी नाही.

व्हाईसरॉय हे प्रथमच पाकिस्तान निर्मितीसंबंधी बोलले आणि ते विरुद्धचे बोलणे असल्यामुळे **जीना** व मुस्लिम यांचा जळफळाट होईल. आपली रिकन्सिलिएशन कमिटी जातीय तेढ सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे, याचाही व्हाइसरॉयच्या भाषणात दूरान्वये संदर्भ आहे.

("What do you think of the Viceroy's speech? His reference to Pakistan is bound to annoy Mr. Jinnah and the Muslims. It is however the first time indirectly referred

to our Committee pointing out that some prominent Indians are making an attempt to solve the communal questions."

कन्सिलिएशन कमिटीचे ५–१२–४४ चे सर्क्युलर बऱ्याच पुढाऱ्यांना पाठविले होते. हिंदी राजकारणांतील निरनिराळ्या प्रश्नांबद्दल त्यांत त्रोटक चर्चा होती; आणि हे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाऱ्यांनी अपक्ष परिषदेत भाग घ्यावा, असे सुचविलेले होते. **श्री. चक्रवर्ती राजगोपालाचारी** यांना हे सर्क्युलर गेले, तेव्हां त्यांनी २३–१२–४४ ला मद्रासहून (48, Bazlullah Road, Theagarayanagar) **सप्रूंना** उत्तर पाठवून त्यांचे आभार मानले व परिषदेला यश चिंतले. पाकिस्तान निर्मितीसाठी आपण जी योजना तयार केली होती, तींत **गांधी–जीना** वाटाघाटी फिसकटल्या तरी फेरफार करण्याचे कांही कारण नाही. यासंबंधीचे माझे विचार हिंदुस्थान टाइम्सने या वाटाघाटीसंबंधी एक पुस्तिका प्रसिद्ध केलेली आहे. तिच्या प्रस्तावनेत मी माझे विचार व्यक्त केले आहेत. बंगाल व पंजाब या प्रांतातील प्रत्येक जिल्ह्याची लोकसंख्या व सीमा प्रथम नक्की करण्यांत मग त्यांची फाळणी करणे वा न करणे या प्रश्नांवर विचार करता येईल. पण त्याचा लीगवाल्यांनी विपर्यास करून जनतेत असा मोघम प्रचार केलेला आहे की, मी पाकच्या निर्मितीस बिनशर्त पाठींबा देत आहे. त्याच प्रमाणे ९३ कलमी राजवट रद्द करून तिच्याऐवजी १९३५ च्या कायद्यातील फेडरल गव्हर्नमेंट, काही फेरफार करून अस्तित्वात आणावे. त्यासाठी पुनः निवडणुकी घेणे जरूर दिसले तर तसे करावे. पण सध्याची राजकीय कोंडी फोडावी आणि भारताच्या राजकीय प्रगतीला अनुकूल वातावरण उत्पन्न करावे, असे मत **राजाजींनी** सप्रूंना कळविणे.

**गायकवाड** लेबर वेल्फेअर ऑफिसर असतांना ते मुंबईत 'धन मॅन्शन' व्हिन्सेंट रोड, मुंबई १४, येथे रहात व तेथून फिरतीवर जात. ते पुण्याला फिरतीवर असतांना त्यांनी साहेबांना ८–१२–४४ ला पत्र पाठविले. त्या सोबत त्यांनी **समता सैनिक दलाची** नवी घटना साहेबांच्या मंजुरीसाठी पाठविली. सदर पत्रात त्यांनी असेही लिहिले होते की, काही लोकांनी माझ्याविरुद्ध आपणाकडे (साहेबांकडे) तक्रारी केलेल्या आहेत, त्याबद्दल मला माझी बाजू मांडण्याची संधी कृपा करून द्या; मग माझ्यासंबंधाने आपण काय ते मत बनवावे. या पत्राला **साहेबांनी** उत्तर दिले की, ३०–१२–४४, समता सैनिकदलाची घटना मिळाली असे लिहून दुसऱ्या मुद्यासंबंधी सविस्तर चर्चा केली. आपल्या पक्षातील कार्यकर्त्यांबद्दल अनेकांच्या अनेक प्रकारच्या तक्रारी माझ्याकडे येतात. कोणाच्या तक्रारी सद्भावनेने केलेल्या असतात, कोणाच्या द्वेषबुद्धीने वा गैरसमजुतीने केलेल्या असतात. या तक्रारी खऱ्या की खोट्या याचा पडताळा लावण्याचे मी कधीच मनावर घेत नाही; अगर ज्या कार्यकर्त्यांविरूद्ध तक्रारी माझ्याकडे येतात त्या जरी खऱ्या असल्या तरी, त्या कार्यकर्त्याविरूद्ध मी काही उपाययोजना करीत नाही.

आतापर्यंतच्या माझ्या सार्वजनिक जीवनांत मला अशा गोष्टींचे बरेच भलेबुरे, वाईट अनुभव आलेले असल्यामुळे मी ही भूमिका स्वीकारलेली आहे. तुमच्या विरुद्ध ज्या तक्रारी माझ्याकडे आलेल्या आहेत त्या मी तुम्हाला आतापर्यंत का सांगितलेल्या नाहीत, हे वरील स्पष्टीकरणावरून लक्षात येईल. आता तुम्ही त्या तक्रारी जाणून घेण्याची इच्छा दाखवितां म्हणून मी त्या येथे देत आहे. :–

१] नाशिक येथील एका सभेत कांही वक्त्यांनी उद्गार काढले की, **डॉ. आंबेडकर** यांना आज जे मोठेपण प्राप्त झालेले आहे ते नाशिक जिल्ह्यातील लोकांच्या प्रयत्नामुळेच ! आपल्या पक्षाचे जे लोक तेथे हजर होते त्यांना हे उद्गार संतापजनक वाटले. पण तुम्ही तसे केले नाही. तेव्हां **वराळे** यांनी सदर वक्त्यांची खरडपट्टी काढली. त्यामुळे **वराळयावर** बरेच लोक नाखूष झाले.

२] **लालिंगकर** यांना **शांताबाई दाणी** बद्दल आकर्षण वाटल्यामुळे त्यांना तिच्याशी लग्न करण्याची इच्छा झाली. ते व **सावंत** यांनी त्याबद्दल तुमच्याकडे अनेक वेळा बोलणे काढले. पण तुम्ही त्यांना रागावून सांगितले कीं त्या मुलींपुढे **लालिंगकर** फार कमी लायकीचा माणूस ठरतो. व या उपर तुम्ही दोघांनी चकार शब्द बोलू नये. **लालिंगकर** व **सावंत** यांचा तुम्ही पाणउतारा केला.

३] तुमचे **भोळयांशी** संबंध बरे नाहीत. तुम्ही त्यांच्या विरुद्ध प्रचार करता. **भोळे** यांनी इंग्लंड व अमेरिका येथे जी कामगिरी केली तिच्याबद्दल पुण्यातील काही मंडळींनी **भोळयांना** थैली अर्पण करण्याचे ठरविले, पुण्यात यासाठी एक सभा भरली होती, तेथे तुम्ही होता. एका वक्त्याने तेथे उद्गार काढले, '**भोळयाला** ही थैली अस्पृश्यांनी दिली तर ते आणखी एक चित्रपटगृह बांधतील.' या वक्त्याची तुम्ही हजेरी घ्याल असे लोकांना वाटले. पण तुम्ही सदर सभेत बोलला की, **भोळयाना** थैली देण्याची काही जरूरी नाही.

४] **मडकेबुवानी** तुमच्या विरुद्ध बऱ्याच तक्रारी केलेल्या आहेत. **मडकेबुवाचे** जे वजन वाढत चाललेले आहे ते तुम्हाला पाहवत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. **मडकेबुवा** समता सैनिक दलाचे अध्यक्ष होते. त्यांना पुढील वर्षीही अध्यक्ष ठेवावे असा ठराव दलाचे बैठकीत आला, तेव्हां तुम्ही तो हाणून पाडला **बुवाची** समाजातील पत घसरली, असे त्यांचे म्हणणे आहे.

माझ्याविरुद्ध अगर इतर कार्यकर्त्यांविरुद्ध अनेक लोक तक्रारी व टीका करतात. त्याबद्दल मी पर्वा करीत नाही. परंतु आपल्या पक्षांतील लोकांत परस्परांबद्दल गैरसमज उत्पन्न होण्याच्या अगोदर अगर पसरण्याच्या अगोदर परस्परांनी विचारविनिमय करून आपापल्या मनांतील किल्मिष काढून टाकावे. नाहीतर परस्परांतील वैरभाव, द्वेष, आणि मत्सर यांमुळे आपले पक्षांत बजबजपुरी माजेल व पक्षाची शक्ती क्षीण होऊन जाईल, पक्षातील लोकांच्या ऐक्यातच पक्षाची शक्ती सामावलेली असते. मला

जी या बाबतींत विशेष धक्का देणारी गोष्ट दिसून आली ती ही की, तुमचे सहकारी व मित्र हेच मला नेहमी सांगतात की, कोणत्याही कार्यात तुमचे हेतु जनतेला दाखवण्याचे एक असतात व मनातील खरे हेतू निराळेच व ते स्वार्थीपणाचे असतात. हे जे वर सांगितलेले आरोप तुमच्याविरुद्ध आहेत त्याबद्दल स्पष्टीकरण कराल, हे मी जाणतो. पण अशा **स्पष्टीकरणाने आपले इष्टकार्य होत नाही. ते जास्तच चिघळत जाते. म्हणून स्पष्टीकरणाला मी महत्व देत नाही; तर समजूतदारपणा, पक्षाची निष्ठा आणि समाजहिताबद्दल दक्षता यांना मी महत्व देतो.** या गोष्टींची निष्ठा ज्या कार्यकर्त्यांना आहे, त्यांनी आपापसांत धुमसत असलेला वैराग्नी शमवावा, आणि पक्षाची संघटना व ऐक्य बळकट करण्यासाठी झटावे. आपल्या समाजाची कार्ये निष्ठेने उत्साहाने आणि एकोप्याने आपण करीत राहिलो तर आपल्या समाजाला त्याची गोड फळे चाखवयास मिळतील, या बद्दल मला संदेह नाही. पण आपण असेच भांडत राहिलो व स्पष्टीकरणे देत राहिलो तर आपल्या समाजाचा सत्यानाश होईल. यावर जास्त मल्लीनाथी करण्याची जरुरी नाही. तुम्ही हे सर्व जाणता. आणि तुम्ही योग्य काय ते करालच!

राजकारणांत राहून मला कांही भरीव कार्य करता आले. आता मी लौकरच राजकारणातून निवृत्त होईन आणि भरीव कार्य करण्याचा कार्यक्रम हाती घेईन. मी चळवळीतून अंग काढले तर समाजाचे काय होणार आहे ते मी आताच सांगू शकत नाही. पण तुम्हां सर्वांना मला हे सांगावयाचे आहे की, तुम्ही जिल्ह्या जिल्ह्याचे व तालुका तालुक्याचे स्तोम माजवीत राहिलात तर तुम्हां सर्वांचा सत्यानाश होणार हे खास! मी १० जानेवारीला मुंबईत आहे. एक दोन दिवस राहीन. तुमची इच्छा असल्यास तुम्ही मला भेटा.

वरील आशयाचे साहेबांचे जे पत्र गायकवाडांना आले होते ते मी येथे देतो :—

"22, Prithviraj Road,
New Delhi, Dated 31st Dec. 1944.

My dear Bhaurao,

I have received your letter and also a copy of the Constitution of Samata Sainik Dal which you gave to Massey. You have also said that you have heard complaints having been made to me by some of our friends about that you would like very much to have an opportunity of hearing your say before I came to any conclusion. As you know, complaints always come to me not only about you but about all, not that I have any manner or means for

satisfying them. All the same, people like to come and unburden themselves to me. As one who has had a great deal of experience of public life, I know quite well that there are always people who will complain and grumble, sometimes with justice and sometime without any justice. I have therefore never communicated these complaints to those against whom they were made. Nor have I ever formed any opinion about them. I receive the complaints and either forget them or take no action. But as you have been persistently asking me to let you know what complaints people have made to me against you — evidently you know that there have been complaints and give you an apportunity to explain your side. I am yielding to your request and letting you know the substance of these complaints.

(1) That at a meeting held in Nasik at which you were present. Some speakers in the course of their speech said that if I was a great man, it was because the Nasik District people made me great. Our partymen who were present at the meeting expected that you would not allow what they regarded as unfair and uncharitable criticism to go unanswered and that you would get up and make a suitable reply. This you did not do. Varale had then to get up and meet it which make Varale very unpopular at that meeting.

(2) Lalingkar had become infatuated with the girl Shantabai Dani and had expressed a desire to marry her. Sawant was asked to negotiate. It is reported that you and others to whom Sawant spoke, you indignant and took great offence at the very mention of the matter and urged that Lalingkar was too low down to claim the hand of Shantabai Dani and that any such alliance would be derogatory to the dignity not merely of the girl but of the Nasik District. Sawant and Lalingkar took it as a great insult.

(3) You have been carrying on propaganda against Bhole. It is said that a certain amount of estrangement has come about between you two. This, it is difficult for me

to believe. For, I cannot imagine what anything could have occurred between you two to have caused such revulsion of feelings against each other. But some of our men in our party persisted in saying that, that was a fact. They quoted one instance as an illustration of what is happening between the two. There was some meeting in Poona at which it was proposed that Bhole be presented with a purse as a token of the recognition by the party of the good work he did in England and America. Some one who was not favourably inclined towards this proposal made an offensive remark that he did not agree to contribute to the purse fund which might be utilised for building another Cinema house and that though you were present you did not say anything in the matter and that you did not rebuke the fellow as you should have done for having made such a vile suggestion. In fact it was reported that you declared yourself as being against the purse proposal.

(4) Madke Buwa has been complaining that you have been guilty of many unfriendly acts against him with the object of understanding his authority. As one of the many instances he cited the recent resolution passed by the Samata Sainik Dal was repudiated. He says that you were behind this revolution which really made him look very small in the eyes of public.

As I have said at the beginning of this letter that all that I am doing is the work of a reporter telling you what exactly people have complained to me about you. I have done so, I cannot close without setting out what I feel in the matter. I do not mind about what others say about us. The complainants unfortunately are most (of) your friends, and co-workers. You will agree that if the organisation which we all of us have been perturbed with so much effort is to last, we must behave in such a way that at any rate, there should be no discussion between us and that before time creats misunderstanding to winden the gulf if it is desirable that stapes should be taken to clear those misunderstandings and restore unity. What has shocked me

most is that many of our co-workers doubt your motives and your sincerity, a pretence to get popularity. They fear that behind your words and deeds there are always ultimate purposes which you conceal from your friends. I am quite prepared to accept that on every one of these points you have some explenation to offer. I must, however, state that explanation are not always quarrels. In fact, explanations may have just the opposite effect in as much as that when a man has an explanation to offer it means that he does not feel that he is called upon to improve his conduct. I am therefore, not interested in explanations. I am interested in rebuilding our unity and I hope that all of you will make a determined effort to see that our unity is not destroyed. That can only happen if what we are all doing in our public life has not as its object an attempt to get power and position. If we are determined to do no more than to serve the people leaving it to time and circumstances to brings the fruits of service if they can bring and be satisfied. If they do not, I think, we can hope to retain the unity we have so far achieved. I do not wish to expatiate on the subject more than I have done, and I hope it will bring about the desired result.

I am not going to be very long in politics. I want to get out of it and devote myself to something more congenial. What may happen in my absence, I cannot say. But let me give you and all the last one warning. You all seem to be saturated with local pride of your several districts. District pride comes before community cause. I have no doubt that this will ruin you all.

I am coming to Bombay on the 10th of January just for a day or two and shall be glad to meet you if you are there.

Yours sincerely,
Sd|- B. R. AMBEDKAR

**बाबासाहेबांच्या** वरील पत्राला **गायकवाडांनी** १०-२-४५ ला उत्तर दिले. आपल्यावरील आक्षेपांना उत्तर देण्याची संधी दिल्याबद्दल **गायकवाडांनी** प्रथम **साहेबांचे** आभार मानले. आपल्या कार्यकर्त्यांत एकोपा व संघटना याबद्दलची जाणीव राहिली नाही तर आपला पक्ष रसातळाला जाईल, हे सूत्र **साहेबांनी गायकवाडांना** परोपरीने सांगितले.

हे जे सूत्र **साहेबांनी** सांगितले, ते 'ते मी अखंड लक्षांत ठेवीन व त्याबद्दल जागृत राहीन' असे **गायकवाडांनी साहेबांना** आश्वासन दिले व त्यांच्यावरील आक्षेपांना खालील प्रमाणे उत्तर दिले.

१) **शांताबाई दाणी** ही सुशिक्षित व सुखांत वाढलेली तरुणी आणि **लॉंगरकर** हा गृहस्थ जरी सच्चा समाजसेवक आहे तरी तो कमी शिकलेला आणि जीवनांत अस्थीर असलेला असा आहे. त्याने सदर मुलीला मागणी घालावी हा त्या मुलीचा व सर्व जिल्ह्याचा अपमान आहे, असे मी समजतो. त्याने सदर मुलीचा नाद सोडावा, असे मी सावंतातर्फे त्याला निरोप दिला. हा गृहस्थ खानदेशांतील एका सुशिक्षित मुलीसाठी (लग्नासाठी) प्रयत्नात होता. विजोड विवाह संबंधात स्वतःला अडकवून घेण्याचे प्रयत्न त्याने यापुढे करू नयेत असे मी त्याला मित्र व सहकारी म्हणून सांगितलेले आहेत.

२) **भोळे**, थैली अर्पण करण्याचे प्रयत्न कांही लोक करीत होते. पुणे जिल्ह्यातील चिंचोली या गावचा एक इसम मला सदर समारंभाच्या स्वागत मंडळाचे अध्यक्षस्थान स्वीकारा, म्हणून सांगण्यास आला होता. माझ्या कार्यबाहुल्यामुळे त्याला मी नकार दिला. दुसऱ्या खेपेस तोच गृहस्थ माझ्याकडे आला आणि जनतेने थैलीला द्रव्यसाहाय्य करावे, अशी मी एक जाहीर विनंती पत्रीका काढावी असे त्याने सुचविले. मुंबईत **भोळ्यांनी** एक चित्रपटगृह विकत घेतले आहेच. तेव्हां त्यांना थैली अर्पण करण्याची काही अवश्यकता नाही, असेही मुंबईतील लोक बोलतात. असेही त्याने मला सांगितले. जो समाजसेवक सद्इच्छेने समाजकार्य करतो त्याला चरितार्थाचे साधन नसेल तर जनतेने त्याला थैली द्यावी, असे माझे मत मी त्या गृहस्थाला सांगितले व मी द्रव्यसाहाय्यासाठी जनतेला जाहीर विनंती करण्याचे नाकारले. या सर्व घडामोडी माझ्या घरी झाल्या. पुण्यातील कोणत्याही सभेत नव्हे. या गोष्टी पुण्यातील सभेत झाल्या, हा वृत्तांत आपणाला कोणीतरी सांगितला, हे खरोखरी आश्चर्य कारक आहे. पुण्यातील लोकांच्या थैली प्रकरणाला माझा विरोध आहे, असे आपणाला लोकांनी कसे सांगितले ?

३) मडकेबुवाविरूद्ध मला काही सांगावयाचे नाही. वरळीतील काही लोकांनी **भोळ्यांचे** अभिनंदन करण्यासाठी एक सभा घेण्याचे ठरविले. त्यांनी बुवाला विनंती केली की, तुम्ही अध्यक्ष व्हा. तेव्हा बुवा म्हणाले वरळीतील एका गृहस्थाने मला शिव्या दिल्यात. तेव्हां मी तेथे येणार नाही. नंतर ते लोक माझ्याकडे आले व मला अध्यक्ष

व्हा म्हणू लागले. मी त्यांना पुनः तुम्ही बुवानांच अध्यक्ष करा म्हणून सुचविले. त्या प्रमाणे ते लोक बुवांकडे अनेक वेळा गेले पण **बुवा** तयार होईनात. याच सुमारास मुंबईत असे प्रसृत झाले की, मी **भोळयाच्या** थैली प्रकरणाचा विरोधक आहे. हे मी जेव्हां ऐकले तेव्हां वरळीच्या सभेचे अध्यक्षस्थान स्विकारण्यास मी संमती दिली. यामुळे **बुवा** माझ्यावर चिडले. समता सैनिक दलाने, **बुवा** समता सैनिक दलाचे अध्यक्ष नसावेत असा ठराव केला खरा त्यांत माझा हात नव्हता, एवढेच नव्हे तर असा ठराव दलाने केला याचा मला थांग पत्ताही नव्हता! **बाबासाहेब** हे मी सत्य सांगत आहे, त्यावर तुम्ही विश्वास ठेवावा!!

४] सुमारे दोन वर्षांपूर्वी **वराळे** यांचे अध्यक्षतेखाली सभा झाली होती तींत, मी, **राजभोज** व इतर मंडळी बोलली. **तुळशीराम काळे** व **दाणी** हेही बोलले ज्या वक्त्यांनी तुमच्याबद्दल अनुदार उद्‌गार काढले त्यांचा खरपूस समाचार घेण्यासाठी आम्ही बरेच लोक उतावीळ झालो होतो. पण **वराळे** हे अध्यक्षस्थानी होते व त्यांनी आम्हाला बोलू दिले नाही. तुम्ही काळजी करू नका. मी त्यांचा समाचार घेतो असे सांगून **वराळयानी** आम्हाला गप्प बसविले. त्यांनी सदर वक्त्यांचा खरपूस समाचार घेतला. आम्ही त्या वक्त्यांची विधाने खोडून काढण्यास तयार नव्हतो या म्हणण्यांत कांहीच तथ्यांश नाही. आम्ही या विघ्नसंतोषी लोकांना नेहमीच छेडीत असतो.

आतां मजसंबंधी थोडेसे लिहितो. मला आपण कायदेमंडळांत निवडून आणले मोठ्या पगाराची जागा दिली. आणखीही इतर अनेक माझ्या हिताच्या गोष्टी आपण केल्या. त्याबद्दल मी आपला ऋणी आहेच. परंतु तेवढयाच करता मी आपणाकडे आकर्षिला गेलो, अगर त्या गोष्टींमुळे मी आपणाशी एकनिष्ठ राहिलेलो आहे असे नाही. पददलित समाजाच्या गुलामागिरीच्या शृंखला तोडण्यासाठी आपण जे सतीचे वाण हातांत घेतलेले आहे व केवळ आपल्याच अफाट कर्तृत्वाने त्या शृंखला तुटणार आहेत, अशी माझी श्रद्धा असल्यामुळे मी आपला एकनिष्ठ अनुयायी झालो आहे. मी खेड्यांतील दरिद्री शेतकरी कुटुंबातील आहे. आपल्या प्रेरणेने मीं जे काय थोडे बहुत समाज सेवाचे कार्य करीत आलो, त्यामुळे महार समाजाचे म्हत्रे व जिल्ह्यातील श्रीमंत महार लोक माझ्या नावाने खडे फोडीत आहेत. आपल्या समाजांत जे सुशिक्षित आहेत ते आशिक्षितांपासून दूर रहातात आणि त्यांच्याकडून मानापानाची अपेक्षा करतात. हे लोकही मला पाण्यांत पहातात. हे लोक भावी सामाजनेते म्हणून पुढे येतील याची मला जाणीव आहे. त्यांनी समाजांत मिळून मिसळून, वागून नेतेपद प्राप्त करून घ्यावे, अशी माझी इच्छा आहे. त्यांनी माझ्यावर वेळोवेळी आग पाखडून वातावरण दूषित केले आहे. तरी पण आपण, समाज सेवेचा जो दिव्य मंत्र आम्हांला दिलेला आहे, त्यामुळे या साऱ्या परिस्थितीला तोंड देण्याची उमेद मला

आलेली आहे. आम्ही स्थानिक अभिमान सोडावा व व्यापक दृष्टी ठेवून समाजसेवा करावी, असा जो आपण आम्हाला नेहमी सदुपदेश करतां तो सतत डोळ्यापुढे ठेवून आम्ही नाशिकमधील गढूळ वातावरण निवळविण्याचा प्रयत्न करू, आणि आपल्या नेतृत्वाच्या झेंड्याखाली समाजाच्या प्रगतीचा मार्ग मोठ्या उत्साहाने व आत्मविश्वासाने आक्रमण करू, अशी मी आपणास ग्वाही देतो.

श्री. गायकवाडांचे पयरनिर्दिष्ट पत्र मी खाली देत आहे :—

"Dhun Mansion,<br>Vincent Road,<br>Dadar, 10th February 1945.

My dear Babasaheb,

I am very much greatful to you for your letter of the 30th of December 1944 written at so great a length. The advice given therein I will always keep near my heart. I tried to find an opportunity to see you in your spare moments during your stay here but unfortunately I could not get one owing to yourself being busy all the time with your book.

No doubt I must not indulge in going explanations over matters narrated in year letter. But allow me Babasaheb to unburden my mind as those have done. I must also as in duty bound say before you the facts which occur to me as true and which according to my sight are right.

I do not hold in the least, nor have I said it anywhere that Mr. Lalingkar to covet the hand of Shantabai Dani would be derogatory not only to the girl but to the district. But I honestly believe that Lalingkar would do a great hard to himself in marrying an educated girl brought up in a life of ease and luxury. He is a sincere social worker and I think he would not but be lost to the cause by such an alliance. That is why I told Mr. Sawant and asked him to advice Mr. Lalingnkar to give up the idea. Mr. Sowant I think, will bear me out about this. You will be amazed to hear that Lalingkar is now seeking a young school going girl from Khandesh. As a friend and a co-worker I have advised him not to enter into such an unequal match.

Referring to Mr. Bhole I can assure you so far I am concerned nothing has occurred which would create any revulsion of feelings between us unless my views regarding presenting a purse to him are misconstrued by some. There was such a proposal some time back. A man from Chincholi, District Poona, once came to me requesting for a contribution to this purse and I readily expressed my willingness to do so. He then requested me to accept the Chairmanship of the Reception Committee that would be appointed for the purpose. I was not able to give my consent to this as I was busy in other work. A proposal was also made by him for me to issue an appeal under my signature requesting people to contribute to purse fund. On this occasion he said that Bombay people were quite averse to this proposal especially, as he said, Mr. Bhole was in a position recently to purchase a Cinema House in Bombay, I hold the view that the presentation of a purse to an individual would only be befitting, if a public worker has no means to maintain himself while engaged in social work. I expressed these views therefrom frankly to the man. This happened, however, at my residence and not at any public meeting attended by me. It is very unfortunate that people should have held this view as antagonistic to Mr. Bhole.

As regards Madke Buwa, I have nothing to say against him. But it seems he has somehow formed a bad opinion about me. Once there was a meeitng to be held in Warali area to congratulate Mr. Bhole. Worli people approached me and requested me that I should preside over the meeting as Madke-Buva was not willing to preside over a Worli meeting on the ground that a certain man from Worli had abused him once, and they also told me that man was not among them. I then asked them to approach Madke Buwa again, and if he refused I will accept the suggestion. Accordingly the Worli people approached Madke-Buva not only once or twice but, I am told, several times. They were however, disappointed. As I was thus, hesitating to preside over the Worli meeting there was one rumour that I was not so much in favour of Mr. Bhole's address, when I heard

this, I decided to preside over the Worli meeting. In my opinion this was the only instance for Madake Buva if at all to have a grudge against me since he was of the opinion that I should not attend the Worli meeting.

As regards the resolution referred to, in your letter, believe me, Babasaheb, neither I had any concern with the the resolution which the Samata Sainik Dal people passed, nor had I any knowledge thereof as to when it was passed.

As regards the first point I can say this much. Some two years back there was a meeting at Nasik under the presidentship of Mr. Varale. I spoke first, they followed Mr. Rajbhoj and other speakers. I remember Tulsiram Kale and Dani had spoken as stated in your letter. Many of us were anxious to reply these men. But Mr. Varale was in the chair he did not allow any other speaker and said, Don t bother, I will reply them, and accordingly he did it. It did not mean that we were not going to reply. I had rebuked these persons on several other occasions for similar mischiefs.

It may be impolite to give expression here to my feelings towards you. The embodiment of the hope of the down-trodden millions. Such considerations as your selecting me for the Assembly or your giving me a big post however greatly beneficial they may have been personally to me have no place in the depth of these feelings. These things may come and go but the firm belief that our people can break the bonds of slavery only under your leadership is ever lasting and unshakable whatever these friends and co-workers of mine speak or think about me. My duty is to carry on your mission and to imbibe the ignorant masses with your inspired message and keep up their spirit of struggle with an abiding faith in you. And considering myself as only a meagre fragment of your popularity with the people I must work with as such humility as possible. If this humility is construed by my co-workers as assumed I am helpless.

I may be wrong but I think our educated youths are not quite one with the ignorant masses and their popularity or unpopularity is in proportion to this oneness with the people. They expect respect from the people on account of their education and that alone is not sufficient to rouse the feelings of regard of the people towards them.

If you permit me, Babasaheb, I might just mention a few events in our struggle. The Mehetres or the old leaders of the Community who were imbued deep with local pride were always antagonistic towards me simply because I came from a small village which did not own their respect. They opposed me in my election. The rich and the well-to-do were against me because I came from a poor agriculturist family and it was only through your inspiring message of a broader out-look that I was able to face such time-honoured nations. I have now to face as I feel the attack of the educated notions. No doubt it is they who are to lead the budding generation of the future and I must not have any disrespect for their learning ignorant as I am, I must also, however, guard against their dreafting by losing a live contact with the multitudes of the ignorant masses. And I am confident I will be able to do it, I am rightly armed with the spirit of your message, I will always bear in mind your advice to cast away local prides. As a matter of fact, I can scarcely ever forget this valuable advice as I had myself to face the attacks of such prides.

In conclusion, I will always remember your advice in respect of the rebuilding of the unity of our people and I would always endeavour to do my best through your guidance and love which has ever been my shut-anchor to unify all the forces to carry on our struggle with unabated zeal under your banner.

With dutiful and kind regards to yourself,

I am,
Yours ever sincerely,
Sd/- B. K. Gaikwad."

श्री **गायकवाड** यांना मोठ्या पगाराची जागा साहेबांनी दिली ती आपल्या खात्यामार्फत. तेव्हां खात्यामार्फत सुपरिंटेंडिंग इंजिनियर यांनी **गायकवाड** यांची शैक्षणिक लायकी, सामाजिक कार्यातील अनुभव, इत्यादिकांबद्दल २२-२-४५ ला **गायकवाड** यांना तार करून चौकशी केली. ("XVL New Delhi 20. STE. 30 Westeernger Bombay, 03180- E/11, Wire Gaikwad Academic Qualifiifications. Studied any Social Science if graduate. Has any social work experience other than in present appointment. — ZAMBA SSERD"). २२ फेब्रुवारीला **गायकवाडांनी** तारेने सुपरिंटेंडिंग इंजिनिअरला उत्तर दिले की आपण विश्वविद्यालयाची एकही परीक्षा पास नाही. आपला समाजसेवेचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास झालेला **नाही** परंतु २० वर्षे समाजसेवेचा अनुभव आहे. शिवाय आपण (१) पब्लिक हेल्थ कमिटी, नाशिक, (२) नाशिक डिस्ट्रिक्ट व्हिलेज इंप्रुव्हमेंट कमिटी, (३) प्राइस कंट्रोलकमिटी नाशिक डिस्ट्रिक्ट, (४) जेल व्हिजिटर्स कमिटी नाशिक (५) नाशिक डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट कमिटी (६) नाशिक डिस्ट्रिक्ट फॉरेस्ट ॲडव्हायसरी कमिटी, (८) नाशिक म्युनिसिपल स्कूल नाशिक म्युनिसिपॉलिटी, (९) नाशिक डी. एल. बी., व (१०) प्रॉव्हिन्सियल व (११) प्रॉव्हिन्सियल क्लास बोर्ड गव्हर्नमेंट ऑफ बॉबे, यांचे सभासद होतो, आणि ऑल इंडिया म्युनिसिपल वर्कर्स फेडरेशन, म्युनिसिपल वर्कर्स ऑर्गनायझेशन ऑफ दी नाशिक डिस्ट्रिक्ट आणि डिप्रेस्ड क्लासेस असोसिएशन, नाशिक डिस्ट्रिक्टचे चिटणीस आणि इतर कांही संस्थांचे अध्यक्ष आहोत.

समाप्त

# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

## चरित्र खंड ९ वा

(ले. श्री. चां. भ. खैरमोडे)

## संदर्भसूची

English


1) Ambedkar, Dr. B.R. — 1) Thoughts on Pakistan (1940).

2) Pakistan or Partition of India.

2) Ahamad, Din — Some Recent Speeches and Writings of Mr. Jinnha (Vol. I) (1952).

3) Alva, Joachim — Men and Supermen of Hindustan.

4) Bose, Nirmal K. — My days with Gandhi.

5) Chaudhary, Ram Narayan — Bapu As I saw him.

6) Coupland, R. — The Cripps' Mission.

7) Edib, Holide — — Inside India.

8) Gandhi, Devidas — India unreconciled (A Documentary History of Indian Political Events From Crises of August 1942 to 1944).

9) Gurumukh, Principal Nihalsing — The Indian Constituent Assembly.

10) Govt. Publication — The Armies in India and their Evolution.

11) Hamson W.H. (ex Detective Inspector) — I Was Chirchill's Shadow.

12) Kabir, Hnmayun — Muslim Politics.

13) Kailash Chandra — Tragedy of Jinnha (1941).

14) Keith Calbrel — Pakistan A Political Study (1957)

15) Krishnalal — Warning to the West.

16) Longer, Victor — The Rise and Fall of The Indian Army.

17) Lohia, Ram Monahar — Sir Stafford Cripps.

18) Masani, M. R. — The Communist Party of India (1954).

19) Mehta, Ashok & Patwardhan Achyut — A Communal Triangal In India

20) Malcmunn, Lt. Gen. Sir George — Martial Race of India.

21) Overstreet, C.D. and Windmillar — Communism In India.

22) Robertson, Alexander — Mahar Folk.

23) Saiyid, M.H. — India's Problem and her future Constitution (A Collection of Essays — 1940).

24) Subramannyam M. — Why Crips Failed.

25) Thomson, Edward — Enlist India for Freedom (1940)

26) Thorat, SPP. Colonel Major Gen. D.S.O. — The Regimental History of Mahar M.G. Regiment.

27) Williams, Francis — A Prime Minister Remembers.

28) Ten Years To Freedom.

## मराठी

29) देसाई ह. वि. — मोठ्यांच्या मुलाखती.

30) देशमुख, बॅ. गोविंद विनायक — 'गोविंद गोपाळ' देशमुख चरित्र.

*English Periodicals:—*

31) The Times of India.

32) Dwan,

33) Illustrtad Weekly of India.

34) The Bombay Chronicle.

35) The People's War.

36) The Liberator (Madras).

## मराठी नियतकालिके

37) आशा प्रमोद

38) जनता

39) दलित बंधु

40) नवयुग

41) लोकमान्य

42) विविधवृत्त

43) प्रबुद्ध भारत

44) ज्ञान प्रकाश

## संकीर्ण

45) Ambedkar, Dr. B. R. — a) Grievances of the Scheduled Caste.

b) Why Indian Labour is Determined to Win This War.

46) कोरेगावच्या विजयस्तंभावरील शिलालेख

47) Letter to Miss Milared G. Dveskeka.

48) Letter to Bhaurao Gaikwad.

49) सप्रू-जयकर पत्रव्यवहार.

# चरित्र लेखकाचा अल्पपरिचय

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्रकार श्री. चां. भ. तथा आबासाहेब खैरमोडे यांचा जन्म पाचवड, ता. खटाव, जि. सातारा, येथे १५ जुलै १९०४ मध्ये झाला.



१९२९ मध्ये बी.ए. झाले. एम. ए., एलएल. बी. च्या टर्मस भरल्या परंतु सेक्रेटरीएटमध्ये नोकरी मिळाल्याने परिक्षेस बसले नाहीत. त्यांचे सामाजिक चळवळीवरील लेख व कविता १९२३ ते १९६४ या काळात अनेक नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या. १९२९ साली त्यांचे 'अमृतनाक' हे खंडकाव्य प्रसिद्ध झाले. युनिव्हर्सिटी ऑफ व्हिस्कानसन (अमेरिका) येथील रॉबर्ट मिलर यांचा "Button Button......Great Tradition Little Tradition Whoes Tradition?' या शिर्षकाखाली ॲन्थ्रापॉलॉजिकल क्वार्टरली व्हॉ. नं. ३० जानेवारी १९६६ ला लेख प्रसिद्ध झालेला आहे. त्यांत 'अमृतनाक' बद्दल गौरवपर उद्‌गार काढले आहेत.

बाबासाहेबांच्या 'शूद्र पूर्वी कोण होते.' हिंदु स्त्रियांची उन्नती व अवनती यांचे अनुवाद श्री. खैरमोडे यांनी केले ते प्रसिद्ध झाले. श्री. आबासाहेब खैरमोडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासात आल्यापासून त्यांचे चरित्र लिहिण्याच्या दृष्टीने प्रचंड सामुग्री जमा करून चरित्राचे अठरा खंड प्रसिद्ध करण्याचा संकल्प केलेला होता. १९५२ ते १९६८ पर्यंत ५ खंड प्रसिद्ध झाले. ६ वा खंड छापत असतानाच म्हणजे १८ नोव्हेंबर १९७१ ला त्यांचा मृत्यु झाला.

१९८३ पासून पुढील खंडांचे काम म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळाने हाती घेऊन ६, ७ व ८ हे खंड प्रसिद्ध केले. हा ९ वा खंड आता प्रसिद्ध होत आहे. १० वा खंड मंडळाने हाती घेतला आहे.

पूर्वी प्रसिद्ध झालेल्या चरित्र खंडावरील कांही अभिप्राय खंड १ (द्वितीय आवृत्ती) व खंड ५ यांत दिलेले आहेत. याबरून श्री. खैरमोडे यांच्या कर्तृत्वाची, अचूक व साधार लिहिण्याच्या प्रवृत्तीची साक्ष पटते.